पारिजात

प्रकाशन

# उपकारी माणसें

[ महाराष्ट्र-समाज व त्याच्या भाव-भावना ]

यांचा

प्रदीर्घ चित्रपट

खंड २ रा

## अभ्र-पटल

पुष्प ३ रें

—रघुवीर सामंत, ठाणें.



श्री. गोपाळ सदाशिव नणदीकर बी. एस्सी.
यांनीं
'पारिजात प्रकाशनसंस्थे' साठीं
प्रसिद्ध केलें.
कोल्हापूर; अनंतचतुर्दशी १८६०

—सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन—

—सोल एजंट्स व डिस्ट्रिब्यूटर्स—
श्री. दा. ना. मोघे, बी. ए.,
स्कूल अँड कॉलेज बुक-स्टॉल, कोल्हापूर.

—मूल्य—

साधी प्रत रु० २।  अँटिक प्रत रु० ३।

श्री. वा. ना. ठकार,
यांनीं
कोल्हापूर येथें श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेसमध्यें
मुद्रित केलें.

याच लेखकाचीं

प्रसिद्ध पुस्तकें

## हृदय-
हा शब्दचित्रें व लघुकथा यांचा संग्रह रसिकमान्य झाला आहे. महाराष्ट्रांतील दलित वर्गांतील व्यक्तींचीं हुबेहूब कलात्मक अशीं मार्मिक शब्दचित्रें यांतील प्रत्येक पानांत सांपडतील. शब्द-चित्र हा अभिनव प्रकार या पुस्तकां-पासूनच प्रामुख्यानें रूढ झाला आहे. त्यामुळें त्या दृष्टीनेंही अभ्यासू वाचकाला हें पुस्तक संग्रहणीय वाटेल. पृष्ठें २५०

किंमत २ रुपये.

## सुरंगीची वेणी-
रशियन लेखक रॅमेनॉव्ह, याच्या 'विदाउट चेरी ब्लॉसम' या पुस्तकांतील, निवडक लघु-कथांचें हें रूपांतर, इतकें सुंदर झालें आहे कीं, मराठी रूपांतरित वाङ्मयांत याला बरेंच प्रमुख स्थान दिलें जातें. पृष्ठें १६०

किंमत ८ आणे.

मिळण्याचें ठिकाण—
भारत गौरव ग्रंथमाला,
चिराबझार मुंबई २.

## वाळूंतील पाउलें
हा दुसरा लघुकथासंग्रह विविधता, कलात्मकता, भावनाविष्कार या सर्व गुणांनीं सुंदर झाला. किंमत १। रु. पृष्ठें १७५ (अन्यत्र कूपन पहा.)

## -पारिजात-
या रसिकमान्य व महाराष्ट्रांतील सर्वश्रेष्ठ लेखकांच्या लेखांनीं नटलेल्या मासिकाचे, जानेवारी १९३४ ते फेब्रुवारी १९३५ अखेरपर्यंतचे संग्राह्य चौदा अंक. एकत्रित कापडी बायंडिंग, पृष्ठें ११०० रॉयल साइज.

किंमत ६॥ रुपये.

☞ स्कूल अँड कॉलेज बुकस्टॉल,
कोल्हापूर.



# रघुनाथ ज. सामंत
( जन्म २४ डिसेंबर १९०९ )

महाराष्ट्रीय वाचकवर्गास, कुमार रघुवीर या नांवानें, हे १९३० सालीं विशेष परिचित झाले. 'शब्दचित्र' हा नवीन वाङ्मयप्रकार, महाराष्ट्रांत त्यांनींच विशेष रूढ केला. १९३२ सालीं, त्यांनीं 'हृदय' हा आपला शब्दचित्रें व लघुकथा यांचा संग्रह प्रसिद्ध केला. यांतील अनेक चित्रें शालोपयोगी पुस्तकांतूनहि आतां मुलांपुढें येत आहेत.

१९३३ डिसेंबरपासून त्यांनीं आपलें 'पारिजात' मासिक सुरू केलें व तें थोड्याच महिन्यांत आपल्या गुणांनीं रसिकप्रिय झालें; तरी शेवटीं, तें अल्पजीवीच ठरलें.

१९३४ सालीं 'वाळूंतील पाउलें' हा दुसरा विविधता व कलात्मकता यांनीं नटलेला लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाला. १९३५ डिसेंबरमध्यें प्रसिद्ध झालेलें, 'सुरंगीची वेणी' हें रूपांतरात्मक पुस्तकहि वाचकवर्गाच्या मनाची पकड घेणारें ठरलें.

त्यांच्या लेखनाचे विशेष, म्हणजे मूलगामी पण कलात्मक दृष्टि, साधी सुटसुटीत ओघवती भाषा, व व्यापक मानवी भावभावनांचा पाया, असें थोडक्यांत सांगतां येतील.

त्यांचें 'पारिजात' मासिक १९३५ सालीं बंद झाल्यावर, आतांपर्यंत दरम्यान दोन तीन वर्षें, त्यांचें स्वतंत्र लिखाण फारसें प्रसिद्ध झालेंच नाहीं. प्रस्तुत कादंबरी १९३६ मध्यें लिहून तयार होती; तरी ती आतांपर्यंत प्रकाशांत आली नाहीं.

ही प्रदीर्घकथा महाराष्ट्रसमाजाच्या पार्श्वभूमीवर व्यापक स्वरूपानें चित्रित केली असल्यामुळें, तिला मराठींत अभिनव व महत्त्वाचें स्थान आहे. यांतील विविधता, जिव्हाळा, परिचित भावभावनांचा आविष्कार, व्यापकता, महाराष्ट्राच्या प्रत्येक रसिक वाचकाला चटका लावल्यावांचून रहाणार नाहीं.

प्रकाशक

प्रिय सौ. छाया ताईस —
[handwritten initials]
2-10-87

## अर्पण

ज्यांच्या
स्नेहाळ व सहानुभूतिशील उत्तेजनामुळेंच
मी सरस्वती-मंदिरांत माझीं पहिलीं पाऊलें
टाकलीं ते माझे विद्वान् व प्रेमळ स्नेही
**श्री. त्र्यंबक शंकर शेजवलकर** बी. ए.
यांस
ही माझी आनंददायी अल्प कलाकृति
स्नेहादरपूर्वक समर्पण.



लेखकाचीं
—आगामी पुस्तकें—

**प ण त्या**
( लघुनिबंधरत्नें )
दिपवाळी १८६० मध्यें
प्रसिद्ध होईल.

**आ का श-गं गा**
[ तृतीय खंड ]
डिसेंबर १९३८ मध्यें प्रसिद्ध होईल.

**तां डा**
( लघुकथासंग्रह )

**ता रां ग ण**
( चिमुकल्या चांदण्यांचा संग्रह )

# उपकारी माणसें

## (खंड २ रा)

# अभ्र-पटल

खड्खड् आवाज करीत गाडी लांब निघून गेली, तसा अरुण तळेगांव स्टेशनाच्या फ्लॅटफॉर्मची उतरण मंद गतीनें चालू लागला. हळूंहळूं पावलें टाकीत रुळ ओलांडून, तो उघड्या रेल्वे फाटकांतून गाडीरस्त्यावर आला; अत्यंत त्रस्त मनानें त्यानें जवळच्याच फर्लांगाच्या पांढऱ्या दगडावर सुन्नपणें बसकण मारली!

इतर राजकैद्यांबरोबर मुक्त होऊन, तो पांच मिनिटांपूर्वीच आगगाडीनें मुंबईचा पल्ला काटूं लागला होता. पोलिसांनी त्याच्या हातीं दिलेलें तिकीट, अजूनहि त्याच्या खादीच्या आंगरख्यांत, फाऊंटपेनशेजारी पडलें होतें.

पण त्याजवळच्याच त्याच्या हृदयांत, गेल्या तीन चार दिवसांतील प्रसंग, आता पुन्हां पुन्हां गिल्ला करीत होते!

: ३२८ :

गाडींत बसल्यावर त्यानें एकाएकी आपला विचार बदलला त्यावेळीं रमणीकलाल भट त्याच्या शेजारींच बसला होता. अरुणच्या मनाची चलबिचल त्याच्या लक्षांत आली, तेव्हां गेल्या दहा महिन्यांतील आपल्या त्या स्नेह्याला प्रश्न विचारल्यावाचून रमणीकला कांहीं केल्या रहावेना. तरटाला तरट लावून बॅरॅकमध्यें ते अनेक रात्रीं झोंपत आले होते. हलक्या आवाजांत कुजबुजून अनेक वेळा त्यांनीं विचारविनिमय केला होता. त्यामुळे अरुणनें, 'मी आतां तळेगांवला उतरतों,' असें म्हणतांच 'अरे केम, सूं कारण, भाई?' असा एकदम काय बदललात बेत? कोठें जाणार आतां?' असले प्रश्न विचारण्याचा रमणीकला एकप्रकारचा हक्कच वाटावा यांत नवल नाहीं!

पण अरुण त्यावेळी कांहींच बोलला नाहीं. गाडी हळूं हळूं चालत शेवटीं तळेगांव स्टेशनांत उभी राहिली. अरुणनें दरवाजा उघडला व स्टेशनवर मुग्धपणेंच उडी घेतली.

''हें काय अरुण भाई? मग आतां मुंबईस येणार तरी केव्हां तुम्हीं? आजच्याच दिवसापुरतें हें तिकीट आहे, हें लक्षातं आहे ना नीट?'' रमणीकनें शेवटी स्वतःच त्याला पुन्हा प्रश्न विचारले.



''अंऽ?...'' अरुण आपल्याच विचारांत गढला होता; त्यामुळें तो किंचित् गोंधळलेल्या मनानेंच म्हणाला, ''मी येईन दुपारच्या गाडीनें आतां!''

''बरं, पण आलात मुंबईला म्हणजे भेटा मात्र हं जरुर मला!'' रमणीक चालत्या गाडीच्या खिडकीतून तोंड काढून अरुणला अगत्यानें म्हणाला.

''हां हां! .... जरूर मळशो, रमणभाई!...'' अरुणहि हात वर करून त्याला म्हणाला. पण त्याचें चित्त मुळींच ठिकाणावर नव्हतें. तोच, रमणीकभाई त्याचकडे स्नेहल दृष्टि लावून आपल्या नेहमीच्या प्रेमळ पद्धतीनेंच हंसत आहे. हें पाहून मात्र अरुणनें आपली खिन्नता आंतल्या आंत दाबली; व गाडीबरोबर हळूंहळूं दूर जात क्षणाक्षणाला बारीक होणाऱ्या रमणीकच्या मूर्तीकडे प्रेमानें पाहून तोहि हंसला. गाडींतून लांब निघून जातांना, अरुण हात वर करून खूण करीत असल्याचें रमणीकला दिसत होतें. पण आपले उसळणारे विविध मनोभाव आंतल्या आंत दाबून टाकणारा अरुणचा कृत्रिम उत्साहच त्यांत त्याला दिसला असावा.

: ३२९ :

ज्याच्या संगतींत, आपला तुरुंगांतील काळ, अनेक प्रकारच्या विचारविनिमयांत व हिंदुस्थानची भावी राष्ट्रीय सुखस्वप्नें चितारण्यांत अरुणनें घालविला होता, त्या रमणीकभाईच्या शेवटच्या सहवासाचा असा विचार करीत, तो त्या रस्त्याच्या कडेला असा बसला होता; तोंच त्याला एकदम कोणाचा तरी प्रश्न ऐकूं आला,

''बाबूजी, स्टेऽशन किधर है?...''

अरुणच्या मनांतील पुढील विचारांना अनपेक्षितपणें एकदम खंड पडला आणि त्यानें मान वर करून पाहिलें; हातांतली खुळखुळी काठी, कमंडलु व कपड्यांचे गबाळें घेतलेला एक शुभ्र व भव्य दाढीचा भस्मचर्चित म्हातारा साधू त्याच्यापुढें उभा होता. त्याने पुन्हा तोच प्रश्न विचारतांच, अरुण चटकन् भानावर आला व त्यानें त्याला हातानें सांगितले, '' अंऽ?...हे स्टेशन! कहां जाओंगे आप?...''

''पहेले बम्बई- और उधरसे डाकोरजी जाऊंगा, बाबूजी!...''

असें म्हणून आपल्या शुभ्र दाढीवरून त्यानें एकदा हळूंच हात फिरविला व पुढें तो हिंदींतच म्हणाला ''ना आगा ना पिच्छा. सच जिंदगीहि ऐसीच चल गई हमारी! ईशचिंतनके आनंदसे उह जादा कुछ नहीं है! और अभी मेरी एकहि इच्छा रही है!.. डाकोरजीके पास इस मर्त्य शरीर रखना !...और,... अच्छा जी! ...तो स्टेशन उधरहि है ना?..''

''हां हां!....'' अरुणनें त्याला हातानें पुन्हा स्टेशनची दिशा दाखवीत म्हटलें. आणि नंतर

त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून अरुण खिन्नपणें आपल्याशींच हंसला!...

त्या जुन्या खोडाच्या जगाकडे पहाण्याचा एकंदर बेफिकीर वृत्तीची अरुणला गंमत वाटली! आणि मग क्षणभरच त्याच्या मनांत उत्कट इच्छा उत्पन्न झाली, कीं त्याच्याबरोबर आपण आणखी चार गोष्टी चाललों असतों तर बरें झालें असते!

पण तोंपर्यंत साधू थोडें अंतर चालूनहि गेला होता!.. तोंच अरुणला एकदम आठवण झाली. मुंबईपर्यंतचें तिकिट आपल्याकडे आहे. त्याचा त्याला उपयोग होईल. आणि त्यानें लागलीच साधूला पुन्हां हांक मारली.

''ए लेब साधूजी!'' तो हांकेसरशी जवळ येतांच, तें तिकिट त्याच्या हवालीं करीत अरुण म्हणाला, ''बंबईतक तो आपकी मुशाफरी ठीकठाक हो जाएगी!..उस्से आगेकी कुछ बात मैं कर न सकता हूं! पर, साधुजी, दुपेरतक आपकू गाडी नहीं है!

या अचानक देणगीनें त्या साधूलाहि झालेला आनंद त्याच्या हंसणाऱ्या म्हताऱ्या डोळ्यांत स्पष्ट दिसत होता. क्षणभर आश्चर्यानें व प्रेमानें अरुणकडे टकमक पहातच उभे राहून, लटलटणारे आपले म्हतारे कापरे पाय स्टेशनच्या बाजूला पुन्हां फिरवीत, एकदां मागें मान करून पहात तो साधू अरुणला म्हणाला, ''परमात्मा आप का भला करेंगा, बाबूजी!...''

: ३३० :

तो म्हातारा काठी टेकीत टेकीत लांब जाऊन शेवटीं फाटकाजवळून वळलेला दिसतांच, अरुणहि त्या दगडावरून उठला; व पुण्याच्या रस्त्यानें मंदमंद पावलें टाकीत चालूं लागला.

''काय वेडा म्हातारा हा!'' चालतां चालतां अरुण आपल्याशींच निराशेनें हसून म्हणाला, ''डाकोरला जायला निघाला आहे म्हणे. रेल्वेच्या चांचपणींतून धक्के खात खात, आतां त्याचा केव्हां प्रवास संपेल कोणास ठाऊक? त्यापूर्वी मध्येंच कुठें हा व ह्याच्या आयुष्याचा प्रवास संपला नाहीं म्हणजे मिळविली!.. आणि तसं पहावं तर मरण याच्या दारांत सारखं उभंच आहे!.. तरी उत्साह केवढा दांडगा! म्हणतो आहे, आतांपर्यंतचं आयुष्यहि सगळं असंच गेलं!''

थोडा वेळ मुग्धपणेंच चालल्यावर अरुणला वाटलें, ''जगाला काय उपयोग याच्या असल्या या धडपडीचा?..''

आणि या शेवटच्या विचारानें मात्र, अरुणला न कळतच पुन्हां एक धक्का बसला. एकाएकीं स्वतःच्या आतांपर्यंतच्या धडपडीविषयी त्यांच्या मनांत पूर्वीच्या विचारांची नवी गर्दी लोटली.

आणि आपण रमणीकभाईबरोबर मुंबईस जावयाचें सोडून, आतां कोठें कशासाठीं जात आहों, याची त्याला स्पष्टशी कल्पनाहि होईना. गेल्या चार दिवसांतील, किंबहुना त्याच्या साऱ्या



तुरुंगवासांतील, अनेक दृश्यें चालतां चालतां त्याच्यापुढें उभी राहूं लागली!...

: ३३१ :

दोन दिवसांपूर्वीचीच गोष्ट!... रमणीकलाल भटनें, रात्रीं रकट्यावर पडल्या पडल्या, आपल्या बंडीखालून, एक वर्तमानपत्राचा कपटा काढला व हळूंच अरुणच्या हातीं कोंबला. गडवाल शिपाई, बाबू गेनू, वडाळा, धारासना सारे प्रसंग त्यांच्यासमोर असल्या पद्धतीनेंच उभे रहात आले होते. ही चालतीं, कुजबुजतीं वाचनालयें आतां तर त्यांच्या अगदी अंगवळणींच पडली होतीं.

नऊ वाजावयास अजून अवकाश होता. बॅरॅकमधील दिवा जळत होता. अरुणनें तो चुरगळलेला कागद नीट केला व बारीक डोळे करून अंधुक उजेडांत तो तें वाचूं लागला.

सर्व वाचून पाहिल्यावर मात्र स्वतःच्या डोळ्यांवर अरुणचा विश्वासच बसेना! 'गांधी व व्हॉइसरॉय यांचा समेट!.. वाटाघाटी जोरांत चालल्या आहेत. आणि एकदोन दिवसांत करारहि होणार!...''

त्याला क्षणभर वाटलें, 'आपण वेडे तर झालों नाहीं ना?...'

भरकन् पलीकडल्या राजकैद्याकडे तो बातमीदार कपटा लोटून, त्यानें निराशेचा एक सुस्कारा सोडला.

रमणीकभाई आपल्या बोलक्या डोळ्यांनी त्याच्याकडेच मुग्धपणें पहातच होता. अरुणची व त्याची दृष्टादृष्ट झाली तरी दोघेहि प्रथम कांहींच बोलले नाहींत.

इतक्यांत झोपण्याची वेळी झाली. 'सो जाव' हा शिस्तीचा हुकूम ऐकून साऱ्या कैद्यांमध्यें झोंपण्याची एकदम चुळबूळ झाली!

''केम अरुणभाई, सूं विचार करो छो?'' कांहीं वेळ गेल्यावर काळोखांतच रमणीक हळूं हळूं बोलूं लागला.

पण अरुणभोंवती सारा अंधकार पसरला होता. तो आपल्या दोस्ताकडे पाहून खिन्नपणें हंसला व कुजबजत म्हणाला, ''मोठी सुखस्वप्नें केलीं होतीं आपण, रमणीकभाई!...आतां तीं विरूं लागलीं... नव्हे विरलींच सारीं! यापुढें कसला विचार, कपाळाचा? ही सारी नाहक धडपड आहे, आपणा प्रवाहपतितांची! नाहीं?''

''छे छे! इतके निराश कां होता?'' अरुणकडे अर्धवट काळोखांत पाहून रमणीक बोलत होता, ''गांधीजींचा हेतु मोठा आहे. शुद्ध आहे!''

''रमणीकभाई, आपण सारीं शेवटीं दुबळीं माणसेंच नव्हत कां?'' पडल्या पडल्या स्नेहानें त्याच्या पाठीवर हात टाकून अरुण म्हणाला, ''आपलीं ध्येयें काय?... आपण करीत आहो

काय?.. मला कांहींच समजत नाहीं यांतलं योग्य अयोग्य काय तें!..पण..जाऊं द्या तो विषय सध्या!.. उद्यां काय तें नक्की समजले! मग चालूं!..

त्यानंतर त्या रात्रीं ते दोघेहि एकमेकांजवळ मुकाट्यानें पडून झोंपण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत होते!

: ३३२ :

आणि त्या धडपडींतच शिस्तीची सकाळ उजाडली. त्यांच्या भिवा वॉर्डरचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्या खुनी भिल्लाच्या प्रत्येक कठोर शब्दांत, प्रत्येक दृष्टिक्षेपांत, जणूं खून भरल्याप्रमाणेंच दिसे!

'चलो उठो!' 'लपेट बिस्तारा!' 'उठाव बिस्तारा!'.. 'चलो जोडी जोडी!-'

आणि त्याप्रमाणें ती राजकैद्यांची रांग साऱ्या हुकुमांना मान नमवीत आपल्या बॅरॅकमधून बाहेर पडली. नेहमींप्रमाणेंच 'वाक नीचे' 'डुबाव पॉट' करीत त्यांनी तोंडें धुतलीं. ओळीनें बसून पांढऱ्या पिठल्यासारखी कांजी घशाखाली उतरवली. आणि कामाच्या वांटणीप्रमाणें त्यांच्या निरनिराळ्या रांगा होऊन, ते आपापल्या कामाच्या विभागांत जाण्याची वाट पाहूं लागले.

: ३३३ :

रात्रींच्या त्या विशेष बातमीनें अरुणचें मन तर अगदीं सुन्न झालें होतें. तो आपल्या रांगेंतून कामावर गेला आणि इतरांप्रमाणेच यांत्रिक पद्धतीनें बागेंतील कामास त्यानें कशीबशी सुरवात केली. पण-

साडेनऊ झाले, भत्ता आला व पुन्हां हुकुम सुरूं झाले. रांगेनें सारे बसल्यावर त्यांच्या नंबराप्रमाणें त्यांना जेवण मिळालें. अरुणनें त्याच ओळींत बसून त्याच्यासमोर आलेल्या दोन नंबरच्या दोन भाकऱ्या मोडून खावयास सुरवात केली!- खातां खातां साऱ्या रांगेकडे गंभीरपणें पण अतिशय खिन्न मनानें पहातां पहातां, त्याच्या मनांत एकच विचार सारखा येत होता, ''Whither?.. कोठें चाललों आहों आपण?..''

पण मग जेवणानंतरच्या कामास थोड्या विश्रांतीनंतर पुन्हां सुरवात झाली! शिपाई बाजूस बसला होता. त्यांचा कुळकर्णी वॉर्डर त्यांच्या बाजूबाजूनें फिरत मधून मधून त्यांना हुकूम सोडीत होता. पण आज त्याच्या आवाजांत नेहमींचा करडेपणा नव्हता. कडक शिस्तीची अपेक्षा नव्हती.

कुळकर्णी अशी देखरेख करीत फिरतां फिरतां, अरुण काम करीत होता तेथें आला. आणि थोडा वेळ त्याच्याकडे पाहून तो आपल्या कांहींशा सुरकुतलेल्या चेहऱ्यावर हास्य आणीत सौम्यपणें हळूच म्हणाला, ''ठाकूर, सावकाश होऊं द्या हं सारं आज! हा शेवटचा दिवस आहे तुमचा कामाचा!-''

त्याच्या त्या शब्दांनी एकदम दचकूनच, अरुणनें त्याच्याकडे पाहिलें. जें त्याच्या मनाला प्रशस्त वाटत नव्हतें,.. किंबहुना खरेंहि वाटत नव्हतें,.. तेंच अगदी सत्य असें ठरण्याची चिन्हें पाहून, एकाएकीं आपल्या हृदयांत नांगी सलल्यासारखेंच अरुणला वाटलें. अगदी बावरल्या चेहऱ्यानें त्यानें कुळकर्ण्यांना हताशपणेंच विचारलें, ''काय म्हणतां?''

''गांधीशीं सरकारचा समेट झाला आज, ठाकूर!'' कुळकर्णी वॉर्डर गंभीर मुद्रेनें त्याच्याकडे पहात म्हणाला, ''तुमचे उद्यां जातांना वापरावयाचे कपडे धुवून ठेवण्यासाठीं, तुम्हां सर्वांना एक तासानें मोकळे करा, असा हुकूम झाला आहे मला!..''

आणि कुळकर्णी वॉर्डर पुढें कांहीं एक न बोलतां आपल्या फेरीसाठीं पुनः पुढें निघून गेला!

अरुणनें त्याच्याकडे पाहिलें. कुळकर्ण्याच्या जातां जातां ओझरत्या दिसलेल्या चेहऱ्यावर, या राजकैद्यांच्या सुटकेचा आनंद व स्वतःच्या भवितव्याविषयींची निराशा या दोन मिश्रभावना स्पष्टपणे पसरल्या आहेत असेंच त्याला वाटलें!

आणि कुळकर्णी दूर निघून गेला तरी त्या वॉर्डरची मूर्ति अरुणच्या दृष्टीसमोरून कांहीं केल्या हलेना!

: ३३५ :

गेले चार महिने, अरुण त्याच्याच हाताखालीं हें बागेचें काम, करीत आला होता. त्यामुळें जवळ जवळ पन्नाशीच्या सुमाराचा तो म्हातारा कुळकर्णी वॉर्डर आतां त्याच्या अगदीं पूर्ण परिचयाचा झाला होता.

त्याचा सुरवातीचा करडेपणा, कठोरपणा, त्यानंतरचें त्याचें कांहीं बाबतींतील जाणून बुजून होत असलेलें शिस्तींतील दुर्लक्ष, मधून मधून दोन चार प्रेमळ वाक्यें, मग एकदां अरुणविषयीं आस्थेनें त्यानें विचारलेले प्रश्न व शेवटी अत्यंत दुःखी अंतःकरणानें त्यानें त्याला एकदां सांगितलेला आपल्या आयुष्याचा इतिहास! कुळकर्ण्याच्या असहाय्य संसारी दुःखी मनाची त्यावेळची काय ती धडपड!...

आजहि कुळकर्ण्याच्या गंभीर चेहऱ्यावर याच साऱ्या गोष्टी जणूं कोरलेल्या आहेत असें अरुणला वाटत होतें!...

: ३३६ :

कुळकर्णी हा कांहीं अशिक्षित गळेकापू लफंगा नव्हता. सात वर्षांपूर्वीचा तो एक प्रतिष्ठित संसारी गृहस्थ, बाकी राहिलेल्या पुढच्या पांच वर्षांचे दिवस मोजीत, मेल्या मनानें, मेलें अन्न

खात, आज हाताखालच्या कैद्यांना ढोराप्रमाणें वळविण्या बसविण्याची कर्तबगारी करीत बसला होता. आपली बाँबे बँकेतील कॅशिअरची सव्वाशेंची नोकरी विसरणे त्याला भाग पडून एक साधा कैद्यांचा वॉर्डर याहून त्याची आजची तेथील किंमत, योग्यता जास्त नव्हती;.. व तशी कसली अपेक्षा करण्यासहि त्याला मुळींच जागा नव्हती.

पांच मुली, चार मुलगे, प्रेमळ बायको, यांच्या गराड्यांत आयुष्याच्या चाळीशीपर्यंत प्रेमानें संसार करणारा तो कारकून, बाहेरच्या जगांत रहाण्यास एकाएकीं, नालायख ठरला; व एके दिवशीं या दुदैवी लोकांच्या येथल्या चिमुकल्या जगांत येऊन पडला !

कां?.. कसा?

अगदीं साधी गोष्ट!.. जगांत साऱ्या बाजूस दिसून येणारा मोह! हो, पैशाचा मोह!..

चार मुलींचीं लग्नें झालीं होतीं. दोन मुलांचें कॉलेजपर्यंतचे शिक्षण झालें होतें! त्याच्या मुंबईतील खर्चिक संसारांतून बाजूस पडलेली कांटकसरीची सारी शिल्लक तर केव्हांच संपुष्टांत आली होती.

आणि मग नवीन लग्नसराई आली. नवी मुलगी लग्नाची झाली. रुप, गुण यांच्यापेक्षां द्रव्याची किंमत केव्हांहि जगांत विशेष मानलेली; त्यानें ती आजपर्यंत पाहिली होती, अनुभवली होती. हो, .. त्या अनुभवाशीं झगडतां झगडतांच, त्यांचें तोपर्यंतचें प्रामणिक आयुष्य गेलें होतें!

आतांहि शेवटी राहिलेल्या दोन्ही तरुण मुलींची लग्नें ठरत होतीं. पण मागितलेल्या हुंड्याच्या रकमा त्याच्याजवळ नव्हत्या. मग यावर इलाज काय?.. इतर सोंगाप्रमणेंच पैशांचें सोंग आणणें तर अशक्य!..

नेहमीं तर हजारो रुपये त्याच्या हातांत खेळत होते. आणि तो मात्र साऱ्या पांच सहा हजारांना नडलेला. आपल्याकडे नाहीं तें दुसऱ्या ठिकाणीं पुष्कळ आहे, या कल्पनेचा रोज रोजचा मनावरील संस्कार वाईटच एकंदरींत!.. मोह, बुद्धिभ्रंश, नाश.. सारें अगदी एकामागून एक येणार हें उघड उघड ठरलेलें!..

आणि त्याचप्रमाणें झालें!- शेवटीं कुळकर्ण्यांच्या दोन मुलींची वेळेवर लग्नें झालीं. पण त्यांचा संसार सुरूं होतो न होतों, तोंच, हे स्वतः आपल्या संसारांतून उठून इकडे आले होते!..

: ३३७ :

काम करतां करतां, कांहीं आठवड्यांपूर्वी डोळ्यांत पाणी आणून, कुळकर्ण्यानें स्वतःच सांगितलेला हा वृत्तांत अरुणला आठवला. यावेळीं शेवटीं तो म्हणाला होता, ‘‘अरुण, तुम्ही उमदे तरुण आहां. जगांत अजून तुम्हांला सारं आयुष्य काढायचं आहे. शिवाय मी जसा येथें आलो आहे, तसे



कांहीं तुम्हीं येथें आलेला नाहींत. म्हणूनच मी माझ्या दुर्दैवाची ही हकीकत तुम्हांला मुद्दाम सांगितली. तसें पाहिलं तर मी जगाचा अत्यंत अपराधी आहे, यांत तिळमात्र संशय नाहीं. पण अरुण, मी नीच नाहीं. जगांत त्या बाहेरल्या जगांत इतरांप्रमाणेंच मलाहि जगण्याचा हक्क आहे!.. पण’’

अरुणला त्याचे हे त्या दिवशींचे शब्द आठवून आजहि भरतें आलें. व त्या दुःखी दुर्दैवी म्हाताऱ्याकडे पहावें म्हणून तो त्या बाजूस मान फिरवतो, तों कुळकर्णीच पुन्हां त्याच्या मागें उभे!-

क्षणभरच दोघेहि कांहीं बोलले नाहींत ! एकमेक मुग्धपणें परस्परांकडे पाहून एकमेकांच्या दृष्टींतील भाव शोधण्याचा प्रयत्न करीत होते!

‘‘बरं तर अरुण!..’’ शेवटीं डोळ्यांत पाणी आणून कुळकर्णी म्हणाले, ‘‘माझी ओळख तुम्ही ठेवण्याइतक्या लायकीचा मी आहे कीं नाहीं कोणास ठाऊक!.. तुम्ही देशासाठीं आपल्या सर्वस्वाचा त्याग करणारी मंडळी!.. मी एक, कुटुंबासाठीं सामाजिक अक्षम्य अपराथ करणारा..क्षुद्र नीच मनुष्य!.. पण तरी मला तुमच्याविषयीं माझ्या हृदयांत आपलेपणा ठेवण्याचा खास हक्क आहे, मला वाटतें!.. आतां तुम्ही वाटल्यास माझी ओळखदेख ठेवा, नका ठेवूं!..’’

अरुणला अगदीं गहिवरुन आलें होतें... तो कुळकर्ण्यांना यावर कांहीं तरी उत्तर देणार, इतक्यांत त्यानें अरुणच्या खांद्यावर हळूंच एकदोनदां प्रेमळपणें थोपटलें व एकदम सर्वांना रांगेनें उभे राहण्याचा हुकूम दिला.

पण रांगेंत उभे रहाण्यास जाण्यापूर्वी अरुण घाईघाईनें कुळकर्ण्यांना म्हणाला, ‘‘बरं कुळकर्णी!.. आमच्या राध्यालाहि आमचा राम राम सांगा!..’’

कुळकर्ण्यानें त्याच्याकडे पाहून कृत्रिम निर्विकारपणें मान हलविली आणि पुढला हुकुम दिला, ‘‘एक कतार!’’

थोड्याच वेळांत आपले दुसऱ्या दिवशीं घालावयाचे कपडे धुण्यास सारे कैदी रांगेनें निघून गेले!..

बॅरॅकवॉर्डरच्या ताब्यांत साऱ्यांना देऊन परत फिरतांना, कुळकर्णी वॉर्डरनें अरुणकडे एक शेवटचा प्रेमळ दृष्टिक्षेप टाकला. क्षणमात्र हास्यमुद्रा केली व तो जड पावलें टाकीत तेथून निघून गेला.

: ३३८ :

शिस्तीच्या करड्या नजरेनें पहाणाऱ्या भिवा भिल्लाच्या-त्यांच्या त्या बॅरॅक वॉर्डरच्या नजरेखाली, आपले तुरुंगवासापूर्वीचे खादीचे कपडे, त्याच्या हुकुमाप्रमाणें हौदाजवळ धूत असतांना, अरुणला

त्याच्या कैदेच्या आयुष्यांतील दोन महिन्यापूर्वीचा असाच दुसरा एक प्रसंग आठवला!

आणि त्या प्रसंगाला उद्देशूनच त्यानें मधा कुळकर्ण्यांला शेवटीची विनन्ति केली होती. हो, त्या प्रसंगावरूनच अरुणला आपल्या कांहीं कौटुंबिक प्रसंगांचीहि आठवण झाली होती!

कुळकर्ण्याच्या देखरेखीखालीं मागें अरुण असाच बागेंत काम करीत होता. त्या दिवशी त्याच्यावर सोंपवलेलें काम त्यानें अर्धा तास आधींच पुरें केलें आणि जवळच्या एका झाडाखालीं तो विसावा घेत पडला होता.

शेजारच्या प्लॉटमध्यें काम करणारी साध्या गुन्हेगार कैद्यांची तुकडी अजूनहि तिथेंच होती! जवळच्या भागांत काम करीत असलेल्या त्यांतील एका कैद्याकडे अरुणचें सहजच लक्ष गेलें. आणि काय आश्चर्य वाटलें त्याला! दोन तीनदां विमनस्कपणें त्याच्याकडे पाहतां पाहतां तो दचकला.

अरुणला त्याचा चेहरा कोठेंतरी पाहिल्यासारखा वाटला. बराच वेळ डोक्याला ताण देऊन शेवटीं त्याला आठवलें, तो नानांच्या गांवड्यावरील त्यांचा गडी राघ्या!...

त्याच्या मनांतील सुप्त विचार पटकन् जागृत होऊन तो एकदम दचकला...

'जो शेवटीं वसंताच्या नानांच्या मृत्यूस कारण झाला तोच हा दुष्ट प्राणी!...'

पण राघ्याचा चेहरा काळजीनेंच जास्त गांजलेला दिसत होता. सूडबुद्धीपेक्षां निराशाच त्याच्या डोळ्यांत तरंगत होती. खाणाऱ्या मनाच्या पश्चातापापेक्षां हताश हृदयाचें दुःखच त्यांत दिसत होतें!..

आणि काय आश्चर्य!.. अरुणला तेथें तुरुंगांत पाहून राघ्याहि काम करतां करतां एकदम थबकून आश्चर्यानेंच ओरडला.- ''कोण? अरुण दादा??..''

अरुणला त्याच्या त्या प्रेमळ हाकेंत हताश हृदयाची शेवटची धडपडच दिसत होती!..

पण त्याच्या या गैरशिस्तीबद्दल, राघ्याच्या वॉर्डरनें सपकन् त्याच्या दोन कानशिलांत लगावल्या होत्या. आणि त्यानंतर निमूटपणें हातांतले काम करतां करतां, मधूनच अरुणकडे दीनपणें पहाण्यावांचून, राघ्याच्या तोंडून एकहि शब्द बाहेर पडला नव्हता.

: ३३९ :

अरुणनें ती सारी रात्र बेचैनपणें तरटावर तळमळून काढली. तो दुसऱ्या दिवशीं कामावर गेला व शेवटीं जेवणापूर्वी त्यानें कुळकर्ण्याला राघ्याची थोडावेळ भेट घडवून आणण्याबद्दल विनन्ति केली. कुळकर्ण्यानें प्रथम कायदेशीर कुरकुर केली; पण मग सहानुभूतिपूर्णपणें त्याला 'हो' म्हटलें व दोन तीन दिवसांतच, एका विसाव्याच्या वेळीं अरुणला राघ्याची भेट झाली!

राघ्या अरुणला भेटल्यावर प्रथम कितीतरी वेळा ढळाढळां रडतच राहिला. शेवटीं अरुणनें त्याची समजूत केल्यावर तो खिन्नपणें त्याला म्हणाला, ''दादा, तुम्ही बी म्हनाल-व्हय्.. मी नानाशेटचा खून क्येला..?''

''राघ्या, बाबा मला त्यांतलं कांहींच ठाऊक नाहीं!'' अरुण अतिशय कळकळ्यानें म्हणाला. ''खरं खरं काय तें तूंच सांग मला!.. माझ्या तुझ्यावर विश्वास आहे!.''

असल्या अकारण सहानुभूतीनें राघ्यालाहि जास्तच रडूं कोसळलें. पण वेळ थोडा राहिला होता. शेवटीं त्यानें मनाच्या आवेगांना प्रयासानें बांध घातलें, व अरुणला सारें सांगितलें.

: ३४० :

''दादा, आमच्या चांगो डोक्र्याला आमी कोन तुरुगांत जाऊं, याचं सपन बी पडलं नसंल! त्यानं काय कमी क्येलं व्हतं आमाला?.. बेसबरी शेतजुमीन व्हती: घराला पुरून बी मोप भात उरं. ऱ्हायाला आमचं मोटं झोपडं बी व्हतं. अन् म्हाताऱ्याचा बुढ्ढेपणीं थाट काय पुसता?.. ब्येस जरीचा रुमाल डोसकीला,.. रंगी बेरंगी बंडी अंगांत, आन्.. तांबड्या निळ्या पट्ट्यांचा लय उंची किमती लंगूट!.. करकर वहाणा वाजवीत चांग्या डोक्रा चालला बगा, कीं बुड्ढ्याचा जरीचा रुमाल वाऱ्यावर उड!.. आन् लंगट्याचा शेव पाहून घ्यावे, जाणाऱ्या येणाऱ्यान् रस्त्याच्या!.. पण दादा, बावलीबिगर येकबी यसन नाय बगा...

आन् मंग त्याच्या म्होरं आमचा बाबा?..दाम्या न्हव कां-त्यो तर काय दादा? तरन्यापनींच ढंग करूं लागला येकयेक! येकबी यसन ठ्येवलं नाय त्यानं, दादा.. त्याच्या अंगांत आळुसच भरला व्हता जनूं.. काय बी काम रोजगार करीना, आन् मंग जिमिनी लागल्या नाना सावकाराकड् गहान पडाया...

आमी बगा समदी पोरांपोरां.. आमाला बी ढंग लागलं दारूचं. दारांत पिठाच जनूं..अन् आमचा बाबा तर दारून् सदा झिंगलेला! गहान सोडविना.. जमीन कसंना, काय बी करना! पैसं तरी कुठून आननार हो?.. इयेवट, दादा, नाना सावकारान् कर्जापायीं आमची समदी जमीन घेतली आपल्या नावावर करून..

आमचा बाबा अन् त्याची आमी पोरं.. समदी अन्नालाबी म्हाग झालों पगा... आन् येक दीस बाबा बी दारूंत बुडला! अन् म्येला..! म्हन्लं, चला आमी सुटलों!

आतां पगा, घरां मी आन् आमचा काठ्या!... काठ्या ग्येला तुमच्याकड् कामाला, आन् मी लागलो रोजान् मजुरी कराया. थोडा सांवरलो;..

त्यें दीस कायबाय ब्येस चाललां व्हतां माजां!...

: ३४१ :

पन् येक दीस नाना सावकाराचं बोलावणं आलं; त्यानं काढला व्हता धंदा, आतां कसा आन् काय सांगूं, दादा?... आमच्या गांवाजवळच बोगदा व्हतां, त्यांत मालगाड्या लुटायचा!...

तवां मी म्हनलं..'नाय नाना, आमी तुमच्या पायाचं चाकुर..पन् असा नका करूं..मी आन् माझी हौशी मजुरींत ब्येस बरी सुखी हांव्'..

पन मंग बगा, येक दीस नाना सावकाराचा पटानच बिजुन् दारांत उबा.. म्हनला 'तेरेकू नाना शेटने कामकेवास्ते बुलाया है.' तवा म्यां लाचारान् काय करायचं? मंग दादा, नानाच्या आन् पटानाच्या धाकान् मी बी येक दीस आपसूक त्यांच्या टोलीत ग्येलो!..

दोन म्हैनं आमी अशी लुटालुट केली, दादा!.. मोप कापाडबिपाड, दानागोटा भरून न्येला.. पोलीसबी समदे आमाला सामील.. आम्ही राजरोस समदं करावं आन् पैसंबी खूप मिलवावं.. आमाला जनूं चटकच लागली समद्याची श्येवट!.. खोटं कशाला बोलावं, ..दादा?..

पन येक दीस आमी रोजच्यावानी नाना सावकाराकडं हुकमाला ग्येलों..

तो थतं दारांत पोलीस आन् त्यो राक्षस पटान!.. आमचं तर तवां धाबंच दनानलं!.. श्येवट पोलीस आलं. आमालाच समद्यांनीं धरलं, हाणलं आन् पोचवलं पांच पांच वर्साला खडी फोडाया.. तुरुंगांत!...

संताप संताप झाला अगदीं.. मी तुरंगांत जातांना सावकाराला म्हनलं बी, 'नानाशेट,..संबाळ! मी सुटूं तर द्ये! तुझं येक हाड ठेवीन जाग्यावर तर नावाचा राघ्याच न्हवं!..'

: ३४२ :

त्यावेळ पांच वर्सां कशी ग्येलीं, ती काय सांगूं, दादा? माजी हौशी घरीं येकली! आन् मी थतं खडी फोडत न् चक्की पिसत!.. मना तर सुचत बी नसं बघा!..

आन् मग एकदीस सुटून घरां गांवड्यावर ग्येलो. मना ब्येस बरं वाटलं.. 'आता घरीं जाऊं, हौशीला भेटूं,.. उजून मजुरी करूं लागू आन्'...

पन् दादा, काय सांगणार तुमाला, तुमच्या नानाशेटची करनी?.. सपन बी नवतां माज्या मनाला.. आमची वयनी तर साध्वी व्हती बगा साध्वी! ती ग्येली मरून आन् नानाला लागले ढंग सुचाया. मग दादा, त्यानं गोड गोड थापा मारून, शेवटीं माज्या हौशीलाच नासवली. मी हिकडं तुरुंगात ! तवा ती बी बायको मानूस फसली!..

काय सांगू दादा माजी उटंबना!.. मी घरी ग्येलो, तवा परतक्ष माज्या बायकोन् माज्या पाटींत काट्या हानल्या!.. अर्र्र्र्.. मना जनुं इंगळ्या डसल्या!.. मी थतन् आमच्या टोलीच्या मानसांत ग्येलो.. खूप खूप दारू झोकली आन् समदे थितंच खोपटांत पडून रायलों झिंगून!



आता म्होरं काय सांगू आमचां दुर्दैव, दादा!.. त्याच दिसा आमच्या गांवांत दुसऱ्या एका बामनाच्या घरच्या कणग्यांतल्या भाताची चार मुढ्याची चोरी झाली. दुसऱ्या दिसा नाना सावकार आला चौकशीला पोलीस घेऊन! देवबी कोपला बगा!.. बामनाच्या भातासारखं भात, आमच्या झिंग्याच्या खोपटांत गावलं! आन् दादा आमांला समद्यांना दोन दोन वर्सांची पुन्हां खडीफोड आली!...

आमी तुरुंगात संतापलों संतापलों! पन् सावकाराची भीति अजून दोन वर्सांतरी ग्येली!

दादा, आमच्या कुटुंबाचा, आन् माजा सवताचा, नाना सावकारानं असा अगदीं सत्यानाश क्येला!.. तुरुंगांत म्यां डोळ्यातून पानी काडावं; पन दादा, आमा गरीबांचा कोन आयकनार!.. कोन हाय वाली?

..माझा काठ्या तुमच्या घरीं बाबांकड् रायला आन् ब्येस सुटला;..त्येवडंच, दादा आपलं मना तुरुंगात सुक वाटं!

गेल्या मार्गशेरांत मी पुना सुटलो, दादा! तसाच गांवड्याकडं घरां ग्येलो! आपल्या गांवची ओड सुटतेय् थोडीच, दादा?

पन् मग हौशी कोनाचा हात धरून ग्येली व्हती. आन् माजी शेतीजमीन काय बी रायली न्हवती!.. सैतानासारखा, मी गांवांतून, हिकडे तिकडे फिरत व्हतो बगा! करमनां म्हणून गांवाच्या धर्मशालेकड् चालूं लागलो. पन् म्होरं पगतो तर, काय दादा..

गांवाच्या भाईरून नाना सावकार सावकास चालत येत व्हता!.. मना मोप राग आला व्हता त्याचा, दादा त्या थ्येरड्यानंच माजा समदा घात क्येला व्हता! माजी पायाची तिडिक येकदम डोसकीला ग्येली.. मना काय करावं काइबी समजना..

मी तसाच झपझप पुडं ग्येलो;.. नानासावकार, दादा, माझ्या अगदीं अस्सा समोर!

अन् मना बघतांच म्हातारा बी चमकलाच मनामंदी.. पन त्याची तेड ग्येली न्हवती!.. मी जवळ जाऊन रागानें असा समोर उभा रायलो. पन् बोललो नाय्, हात उगारला नाय्, शबुदच फुटंनां भाईर!..

तोंच नानाशेट एकदम वरडला..''काय रं, शिंदडीच्या, सुटलास व्हय तुरुंगातून?.. आतां पुना माज्या गांवांत चोऱ्यामाऱ्या व्हतील सुरूं!.. तुमा लोकांना ल्येको तुरुंगात डांबून न्हाइ चालनार नुसतं! तुमी पाजी हलकट!.. ठासनीच्या गोळ्या न्हाई, उंदराच्या गोळ्या घालूनशान ठार क्येलं पायजे तुमा साऱ्यांना?''

: ३४४ :

दादा, आम्ही गरीब लांचार, आन् नानाशेटचे नोकर. पन् आमालाबी बगा मान हाये कीं नाय? नाना सावकार बोलत व्हता ते शबुदच ऐकून मना संताप आवरना!.. जवळ मना आवराया बी तवा थितं कोन न्हवतं!.. मी गांजलो व्हतों, नबळा झालो व्हतो;.. दादा, माझ्यान् ऱ्हावना!

मी येकदम धावून त्याच्या अंगावर ग्येलो, आन् नानासावकाराच्या कानफटांत ब्येस येक भडकावली!..

पन म्हातारा शाप नबळा झाला व्हता.. त्याचा यकदम झोक ग्येला आन् धाडकान् दगडावर पडला! डोसकीला खोंक पडली. रगत भळभळ गळूं लागलं!..

नाय म्हनलं तरी पाठी त्याचं अन्न खाल्लं व्हतं मी, दादा!.. मी एकदम घाबरलो,.. धांवलो आन् त्याला उचलून घ्येतला. पन् रगत गळायचं थांबना! मनाबी काय करावं समजना. आन् आता रस्त्यांत समदे लोक जानार येनार.. धरला मना तर?.. ह्यो धाक आन् उराशीं!..

म्हनून मी त्याला तसाच टाकला, आन् माजा जीव घ्येऊन वाट सांपडंल थितं धांव ठोकली. दोन दीस मी लपून ऱ्हायलों. आन् श्येवटीं पंचनाम्यांत.. खटल्यांत.. समद्यांत ठरलं, दादा, मी नानासावकाराला कांठीन् हानला आन् खून क्येला!..

दादा, मी नानाला मारलं खरं; पन त्यो मरावा असं माझ्या सपनात बी आलं न्हवतं, बगा!..

मना सहा वर्सां तुरुंगात बिजून यावं लागलं, त्याचं नाय् इक्तं वाईट वाटत आतां. पन नानाला म्यां मारला, तो पांच सहा दिवसांत मेला! दादा, तुमच्या नाना सावकाराला, आमच्या वसंताशेटच्या बापाला, म्यां असा मारला बगा!..''

: ३४५ :

त्यावेळीं राघ्या ओक्साबोक्सी रडूं लागल्यामुळें अरुणला अगदीं राहवेना. त्यानें त्याच्या पाठीवर अत्यंत जिव्हाळ्यानें थोपटलें. पण पुन्हां कामाला सुरवात होईपर्यंत राघ्याचें सांत्वन कांहीं केल्या होईना!

अरुणला आपलें धोतर व आंगरखा पिळतां पिळतां, आज हा सारा प्रसंग आठवत होता. दुर्दैवी राघ्याच्या आयुष्याविषयींचा विचार त्याच्या मनांतून तेव्हांहि कांहीं केल्या जाईना!

'चलो जोडी जोडी!' भिवा भिल्लाच्या नेहमींच्या करड्या कठोर आवाजांतील हुकुमी शब्द ऐकून, अरुण दचकून एकदम भानावर आला; व रांगेत मिसळून मंद पावलें टाकीत टाकीत तो नेहमींच्या पद्धतीनें आपल्या बराकींत शिरला.

जेवणें वगैरे होऊन बराच वेळ झाला होता. बहुतेकजण जवळ जवळ बसून चालूं विषयावर आपापली मतें सांगत होते. कोणी आज बऱ्याच दिवसांनी राजरोस मिळालेल्या वर्तमानपत्रांतील



बातम्या वाचीत होते. वेळ कसा निघून गेला समजलेंसुद्धां नाहीं.

शेवटीं भिवा भिल्लाचा आवाज ऐकूं आला, 'सो जाव्!'..

अरुण व रमणीकलाल आपल्या नेहमींच्या टोंकाच्या जागेवर, आपलीं तरटें अंथरून, एक प्रकारच्या कृत्रिम शांततेनें जवळ जवळ पडले होते. त्यांच्या पलीकडेच भिवा भिल्लाची पथारी होती. त्याला ऐकूं जाणार नाहीं असल्या हलक्या आवाजांत ते दोघे कुजबुजूं लागले.

''रमणीकभाई, उद्यां तुम्ही कोठें जाणार, मुंबईला?..'' अरुणनें हळूंच विचारलें.

''हुं तो एच विचार करूं छुं!..'' रमणीक अरुणच्या पाठीवर हात टाकून म्हणाला. ''पन हूं, पेहले तो बॉम्बेच जवानो. अने पछी बद्धु जोसे!.. तमें क्यां ज्यासो, अरुणभाई?.. तमारा बाबापासे?..''

अरुणला प्रश्न पडला. त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

''अरे अरुण, भाई नाराज न थाय!.. जगतमें बद्धु एमच च्याले छे!..''

अरुण बोलत नाहीं असें पाहून सांत्वन करण्याच्या हेतूनें रमणीक त्याच्या पाठीवर थोपटीत शेवटीं मराठींत म्हणाला ''आशानिराशा मनुष्याला नेहमींच भेवडावीत असते, अरुण; त्यांतूनच वाट काढीत गेलं पाहिजे आपण, नाहीं कां?..'' अरुण तरीहि स्वस्थच पडला होता. तेव्हां रमणीकहि शांत राहिला.

कितीतरी वेळ दोघांचेहि मुग्धपणें विचार चालले होते!

: ३४६ :

''माझ्या आईची तुला गंमत सांगतो, अरुणभाई!'' शेवटीं रमणीकभाईच थोड्या वेळानें पुन्हां एकदम म्हणाला, '' ती कांहीं विशेष शिकलेली नव्हती. मात्र तिचें सांगणें मोठें सूत्रात्मक आणि श्रद्धेचें असे!..

ती मला सांगायची, 'रमण, तुला काय करायचं तें कर जगांत; पण तुझें मनच नेहमीं तुला मधून मधून घाबरवील मात्र! त्यावेळीं माझी ही एक कहाणी तुला कदाचित् उपयोगी पडेल, ऐकून ठेव आपली.

डिक्रा, मूल जन्माला येतं तेव्हां ते मोठ्यानें टाहो फोडतं. म्हणतं 'कॅहॅं कॅहॅं,.. मी कोण आहे? कुठें आहे?'... तेव्हां माझ्यासारखी त्याची आई त्याला पोटाशीं घेते आणि म्हणते..'असा गांगरून जाऊं नकोस बाळा!.. तूं भाग्यवान् म्हणूनच मनुष्य जन्माला आला आहेस! माणुसकी हा आतां तुझा धर्म झाला आहे. तुला या जगांत सारंच कांहीं सुख वाढून नाहीं ठेवलेलं, बरं!..दुःखं आणि संकटं तुला गांगरवून सोडतील! ती तर तुझी कसोटी! त्यांना तोंड देण्याची

तुझ्यांतील कुवत, तो तुझ्यातला मर्दपणा!.. आपल्याला जें जास्तीत जास्त योग्य वाटतं तें नेहमीं करीत असणं, हा तुझा ध्येयमार्ग!.. भोंवतालच्या मंडळींच्या सुखदु:खाकडे, त्यांच्या स्खलनशील जीवनांत, त्यांच्या हातून घडणाऱ्या लहानमोठ्या अपराधांकडे अगदीं सहानुभूतीनें पहाणें व त्यासाठीं नि:स्वार्थी त्यागी धडपड करणें, हें तुझें मानवी आद्यकर्तव्य! तुला बरेंवाईट, योग्यायोग्य सांगण्यासाठी सतत धडपडत असलेलें तुझें हृदय, हा तुझा ईश्वर!... आणि त्याच्या हांकेला ओ देण्याची तुझी अव्याहत धडपड, हीच तुझी ईश्वरभक्ति व ईशनिष्ठा!...

अरुणभाई, माझ्या मृत आईचे हे कळवळ्याचे शब्द मला नेहमीं आठवतात. मीं या शब्दांना जागूनच माझें जगांतील  प्रत्येक पाऊल टाकण्याचा प्रयत्न करतों. तुला मजविषयीं जास्त सांगूं?.. अरुणभाई, मी जात्याच कांहीं गांधींचा अनत्याचारी चेला नाहीं!.. पण आपल्या मायदेशाला सध्या योग्यअयोग्य काय याविषयींच्या खोल विचारानंतरच मी कॉंग्रेसचा सैनिक झालों. त्यावेळीं मी माझ्या हृदयांतील ईश्वराला जागलो. तसाच यापुढेंहि जागणार आहे!''

अरुणला रमणीकचा प्रत्येक शब्द मोतीमोलाचा वाटत होता. त्यांतील स्नेहाळ जिव्हाळ्यामुळें अरुणचें हृदय भरून आलें होतें.

इतक्यांत,त्यांच्याजवळ पसरलेल्या आपल्या रकटावर तळमळतां तळमळतां भिवा भिल्ल एकदम उठून बसला. दोघांनाहि वाटलें, आपल्या गैरकायदा कुजबुजण्यामुळें, शेवटच्या दिवशींहि तो वॉर्डर एकदम चिडूनच उठला आहे. आणि शेवटीं त्याला जागेवरून उठून त्यांच्याजवळच येतांना पाहून तर त्यांची तशी खात्रीच झाली!

: ३४७ :

पण भिवा घाईघाईनें दोघांच्याहि पायाशीं येऊन बसला व त्यांच्या पायाला आपल्या कपाळानें स्पर्श करीत तों ओक्साबोक्शी रडूं लागला.

त्या नेहमीच्या कठोर अंत:करणी भिल्लाला, आज तसा अश्रू ढाळतांना पाहून दोघांनाहि प्रथम आश्चर्यच वाटलें. ते दोघेहि लगबगीनें उठून बसले व त्यांनी 'अरे अरे' म्हणत भिवालाहि नीट उठवून बसविलें.

बराकींत येणाऱ्या चंद्राच्या अंधुक उजेडांत, त्या दोघांकडेहि अश्रु ओघळणाऱ्या दीन डोळ्यांनी पाहून भिवा पुन्हा हळूं हळूं मुसमुसून रडूं लागला.

तिघांचाहि, नंतरचा थोडा वेळ, तसाच मुग्धपणें एकमेकांकडे पाहण्यांत गेला. शेवटीं भिवाकडे प्रश्नार्थक दृष्टि फिरवून, त्याच्या पाठीवर रमणीकनें आपला हळुवार हात ठेवला. कांहीं वेळानें, भिवा अत्यंत आदबीनें शक्य तितक्या शुद्ध मराठींत, अडखळत अडखळत बोलूं लागला.



''तुम्ही मानसं, भाऊ, केवढी मोटीं! तुमच्या पायधुलीचे पन मले गरीबाले मोल नाई! पन भाऊ, मी तुम्हाले नऊदस मास खूप तरास लावला. दुनियेनें मले गरीबाले नाडलं, त्येचा सूड तुमपान कठोर वागून मी करस, तेच मले समाधान!... पन भाऊ, आतां उद्याले तुम्ही घराले जाताल, आन् मी आहे तिठेच!... माहे सारे आगळीले दया करा मायबास!...''

भिवा पुन्हां रडूं लागला. त्याला त्यांच्याबरोबरच्या आपल्या कठोर वागणुकीचा अगदीं पश्चात्ताप होत होता.

''अरे थांब, भिवा, असं वेड्यासारखं करूं नकोस!'' अरुण त्याला शांत करण्यासाठीं त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, ''आम्ही तुरुंगांत शिक्षा भोगायला आलों होतों, नाहीं तरी! नाहीं कां? आतां झालं ते झालं! हं,.. आम्हांला सांग बरं? तूं इथं कां आलास? राहणारा कुठला तूं?''

: ३४८ :

''भाऊ, मी त्येंच तुम्हाले आज सांगायाले तुमपान आलो!'' भिवा डोळे पुसत नवें अवसान आणून म्हणाला, ''मले न्याइ नाइ जाला दुनियेत! तुमी तरी करा आतां!..''

भिवा थोडा वेळ कपाळावर हात घेऊन खालीं जमिनीकडे पहात बसला व मग गोंधळलेल्या चेहऱ्यानें पुढें म्हणाला, ''भाऊ, मी खानदेशांतला ऱ्हानारा. माजेवाले धाकले कपशीचं श्येत रहात. जोंधलाबी घराले येत.

एक दीस सांजेला नांगर सोडला, बैल घराले हानले, आन् श्येतावरनं घराकडं निगालो, तवा वाटत येक नवखी पोर भ्येटली. ती घाबरलेली व्हती. रडत व्हती. आन् ती मले बोलत, 'मले मना बुढा नवरा बहुत तरास देत, मारहान करत. म्हनून मी आज तुमापायीं धाव घ्येतली! कोन मले वाली नाई! आतां मले आसरा देस!'

मी मर्द आन् ती पोर-सोनी, तरनीबांड! मी मनमे इच्यार करत, आपन गुन्यागोइंदानं ऱ्हाऊं! आन् मग तिले म्हनत, 'बरं तर, मी येकलाच से. तूं माजे घराले चाल! मनपान से ते तुलेमले!....आपन म्होतुर लावूं!'

मग भाऊ, आमी त्या मोरे च्यार वर्सा सुखांत काढलीं. मी आन् मायी सोनी!... श्येतांत खपत, लसनीभाकरीची न्हारी करत, दोन येळ आनंदान् जेवत,.. असे दीस चालत!.. आम्हाले कसलीबी काळजी नसे वाटत!..

पण शेवटीं, भाऊ, तिच्या पयल्या नवऱ्याले सोनीचा सुगावा लागला, आन् त्यानं कोडतात माज्यावर दावा गुदरला. झालं!.. आमचं सुकाचं दीस फिरल्ये!..

जडजानं म्हनलं, 'भिवा भिल्लान् गुना क्येला हाये. त्यानं सोम्या भिल्लाले त्याच्या पळून आलेल्या बायकोचा कबजा दिला पाहिजे!'

माज्या सोनीनं दोन हात जोडले, 'साह्येब, मी भिवाकडच -हानार!'

पन साह्येब म्हनले, 'बाई, कायद्यापरमानं मना वागाया पायजे!..'

आन् त्या सोम्या थेरड्यान् माजी सोनी परत नेली. मला ५० रु दंड झाला.

मग बगा माज्या जातीले कळलं. तिनी बी मनपान जात टाकली. भाऊ काय सांगूं? सरकारपेक्षां आमच्यांत जातीचा दंड भारी! त्यांना दारू बकरं समदं मिळाया पायजे. मना शंभर रुपये दंड क्येला. मी गांगरलो पन् जातीले दंड नाय म्हून कसं चालंल?.. पंचांले म्हनलं, 'तुमी चांगले मानसे, मी तुमपायले लेकूर..माटी! माले वागवून घ्या!' पन् कोनीबी आयकंना. आन् दंडाची आठ दीस मुदत दिली!

मी रडरड रडलो. आन् शेवटीं भाऊ, माझी जिमीन गाहन लावून दंड भरला. आन् पंचांले, जातीले, समद्याले, चार घटका चंगल झाली.

ते बर्साले मन्हं ध्यान कामावर नसे;... सोनीची आठवण करावी आन् रडावें. मन्हं कपाशीच पीक जळालं आन् सावकाराचे पैसे बी ग्येले. माजं पोट ग्येलं!.. समदा सत्यानास झाला!.. आन् सावकारन् जिमनी ताब्यांत घेतल्या!..

: ३४९ :

येक दिस मग मी असाच येका झाडाखालीं बसलो. ढळाढळा रडलो. म्हनलं 'माझ्या या सत्यानाशाले कारन कोन?... मनी सोन्यासारखी सोनी ग्येली! मनी शेत जिमीन ग्येली! काय करायचं या दुनियेंत -हाऊन आतां!' आन् ह्ये समदं या सोम्याचं काम! थेरड्याची याद झाली न् माजा अंगाचा भडका झाला. म्हन्लं 'त्या थेरड्याचे तुकडे तुकडे करील, त्याले ठार करील, तरच नांवाच भिवा भिल्ल!...'

तस्साच थतन् उठलो. त्या गांवाला ग्येलो. सोम्या ओहोळावरून सांजचा जाई. त्याची पालत ठेवली. आन् थेरडा जसा कां ओहोळापान आला, तस्सा मोरं घुसलों; आन् हातातल्या कुऱ्हाडीन् त्याच्या खांडोळ्या खांडोळ्या केल्या!... त्यायेळ आहोळाचं पानीबी रक्तानं न्हालं!...

मी जवां शांत झालो तवां वाटलं, ह्ये काय झालं? पन मंग म्हनलं आता ठीक!..आतां मराया मी तयारच हाये. आतां जातो पोलिसांत आन् सांगतो सारं!..

मी तडख उठून फौजदारापायीं ग्येलो आन् म्हनलं ''भाऊसाहेब, सोमा भिलाचा म्यां आतां खून क्येला! मले फांशी द्या ! सुटंन् मी!''



पन काय भाऊ हा सरकारी न्याव? खटला चालला,... आन् मी गुन्हेगार ठरलो; तरीबी दया म्हनून मले जन्माच्या तुरंगाची शिक्षा!..

..आतां तुमीच सांगा भाऊ, हा माजा यांनीं न्याव केला कीं अन्याव?.. अजून भाऊ, लडत लडत समदं आयुष्य जायचं!.. एकेक वारीले वाटतं समद्यांचे खून पाडावे!.. फांसावर लटकलो असतो म्हणजे सुटतो, भाऊ!.''

भिवाला बराच वेळ रडूं आवरतां येईना. त्याचा न्याय आपण करणार तरी कसा, हें न समजून, रमणीक आणि अरुण एकमेकांकडे त्रस्त मनानें पाहूं लागले. भिवाला राहवेना. शेवटी तोच ओक्साबोक्शीं रडत तेथून उठला व आपल्या तरटावर जाऊन पडला.

अरुण आणि रमणीक दोघेहि या अनपेक्षित प्रकारामुळें; व विशेषतः त्या वरवर क्रूर दिसणाऱ्या भिल्लाच्या हृदयापासून निघालेल्या अश्रूंमुळे दडपल्या अंतःकरणानें, कांहीं एक न बोलता आपल्या तुरुंगातील तरटावरील शेवटची झोंप घेण्यासाठीं पडले!..

(३५)

अरुण बिछान्यावर पडला तरी त्याला कांहीं केल्या झोपच येईना.

तुरुंगांतील सारे कैदी असे असतील असें त्याला वाटेना. पण तरीहि, या शेवटच्या प्रसंगामुळें, दुपारप्रमाणेंच, त्याच्यासमोर कुळकर्णी वॉर्डर, राघ्या यांचेहि आयुष्यपट उभे राहिले.

चार दिवस यांच्या संगतींत राहून आपण पुन्हां बाहेर चाललों आहों. आणि हे!.. या साऱ्यांचें येथील आयुष्य असेंच पुढें चालूं राहणार!.. हीं सारीं माणसें हृदयहीन पशू.. दगडच आहेत कां?..छे छे! किंबहुना यांनाहि सतत धडपडणारी, अश्रू ढाळणारीं हृदयें खास आहेत!.. त्यांनी देशासाठीं त्याग केलेला नाहीं! त्यांच्या कक्षा लहान लहानच होत्या. आणि त्यांतूनच फिरतांना त्यांनीं हे असले मोठमोठे समाजद्रोही गुन्हे केले!.. ते एक प्रकारें प्रवाहपतित होते व आहेतहि!..

पण मग तो एकदम दचकला. आपण यांहून कांहीं विशेष श्रेष्ठ आहों कां?.. कोणास ठाऊक?.. त्याची चित्तवृत्ति कांहीं केल्या स्थिर होईना!.. ''आमच्या कक्षा मोठ्या करून आम्ही तरी विशेषसं काय केलं?..हे सारे प्रवाहपतित! आणि आम्ही?''

त्यामुळें अरुणला एकाएकी स्वतःची सद्यःपरिस्थिती आठवली! आणि त्याचें मन, त्याच्या स्वतःच्या भवितव्यांत खोल बुडून, त्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न करूं लागलें!

अरुणला मनापासून वाटत होतें, गांधींनीं सुरवातीस ध्येय गांठेपर्यंत लढावयाचें ठरवून, असा मध्येंच समेट करण्यांत पुन्हां हिमालयाएवढीच चूक केली आहे!.. आजची राजकैद्यांची मुक्तता म्हणजे या येथील लहानग्या तुरुंगातून बाहेरील मोठ्या तुरुंगांत होणारें पदार्पणच!

: ३५१ :

..आणि आपली-व्यक्तिशः अरुण ठाकूरची-जबाबदारी?..

''ती तर पूर्वीपेक्षां जास्तच वाढली! आपल्या स्वतःच्या मनोमय आकांक्षा, ध्येयें यांना आपण दडपणें घातलीं आपल्या सर्व भावना...विश्वकौटुंबिक सामाजिक, व्यापक,..अशा देशाच्या आकांक्षांत मिळविल्या-विलीन केल्या. त्या कल्पनेमागें धांवूनच आपण देशासाठीं आपल्या माणसांशी झगडलो. त्यांना शेवटीं सोडलें-कायमचें पारखे झालो!.. अनत्याचारी असहकाराचें अमोघ अस्त्र, आपल्या मनावर आपला अंमल त्यावेळीं चालवीत असल्यामुळें, आपण आपलें वैयक्तिक जीवन तात्पुरतें पूर्णपणें बंद करून, या लढ्यांतील एक साधा सैनिकहि बनलो!.. देशाच्या आकांक्षांपुढें आपण आपलीं वैयक्तिक ध्येयें, यशें, आपल्या चित्रकलाप्रांतांतील श्रेष्ठत्व-पुढारीपण, सारें कवडीमोल ठरविलें! कां? त्यावेळीं, त्याहून श्रेष्ठ वाटणाऱ्या देशाच्या आकांक्षांसाठी त्याग करण्याची, आपल्याला अनावर इच्छा होती! -आणि ती अजूनहि आहे! -पण त्याबरोबरच देशाच्या उज्ज्वल भवितव्याविषयींच्या अपेक्षाहि नव्हत्या कां आपल्याला?-

आणि उलट आज वस्तुस्थिति काय दिसत आहे आपल्याला?...

पूर्वीचीं देशाच्या स्वातंत्र्याचीं सुखस्वप्नें तितकींच विरल.. तितकींच अस्पष्ट आहेत.. देश आहे तितकाच परकीय शृंखलांनीं जखडलेला!.. त्याच, तसल्याच व तेवढ्याच त्यागाची अप्रतिहत इच्छा आपल्या मनांत असूनहि,.. स्वातंत्र्य हातीं आणण्यासाठीं देशानेंच ठरविलेला हमरस्ता, तितक्याच दिमाखानें अगर मनाच्या तयारीनें पुढें तुडवून जाण्याची अंगांत हिंमत असतांना,.. आतां आपल्याला मध्येंच थांबावें लागत आहे!.. लाखों बांधवांचा मधल्या काळांतील हा त्याग एकप्रकारें तितकाच निरुपयोगी ठरत आहे!..

कां?..

असें अर्धवटपणें मध्येंच सर्व थांबवण्यांत सारी चूक होत आहे कां?... पण नाहीं... त्याच तावून सुलाखून ठरलेल्या धुक्यावर,.. मृगजळावर, विसंबून राहून, आपल्या हातचें सर्व गमावणें योग्य अगर अयोग्य.. याविषयीं कांहींहि ठरविण्यास आपण समर्थ नाहीं ! आपण केवळ शिस्तीचे गुलाम असे साधेसुधे सैनिक!.. प्रवाहपतितासारखेच लोंढ्याबरोबर आंत शिरलों! लोंढ्याबरोबरच आतां बाहेर चाललों!..ही धरसोड,.. कदाचित् गांधींचें हें नैतिक सौंदर्य..हार्दिक पावित्र्य!..पण ही मुत्सद्देगिरी खास नव्हे ! हें आमच्या एकप्रकारें नाशासच कारण होत आहे!..

पण गांधींना एकदम दोष देणेंहि त्याच्या जिवावर आलें, असल्या महान् गोष्टींना त्यागहि पुष्कळ करावा लागेल!.. तो पुष्कळ काळहि करावा लागेल -हें त्याला पटे!..

तरी आतां आपलें पुढें काय?.. या विचारांमुळें त्याच्या मनाचें मात्र मुळींच समाधान होईना!

: ३५२ :

हो, वैयक्तिक दृष्टीनें पाहिलें म्हणजे तर अरुणला वाटलें, '''हेंहि गेलें आणि तेंहि गेलें!'.. आपण शक्य तों सारा त्याग करावयास उद्युक्त झालों. अजूनहि जरूर तर तयार आहों; पण आजची आपली स्वतःची जगांतील खरी किंमत काय?

आपल्या वैयक्तिक आकांक्षांना तर आतां मध्येंच खंड पडला. ध्येयें मुरगळलीं गेलीं!.. व्यक्तिगत प्रगति तर खुंटलीच;.. जीवनकलहांतील आपली वैयक्तिक जबाबदारी मात्र दुणावली!.. भावनेच्या भरीं पडून, कर्तबगारी, कार्य यांची कक्षा.. व्याख्या आपण एकाएकीं आटोक्याबाहेर मोठी केली. आणि ज्यासाठीं आपले सारे पाश तोडून,.. सारीं माणसें सोडून,.. आपण बाहेर पडलों, तें सामाजिक कार्यहि तडीस गेल्याचें मनाला आतां समाधान नाहीं. त्यामुळें या अर्धवट दुबळ्या परिस्थितींत व मनःस्थितींत, आपली बाहेरील जगांतील निराश्रितता तर जास्तच वाढली!''..

अरुण असल्या विचारांनीं क्षणभर बराच गांगरून गेला. त्याला त्यावेळीं भकास वाटणाऱ्या आपल्या भवितव्यांत आपल्या शिरावर प्रेमळ छत्र असावें असें उत्कटतेनें वाटूं लागलें!... आणि त्याच्या मनांत, प्रथम त्याच्यावर निरपेक्ष प्रेम करणारी मावशी,.. त्यागी व उदारहृदयी मंजुळा, पोरकट पण प्रेमळ मिरा,.. यांचीं चित्रें उभी राहिलीं!..

पण पहातां पहातां मिरा अस्पष्ट झाली!.. मंजुळेला आजपर्यंत त्यानें दिलेल्या दुःखाच्या आठवणीनेंच त्याचें हृदय भरून आलें. मावशीकडे एकदम धांव घ्यावी, असें प्रथम त्याच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं; पण मग मावशी.. म्हणजे बाबा.. आणि त्यापुढलाच आपला इतर गोतावळा!-छे छे!..वेडा विचार!.. त्याला ती कल्पनाच सहन होईना!.. हो, तीं उपकारी माणसें!.. त्यांच्यातून बाहेर पडण्याची,.. त्यांच्यापासून शक्य तों दूर दूर जाण्याचीच, त्याची आजपर्यंतची सारी धडपड होती!..

मग आतां हा कमकुवतपणा कां?.. ओघानेंच ध्येयें पुन्हां संकुचित होणार आणि प्रथम जीवनकलहाला तोंड द्यावें लागणार!.. या जीवनकलाहासाठींच मनाची तयारी करून, दोन हात धीरानें खेळावेत व जगाचा याहून जास्त प्रत्यक्ष संबंध, तोंडओळख करून घ्यावी!..

त्यांतून स्वकर्तबगारींचा अंदाज तरी होईल!..

: ३५३ :

असल्या विचारांनी तळमळतच अरुणची सकाळ उजाडली. दिवसाच्या सुरवातीच्या साऱ्या गोष्टी, एकदां शेवटच्या म्हणून इतरांबरोबर तुरुंगांतील शिस्तींत करून, अरुणनें आपले आधल्या

दिवशीं धुतलेले कपडे अंगावर चढविले.

भिवा आला. त्यानें साऱ्यांना रांगेनें उभें केलें व इतके दिवस ते राहत होते त्या बराकींतून सगळे राजकैदी बाहेर पडले.

त्या पलीकडील लोखंडी गजांच्या दरवाजांतून ते बाहेर पडल्यावर भिवानें फाटक ओढून घेतला;... व आपला हात व डोकें त्या गजावर टेकून, तो बाहेरच्या बाजूस उभ्या असलेल्या अरुण, रमणीकलाल यांच्याकडे अश्रु भरलेल्या नेत्रांनी पाहूं लागला.

दोघेहि मागें फिरले, व त्यांनी भिवाचा गजातून बाहेर आलेला हात प्रेमळ, हळुवारपणें दाबला.

डोळ्यांतून अश्रु ठिबकतां ठिबकतां भिवा जड आवाजानें म्हणाला, ''साहेब, मी तुमांले फार तरास दिला. माफी करा आनी गरीबाची याद ठेवा!..''

''वेडे आहांत भिवाजी! कांहीं काळजी करूं नका!' अरुण स्नेहानें म्हणाला,

''आमच्या कुळकर्णी वॉर्डरना आणि राघ्या कोळ्याला माझा राम राम सांगा!''

भिवानें कांहीं न बोलतांच मान हलविली.

आणि चालतां चालतां मागें वळून, गजामागील भिवाकडे व त्या तुरुंगाच्या दारांतून दिसणाऱ्या त्या लहानग्या जगाकडे, अरुणनें एक शेवटचा दृष्टिक्षेप टाकला!-

: ३५४ :

असल्याच विचारग्रस्त मनःस्थितींत अरुण पुण्याच्या नव्या पुलापर्यंत केव्हां येऊन पोहोंचला तें त्याला समजलें सुद्धां नाहीं! त्या पूर्वपरिचित रस्त्यांतून जातांना त्यानें एकदां सभोंवार पाहिलें. सगळीकडे एकच गडबड घाई चालली होती. जगाचे व्यवहार पूर्वीप्रमाणेंच सुरळीत.. अव्याहत चालूं होतें.

त्याला आपल्या त्यागाची, नाहीं म्हटलें तरी थोडी फार जाणीव होती. त्यानें शिरोड्यास खाल्लेल्या लाठीमारानें झालेल्या जखमा हॉस्पिटलमध्यें भरून निघाल्या होत्या; तरी कपाळावरील घाम पुसतांना त्यांचे वण त्याच्या हाताला लागल्यावांचून राहिले नाहींत. नुकताच भोगून आलेला तुरुंगवासहि अरुणच्या स्मृतींत अजून ताजा होता.

मग मानवी मनाच्या लहानसान अपेक्षा अरुणच्या हृदयालाहि त्यावेळी भंडावीत असल्यास नवल काय? एखाद्या पुढाऱ्याप्रमाणें त्याला हारतुरे घालून रस्त्यांतून गौरवानें हिडवितील असें त्याच्या मनांतहि आलें नव्हतें!-तो तर विचारा साधा सैनिक! आणि हें तो जाणून होता;...पण केवळ आपल्याच लहानसान गोतवळ्यांत रममाण होऊन राहणाऱ्या त्याच्या भोवतालच्या बहुतेक जमावाहून, त्याची किंमत कांहीं तरी जास्त आहे, हा त्याला आत्मविश्वास खासच वाटत



होता!..

आणि तरीहि, तो आपलीं उच्च ध्येयें अर्धवट सोडून, आज त्याक्षणीं, बाहेरील जगांत निराश्रितपणें हळूंहळूं पावलें टाकीत होता.

: ३५५ :

दुपारीं बाराचा सुमार होता. सारखे चालून आल्यामुळें तो बराच दमलाहि होता. त्याला तहान लागली होती. कांहीं तरी खाऊन भूक शमवावी असेंहि त्याला वाटत होतें. भोंवतालीं दिसणाऱ्या उपाहारगृहांच्या पाट्या वाचतां वाचतां त्याला वाटलें, आपण त्यांतील एखाद्याचा आश्रय घेऊन, आपला आत्मा शांत करावा,.. थोडीशी विश्रांति घ्यावी!

पण मग प्रत्येक वस्तूला लागणारा जगाचा पैसा?.. त्याची त्याला साहजिकच आठवण झाली, आणि त्यानें आपल्या जीर्ण अंगरख्याच्या खिशांत हात घातला. पावली, चवली, एक आणा व दोन दिडक्या.. असे सारे साडेसात आणे त्याला त्यांत सांपडले. पण एवढ्यांत आपली भूक तहान विशेष ती काय शमणार? आणि या विचारानें त्याचें मन जरा रंजीसच झालें!

हळूंहळूं चालतां चालतां, त्याला वाटलें, निदान आजच्या दिवस तरी आपल्या आतांपर्यंतच्या त्यागाला किंमत देऊन, केवळ आपल्या वैयक्तिक विश्वासावर, कोणी आपल्याला पोटभर खाऊं देईल कां?

हा विचार मनांत येतो तोंच, त्याला समोर एक मोठी पाटी दिसली, - 'महात्मा हिंदु हॉटेल'!.. त्यानें विचार केला, 'पहावें तर खरें एकदां जगाची ही नवी प्रचीति घेऊन!..

पण..'

आणि या पणमुळेंहि तो आपल्याशींच एकदां हंसला!..

: ३५६ :

फारसा विचार न करतां, त्या हॉटेलच्या पायऱ्या चढून, तो आंत शिरला व कोपऱ्यांतील एका रिकाम्या टेबलाजवळ जाऊन बसला!

एक प्रकारच्या शून्यतेनें त्यानें एकदां आपली दृष्टि सभोंवार फिरविली! प्रत्येक टेबलापाशीं निरनिराळे लोक बसून कांहीं तरी खाण्यापिण्यांत गुंतले होते; व खाताखातां, पुष्कळजण गांधी-इर्विन समेटाविषयी आपापलीं मतें प्रतिपादीत होते!

आपल्या भोवतीं जणु ही देशभक्तीची दुथडी नदीच वाहून जात असल्यासारखं अरुणला क्षणभर वाटलें!... पण त्याक्षणीं तो मात्र तिच्यांतच गटंगळ्या खात होता!

एकाएकी त्याच्या डोक्यांत, आंत शिरतांना आलेला विचार, पुन्हां बळावला; व त्यानें एकदम

ऑर्डर दिली- ‘‘अर्धा शेर पुरी..पावशेर श्रीखंड..सुकी भाजी..कचोरी..सोले उसळ.. केळा भजी..’’

पोऱ्यानें अदबीनें सारें आणून पुढें ठेवलें; व बऱ्याच दिवसांनी त्या साऱ्या वस्तु समोर दिसतांच, अरुणनें त्यांचा मनापासून आस्वाद घेतला. वर दोन कप चहा तो प्याला. आणि त्याची भूकतहान एकदांची शमली!

पण आतां पुढें?

त्याला पुन्हां त्याच्या खिशांतील आण्यापैशाच्या भांडवलाची आठवण झाली. जगांतील एकंदर अनुभवाची चुणूक पहावयाचीच त्याच्यासमोर ही संधि आली होती.

पोऱ्यानें त्याच्यापुढें बिल आणून ठेवलें. अरुणनें त्यावरून दृष्टि फिरविली. त्यावर रेघी पद्दतीनें लिहिलें होतें ‘एक इसम...१ रुपया दोन आणे’

‘आणखी कांहीं पाहिजे?’ असें पोऱ्यानें विचारतांच, अरुण स्वतःशींच किंचित् खिन्नपणें हंसला; व त्यानें त्याला माननेंच ‘नको’ म्हटलें.

पोऱ्या लांब निघून जातांच, अरुणनें आपल्या खिशांतील साडेसात आण्यांचें भांडवल काढून पुन्हा एकदां मोजलें व त्या बिलावर रचून ठेवून त्या पोऱ्याला हांक मारली. पोऱ्या आंत येतांच अरुण त्याला सौम्यपणे म्हणाला, ‘‘अरे माझ्याकडे एवढेच आहेत आतां! बाकीचे एक दोन दिवसांत आणून देईन.’’

इतका वेळ आदबीनें बोलणाऱ्या बोलणाऱ्या पोऱ्याच्या चेहऱ्यावरील मार्दव एकदम निघून गेलें. थोडा वेळ अरुणच्या खरेपणाचा त्याच्या दृष्टीवरून अंदाज करून, नंतर एकदम जरा बेफिकीरीनेंच तो अरुणवर ओरडला, ‘‘चावटपणा काय लावला आहे, साहेब! खिसे चाचपून शिरायचं होतं कीं नाहीं आंत?..’

: ३५७ :

‘‘अरे, पण मजकडे जास्त पैसे नाहींऽत आतां!.. त्याला मी काय करूं, सांग’’ अरुण त्याच्याकडे पाहून कांहींशा कृत्रिम अजिजीनें म्हणाला.

पोऱ्यानंतर मुकादम तेथें आला, त्यानें मॅनेजरला सारें सांगितलें आणि ते तिघेहि शेवटीं अरुणभोवती गोळा झाले.

‘‘साहेब, ही काय आपली वागायची पद्धत झाली?..’’ मॅनेजर तावातावानें अरुणला चालत होता. ‘‘आम्ही काय असले झगडे सोडवायला हें दुकान घालून बसलो आहों वाटतं?.. तुमच्या खिशांतले पैसे प्रथम पाहून तुम्ही जीभ सैल सोडायची नव्हती!’’

‘‘हें महात्मा हिंदु हॉटेल नाहीं कां? मग हे पहा मॅनेजरसाहेब, नुकताच समेटामुळें तुरुंगांतून



सुटलो आज मी!- मी आतां येथें पैसे मिळवणार आहे!..’’ अरुण कांहींशा थट्टेनें पण गंभीर स्वरांत म्हणाला, ‘‘तुमचे दहा साडेदहा आणेच रहातात नाहीं का माझ्याकडे? ते मी मागाहून देईन आणून तुमचे, शक्य तितक्या लौकर! माझ्यावर जरा थोडा विश्वास ठेवा-’’

‘‘तें कांहीं आम्ही जाणत नाहीं, मिस्टर!..’’ मॅनेजर रागानें लाल होऊन, अरुण विषयींचा आदर कमी कमी करीत म्हणाला, ‘‘इथें कोणाची तरी ओळख काढा, वाटेल तें करा!.. टोपी गहाण ठेवा म्हटलें असतें पण नुसती खादीची आहे;.. नाहीं तर मग तुमचें तें खिशांतले फाऊंटनपेन ठेवून जा!.. तुम्ही हल्लींची सारी तरुण मंडळी ही अशीच! तुमचा वरचा तोरा तेवढा पाहून घ्यावा!..’’

भोंवतालची मंडळी आपली देशाच्या भवितव्याची चर्चा सोडून, अरुणच्या भवितव्याकडे पहाण्यासाठीं, आतां त्याच्या बाजूस तोंडें फिरवीत होतीं. कोणी जागेवरून उठत नव्हतें, कीं कांहीं विचारीत नव्हतें. सर्व निरीक्षण मुग्धपणेंच, पण अगदीं एकाग्रतेनें चालूं होतें!.. आणि लोक तिकडे पहात आहेत व अरुण आतां जास्त कांहीं चालत नाहींसें पाहून, मॅनेजरचें पुराणहि उत्तरोत्तर जास्तच वाढूं लागलें होतें!

अरुणला आपली ही अपेक्षेप्रमाणें होत असलेली फटफजिती पाहून निराशेचें खिन्न समाधान वाटत होतें. आतां त्याला खासच वाटलें, आपल्याला त्यांतून सोडवावयास खात्रीनें कोणीच येणार नाहीं!

तो मॅनेजर उलटा फिरून व इतरांना न्यायधीश करून, अरुणला हलक्या भाषेंत दोष देत होता; आणि इतर त्याचें चालणें मुग्धपणेंच ऐकत होते.

‘‘मग शेवटी म्हणणं काय तुमचं?..’ अरुण, थोड्या वेळानें, बऱ्याच बेफिकीरीनें हंसून म्हणाला, ‘‘तुम्ही मजवर विश्वास ठेवीत नाहीं हें ठरलं; पण माझ्याकडे पैसे नाहींत! तेव्हां मला येथून उतरावयाचं असेल तर हें फाऊंटनपेन तरी तुमच्या हवालीं केलं पाहिजे! असंच ना सारं?’’

‘‘अरे गृहस्था, तुझी माझी नाहीं ओळख!..’’मॅनेजर अजूनहि चिडलेलाच होता; शेवटी तो ‘अरे तुरे’ वर येऊन ओरडला, ‘‘तुझ्यावर आणि तुझ्या शब्दावर विश्वास तरी कसा ठेवायचा आम्ही? तेवढाच आम्हाला इथं धंदा आहे वाटतं?.. हें फाऊंटनपेन तरी काय नाइलाजानेंच घेणार आम्ही!. नाहीं तरी करायचं आहे काय तें फाऊंटनपेन म्हणा?-’’

अरुणला त्याच्या शब्दांतील वाढत चालेली बेफिकीरी जास्तच गंमतीची वाटली. तो जागेवरून उठला, आपल्या खिशांतील पेन त्यानें मुकाट्यानेंच काढलें व तें त्यानें मॅनेजरच्या हातीं दिलें ! आणि काढून ठेवलेली आपली डोक्याची टोपी घेण्यासाठीं तो जवळच्या खुर्चीकडे वांकला!

इतक्यात त्याला मागून एक गंभीर आवाज ऐकूं आला, 'थांबा हं जरा..'

: ३५८ :

त्या आवाजानें मात्र अरुण पुन्हां दचकला. अपेक्षेप्रमाणें सर्व घडून आल्यामुळें, त्याला वाटत असलेलें एकप्रकारचें खिन्न समाधान एकदम ओसरलें; आणि त्यानें मागें वळून पाहिलें!

काळ्याभोर दाढीनें विभूषित अशा चेहऱ्याचा एक पन्नाशीचा उंच पुरुष, आपल्या प्रेमळ नजरेनें त्याच्याकडे पाहत त्याच्यामागेंच उभा होता. त्याच्या चेहऱ्याच्या एकंदर गांभीर्याला, पाठीवर सोडलेले त्याचे केस, त्याचा पांढरा शुभ्र लांब अंगरखा आणि बंगाली पद्धतीचें धोतर,.. सारीं जास्तच भव्यता आणत होतीं.

आतांपर्यंतच्या या अनपेक्षित प्रकारानें, मॅनेजर वगैरे सारे एकदम शांत झाले होते. तो दाढीवाला सर्वांकडे हंसून पहात, मॅनेजरला अस्खलित मराठींत म्हणाला, ''काय? भानगड कसली आहे? पैशाची देवघेव कां आहे कांहीं? तुमचे किती पैसे द्यायचे त्यांनी?..''

''साडेदहा आणे!'' मॅनेजरहि या त्याच्या गंभीर व सौजन्यपूर्ण प्रश्नानें किंचित् लाजून म्हणाला. त्या नवख्या माणसानें, जास्त कांहीं न बोलतां, रुपया त्याच्या हातीं ठेवला. मॅनेजरनें लगबगीने जाऊन राहिलेले पैसे व फाऊंटनपेन त्याच्या हातीं ठेवलें व तो मुग्धपणें काउंटरजवळील आपल्या खुर्चीकडे निघून गेला. त्याला पैसे मिळाल्याच्या आनंदापेक्षां लाजच जास्त वाटत होती!..

या अगदी अनपेक्षित प्रकारानें अरुण तर आश्चर्यचकितच झाला होता. तो त्या पुरुषाकडे वळून त्याचे आभार मानणार, इतक्यांत तो उलट त्याला म्हणाला, ''तुमचं खाणं वगैरे झालं आहेना यथास्थित?..''

अरुणनें मानेनेंच होय म्हणून सांगितलें.

''मग जरा माझ्याबरोबर चलता तर चला! आपण बाहेर पडूं इथून!..''

तो नवखा मनुष्य चालूं लागून म्हणाला.

अरुणहि अत्यंत मुग्धपणेंच त्याच्यामागून हळूंहळूं पावलें टाकीत, 'महात्मा हिंदु उपाहारागृहा'च्या पायऱ्या उतरून रस्त्यावर आला.

: ३५९ :

''तुम्हांला कांहीं कामबीम नाहीं ना आतां?'', ''बरोबर चालतां चालतां, त्या नवख्या पुरुषानें अरुणकडे तोच प्रेमळ दृष्टिक्षेप टाकून पहिला प्रश्न केला.

अरुणला काय बोलावें तेंच समजेना. तरी त्यानें अडखळत म्हटलें,



''नाहीं!.. पण मी अगदीं गांगरल्यासारखा झालो आहे!..''

''चला माझ्याबरोबरच!.. आपण माझ्या घरीं जाऊं!.. आणि मग सारें बोलूं!..'' तो त्याच्याकडे हंसून पहात त्याच्या पाठीवर स्नेहानें हात ठेवून म्हणाला.

अरुणहि त्याच्या या एकंदर अकारण सौजन्यानें दडपून गेल्यासारखा होऊन त्याच्याबरोबर पुढें चालूं लागला.

शनिवारवाड्याच्या बाजूनें वांकडी तिकडीं वळणें घेत तो पुढें चालला होता. अरुण त्याच्यामागून निमूटपणें पावलें टाकीत होता. पण अरुणला चालतां चालतां शेवटीं राहवेना. त्यानें अत्यंत आदरानें त्याला विचारलें, ''हें पहा, एक प्रश्न विचारूं कां तुम्हाला?..''

''काय?'' त्यानें किंचित् थबकून अरुणकडे दृष्टि वळवली.

''मजकरितां इतका खर्च करण्याचं आणि त्यानंतर मला आतां आपल्याबरोबर घरी चालावण्याचं तुम्हाला कारण काय हो?..''अरुण अडखळत आपल्या कल्लोळ करणाऱ्या साऱ्या भावना शब्दांत मांडण्याचा प्रयत्न करीत होता.

''माणुसकी! दुसरें काय..'' तो हंसून म्हणाला, ''पण असले सारे प्रश्न घरी गेल्यावर नाहीं कां विचारतां येणार तुम्हाला?..''

: ३६० :

शेवटीं एका बोळाच्या आंतल्या टोंकावर जुनीशीच इमारत होती; तिकडे वळून जिन्याच्या पायऱ्या तो चढूं लागला. शेवटच्या चौथ्या मजल्यावर तो कोपऱ्याच्या कुलूप लावलेल्या खोलीजवळ उभा राहिला; व आपल्या अंगरख्याच्या खिशांतून चावी काढून त्यानें कुलूप उघडलें.

तो दाराची कडी काढत असतां अरुण त्याच्याकडे कुतूहलानें पहात होता.

''या, आंत या!..'' त्यानें दार लोटून स्वतः आंत शिरत अरुणचें स्वागत केलें.

तो दोन खणी मोठा हॉल, म्हणजे एका चित्रकाराचें वास्तव्यस्थान असावें, हें अरुणला पहिल्या दृष्टिक्षेपांतच ओळखतां आलें. एका बाजूस अपूर्ण चित्रांचे कपड्याने झांकलेले पांच सहा फलक ठेवले होते. त्याजवळच अनेक लहान मोठे कुंचले, रंगाच्या दोन तीन उघड्या पेट्या, पॅलेट!.. अरुणनें भिंतीवर सभोंवार दृष्टि फिरविली; साऱ्या भिंतींना, सुंदर फ्रेम केलेली निरनिराळीं लॅंडस्केप्स् पोर्ट्रेट्स्, फुलफिगर्स टांगल्या होत्या. विशेषतः काश्मिरमधील कांहीं, हिमालयांतील कांहीं, असे त्यानें पाहिलेलेच देखावे डोळ्यापुढें उभे करणाऱ्या त्या मोठमोठ्या पेंटिंग्जवर, अरुणची दृष्टि मधून मधून थबकत फिरत होती.

त्यांतील एक दोन चित्रांकडे तर त्यांने विशेष आपुलकीनें पाहिलें व त्यांवर त्याची दृष्टि

नकळतच खिळून राहिली.

: ३६१ :

सूर्य नुकताच खाली उतरत आहे. पश्चिमेकडील बर्फमय डोंगराआड जातां जातां त्यानें उधळलेले कोमल किरण, नाना तऱ्हेच्या नाना रंगांच्या पोषाखानें सजलेले दिसत आहेत. पूर्वेचे गुलाबी कोडें मनाला आल्हाद देत आहे. उंच उंच डोंगरांच्या शिखरांवरील हिम, सुवर्णमय झालें आहे; दरीच्या खबदाडांतील बर्फांचें पुंजके, संध्येच्या सावलींत विरोधाभासामुळे जास्तच पांढरे शुभ्र दिसत आहेत; पाहतां पाहतां साफ बुडणाऱ्या सूर्याचें, आपल्या जवळच्या ढगांना सोन्याचा मुलामा देण्याचें व लांबच्या आकाशाला जास्त निळें करण्याचेंच, जणु मानस आहे!..

तें दुसरें, गुलमर्गमधील सकाळचें सुंदर दृश्य!... सरळ लांबवर गेलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंची पॉप्लर झाडें, एखाद्या तप करीत बसलेल्या म्हाताऱ्या जटाधारी ऋषीसारखे दिसणारे समोरच्या दूरदूरच्या गुलमर्ग दरीच्या बाजूचे हिमाच्छादित डोंगर, त्यांच्यावरील मुगुटाप्रमाणें भासणारे पांढऱ्या शुभ्र हिमाचे थर, सर्पाप्रमाणे वळवळत डोंगरावरून येणारे ते पाण्याचे प्रवाह,.. चारी बाजूंनी अगदी मोहिनीच पडावी! मधून मधून दोन डोंगरांमध्ये शिरणारा रस्ता, त्या आ वासून बसलेल्या राक्षसी दरीच्या तोंडात, आपल्या जिभेच्या सहाय्यानें मानवाला जणुं ओढून नेण्याचाच प्रयत्न करीत आहे;.. खालीं दूरपर्यंत सारीपटाप्रमाणें पसरलेलीं हिरवीगार शेतें व त्याजवळपास आपल्या बैलांना हांकीत पुढल्या आशेवर जमिनीची मशागत करणारे शेतकरी;..पलीकडे निरनिराळ्या आकाराच्या रांगोळीप्रमाणें दिसणाऱ्या चरत असलेल्या हलत्या चालत्या गुरांच्या कळपांचे, काळे पांढरे ठिपके..

तुरुंगावासानंतर अनेक दिवसांनी आपल्याला अशी अचानक चित्रकलेची पहिलीच मेजवानी मिळत आहे, या विचारानें अरुणनें अतिशय समाधानाचा सुस्कारा सोडला; व या साऱ्या सुखद गोतवळ्याचा हाच जनक, अशी मनोमय खात्री झाल्यामुळें, अरुणनें त्याच्या त्या नवख्या म्हाताऱ्या स्नेह्याकडे वळून पाहिलें. आतांपर्यंत त्याने अंगांतील कपडे काढून ठेवले होते. त्याचें उघडें शरीर पूर्वीसारखेंच उंचनीच दिसत असलें, तरी अरुणला ते कांहींसें कृश वाटलें. छातीवरील केसांतील एखादा केंस रुपेरी झालेला दिसत होता. अरुणनें त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें, तेव्हां आपली एखाददुसरा पांढरा केस झळकत असलेली लांबलचक काळी दाढी, तो उगीचच मुग्धपणें गोंजारीत होता.

अरुणची व त्याची दृष्टादृष्ट होतांच तो पूर्वीच्याच प्रेमळपणें त्याचकडे पाहून हंसला.

अरुणाला त्याच्याविषयी आता पूर्वीपेक्षांहि जास्त जिव्हाळा वाटत होता!



''या ना! कपडे काढा आणि असे जवळ बसा!'' तो अरुणला म्हणाला.

अरुणनेंहि त्याचा प्रेमळ हुकूम कांहीं न बोलतां पाळला व तो त्याच्याजवळ जाऊन बसला.

''हं! आतां बोलूंया आपण मोकळेपणें!'' तो अरुणकडे पाहत स्मित करून म्हणाला, ''प्रथम मजविषयींच सांगतो. मी एक गरीब चित्रकार आहे. माझें नांव... श्रीचंद्र टागोर!.. मी उत्तर हिंदुस्थानांत बरेच दिवस फिरलो... हिमालयाच्या जवळपास राहिलोहि आहे अनेक वर्षे!.. माझ्या या कांहीं चित्रांवरून तुम्ही तें जाणलेंच असेल म्हणा. आतां गेलीं तीन चार वर्षे त्या प्रांतांतून इकडे येऊन राहिलो आहे. माझें असें येथे जवळपास कोणी नाहीं. त्यामुळें एकट्याला लागणाऱ्या गरजा, या माझ्या कलेवरच येथें मी कशाबशा हल्लीं भागवतो; आणि उरला सुरला वेळ स्वतःला समाधान वाटणाऱ्या कलकृतींच्या निर्मितींत घालवतो!.. पहिलें पोटासाठीं करायचें काम, दुसऱ्या स्वानंदासाठीं करावयाच्या कामासाठीं फावला वेळ मिळावा म्हणून करावयाचं असतं!.. तेव्हां तेंहि आतां अंगवळणींच पडलं आहे!-''

टागोर आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणेंच हसंले.

आणि त्यांतूनहि अरुणला त्याच्या आयुष्याच्या गांभीर्याची कल्पना होत होती!

: ३६३ :

त्यानंतर कांहीं वेळ खोलींत शांतताच होती. अरुण खोलींतील चित्रांची पुन्हा पाहणी करीत होता. आणि टागोर आपल्या खोलींत आलेला उमदा तरुण या दृष्टीनें अरुणकडें कुतूहलानें पहात होते.

''हं... आतां तुमचं नांव काय?..'' टागोरांनी अरुणकडे आपल्या जात्या प्रेमळ दृष्टीनें पाहून विचारलें, ''हरकत नसेल तर सांगतां येईल तेवढें सारें कांहीं सांगा!..''

''वाः! हरकत कसली त्यांत?..मी..अरुण ठाकूर!..'' अरुणनें सुरवात केली.

त्याच्या त्या पहिल्याच शब्दांनी, कां कोणास ठाऊक टागोर एकदम दचकले. पण आपली चलबिचल अरुणच्या लक्षांत येऊं नये, म्हणून मोठ्यानें खोकल्याची ठांस आल्यासारखें करून ते जाग्यावरून उठले व अगदी साहजिकपणें एका झांकलेल्या चित्रावरील उडत असलेला फडका नीट ठेवून, त्याला ते पिन लावण्याचा बहाणा करीत म्हणाले, ''हं सांगा!.. मी ऐकतो आहे..''

अरुण अगदी मोकळ्या मनानें त्यांना पुढें सांगूं लागला. ''मी मुंबईचा राहणारा आहे... गांधी करारामुळे आजच माझी तुरुंगांतून सुटका झाली...''

टागोर सारें शांतपणे येरझारा घालीत ऐकत होते. अरुण सांगत असलेल्या आपल्या आयुष्यांतील गेल्या कांहीं वर्षांतील मुख्य घडामोडींकडे मधून मधून लक्ष देतांना, ते सहज म्हणून प्रश्न विचारीत;

पण अगदी नवख्या माणसामध्यें अनैसर्गिक वाटेल, अशी एक प्रकारची आत्मीयता, त्यांच्या त्या प्रश्नांत कोणालाहि दिसून आली असती.

सांगण्याच्या ओघांत असल्यामुळें, अरुणच्या दृष्टींतून मात्र तें सर्व निसटले!

: ३६४ :

यशवंतदादांनी केलेली भाऊबंदकी, नानांचा मृत्यु, अरुणचा तुरुंगवास वगैरे सर्व गोष्टी शांतपणे ऐकल्यावर, टागोरांनी एक सुस्कारा सोडला. विजेचें बटन दाबलें आणि अंगांत कपडे चढवीत ते म्हणाले, ''अरुण, आतां आपण जेवून येऊं!.. नंतर आपण पुन्हा सारें बोलूं!.. आतां चार दिवस माझे पाहुणे आहां तुम्हीं!...''

''पण हें पहा, टागोर...'' अरुण कांहीं तरी अडखळत चालण्याचा प्रयत्न करीत होता.

''तें राहूं द्या! पण हें पहा अरुण, माझी आज आपलीं अशी जीं दोनतीन माणसें आहेत, तीं मला 'भाई' म्हणतात.. तुम्ही तेंच म्हणा!'' टागोर एकदम म्हणाले.

अरुणला त्यांचें तें अकारण सौजन्य पाहून, गुदमरल्यासारखेंच झालें. त्या अननुभूत आनंदामुळें प्रथम त्याला कांहींच बोलता येईना. शेवटी तो मुकाट्यानें उठला व कोटटोपी घालून दाराकडे वळत म्हणाला, ''बरं चला..भाईऽ!''

: ३६५ :

''अरुण, तुम्हीं आतां दमले भागले आहां!..माझ्या कॉटवर झोंपा!..

मी झोंपेन या खालीं घातलेल्या बिछान्यावर!..'' जेवून आल्यावर कांहीं वेळ तशाच आणिखी कांहीं गप्पा मारतांना अरुणला मधून मधून जांभया देतांना पाहून भाई म्हणाले, ''मला अजून एक चित्र पुरें करावयाचें आहे त्या कामाला मी लागतो!..''

भाईंच्या भेटीपासून सहा सात तासांतच, आपल्या बाबतींत वाढत गेलेल्या त्यांच्या सौजन्यामुळें, अरुणचें हृदय विविध भावनांनी, त्यांच्याविषयींच्या आदरानें भरून आलें होतें; तो गोंधळला होता!

''भाई, तुम्ही माझ्यासाठी एवढं कां करीत आहां, मला समजत नाहीं!''

भाईंनी दिलेली शाल पायावर ओढीत अरुण म्हणाला, ''अनेक वर्षांच्या स्नेह्याप्रमाणें, तुम्ही मजबरोबर आपल्या भेटीच्या पहिल्या दिवसापासूनच वागत आहां!...कां तें सांगाल कां मला?..''

''कोणास ठाऊक!'' भाई त्याच्या मनाच्या समाधानासाठी म्हणाले, ''अकारण जिव्हाळा म्हणा पाहिजे तर!- आणि अरुण, स्नेहाला वर्षांची जरूरी लागत नाहीं! पण हें पहा, आतां तुम्ही एक शब्दहि न बोलतां झोपा पाहूं गप्प बऱ्या बोलानें!... तुम्हांला फार त्रास झाला आहे आज!..''

''बरं तर!.. '' अरुण त्यांच्याकडे प्रेमळपणे हंसून पहात म्हणाला व झोंपण्यासाठी कुशीवर वळला.

भाईंनी आपले स्टूल कोंपऱ्यांतील फलकापुढें ठेवलें. त्यावरील आच्छादन बाजूस सारलें, स्टँड पुढेंमागें करून त्यांनी चित्रावर योग्य तो उजेड पाडला व ते रंगाचें मिश्रण करूं लागले.

अरुण अजून बिछान्यावर तळमळत होता. हॉटेलमधील प्रसंग, भाईंची भेट! किती परस्परविरोधी घटना!... त्यानंतरचा त्यांचा सहा सात तासांतील वाढता जिव्हाळा!...

अरुणलाहि भाईविषयीं एकाएकीं अतिशय आपलेपणा वाटूं लागला होता!

का?.. त्यालाच समजेना!.. 'आंतरःकोऽपि हेतुः' अशासारखे स्वतःचें समाधान करण्याचा त्यानें शेवटी प्रयत्न केला!..

आणि थोड्या वेळानें, विमनस्कपणें चित्राशीं व्यर्थ खटपट करीत बसले असतां, भाईनीं मागे वळून पाहिलें तो अरुण झोपीं गेला होता.

: ३६६ :

खोलींत अगदी शांतता पसरली होती. अरुण गाढ झोंपला आहे असें पाहतांच भाईंना राहवेना. त्यांनी आपल्या समोरील चित्रावर पुन्हां आच्छादन घातलें. रंगाच्या डब्या बाजूस केल्या. कुंचले उचलून एकत्र केले व चित्र बाजूस सारलें.

स्टूलवरून उठतां उठतां त्यांच्या डोळ्यांतून अश्रु ठिबकत होते!

अरुणची दुपारी अचानक भेट झाल्यापासून, त्यांच्या आयुष्यांत अनेक वर्षांनी कौटुंबिक सुखदुःखाच्या जुन्या नव्या भावभावनांना एकाएकी भर आला होता!

हो, श्रीचंद्र टागोरांना आपण पूर्वी एकदां श्रीनिवास ठाकूर होतो याची जाणीव होत होती!

आणि याचें कारण, आज अनेक वर्षांनी त्यांच्या खोलींत, त्यांच्या शेजारी, त्यांच्या कॉटवरच, प्रत्यक्ष रक्ताचा संबंध असलेली एक व्यक्ति झोंपली होती!

: ३६७ :

अरुणच्या झोंपलेल्या चेहऱ्याकडे थोडा वेळ निरखून पाहून, भाई मंद पावलें टाकीत खिडकीजवळ जाऊन उभे राहिले.

आपल्या कुटुंबातील माणसांना सोडून ते जवळ जवळ गेली पंचवीस वर्षे इकडे तिकडे फिरत होते. अरुणचें कलावंत हृदय आपल्या माणसांत आपल्या आकांक्षाच्या पूर्तीसाठी जसें धडपडलें आणि शेवटीं अरुणनें जसा त्यांचा त्याग केला, तसाच भाईंनींहि त्यावेळी केला होता.

त्यांना आठवण झाली. आई, नाना, दादा, बाबा, सारी मंडळी त्यावेळी त्यांच्या विरुद्ध होती. त्यांची चित्रकला कुटंबातील पैशांत भर घालीत नव्हती. यामुळेंच ते साऱ्या कुटुंबांत हास्याचा उपहासाचा, कायमचा विषय झाले होते!

रवींद्रनाथ टागोरांच्या 'उद्योगनगरांतील निरुद्योग्या'प्रमाणे, त्यांच्या तरुण मनाची धडपड जणुं गुन्हेगारी ठरून, त्यांना कॉलेजचें शिक्षण पहिल्याच वर्गांत अर्धवट सोडावें लागलें होतें. त्यांच्या त्या वेड्या उद्योगांना पायबंद बसावे म्हणून घाईघाईनें नोकरी व बायको यांच्या दोन बेड्या त्यांच्या पायांत घालण्यात आल्या होत्या.

आणि त्यानंतरची त्यांची दोन वर्षे, जणुं नदीच्या प्रवाहांत पडलेल्या काटकीसारखीं गेलीं होतीं. नोकरींचे यांत्रिक आयुष्य आधींच त्यांना मानवत नव्हतें, त्यांत रंजीस मनानें धडपड करतां करतां त्यांच्या आयुष्यांत त्यांच्या लहानग्या जयंताचें पदार्पण झालें... पाश वाढत चालले म्हणून गौतमबुद्धाप्रमाणें भाई गांगरून जातात न जातात तोंच, बारशाच्या दुसऱ्या दिवशीं त्यांची पत्नी त्यांच्या हातीं जयंताला देऊन निघून गेली!

सीतावहिनी आपल्या अरुणला आणि त्यांच्या जयंताला पाजीत असे. एके दिवशी जयंत आजारी झाला आणि चार दिवसांत निघून गेला. बाबासाहेब नोकरीनिमित्त फिरतीवर होते. नाना गांवड्यावर गेले होते. भाईनाहि तेथील आयुष्याचा अगदीं कंटाळा आला होता. त्यांच्या आकांक्षांचा तेथें अगदीं कोंडमारा होत होता. अनायासें ते पाशांतून नुकते सुटले होते!

आपल्या लहानग्या जयंताच्याच वयाच्या अरुणकडे, त्यांनी शेवटचा दृष्टिक्षेप टाकला. प्रेमळ वहिनीबरोबर भरल्या अंतःकरणानें ते चार शब्द बोलले आणि त्या संधीचा उपयोग करून नोकरीवर म्हणून घरांतून ते जे निघाले ते निघालेच!

आणि त्या दिवशीं पाळण्यांतील गादीवर खेळकरपणें हातपाय हलवीत होता. तोच अरुण आज जगाला तोंड देण्यासाठी हातपाय हालवतांना त्यांना पहावयास मिळाला होता. त्या अचानक भेटीनंतर, त्या यदृच्छया घडलेल्या सहवासानंतर, आतां उमदा तरुण झालेला त्यांचा तो अरुण भाईच्याच खोलींत सुखानें झोंप घेत होता!

: ३६८ :

असल्या साऱ्या विचारांनी चलबिचल झालेल्या आपल्या भारावलेल्या हृदयानें भाईंनी त्याच्याकडे एक प्रेमळ दृष्टिक्षेप टाकला. त्यांना वाटलें, आपल्याला अकारण स्नेह दाखवणाऱ्या, या जवळच बसलेल्या नवख्या म्हाताऱ्याच्या हृदयाला असला वणवा लागला आहे, याची त्या निद्रिस्त बाळाला कल्पनाहि नसेल!



या विचारानें त्यांच्या वात्सल्याला भरतें आलें. ते खिडकीजवळून पलंगाजवळ गेले. झोपेंत बाजूस सरलेली अरुणच्या अंगावरील शाल, आपल्या किंचित् थरथरणाऱ्या हातानें त्यांनी नीट केली; व ते किती तरी वेळ धडधडत्या छातीनें अरुणच्या निष्कलंक चेहऱ्याकडे निरखून पाहत उभे राहिले.

त्यावेळीं त्यांच्या डोळ्यात प्रेम ओतप्रोत भरलें होतें.

: ३६९ :

आपल्या आकांक्षा-ध्येयांसाठी, आपणहि अरुणप्रमाणेंच एकदां धडपडत होतों; हाच विचार तसें पाहतां पाहतां त्यांच्या मनांत येऊन, त्यांना आपल्या गेल्या कित्येक वर्षांच्या झगड्याची आठवण झाली व ते खोलींत येरझारा घालूं लागले.

मनुष्याच्या प्रत्येक हालचालीकडे, प्रत्येक पावलाकडे, उपयुक्ततेच्या दृष्टीनेंच पाहणाऱ्या या जगाचा आपल्याला किंचित् देखील संपर्क नको, म्हणून ते घरांतून बाहेर पडल्यावर, वैतागानें थेट हिमालयाच्या जवळपास गेले होते. हरिद्वारजवळच्या एका शांत खेड्यांत त्यांनी त्यानंतरचीं आपली अनेक वर्षे स्वानंदांत रममाण होऊन घालविलीं होती. त्यावेळीं, आपल्या माणसांशी, पूर्वीच्या जगाशीं.. त्यांचा कोणत्याहि तऱ्हेचा संबंध नव्हता! यामुळें मनाला किती समाधान वाटे त्यांच्या! रानावनांत फिरावें, निसर्गाचें वैभव लुटावें, डोळ्यांत तें कायमचे सांठवण्याचा प्रयत्न करावा; वाटल्यास आपल्या बरोबरच्या रंग, कुंचले वगैरे साधनांनीं केवळ स्वानंदासाठीं तें पकडण्याची आटोकाट धडपड करावी. आणि आपली गरिबाऊ जीवनयात्रा असल्या अमोल पद्धतीनेंच पुढें चालवावी..

अशी त्यांची वर्षांमागून वर्षें गेलीं होती. मनुष्य, मानवी संस्कृति, त्यावेळीं कशाचीही त्यांना..किंचित् देखील आठवण होत नव्हती; जरुरच भासत नव्हती! पण शेवटीं, नाना ठिकाणे फिरुनहि, भाईंना पाहिजे असलेलें चिरंतन मनःस्वास्थ लाभेना. केवळ निर्सगजीवन, कल्पनानंद यांनी त्यांचें समाधान होईना! त्यांच्या मनाला पुन्हां जगाची ओढ लागूं लागली होती. मानवी सहवासाची नैसर्गिक तहान, त्यांना तसल्या जीवनानें भागवतां येईना!

मनुष्य ज्याला जग म्हणतो त्यांतील सुखदुःखें, त्यांतील कूट प्रश्न, पुन्हां भाईंच्या मनांत उत्कटतेनें वावरूं लागले. त्यांना वाटलें, निर्भेळ चिरंतन सुख असें कोठेंच नाहीं; जगापासून फटकून असें अगदी एकाकीं जीवन कंठण्यापेक्षां, त्या मानवी जगाच्या खवळलेल्या समुद्रांत धीरानें उडी घेऊन पोहण्याचा प्रयत्न करणें, त्यांतील भेवडावणाऱ्या लाटांवर स्वार होऊन चार हात मारून शक्य तों लांबचा पल्ला गांठणे, हेंच मानवी कर्तव्य! एकाकी आयुष्यांतील स्वानंद ज्याला चिरंतन

सुखाचा वाटेल, त्यानें त्याचा स्वीकार करावा! पण तो आपल्याला कांहीं तेथें लाभत नाहीं! तेव्हां, त्यापेक्षां मानवी जगांत राहण्याचा मार्ग खडतर असला, तरी तोच योग्य!

असले विचार भाईंच्या मनांत जों जों जास्त गर्दी करूं लागले, तों तों त्यांची आपल्या जगाकडील ओढ उत्कट होऊं लागली! आणि शेवटीं, पुन्हां अनेक वर्षांनीं, ते आपल्या पूर्वीच्या माणसांनीं गजबजलेल्या जगाकडे आपली दृष्टि वळवून, आपलीं पावलें टाकूं लागलें.

: ३७० :

सहा महिन्यांपूर्वी भाई जेव्हा पुण्यांत येऊन राहिले, तेव्हां त्यांना आपल्या कुटुंबीय माणसांना भेटावें असें प्रथम वाटल्यावांचून राहिलें नव्हतें! पण अनेक वर्षे नाहींसे होऊन असे एकाएकी धूमकेतूप्रमाणें त्यांच्यांत पुन्हां जाऊन पडणें म्हणजे न जाणो त्या सर्वांची कोणत्या एकाप्रकारें बसलेली घडी, कदाचित् विनाकारण आपणच नकळत विस्कळीत केल्यासारखी होईल! या भीतीनें त्यांनी तो बदलला; व आपलें आतांपर्यंतचें एकाकी जीवन तसेंच एकाकीपणें पुण्यांतहि पुढें चालूं केलें.

'आपल्या साऱ्या कुटुंबाची परिस्थिति कशी असेल, त्यांतील कोणकोण हयात असतील, आपण निघून जातांनाचा लहानगा अरुण आतां केवढा मोठा झाला असेल? काय करीत असेल?' हे विचार त्यांच्या मनांत मधून मधून डोकावत; पण काहींशा विस्तृत दृष्टीनें जगाकडे पाहण्याची भाईंना आतां संवय झाल्यामुळें, लहान लहान केंद्रांभोवती पिंगा घालणाऱ्या जगाचे व्यवहार पूर्वीप्रमाणेंच भोंवती चाललेले पाहूनहि, त्यांनी आपलें मन आजपर्यंत आवरलें होतें!

पण आज एकाएकीं अरुणची भेट होऊन त्यानंतर समजलेल्या साऱ्या हकीगतीनें मात्र, त्यांच्या पूर्वीच्या भावभावनांना पुन्हां एकदां भरती आली होती. त्यांना वाटलें, ''आपण इतकी वर्षे जगाबाहेर राहूनहि, म्हणतात त्याप्रमाणें मनु पालटला मात्र नाहीं! आपल्या तरुणपणाप्रमाणेंच अरुणच्याहि तरुण हृदयाच्या आकांक्षांचा भोवतालच्या जगाशी तसाच व तितकाच उत्कट असा झगडा चालला आहे!...''

विचार करतां करतां भाई एकदम थबकले. झोपलेल्या अरुणच्या चेहऱ्याकडे प्रेमाचा दृष्टिक्षेप टाकतां टाकतां, त्यांच्या हृदयाचा दुसरा एक अज्ञात कप्पा क्षणभरच खोलला गेला. त्यांना आपल्या लहानग्या जयंताची आठवण झाली आणि त्याच पितृवात्सल्यानें त्यांनीं अरुणकडे पाहिलें.

पण मग मनाला असेंच सुटें सोडलें, तर तें बेफाम व चौखूर धावूं लागेल;.. म्हणून त्यांनी मोठ्या प्रयासानें त्याला लगाम घातली!

आपल्या साऱ्या माणसांना सोडून, बाबांचा अरुण उच्च ध्येय व उच्च आकांक्षा यांच्या प्रेरणेने



बाहेर पडला;... अगदी अकल्पित योगायोगानें त्याची आपली गांठ झाली! म्हाताऱ्या देहाच्या पण तरुण मनाच्या आपल्यासारख्या माणसाच्या खोलीत, तो आज या क्षणी शांतपणें विश्रांति घेत आहे!... या विलक्षण घटनेला कांहीं तरी भवितव्य खास आहे;.. या विचारानें, ते अत्यंत वात्सल्यानें अरुणकडे पाहत मनाशीं पुटपुटले,''बाळा अरुण, वेड्या असा गांगरून जाऊं नकोस. मला तुझ्या हृदयाच्या आकांक्षा समजतात. मजकडे यापुढें रहा. जगाचे व्यवहार जरी निराळे असले, तरी त्यांतूनहि वाट काढण्याचा आपण प्रयत्न करूं!''

या शेवटच्या विचारानें, भाईंचे मन थोडेसें शांत झालें. त्यांनी समाधानाचा एक सुस्कारा सोडला व अरुणच्या चेहऱ्याकडे पुन्हां एकदां प्रेमानें पाहून त्यांनी दिवा मालवला!

पाणी पिण्यापूर्वी चूळ बाहेर टाकण्यासाठी ते खिडकीतून वांकले, तो चंद्राचें पिठासारखे चांदणें सगळीकडे पसरलें होतें!..

आणि तसल्याच कांहींशा प्रसन्न चित्तानें त्यांनी बिछान्यावर आपलें अंग टाकले

: ३७१ :

आपलें काम संपवून, भाई भरभर पावलें टाकीत आपल्या खोलीकडे परतले. अरुणच्या औषधाची वेळ होऊन गेली होती. त्यानें तें घेतलें असेल कीं नाहीं या विचारांतच ते जिने चढत होते. पण पाहतात तों दाराला कुलूप!

ते एकदम दचकले. 'अजून चांगली शक्ति अंगांत आली नाहीं आणि हा बाहेर कशाला पडला? असल्या विचारांतच त्यांनी आपल्या जवळच्या किल्लीनें कुलूप उघडले. दरवाजा उघडून ते आंत आले. अंगरखा काढून ठेवला. नेहमीच्या सवयीप्रमाणे आंतल्या खोलींत जाऊन, त्यांनी पाय व तोंड स्वच्छ धुतलें व ते पुन्हां बाहेर आले.

'गेला असेल असाच कोठेतरी जवळपास!' या विचारानें त्यांनी खिडकींतून उगीचच बाहेर डोकावून पाहिलें व खोलीत पुढें मागें येरझारा घालावयास सुरवात केली. पांच मिनिटें झाली! दहा झालीं, जवळ जवळ अर्धा तास निघून गेला, सांजा काळवंडल्या;..तरी अरुणचा पत्ता नाहीं!

त्यामुळें मात्र त्यांना भीति वाटली. त्यांनीं सभोंवार दृष्टि टाकली. अरुण ठेवीत असे त्या खुंटीवर त्याची कोटटोपी नव्हती. कोपऱ्यांत त्याच्या चपला नव्हत्या. तो कोठेंतर लांब फिरावयास गेला आहे हें नक्की. 'पण कुठें? रस्त्यांतून गाड्या, घोडे, मोटारी फिरतात आणि हा अजून साफ बरा झालेला नाहीं; कशाला गेला एकटाच बाहेर! निदान मी परत येईपर्यंत तरी वाट पाहावयाची होती!' त्यांच्या मनांत असले अनेक विचार येत जात होते!..

त्यांनीं पुन्हां आंगरखा चढवला, धोतर नीट केलें व बाहेर जाण्यासाठी ते चपला घालूं लागले.

इतक्यात कोपऱ्यांतील टेबलाकडे त्यांची दृष्टि गेली. त्यावरील फोटोकेसमध्यें, नेहमी तेथें असणारा त्यांचा फोटो नव्हता; व त्याखालींच ठेवलेला एक कागद खिडकींतून येणाऱ्या वाऱ्यानें फडफडत होता.

भाईंनी एकदम चमकून चपला काढल्या व ते घाईघाईनें टेबलापाशीं आले. हो, तो टेबलावर फडफडणारा कागद, अरुणनें त्यांना लिहून ठेविलेली चिठीच होती. भाईंनीं अतिशय लगबगीनें ती तेथून उचलली व कॉटवर बसकण घेऊन, त्यांनी अत्यंत उत्कंठित अतःकरणानें ती वाचावयास सुरुवात केली-

पुणें; ता. २० मे १९३१
(दुपारीं २ वा.)

प्रिय भाई,

अत्यंत भरून आलेल्या हृदयानें मी तुम्हांला हे लिहावयास घेत आहे. भाई, तुमच्या नांवाला तुम्हीं अगदीं योग्य आहां;.. तुमचे यावेळी कोणत्या शब्दांत आभार मानूं तेंच मला समजत नाहीं!

रांगत रांगत जगांत शिरलेला मी एक अगदी दुबळा तरुण आहे, भाई! इतर हजारो माणसांप्रमाणेच तुम्ही मला रस्त्यांत भेटला. ना ओळख, ना देख, प्रथमच मला मदत केलीत! ती तसें पाहिलें तर किती क्षुल्लक;..पण मला तरी ती लाख किमतीची वाटली!

नंतर आपल्याबरोबर मला घरीं आणलेंत आणि तुमचें सौजन्य, तुमची प्रेमळवृत्ति त्यांनींच मी जास्त गांगरलो. तुमच्या घरचा चार दिवसांचा पाहुणचार-तो सुरूं होण्यापूर्वीच, मी त्रासामुळें व त्रस्त मनःस्थितीमुळें, विषमज्वरानें आजारी पडलो. पोटच्या मुलाप्रमाणें दीड महिना माझी रात्रंदिवस तुम्ही शुश्रूषा केलीत! आणि खरंच, केवळ तुम्ही होतां म्हणूनच मी जगलो. त्यानंतर आज जवळ जवळ एक महिना, माझी अशक्यता जाईपर्यंत तुमच्याकडे पडून राहिलो. तुम्ही मला सांगत होतां, 'थांब अरुण, बरा झाला नाहींस तोवरच काय जाण्याच्या गोष्टी?'

पण भाई, तुम्ही हें सारें कां करीत आलां हो?.. किती प्रेमळ आणि उदार तुमचें हृदय!..

पण काल तुम्ही मला सांगितलें, 'अरुण, तूं आतां मजजवळच रहा. माझी खोली हें तुझेच घर आहे असें समज! दोघांचं आपण कसं तरी सामावून घेऊं.'

भिडेमुळें मी त्यावेळीं कांहींच चालूं शकलों नाहीं. पण तुमच्या या अकृत्रिम व अव्याहत सौजन्यानें, तुमच्या या निरपेक्ष प्रेमामुळें, माझें हृदय शेवटीं विविध भावनांनीं धुमसूं लागलें. मला काय करावें तेंच समजेना!



भाई, माझ्या मनांतील सारें मी आतांपर्यंत तुम्हाला सांगत आलो आहे. तुम्हांला ठाऊकच आहे, मी माझ्या माणसांतून तीं सारीं उपकारी म्हणून एकदां बाहेर पडलो. मला जगाला तोंड द्यावयाचें आहे. माझ्या कर्तृत्वाचा अंदाज घ्यावयाचा आहे. अशावेळी आपल्या निरपेक्ष सहाय्याचा मला मोह पाडूं नका. आपल्या प्रेमळ उपकारांचे ओझें आतांच मला डोईजड वाटूं लागलें आहे; तें आपण आणखी किती दिवस लादणार? तुमच्यासारख्या तिऱ्हाइताच्या निरपेक्ष उपकारांनी मी अधिकच गुदमरलो!-

आणि म्हणूनच तुम्हांला आज मी सोडून जात आहे. पण मजवर रागावूं नका. किंवा माझ्यावरील आपल्या अकारण प्रेमामुळें, माझ्या शोधालाहि लागूं नका. जगाच्या आखाड्यांत उतरून, माझ्या भवितव्याला माझें मलाच तोंड देऊं द्या!..

आपल्या प्रेमाची आठवण म्हणून टेबलावरील आपला फोटो मी घेऊन जात आहे. माझ्या खिशांत आपण काल दिलेल्या नोटांपैकी, डॉक्टरचें बिल देऊन राहिलेला रुपाया आहे. तो मी तसाच ठेवून दिला.

भाई, मी गेलो म्हणून रागावू नका. तुमच्या सौजन्यांमुळेंच मी गुदमरलो तरी आपल्या मजवरील अमूल्य पण निरपेक्ष उपकाराची मला कायमची जाणीव राहील!..

तुमचाच,
अरुण ठाकूर

: ३७३ :

भाईंनी ती चिठी पुन्हां पुन्हां दोन तीनदां वाचली व ती बाजूस ठेवून ते कॉटवर आडवे झाले. अनेक भावनांनी मिश्र असा एक सुस्कारा सोडून, त्यांनी आपले हात डोक्याखाली घेतले; आपले पाय कॉटच्या खालच्या कठड्यावर टाकले; व ते वरच्या सीलिंगकडे शून्यपणे दृष्टि रोखून पाहूं लागले. त्यांच्या मनांत पहिला विचार आला. ''मोठा मानी पोरगा आहे!.. गेलाच तर शेवटी मला सोडून!..''

कालपासून तो त्यांच्याबरोबर फारसा बोलला नव्हता. दोनचार वेळां तरी त्यांनी त्याला, 'प्रकृति बरी आहे ना? काय होते आहे?' असले प्रश्न विचारून पाहिलें होतें. पण 'छे! कुठें काय?' असें कांहीं तरी तो उडवाउडवींचे उत्तर देई.

आज सकाळीं ते दोघेहि बरोबरच जेवले. आणि एका गिऱ्हाइकाचें पोर्ट्रेट त्याच्या घरी पोहोंचवावयाचें होतें, तें घेऊन ते दुपारीं टांग्यांत बसले.''मी संध्याकाळ पर्यंत आणखी एक दोन कामें करून येतोच हं! तूं जाऊं नको कोठें बाहेर!..'' असें त्यांनीं खालीं उतरतांना अरुणला

सांगितलें. त्यावेळीं तो 'नाहीं, तुम्हा आल्यावरच फिरायला जाऊं!..असेंहि म्हणाला होता.

आणि आतां ते परत आल्यावरची त्याची ही चिठी! त्यांनी पुन्हा एकदां ती हातीं घेतली; व तीवरून दृष्टि फिरविली.

: ३७४ :

अरुण त्यांना प्रथम भेटला, त्या दिवशीं तो झोपल्यावर आपल्याशींच विचार करतां करतां, त्यांनी त्याच्याविषयीं केलेले सगळेच बेत ढांसळले; कारण अरुण दुसऱ्या दिवशी सकाळीं उठलाच नाहीं. झोपेतच त्याच्या अंगांत सडकून ताप भरला होता! संध्याकाळपर्यंत उतरेना म्हणून भाईंनी डॉक्टर बोलावला आणि दोन तीन दिवसांतच ठरलें कीं, तो विषमज्वर आहे. भाईंनीं त्याच्या शुश्रूषेची सारी खटपट सुरू केली. त्याची मधून मधून बडबड चालूच असे! ''भाई, तुम्हांला माझ्यासारखा आगंतुक आल्यामुळें उगीचच त्रास झाला!'' अशावेळीं कधी कधीं तर त्याला रागावूनच गप्प बसवावें लागे!

त्या आजारांत एके दिवशीं शश्रूषा करतां करतां, भाईंना अरुणच्या उजव्या मांडीवरील एक मोठा लाश्याचा डाग दिसतांच ते केवढ्यांनें दचकले होते!.. ते घरातूंन बाहेर पडण्यापूर्वीच्या दिवसांत, तसला मोठा डाग त्यांनी एका बालकाच्या मांडीवर तसाच पाहिला होता. आणि त्या आठवणीनें भाईच्या हृदयांत अनेक भावना पुन्हा पिंगा घालूं लागल्या.

त्यावेळी त्यांच्यानें राहवेना. ते तसेच उठले व अरुणकडे एकाग्रतेनें पाहूं लागले. आजारानें निस्तेज झालेल्या त्याच्या चेहऱ्याकडे पाहून, वात्सल्यानें त्यांचें हृदय ओतप्रोत भरून आलें. त्यांनी शेवटीं हळूंच खालीं वांकून, निद्रिस्त अरुणच्या कपाळाचें हळुवारपणें चुंबन घेतले.

त्यानंतर दोन दिवस त्यांच्या हृदयांत एक अगदीं अभिनव झगडा चालूं होता. त्यांना एकदां वाटलें, आपण अरुणला आपला ठाकूर घराण्याशीं असलेला जिव्हाळ्याचा, रक्तमासाचा संबंध सांगावा. त्याला म्हणावें, ''अरुण.. बाळ, तूं तुझ्या अगदीं घरींच आहेस, आणि तूं ज्या तुझ्या नवख्या म्हाताऱ्या स्नेह्याला भाई म्हणून हांक मारती आहेस, तो तुझा प्रत्यक्ष चुलता...तुझाच...''

पण त्यांनी आपला मोह शेवटीं अगदीं प्रयासानेंच आंवरला; कारण त्या दिवशीं असलें कांहीं नवीनच एकदम अरुणला सांगण्यासारखी त्याची स्थितिहि नव्हती. - त्यानंतरचे भाईचे दहापंधरा दिवस अरुणच्या आजाराच्या व आपल्या मनस्तापाच्या दुहेरी दडपणांतच गेले होते.

पण मग त्यांनी अत्यंत कष्टानें आपले मन शांत केलें होतें; त्याला पूवींचें गांभीर्य आणलें होतें!..

अरुणचा ताप गेला. त्याची अशक्तता कमी होत होती. तो यापुढेंहि आपल्याकडेच रहावा



असें भाईंना सारखें वाटत होतें; पण मग अरुणला काय व कसें सांगितलें म्हणजे तो आपल्याकडेच रहावयास तयार होईल हें त्यांना समजेना. असल्याच मनोमय झगड्यांत भाईंचा गेला पंधरवडा गेला होता; आणि आज ते परततात, तों अरुण त्यांना सोडून निघूनहि गेलेला!..

: ३७५ :

भाईंनीं व्यग्र मनानें एक सुस्कारा टाकला. 'बाळा अरुण, तुला मीं तुजवर उपकार केले असें वाटलें. पण मी माझें कर्तव्यच केलें. तूं असा एकाएकीं मजकडून निघून गेलास यांत कांहीं आश्चर्यकारक नाहीं. पण मला अशी दुपारपर्यंत कल्पनाहि नव्हती!.. कोठें गेला असशील कोणास ठाऊक!.. अगदी निःसहाय्यपणें जगांत वावरतांना तुझी काय स्थिति होईल बरं?.. पण मी तरी स्वतः दुबळाच! तुजसाठीं चिंता करणारा कोण?.. डगमगला नाहींस तर शेवटीं तीराला लागल्यावांचून राहणार नाहींस!.. जा बाळा, तुझी वाट तूंच काढ!..''

भाईंनीं असल्या विचारांनीं आपल्या मनाचें समाधान करून घेतल्यावर, एक क्षणभरहि ते पडून राहिले नाहींत. लागलीच उठले व हातीं घेतलेल्या आपल्या अजून पुरें करावयाच्या चित्राकडे वळले.

: ३७६ :

ते अनेक वर्षे एकेच ठिकाणीं पडून राहिलेले लहान मोठे दगड, असेंच वर्षांनुवर्षे, तो प्रत्येक क्षणाला चाललेला त्या लाटांचा खेळ पहात आले होते. अनेक लाटा वर चढत; एखादी खळकन् फुटे आणि फेंसाळून हासूं लागे.

या एक प्रकारचें तप करीत बसलेल्या दगडांवर, आपल्या असल्या खेळकर जीवनाचा कांहींच परिणाम होत नाहीं, या कल्पनेनेंच जणुं काय, त्यांच्या प्रत्यक्ष भेटीसाठीं लहरी लहरीनें पुढें येणारा तो पाण्याचा झोत, त्यांच्याजवळ धांवून येई. त्यांच्यावर तो आपटतांच खळकन् आवाज होई. त्यावेळीं दगड बाहेरून ओले होत खरें पण त्यांच्या हृदयाला आंतून पाझर फुटतो थोडाच!..

अनेक वर्षांच्या संस्कारानेंहि, त्या दगडी मनावर ज्यांचा परिणाम झाला नव्हता, त्या लाटांचा हा मनोरम खेळ, अरुणच्या हृदयाला मात्र, तिकडे पाहतां पाहतां एका क्षणांत आकलन करतां आला! आणि त्याचे कारण, त्याच्याहि अंतःकरणांतील भावना-सागरांत अशाच लाटा उठून येत होत्या; अशाच फेंसाळून फुटत होत्या!

त्याच्या समोरच्या कागदाच्या पुडींतील भेळीमधून एक एक दाणा यांत्रिकपणें तोंडात टाकतांना, अरुणला आठवणीमागून आठवणी होत होत्या!..

: ३७७ :

नुकतेच दोन मिनिटांपूर्वी, भाईंकडून निघतांना घेतलेल्या रुपयांतील शेवटचे सहा पैसे त्यानें भेळवाल्याच्या हातावर टाकले होते. भाईंचे ते शेवटचे पैसे! त्यावरून त्याला त्यांची आठवण झाली.

भाई! खरंच किती प्रेमळ म्हतारा !

तसा आपला त्यांचा काय संबंध! पण आपण एकाएकीं निघून आल्यामुळें त्यांच्या मनाची काय धडपड झाली असेल, याची त्याला अनुभवामुळें कल्पना करता येत होती. तो निरपेक्ष प्रेमळपणा कोणीकडे, आणि आज पहाटे ज्याच्याकडून आपण एकाएकीं निघून आलों, त्या बाबूलालचा अपेक्षेनें पुरेपूर भरलेला पाहुणचार कोणीकडे!

पायपीट व त्याबरोबरच अनेक प्रकारें विचार करीत, आपण पुण्याहून निघाल्यावर तीन दिवसांनी गजबजलेंली मुंबई गाठली; आणि तेव्हांच आपल्याला आपली निराश्रितता खरी जाणवली. याच मुंबईत आपण पूर्वी बेफिकीरीनें पैसे खर्च करीत होतों; पण आज आपल्या खिशांतले केवळ चवल्या पावल्यांचे भांडवल चांचपून, आपण प्रत्येक पाऊल टाकतांना दबकत चाललों होतो.

सिनेमाच्या चित्रांच्या पाट्या घेऊन फिरणारे मजूर, सामानाच्या पाट्या डोक्यावर ठेवून धांवपळ करणारे पाटीवाले, गिरणीच्या वातावरणांत आपल्या आयुष्याचें सारे दिवस कसेबसे मोजीत चाललेल्या मजुरांची मालिका..साऱ्या साऱ्यांवर अगदी बेफिकीरीनें आपली धांवती नजर त्यावेळी फिरत असे! पण त्यांच्याच संकुचित जीवनांतील, सापेक्ष कां होईना पण स्पष्ट दिसून येणारी स्थिरता पाहून, आपलें मन आज जास्तच बेफाम होत होतें, गांगरून जात होतें!..

धर्मशाळेंत पडावें म्हणून आपण कानेकोपरे शोधले; पण तेथेहि पैशाशिवाय व्यवहार चालत नाहीं, हेंच आपल्याला दिसून आलें आणि राहिलेल्या दुसऱ्या ओंगळ जागांमध्यें पडावयास, आपले अजूनहि चांगल्या वाईटासाठीं कुरकुरणारें मन तयार होईना. असल्या मनःस्थितींत आपण गंभीर विचार करीत किती रस्ते तुडवले, याची अरुणला आठवण झाली!

: ३७८ :

बाबूलाल! हो, त्यानंतर त्याला तोच भेटला. 'जवळपास चांगली धर्मशाळा आहे कांहो?' म्हणून आपण तो रस्त्यांत भेटल्यावर, सहज त्याला प्रश्न विचारतों काय, आणि 'का हो? चांगले पांढरपेशे दिसतां आणि मुंबईतली धर्मशाळा कशाला तुम्हाला? मजबरोबर चला पाहिजे तर!' म्हणून तो आपल्याला सांगतो काय!

आपल्या दोन अडीच महिन्यांत वाढलेल्या दाढीकडे पाहून तर त्यानें आपल्याला हें पाचारण केलें नसेल ना? हो. कदाचित् तीच कल्पना बरोबर असेल! कारण त्या रात्रीं त्यांच्या सोनापुरांतील बिऱ्हाडाच्या ग्यालरींत, आपण उपाशीच तळमळत झोंपलों! पण दुसऱ्या दिवशीं मात्र, पहाटेसच घाईघाईनें येऊन बाबूलालनें आपल्या हलवून जागे करून बसवले! त्यावेळचा त्याचा उत्साह केवढा दांगडा होता. आपल्या डोळ्यावर झोप होती तरी तो पुन्हां पुन्हां सांगत होता, ''हे पहा पाहुणे! एकंदरींत तुमचाच पायगुण चांगला! आठ दिवस झाले पहा! सारखे पैसे गेले, अनेक साधूंना विचारलें! साऱ्या 'किल्ल्या'हि फुकट गेल्या!..पण आज कल्पनेबाहेरच 'फत्ते' झाली! गेल्या साऱ्या रकमेची भरपाई झाली अगदीं! काल रात्री तुम्ही आल्यानंतर मनाचा धडा करूनच मीं शंभर रुपये 'डबलिन्' केले होते! अगदी सोळा आणे जुळले!..उठा पाहुणे, उठा, चहा आणि फराळाचें सारें तयार आहे. आपली अजून ओळखहि झालेली नाही!''

एक साधा सट्टेबाज तो; पण त्याचा तो प्रेमळ पाहुणचार केवढ्या उत्साहाचा! आणि त्यानंतर मामुली ओळख झाल्यावर, चहा घेता घेता बाबुलाल म्हणाला होता; ''हे पहा, परवा चतुर्दशीला आमचा मोठा सत्यनारायण आहे. तो झाल्याशिवाय आम्हीं तुम्हांला आमच्याकडून जाऊच देणार नाहीं आता, बरं कां?''..घरांतील मुलें, बाळें, त्याची बायको, साऱ्यांच्या आग्रहाला आपण शेवटीं बळी पडून, पुढले दोन दिवस तेथेंच कसें राहिलों याचें चित्र अरुणपुढें येत होतें!

पण बाबूलालनें तरी आपल्यासाठी एवढें कां केलें? या आश्चर्यानेंच त्याचें त्रस्त मन भांबावले, असल्या चलविचलित सुन्न मनःस्थितीतून एकच एक दृश्य त्याला दचकून जागें करीत होतें-

: ३७९ :

वर गुलाल व फुलें उधळून, गडगड हलणाऱ्या, निर्जीव प्रेतांना लोक वाहून नेत असल्याचें..ग्यालरींत उभे राहिल्या राहिल्या पाहून, तेथें सोनापुरांतच राहणाऱ्यांच्या सरावलेलया डोळ्यांना कांहींच वाटत नव्हतें; पण तोच 'रामबोलोऽ'चा आवाज, अरुणच्या कानांच्या पडद्यांवर तेथें असतांना वारंवार आदळे! आणि त्याच्या हळुवार हृदयांत आतांप्रमाणेंच त्यावेळींहि भावनांचा एक कल्लोळ उठे!

त्या सोनापुरांत असतांना दुसऱ्या दिवशीं रात्रीं तो तसाच बाबूलालच्या ग्यालरींत बिछान्यावर पडला होता. सगळीकडे जवळ जवळ शांत झालें होतें. आणि अरुणपुढें, आपल्या भवितव्याचें तेवढेंच मोठें थोरलें प्रश्नचिन्हे पडलें होतें!.. इतक्यांत, त्या शांत वातावरणांत तोच, त्याला आतां थोडा फार परिचित झालेला गंभीर आवाज ऐकूं आला, ''राम बोलोऽभाऽऽई राऽम!''

अरुण कितीतरी वेळ विमनस्कपणें त्या दृश्याकडे निरखून पाहत राहिला.. आवाज अगदी अस्पष्ट होईपर्यंत व अस्पष्ट झाल्यावरहि त्याच्या कानांत तेच पडसाद उठत होते!.. आणि त्याच्या मनांत त्या पडसादांबरोबर विचार येत होते, ''पहा, माझ्यासारखाच तरणा पोरगा!.. पण..

अकल्पितपणें चालला!. खरंच क्षणभंगुर! जगांतील सारेंच अगदी क्षणभंगुर! आणि तरीहि साऱ्यांची ही धडपड चाललीच आहे. एकाच क्षणीं, सुखें आणि दुःखें जगांत वावरत आहेत. हें समोरचं प्रत्यक्ष दुःख.. आणि मागल्या खोलींतलं बाबूलालचं आजचं नश्वर सुख!.. हो, आणि त्याच बाबूलालच्या सुखांत भागीदार होण्यासाठी आपण इथं झोंप घेतों आहों..

पण आपलं दुःख?.. आपलं भवितव्य?..

....तीं उपकारी माणसें, म्हणून आपण आपल्या नातलगांतून बाहेर पडलों. एवढेंच नव्हे; यदृच्छया आपल्या आयुष्यांत चालून आलेल्या टागोरभाईंनाहि आपण सोडून पळालों! आणि आतां बाबूलालचे हे उपकार? प्रेमळ असला तरी तो केवळ अपेक्षेनेंच परिपूर्ण भरलेला पाहुणचार ना?...छे! छे! आपण करीत आहो काय?. हेंच कां आपलं मोठं ध्येय?''

विचार असह्य होऊन, अरुण तसाच उठला; उशाखालीं घेतलेला कोट त्यानें अंगावर चढवला. आणि हळूंच जिना इतरून तो रस्त्यावर आला!.. त्यावेळीं कावडी घेऊन धावणाऱ्या दूधवाल्या भय्यांची पुन्हा ये-जा सुरू झाली होती. एखाद दुसऱ्या हॉटेलचा बाहेरील पाटीजवळचा विजेचा दिवा पेटूं लागला होता. मुंबई जागी झाल्याचींच तीं चिन्हें होती !

नव्या धीरानें अरुणनें वाटचाल सुरूं केली! पण मग त्यानंतरची आजची दुपार! 'नो व्हेकन्सी'च्या पाट्या वाचण्यांत, व'सॉरी, सध्यां कांहीं नाहीं!' हे शब्द अनेक ठिकाणीं पुन्हां पुन्हां शांतपणे ऐकण्यांतच, त्यानें ती घालविली होती!

शेवटीं पुन्हां पायपिटी करीत, तो आतां शहराच्या त्या गजबजलेल्या भागांतून लांब लांब, ... वरळी बीचवरील समुद्राच्या लाटांनी नाहणाऱ्या या दगडांत येऊन बसला होता!

एकदम भानावर येऊन, अरुणनें पुढ्यांतील भेळीचे, झरझर एक दोन बकणे मारले आणि तो शून्यपणें सभोंवार पाहू लागला.

सूर्य बुडत होता. लाटा अशाच वरखालीं उठून फुटत होत्या. पाठीमागल्या बाजूचे रस्ते फिरावयास येणाऱ्या लोकांनी हळूहळू गजबजत होते. पण त्याच्या भोंवतालचे ते दगड मात्र तसेच पूर्वीप्रमाणे निश्चलपणे बसले होते!

: ३८० :

अरुणनें सहज सभोंवार दृष्टि टाकली. थोड्या अंतरावरील एका दगडावर एक मध्यम वयाचा बंगाली मनुष्य उभा होता. त्याच्या उघड्या डोक्यावरील केस वाऱ्यानें भुरभुर उडत होते. अंगावरील कोट अगदी नवा नसला तरी चांगला होता. किंचित् जुनेऱ्या धोतराचा त्यानें आपल्या बंगाली पद्धतीनें सोगा सोडला होता. त्याच्या डाव्या हातांत जुनीशीच सारंगी दिसत होती. आणि उजव्या



हातांत शालीचें आच्छादन असलेली एक जाडशी तांबडी घडी होती.

अरुण त्याच्याकडे कांहींशा अहेतुक कुतूहलानें टवकारून पहात राहिला!

इतक्यांत, तो आपल्याच बाजूस येत असलेला पाहून तर अरुणला वाटले. ''ही स्वारी इकडे समुद्र किनाऱ्यावर दोन घटका मौज करण्यासाठींच आली असावी!... दगडावर शाल वगैरे अंथरून, आतां थोड्या वेळांत, हे राजश्री आपल्या वाद्याच्या तारा छेडण्यास सुरवात करतील कदाचित्!''

पण पहातां पहातां, तो अरुणच्या अगदीं जवळच्या दगडांपर्यंत येऊन कांहींशा दीनपणेंच त्यावर बसला; आपली सारंगी त्यानें आपल्या मांडीवर ठेवली; आणि एकदां सभोंवार दृष्टि फिरवून तो अरुणकडेच उलट निरखून पाहूं लागला. तेव्हां मात्र अरुणला त्याचा चेहरा लांबून वाटत होता तितका आनंदी दिसेना. कां कोणास ठाऊक, त्यावर एकप्रकारची खिन्नतेचीच छाया पडली होती.

पुन्हां भेळेचे दोन तीनदां फाके मारून, अरुणनें त्याच्याकडे एकदां उत्सुकतेनें पाहिलें. तो बंगाली अजूनहि त्याच्याकडेच पहात होता. तेव्हां अरुणनें शेवटी त्याला बंगालीतच विचारलें, ''आपनि सारंग-बाजीये मोने होच्छे! बाजिये शूनान् ना एकटा गान? बाङलादेशे आपनार बाडी कोथाय्...''

''हां, आमि सारंगबजाई, भालो बजाइ बले अंततः आमि मोने कोरे एसेछि.''

तो खिन्नपणेंच आपल्या सारंगीकडे हसूंन पहात, पुढें तुटक तुटक म्हणाला, ''माझं गांव होय?.. कलकत्त्याजवळच आहे तसं पाहिलं तर ! पण सध्यां मला कोणतंच गांव नाहीं म्हणा ना!..... नांवागांवाशी काय करायचं आहे?... भोवतीं सगळींकडेच भिरभिर पहात, मी सध्यां तरी दीनपणें फिरतो आहे!''...

क्षणभरच धाप टांकल्यासारखें करून तो थांबला व पुढे म्हणाला, ''पण हें पहा!..पाहिजे तर सारं काहीं मी सांगतो तुम्हांला मागाहून!.. पण मला भूक लागली आहे सडकून!.. स्पष्ट बोलतो.. माफ करा.. तुम्ही हवा खातां खातां मजेंत म्हणून तुमच्या पुढ्यांतील तें खात असलां, तर याक्षणीं, त्या साऱ्याची तुमच्यापेक्षां मलाच जास्त गरज आहे!''

अरुण तर त्याच्या त्या साऱ्या अनपेक्षित उद्गारांनी प्रथम दचकलाच!.. त्यानें स्वतःच्या खिशांतील अगदीं शेवटच्या पैशांची ती भेळ घेतली होती. आतापर्यंत अनेकवेळा, हवा खातां खातां केवळ मौज म्हणून भेळ खाल्ली होती खरी त्यानें!... पण आजतरी, त्याला भूक लागली होती म्हणूनच तो ती तेथें खात बसला होता.

तरी त्या बंगाली गृहस्थाची अधीरता व खिन्नता पाहून, तोहि आपल्यासारखाच एक ध्येयवादानें पोळलेला निराश्रित जीव आहे, हें अरुणनें ओळखलें; त्यानें एक लहानगा वचका भरून त्या पुडींतील थोडी भेळ स्वतःच्या मुठींत घेतली; व बाकीची सारी पुडीच्या पुडी त्यानें त्याच्यापुढें केली.

त्या बंगाल्याच्या चेहऱ्यावर किंचित्काळ आनंद झळकला. त्यानें घाईघाईनें ती आपल्यापुढें केली; व एखाद्या आधाशाप्रमाणें तो तिचे एका मागून एक बकणे मारूं लागला!... पुडीतील सारी भेळ एकदांची संपविल्यावर, त्याने कागद वाऱ्यावर सोडला; व खातां खातां दगडावर पडलेले दोन तीन कुरमुरे तोडांत टाकीत, त्यानें अरुणकडें कांहींशा कृतज्ञतेचा एक प्रेमळ दृष्टिक्षेप टाकला!

: ३८१ :

''आच्छा, एखन चालून!'' तो थोड्या वेळानें एक दीर्घ निःश्वास सोडून अरुणकडे हंसून पहात बंगालींत म्हणाला, ''हां, एखन अनेकटा भालो बोध होच्छे. पण काय हो तुम्ही तर महाराष्ट्रीय दिसतां!.. आणि बंगाली कसें बोलतां बरं एवढं अस्खलित?.. पण तें असो म्हणा; माझी माहिती विचारीत होता तुम्हीं, नाहीं कां मघां? तीच प्रथम सांगतो कबूल केल्याप्रमाणें!..''

त्यानें आपली शाल व त्याखालचें ब्लँकेट एकदां नीट झाडले, त्यावर तो बसला आणि आपली सारंगी पुन्हां कांखेजवळ धरून, तो थोडा अरुणच्या बाजूस सरकला.

''आम्हां बंगाल्यांना भावनाप्रधान म्हणतां नाहीं कां सारे तुम्ही?..''तो खिन्नपणें हंसून म्हणाला, ''हो, आहे खरं थोडंसं तसं!.. पण भावनाप्रधानता निखालस वाईटच असं वाटतं कां हो, बाबुजी तुम्हाला? तें असो म्हणा!.. मला सांगायचंय् काय? मीहि एक बंगाली गौडब्राह्मण आहे. रवींद्र चतर्जी माझं नांव! कलकत्त्याजवळ... दहा मैलांवर माझं गांव आहे. नांव कशाला पाहिजे त्याचं? कारण आज सगळीकडेच भटकतो आहे!..कुठेंहि थारा नाहीं मला सध्यां!..

कां म्हणून विचारवंसं वाटत असेल नाहीं तुम्हांला! सांगतो! तेच सांगतो आतां! कारण ही सारंगी!...

जुनी दिसते आहेना तुम्हाला!..पण एक लाख रुपये दिलेत तरी ती मी देणार नाहीं तुम्हाला! हो, या क्षणीसुद्धां!..पंधरा वर्षे रात्रंदिवस हिची सेवा केली आहे मी, बाबूजी!.. कला! कला!..सारी म्हणत नाहीं मी.. पण खूप संपादन केली!... एकच ध्येय होतं त्यावेळी,...आपण उत्कृष्ट सारंगीकार व्हायचं!..

माझं शिक्षण तसं विशेष नाहीं. जेमतेम कॉलेजपर्यंत गेलो! बापानें मरतांना मजसाठीं थोडी



फार पुंजी ठेवली होती. नाहीं असं नाहीं!.. आणि माझी आई तर मला उद्योग करायला पुष्कळ सांगायची!..

पण उद्योग म्हणजे काय हो, बाबूजी?..

मी कांहीं निरूपयोगी नव्हतो!..कला!.. पैसा न देणारी कला!... पण मग मी त्याच माझ्या कैफांत होतो. तेवढ्यासाठी अगदी गरीबीतदेखील हालानें दिवस काढले.

पण मग शेवटी शेवटीं घरांतील एक एक जिन्नस, आईच्या डोळ्यांतील अश्रु दुर्लक्षून, मला तिच्या डोळ्यादेखत विकावे लागले, तें पाहून माझी आई सारखी रडत राही! तेव्हां तिला मी म्हणे, ''माऽजी, अग थोडंसं, थांब, वेडे! हा तुला दरिद्री वाटणारा तुझा मुलगा, आतां उत्कृष्ट कलावंत होणार आहे थोड्याच दिवसांत! एक साधी लकेर काढली मी माझ्या वाद्यावर,.. तर सारं जग मोहून जाऊन माझ्या भोवतीं धांवत गोळा होईल!.. थिएटरं गजबजतील स्वरसंगीत ऐकायला माझं!..हूं काय समजलीस? आणि मग माय ! तुला पाहिजे तितका पैसाच पैसा?..''

पण हें ऐकून ऐकूनहि, आई शेवटी एके दिवशी ढळढळां रडली!...

: ३८२ :

शेवटीं वर्षांपूर्वी, मला माझ्या कलेच्या पूर्णतेबद्दल आत्मविश्वास वाटूं लागला;..मला अगदी जग जिंकल्यासारखें वाटलें त्या दिवशीं!..तो क्षण मी जन्मांत कधी विसरणार नाहीं! मी इतका आनंदांत होतो त्यावेळीं..वाटलं, तसं जावं आणि आईला घट्ट मिठी मारावी!...

पण माझी म्हतारी आई, माझ्या बेफिकीर वागणुकीमुळें दुःख भोगून भोगून, त्यापूर्वीच मला शेवटीं सोडून गेली होती! माझ्या सत्तेच्या घरांतील एक एक करतां बहुतेक साऱ्या वस्तु, माझा तोपर्यंतचा चरितार्थ चालवण्यासाठी नाहींशा झाल्या होत्या. माझी प्यार सारंगी, मी बसत असे ती आरामखुर्ची व लांबच लांब विस्तारलेलं माझं खेड्यांतील दिवसेंदिवस ओसाड होत चाललेलं घर!... एवढ्यावरच त्या दिवशी माझी मालकी होती!

सारंगी मांडीवर ठेवून मी तसाच एकाकी बसलो.. किती तरी वेळ विचार करीत होतो. जुन्या रकमांची तर फेड मला करतां येईना; म्हणून नवीन चार आणेहि हातांत द्यायला कोणी तयार नव्हता. आणि मी स्वतः तर संपुष्टांतच आलो होतो!

तेव्हां माझ्यासारखा एक साधासुधा भणंग तरी काय करणार?... माझ्याकडे कला होती; तिचा उपयोग करून, कीर्ति व जगण्याइतका तरी पैसा मला मिळविण्याची अपेक्षा होती! पण...

शेवटीं मी वैतागलो, आल्या किंमतीला घर आणि त्याबरोबर त्यांत असल्या नसलेल्या साऱ्या वस्तूहि फुंकून टाकल्या. आणखी पंचवीस रुपये आले असते; पण माझ्यामुळें दुःखांत आयुष्य

कंटून गेलेली माझी प्रेमळ आई, जिवंत असता, ती झोपतांना जी पांघरे तीच ही शाल व ब्लँकेट विकण्याचं माझ्या अगदी जिवावर आलें! आईच्या प्रेमाचं पांघरूण आपण होऊनच मीं गमावलं होतं. तेव्हा माझं दुःखी मन, प्रेमळ आईच्या पांघरुणांतच आसरा शोधीत होतं!

प्रत्येक चीजवस्तू घराबाहेर काढतांना,.. प्रत्यक्ष माझ्या बाबांची आठवण म्हणून उभे असलेल्या माझ्या घरांतून स्वतः तिऱ्हाईत म्हणून बाहेर पडतांना मला माझ्या अंतःकरणात कोणी तरी कुरतडत असल्यासारखं वाटलं!

साऱ्यांची देणी भागवून राहिलेले अवघे तीसपस्तीस रुपये खिशांत घातले,... आणि एका हातांत माझी सारंगी - माझा प्राणच जणुं व दुसऱ्या हातांत माझ्या आईच्या ह्या आठवणी, जगांतील खडकाळ मार्ग चांचपडणारी काठी,.. एवढ्या वस्तूंसह, आपल्या हाताने माझा सारा पसारा आटपून, मी सत्तेच्या घराबाहेर होऊन, निराश्रित रस्त्यावर जाऊन उभा राहिलो!

: ३८३ :

घमेंड म्हणून नाहीं सांगत मी, बाबूजी... एवढं सारं मी माझ्या कलेसाठीं केलं!... मनांतल्या मनांत हंसत असाल नाहीं तुम्हीं, मूर्ख मी म्हणून?.. पण खरी वस्तुस्थिती सांगायची तर ही अशी आहे.

दुसऱ्या कोणी मला तशी किंमत दिली नाहीं, तरी मी मात्र मरेपर्यंत तितक्याच आत्मविश्‍वासाने ओरडून म्हणेन, कीं मी एक उत्कृष्ट कलावंत आहे!.. तरी बाबू, आज तुम्हांला अनुभवाचे खरे खरे बोल सांगतो. या क्षणीं, तुमच्यासमोर जगांतील एक श्रेष्ठ कलावंत, भणंगभिकारी होऊन बसला आहे. ज्याचं कौशल्य पहावयास...ज्याच्या स्वरसंगीताच्या माधुर्याचा आस्वाद घ्यावयास, थिएटरें गजबजतील अशीं मला सुखस्वप्नें पडत होतीं,. तोच हा आज तुमच्या समोर बसलेला वेडा रवींद्र,.. आज त्याच्या साध्या तहानभुकेलाहि महाग झाला आहे.

खरंच, जगाच्या मोठ्या बाजारांत आपल्या तुंटपुज्या कलेचा बाजार मांडून बसलेलीं, प्रत्यहीं.. पावलोंपावलीं दिसून येणारीं ही घुंगुरटींहि,.. आज मजपेक्षां जास्त सुखी आहेत!.. तुम्ही म्हणाल, अपेक्षा कोणाला नाहीं? हो!..पण आज माझ्या तपश्चर्येचं जगांत खरं चीज होत नसलं, तरी मला असलं हें कुत्र्याचं जीवन खासच नको आहे!''

बोलतां बोलतां रवींन्द्र चतर्जींचें भुकेनें व्याकूळ झालेलें तोंड, आत्मविश्‍वासानें व स्वाभिमानानें क्षणभर प्रफुल्ल झालें; त्याच्या ओढलेल्या पण चकाकणाऱ्या डोळ्यांत बुद्धिसामर्थ्याबरोबरच, खिन्नता, त्रस्तपणा, प्रेमळपणा, सारे भाव एकदम तरंगत आहेत असेंच अरुणला वाटलें.

अत्यंत उत्कट आवेगाबरोबर आपली छाती हातानें चाचपतांच, जगांत अयशस्वी ठरलेल्या त्या



श्रेष्ठ कलावंताच्या हृदयाच्या भावना, अरुणला तत्काल समजून आल्या. तो भारावलेल्या हृदयानें आपल्या जागेवरून उठला; व रवींद्र बसला होता त्या दगडावरच त्याच्याजवळ बसून, अत्यंत प्रेमानें त्यानें त्याच्या पाठीवर एकदां हळूंच थोपटलें.

: ३८४ :

अरुणहि आज जवळ जवळ तसल्याच परिस्थितींत होता. त्याची कला, त्याच्या पदव्या, त्या क्षणीं तरी मातीमोल-फोल ठरून, तो निराश्रितपणें इकडे तिकडे भटकत होता. आपल्याप्रमाणेंच चतरजीचें हृदयहि आंतल्या आंत धुमसून जळत आहे याची जाणीव झाल्यामुळें, अरुणचें जात्याच सहानुभूतिपूर्ण हृदय अगदी उचंबळून आलें होतें!

चतर्जीला उठवीत तो हळुवारपणें त्याला बंगालींतच म्हणाला,'उठा रवीन्द्र, तुमच्याहून माझी स्थिती कांहीं निराळी नाहीं. मीहि एक, तसाच जगांत अस्थिर पावलें टाकणारा, तुमच्यासारखा निष्कांचन कलावंत आहे. चला, असंच जरा धक्क्याजवळ फूटपाथवरून बाजूबाजूनें पुढें जाऊंया. चालतां चालतां मी मजविषयीं तुम्हाला सांगतो. आपल्याला एकाच प्रकारचा मार्ग तुडवून पुढें जावयाचं आहे...''

मोटारी इकडे तिकडे फिरत होत्या. विविध रंगांचे पोषाख घालून स्त्री-पुरुष चालले होते. जगांतील जीवनकलहाची अगर त्यांतील इतर जबाबदारींची किंचित् देखील जाणीव नसलेलें एखादें बालकहि मधूनच इकडून तिकडे दुडदुडतांना दिसत होतें!

रवीन्द्राच्या खांद्यावर हात टाकून, ते बसले होते त्या दगडांकडे व फेंसाळणाऱ्या समुद्राच्या लाटांकडे दृष्टि फिरवीत, अरुण त्या जनसंमर्दांत शिरला!...

: ३८५ :

धक्क्याच्या अगदीं कोंपऱ्यावर रवीन्द्र विमनस्कपणें बसला होता. 'थोडा वेळ दोघे निरनिराळे फिरू या. साफ काळोख पडला कीं, धक्का सुरू होतो, तेथल्या रस्त्यांच्या नाक्याजवळ आपण पुन्हां भेटूं!' असें सांगून अरुण गेल्याला जवळ जवळ अर्ध्या तासावर वेळ होऊन गेला होता. हळू हळू बारीक होणाऱ्या अरुणच्या पाठमोऱ्या आकृतीकडे एकाग्रतेनें पाहात असता चजरजीच्या दृष्टीपुढें त्यानें नुकताच सांगितलेला त्याच्या आयुष्याचा लहानसा झगडा उभा राहत होता.

अरुणहि, आपल्यासारख्याच एक, भोंवतलच्या जगांतील व्यवहारांनी गांगरलेला, निराश्रित कलावंत आहे, या जाणिवेनें चतर्जीला त्याच्या दुःखांत थोडा विरंगुळा वाटला होता व त्याची आपली अशी अकल्पित भेट झाल्यामुळे, थोड्या वेळापूर्वीपासून आपल्या दुःखात वाटेकरी लाभल्याचे त्याला समाधान मिळालें होतें. पण केवळ हे विचार त्याच्या मनाची तसली शांति कितीशी

टिकविणार? पोटांत भुकेची लाही उठली होती!...त्यामुळें तर त्याला कांहीं एक सुचत नव्हतें.

अगदी हतबलतेनें रवींद्राने हळूच आपली सारंगी हातीं घेतली व दीपरागाचे योग्य स्वर धुमवून तो हवेंत सोडूं लागला;.. आणि याचवेळी समोर पसरलेल्या गजबजलेल्या अफाट मुंबईचा तो भाग तुरळक तुरळक दिव्यांनीं झगझगूं लागला होता. त्याला सहज कल्पना आली, 'आपल्या दीपरागानेंच जणू हे दिवे पेटले!'.. त्या कल्पनेनें तो किंचित्‌काळ वेड्यासारखा खिन्नपणें हंसला. 'आपली कला इतक्या श्रेष्ठ दर्जाची आहे खासच!' या आत्मविश्वासाचा नंदादीप त्याच्या हृदयांत अखंड तेवतच होता;.. त्याची त्याला जाणीव होती! तरी ती सभोंवारची सारी स्वत्वनिष्ठ कठोर कावकाव व पोटांतील भुकेची कावकाव तत्क्षणीं थांबवूं शकेल, असा एकादा राग नाहीं,याचा त्याला राग आला!

तो तसाच खिन्नपणे उठला;.. व प्रयासानें मंद पावलें टाकीत अरुणला भेटावयाच्या ठरलेल्या जागेच्या बाजूनें चालूं लागला.

: ३८६:

त्याच्या भोंवतालची गर्दी हळूं हळूं वाढूं लागली होती. प्रत्येकजण आपापल्या लहानसान सुखांत रममाण झालले दिसत होते; आणि त्याला तर, त्याक्षणीं लहानसें भुकेचें दुःखहि असह्य झालेलें! वैतागलेल्या डोक्यानें त्यानें स्वतःला प्रश्न केला, 'आपल्यापेक्षा हीं सारींच माणसें श्रेष्ठ कां?..पण मन कांहींच निर्णय देईना; तें अगदीं नबळें झालें होतें! कोणी कांहीं खातांना दिसलें कीं, त्याचें मन जास्त व्याकूळ होई. कुठें तरी कांहीं तरी खावयास मिळेल, ही आशाच तेवढी त्याला पुढें पुढें नेत होती!...

बराच निराश होऊन, शेवटीं गेले चार दिवस आपल्या वाद्यासह तो मुंबईतील बहुतेक सिनेमाकंपन्या फिरला होता. एका फुटपाथच्या कोंपऱ्यावर, काल रात्रीं, आईच्या ब्लँकेटवर अंग टाकून, आईची शाल पांघरून, आईविषयीं, आपल्या कलेविषयीं व आपल्या भवितव्याविषयीं, तळमळत विचार करीतच त्याची सकाळ उजाडली होती.

मुद्दाम बोलवलें होतें, म्हणून मोठ्या आशावंत मनानें आपल्या खिशांतील शेवटचे चार आणे खर्चून, तो आजच सकाळीं दादरला एका सिनेमाकंपनीत गेला होता. पण त्यांच्या बेफिकीर 'उद्यां' मुळें, त्याचा आज तरी प्राण गळ्याशीं आला होता...

''आपली पंधरा वर्षांची धडपड! हो, अगदीं सर्वस्वाचा त्याग! हस्तगत असलेली आपली कला,..सारी निष्फळ, निष्प्रभच तर मग! आज आपण केवळ अन्नासाठी व्याकूळ होऊन आपलीं पावलें अडखळत टाकीत आहों. कसलीं आपलीं ध्येयें? कसला आला आहे प्रामाणिकपणा? छे



छे!..या जणूं अफूच्या घातकी गोळ्याच एक एक!...''

: ३८७ :

रवीन्द्राच्या डोक्यांत असले विचार चालले होते, तोंवर त्याच्या पायांनी त्याला धक्क्याच्या या टोकापर्यंत आणून सोडलें होतें.

त्याच कोपऱ्यावर असलेल्या एका फळफळावळीच्या दुकानांत, रसानें भरलेल्या मोसंबी, सफरचंद, डाळिंब वगैरे फळांवर विजेचा झगझगाट पडला होता. तिकडे पहातांच, रवींद्राच्या तोंडाला पाणी सुटलें. एकाद्या गाण्याचे सूर ऐकून त्या फळवाल्यानें त्याला त्यांतील फळें यथेच्छ खाऊं दिलीं असतीं,..तर किती बहार होती यावेळीं?...

त्याला वाटलें, त्यामुळें जगांतील धडपड अर्धीअधिक थांबली असती. पण छे! तें किती अशक्य!

तो तसा तिकडे पहात होता;..तोंच तो दुकानदार खाली उतरला, आणि जवळच कोठें तरी निघून गेला.

आंत कोणीहि नव्हतें !...

रवींद्र दुकानाच्या कोपऱ्याजवळच उभा होता;...आणि कोपऱ्यावरील तीं सारीं फळें, त्याच्या हाताच्या टप्प्यांत होतीं!..त्यानें इकडे तिकडे पाहिले, अगदीं नजीक असें त्याला कोणी दिसलें नाहीं!

क्षणभरच त्याच्या मनांत एक मोठा झगडा झाला!

पण मग दुसऱ्याच क्षणीं त्याचा हात लांब झाला;..हाताला लागलीं तीं चार पांच फळें त्यानें उचललीं!..सारें धैर्य एकवटून, त्याच्या पायांनी पहिलीं दहावीस पावलें सभ्यपणें मंद मंद टाकली;...आणि थोडा पल्ला गांठतांच तो धांवत धांवत धक्क्यापर्यंत पोंचला. तेथून त्यानें एका खडकावर संभाळून उडी मारली व त्यावर तो धापा टाकीत बसला.

किंचित् काल कान टकवकारून त्यानें चाहूल घेतली;..कोणी आपला पाठलाग केला नाहीं अशी खात्री होतांच, शालीच्या घडींत लपवलेलीं फळें त्यानें बाहेर काढलीं

: ३८८ :

तीं समोरील फळें आपल्या पोटांत शक्य तितक्या लौकर कशीं पडतील, हा एकच एक विचार त्याच्या मनावर पुढले कांहीं क्षण ताबा चालवीत होता!

भूक, तहान, साऱ्यांचे शमन झाल्यांवर त्यानें कठड्यावरून उडी मारली,..पुन्हां रस्त्यावरून चालूं लागल्यावर मात्र त्याच्या मनांत विचारांचा एक नवा वणवा पेटला.

‘‘आपण केलें हें योग्य कां? आपण चोर, गुन्हेगार का? आपल्याला भूक लागली;..अगदी असह्य झालें. जवळ कपर्दिक नाहीं;..मेहनतीला चीज नाहीं!.. नाइलाजानें शेंकडों फळांतून चार उचललीं!..पाप-पुण्य, चांगलें-वाईट, आहे तरी काय?-’’

असलेच कांहीं, अर्धवट अस्थिर विचार करीत, अरुणनें त्याला सांगितलेल्या ठिकाणीं येऊन चतर्जी पोहोंचला. आतां मघा वाटत असलेली पोटाची भ्रांत, त्याच्या मनाला तात्पुरती तरी भासत नव्हती. तेव्हां त्याच्या मनांत आपल्या कलेविषयींचा आत्मविश्वास पुन्हां बळावूं लागला; व तो हंसून स्वतःशींच पुटपुटला, ‘‘चला!..कांहींका असेना! मजसारखा एक श्रेष्ठ कलावंत जगांत आणखी एक दिवस तरी जास्त जगणार!- आणि कोणी सांगावं?..त्यामुळेंच कदाचित् आणखी अनेक वर्षेंहि!’’

असल्या विचारांमुळे झालेल्या प्रसन्न मनानें, त्यानें आपली सारंगी हातीं घेऊन, एका कोंपऱ्यांत बैठक टाकली;.. आणि अरुण येईपर्यंत तारा छेडण्याचा विचार करून, तो तिच्या खुंट्या पिळूं लागला.

: ३८९ :

स्वानंदासाठीं, आपल्या कलेच्या उत्कर्षासाठी,..तो त्याचीं बोटें या वाद्यावर इतकी वर्षे जशीं फिरवीत आला होता, तसल्याच उच्च भावनेनें आपल्या सारंगीच्या तारा छेडून, तो गंभीर पण मंजूळ स्वर काढूं लागला!..

त्या बाजूस वर्दळ नव्हती. आजूबाजूस फारसें कोणी फिरकतच नव्हतें आणि रवीन्द्राला तशी अपेक्षाहि नव्हती. तारांना हळुवारपणें गोंजारून, आपल्या हृदयांत उसळणारीं सारीं सूक्ष्म आंदोलनें हवेंत सोडतांना, त्याचें अंतःकरण अवर्णनीय आनंदानें भरून आल्यामुळें त्याच्या डोळ्यांतून, आनंदाश्रू ओघळूं लागले होते. त्यांतच पूर्ण तन्मय झाल्यामुळें, भोवतालच्या साऱ्या वस्तूंचें, कालाचें,...सारें सारें भान तो पूर्णपणें विसरला होता!

असा किती वेळ गेला, त्याला समजलेंसुद्धा नाहीं. इतक्यांत! स्वतः आळवीत असलेल्या रागाच्या स्वरांशीं सर्वस्वी विसंवादी असा, खळकन् झालेल्या नाण्याचा आवाज त्याच्या कर्णपटलावर आदळून, चतर्जी दचकून भानावर आला.

आपल्या सारंगीवर फिरणारा हात एकदम थांबवून, त्यानें इकडे तिकडे पाहिलें. जगात दोन आणे किंमत असलेला एक निकलचा चौकोनी तुकडा त्याच्यासमोरच फुटपाथवर पडला होता; आणि एका मनुष्याची लांब जात असलेली अंधुक पाठमोरी आकृति त्याला दूरवर दिसत होती.

एकंदर परिस्थितीची थोडी कल्पना येतांच, चतर्जी एकाएकीं संतापून, जागेवरून पटकन्



उठला;...त्याच्या अंगाचा अगदीं भडकाच होत होता!...

: ३९० :

शेवटीं अतिशय रागामुळें थरथरणारे आपले ओंठ दाबीत, रवीन्द्र ओरडला, ‘‘क्षुद्र लेकाचे! माझ्या कलेची हे लोक अशी किंमत करतात. त्यांच्या डोळ्यांत नेहमी तरंगत असलेली अपेक्षाच त्यांना साऱ्या ठिकाणीं दिसते. हँः !..हा आतां गेलेला हृदयहीन सैतान! स्वतःला तो मोठा पैसेवाला समजत असेल! पण त्याला म्हणावं, मूर्खा, गरीब असलो, तरी माझ्या कलेचा असा हलका पैसापासरी बाजार मांडून येथें बसलेलो नाहीं मी ! तुला संगीत ऐकायचं होतं, तर हवेवर स्वार होणारे माझे स्वर तुझेच होते! पण फडका पुढें अंथरून, आपली अर्धवट अपूर्ण कला पोटासाठीं तुजवर लादणारा, एक क्षुद्र प्राणी ठरविलेस मला तूं!...तसला भिकारी नव्हे मी!..एक श्रेष्ठ कलावंत आहे! हें तुला समजत नसलं, तरी मला त्याची पूर्ण जाणीव आहे. आज या घटकेला मी भुकेकंगाल असलो, तरी केवळ रसिकांच्या सेवेसाठीं माझे जलसे थिएटरमध्यें होतील; तेव्हां दांभिक मोठेपणासाठीं कां होईना, रिझर्व्ह करावयाच्या तुझ्या खुर्चीसाठीं तुला गर्दीत धडपडावंच लागेल! आणि मगच बेट्या माझी खरी किंमत तुला समजेल!’’

रवीन्द्रानें त्या निकलच्या नाण्याकडे एकदा अत्यंत तुच्छतेनें पाहिलें; आणि दुःखानें जड झालेल्या हृदयांतून गळणारी टिपें आपल्या कोटाच्या बाहीनें पुसत तो मंद पावले टाकीत पुढें चालूं लागला!

पण मग चालतां चालतां, त्याचा संताप थोडा कमी झाला; आणि एक तासापूर्वीच त्यानें चोरून खाल्लेल्या फळांची व त्या फळवाल्याची त्याला एकदम आठवण झाली!...पटकन् कांहीं विचार येऊन, चतर्जी एकदम दचकला, थबकला; आणि क्षणभरच मनाशीं कसला तरी विचार करून, तो पुन्हां बसला होता त्या ठिकाणीं हळूं हळूं चालत आला.

रस्त्याच्या काठाला असलेल्या दिव्याच्या उजेडांत, मघांचे तें नाणें तेथें तसेंच चकचकत पडलें होतें!..चतर्जी क्षणभर घुटमळला; त्यानें एकदां अपराधी मनानें सभोंवार पाहिलें; आणि मग जणूं झडपच घातल्याप्रमाणें घाईघाईनें जवळ जाऊन, त्यानें तें नाणें उचललें व कोटाच्या आंतल्या खिशांत कोंबलें!

: ३९१ :

चतर्जीला सोडून अरुण पाय नेतील तिकडे चालला होता;... कोठें आणि कशाला, हा त्यावेळीं त्याच्यापुढें प्रश्नच नव्हता!..काळोख गडद होत गेला, तरी मानवी जगांतील दिवे त्यांत उजेड पाडण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र अरुणच्या हृदयांत त्या क्षणीं तरी दाटलेला अंधार

घालवून टाकणारा एकादाहि दिवा तेथें नव्हता. नाहीं म्हणावयास रवीन्द्र चतर्जींची भेट! त्यामुळें त्याच्या मनाला वाटणारें समाधान काय तें त्याच्या अंतःकरणांत अजून कायम होतें!...

मोठ्या रस्त्याला एक निर्जन फांटा फुटला. हमरस्त्यांतूनच गेले दोन दिवस तो सारखा फिरत असल्यामुळें, त्यानें आपला मोर्चा तिकडे वळवला!..त्या बाजूस माणसांची फारसी वर्दळ कां नाहीं, असा विचार करीत काळोखांतून तो पुढें पुढें जाऊं लागला;...तों त्याला आढळलें, रस्त्यांत पुढें एक पूल लागत आहे. त्यानें चारी बाजूस दृष्टि फिरविली, तेव्हां त्याला खालीं हिरवे तांबडे दिवे दिसूं लागले. खालच्या अंधारांत, रूळ आणि विजेच्या तारा क्वचित चकाकतांना पाहून त्यानें जाणलें कीं तो एक रेल्वेवरील माणसांचा पूल आहे!

तो तसाच पुढें गेला. अजूनहि त्या बाजूस चिटपांखरूं फिरकत नव्हतें; त्याला आश्चर्य वाटलें! कां?..लोखंडी कठड्यावरून, त्यानें जातां जातां सहज हात फिरवला, तेव्हां त्याच्या तळव्याला गंज लागला; म्हणून त्यानें नीट पाहिलें, तों पुलाचा बराचसा भाग मोडकळीस आला होता आणि दुसऱ्या बाजूस साधारण अर्ध्या फर्लांगावर, त्या पुलालाच समांतर रेषेंत जाणाऱ्या दुसऱ्या पुलावरील झगझगाट व माणसांची हालती वर्दळ पाहून तर त्याची खात्रीच झाली, कीं तो दुसरा नवा पूल झाल्यावर, हा मोडकळीस आलेला पूल निर्जन झाला असावा.

त्याच्या त्या वेळच्या मनःस्थितींत तसल्याच निर्जन स्थानाची त्याला आवश्यकता होती. म्हणून त्यानें समाधानाचा एक सुस्कारा सोडून, अकारणच लांबवर पर्यंत पाहिलें..अंतराअंतरावर काळोखांत लुकलुकणाऱ्या दोन तीन दिव्यांशिवाय तेथें कसलीच हालचाल नव्हती. अरुणनें आपल्या डोक्याची टोपी काढून हाती घेतली व तेथें कठड्याजवळ काळोखांतच बसकण मारली.

: ३९२ :

खाली दोन्हीं बाजूंस असंख्य लहानमोठे दिवे लुकलुकत होते. गाडी येण्याजाण्याच्यावेळी, लांबचे सिग्नलचे दिवे हिरवे होत,...पुनः तांबडे होत. जवळचे सिग्नल वर खाली होतांना, त्या शांततेत 'खड्' करून सूक्ष्म आवाज होई.

तो त्या बाजूस असें पहात असतां, वर व खाली जाणाऱ्या दोन तीन विजेच्या गाड्या,..'खटऽक् खटऽक्' करीत, त्याच्या त्या मोडक्या पुलाखालून वेगानें निघून गेल्या!...

दुसऱ्या बाजूस नव्या पुलाकडे त्यानें दृष्टि फिरविली. त्यावरून माणसें सारखीं येत जात होतीं. मधून मधून मोटारी व व्हिक्टोरियाहि जातांना दिसत होत्या. प्रकाश चक्क पडला होता!..

तेथील त्या झगझगाटाशीं व अव्याहत हालचालीशीं, आपल्या पुलावरील अंधार व निर्जनता यांची, अरुणनें मनांत सहजच तुलना केली; आणि तो आपल्याशींच खिन्न हंसून म्हणाला,



''असले दोन पूल मानवी आयुष्यांतहि आहेत!..आणि तेथें देखील दुःखाचा मोडका वाटणारा पूल कोणालाही नको असतो!''

दुःखाच्या निर्जन पुलाची ती कल्पना त्याच्या डोक्यांत आली;.. आणि त्याबरोबरच, आपण आज त्या निर्जन पुलावर, दुःखी मनाला विरंगुळा आण्याचा प्रयत्न करीत एकटेंच बसलों आहो,..ही जाणीव होऊन, त्या काळोखांतच निराशेनें हंसत, अरुणनें अकारण लांबवर पाहिलें!

: ३९३ :

पण काय आश्चर्य!...तो बसला होता त्या बाजूकडेच कोणी तरी चालत येत होतें. एका दिव्याच्या प्रकाशांत ती आकृति हालली व पुन्हां अंधारांत दिसेनांशी झाली दुसऱ्या जवळच्या दिव्याचा प्रकाश तिजवर पडला;...अणि आतां अगदी पहिल्याच दिव्याजवळ येऊन तो मनुष्य थबकला.

अरुणला त्याचा कांहींच बोध होईना. हा मनुष्य यावेळीं येथें कां? याच्या मनांत तर कांहीं काळंबेरं नाहीं ना?...काळंबेरं म्हणजे, अरुण स्वतःविषयीं म्हणत नव्हता!..त्यावेळीं तो चोर असता तरी अरुणकडून काय त्याचें दारिद्र्य..त्याची निराशा चोरणार होता? पण त्या माणसाच्या स्वतःच्या जिवाविषयीं!...हो, असेल!

इतक्यांत,..लांबून त्यांच्या पुलाच्याच बाजूस एक गाडी जोरानें येत होती तिचा पुढील दिवा वेगानें जवळ जवळ येत होता. तो मनुष्य झपझप पावलें टाकून थोडा पुढें झाला, कठड्यावर चढून बसला;..आणि गाडीच्या रुळाचा अदमास करीत तो खालीं बघूं लागला.

अरुण दचकला व जागेवरून घाईघाईनें उठला. त्याच्याकडे अजून त्या नवख्या माणसाचें लक्षहि गेलें नव्हतें. गाडी तर वेगानें त्यांच्याच बाजूस येत होती. तिच्या रुळावर आपटणाऱ्या चाकांचा आवाज क्षणाक्षणाला मोठा होत होता. आतां या घाईत, त्या धिप्पाड माणसाला मागें कसा खेंचावा, तें अरुणला समजेना. त्याला वांचवावे असें वाटत असूनहि अरुण अगदी गांगरला होता. इतक्यांत, सात आठ वर्षांचा एक मुलगा, त्या अंधारांतून धांवत धांवत येऊन त्यांच्याजवळ उभा राहिला...आणि प्रसंगावधान संभाळून अरुणनें धांवत जाऊन त्या बसलेल्या आकृतीपुढें चपळाईनें हात घातला व आपलें सारें बळ एकवटून त्याला आपल्या बाजूस ओढीत तो मोठ्यानें ओरडला, ''थांबाऽ थांबा!..अहो, असा अविचार करू नका!..हा पहा तुमचा मुलगाच, मला वाटतं,..तुमच्यामागें धांवत आला आहे!''

: ३९४ :

त्याचे शब्द पुरे होण्यापूर्वीच, 'खडऽटक् खडऽटक्' असा अगदीं जवळचा हृदय हादरविणारा

कर्कश शब्द करीत, ते उभे असलेल्या पुलाखालून, त्यांच्या पायांखालूनच गाडी गेली;..आणि तो कठड्यावर चढलेला मनुष्य, अरुण उभा होता त्याजवळच दणकन् पडला. तो पडतांपडतां त्याच्या धक्क्यानें अरुणलाहि बसकण मारावी लागली.

या एकच गोंधळानें तो मुलगा मात्र कावराबावरा होऊन मोठ्यानें ओरडूं लागला. त्याला पाहतांच तो मनुष्य अंगावरची धूळ झाडीत पटकन् उठला व त्याच्याजवळ धांवत जाऊन त्याला त्यानें 'उगी उगी' करीत पोटाशीं धरलें. तोहि दोन तीन मिनिटांत गप्प राहून विचारूं लागला, ''कसें पडलात हो, बाबा?..गाडी खालून गेली म्हणून घाबरलांत? वर कशाला चढला होतां?..आई जेवायची वाट पहाते आहे!... तुम्हांला या बाजूला येतांना पाहिलं म्हणून मी मागून आलो. किती हांका मारल्या, पण तुम्ही थांबलाच नाहीं!..''

लागलीच, ही त्याची बडबड सुरू होताच त्याला पोटाशीं घट्ट धरून, त्या गृहस्थानें काळोखांत अस्पष्ट दिसणाऱ्या अरुणच्या चेहऱ्याकडे एकदां कृतज्ञतेनें पाहिलें आणि एकदां पुलाच्या कठड्यांतील फटींतून खालच्या काळोखांतील अस्पष्ट रुळाकडे, त्यानें आपले डोळे रोखले.

पण तरीहि त्याची जिव्हा गेल्याप्रमाणें तो अगदीं गप्पच बसला होता!...

: ३९५ :

''बरंच लागलं कां?..'' बोलावयास कशी सुरवात करावी तें न समजून, अरुणनें त्या बापलेकांजवळ जाऊन विचारलें.

''जीव जाणार होता, नव्हे घालवीत होतो!..तें आतां थोडं खरचटलं त्याची कसली काळजी करायची?..''तो खिन्नपणें हंसून अरुणला म्हणाला, ''तुम्ही देवासारखे धांवून आलां! आणि या माझ्या अजाण पोरला मी पुन्हां लाभलो. तुमचे आभार कोणत्या शब्दांत मानूं?..मला समजत नाहीं!''

''चला जाऊंद्या तें! तुम्हांला तुमच्या घरीं नेऊन पोचवतो!...''अरुण त्याच्या मुलाचा हात धरून पुढें म्हणाला, 'हा तुमचा मुलगा आला म्हणून बरं!.. नाहींतर एकट्या मला तुम्ही आवरलांच नसतां!..''

''शेवटची, आणीबाणीची...धडपड होती ती जिवाची!''ते तिघे पुलावरून तसेंच पुढें चालतां चालतां, त्या मुलाचा बाप म्हणाला. अजूनहि चालतां चालतां मध्येंच एकदम तो खालच्या रुळांकडे वळून वळून पाहत होता. अरुण त्याच्या या हालचालींकडे साशंकपणें पहात आहे, तोंच त्यानें त्याच्याकडे दृष्टि वळवली.

''मी आतां पुन्हां उडी घेण्याच्या प्रयत्न करीन, असा तुम्हांला संशय कां येतो आहे अजून?''तो खिन्नपणें हंसून अरुणकडे पाहात म्हणाला, ''वेडे आहांत! खरं म्हणजे फार तरुण आहांत!..तुम्हांला माणसाच्या मनाची तशी कल्पना नसेल!..जीव देण्याची छाती करून पुढें होणाऱ्या माणसाला, शेवटींहि जीव द्यावासाच वाटत असतो, असं तुम्हांला वाटतं कीं काय? छे!.. पांच मिनिटांपूर्वीच मला त्याचा अनुभव आला! आतां मला उलट वाटतं,..तो अगदीं गलितगात्र होतो, असहाय्य होतो, आणि त्याचा केवळ नाइलाज होतो;..म्हणूनच त्याचा झोंक जात असेल, इतकंच!..वास्तविक, त्याची मरण्यापूर्वीची अगदीं शेवटची कल्पना, म्हणजे 'जगावं, जगावं!' अशीच असते.''

: ३९६ :

अरुण त्याच्याकडे निरखून पहात, त्याचें बोलणें उत्सुकतेनें ऐकत होता.

''पण तुम्ही आज होतां म्हणूनच मी पुन्हां जगूं शकलो!'' तो मनुष्य आवेगानें पुढे म्हणाला; आणि खाली वांकून त्यानें आपल्या मुलाचें चुंबन घेतलें.

''मग असा वेडा विचार तुमच्या मनांत तरी कां आला होता?'' अरुणनें जास्त गोंधळून जाऊन त्याला अडखळत विचारलें.

''सारें सांगतो; पण तुम्हांला आता घरीं जायला वेळ होत असेल!...'' काय करावे तें न समजल्यामुळें, बावरल्यासारखें होऊन तो मनुष्य म्हणाला.

''नाहीं, आज मला घरच नाहीं कोठें जायला!..तसं पाहिजे तर मी हवा तितका वेळ ऐकूं शकेन...''त्याच्या आत्महत्येचें कारण ऐकण्याच्या मोहानें, अरुण पटकन् तसें बोलून गेला खरा; पण मग त्याला वाटलें, आपण विनाकारणच त्याला हें सांगितलें.

''काय?''आश्चर्यानें तो मनुष्य एकदम म्हणाला,; तरी मग आपल्या उत्सुकतेला आळा घालून तो पुढें म्हणाला, ''बरं पण तें कांहीं असो. मग आधीं आमच्या घरींच चला तर आज! अगदीं आलंच पाहिजे तुम्हांला!..''

अरुणला त्यावर कांहींच बोलवेना. शेवटीं त्याच्याबरोबर चालतां चालतां थबकून तो म्हणाला, ''माझा एक मित्र, वरळीबीचवर माझी वाट पहात असेल. तोहि माझ्यासारखाच फकीर आहे आज!..''

''मग प्रथम त्यांना गांठूं या तर!'' आपलें हें दुसरें नवें आश्चर्य, तसेंच मनांतल्या मनांत दडपून तो म्हणाला, ''त्यांनाहि घेऊन आपण घरी जाऊं!.. दगडू जाधव माझं नांव;..मी अस्सल कडवा मराठा आहे. माझ्या घरची मीठ-भाकरी चालेल ना तुम्हांला?...हं!..गेली ती आठ वीसची गाडी! म्हणजे आतां साडेआठ होऊन गेले. आपण घरीं पाहोंचेपर्यंत साडेनऊ सहज होतील! आमचा गोपा घरीं जाऊन, आईला आपल्या जेवणाची तयारी करून ठेवायला सांगेल!..जाशील

ना रे गोपा?..''

बापाचे शब्द पुरे होण्यापूर्वीच, तो बाळ आपल्या विजारीच्या खिशांत हात घालून उत्साहानें घराकडे धांवूंहि लागला; आणि जातां जातां तो मोठ्यानें ओरडला ''बाबा लवकर या हंऽ पाहुण्यांना घेऊन!...''

''हं हं!...अन् गाडी घोडे सांभाळून जा रे गोपा!..धांवू नको उगीच!..'' आपल्या धावणाऱ्या उत्साही मुलाकडे पहात कुटुंबवत्सल दगडू जाधव ओरडला; आणि मग अरुणकडे प्रेमळपणें पहात तो पुढें म्हणाला, ''तुम्ही कोणीहि आणि कसेंहि असा! पण आज तुम्ही मला खरोखरच जीवदान दिलेंत!.. यावेळीं माझ्या घरांत काय हा:हा:कार उडाला असता, याची आतां मला कल्पनाहि करवत नाहीं!..

: ३९७ :

दगडोबा जाधव मूळचे कोकणांतील फोंड्याचे कडवे मराठे. पंचवीस तीस वर्षांपूर्वी, एका छापखान्यांत साधा कंपॉझिटर म्हणून ते नोकरीला लागले. प्रामाणिकपणा, चिकाटी, कर्तबगारी, यांना कल्पकता व हुषारी यांची जोड मिळाल्यामुळें, ते वाढत वाढत स्वतःच त्या छापखान्याचे मालक झाले.

सुरवातीच्या त्या काळांत, मोठमोठीं छपाईची कामें अंगावर घेऊन तीं वेळच्या वेळीं पार पाडावयाचीं, पैशाची देवघेव चोख असावयाची, हा त्यांचा लौकिक वाढत गेला. त्यांचा रिलायन्स प्रेस व त्याबरोबरच ते, मोठ्या पदाला चढत चढत, शेवटीं मुंबईंतील दोन तीन मोठ्या प्रेसमध्यें त्यांच्या प्रेसची त्या काळीं गणना होऊं लागली. तीनशेंवर कामगार त्यांच्या हाताखालीं काम करूं लागले. स्वतःला विशेष कळत नसे, तरी त्यांनी अनेक लहानमोठीं प्रकाशनें अंगावर घेतलीं. त्यांच्या कमिशनवरच अनेकांनीं घरें बांधिलीं. हजारांनी त्यांचे व्यवहार होत; हजारांचीं त्यांना नेहमीं जरूरी असे. पण त्यांच्या हजारांच्या हुंड्यानांहि, त्यांच्या विश्वासामुळें मुंबईच्या मुलतानी बाजारांत किंमत असे.

पण मग शेवटीं ते दिवस एकाएकी अचानक बदलले! तीनचार मोठे व्यवहार एकदम अंगावर उलटून त्यांनी भली मोठी ठोकर खाल्ली. आतांपर्यंत हळूंहळूं उभारलेला त्यांचा एवढा मोठा डोलारा डगमगूं लागला.

आपल्या यशाचें अत्युच्च शिखर गांठल्याचें प्रत्यक्ष पाहिलेल्या त्यांच्याच डोळ्यांना, एका क्षणांत, आपल्यापुढें घोर दारिद्र्याच्या दरींत ढकलणारा नंगा कडा आ वासून उभा असलेला दिसूं लागला. त्यांच्या विश्वासावर असलेल्या अनेकांचे हजारों रुपये त्यांच्या त्या पसाऱ्यांत गुंतले होते.



त्यावेळीं, किंचित् काल ते अतिशय गांगरले. कारण अगदी जिवलग स्नेही तर नादारीचा संभावित मार्ग सुचवीत होते; आणि तसलीं उदाहरणेंहि प्रत्यहीं त्यांच्यासमोर घडत होतीं.

पण अनेक रात्रीच्या रात्री तळमळून, शेवटीं, आपल्यावर विसंबून असलेल्या अनेकांचे, विश्वासघातानें गळे कापण्यापेक्षां आपला स्वतःचा डोळ्यांदेखत होणारा नाशच त्यांनीं पत्करला. त्यांनीं आपलें सारें वैभव,..आपलें सारें सर्वस्व, लाजलज्जा सोडून स्वतःच्या हातांनी फुंकलें. इतरांचीं बहुतेक देणीं भागवलीं आणि राहिलेल्यांना ''थोडा वेळ थांबा!.. मला व्यवस्थेला कांहीं अवधि द्या!'' असें सांगत, स्वतः दारुण दारिद्र्य पत्करलें.

उतारवयांत झालेल्या एकुलत्या एका लहान मुलाकडे पाहून, त्यांनीं शेवटीं अभिमान बाजूस सारला; व ज्याच्याबरोबर अनेक कामांत ते प्रामाणिक झुंज खेळले होते, त्याच, 'आर.बी.प्रेस' मध्यें आपल्या म्हातारपणीं त्यांनीं सव्वाशें रुपयांची प्रेसमॅनेजरची नोकरी पत्करली!

यानंतरचीं गेलीं सहा सात वर्षें, त्यांनी प्रामणिकपणें व कसोशीनें नोकरी केली. उर्जितकालीं उपकृत केलेल्या अनेकांकडूनहि होणारी मानखंडना व अपमान ते निमूटपणें सहन करीत. सोनें वेंचलें तेथेंच गोंवऱ्या वेंचीत, लोकांची राहिलेली देणीं फेडण्यासाठीं, अत्यंत हालअपेष्टांत त्यांनी संकटांशीं झगडत काढलीं होतीं.

पण तरीहि, आज ते दगडोबा जाधव आगगाडीखालीं उडी घ्यावयास धांवले होते!...इतक्या धीरानें जगाच्या व्यवहारांना तोंड देणारा हा मनुष्य, शेवटीं आत्महत्येस तयार होतो याचा अर्थ काय?

त्याचें कारण मात्र, कोणाला विश्वास वाटणार नाहीं एवढें क्षुल्लक होतें!

: ३९८ :

आज त्यांच्या जुन्या मालकाच्या तरुण मुलानें त्याना नोकरीवरून काढलें होतें!..म्हणून ते वैतागले?...नाहीं हे खरें वाटत नाहीं!

त्यांच्यावर अफरातफरीचा व अप्रमाणिपणाचा आरोप ठेवण्यांत आला होता!..पण त्यामुळें वाईट वाटलें, तरी इतकें गांगरून जाण्याचें त्यांना खास कारण नव्हतें. असल्या वृथा आरोपांना, त्यांनी आजपर्यंत अनेक वेळां पचनीं पाडलें होतें.

त्यांच्या हाताखालीं काम करणारा विसोबा साठे, त्यांच्यानंतर त्यांच्या जागीं तेथें काम करणार होता! पण त्यामुळें राग येण्याइतके ते हलक्या मनाचे खास नव्हते.

मग विसोबा साठ्यानेंच स्वतःच्या उत्कर्षासाठीं, वस्तुस्थितीचा विपर्यास करून, त्यांचा मुदलांतच नसलेला अप्रामाणिपणा, खोट्या मार्गानें सिद्ध केला! यामुळें तर ते संतापले नसतील? छे,

त्यांच्या हाताखालच्या दुसऱ्या कोणत्याहि माणसानें तसें केलें असतें, तर फार तर खिन्न मनानें व हताशपणें ते घरीं जाऊन बसले असते!..

पण विश्वनाथ साठे यानेंच हें सारें केलेलें पाहून, त्यांच्या हृदयांत, रसरसणारे निखारे पडल्यासारखे त्यांना वाटलें!

कां? असा हा विसोबा साठे मोठा कोण? तो प्रसंगच तसा होता!..म्हटला तर मनाला लागणारा, म्हटला तर क्षुल्लक!-

: ३९९ :

बारा तेरा वर्षांपूर्वीची गोष्ट! हा विश्‍वनाथ साठे याच 'आर.बी.प्रेस'मध्ये नोकरीस होता. तेथें तीस रुपये पुरत नसल्यामुळें, जाधवांचा खाजगी हिशेब ठेवण्याचें काम फावल्या वेळांत तो करीत असे व त्याबद्दल ते त्यास वीस रुपये देत.

कांहीं महिने गेल्यावर रेल्वेच्या कामाचें एक मोठें टेंडर भरण्याचा वेळ आला. जाधवांप्रमाणेच 'आर.बी.प्रेस' कडूनहि टेंडर जाणार होतें. शेवटची तारीख येण्याच्या आधीं दोन दिवस, दगडोबांना सहजच एक विचार सुचला. तसला लबाडीचा विचार त्यांना त्यावेळीं प्रथमच मोहानें सुचला होता!..'आर.बी.प्रेस'च्या टेंडरचा आंकडा आपल्याला समजला, तर त्यापेक्षां पाचपन्नास रुपये कमी करून आपला आंकडा तयार केल्यास आपल्याला टेंडर खात्रीनें मिळेल.

पण तो आंकडा समजावयाचा कसा? विसोबा आपल्याप्रमाणेच तिकडेहि काम करतो याची आठवण होऊन, त्यांनीं तो हिशेब लिहीत असतां त्याला विचारलें होतें ''विसोबा, 'आर.बी.प्रेस'चं टेंडर गेलं कां हो?''

''हो,'' तो निर्विकारपणें म्हणाला.

''किती आंकडा?'' दगडोबांनी धडधडत्या छातीनें विचारलें. असल्या नवख्या वांकड्या प्रयत्नामध्यें त्यांचेंच मन त्यांना सुरुवातीपासून खात होतें.

''जाधवशेट, मला तुम्ही तेवढं विचारूं नका! आपल्याप्रमाणेंच मी त्यांचाहि नोकर आहे.'' विश्वनाथ साठ्यानें त्यावेळीं त्यांना पटकन् तसें उत्तर देतांच ते केवढ्यानें दचकले; त्यांना त्यामुळें आपली स्वतःची स्वतःच लाज वाटली होती!..

: ४०० :

पण तरी निराळ्या हेतूनेंच त्यांनीं मुद्दाम त्याला दुसऱ्या दिवशींहि तोच प्रश्न केला; त्याचें तेंच उत्तर आलें.

तिसऱ्या दिवशीं पगाराचा दिवस पडत होता. विसोबाला एकाग्रतेनें व्यवस्थित काम करतांना



पाहून, जाधवांचे हृदय आपल्या प्रामाणिक नोकराविषयींच्या अभिमानानें भरून येत होतें. तरी त्यांनीं त्याच्या प्रामणिकपणाची शेवटची परीक्षाच घ्यावयाचें ठरविलें.

''टेंडर भरायची आजची शेवटची तारीख, नाहीं विसोबा?'' जाधवांनीं त्याच्याजवळ उभें राहून विचारलें.

''हो!..''तो वहींत पाहतां पाहतां, अप्रिय प्रसंग पुन्हा आला या जाणिवेमुळें, जरा चोरट्या नजरेनें म्हणाला होता.

''मग आंकड्याचं काय ठरवलंत?'' जाधव त्याच्याकडे निरखून पहात म्हणाले, ''आपल्याला आज टेंडर भरलेंच पाहिजे.''

''तुम्ही सांगाल तो आंकडा भरून पाठवूं या कीं!'' विसोबा त्यांच्याकडे निश्चयाची दृष्टि टाकून म्हणाला, ''पण जाधवशेट, मला तो त्यांचा आंकडा विचारूं नका. तो आपल्याला सांगण्याचा मला अधिकार नाहीं!''

पण जाधव त्या उत्तरानें उलट आनंदितच झाले! आपल्या खिशांतून दहाच्या तीन नोटा काढून त्यांनी साठ्याच्या पुढें केल्या.

विश्वनाथ दचकून एकदम मागें झाला व म्हणाला, ''हें काय? आंकडा सांगण्यासाठीं..ही-'

''नाहीं, हा तुमचा पगार!'' दहा रुपयांची एक नोट जास्त आलेली पाहून गोंधळलेल्या विसोबाकडे पहात जाधव म्हणाले,''विसोबा, तुम्हांला 'आर.बी. प्रेस'च्या टेंडरचा आंकडा सांगण्याचा अधिकार नसेल!.. पण मला तुमच्यासारख्या माझ्या प्रामणिक नोकराच्या पगारांत वाढ करण्याचाहि अधिकार नाहीं कां?''

साठ्यानें त्यावेळीं जाधवांकडे कृतज्ञतेनें पहात ती जादा नोट हातीं घेतली होती.

: ४०१ :

त्याची त्यावेळची ती दृष्टि अजूनहि आठवत होती!..

आणि तोच विसोबा साठे, बारा तेरा वर्षांत, आतां अगदीं आमूलाग्र निराळा झाला होता. केवळ आपल्या दहावीस रुपयांच्या फायद्यासाठीं निखालस खोटें कर्म करून वृद्धापकालांत परिस्थितीनें गांजलेल्या आपल्याच एके काळच्या मालकाला, आज त्याच्या म्हातारपणीं तो नाहक अप्रमाणिक ठरवीत होता!

परिस्थितीमुळें विसोबामध्यें केवढा मोठा फरक घडून आला!

त्याच्यासारखा, त्यावेळच्या त्यांच्या प्रामणिकपणाच्या कठोर परीक्षेस उतरलेला तो मनुष्य, आज दुबळेपणामुळें अधःपतित होऊन त्यांच्यावरच उलटला होता!

हें जग आणि त्याचे हे व्यवहार! अनेक कसोटींतून अत्यंत प्रमाणिकपणें त्यांना तोंड देतच, जाधवांनी आपलें आतांपर्यंतचें सारें आयुष्य घालविलें होतें! पण त्याच जगांतील विसोबा साठ्यासारख्या माणसाचा हा उघड उघड झालेला अध:पात, त्यांच्या मनाला कांहीं केल्या सहन होईना!

त्यांना वाटलें, ''आजपर्यंत आपल्या हृदयाला आपण जागलों खरं!.. पण कोणीं सांगावं, कदाचित, आपणहि एखाद्या लहानसहान मोहाला वश होऊन, असेच पटकन् अध:पतित होऊं!..आणि आतां नोकरी गेल्यावर तर..''

...याच कल्पनांनी एकाएकीं व्यापलेल्या त्यांच्या मनाला हें मुळींच सहन होईना..

वैभव आणि दारिद्र या दोहोंतून, सारख्याच धीरानें वाट काढीत आलेल्या जाधवांच्या मनाला, यापुढें तरी असली विषाची परीक्षा बघण्याची छाती होईना! आणि या एकाच भावनेनें उत्कटपणें भारलेल्या त्यांच्या अंत:करणाला वाटलें; ''छे, असल्या जगांत रहाण्यात तरी अर्थ काय? तें आपल्यासारख्याला अगदीं अयोग्य आहे! येथें एखाद्या बेसावधवेळीं, आपलाहि बळी जाईल!''

- आणि भावनाप्रधान अंत:करणांत एखादी जरी ठिणगी पडली, तरी हां हां म्हणतां लळलळणाऱ्या ज्वाला भडकावयास मुळींच वेळ लागत नाहीं!

- जाधवबाबांचे आज तसेंच झालें होतें!..

: ४०२ :

जाधवांनी त्याला सांगितलेली आपल्या आयुष्याची सारी हकीकत ऐकूनहि, अरुणनें आपल्याविषयीं फक्त मामुली माहिती तेवढीच त्यांना पुरवली.

ते दोघे असेच एकमेकांविषयीं बोलत, वरळीबीचच्या धक्क्याजवळ पोहोंचले. मघां बसला होता त्या दिव्याजवळपासच, चतरजी अरुणची वाट पहात घोंटाळत होता. अरुण व जाधव जवळ येत असलेले पाहतांच तो हंसून पुढें झाला.

''कां? इतका वेळसा? मी वाट पाहून पाहून दमलो.'' त्यानें अरुणबरोबर बंगालींत बोलावयास सुरवात केली, ''आणि हे बरोबरचे कोण म्हातारबुवा?''

''तेंच सांगतो आतां. आपली आजच्या दिवसाची तरी जेवणाची व राहण्याची सोय झाली आहे त्यांच्याकडे. अगदीं आग्रहच करीत आहेत.''अरुणनें त्याला उत्तर दिलें व जाधवांच्या आत्महत्येचा प्रसंग तेवढा गाळून, त्यांच्या भेटीची हकीकत थोडक्यांतच त्यानें रवींद्राला बंगालींत सांगितली.

: ४०३ :



जाधवांचें घर म्हणजे एका बैठ्या तीन बिऱ्हाडी चाळींतील दोनखणी गाळा होता. पाठीमागच्या बाजूस मोडकळीस आलेलें एक पत्र्याचें छप्पर होतें. त्यांत त्यांनीं आपल्या गोपासाठीं मुद्दाम पाळलेली सवत्स गाय, एका बाजूस बांधली होती. राहिलेल्या अर्ध्या भागांत गाईकरतां घेतलेल्या गवताच्या गासड्या रचून ठेवल्या होत्या.

ते तिघेहि तेथें आले, त्यावेळीं जाधवांच्या कोपऱ्यावरील गाळ्याच्या दारांतच, बाबांची व पाहुण्यांची वाट पहात बसलेला गोपा अरुणला दिसला. त्यांना पाहतांच तो धांवत धांवत पुढें आला; व आपल्या वडिलांचा हात धरून दोघां पाहुण्यांकडे हंसत, लाजत पाहात, तो पायऱ्या चढूं लागला.

'या, आंत या.' आंत शिरल्यावर जाधव दोघांकडेहि प्रेमानें हंसून पाहात म्हणाले. दोघेहि किंचित् संकोचानेंच आंत शिरले. आपले कपडे काढतां काढतां, आंतल्या खोलीकडे पाहून, जाधव बहुतेक आपल्या बायकोला उद्देशूनच मोठ्यानें म्हणाले, ''हें पहा, आपल्याकडे पाहुणे आहेत हो आज जेवायला! गोपानें सांगितलं असेलच तुम्हाला म्हणा! जेवण तयार आहे नां?''

''हो, केव्हांची वाट पाहतों आहों आम्ही. हो ना रे गोपा?'' एका स्त्रीचे आंतल्या खोलींतून आलेले शब्द अरुणला ऐकूं आले.

गोपानें आणून ठेवलेल्या तांब्यांतील पाण्यानें, त्या दोघां पाहुण्यांनीं हात पाय धुतले व ते वर आले. जाधव टॉवेल घेऊन पुढें होत म्हणाले, ''चला, पानें वाढलीं आहेत. आमच्या घरची मीठभाकर तुम्हांला गोड लागली म्हणजे झालं,''

गोपाच्या बालमनाचा त्या दिवशींची उत्साह दांडगा होता. आपल्या चिमुकल्या रंगीत पाटावर तो बाबांशेजारींच बसला होता. मधून मधून हंसून आपल्याकडे आलेल्या नवख्या पाहुण्यांकडे पाहात, आपल्या मनांतील आनंद व्यक्त करण्याचा तो मुग्धपणें प्रयत्न करीत होत.

दोन तासांपूर्वी त्याच्यावर येऊं पाहणारी आपत्ति, त्याच्या बालमनाला शिवली देखील नव्हती!..

: ४०४ :

वाढलेलीं पानें हंसतमुखानें समोर आणून ठेवणाऱ्या जाधवांच्या बायकोकडे, अरुणनें वर डोळे करून एकदोनदां पाहिलें. ती साधारण चाळिशीच्या वयाची असावी. काळजीनें तिचा गौरवर्ण चेहरा कांहींसा त्रस्त झालेला दिसत होता. तरी त्यांतूनहि तिच्या मनाचा आनंदीपणाच स्पष्ट डोकावत होता. तिला पाहतांच अरुणला आपल्या कमळामावशीची क्षणभरच आठवण झाली!

वाढून झाल्यावर, गोपाची आई दाराआडून हळूच वांकून पहात होती. जाधव मधून मधून आपल्या पाहुण्यांकडे पाहून जेवणाविषयीं विचारपूस करीत होते. गोपा थोडासा गांगरल्यामुळें

कांहींच बोलत नव्हता.

थोडा वेळ असाच शांततेंत गेला. प्रत्येकाचें जेवणाकडे लक्ष होतें. इतक्यांत गोपाची आई दारापुढें मान करून आंतूनच म्हणाली, ''फार उशीर झाला यायला नाहीं आज?...आणि हा गोपा कुठं भेटला?..मघां सांगत होता,..आपल्याकडे पाहुणे येणार आहेत ना, त्यांची आणि पुलावर मारामारी झाली! पण ते पाहुणे आतां जेवावयलाच आपल्याकडे येणार आहेत. मला तर त्या गोंधळांतून कांहींच उमजेना. सांगण्याचं मात्र मोठं हसूं येत होतं त्याच्या!''

''हो का रे, गोपा?''जाधव कांहींसें खिन्नपणें हंसून मुलाचें कौतुक करण्यासाठीं म्हणाले, ''त्यांतले कोणते मघाचे पाहुणे?''

गोपानें लाजत लाजत हळूंच अरुणकडे बोट दाखविलें. अरुणहि त्याच्या बालिश उत्साहानें आनंदून त्याच्याकडे पहात हंसला.

''खरं काय झालं मग? नेहमीं येता ती आठ वीसची गाडी चुकली वाटतं?'' गोपाच्या आईनें आंतून पुनः प्रश्न केला.

...जाधव जेवतां जेवतां केवढ्यानें दचकले!..अरुणनेंहि चमकून त्यांच्याकडे गांगरल्या नजरेनें पाहिलें!... आठ वीसच्या फास्ट गाडीचा अभावितपणें झालेला तो असला चमत्कारिक उल्लेख,..दोघांनाहि दोन प्रकारें असह्य झाला होता!..

: ४०५ :

जाधवांनीं एक लांब सुस्कारा सोडला;..व गोपाकडे एकदां प्रेमानें पाहून भाकरीचा तुकडा हळूच मोडीत, ते आपल्या बायकोला म्हणाले, ''तें सारं मग सांगेन मी तुला!''

आणि ते पुन्हां खालीं मान घालून, थोडा वेळ कांहीं एक न बोलतां यांत्रिकपणें जेवत होते!..पण गोपाची आई कांहीं तरी वाढावयास म्हणून तेवढ्यांतच जवळ आली होती. फक्त तिला ऐकूं जाईल उतक्या मोठ्यानें जाधव कुजबुजले, ''आज माझी नोकरी गेली एकाएकीं!...आतां?''

गोपाची आई प्रथम किंचित् दचकली!... पण मग ती कांहींशा लटक्या उत्साहानें पण खिन्नपणें हंसून म्हणाली, ''जाऊं द्या! आजपर्यंत चालवून नेलं तसेच पुढं!..नेऊं कसं तरी आपण सांभाळून !..''

थोडा वेळ तशीच शांतता होती. मग गोपाची आई पुन्हां आतल्या दाराजवळून डोकावत म्हणाली, ''ताईचं पत्र आलं आहे! आठ दहा वर्षे मला भेटली नाहीं, म्हणून म्हणतें आहे भेटावंसं वाटतं. जांवईबुवा नको, नको म्हणतात. तें इतका वेळ ऐकलं, पण आतां आठ दिवस तरी येऊन जाणारच! कोणाचं ऐकणार नाहीं! असं लिहिलं आहे तिनें पत्रांत!...''



थोडा वेळ गप्प उभे राहून, शेवटीं पुन्हा गोपाची आई म्हणाली, ''काय उत्तर पाठवायचं तिला?..''

''वेडी आहे ती! काय पाठवायचं उत्तर दुसरं?'' जाधव बाबाहि थोडा वेळ शांत बसले होते; शेवटी अगदीं एकाएक शब्द उच्चारीत, ते आपल्या बायकोला म्हणाले, ''तिच्या श्रीमंतीला साजेल असा पाहुणचार करायची आपली ऐपत कां आहे सध्यां? आणि आतां तर... तेव्हां तिला लिही, म्हणावं तूं घरीं सुखांत आहेस, यांतच आम्हांला आनंद आहे! नवऱ्याच्या किंवा सरदार साहेबांच्या इच्छेविरुद्ध कांहीं एक करूं नकोस!''

आयुष्यांत,..वैभव आणि दारिद्र्य दोन्ही अनुभविलेल्या त्या धीर वृत्तीच्या प्रेमळ जोडप्याचा कुजबुजत चाललेला तो संवाद ऐकून, अरुणचें हृदय त्यांच्याविषयींच्या आदरानें भरून आलें!

तिघेहि जेवण संपवून उठतांना, अरुणच्या मनांत एकच विचार कल्लोळ करीत होता- 'इतक्या धीरानें साऱ्या आयुष्यभर संकटांना...आशानिराशेला...तोंड देत आलेले हे जाधवबाबा, आत्महत्या करण्यास उद्युक्त होण्याइतके उत्कटतेनें विचलित झाले होते तरी कसे, तीन तासांपूर्वी?...'

: ४०६ :

जाधवांनी पुष्कळ आग्रह केला पुढल्या खोलींत झोंपायचा; पण त्यामुळें त्या दोन खोल्यांत बिऱ्हाड थाटलेल्या कुटुंबाची अगदीं गैरसोय होणार, हें जाणून, अरुणनें कांहीं तरी कारणें सांगून विनयानेंच ते नाकारलें. शेवटीं, गोठ्यांतील गसड्यांवर दोघांनी निजावयाचें असें ठरलें. 'नको नको' म्हणत असतां जाधवांच्या बायकोनें एक सत्रंजी व दोन चादरी त्यांना आणून दिल्या; व रात्रीपुरता त्या प्रेमळ जोडप्याचा निरोप घेऊन, अरुण व चतर्जी गाईच्या मागील गोठ्यांत आले.

गोठ्यांत बांधलेली गाय ते जवळ येताच फुरफुरली. तिचें गोजिरवाणें वासरूं तिला चाटत होतें. त्यावरून अरुणला सहजच गोपाची व लगेच त्याच्या आईची आठवण झाली. 'जाधव त्यांना मघा सोडून गेले असते तर' या कल्पनेनें, त्याच्या अंगावर एकदम कांटा उभा राहिला!

सतरंजी अंथरून झाल्यावर रवींद्राने आपलें ब्लँकेट त्यावर पसरलें; व आपली शाल त्याजवळच पांघरण्यासाठी टाकून, तो सारंगीच्या खुंट्या पिळीत तारा छेडूं लागला. थोड्याच वेळांत, त्या गाईच्या गोठ्यांतून बिहाग रागाचें मंजुळ शब्द बाहेर पडूं लागले होते.

पण अरुणचें तिकडे लक्ष लागेना. त्याच्या डोळ्यापुढें जाधव, चतरजी, बाबूलाल,..साऱ्यांचे आयुष्यपट पुनःपुन्हा येत होते. उगीचच त्यानें बाहेर दृष्टि फिरवली. पिठासारखें चांदणें पडलें होतें.

असल्या विचारमनस्क स्थितींत तेथेंच तिष्ठून बसण्यापेक्षां, जरा इकडे तिकडे फिरून आलें तर मन लौकर शांत होईल असें वाटून, शेवटीं अरुण जागेवरुन उठला व आपल्या गाण्यांतच रममाण

झालेल्या रवींद्राला बाहेर पडतां पडतां बंगालींत म्हणाला, ''मी जरा फिरून येतो. तुम्हाला झोंप आली तर झोपा!...''

: ४०७ :

रात्रींच्या अकराचा सुमार होता. त्या भागांत मुंबईला परिचित अशी गडबड घाई मुळींच नव्हती. रस्त्याचा फांटा सोडून अरुण मोठ्या रस्त्याला लागला, तरी त्यांतून क्वचितच एखाद दुसरें मनुष्य जातां येतांना दिसत होतें. तसल्या निर्जन रस्त्यांतून एकाकीपणें मंद पावलें टाकतांना, अरुणला त्याची निराश्रितता जास्तच उत्कटतेनें भासली;..व भवितव्याविषयींचें प्रश्न त्याच्या मनांत पुन्हां पुन्हां येऊं लागले!

स्वतःचे भवितव्य?.. आणि तें धुक्क्याप्रमाणें समोर पसरलेलें पाहून, त्याला मागल्याच कालांतील कांहीं प्रसंग भंडावून सोडूं लागले.

आपल्या माणसांची आठवण करतां करतां, वसंत, नाना, यांवरून त्याच्या पुढें राघ्या कोळी उभा राहिला. राघ्याबरोबरच तुरुंगांतील भिवा भिल्ल आठवला. प्रेमल टागोरभाई आपल्याकडे निरपेक्ष वत्सलतेनें पहात असल्याप्रमाणें त्याला वाटलें. त्याबरोबर त्याच्या मनाची उडी सोनापुरांतील बाबूललावर गेली. ..बाबूलाल सट्टेबाज खरा;..पण कुटुंबवत्सल होता! तसाच कुळकर्णी वॉर्डरहि होता;..पण एक सुखांत, एक दुःखांत!..

पण मग त्याला वाटलें, त्या साऱ्यांचें जीवन दुःखमय व्हायला आपल्याप्रमाणें कला, सौंदर्य, स्वातंत्र्य असल्या अव्यवहारी कल्पना कारण झाल्या नव्हत्या!..खरंच, पण आपण एकटेंच तसें आहों कां?..तरटाला तरट लावून आपल्याबरोबर तुरुंगांत पडणारा रमणीक!.. सध्यां आपल्याबरोबरच असलेला रवीन्द्र चतर्जी!..आणि आपण आजपर्यंत प्रामणिकपणाची महती गात होतों, त्याचें दृश्य उदाहरण म्हणजेच आपले आजचे प्रेमळ यजमान दगडोबा जाधव ..इतक्या धीर मनाच्या म्हाताऱ्याच्याहि आयुष्यांतील, आत्महत्येची मनःस्थिति आपण आज पाहिली!..

असल्या विविध मनोमय दृश्यांमुळें उठणाऱ्या भावोर्मींनीं त्याचा हृदयसागर फेंसाळून येत होता. हळूंहळूं पावलें टाकीत तो रस्त्याच्या दुसऱ्या एका फांट्यानें पुन्हां आंत शिरला.

त्याला वाटलें, या लोकांप्रमाणेंच आपणहि कांटकीसारखे एकटेंच, ... अफाट सागरावर नुकतें तरंगण्याचा नुसता प्रयत्न करूं लागलों आहों. आपण कोठें आणि कसे वाहवत जाणार, कोणत्या तीराला लागणार, याची त्याला कांहींच कल्पना होत नव्हती.

या साऱ्यांच्या सुखदुःखांशीं आपल्याला समरस होतां येणार नाहीं, एवढें मात्र निश्चितपणें त्याला वाटलें! आणि आपण एकाकीपणें तरंगत आहों, तसाच आपल्याला पुढेंहि जीवनसागराच्या



लाटांतून मार्ग काढावा लागणार,..या विचारानें त्यानें त्या लांबवर पसरलेल्या निर्जन रस्त्यावरून शून्यपणें दृष्टि फिरविली. पण त्याच्या मनाला समाधान कांहीं वाटेना.

त्यानें वर पाहिलें,..असंख्य तारकांनी लुकलुकणारें अफाट आकाश तेवढेंच त्याच्या डोक्यावर पसरलें होतें. लांब लांब पसरलेलीं जवळपासचीं सारीं घरें, आंतील माणसांना पोटाशीं धरून झोपी गेलेलीं आहेत, असेंच जणूं त्याला वाटलें! पण आपल्या डोक्यावर मात्र याक्षणीं कसलेंच छत्र नाहीं, या कल्पनेनें त्याचें हृदय क्षणभर हादरलें. आणि लांब दिसत असलेल्या एका झाडाकडे त्यानें आपला मोर्चा वळवला.

कांहींशा कृत्रिम उत्साहानें झपझप पावलें टाकीत त्यानें मधला रस्ता कांटला. झाडाजवळ जवळ पोहोचूं लागतांच, त्याची दृष्टि सहजच त्याच्या बुंध्याजवळपास गेली;..पण त्याखाली कसली तरी झटापट चाललेली पाहून तो एकदम दचकला.

: ४०९ :

जागच्या जागीं क्षणभर थबकून त्यानें पाहिलें. झाडाच्या तो बराच नजीक होता,..त्यामुळें त्या बुंध्याजवळच्या सावलींत लांबवरच्या दिव्याच्या प्रकाशानें त्याला अस्पष्ट दिसूं लागलें!...

कोणा तरी पांढरें पातळ नेसलेल्या स्त्रीबरोबर एक काटकोळा पुरुष झगडत होता. त्याचा मलमलचा लांब सदरा, अस्ताव्यस्त उडणारे लांब लांब बहुतेक तेल चोपडलेले केस, मळकट सुरवार, यांवरून तो मवाली असावा, हें तो ताबडतोब समजला!

त्या स्त्रीच्या अगदीं जवळ जाऊन, त्या मवाल्यानें तिला आपल्या हातची पक्कड घालतांच, तिनें धिटाईनें त्याचा दुसरा हात धरला व ती त्याला कडकडून चावली. त्याबरोबर तो ओरडून विव्हळत बाजूस झाला. इतक्यांत,..त्या तरुण स्त्रीनें झटकन् पुढें होऊन, त्याच्या थोबाडींत फाडफाड दोन तीन लागावल्या. थोडा वेळ तो तिरमिरल्यासारखा होऊन मागें झाला; पण लागलीच पुन्हां अवसान आणून 'साले...' असे कांहींसे अस्पष्ट अचकट विचकट शब्द तोंडांतल्या तोंडात पुटपुटत, तिच्यावर पुन्हां तो चालून जात आहे हें पाहून, मग मात्र अरुणला राहवेना, तो धांवतच पुढें जाऊन त्यांच्यामध्यें उभा राहिला व त्या मवाल्याच्या छाताडांत एक जोराचा ठोसा हाणून, तो त्याच्या अंगावर चालून गेला.

त्या अचानक ठोशानें तो जमिनीवर कोलमडला आहे,..तोंच अरुणनें पुन्हा त्याच्या कानशिलांत दोनतीन भडकावल्या. या साऱ्या अनपेक्षित मारानें तर तो अगदी जेरीसच आला. 'थांबा थांबा चुकलो! मी जातो..' संरक्षणासाठीं तो हात पुढें करून अरुणकडे वर पहात म्हणूं लागतांच, अरुणनेंहि 'निर्लज्ज लेकाचा' असें म्हणत, हात आंखडता घेतला.

तो मवाली उठून त्यांच्याकडे वळून पहात पहात थोडा दूर निघून गेल्यावर, अरुणनें आपलें लक्ष त्या तरुणीकडे फिरविलें. एकट्या हातानें त्या मवाल्याशीं धीरानें झगडणारी, पांच मिनिटांपूर्वीची जगदंबा-महिषासुरमर्दिनी वाटणारी ती तरुणी, आतां धांपा टाकीत,...त्या झाडाच्या बुंधाशीं पाय पसरून अरुणकडे घाबरल्या नजरेनें पहात गप्प बसली होती.

: ४१० :

अरुण थोडा पुढें झाला, व तिच्यासमोर उभा राहून, किंचित् स्मित करून तिजकडे पहात तिला म्हणाला, ''त्यानं तुम्हांला त्रास दिला कां कांहीं?..मग ओरडलात कां नाहीं?''

''कां ओरडायचं?'' तिच्या श्रमानें श्रांत झालेल्या चेहऱ्यावर पुन्हां संताप चमकूं लागला, ''चार लोकांनी हंसून माझी टिंगल करायला, म्हणतां? मेल्याच्या मुडदा पाडायला मी एकटीच समर्थ होते, की!.. त्याला वाटलं असेल,.. ही एखादी पांजरपोळांतली गाय आहे!''

तिच्या त्या सात्त्विक संतापाची अरुणला गंमत वाटली व त्यानें कुतूहलानें तिच्याकडे निरखून पाहिलें. ती तरुण होती. होती काटकोळीच; पण तिचा स्वसंरक्षणाविषयींचा आत्मविश्वास केवढा दांडगा!

''कांहीं लागलं नाहीं ना तुम्हांला कुठं?..'' अरुणनें पुन्हां बोलावयास सुरवात केली.

''नाहीं !..पण तुम्ही वेळेवर आलां म्हणून बरं झालं!'' तिनें सौम्य हंसत, त्याच्याकडे कृतज्ञतेचा कटाक्ष टाकला.

''उठा पाहूं आतां तिथून!'' अगदीं सहजगत्या तिला उठावयासाठीं हात पुढें करून अरुण म्हणाला.

''नको. उठते मी!'' असें म्हणत ती अरुणची मदत न घेतां पटकन् उठली! तिच्या या साऱ्याच स्वतंत्र तडफेची अरुणला मौज वाटली!

: ४११ :

''यावेळीं असल्या निर्जन रस्त्यांतून तुम्ही कोठें जात होता?'' अरुणनें शेवटीं चालतां चालतां तिला प्रश्न केला, ''धोक्याचें नाहीं कां तुमच्या सारख्यांना तें?''

''हो, पण त्यापेक्षांहि मोठ्या धोक्यांना तोंड द्यायला मन तयार असलं तर?..''ती एकदम अरुणकडे वळून, खिन्न बेफिकीरीनें हांसत म्हणाली.

अरुणनें चमकून तिजकडे पाहिलें. समोरून दोघांवरहि चंद्रप्रकाश पडला होता. त्यांत तिचा चेहरा अतिशय आकर्षक दिसत होता. पण त्यावर अज्ञात दुःखाचें अस्पष्ट जाळेंहि पसरलेलें होतें!...



किंचित् कुरळे पिंगट केस, सैल झालेल्या तिच्या आंबाड्यांतून भुरभुरत होते. झटाझपटींत तिच्या रुंद गौर कपाळावरील कुंकवाच्या टिकलीला दोन तीन फांटे फुटले होते. ती हंसतांना हळूच दिसलेली तिची रेखीव शुभ्र दंतपक्ति चंद्रप्रकाशांत किंचित्काल चकाकली व त्यामुळें तिच्या थोड्याशा लांबट तोंडाला जास्तच आकर्षकता आली. तिच्या काटकोळ्या अंगावरील पांढऱ्या पातळाचा तिनें थोडासा लांब पदर काढला होता. कौमुदीप्रकाशानें तिला तें सारें फारच खुलून दिसत होतें!..

आणि असल्या या तरुण मुलीला, या भागांत अशा रात्री एकटी फिरतांना, स्वसंरक्षणासाठीं धिटाईनें झगडतांना, आणि विशेषतः शेवटचें तें वाक्य उच्चारतांना पाहून, अरुण तर अतिशय आश्चर्यचकितच झाला.

इतक्यांत,...एक वळण लागून तीं दोघें मोठ्या रस्त्याच्या नाक्यावरील मधल्या दिव्याखालीं येऊन पोहोंचलीं.

''हं, हा रस्ता सरळ पुढें चालून गेलं.. कीं, एक मोठा पूल लागेल!''अरुण तिला माहिती देऊ लागला, ''थोडं पुढें गेलं तसंच, कीं तुम्हांला ट्राम मिळेल! उशीर करू नका मात्र! नाहींतर शेवटची ट्राम निघून जाईल!''

त्याची आपल्याविषयींची असली किंचित् बेफिकीरी पाहूनच कदाचित्, त्या तरुणीचा अरुणविषयींचा विश्वास जास्त वाढला व अंगांत आणलेलें आतापर्यंतचे सारें उसनें धैर्य जाऊन, ती एकदम त्रस्त मनानें आपली असहाय दृष्टि अरुणकडे लावून म्हणाली, ''हें पहा, मजवर एक प्रसंग कसा आला तें प्रत्यक्ष तुम्ही पाहिलेंतच ना?..अजून जवळ जवळ सारी रात्र जावयाची आहे!...

मला तुम्ही रस्त्यांत भटकावयास पुन्हा अशीच सोडणार कां?...''

अरुणला कांहींच समजेना. 'या पोरीचें म्हणणें तरी काय? सारेंच चमत्कारिक!'

''मग मी काय करूं..घरीं पोहोचवूं तुमच्या, म्हणतां?'' तो काय करावें तें न समजून, शेवटीं अडखळतच म्हणाला.

''घरीं!...'' तिनें एक सुस्कारा सोडला व मुग्धपणेंच आपली मान बाजूस वळवली.

त्यामुळें तर अरुण जास्तच गोंधळून तिजकडे पाहूं लागला.

''घरीऽ?...माझं कुठं घर आहे म्हणतां इथं?..हें पहा, आतां कृपा करा!..माझ्या तुमच्यावर विश्वास आहे पूर्ण !..मग आजची रात्र तरी तुमच्याकडे व्यवस्था नाहीं कां होणार माझी? ..'' ती दीनपणें त्याच्याकडे पहात म्हणाली, ''मी बाहेर कोठें तरी अंग टाकीन पहिजे तर!''

आपल्या घरीं!...कुठलं आपलं घर?..अरुणला गोठ्यांतील गसड्या व सतरंजी आठवली;..आणि

तेथें या तरुण मुलीला न्यावयाची?...

पण मग!..

शेवटीं, त्यानें नाइलाज म्हणून गोंधळलेल्या वृत्तीनें व खिन्नपणेंच तिला म्हटलें, ''बरं तर! चला! मला जास्त कांहीं विचारूं नका! आतां मी जेथें परतणार आहे, तेथें फार तर नेतो तुम्हांला माझ्याबरोबर!''

- आणि तीं दोघें जाधवांच्या घराकडे मुग्धपणें चालूं लागलीं!...

: ४१२ :

एकामागून एक अनेक दृश्ये पहात असलेलें अरुणचें मन, या तरुण सुंदर मुलीच्या गांठीमुळें तर अतिशयच गांगरून गेलें होतें. असल्या रात्रीच्या वेळीं, ती अनोळखी मुलगी आपल्याबरोबर विश्वासानें पावलें टाकीत आपल्या घराकडे म्हणून निघाली आहे, या चमत्कारिक घटनेची तसल्याहि स्थितींत त्याला मनांत गंमत वाटली!...

''तो मेला माझा बराच वेळ पाठलाग करीत होता, मला वाटतं?...'' ती चालतां चालतां आठवल्यासारखं करून अरुणकडे वळत स्तब्धता मोडून म्हणाली, ''त्यावेळीं मला एवढं अवसान आलं होतं तरी कसं,...कोणास ठाऊक?...आतां मात्र तो प्रसंग आठवला; कीं मला उलट भीतीच वाटते!..खरंच, तुम्हीं भेटलां हें नशीबच माझं!...मला आतां किती हायसं वाटतं आहे म्हणून सांगूं?''

अरुण कांहींच बोलला नाहीं. तो तिजबरोबर तसाच पुढें चालला होता.

''तुमचं नांव काय?'' थोडा वेळ तसेंच शांततेंत चालल्यावर पुन्हा शेवटीं तिनेंच त्याला, त्याच्याकडे अगदी स्नेहानें हंसून पहात प्रश्न केला.

''अरुण ठाकूर !...'' अरुण वर पाहून म्हणाला.

''यापेक्षां जास्त नाहीं कां सांगूं शकणार तुम्ही मला तुमच्याविषयीं?'' तिनें पुन्हां अरुणला आस्थेनें प्रश्न केला.

''काय करायच्या आहेत या नवीन नवीन होणाऱ्या ओळखी!...त्यानें आपण जास्त जास्त दु:खीच होत आहों. आणि विशेषत: असल्या तरुण मुलीची ओळख! छे:!..'' असल्या विचारांनी अरुण कांहीं वेळ गप्पच चालत होता. पण मग, प्रश्न विचारतांना तिच्या डोळ्यांत तरंगणारा प्रेमळपणा आठवून त्याला वाटलें, काय झालें मामुली माहिती सांगितली हिला, ती विचारते आहे तर?..शेवटीं कांहीं वेळानें, अरुण तिला गंभीरपणें हळूंहळूं म्हणाला, ''मी एक पदवीधर आहे. चांगला चित्रकार आहे. मध्यें 'राष्ट्रवीर' ठरलो होतो! पण सध्या बेकार!- इकडे तिकडे फिरत...परिस्थितीशीं झगडण्याचा प्रयत्न चालला आहे झालं माझा!...''



अरुणच्या या त्रोटक उत्तरानेंहि तिला समाधान वाटण्याइतकी माहिती मिळाली आणि ती थोडा वेळ गप्प राहिली. त्यानंतर तिला प्रत्येकक्षणीं वाटत होतें, आतां अरुण आपल्यालाहि तशी माहिती विचारील. आणि ती मात्र आपण शक्य तितकी मोकळेपणें सांगूं!

पण बराच वेळ चालून गेल्यावरहि, अरुणनें तिला तिजविषयीं कांहींच विचारलें नाहीं!... अरुणची असली आपल्यविषयींची पूर्णपणें दिसून येणारी बेफिकीरी, प्रथम तिला अतिशय आश्चर्याची वाटली;..नंतर तिला ती कांहींशी दु:खदायक झाली; मग तर तिला त्याचा बराच राग आला. आणि शेवटीं कांहींशा रंजीस मनानेंच तिनें अरुणकडे पाहून म्हटलें, ''बरं कां? मी जाई पै!..एक प्रवाहपतित असहाय्य मुलगी आहे!...कांहीं चमत्कारिक परिस्थिति आली आणि घराला पारखी झाले. कॉलेज शिक्षण तसेंच दुसऱ्या वर्गात अर्धवट राहिलें आणि आतां तुम्ही म्हणालांत ना,..तशीच भविष्यकाळाकडे डोळे लावून, इकडे तिकडे फिरत आहे!..''

तिजकडे पाहून, अरुणनें मुग्धपणें आपली मान हलवली! पण त्यांत अनेक भावना दडल्या होत्या.. घराबाहेर पडलेली एक कुलीन मुलगी या दृष्टीनें जाई पैकडे चालता चालतां पाहून अरुणला वाटलें, 'तिजबरोबर कांहीं न बोलून तिला आपण उगीच दुखवीत आहों,...हेंहि काहीं चांगलें नव्हे!'

आणि तो कांहीं बोलणार, इतक्यांत, त्याच्याकडे विनयपूर्वक हंसून व प्रेमभरल्या डोळ्यानें पहात जाईच म्हणाली, ''ठाकूर, तुमची आज ओळख झाली हें मी माझं भाग्य समजते!.. खासच, माझ्या आयुष्याला कांहीं तरी नवं वळण मिळणार, त्यामुळें!...''

अगदी स्नेहानें बोलणाऱ्या त्या मुलीचें हें शेवटचें वाक्य ऐकून, अरुण पुन्हा एकदम चमकला. आपल्या भेटीमुळें कसले कपाळाचें वळण मिळणार हिच्या आयुष्याला? बायकी भावनाप्रधानताच ही!.. आणि मग या जाईमुळे आपल्या आयुष्यांतहि असेंच कांहीं होणार आहे कीं काय?..

त्याला एकदम आपलें मागलें आयुष्य आठवलें!.. आणि तो जे कांहीं बोलणार होता, ते शब्द त्याच्या तोंडांतल्या तोंडांतच.. तसेच राहिले.

: ४१३ :

''कोण बरं हें?'' जाई कानोसा घेत हळूं हळूं चालत म्हणाली, ''असल्या शांत वेळी, सारंगीवरील भैरवीचे स्वर कसे हळुवार व मधुर वाटतात, नाहीं?''..

जाईच्या त्या शब्दांनी अरुण भानावर आला;..पहातो, तों तीं दोघें जाधवांच्या घराजवळच येऊन पोहोंचली होतीं.

''हं! तेथेंच जायचं आहे आपल्याला!'' अरुण तिकडे बोट दाखवीत म्हणाला, ''स्पष्टच सांगतों आतां! एका नव्या स्नेह्याच्या मागील गोठ्यांत आम्ही आमची पथारी सोडली आहे. आतां ही सारंगी वाजवीत आहे ना,...तोच माझा जोडीदार बंगाली मित्र, रवीन्द्र चतर्जी!''

''अस्संऽ'' जाई किंचित् आश्चर्यानें म्हणाली, ''मी आल्यानें तुम्हांला त्रास नाहीं ना व्हायचा पण?..''

''नाहीं, नाहीं!..''बदलत बदलत रंजीस होणाऱ्या तिच्या चेहऱ्याकडे पाहून सहानुभूतिपूर्ण शब्दांनी अरुण म्हणाला, 'तुम्हांला आमच्याविषयीं विश्वास असेल तर आमची कांहीं हरकत नाहीं, असंच समजा!..मग येतां?..''

''फार आभारी होईन!...'' तिचा घाबरलेला चेहरा, गधळलेलें पाणी पुन्हां शांत झाल्याप्रमाणे, हंसरा व खेळकर झाला;..आणि अरुणकडे प्रेमळ व उत्साही नजर टाकून ती म्हणाली, ''चला तर आपण जाऊं या तिकडे!..''

अरुणनें जाईच्या त्या विश्वासू वृत्तीनें क्षणभर मोहून, तिजकडे एकदां पाहिलें व ते दोघे जाधवांच्या बिऱ्हाडामागील गोठ्याकडे वळले.

: ४१४ :

चाळींतील बाकीचीं दोन्ही बिऱ्हाडें गाढ झोपीं गेली होती. जाधवांच्याकडेहि दिवाबत्ती कांहीं दिसत नव्हती. अरुण व जाई कोपऱ्यावरून हळूंच मागल्या बाजूस गेलीं. गोठ्यांतील गाय आपल्या वासराजवळ बसून, अर्ध्या किलकिल्या डोळ्यांनी मधून मधून सुस्कारे टाकत रवंथ करीत होती.

रवींद्र एका गसडीच्या टोकावर बसून, पाठीमागील दुसऱ्या गसडीला रेलला होता;...व आपल्या छातीवरील सारंगींतून अगदीं सूक्ष्मपणें भैरवी आळवण्यांत रमून गेला होता. त्याला कशाचेंहि भान असलेलें दिसत नव्हतें!

अरुणनें सगळीकडे एकादां विमनस्कपणें पाहिलें व शेवटीं आपली दृष्टि जाईकडे फिरविली! भोंवतालच्या साऱ्या शांततेनें व अरुणच्या असल्या अस्वस्थ हालचालीमुळें, जाई थोडी गांगरून अरुणपासून कांहीं पावलें थबकली होती. पण तिच्या डोळ्यांत संशयी भीतीपेक्षां, 'आपल्या सान्निध्यानें अरुणला त्रास होत असेल कां?' या कल्पनेचें हतबल दुःखच जास्त दिसलें!

अरुणनें मात्र पूर्वीच्याच स्नेहानें तिजकडे पाहून, तिला लांबूनच 'या' असें खुणावलें; त्यामुळें तिला पुन्हां धीर येऊन तीहि दबकत दबकतच पुढें झाली.

: ४१५ :

''रवींद्र, अजून तुम्ही जागेच कां? फार सुंदर वाजवतां हं तुम्ही!'' हे अरुणचे एकाएकीं



कानावर पडलेले शब्द ऐकून, चतर्जी दचकून भानावर आला.

''कलानंद हा असाच असतो, बाबू!..भूकतहान, सुखदुःख सारें विसरावयास लावणारी ती एक समाधीच असते, नाहीं कां?'' असें कांहीं तरी उत्तरादाखल बंगालींत म्हणत, चतर्जी अरुणकडे पाहूं लागला;..तोंच त्याला त्याच्या मागेंच उभी असलेली जाई दिसली आणि तो अत्यंत आश्चर्यचकित होऊन अरुणला म्हणाला, ''अंऽ? या कोण?''

''या जाई पै! नुकतीच त्यांची माझी रस्त्यांत भेट झाली!...'' अरुण अगदीं साहजिकपणेंच जाईची वकिली करूं लागला. ''आज इथं आपल्याबरोबरच, या छपराचा त्या आश्रय घेणार आहेत!..''

चतर्जीनें एकदा जाईकडे पाहून, आपली मान बाजूस वळविली; त्याचा चेहरा अगदीं त्रस्त झाला होता. शेवटीं तो त्राग्याच्या आवाजांत म्हणाला, ''अरुण, तुम्ही शुद्धीवर आहांत कां? आपण हे असे सडेफटिंग दोघे तरुण!.. आणि एका सुंदर तरुण मुलीला रात्रीं बारा साडेबाराला तुम्हीं येथें आणतां? आतां या झोंपणार कुठं? यांच्या आंथरा-पांघरायची व्यवस्था काय करायची?..आणि आपले ते वृद्ध यजमान काय म्हणतील, उद्यां सकाळी? अजूनहि शहाणपणा करून त्यांना परत जायला सांगा!...''

चतर्जीचा हा प्रश्नांचा व सूचनांचा भडिमार, अरुण शांतपणे ऐकत होता. आपल्याविषयीचें दोघांचे कांहीं तरी बोलणें चाललें आहे व आपल्याच बाजूनें त्या बंगाल्याला अरुण कांहीं तरी सांगत आहे,..एवढेंच काय तें जाईला त्यांतून समजलें. यामुळेंच ती बिचारी गांगरून, त्या दोघांकडेहि आलटून पालटून पहात राहिली.

''रवींद्र, आज तरी आपल्यासारखी ती निःसहाय्य मुलगी आहे.'' अरुण पुन्हां जाईसाठी रदबदली करीत म्हणाला, ''त्यांना जा म्हटलें तर त्या जाणार तरी कोठें?''

''पण..नाहीं...अरुण'' रवींद्र किंचित् विचार केल्यासारखें करून नकारात्मक मान हलवीत म्हणाला, ''साऱ्यांचीं सुखदुःखें आम्हीं पाहातों. पण आमचीं सुखदुःखें आम्हीं कोणाला सांगणार? साऱ्यांच्या अडचणी आमच्या म्हणून चालण्याइतकं आपल्यांत सामर्थ्य आहे कां?''

जाईला त्यांचें बंगाली बोलणें समजत नव्हतें; तरी आपल्या येथे येण्यानें यांच्यांत कांहीं तरी घोंटाळा उत्पन्न झाला आहे,..विशेषतः, रवीन्द्राला तिचे येणें मुळींच पसंत नाहीं,..हें तिला लागलीच उमगलें!

किंचित् काल विचार करीत ती घुटमळली!..पण एकदम निर्धार करून ती मागें वळून चालूं लागली..

आपापसांतील जीवनकलहाचीच जणूं ती तिघांची धडपड होती!

तरी अरुणला, चतर्जींच्या कठोर वागण्याचा जितका राग आला, तितकाच जाऊं लागलेल्या मानी जाईबद्दल एकाएकीं आपुलकी वाटूं लागली.

''चक्कर आहां अगदीं, चतर्जी!..तुम्हांला कांहीं हृदय आहे कीं नाहीं?'' असें पुटपुटत तो धांवत पुढें गेला व जाईला आडवा होऊन म्हणाला ''थांबा ना!..जातां कोठें?..''

: ४१६ :

''नको ठाकूर, माझ्यामुळें तुम्हांला कां उगीच त्रास? मी जाते आतां..'' जाई पुन्हां चालूं लागत म्हणाली.

''कुठें?'' अरुणनें तिजबरोबर चालत चालत, तिला जिव्हाळ्यानें विचारलें. किंचित् आत्मविश्वासानें अरुणकडे मिश्रभावनांनी भरलेला कटाक्ष टाकून म्हणाली, ''तुम्ही मजसाठीं केलंत तेवढंच पुष्कळ झालं!..''

''पण मी सांगतो म्हणून तरी थांबाल कां?'' शेवटीं भावनाभरित अंतःकरणानें अरुण विनवणीच्या स्वरांत तिला म्हणाला.

जाई चालतां चालतां थांबली. मागें वळून तिनें अरुणकडे पाहिलें; त्यावेळीं तिजविषयीची निरपेक्ष आपुलकीच त्याच्या दृष्टींत, उत्कटपणें भरलेली तिला दिसत होती! जाईनें सौम्य हास्य केलें, ओल्या झालेल्या आपल्या टपोऱ्या डोळ्याच्या कडा पुसल्या,..व शेवटीं मागें फिरून अरुणबरोबर ती चालूं लागली.

दोघेंहि परतलीं, तेव्हां रवींद्र आपली शाल पांघरून आपल्या ब्लँकेटवर थोड्याशा घुश्श्यानेंच पडला होता. अरुणनें तिकडे लक्ष दिलें नाहीं, कीं त्याच्याबरोबर तो बोललाहि नाहीं.

जाईच्या झोंपण्याची व्यवस्था काय करायची या दृष्टीनें त्यानें इकडे तिकडे पाहिलें, तों त्याला आढळलें, त्या दोघांनीं स्वतःसाठीं सतरंजी अंथरली होती, त्या थरावरच मागल्या बाजूस आणखी एक गसडीचा थर होता. अरुणनें वर चढून आपल्या झोंपावयाच्या जागीं पडलेल्या दोन्ही चादरी घेतल्या, त्यांतील एक त्या वरच्या गसडीवर अंथरली, व दुसरी तेथें त्यावर पांघरावयासाठीं ठेवली.

त्याच्या या सर्व हालचाली, जाई लांबूनच कौतुकानें मुकाट्यानेंच पहात होती;..अरुण पुन्हां खालीं उतरून तिच्याजवळ केव्हां आला, त्याचें तिला भानहि राहिलें नाहीं.

''चला, तुम्ही तिथें वर झोपा,'' अरुण तिला हळुवारपणें म्हणाला, ''मी रवींद्राजवळ खालीं झोपेन त्या सत्रंजीवर.''

''आणि तुम्हांला पांघरायला?'' जाई त्याच्याकडे प्रेमानें पहात आस्थेच्या स्वरानें म्हणाली,



''हवेंत थोडा थोडा गारवा वाढतो आहे.''

''नको, मला नाहीं लागत कांहीं पांघरायला. पण वर जा तुम्ही! बोलण्यांत वेळ घालवूं नका!..आतां रात्र बरीच होत आली आहे.'' अरुणनें तिला जरा वडीलकीच्या हुकमी आवाजांत म्हटलें.

: ४१७ :

जाई अगदीं भरलेल्या हृदयानें गसड्यांपर्यंत गेली, पण ती वर चढेना. 'आता वेळ कां?' अशा दृष्टीनें अरुण तिजकडे पहात असलेला पाहून, शेवटीं ती म्हणाली, ''मला वर चढतां येईल?''

''अगदी लहान मुलांसारखं काय करतां हो? मी हात देऊं कां?'' अरुण वरच्या सत्रंजीवर चढला व त्यानें आपला हात पुढें केला. जाईची जणूं काय तशी अपेक्षाच होती, इतक्या चटकन् तिनें हंसत हंसत अरुणचा हात हातीं धरला व ती वर चढली.

तिच्या हृदयांत, अरुणच्या अनपेक्षित पण अर्धवांच्छित अशा त्या साध्या स्पर्शानेंहि, भावनांचा कल्लोळ उठला होता;.. त्यांना लगाम घालून, तिच्या वर घातलेल्या अंथरुणाकडे जाण्यास अरुणनें मदत करावयाच्यापूर्वीच, ती झटकन् वर चढूनहि गेली. आणि तिच्या ह्या साऱ्या हालचालीकडे, आश्चर्यचकितपणें पहात अजूनहि उभ्या असलेल्या अरुणकडे, अगदीं प्रेमभरला दृष्टिक्षेप टाकून अंगावर चादर ओढीत, मंजुळ शब्दांत जाई त्याला म्हणाली, ''झोपा ना आता तुम्ही. पाहिजे तर माझें कपड्यांचं तें लहानगं बोचकं उशाला घ्या. आतां रात्र बरीच झाली, नाहीं कां?''

भारलेल्या अंतकरणानें अरुण क्षणभर तसाच तिच्याकडे पहात उभा राहिला; व नंतर तो खाली वांकून सत्रंजीवर बसला. त्याच्या पायाजवळ असलेलें जाईचें कपड्याचें बोचकें त्यानें उशाशी घेतलें..व त्यावर डोकें टेकून, धडधडत्या छातीनेंच, त्यानें आपले अंग गवताच्या गंजीवर पसरलें.

: ४१८ :

जीवनकलहांत कसल्याप्रकारची धडपड असते यांची दहा मिनिटांपूर्वीच, किंचित्शी चुणूक दाखवणारा रवींद्र चतर्जी, आपली शाल लपेटून, आपल्या ब्लँकेटवर त्याच्याजवळ गाढ झोपी गेला होता.

पण थोडा विचार करतां, त्याच्याविषयींचा अरुणचा राग मात्र साफ निघून गेला.

गेल्या दीड तासांतील जाईच्या सहवासांतील सारे प्रसंग त्याच्या डोळ्यासमोर येऊन, तिच्या स्नेहशील पण असहाय्य स्थितीमुळें, मधून मधून त्याची वृत्ति विचलित होत होती; पण आपलें उचंबळणारें हळवें हृदय, कठोरपणें दडपण्याचा त्याचा असा नेटाचा प्रयत्न चालला असतांनाच, त्याच्या डोळ्यावर झोपेची झांपड येऊं लागली.

पहाटेची थोडी थोडी थंडी, त्याच्या उघड्या अंगाला लागून तो जागा झाला;..तेव्हांच त्याला समजले, कीं, आपण विचार करतां करतां दोन तीन तास तरी झोपीं गेलों होतों. समोर शालींत लपेटून गाढ झोंपी गेलेल्या चतर्जीकडे किलकिल्या डोळ्यांनी एकदां पाहून, तो दुसऱ्या कुशीवर वळला; व हात पाय जवळ घेऊन, थंडीनें कुडकुडत तो पुन्हां झोंपण्याचा प्रयत्न करूं लागला.

पण फटफटीत उजाडल्यावर तो पुन्हां जागा झाला. तेव्हा जाईला पांघरावयास दिलेली चादर, आपल्या गळ्यापर्यंत नीट घातलेली त्याच्या आश्चर्यचकित किलकिल्या दृष्टीला दिसली!..

आणि उठून बसून त्यानें वर पाहिलें, तों जाई बसल्या बसल्या डुलक्या घेत होती.

: ४१९ :

तिसऱ्या दिवशी संध्याकाळची गोष्ट! झपझप पावलें टाकीत, जाई जाधवांच्या घराच्या बाजूला चालली होती. नुकतीच ती वरळीबीचच्या धक्क्यावरून, एका नव्या आनंदाने परतत होती.

आपण संत्रस्त मनानें कोठें तरी भटकत फिरायचें म्हणून धक्क्याकडे जातों काय; फिरतां फिरतां, जवळच बसलेल्या एका प्रौढ गुजराथी गृहस्थाच्या हातीं असलेला टाइम्सचा अंक पाहून, आपण केवळ ‘वान्टेड’चे सदर पाहण्यासाठीं थोड्या वेळाकरितां त्याच्याकडून तो मागून घेतो काय;..आणि त्यांत मॉडेल गर्लच्या रिकाम्या जागेविषयींच्या एका अडव्हर्टाइजमेंट ब्यूरोची जाहिरात वाचतो काय? किंचित् आशेनें आपण तो पत्ता लिहून घेण्यासाठीं, त्या गुजराथ्याकडे पेन्सिल मागतांच, त्यानें ती देतांना ‘काय लिहून घ्याचं आहे?’ हा प्रश्न विचारणें, हें कांहीं विशेष आश्चर्यकारक नव्हतें;.. पण त्यानंतर झालेल्या बोलण्यांत, आपण लिहून घेतलेल्या पत्त्याची जाहीरात त्यानेंच दिली होती व तोच त्या कंपनीचा मालक होता, असें समजतें काय!...

या बातमीनें मात्र ती एकदम दचकली होती. जाईबरोबर बोलत असतां मधून मधून तिच्यावर रोखली जाणारी त्या गुजराथ्याची दृष्टि, त्यांतील ती एक प्रकारची वैषयिकता...लंपटपणा तिला त्याच्याबद्दलची अगदीं शिसारी आणीत होती. आणि त्याच्याबरोबर पुढें कांहीं बोलूं नये असेंहि क्षणभर तिला वाटलें होतें. पण पुन्हां तिनें आपल्या सभ्यासभ्यतेच्या कल्पना, स्वतःच्या गरजू परिस्थितीकडे पाहून संकुचित केल्या होत्या;..त्यानें विचारलेल्या साऱ्या प्रश्नांची शांतपणे उत्तरें दिलीं होतीं. आणि त्या बोलण्याशेवटीच त्यानें तिला नोकरीवर रुजूं होण्यास सांगितलें होतें!...

‘मॉडेल गर्ल’ होणें हें कांहीं तिच्या आयुष्याचें ध्येय नव्हतें!...तिला एकाएकी नोकरीवर बोलावण्यांत त्या कंपनीच्या मालकाचा कांहीं तरी स्वार्थ असावा, हेंहि त्याच्या आजच्या वृत्तीवरून तिला वाटल्यांवाचून राहिलें नाहीं!..पण जगाला तोंड देण्यासाठींच ती बाहेर पडली होती;..असल्या काल्पनिक संशयांना तोंड देऊन तिचें चालणार नव्हतें. मानानें जगांत जगण्यासाठीं जरूर असणारें,



सापेक्ष पाहिल्यास कनिष्ठ कां होईना, पण निदान सरळ साधन तिला या नोकरीनें मिळण्यासारखें होते! म्हणूनच, क्षणाचाहि विलंब न करतां, त्यानें दिलेल्या सवलतीचा फायदा घेऊन, तिनें त्याला ‘हो’ म्हटलें होतें!

जाहिरातीची व्यापारी चित्रकला झाली, तरी समोरील चित्रकार ज्या पोझमध्यें बसावयास सांगेल, तसं-प्रसंग पडल्यास मनाविरुद्धहि बसावयाची, तिला उद्यापासून तयारी करावयास पाहिजे होती!

: ४२० :

आणि या कल्पनेवरून चालतां चालतां, आज दोन दिवस, तिजबरोबर असलेला अरुण ठाकूर देखील चित्रकार आहे, हें तिला चटकन् आठवलें. किती उमद्या मनाचा प्रेमळ तरुण तो ! त्याच्या मनाची उदात्त भूमिका, त्याच्या थोड्या सहवासांतहि तिच्या मनाला समजून आली होती.

आपण सुंदर आहों, याची जाईला घमेंड नसली तरी पूर्ण जाणीव होती. रात्रीच्या वेळी,..अगदीं निर्जन रस्त्यांत एका दुष्ट वृत्तीच्या माणसाच्या हातून तिला सोडवण्याचे उपकार अरुणनें तिजवर केले होते; पण मग त्यानंतर तिच्या मनाच्या तसल्या गोंधळलेल्या स्थितींत, त्या उपकाराचा फायदा घेऊन, सभ्यतेचा किंचित् देखील अतिक्रम त्यानें केला नव्हता!.. जाधवांच्या घरापर्यंत ती दोघे एकटींच जातांना, त्याचा तिजविषयींचा बेफिकीरपणा तिच्या मनाला त्यावेळी थोडा जाचक झाला होता खरा; पण आतां मात्र तिच्या मनांत, त्याच्याविषयींच्या आपुलकीचें भरतें येत होतें. जाधवांच्या मागीलदाराच्या गोठ्यांत पोहोचल्यावर, जीवनकलहांत सांपडणारा चतर्जीचा कांहींसा नैसर्गिक कठोरपणा नि अरुणचे त्याचवेळचें सहानुभूतिजन्य औदार्य,..यांमध्यें झालेला लहानसा झगडा!...तो तिनें प्रत्यक्ष पाहिला होता!...चतर्जी शाल लपेटून बेफिकीरीनें झोपलेला दिसत असतांना, स्वतःचे पांघरूण तिला देण्यांतील अरुणचा लहानसाच त्याग तिच्या मनावर खोल बिंबला होता!...विनय, प्रेमळपणा, स्वतःची असहायता,..त्यांनी गोंधळलेला त्याचा त्यावेळचा चेहरा,..व त्यानंतरची सारी रात्रभर झालेली तिच्या मनाची धडपड,.. तिच्या दृष्टीसमोर पुन्हां पुन्हां उभी रहात होती!...

पहाटें तिला राहवेंना म्हणून त्याला थरथरत्या हातानें आपले पांघरूण घालतांना, तो किंवा त्याच्याशेजारीं झोपलेला चतर्जी, त्याच वेळी एकदम उठले तर त्यांना काय वाटेल?..या कल्पनेमुळें तिचें हृदय भीतीनें एक सारखें कसें धडधडत होतें,...पण तरीहि, त्यांत तिला किती समाधान वाटत होतें,..हें सारें जाईला चटकन् आठवलें व ती आपणाशींच हंसली!..त्या मनोमय दृश्यानें चालता चालता जाई किंचित् लाजलीहि!-

: ४२१ :

गोपाची आई दूध काढतांना होणाऱ्या धारांच्या आवाजानें अरुण जागा झाला; त्यावेळीं, गाईजवळ उभ्या असलेल्या जाईकडे पाहून, पांघरुण एका हातानें बाजूस सारून तो उठून बसला; तेव्हां त्यानें तिच्याकडे जो प्रेमळ कटाक्ष टाकला होता, त्याच्या आठवणीनें जाईच्या अंगावर आतांहि रोमांच उभे राहिले!..आणि तिच्या आंगतुक व आकस्मिक आगमनाचें, गोपाच्या आईकडे स्पष्टीकरण करतांना झालेला अरुणच्या मनाचा गोंधळ, तिला आठवून चालतां चालतां क्षणभर हंसूंच आलें. त्यापूर्वींच उठून, तिनें गोपाच्या आईची ओळख करून घेतली होती, व तिला ती तेथें कशी आली याची थोडक्यांत माहितीहि करून दिली होती, त्यामुळें त्या प्रेमळ बाईनें ''तुम्ही नको ओळख करून द्यायला!..बायका कितीहि शिकल्या तरी आपणच एकमेकींशीं घेतात ओळखी करून बरं!'' असें मध्येंच गंमतीनें म्हटल्याबरोबर, आणि त्यावर ती व जाई सौम्यपणें हंसल्याबरोबर, अरुणच्या मनाची उडालेली त्यावेळची गंमतीदार तिरपिट!..त्याचें सौजन्यच त्यांतून पुरेपूर स्पष्ट होत होतें.

दुसऱ्या दिवशी रात्रीं जेवणापूर्वी चतर्जी एकदम बाहेरून येऊन ''काल मी भेटावयास गेलेल्या कंपनींत मला नोकरी मिळाली;..थोडेसें आगाऊ पैसे हातीं आले. आतां तुम्हांला सोडून मला लागलीच गेलं पाहिजे;..उद्यां सकाळीं शूटिंग आहे!..'' असें सांगूं लागतांच, त्याच्या सुस्थितीच्या आनंदानें व त्याच्या वियोगाच्या दुःखानें अरुणचे डोळे कसे चटकन् पाण्यानें भरले?...

त्या रात्रीं,..चतर्जी मोकळेपणें वाजवीत होता, पण अरुण अगदीं मुग्धमुग्धच कसा होता?.. दुसऱ्या दिवशीं सकाळी चतर्जी निघाला, तेव्हां अरुणनें त्याच्या पाठीवर हात ठेवून, दारापर्यंत जाऊन त्याचा निरोप कसा घेतला; आणि परत आल्यावर जाईकडे पाहून, ''बरं झालं! आतां राहिलं आपलं दोघाचं भवितव्य!'' असें कांहींतरी पुटपुटून, तो तिच्यापासून थोड्या अंतरावर कसा बसला;..या साऱ्या गोष्टी जाईपुढून भरभर जात होत्या!...

त्यावर जाई म्हणाली होती, ''अरुण, दोघांपैकी एकालाहि काम लागलं तरी सांभाळून नेता येईल!''

पण त्यावर किंचित् दचकून, अरुणनें मुग्धपणेंच निराशेचा एक मोठा सुस्कारा सोडला होता... ते तिच्या दृष्टींतून सुटणें अशक्य होतें!..आणि प्रथमपासून तिच्याविषयी त्याच्या मनांन वास करीत असलेला आत्यंतिक परकेपणा, अजूनहि तितकाच अचल आहे याची जाणीव होऊन, तिला त्यावेळीं अतिशय दुःखहि झालें होतें!

: ४२२ :



आज दुपारच्या सुमारास दोघेहि बाहेर पडल्यावर, या बाजूस येतां येतां बोलण्याच्या ओघांत अरुण तिला म्हणाला होता, ''कांहीं असलं तरी आपल्याला आपले मार्ग पुन्हां भिन्नपणें आक्रमूं लागलं पाहिजे, नाहीं कां?''

''अगदीं याचक्षणीं कशाला त्याचा विचार?''असें जाईनें त्यावर म्हटलें होतें. पण मग तें बोलणें तेथें तेवढ्यावरच अर्धवट राहिलें!... त्यांनतर तो तिकडे गेला व जाई इकडे आली. त्यावेळीं तिला दोघांच्याहि असहाय्य स्थितीचें, सारखेंच दुःख होत होतें!..'पण आतां चार तासांतच आपलं भवितव्य अगदीं अकल्पितपणें किती बदललं आहे!.. आणि अरुण मात्र कदाचित् तसल्याच खिन्न मनानें तेथें परतून आले असतील!..'

मग तिला वाटलें, ''आपण आतां तेथे जाऊं. आपल्या या आनंदांत ते तसल्याच कांहींशा परकेपणानें सामील झाले, तरी आपण त्यांना सांगूं, 'अरुण, तुमचीहि परिस्थिती बदलेल तोपर्यंत आपण मजवर आपला भार टाकूं नाहीं कां शकणार?' आणि ते त्याला नाकबूल झाले, तर त्यांना आपण आपुलकीनें आग्रह करूं!''

अरुणचें भवितव्य!..यावरून जाईला आपल्या उद्यांपासून सुरू होणाऱ्या नव्या आयुष्यक्रमाची आठवण झाली. आणि तिच्या डोक्यांत कल्पना आली,.. 'ज्याच्यासमोर आपल्याला नेहमीं बसायचं,..तो चित्रकार, अरुणसारखा सज्जन असला तर' व लागलीच त्यापुढेंहि तिचें मन धांवले '-अरुणच स्वतः असले तर!..'

त्यामुळें मात्र जाईला क्षणभर आनंद झाला!..त्यांतच लागलीच तिला आठवण झाली, ज्या फर्ममध्ये मी काम करणार होती, तेथे एका चित्रकाराचीहि जरूर असल्याची जाहिरात, तिने मघां त्याजवळच वाचली होती.

तिला लागलीच एक कल्पना सुचली; चालतां चालतां तिनें मनाशीं बेतहि केला -''आपण उद्यां अरुणांना घेऊनच कंपनींत जाऊं. आपल्याला त्यांची सोबतहि होईल...शिवाय...त्यांना ही व्यापारी चित्रकला अवगत असो नसो, आवडत असो नसो, सध्याच्या परिस्थितींत, ती नोकरी मिळत असल्यास ती त्यांनी पत्करावी असें आपण त्यांचें मन वळवूं!.. आणि आज आपल्याला भेटलेला आपला तो गुजराथी मॅनेजर आपलं ऐकेल, तर कदाचित् अरुणांच्या भवितव्याचाहि सध्यां प्रश्न सुटेल!''

: ४२३ :

असल्या आशावंत मनानेंच ती चालत आली व घाईघाईनें ती जाधवांच्या घराच्या पायऱ्या चढली. जाधव आले नव्हते व अरुणहि परतलेले दिसत नव्हतें. ती किंचित् चमकली व आतां

चांगल्या परिचित झालेल्या गोपाच्या आईकडे लगबगीनें जात तिनें विचारलें, ''अजून ठाकूर आले नाहींत कां?''

''तुम्ही दोघें बाहेर पडल्यावर ते घाईघाईनें परतले.'' गोपाची आई तिला माहिती पुरवीत होती, ''ते म्हणाले मला आतां लागलीच गेलं पाहिजे..तेव्हां माझाहि अगदीं नाइलाज झाला. त्यांनीं तिथं बसून ही चिठी लिहिली व बंद करून मजकडे दिली. दाराकडे वळतां वळतां, ते मला म्हणाले, 'मी दोन चार दिवसांनी येईनच! ही चिठी जाई पै परत आल्या, म्हणजे त्यांना द्या. गोपाच्या वडिलांनाहि माझा रामराम सांगा.' आणि ते चटकन् पायऱ्या उतरून निघूनहि गेले. कसलं एवढं एकदम काम निघालं...मला अजून समजत नाहीं!..

: ४२४ :

जाईनें घाईघाईनें पाकीट फोडून आपली चिठी उघडली;.. त्यांत फक्त एवढाच मजकूर लिहिला होता -

''क्षमा करा. माझं मागील आयुष्य तुम्हांला ठाऊक नाहीं. मला एकटंच परिस्थितीशीं झगडावयाचं आहे. तुमच्या दोन दिवसाच्या लहानशा सहवासांतील तुमची स्नेहशीलता मी जाणतो; पण माझ्यामुळें आणखी तुम्ही किंवा जाधवांसारख्या प्रेमळ मंडळींनीं दुःखी कां व्हावं? मनावर ताबा मिळवूनच तुम्हीं साऱ्या नवीन स्नेही मंडळींना सोडून दोघांच्याहि हिताच्या दृष्टीनें मी निघून जात आहे. तुमचें भवितव्य काय तें तुम्ही ठरवा! जाधवांनाहि हेंच सांगा -

- अरुण ठाकूर.''

जाईनें ती चिठी वाचल्यावर, तिच्या साऱ्या उत्साहाचा विरस झाला होता. सुन्नपणें कपाळावर हात घेऊन, ती तेथेंच चुलीपाशीं बसली; व तिजकडे वत्सलमातेच्या सहानुभूतीनें पाहणाऱ्या गोपाच्या आईपुढें तिनें आपल्या हातांतील कागद केला.

: ४२५ :

जाई तेथून उठली व बाहेरच्या खोलींत जाऊन बसली. आपल्या मागील अज्ञात आयुष्याविषयीं अरुणने चिठींत लिहिल्यामुळें,..तिलाहि आपला भूतकाळ आठवूं लागला.. अरुणच्या गतायुष्याची तिला कांहीं कल्पना नव्हती. पण तिला वाटलें, जगाच्या दृष्टीनें आपलें तरी आतांपर्यंतचें आयुष्य पापी घटनांनीच भरलेलें आहे!..शांताराम तेलंगाबरोबरचा आपला संबंध स्खलनशील होता खरा. पण...त्यांत केवळ कामुकताच नव्हती! त्याच्याविषयी त्यावेळीं तरी वाटणाऱ्या प्रेमामुळें, आपण हळूंहळूं वाहवत गेलों;..त्याच्या सुखासाठींच आपल्या हातून शेवटची चूक घडली. त्यानंतर, त्यावेळीं त्याच्याविषयींचा उत्कट विश्वास, आपल्या सलणाऱ्या मनाला किंचित् काल तरी समाधान



आणीत असे. पण आपल्या विश्वासास शेवटीं तो अपात्र ठरला व आपण एकटेंच सर्वथैव दोषी ठरलों,..तोंडघशीं पडलों!..ज्या प्रसंगामुळें त्याच्या आयुष्याचें स्थैर्य जरासुद्धां ढळलें नाहीं, त्यामुळेंच आपल्या जीवनांत मात्र भयंकर क्रांति झाली. आपण पतित ठरून जगाशीं तोंड देण्यास वाऱ्यावर पडलों!..पण त्याबद्दल ती शांताराम अगर आपले वडील यांना दोष देण्यापेक्षां, आपल्या वेड्या प्रेमाला आपल्या मनाशीं बोल लावीत होती!...

आणि त्यानंतरची तिजवरील लहानमोठीं संकटें,...अगर अगदी निराश्रितपणें झालेलें तिचें एकाकीं भ्रमण! यामुळें निसर्गतःच उत्कट प्रेम करणारें तिचें हृदय मात्र जरासुद्धां बदललें नव्हतें!..तिला सात्त्विक प्रेमाचा आसरा अजूनहि तितक्याच उत्कटतेनें आवश्यक वाटत होता.

: ४२६ :

आणि म्हणूनच जाईच्या या निराश्रित स्थितींत, तिला निरपेक्षपणें प्रेमळपणा व सौजन्य दाखवणाऱ्या अगदीं अनोळखी अशा अरुणची भेट,...त्याचा लहानसा सहवास,..ही तिला आपल्या आयुष्यांतील एक नवी क्रांति वाटूं लागली होती. त्याच्या संगतींतील लहानमोठ्या प्रसंगांच्या आठवणीनें, तिच्या जात्या आशावंत मनांत, आपाततःच चमत्कारिक वाटणारे हळुवार भावनांचे कल्लोळ व कल्पनांचे अनेक टोलेजंग मनोरे,...आतांपर्यंत उठून गेले होते!

''चोवीस तासांच्या आंत अरुणविषयीं आपल्याला इतकी आपुलकी कां वाटावी? पूर्वीच्या कटु अनुभवामुळें आपण बावरलों कसें नाहीं?..अरुणविषयीं आपल्याला इतकी खात्री कां वाटूं लागली?..'' हें सारें तिचें तिलाहि एक मोठें कोडेंच वाटलें! -पण मग तिनें मनाची समजूत केली..''कोठें अरुण आणि कोठें शांताराम! त्याचा जिवलग स्नेह शेवटीं जितका स्वार्थी ठरला, तितकीच अरुणांची भेट झाल्यापासून ते निघून जाईपर्यंतच त्यांची बेफिकिरी शेवटीं जास्त महत्त्वाची व पवित्र ठरेल!..''

आणि म्हणूनच तिला वाटलें, अरुण आपल्या आयुष्यांत कांहीं तरी भयंकर क्रांति घडवून आणण्यास समर्थ झाले आहेत व होतील खास! असल्या विचारांमुळेंच अरुणच्या अगदीं थोड्या सहवासानंतरहि हा एकाएकीं झालेला वियोग तिला जास्तच असह्य होत होता.

: ४२७ :

अरुणचें पूर्वीचें आयुष्य तिला ठाऊक नव्हतें, आणि तिचें तरी त्याला कुठें ठाऊक होतें? पण दोघांच्याहि मागल्या आयुष्यांचें हें धुकें तसेंच कायम राहून आपल्या या नव्या स्नेहाची वाढ झाली,..आपण एकमेकांना एकमेकांच्या प्रेमळपणाचा आसरा केला;..व ही अकल्पित अचानक झालेली भेट, चिरस्थायी करून पुढल्या धुक्यांतील ठेंचाळणाऱ्या मार्गांत संगत केली,.. तर नाहीं

का चालणार? -पण हें आतां सांगायचें कोणाला? अरुण जसे एकाएकीं कोठून तरी आले तसेंच एकाएकीं कोठें तरी गेले. आज आपल्या आनंदांत साध्यासुध्या स्नेहानें वाटेकरी होण्यासहि ते येथें नाहींत!..यामुळें तर तिची खिन्नता जास्तच वाढली!

मग जाईला वाटलें, अरुण आज उद्यां पुन्हां भेटणार नाहींत असें थोडेंच आहे? तोंपर्यंत आपण अगदी ते जणुं आपल्याजवळच आहेत असें मानून वाट पाहूं. पूर्वी ठरल्याप्रमाणें आपण उद्या स्वीकारलेल्या कामावर रुजूं होऊं. मनांत बेत केल्याप्रमाणें मॅनेजरकडे त्यांच्याकडील चित्रकाराच्या जागेविषयीं बोलणें करूं व त्याच्याकडून एकदोन दिवसांची मुदत घेऊन अरुणांना शोधण्याची खटपट करूं..पण त्यांना शोधावयाचें कोठें? याविषयीं तिची मति पुन्हां गुंग झाली! तरी विचार करूनहि न सुचल्यामुळें शेवटीं तिनें आपल्या हृदयाच्या आशावादाचाच आश्रय घेतला!..

''जेवायला चालतां ना ताई?..बाबा वाट पहात आहेत तुमची?'' गोपानें जाईचा हात धरून, तिला एकदोनदां हालवतांच, ती आपल्या त्या तंद्रींतून जागी झाली.

त्या निष्कलंक बालकाकडे पाहून तिनें गोड हास्य केलें, त्याच्या गालांवर हळूच चापट मारून तिनें त्याला उठतां उठतां जवळ ओढलें व ती त्याच्याबरोबर मुग्धमंद चालत, जेवावयासाठीं घरांत निघून गेली.

: ४२८ :

''जाई, नोकरी लागली म्हणून आमच्याकडून लागलींच जाण्याचें काय कारण?'' गोपाची आई, जवळ बसलेल्या जाईबरोबर जेवतां जेवतां प्रेमानें बोलत होती, ''तुम्ही एथूनच गेलांत तर नाहीं कां चालणार नेहमीं?''

''तसं नाहीं गोपाच्या आई,'' आई प्रथम थोडीशी घुटमळली. ''माझी तुमची दोन दिवसांचीच ओळख! माझ्याविषयीं काय तुम्हांला ठाऊक आहे? आणि मीं तुम्हांला कां त्रास द्यायचा बरं? तसं पाहिलं तर अरुण निघून गेले, त्यांत तरी त्यांचं काय चुकलं, म्हणते मी?''

आपलें चुलीजवळचें सर्व काम आवरून गोपाची आई जाईजवळ येऊन बसली. मान खालीं घालून, ती खिन्नपणें बसली होती. तिच्या पाठीवर हळुवारपणें हात ठेवून, तिला किंचित् आपल्याजवळ ओढीत जाधवांची बायको म्हणाली, ''अशा खिन्न का बसला आहांत, जाई? तुमची माझी नवी ओळख असली,.. आणि तुम्ही माझ्यापेक्षां पुष्कळ शिकलेल्या असलां,..म्हणून आपणां बायकांना एकमेकांची दुःखं समजण्याची शक्ति नसते,...असं कां वाटतं तुम्हांला?..माझ्या आयुष्यांत मी काय कमी दुःखं पाहिलीं?...आणि सध्यां काय कमी भोगीत आहे?..पण यांच्या संगतींत, त्यांतहि मला सुख वाटतं!..''



तिच्या ह्या थोपटण्यानें आणि तसल्या मनापासूनच्या शब्दांनीं, जाईचें हृदय अगदीं गहिंवरून आलें. तिला आपल्या आईची, मिरेची,..साऱ्यांची एकदम आठवण होऊन, गोपाच्या आईच्या कुशींत एकदम मान घालून, ती भावनांच्या आवेगानें ओक्साबोक्शी रडूं लागली.

तिला अश्रू ढाळतांना पाहून, गोपाच्या आईलाही गहिवरलें. तसेंच हळूंहळूं थोपटत जाईला, तिनें अगदीं जवळ ओढलें; त्यावेळीं, सासरी गेल्यापासून तिला न भेटलेल्या आपल्या मुलीची तिला एकदम आठवण झाली. जाईच्या डोक्यावर आपली मान टेकून, ती कुजबुजत अगदी प्रेमानें तिला म्हणाली, ''जाई! मुली, जशी माझी ताई, तशी तूं! तुझ्या मनाला एवढं कसलं दुःख होत आहे, सांग बरं मला?''

तिच्या त्या एकेरी हांकेंत भरलेल्या ममतेनें, जाईचें दुःख एकदम हलकें झालें;..आणि तिनें अश्रुभरल्या नेत्रांनीं तिजकडे एकदां हंसून पाहिलें!..

तींहि जाईकडे पहात स्मित करीत होती. आपले अंग तसेंच भिंतीजवळ लांब पसरून, जाईनें तिच्या मांडीवर आपलें डोकें टेकलें; व आपल्याकडे खालीं वांकून प्रेमानें पाहणाऱ्या गोपाच्या आईकडे एकाग्रतेनें पहात, ती कांहीं वेळ निश्चल पडून राहिली.

नंतर मधून मधून मुसमुसत, जाई तिला हळूंच म्हणाली, '' आई, या दुर्दैवी पण भाबड्या जाईला, पुन्हा इतक्या लौकर तिची आई मिळेल,...असं वाटलं नव्हतं! माझं मन मोकळं करायला...इतक्या आपुलकीनें तुम्ही मला सांगत असतांना, कुढत कां बसेन?...पण आई, माझं सारं ऐकल्यावरहि तुला माझ्यावियी तितकंच प्रेम वाटेल कां ग?...कोणास ठाऊक!''

गोपाच्या आईने जाईकडे एकदां वत्सलतेनें पाहिलें,..तिचा प्रेमानें हळूच एक गालगुच्चा घेतला; आणि तिला सौम्यपणें थोपटत ती भिंतीला ओडगून बसली.

''थांब तर मग!'' जाई एकदम उत्साहाने उठून अगदीं घरच्या मोकळेपणाने म्हणाली, ''मी अंथरुणं घालते आपलीं. तंवर, बाहेरच्या खोलींत सत्रंजीवर गोपा झोपला असेल, त्याला आंत घेऊन ये. आपण मग पडल्या पडल्याच बोलूं सारं-''

आणि थोड्याच वेळांत, जाईला आई मिळाल्याप्रमाणें,.. आणि गोपाच्या आईला, आजच जिला 'इकडे येण्याचा विचार करूं नको' असें पत्र लिहून टाकलें होतें, तीच तिची जिवलग मुलगी-ताई-फार दिवसांनी माहेरी परत आल्याप्रमाणें,...त्या दोघी एका उशीवर डोके ठेवून, कितीतरी वेळ मोकळ्या मनानें बोलत होत्या!..

: ४२९ :

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, गोपाबरोबर शाळेच्या वेळेवर घाईघाईनें जेवून जाई घराबाहेर पडली.

कोटांतल्या मोठमोठ्या इमारतींतून आपल्या नव्या नोकरीचें ऑफिस शोधण्यास कदाचित् कमीजास्त वेळ लागेल, म्हणून ती दोन अडीच तास आधींच निघाली होती!

'संध्याकाळी काम संपलं, कीं लागलींच परत ये हं!..' असें अगदीं मातेच्या जिव्हाळ्यानें सांगणाऱ्या गोपाच्या आईचा, मान हलवून स्नेहानें हंसत तात्पुरता निरोप घेतांना, जाईला एक नवाच उत्साह वाटत होता. कोणत्याहि परिस्थितींत आपल्या प्रेमळ मनाचा सुगंध आपल्याभोवतीं पसरविणाऱ्या,..त्या स्नेहाळ जोडप्याचें आयुष्य थोडा वेळ पाहूनहि, तिला वाटलें, 'हीं सदाफुलीचींच फुलं जणूं!..'

आणि अशा या प्रेमळ जोडप्याकडे जाईला एकाएकीं, अचानक स्थान मिळालें हें तिचें भाग्यच!

म्हातारे जाधव एके काळी वैभवसंपन्न असूनहि, आज वृद्धापकाळीं नोकरीशिवाय आहेत- या माहितीमुळें त्यांच्यावर आपला भार टाकणें जाईला प्रथम अयोग्य वाटत होतें; पण नंतर त्याच त्यांच्या परिस्थितीमुळें तिला वाटलें, आपल्याला यांचें प्रेमळ छत्र लाभेलच; आणि त्याबरोबरच, आपण तेथें राहिल्यास, आपल्या मर्यादित कुवतीप्रमाणें, आपणहि त्यांना आर्थिक मदत करूं शकूं!

तरीहि, असल्या विचारांचा उच्चार त्यांच्याकडे न करतांच, गोपाच्या आईच्या तेथेंच रहावयाच्या प्रेमळ आग्रहाला, जाईनें शेवटीं 'हो' म्हटलें होतें.

'पण या कुटुंबाशीं आपला संबंध जोडणारा व लहानशा सहवासांतहि आपल्या मनाला चटका लावणारा, प्रेमळ अरुण आतां कोठें असेल? कोणत्या स्थितींत असेल?'

: ४३० :

तिचे मन मधून मधून असेंच अस्वस्थ होत होतें!.. असल्या या द्विधा मनःस्थितीत व मनाच्या विविध आंदोलनांतच, ती शेवटीं फ्लोराफाऊंटनजवळ येऊन पोहोंचली. खाली उतरून तिनें पारशी स्ट्रीटची विचारपूस केली; व त्या बाजूस जातां जातां, आपल्याबरोबर अरुणला घेऊन जाण्याच्या कालच्या कल्पनेची तिला आठवण झाली.

'आपण आतां जाऊन मॅनेजरला भेटूं. आपल्या या अगदी नवख्या कामाची माहिती करून घेऊं व नंतर अरुणसाठीं त्या चित्रकाराच्या जागेबद्दल आपण त्याजबरोबर बोलणें करूं', असले विचार करीत ती पुढें चालली असतां, तिला एका गल्लीच्या कोपऱ्यावरच, ''ब्रिटिश इंडिया बिल्डिंग'' ही पाटी दिसली. तेथेंच थबकून ती आंत शिरली; आणि लिफ्टनें चौथ्या मजल्यावर जाऊन, तिनें आपल्या ऑफिसची चौकशी केली.

काल संध्याकाळी भेटलेला मॅनेजर, तिची वाटच पहात बसला होता. प्रथम इकडच्या तिकडच्या



चार गोष्टी झाल्यावर, तिला तिच्या कामाची माहिती करून देत तो म्हणाला, ''काल एक तारीख! तवा कालेथीच तुमी कामवर रुजू होवा! वात अशी हाय, के अजू एक नवा चित्रकारची अपाइंटमेंट थवानी छे! एक ज्यों! ए टेबलपर इतके अर्ज येऊन पडले हाय. काले बे-चार लोकला बोलावला हाय!.. तेमंदीथी कोयपण अपाइंट करेल आंमी! तवा परमधाडेथी तुमचे कामला सुरवात होएल!-''

त्याच्या इच्छेप्रमाणें सहा महिन्याच्या कॉंट्रॅक्टवर सही करतांना जाईचा हात थरथर कांपत होता. कसल्या आणि कोणत्या चित्रकाराकडून, आपली कशी विटंबना होणार आहे,..कोणास ठाऊक? हा विचार तिच्या मनांत अकारण भीति उत्पन्न करीत होता!..आणि या मॅनेजरबद्दल तर, कां कोणास ठाऊक, तिला अगदीं प्रथमपासूनच शिसारी वाटत होती..आणि तरी देखील तिनें कॉन्ट्रॅक्टवर सही केली! व्यवहारी जगाला तिची ही पहिली सलामी होती!...

: ४३१ :

पण इतक्यांत, तिला पाहिजे होता त्याच विषयाचा, मॅनेजरनें नुकताच उल्लेख केल्याचें आठवून, जाई त्याला म्हणाली, ''तुम्ही म्हणतां त्या नव्या जागेसाठीं चित्रकाराची निवडणूक केव्हां होणार आहे?''

''काल!..का बरा?'' मॅनेजर तिच्याकडे आपल्या कालच्यासारख्याच लंपट नजरेने पहात म्हणाला, ''तुमचे ओळखाणचे कोण चित्रकार हाय के?''

त्याच्या नजरेंतील तोच भाव पाहून, जाई किंचित दचकली; पण तरी थोड्या धैर्यानेंच ती त्याला म्हणाली, ''हो, माझे एक चांगले चित्रकार स्नेही आहेत, तेहि सध्यां असेच एखाद्या नोकरीच्या शोधांत आहेत. इथं जमलं तर तें आनंदाने तयार होतील.''

''एऽम?'' म्यानेजर तिच्याकडे निरखून पहात म्हणाला, तोऽ तेला आतां घेऊन या ना ट्रायलसाठी. आमी तो बेत्रण घंटा ऑफीसमंदीच ऱ्हाणार!..''

जाईला त्यावर काय उत्तर द्यावें हें समजेना. तरी ती चटकन प्रसंगावधान साधून म्हणाली, ''ते आज संध्याकाळीं बाहेरगांवाहून येणार आहेत.''

''अर्र्र् !'' चुकचुकत थोडा विचार करून मॅनेजर म्हणाला, ''मंग कसा होएल? आमांला काल सकाळसुधी तो नक्की केलाच पायजे!..पन आमी अशा करेल,..फकत तुमचेवास्ते!..काल सकाळीं बार कलाकसुधी तुमचेवाले माणसची वाट पाएल!..बस?..''

''बरं. थॅंक्स्'' असं म्हणून जाई जाग्यावरून उठली व जाऊं लागली. मॅनेजर तिच्याकडे पहात होता;..ती दारांतून बाहेर पडणार, इतक्यांत त्यानेंच तिला पुन्हा हांक मारली, ''मिस् पै, वन्

मिनिट..''

जाई जागच्याजागीं थबकून परत फिरली; आणि आतां पुढें काय ओढून येणार आहे हें न समजून, त्याच्या टेबलाजवळ येऊन गोंधळलेल्या चेहऱ्यानें उभी राहिली!

मॅनेजर तिच्याकडे निरखून पहात म्हणाला, ''ए ज्यो, तुमची माझी तद्दन नवी ओळखाण; तोपण आमी तुमचेवर विश्वास राखते. अबे छे मासनुं कंट्राक छे! तवा तुमाला पायजे तो एक मासचा अधा पगार,..एटले पचीस रुपया आमच्या कॅशरला बोला अने घेऊन ज्यानी!..केम समज पडी?..''

त्याच्या या अनपेक्षित सवलतीनें जाई किंचित् आश्चर्यचकित झाली होती.. पण क्षणभर विचार करून तिनें मानेनेंच त्याला 'होय' म्हणून सांगितलें.

म्यानेजरनें लागलीच घंटा वाजवली व कॅशियरला बोलावून आणलें. त्यानें दिलेले पैसे जाईनें आपल्या हाती घेतले, पावतीवर सही केली व म्यानेजरचे आभार मानून ती बाहेर पडली.

: ४३२ :

पुन्हां रस्त्यांतील जमावांत शिरल्यावर, चालतां चालतां तिला म्यानेजरच्या एकंदर सौजन्याचें कौतुक वाटलें; पण तरीहि, कां कोणास ठाऊक, त्याचें तें औदार्य कशामुळे तरी कलुषितच असावें, असें तिला मनांत वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आणि मग तिला पुन्हां एकदम आठवण झाली, 'अरुणला उद्या सकाळपर्यंत आपण त्याजकडे नेऊं शकलो, तर त्यांना ती नोकरी मिळूं शकेल खास!

पण मग,.. आतां आपली व अरुणांची भेट कोठे आणि कशी होणार?..

ती भांबावल्यासारखी उगीचच इकडे तिकडे पाहूं लागली. काम संपतांच आपण लागलीच घरी येऊं, असें गोपाच्या आईला निघतांना सांगितल्याचें तिला स्मरूनहि, तिने शेवटी तो बेत बदलला;..आणि त्या अफाट मुंबईत,..ती अरुणच्या शोधाच्या इच्छेनें आशापूर्ण मनानें, एकामागून एक रस्ते तुडवूं लागली!..

: ४३३ :

संध्याकाळपर्यंत, ती अशीच पाय नेतील तसें इकडे तिकडे भटकत होती. तिच्या विस्तीर्ण गौर कपाळावरून, उन्हामुळें घामाच्या धारा निथळत होत्या;.. आणि किंचित् केतकी वर्णाचा तिचा चेहरा लालबुंद झाला होता. आपल्या पदरानेंच ती मधून मधून तोंड व कपाळ पुसे, कोठें तरी थोडा वेळ थांबे; थांबल्याथांबल्याहि शोधक दृष्टीनें इकडे तिकडे पाही, आणि पुन्हा कोणता तरी नवा रस्ता ठरवून ती पुढें चालूं लागे.



ऑपोलोबंदरावर, कापाच्या मैदानांत, चर्नीरोड बागेंत,..ऊन होतें, तरी लांबच लांब पसरलेल्या चौपटीवर,...साऱ्या साऱ्या ठिकाणीं ती फिरली. ट्रॅमनें भायखळ्याला येऊन, तिनें व्हिक्टोरिया गार्डनमध्येंहि अरुणला धुंडाळले!.. तिला मधूनच केव्हां तरी त्याला पाहिल्याचा भास होई;..पण मग जवळ गेलें, कीं तिला आपल्या फसवणुकीची खात्री होई...तिन्हीसांजेपर्यंत, अरुण आतां भेटतील मग भेटतील, अशा आशेनें,..ती अशीच सारखी इकडे तिकडे फिरत राहिली.

आणि शेवटीं,..अत्यंत हताश मनानें जाधवांच्या घराकडे जावयासाठीं ती वळली!

: ४३४ :

दिवे लागण्याच्या सुमारास, जाई जेव्हां जाधवांच्या चाळीपाशीं असलाच विचार करीत खिन्न चेहऱ्यानें येऊन पोंहचली,...तेव्हां पायऱ्यावरच गोपा बसला होता; आणि त्याची आई दारांत उभी राहून तिजकडेच हास्यमुद्रेनें पहात होती.

''कां ग जाई, इतका उशीर लागतो कामावरून सुटायला? गोपा मघां म्हणत होता, ताईला घेऊन फिरायला जायचं!.. केव्हांचे तुझी वाट पहात आम्ही इथं उभे राहिलों आहों!..हो ना रे गोपा?'' आपल्या मुलाकडे व जाईकडे एकाच दृष्टीनें पहात, ती प्रेमळ बाई कौतुकानें म्हणाली.

आणि नंतर ती हळूच जाईला म्हणाली, ''मला वाटलं,..अरुणांसारखीच जाईहि आमच्याकडून निघून गेली कीं काय!..किती घाबरलें होते मी!..तुला आतां पाहिलं, आणि शेवटीं जिवांत जीव आला!..''

त्या साऱ्या नवपरिचित पण प्रेमळ माणसांचे, आपल्याविषेयीचे निरपेक्ष प्रेम पाहून, जाईच्या अतःकरणांत कालवाकालव झाली!..तिनें पायरीवर बसलेल्या गोपाच्या बालिश गालावर, हंसत हंसत लाडुकपणें थापट मारली, व ती पायऱ्या चढून वर गेली.

गोपाच्या आईबरोबर दोन पावलें चालल्यानंतर मात्र,..तिनें आपल्या मनाला आतांपर्यंत प्रवासानें घातलेला सारा बांध फुटला. तिच्या डोळ्यांत टचकन् पाणी उभें राहिलें;..आणि गोपाच्या आईच्या खांद्यावर आपला एक हात व मान टेकून, ती कुजबुजत म्हणाली, ''आई, मला तुला आणखीन् पुष्कळ सांगायचं आहे. चल् घरांत!..''

: ४३५ :

अगदीं याच वेळीं, चोपाटीवरच्या एक बाजूच्या कोपऱ्यांत अरुण, वाळूमध्यें ऐसपैस पसरला होता!

चौपाटीवर येणाऱ्या जाणाऱ्यांचा,..शेंगा गंडेरी, भेळवाल्यांचा, 'जलं थंडा' 'चंपेऽऽचा',... मागल्याच बाजूस चाललेल्या रस्त्यावरील वर्दळीचा,..असला अनेक प्रकारचा त्यावेळचा मानवी

कोलाहल, त्याच्या कर्णपटावर आदळत होता.

आणि त्याचवेळीं,..समोर पसरलेल्या अफाट लाटांचा गंभीर सळसळाट, वर पसरलेल्या विस्तीर्ण आकाशांतील चांदण्याची लुकलुक, सोसाट्यानें सुटणाऱ्या वाऱ्याचा आंगाला जरासा बोचणारा स्पर्श,..या साऱ्यांची त्याला मधून मधून जाणीव होत असली; तरी एकाकी अरुणला खवळलेल्या हृदयसागराची खळबळच सर्वात जास्त जाणवत होती!...

चतर्जीला नोकरी लागली आणि तो अचानक भेटला तसाच अचानक निघून गेला, त्याची स्नेहशीलता अरुणला समजून आली होती; त्याला वाटलें, त्या चमत्कारिक घटनेंत, याहून जास्त गंभीर अर्थ भरला आहे!

जाईचीहि अशीच एकाएकी पडलेली गांठ एकाएकी सुटेल तरच बरें, असे त्याच्या मनांत आलें. कारण त्या लहानग्या सहवासांतच, तिच्या नैसर्गिक प्रेमळवृत्तीमुळें अरुण तिजकडे जास्त जास्तच आकर्षू लागला होता. अरुणला त्यामुळेंच जास्त भीति वाटूं लागली! कारण एकाएकीं उंचबळून येणाऱ्या आपल्या हळव्या स्वभावाची त्याला चांगलीच कल्पना आली होती! त्यामुळे त्याच्या आयुष्यांत, आतांपर्यत अनेक संकटें आलीं होतीं!

अगदी लहानपणाची मिरा! किती स्नेहाळ पोरगी! तिच्याच सहवासांत, त्याचें सारें बालपण अतिशय आनंदात गेलें होतें; ज्या शेवटच्या भेटींत तिच्या प्रेमाचा त्यानें स्वीकार केला होता, तो प्रसंग व त्यानंतरची त्यावेळची त्याचीं सारीं सुखस्वप्नें, त्याला आतांहि आठवल्यावांचून राहिलीं नाहींत...

पण मग ती गेली, काहीं दिवस गेले; आणि तिला तो कायमचें नाहीं तरी बरेंचसें विसरला होता.

त्याच्या निःस्नेह आयुष्यांत आलेली त्यानंतरची मंजुळा! त्यावेळींही त्याचें भावनाशील हृदय उचंबळले; केवळ तिच्या सुखाच्या एकाच कल्पनेनें तो त्याच्या माणसाशी तेव्हां झगडला!..मात्र शेवटीं देशप्रेमाच्या मोठ्या लाटेंत, तिच्याविषयींच्या त्याच्या गोंधळलेल्या भावना, शिथिलपणें कोठल्याकोठें...गडप झाल्या! त्यानंतर तिच्या उदारहृदयी त्यागापासून, त्याची तिची साफच ताटातूट झाली होती! पण तरीहि या साऱ्या घटनांमुळें, त्याला एका दृष्टीनें दैवी वाटणारी तिची सौम्य..स्निग्ध प्रतिमा, त्याच्या हृदयांत अजून देखील ठाणें देऊन होती. त्याला वाटलें, आपण स्वतः मात्र सर्वस्वी तिच्या दुःखासच कारण झालों.

आणि म्हणूनच, आपल्या भावना कितीही पवित्र असल्या, तरी स्त्रियांच्या साध्यासुध्या स्नेहालाहि आपण अपात्र आहोंत, अशी मनाशीं खूणगांठ बांधून, त्यानें त्यापुढें स्त्रीसहवासापासून लांब



राहण्याचा निर्धारच केला होता.

तसल्या निःस्नेह, निष्प्रेम, अशा घोर निराश्रिततेंच, आतां त्याला सुख वाटूं लागलें होतें!

: ४३६ :

या चमत्कारिक मनःस्थितींत जगाशीं झगडण्यासाठीं आपलीं पहिलीं दुबळीं पावलें टाकीत असतांनाच जाईची त्याची अनपेक्षित भेट झाली. त्याला शक्य होतें तितक्या बेफिकिरीनें तो तिजबरोबर वागला. तिजपासून दूर होण्याचा त्यानें प्रयत्नहि करून पाहिला.

पण साऱ्या घटनाच इतक्या चमत्कारिक, कीं उलट तिच्या सहवास, थोडा वेळ कां होईना, जास्तच वाढला, दृढ झाला! आणि तेवढ्याच लहानशा अवधींत त्याचें मन तिजकडे अधिकाधिक ओढ घेऊं लागलें. यामुळें तो अतिशय गांगरला. त्याची खात्री झाली- 'हा मोह तसाच कायम राहिला, तर आपण आपल्या मनाला आतांपर्यंत घातलेले सारे बांध पुन्हां एकदां ढांसळतील! पुन्हा आपण स्वतः दुःखी होऊंच; पण आपल्याबरोबर दुसरे आणखी कोणीतरी!'

आणि जाधव!... त्यांच्याशीं त्याचा असाच अकल्पित स्नेह घडून आला होता. तें प्रेमानें त्याला जवळ करीत होते; पण त्या वेळच्या त्यांच्या गांजलेल्या दुःखी आयुष्यांत, आपण त्यांच्या सौजन्याचा फायदा घेणें म्हणजेहि त्याच्या दुःखांत आपण भर टाकण्यासारखेंच आहे,..असें शेवटी त्याला वाटलें!आणि आपण त्यांना कसली मदत करूं शकत नसलों, तरी, जसें त्यांच्या आयुष्यांत आपण एकाएकीं आलों, तसेंच त्यांतून आपण बाहेर पडणें, हीहि, त्या चमत्कारिक परिस्थितींत, त्यांना आपल्याकडून एक मदतच होईल, असें त्याचें शेवटी ठाम मत झालें!

त्या दिवशीं जाईला रस्त्यांत सोडल्यावर, असले विचारच त्याच्या मनाला सारखे व्यापून टाकीत होते. आणि म्हणूनच जाधव घरीं परत येण्यापूर्वी त्यांच्याकडे पोहोचण्यासाठी तो घाईघाईनें तसाच परतला; तेथें चिठी लिहून ठेवून, पुन्हा एकदां जगांत एकटेंच वांवरावयाचें ठरवून तो बाहेर पडला.

: ४३७ :

इकडे तिकडे पाहात, चालतां चालतां त्यानें सहज आपल्या बाहेरील डाव्या खिशांत हात घातला. कसला तरी दुमडलेला कागद त्याच्या हाताला लागतांच, किंचित् चमकून त्यानें तो बाहेर काढला!... पहातों तों पांच रुपयांची एक नोट!

त्याला वस्तुस्थितीचा मात्र प्रथम कांहीं बोधच होईना. पुन्हा पुन्हा विचार करुनहि, ती नोट तेथें आपल्या खिशांत एकदम कशी आली, हें कांहीं त्याला समजेना!

जाधवांनी चुकून ठेवली म्हणावें, तर सारा वेळ कोट त्याच्या आंगांतच होता!

जाईनें?.. पण तें त्याला शक्य वाटेना!...

इतक्यांत, त्याला एकदम आठवण झाली; आपण चतर्जीला पोंचवण्यासाठीं काल रस्त्यावर आलों व तेथेंच त्याच्याबरोबर कांहींतरी बोलत थांबलों होतों...तो स्नेहशील बंगाली, आपल्या कोटाचें बटन फिरवण्याचा त्यानें उगीचच कांहीं तरी चाळा चालवला होता. त्याच्याबरोबर दोनचार वाक्यें आपण बोललों खरीं!..पण त्यावेळीं, आपण अगदीं शून्य दृष्टीनें शेजारच्या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या माणसांकडे पाहात, आपल्या भवितव्याचाच विचार करीत होतों. आपल्या डाव्या हातानें, आपण आपल्या कांखेंतील त्याच्या शालीची घडी धरली होती व आपल्या उजव्या हातांत चतर्जींची सारंगी होती. शेवटीं निरोप घेतांना आपण त्याच्या हातांत त्या दोन्ही वस्तू दिल्यावर तो झटकन् निघून गेला होता.

या गडबडींत तर त्यानें ती नोट आपल्या खिशांत घातली नसेल ना? हो! खासच! त्यावेळीं आपलें तिकडे जरा देखील लक्ष नव्हतें.

आणि त्याबद्दलच्या तशा मनोमय खात्रीनें, प्रेमळ चतर्जींची व त्याच्या एकंदर सहवासाची, अरुणला आठवण झाली; आणि त्यानें त्या नोटीकडे एकदां हळुवार दृष्टीनें पाहून ती आपल्या आंतल्या खिशांत नीट ठेविली. तो अजूनहि तितकाच निराश्रित होता. पण तरी देखील चतर्जीनें जातां जातां त्याला दिलेल्या त्या प्रेमळ पण गुप्त भेटीची, त्याला आतां बरीच ऊब वाटूं लागली होती!

परिचित मंडळी असलेल्या त्या भागांतून, आतां जितक्या लौकर व जितक्या लांब निघून जातां येईल, तितकें अरुणला त्याक्षणीं पाहिजे होतें!..

लागलीच, तो समोर दिसणाऱ्या बसमध्यें शिरला,..व ती नोट पुढें करून त्यानें भायखळ्यापर्यंतचें तिकीट काढलें.

: ४३८ :

या विचारग्रस्त मनःस्थितींत, त्याची बस भायखळा स्टेशनजवळ येऊन केव्हां उभी राहिली, ते त्याला समजलेंसुद्धां नाहीं. तो खाली उतरला,.. त्यावेळीं समोरच, पॅलेस थिएटरमधून दुपारचा खेळ पाहून परतणाऱ्या मंडळींची गर्दी बाहेर पडत होती. त्या जवळचेंच रीगल रेस्टरॉं पाहून त्याला वाटलें, तेथल्या सुंदर चहाचा एखादा कप तरी घशाखालीं घालावा आणि मगच पुढें जावें; म्हणून ट्रामचा रस्ता ओलांडून तो त्या रेस्टरॉंकडे वळला. 'पोणा चाय्' म्हणून त्यानें पोऱ्याला ऑर्डर दिली व तो वाट पहात एका टेबलाजवळ जाऊन बसला.

समोरच्या टेबलावर टाईम्सची दोन पानें होती. सहज म्हणून ती पानें चाळवतां चाळवतां,



त्यानें त्यातील एक उघडलें; वर मोठा मथळा होता - 'राऊंडटेबल कॉन्फरन्स अँड इंडियन स्वराज्य!'

जास्त कांहीं एक न वाचतां, त्यानें तें तसेंच बंद केलें, व पोऱ्यानें पुढें आणून ठेवलेला चहाचा कप उचलून हातीं घेतां घेतां, तो आपल्याशींच खिन्नपणें हंसला. गांधींची चळवळ अशी सरड्यासारखे आपले रंग पालटीत असलेली पाहून; व आपल्यासारखे तींत मनोभावें पडलेले तिचे सैनिक आज वणवण भटकत आहेत याची जाणीव होऊन, अरुण चहा पितां पितां, पुन्हां एकदां निराशेनें हंसला. त्यांत पूर्वीपेक्षांही जास्त दारुण खिन्नता भरली होती!...

पण असल्या नुसत्या खिन्न विचारानें आपली परिस्थिति सुधारणार आहे थोडीच? हा प्रश्न मनांत येऊन त्यानें रिकामा कप टेबलावर ठेवला व तेथें पडलेलें टाईम्सचें दुसरें पान उघडलें. ठळक टायपांतील, एका बाजूचे सिनेमाचे कॉलम्स तसेच परतून, त्यानें दुसऱ्या बाजूवर दृष्टि वळवली.

'Wanted' ची नुसती फैर सुटली होती. त्यावरून दृष्टि फिरवतां फिरवतां, एखाद्या गर्दीतून चालल्यासारखेंच त्याला वाटलें. पण गेले कित्येक दिवस असल्याच गर्दीतून चालण्याची त्याला संवय झाली होती; त्यामुळें एक सुस्कारा सोडून, तो प्रत्येक जाहिरात लक्ष देऊन वाचूं लागला.

शेवटी, एके ठिकाणच्या व्यापारी चित्रकलेसाठीं सत्तर तें पाऊणशे रुपये पगारावर पाहिजे असलेल्या, चित्रकाराविषयींच्या जाहिरातीवर त्याचें लक्ष खिळलें. अरुण एक सुस्कारा सोडून आपल्याशी हताशपणें म्हणाला, ''व्यापारी चित्रकला! हो, चित्रकलेचा व्यापारच तो!...पण मग व्यापाराशिवाय तसें काय चाललें आहे या जगांत?''

: ४३९ :

आणि त्यावरुन, तो आर्ट स्कूलमध्यें जात असें, त्यावेळीं एकदां त्याच्या गुरुजींनीं - त्रिनिदाद मास्तरांनी - त्याचें एक सुंदर चित्र पहात असतांना, त्याच्याकडे हळूच काढलेले उद्गार त्याला आठवले. ते म्हणाले होते, 'ठाकूर, तुम्ही सुंदर सुंदर चित्रें काढतां खरीं!..पण तुम्हांला वाटतें त्यापेक्षां जग जास्त व्यापारी, व्यवहारी आहे. आणि त्यांत जगावयाचें तर आपल्यालाहि थोडेफार व्यवहारी बनावयास पाहिजे. निर्भेळ कला व व्यापारी कला या दोन अलग अलग.. अगदीं भिन्न असल्या,..तरी त्या दोहोंवरहि माणसाची कमीजास्त दृष्टि पाहिजे!..हें तत्त्व हुकलें, तर सारेंच हुकेल! हें माझ्यासारखा मनुष्यहि तुम्हाला सांगत आहे, हें लक्षात ठेवा!''

आणि त्यावेळीं, वर्कशॉपमधल्या आपल्या मध्यवर्ती खुर्चीवर चित्रफलकासमोर बसल्या बसल्या, मास्तरांनीं तोंडभर हंसत हंसत, आपल्या पांढऱ्या दाढीवर हात फिरवला होता! तें अरुणला प्रत्यक्ष घडत असल्याप्रमाणें आज आठवलें. आपले चित्रकलेचे प्रत्यक्ष गुरुजी निराळे असूनहि, मधून मधून

सूचना घेण्यसाठीं, अरुण त्यांच्या घरीं किंवा आर्टस्कूलच्या वर्कशॉपमध्यें मास्तरांकडून सूचना घेण्यासाठी केव्हां तरी जात असे; त्यावेळीं त्यांनी त्याला सांगितलेल्या अनेक गोष्टींची त्यावेळेपेक्षां आजच त्याला जास्त प्रचीति येत होती!...

म्हाताऱ्याचे ते तसले शब्द पुन्हां आठवून, आज त्याच्या खिन्न मनाला त्यांतच एक प्रकारें मौज वाटली व त्यांच्या प्रेमळ सहवांसातील आणखी एक प्रसंग त्याला स्मरला.

: ४४० :

तो दिल्लीला जातांना मास्तरांची त्याच्याविषयींची खटपट पाहून, तो त्यांना थट्टेनें म्हणाला होता, ''माझी चित्रें जर एवढीं चांगलीं आहेत म्हणतां मास्तर, तर तीं आपोआप लोकांपुढे येतील! त्यासाठी तुमची ही म्हातारपणीं एवढी यातायात तरी कां?'' त्यावर ते तसेच नेहमींसारखे गंभीर हंसून त्याला म्हणाले होते, ''हें जाहिरातीचं युग आहे, हें विसरतां तुम्ही, ठाकूर!''

आणि मग यावरूनच, त्याच्या मनांत कल्पना आली,...मन तयार करून आपण उद्यां ही नोकरी मागावयास गेलों, तर तेथें ती मिळवण्यासाठी आपण आपली जाहिरात तरी कशी करावयाची? आपण चित्रकलेंत प्रवीण आहों, प्रदर्शनांत बक्षिसें मिळविलीं आहेत वगैरे आपण तेथें सांगितलें तरी त्यावर कोणाचा विश्‍वास नाहीं बसला तर?...त्रिनिदाद मास्तरांनी आपण होऊन दिलेलीं अनेक सर्टिफिकिटें, आर्टस्कूलचा डिप्लोमा, सारें कांहीं घरीं राहिलें होते. मग त्यांचा आतां या जरुरीच्यावेळी उपयोग तरी काय?...

इतक्यांत तो तुरुंगांत असतांना त्रिनिदाद मास्तरांनी त्याला पाठविलेल्या एका पत्राची आठवण झाली. तुरुंगांतील साऱ्या अकरा महिन्यांत अरुणनें कोणालाच पत्र लिहिलें नव्हतें. फक्त एकदांच विचारांचें गोंधळी काहूर उठल्यामुळें, त्यानें त्या दिवशीं त्रिनिदादसाहेबांना पत्र पाठविलें होतें. त्यावर पंधरा दिवसांनी त्यांचें किती प्रेमळ उत्तर आलें?..

'हो, तें बरोबरहि असेल बहुतेक आपल्या!' त्यानें आपले खिसे चाचपावयास सुरवात केली. आणि त्याच्या आंतल्या खिशांत तें पांचसहा इतर फालतु कागदांच्या घड्यांतच पडलें होतें. अत्यंत प्रेमादरानें त्यानें तें बाहेर काढलें, व एकदोनदां त्यावरून दृष्टि फिरविली.

मुंबई; ता. १५ डिसेंबर १९३०

''सन्मित्र ठाकूर,

देशासाठी तुरुंगांत असतानांहि तुम्हाला माझी आठवण झाली, हें खरोखरच माझें भाग्य!.. पण त्यावरूनच मला तुमच्या कलाप्रेमाची खरी कल्पना करतां आली; आणि म्हणूनच मी पुढील



चार ओळी लिहितो-

हातीं घेतलेल्या कोणत्याही कामांत, तुम्हाला मी सुयश चिंतितो. पण मला वाटतें, तुमच्या बाबतींत तरी या सर्व गोष्टी तात्त्कलिक स्वरूपाच्या आहेत. कारण श्रेष्ठ कलावंताची कला सर्वव्यापी असते; आणि त्यानें तात्कालिक गोष्टींत आपलें सर्वस्व घालवून चालत नाहीं. मला अभिमान वाटणारे, तुम्ही माझे एक कलावान् विद्यार्थी आहां, म्हणूनच तुम्हाला येथें हें सुचवितो. आपली वैयक्तिक प्रगति विसरूं नका! मुंबईच्या प्रदर्शनांत, दिल्लीच्या अखिल भारतीय प्रदर्शनांत तुम्हाला मिळालेलीं बक्षिसें व अत्युच्च यशें ध्यानीं आणा!..याहून उच्च यश शक्य आहे!.. या लाटांप्रमाणें सध्यां उसळत असलेल्या चळवळींत, हें सर्व तुम्हाला अगदीं कःपदार्थ वाटेल कदाचित्! पण एकाएकीं तुमच्यावर जगांत वावरण्याचा व त्याला प्रत्यक्ष तोंड देण्याचा कधी प्रसंग आला, तर मात्र तेंच तुमच्या उपयोगी पडेल हें विसरूं नका! श्रेष्ठ कलावंतहि देशसेवा करतोच!..

दुसरें काय लिहूं?.. आतां पिकलीं पानें झालेल्या आम्हां म्हाताऱ्या कलाभिमान्यांना, तुमच्यासारखी तरुण मंडळी पुढें यावीत व त्यांनी आपल्या श्रेष्ठकलेनें आम्हाला अगदीं कनिष्ठ ठरवावें,..दिपवावें, हीच इच्छा असते.

- त्रिनिदाद.''

अरुणनें तें पत्र आणखी एकदां आदरपूर्वक वाचलें व मग घडी करून आंत ठेवलें! आपल्यासाठीं त्रास होऊं नये, म्हणून सध्यां त्रिनिदादमास्तरांना प्रत्यक्ष भेटावयाचें नाहीं, हें त्यानें ठरविलेंच होतें. पण त्याला वाटलें, वेळ पडल्यास त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें या पत्राची जाहिरात करावयास कांहीं हरकत नाहीं!

आणि या विचारानें त्यानें एक समाधानाचा लांब सुस्कारा सोडला. तो जागेवरून उठला व पैसे चुकते करून बाहेर पडला.

: ४४२ :

मुंबई सारी दिव्यांनी चकाकित झाली होती ! 'पॅलेस' भोंवती नुकतेच आतां लागलेले दिवे पाहून, अरुणनें तिकडे दृष्टि टाकली! एडिकॅन्टरचें काळे तोंड व पांढरे ओठ पडद्यावर झळकत होते! आणि वर नांव लिहिलें होतें, 'हूपी'! ते शब्द त्यानें मोठ्यानें वाचले व तो स्वतःशीच पुटपुटला, ''हूपी, काय बाबा? मला अजून माझ्या जगण्याचीच व्यवस्था करायची आहे!''

आणि त्यावरूनच, दीडदोन वर्षांपूर्वी याच सिनेमाला तो अरविंदबरोबर आला होता, त्या वेळचा प्रसंग अरुणला आठवला! तेव्हां त्याला वाटत असलेली पैशाची किंमत, आतां तर जास्तच मोठी झाली होती. त्यावेळीं, फिल्म चालूं असतांना, अरविंदहि त्याच्याबरोबर अश्रू ढाळीत होता!

त्यामुळें आपल्या त्या जिवलग स्नेह्याची अरुणला एकाएकी आठवण होऊन, त्याला भेटण्याची क्षणभर त्याला अनावर इच्छा झाली. पण अरविंदला भेटणें, म्हणजे...ज्यांना आपण एकदां सोडून आलों त्या आपल्या साऱ्या माणसांत पुन्हा जाऊन पडणें! आणि ही परंपरा तर अरुणला नको होती; तेव्हां त्यानें आपल्या त्या क्षणिक मोहाला पुन्हा आळा घातला.

चतर्जीच्या सौजन्यामुळें, आपल्या निःसहाय्य परिस्थितींत, अरुणला आज तरी पुन्हा पैशांची ऊब वाटत होती!

: ४४३ :

दुसऱ्या दिवशीं साडेदहा अकरा वाजतां, लिहून घेतलेल्या पत्त्यावर जाऊन, अरुणनें तेथील व्यवस्थापकाची जेव्हां भेट घेतली व आपली तात्पुरती माहिती सांगून तेथें नोकरी करण्याची आपली इच्छा दर्शविली, तेव्हां त्याला आपल्या अपेक्षेप्रमाणेंच अनुभव आला.

अरुण गरजू असल्यामुळें, व्यापारीचित्रकलेवरील एक लांबलचक व्याख्यान त्याला ऐकावें लागलें; आणि शेवटीं, तो व्यवस्थापक त्याला इंग्रजींत म्हणाला होता, 'तुमची आमची ओळख नाहीं. तुम्ही म्हणतां त्या साऱ्या गोष्टी खऱ्याहि असतील. पण कोणातरी तज्ज्ञ जबाबदार माणसाचें जोपर्यंत तुमच्याकडे एखादें सर्टिफिकेट नाहीं, तोपर्यंत आम्हाला कांहींच खरें धरून चालतां येत नाहीं.'

त्यामुळें, आपल्या गुरुजींचें आपल्याजवळ असलेलें खाजगी पत्र अरुणनें त्याला अत्यंत नाखुषीनें दाखवलें.

त्रिनिदादमास्तरांच्या त्या पत्राचा मात्र एकदम परिणाम झाला व त्या फर्मच्या मालकानें त्याचा थोडासा गौरव करून, दुसऱ्या दिवशीं दुपारीं येऊन भेटल्यास, मामुली ट्रायल घेऊन नोकरीचें बहुतेक जमवून टाकूं, असें अरुणला सांगितलें.

त्या आशेवरच तो आज सारी दुपार एका फ्री रीडिंग रुमच्या हालमध्यें, निरनिराळ्या मासिकांची व वर्तमानपत्रांची पानें विमनस्पणें उगीचच चाळण्यांत घालवून, आतां संध्याकाळी एथें चौपाटीवर येऊन पडला होता!.. उद्यां आपल्या अपेक्षेप्रमाणें आपल्याला तेथें नोकरी मिळाली, तर आपलें हें नवें एकाकी जीवन आपल्याला सुरळीत सुरू करता येईल, या विचारानें अरुणला समाधान वाटत होतें.

समोरील अथांग सागराच्या लाटा,...क्षणभर वर चढून जवळच खळ्कन् फुटत; व पुन्हां पाण्याच्या त्या अथांग पसाऱ्यांत कोठल्या कोठें विलीन होऊन नाहींशा होत! तिकडे पाहून अरुणला वाटलें- चतर्जी, जाधव, जाई,..आपण सारीं, अशींच क्षणभर जवळ आलों..एकमेकांच्या



स्नेहाळ प्रेमाचा फेस किंचित्काळ खळाळला;..आणि आतां पुन्हां,..अनन्तकालपर्यंत त्यांच्यापासून आपण दूर झालों!..तीं आपल्या व आपण त्यांच्या आयुष्यांतून आतां बहुतेक कायमचे नाहींसे झालों!

आपल्यासारख्याला त्यांच्या आयुष्यांत चुकून स्थान मिळण्याचा संभव होता तो आतां नाहींसा झाला;..आतां आपलें एकाकी भ्रमण पुन्हां चालू होईल! हें मनांत येऊन, समाधानाचा एक मोठा सुस्कारा सोडीत, अरुण जागेवरून उठला; आणि सभोंवारच्या कोलाहलाकडे पाहात, आपलीं अस्थिर वाळूंतील पावलें टाकीत हळूंहळूं पुढे चालू लागला!

: ४४४ :

आदल्या दिवशींच्या बोलण्यांत ठरल्याप्रमाणें, अरुण आज सकाळीं अकरा वाजतां आपल्या ऑफिसमध्यें हजर राहिला होता. थोड्याच वेळांत तेथील गुजराथी म्यानेजरनें त्याला आपल्या खोलींत बोलावलें; नंतर त्याच्याबरोबर स्टूडिओच्या बाजूस चालतां चालतां मॅनेजर त्याला म्हणाला, ''तुमची कालची ट्रायल मंदीची कल्पना तो लय चांगली हाय! पण वात अशी हाय के ए चित्रमंदी बाईच्या चेहऱ्यावर तुमी जर जास्त विनय दावला हाय! ए आमाला नको पायजे! आतां तुमीच ज्यो, तुमचा ए चित्र कोइपण गिरणचे धोतरपर चिकटल तो काय होएल? अरे, अनेक जातच्या लोकचे हातामंदी ए जाणार, तवा समद्या लोकनां ते आवडल, तोच तेमदली जाहिराती कला यशस्वी! एनाकरतां ए बायचे आखमंदी, एचे पेहरावमंदी, एचे उभी ऱ्हाण्याचे ढबीमंदी, डोल्यांत भरल, एवा तद्दन मिस्किलपणा, मादकपणा, थाटमाट पायजे! ए गोष्टी तुमांला येते नाय, एवी वात नाय! पण तुमी लोकला एची खबर नाय होते. एटलेच आमां लोकला पहले सुरवातीच्या वख्ताला बोलवा पडते. धीरे धीरे, सराव होएल, तो तुमीबी ए समदा पोते पोतेच करेल!''

मन अगदी घट्ट करून, अरुण तें सारें धेडगुजरी पुराण, चालतां चालतां ऐकत होता. म्यानेजरच्या शेवटच्या वाक्यानें तर त्याला वाटलें, आपलें यापुढील सारें भवितव्यच हा सांगत आहे!.. पण आपले विचार, आपल्या आवडीनिवडी,..त्यानें आंतल्या आंत दडपल्या;..आणि तो म्यानेजरच्या मागून आपल्या कामाच्या स्टुडिओंत शिरला.

: ४४५ :

पुष्कळ स्त्रियांची व स्त्री पुरुषांची, निरनिराळ्या पोझमधील चित्रें, तेथें भिंतींवर टांगून ठेवली होतीं. एका कोपऱ्यांत दोन तीन फलक व बसावयाची स्टुलें टाकलीं होतीं. अगदी पलीकडच्या भिंतीजवळ, एक ऐसपैस कोच, एक खुर्ची, एक मोठे टीपाय, असें सर्व सामान इकडे तिकडे पडलें होतें; आणि दाराशींच, एका टेबलाजवळ, एका बाजूस दोन खुर्च्या व दुसऱ्या बाजूस पुढें मागें

झोके खाणारी, अंगाभोवती फिरणारी एक मळसूत्राची खुर्ची होती.

सगळीकडे अरुण दृष्टि फिरवित असतां, म्यानेजर त्या फिरत्या खुर्चीवर बसून समोरच्या खुर्चीकडे बोट दाखवीत त्याला म्हणाला, 'बेसा बेसा, एच तुमचा स्टुडिओ अने ऑफीस! आजेथीच कामला सुरवात करा. ए आवते सीझनमंदी आपल्याला लगबग साठ एक चित्र पुरी करायची हाय! कमजास्त घाई होएल तोपण हरकत नाय. कारण, बे गिरणची मोठी कंट्राक्ट हाय- अने दुसरी नानी मोठी सिनेमा पोस्टरची बी काम आमी तुमचेपास देएल! एवे ए ज्यो! ए फ्रेंच अने जर्मन कार्ड आमी राखली हाय! एचा बी तुमी मोप उपयोग करा! एमंदी उपयोगची तो लय मिळेल. अरे, एमंदी थोडाक इकडे तिकडे फरक करेल, अने पेहरावमंदी बदल करून आपण लोकचा-हिंदूचा करेल, तो बस! तुमचा मोप काम कमती होऊन जाएल! अने तद्दन थोडा वखतमंदी होएल! बिजुं ए छे, के आमची कंपनी, काममंदी तुमाला मदतला अने मोडेलवास्ते, आमचे पोतेचा खर्च करीने, एक 'मोडल गर्ल' तुमाला देएल! कल्पकता वापरीने तुमी चित्र काडेल तो आमाला पायजेच हाय!.. तो पण एक वात ध्यानमंदी राखा!..तुमचा समदा चित्रमंदी व्यापारी लोकला पसंत एवी झकपक खुबी अने आकर्शकता पायजे!..अने समद्यामंदी वात अशी हाय, के तुमचा काम लगबग खलास होयाला पायजे! झटपट रंगारीचाच ए समदा काम हाय,..बोलानी!..''

आपल्या शेवटच्या कोटीवर म्यानेजर बेहद्द खुश होऊन, स्वतःच मोठ्यानें हंसत हंसत जागेवरून उठला; व दाराकडे वळतां वळता म्हणाला, 'ठिक तो. हूं जाऊं छूं! अबे थोडा वखतमां मोडेल गर्ल अवी जासे!'

आपल्या कामाच्या कल्पनेनें, व म्यानेजरच्या एकंदर सूचनांनीं, अरुणची छाती अगदीं दडपलीच होती. पण तरीहि मन घट्ट करून, काय काय होतें तें पाहावयाचेंच त्यानें ठरवलें!

तसल्याच मनःस्थितींत, अरुणनें म्यानेजरला 'बरें' असें मान हालवून सांगितले; आणि तो निघून गेल्यावर, आपल्या त्या फिरत्या खुर्चीवर तो विराजमान झाला! व्यापारी चित्रकलेची त्याला कल्पना होती, पण ती स्वतःच दिवसभर करीत राहण्याचें काम, त्यानें आजच प्रथम पत्करलें होतें. केवळ मनावर ताबा मिळवून, आपल्या जडजीवाच्या स्थिरतेसाठींच तो तें काम करावयास तयार झाला होता!..

इतक्यांत, त्यांच्या मनांत विचार आला. ही 'मॉडेल गर्ल' म्हणून आपल्याबरोबर काम करणारी बाई आहे तरी कशी? कोणत्या प्रकारची? आपल्या देहाचें पैशासाठीं प्रदर्शन मांडणारी एक बाई! तिला चारित्र्याच्या दृष्टीनें विशेष ती किंमत काय असणार? आणि तिच्याबरोबर नेहमींच काम करावयाचें असलें व आपण थोडे फार भावनावश होणारे असलों, तरी तिजबरोबर वागतांना,



आपल्याला शक्य तितकें अलिप्त व कठोर राहतां येईल, खासच!...

: ४४६ :

त्याचे असले विचार चालले आहेत, तोंच कोणी तरी येत असल्याचा दाराजवळून आवाज आला; तो जागेवरून उठला व त्याची हस्तक म्हणून येणारी मॉडेल गर्ल दिसावी म्हणून तो दाराबाहेर उत्सुकतेनें पाहूं लागला.

पण त्याला आश्चर्य वाटलें! ज्या पांढऱ्या पातळांत त्याला चार दिवसांपूर्वी ती भेटली होती, तेंच पातळ नेसून, जाई त्याच्यापुढें उभी राहिली. प्रथम तो केवढ्यानें तरी दचकला. शेवटी मन स्थिर करून, जरा अडखळतच तो तिला म्हणाला, ''जाई पैऽ? तुम्ही इथं कशा?..आणि मी इकडे चित्रकाराची नोकरी पत्करली आहे, असं तुम्हाला कोणी सांगितलं?''

गेले दोन तीन दिवस, ज्याचा शोध करून करून ती निराश झाली होती, तोच अरुण समोर पाहिल्यावर, व ज्याच्यासमोर आपल्याला काम करावें लागणार तो चित्रकारही तोच आहे, हें समजतांच, जाईला मनस्वी आनंद झाला!..आणि त्याचा गांगरलेला चेहरा पाहून, ती स्वतःशीच किंचित् मोहक हंसून त्याला म्हणाली, ''असं घाबरल्यासारखं काय पाहतां माझ्याकडे अरुण?..माझीहि इथंच मॉडेल गर्ल म्हणून नेमणूक झाली आहे.''

या साऱ्याच एकंदर चमत्कारिक घटनेनें, अरुण पुन्हां एकदा मोठ्यानें दचकला, आणि त्याच्या तोंडून अत्यंत प्रयासानें शब्द बाहेर पडले.

''तुम्ही!..मॉडेल ऽ गऽर्ल??''

***

# उपकारी माणसें

# -- अभ्र-पटल --

# विभाग २ रा.

''होय अरुण, मी जाई पै!.. इथं मॉडेल गर्ल म्हणून राहिले आहे!'' जाई विनयशीलपणें भिंतीला ओडगून उभी राहिली व अरुणकडे पहात किंचित् खिन्नपणें म्हणाली, ''आश्चर्य वाटलं असेलना तुम्हांला? मलाहि समजतं अरुण, हा थोडा कनिष्ठ दर्जा आहे हें!- पण त्या पूर्वीच्या जीवनापेक्षां, हें प्रामाणिक आयुष्य जास्त चांगलं नाहीं का ठरत?''

अरुण कांहींच बोलला नाहीं-

जाईहि तशीच उभी राहून त्याच्याकडे निरखून पाहात होती!

बराच वेळ झाला तरी कोणी कांहींच बोललें नाहीं!

अरुण आपल्या खुर्चीवर बसून, टेबलावर ठेवलेल्या हातावर कपाळ टेकल्या टेकल्या विचार करीत होता!-

तो जरी स्त्रीद्वेष्टा नव्हता, तरी त्याची सध्यांची सारी धडपड स्त्रियांपासून लांब लांब राहण्याची होती! तो जरी माणूसघाण्या नव्हता, तरी त्याला सध्यां आपलें सारें सुखदुःख आपल्या एकट्यालाच भोगावयास पाहिजे होतें! आणि म्हणूनच ती आपली सारीं माणसें सोडून आला होता; भाई, जाई, जाधव यांसारखे नवीन पाशही त्यानें तत्काल तटकन् तोडण्याचा प्रयत्न केला होता!.. त्याचें जन्मतःच कलावंत हृदय बंड करीत होतें,..तरी त्यानें सारें धैर्य एकवटून, पैशाच्या अपेक्षेसाठीं आपल्या कलेचा हलका व्यापार मांडावयास,...आपलें मन तयार केलें होतें!

आणि तो आपल्या या नवीन जीवनास असल्या प्रवाहपतितपणें ही सुरवात करणार, तोंच, जिच्यापासून दूर होण्याचा त्यानें दोन दिवसांपूर्वी धीरानें प्रयत्न-निश्चय केला होता, ती जाईच पुन्हा त्याच्या आयुष्यांत अचानक अवतीर्ण झाली होती!...आणि आतां पुन्हा, त्यापुढें कामाचा सारा दिवस तिच्याच सहवासांत त्याला घालविणें जरूर होतें; या वस्तुस्थितीनें तर, अरुण जास्तच गांगरला होता.

एकदम भावनेचा भर होऊन त्याला एकदां वाटलें, ''आपण ही नोकरी आतांच्या आतां



सोडूनच द्यावी!..आपलं वेडं मन पुन्हां कशा प्रकारच्या गटंगळ्या खाईल, याची प्रचीति घ्यायचं साहस करण्यात अर्थ नाहीं!..''

: ४४८ :

क्षणभर असल्याच विचारानें भारावून जाऊन, अरुण जाग्यावरून उठला व इकडे तिकडे मुग्धपणें फिरत राहिला.

इतक्यांत, ती स्तब्धता असह्य होऊन, शेवटीं, प्रथम जाईच त्याला प्रेमळपणें म्हणाली, ''अरुण, कोठें हो गेलां होतां, असं आम्हाला फसवून, एकाएकीं? याच नोकरीसाठी तुमच्याकरतां खटपट करून, परवां संबंध दिवस आणि सकाळीं, मी किती वणवण फिरले!..पण मग या गजबजलेल्या अफाट मुंबईत मला तुमचा पत्ताच लागेना. अगदीं निराश झाल्यावर, शेवटीं आज मन पूर्ण घट्ट केलें, आणि या नोकरीवर रुजू व्हावयास आले. त्यावेळीं, माझ्या मनांत विचार येत होते,..आतां कोणत्या प्रकारच्या चित्रकाराशीं आपली गांठ व्हायची आहे कोणास ठाऊक! आणि त्याचवेळीं, तुम्ही कदाचित् तसेंच कोठेंतरी रस्त्यांतून भटकत असाल, या विचारानेंहि माझं मन अगदीं रंजीस झालं होतं. पण मग, ...आतां माझ्या वाट्याला आलेले चित्रकार म्हणून तुम्हीं स्वतःच इथं भेटतां! किती चमत्कारिक! नाहीं? आता बरं झालं बाई! अकल्पित का होईना, तुमची अशी पुन्हा भेट तरी झाली! आतां कीं नई, माझा जीव कसा खालीं पडल्यासारखं वाटतं आहे मला! - पण संध्याकाळीं बोलूं आपण सगळं! आतां कामाला लागायचं नां?''

जाईच्या बोलण्यांत अकृत्रिम आनंद, प्रेम, मोकळेपणा, उत्साह,...सारें कांहीं तुडुंब भरलें आहे हें अरुणला चटकन् दिसून आलें; आणि त्यामुळें त्याचे विचार पुन्हा एकदम दबले. त्याला वाटलें,..''जी जाई अकल्पितपणें पुन्हा एकदां भेटते,.. तिला आतां सोडून जाऊन आपल्या भवितव्यावर व तिच्या साऱ्या उत्साहावर असं पाणी टाकणं मूर्खपणाचंच ठरेल!..''

शिवाय, त्या कंपनीशीं त्याचें कॉंट्रॅक्टहि झालें होतें. 'जाई आणि मॉडेल गर्ल' या कल्पनेनें तो प्रथम दचकला होता खरा,.. पण मग विचार करतां करतां त्याला वाटलें, ''त्या प्रामाणिक पण असहाय मुलीला, पुढल्या जास्त चांगल्या भवितव्याचा मधला टप्पा म्हणून, परिस्थितीशीं झगडतांना असलं काम मनाविरुद्धच स्वीकारावं लागत आहे! हें चमत्कारिक असलं, तरी त्यांत वावगं काय आह? आपणही तसल्याच परिस्थितींत इथं येऊन पडलों आहों! आणि योगायोगानें, ती ज्याच्यापुढें मॉडेल गर्ल म्हणून काम करणार त्या चित्रकाराचं कामहि आपल्याकडेच आहे. कदाचित् हीनवृत्तीच्या दुसऱ्या एखाद्या चित्रकारापुढें तिला काम करावयास बसण्याची पाळी येण्याऐवजीं, अघटित घटनेनें आपल्याशींच तिचा संबंध येत आहे! यांत ढवळाढवळ करायला आपल्याला तरी काय अधिकार?

हो खरंच...आपण फारतर जगांत वावरतांना जास्त कठोर व्हावं. पण तेवढ्यासाठीं, जाईला सर्वच दृष्टिनें आतांपेक्षा जास्त दु:खी करण्याचा, आपल्याला कांहीं अधिकार पोचत नाहीं!''

: ४४९ :

असल्याच विचारांत बराच वेळ मुग्धपणें घालवल्यावर, कसलासा ठाम निश्चय करून, जाईकडे थोड्याशा स्नेहभावानें पहात, अरुण तिला म्हणाला, ''हें पाहा, तुम्हीं इथं बसा! तुम्हाला सोडून आलो तेव्हां तुम्हीं मला पुन्हां अशा कधीं भेटाल, ही मला कल्पनाहि नव्हती, पण आपण आज असे अकल्पितपणें एकाएकीं पुन्हां भेटलों. आणि म्हणूनच मी अतिशय गांगरलो आहे. तुम्हीं माझ्यासाठीं आपुलकीनें खटपट केलीत, याबद्दल मी तुमचा फार आभारी आहे; पण या जागेसाठीं मीहि दोन तीन दिवस खटपट केली तेव्हां यशस्वी झालो. आतां एका कंपनीचे आपण दोघे नोकर म्हणून अनपेक्षितपणें जवळ जवळ आलों आहों. तेंच नातं कायम ठेवूंया!..कृपा करून मागलं सगळं विसरा; आणि बरोबर वागतांना माझ्यामध्यें पूर्वीपेक्षां जास्त कठोरपणा दिसला, तर मला मोकळ्या मनानें क्षमा करा. मला माझें असें, अगदीं एकाकी जीवन कंठण्याचा प्रयत्न करावयाचा आहे,..यापुढं!''

जाईचा चेहरा खिन्न झाला होता; आपल्या अश्रु भरलेल्या नेत्रांनीं ती अरुणकडे पाहात राहिली. गळा दाटला असल्यामुळें, ती कांहींच बोलली नाहीं! तिनें नुसती मान हालवून म्हटलें- 'बरं!'

: ४५० :

संध्याकाळी जाई कामावरून निघाली व जाधवांच्या घराकडे जाण्यासाठीं ट्राममध्यें बसली. तेव्हां तिला मधून मधून रडूं आल्यासारखें वाटे. तिच्या मनांतील त्यावेळचे भावनांचे आवेग इतके उत्कट होते, कीं मध्येंच दचकून भानावर आल्यावर तिला क्षणभर वाटलें, आपल्या भोवतालीं बसलेले हे लोक, आपल्या या हालचालीकडे कुतूहलानें पाहात आहेत कीं काय!..

पण ट्राम जशी आपल्या रुळावरून पुढें चालली होती,...ड्रायव्हर जसा आपल्याच जागेवर उभे राहून, गाडी सारखी हांकीत होता,...बाहेरच्या दोन्ही बाजूच्या मोटारी व व्हिक्टोरिया जशा आपापल्या स्थानाकडे आणि आपापल्या दिशेने मार्ग आक्रमित होत्या,...तसेंच तिच्या भोवताली बसलेले लोकहि, आपापल्याच सुखदु:खांत रममाण होऊन बोलत बसले होते, उतरत व चढत होते. जाईकडे कोणाचें विशेष लक्षहि नव्हतें!..

आणि मग त्या जाणिवेनें तिला क्षणभर समाधानच वाटलें!..

'गेले दोन दिवस, ज्यांना भेटावयाची इच्छा मनांत सतत बाळगून, आपण मोठ्या आशेनें



इकडे तिकडे फिरत होतों, तेच अरुण आज आपल्याला एकाएकीं भेटलें; एवढेंच नव्हे, तर तेच आपले चित्रकार ठरले; त्यांच्याशीं वागण्यांतच आपलं सध्याचं भवितव्य समाविष्ट आहे!' या कल्पनेनें जाईला जितका आनंद वाटत होता, तितकाच त्यांच्या आजच्या साऱ्या दिवसांतील कांहींशा कठोर व बेफिकीर वागणुकीनें, तिचें मन अत्यंत दु:खी;... उद्विग्न होत होतें!...

'ज्या अरुणांनी आपल्याला त्या दिवशीं रात्रीं आपल्या असहाय स्थितींत हात दिला, चतर्जींच्या कांहींशा कठोर वागणुकीलाहि न जुमानतां, आपल्याला प्रेमळ आसरा दिला;...त्यानंतरच्या लहानशा सहवासांत जे आपल्याबरोबर अत्यंत हळुवार प्रेमळपणानें वागले,..तेच अरुण आपली आयुष्यें योगायोगानें पण सहजासहजीं अशीं निगडित झालीं हें पाहून, एकाएकीं असे कठोर कां झाले?...ते मात्र तिला विचार करूनही मुळींच समजेना!

: ४५१ :

अरुण तिला भेटला त्यापूर्वीच्या त्याच्या आयुष्याची, तिला कांहींच कल्पना नव्हती. पण तिचें मन तिला ग्वाही देत होतें, कीं त्याच्यासारखा प्रेमळ मनाचा मनुष्य, निराळें म्हणजे तरी काय करणार? कोणत्याही दुष्ट घटनांना तर त्यांत खासच थारा मिळालेला नसेल!..मग असें कां?

केवळ मनाला पडलेल्या असल्या कोड्यामुळें मात्र, तिला तें जाणण्याची मधून मधून इच्छा होई!..तरी पण कांहीं कां असेना आज त्याला तिचा स्नेह वाढविण्याची मुळींच इच्छा नव्हती!.. तिच्याच कीं दुसऱ्या कोणत्याहि स्त्रीचा?...

पण अरुणला कोणाचाच स्नेहपाश न वाढवतां, कोणत्याही कारणामुळें का असेना, एकाकी जीवन कंठण्याची उच्छा होती, हें तिला स्पष्टच दिसत होतें! तिच्या हळव्या मनाला, स्वत:च्या बाबतींत मात्र तें अशक्य वाटत होतें. त्यामुळें तिला वाटे, 'सुदैवानें अरुणांचा सहवास वाढण्याचा, स्नेह वृद्धिंगत करण्याचा,.. आपल्या आयुष्यांत आलेला हा योग!..तो कांहींसा चमत्कारिक अकल्पित असला आणि त्यामुळें अरुण स्वत: गांगरून गेलेले दिसत असले, तरी आपल्याला त्यांच्याबरोबर त्याच पूर्वीच्या प्रेमळपणानें वागतां कां येऊं नये? तसा आपल्याला अधिकारच नाहीं का कांहीं?'

उलट तिला दुसरेंहि वाटे,..'आज आपण या नव्या आयुष्यक्रमानें स्वत: पुन्हां जगात स्थिर होऊं लागलों असलों तरी आपल्या भोंवतालचं वातावरण अजून निष्प्रेम एकाकी असंच आहे!'

आणि म्हणूनच, तिच्या जात्या प्रेमळ अंत:करणाला सात्त्विक प्रेमाची उत्कट तहान लागली होती!

: ४५२ :

जुन्या आयुष्यांतून मिरा तेवढीच तिला आपली अशी वाटे!...

आणि या नव्या आयुष्यांत?...

जाधव कुटुंबाच्या प्रेमाचा आसरा तिनें संपादन केला होता! गोपाच्या आईला तर सध्यां जाईच्या आयुष्यांत, तिच्या प्रत्यक्ष आईचेंच स्थान मिळालें होतें. चार दिवसांतच, जाधवबाबांकडे ती पितृवात्सल्यानें पाहूं लागली होती!

पण त्यांच्याशी तिचा संबंध आणणारा अरुण!..त्याच्याविषयीं, जाई जों जों जास्त विचार करूं लागे, तों तों तिला तो आपल्या प्रेमळस्वभावामुळें जास्त जवळ जवळ आकर्षूं लागे!...

तिच्या आयुष्यांत तो एकाएकीं आला, एकाएकीं नाहींसा झाला; आणि आतां तर पुन्हा एकाएकीं कांहीं काळ तरी चिरसहवासासाठींच भेटला!...या घटनेंत तिचें आशावंत हृदय जितकें जितकें खोल शिरूं लागे, तितकें तितकें तिला वाटे, कीं त्याच्या मोकळ्या सहवासाचा, त्याच्या जिव्हाळ्याच्या स्नेहाचा, तिला खासच एक प्रकारचा हक्क आहे!..पण मग तिला त्याची आजची पूर्णपणें आपल्याविषयींच्या परकेपणाची,...बेफिकिरीची वागणूक आठवून अगदीं विरस झाल्यासारखें होई. आणि शेवटीं त्याच्या तसल्या बदललेल्या वागणुकीचा कांहीं तरी ताळा घालण्याचा प्रयत्न करून, ती आपल्या मनाचें समाधान करण्याची धडपड करी!..कसल्या तरी चमत्कारिक मनःस्थितीमुळें,..आपण केवळ एक तरुण स्त्री आहों म्हणूनच,..आपल्यापासून अरुण लांब लांब राहूं पाहात आहे, हें तिनें मनांत ओळखलें होतें.

आणि म्हणूनच, शेवटीं तिनें मनाशीं विचार केला, 'अरुणसारखी माणसें लहरी असतात. त्यांच्या हृदयसागरांत होणाऱ्या असल्या तुफानांना, त्यांच्या कलाप्रमाणें वागून शांत होऊं देणें, हेंच जास्त श्रेयस्कर!..'

या विचारसरणीनें जाईच्या मनाला बरेंचसें समाधान वाटले!..अरुणच्या जिव्हाळ्याच्या स्नेहाचा आसरा अगर त्याची वृद्धि, याचा सध्यां तरी लाभ होणें, तिला शक्य वाटलें नाहीं. पण मग,..आपल्या मनाची तिनें समजूत केली, 'आपण त्याच्या कठोरपणाकडे न पाहतां,..या वरवरच राख असलेल्या जळजळत्या अग्नीला फुंकर न घालतां,..मिळेल तितकींच ऊब घेऊन, आपल्या मनाचं समाधान करीत त्यांच्या सहवासांत वागावं!..'

: ४५३ :

अरुणानंतर..आपलें सारें आयुष्य समजल्यावरहि, तितकेंच निरपेक्ष प्रेम करणारी, आपल्या स्वतःचीच आई वाटणारी, गोपाची आई तिला आठवली. आपल्या दुःखानें दुःखी होणाऱ्या तिच्या मनाची, गेल्या दोन दिवसांतील धडपड, जाईसमोर उभी राहिली;..आणि तिच्याविषयींच्या प्रेमानें जाईचें अंतःकरण उचंबळलें.

वास्तविक, जुन्या पिढींत मोडणारी प्रौढ बाई ती!..आपल्यासारख्या एखाद्या सुंदर मुलीनें, एखाद्या चित्रकारापुढें तो सांगेल तसें बसून, आपल्या शरीराचें सतत प्रदर्शन मांडावयाची नोकरी पत्करल्याचें ऐकून, आपल्याविषयीं तिला एकदम तिटकाराच वाटावयास पाहिजे होता! पण किती विस्तृत दृष्टीनें जगाकडे व त्याच्या व्यवहारांकडे पाहणारी ती बाई ! त्यावर जाईला ती आपुलकीनें म्हणाली होती, 'जाई, वेडे त्यांत गांगरण्यासारखं ग काय आहे? वेळ पडेल तसं सर्व करायला पाहिजे! आपलं मन शुद्ध असल्यावर, कोणतेंहि प्रामाणिक काम करतांना लाजावयास नको कांहीं!'

अगदी हेच तिचे शब्द! नवीनच झालेली ओळख, पण जाईविषयींचा तिचा केवढा हा विश्वास! त्यानंतरचेंहि सारें जाईला आठवलें.

आपण जेव्हां, आपल्या हातीं पहिल्या दिवशीं आलेले पैसे तिजकडे नेऊन दिले, तेव्हां ती किती भांबावली,..आपल्यावर थोडा वेळ कशी रागावली; पण त्यावर आपण जेव्हां म्हटलें, 'आई, तूं मला आपल्या घरांतली,..आपली लेकच समजतेस ना? मग आतां हा असा पैशांच्या बाबतींतच तेवढा दुजाभाव कां ग?..' तेव्हां तिनें आपल्याला जवळ ओढलें होतें; व आपल्याला कुरवाळीत किंचित् स्मित करून म्हटलें होतें, 'जाई, मनाला लावून घेऊं नकोस पोरी! नेहमीं चांगल्या माणसांनाच कसोटीला जास्त उतरावं लागतं,..हें लक्षांत ठेव!..'

आणि तिनें हंसत हंसत नोटा ठेवून, आपल्याकडे सुटे पैसे देत, 'हें तुला खर्चासाठीं ठेव' असें म्हटलें, त्यावेळीं आपल्याला किती आनंद वाटला होता! ज्या घरासाठीं आपण वणवण फिरत होतों, तें घर आपल्याला लाभलें,..या विचारानें आपलें दुःखी मन त्यावेळीं एकदम किती शांत झालें?...

जाईला आतां तें सारें आठवून, तिच्या अंगावर त्याच भावनांनीं रोमांच उभे राहिले!

नव्या कामासाठीं, म्हातारपणीं वणवण करून सारखी धडपड करणारे जाधवबाबाहि अगदीं धीरानें वागत;..आणि आपल्या तसल्या मनःस्थितींतदेखील जाईबरोबर मोकळ्या मनानें प्रेमळ शब्दांत बोलत!..तें जाईला आठवतांच, तिच्या प्रफुल्ल मनांत पुन्हा दोन दिवसांपूर्वींचीच कल्पना आली,...'खरंच हीं अगदीं सदाफुलीचींच फुलं!...'

: ४५४ :

ट्रॅममधून उतरूनं रस्त्यानें आंत आत येत, जाई शेवटीं घराजवळ पोचली. जाधवबाबा व गोपा जेवणासाठीं तिची वाट पाहात बसले होते. तीहि पटकन् हातपाय धुऊन पाटावर जाऊन बसली.

वाढतां वाढतां गोपाच्या आईनें विचारलें, 'काय ग जाई, आज तरी अरुण भेटले का?'

'हो,' ती म्हणाली व आश्चर्यचकित जाधवबाबांकडे व आईकडे पाहून तिनें त्यांना थोडक्यांत सारी हकीकत सांगितली.

नंतर थोडा वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं!...

''मग उद्यां जाऊन त्यांना भेटलं तर नाहीं का व्हायचं?..''शेवटीं दुसरा भात वाढतां वाढतां, हळूच वर पाहात, गोपाच्या आईनें जाधवबाबांना विनयानेंच सुचविलें.

''खरंऽच!-'' जाईहि त्या नव्या आशेनें उत्साहित होऊन, हातांतला घास तासच हातांत ठेवीत, जाधवबाबांकडे प्रेमानें पाहून म्हणाली, ''तुम्ही याल कां बाबा,..माझ्याबरोबर उद्यां त्यांना कांहींतरी सांगायला?''

जाधवबाबा त्यावर आतां काय म्हणतात तें ऐकावयास, जाई व आई उत्सुकतेनें त्यांच्याचकडे पहात राहिल्या; पण तरी थोडा वेळ ते कांहींच बोलले नाहींत!

नंतर दोघांकडे पाहात, जाधवबाबा हंसून म्हणाले, ''जाई अजून तरुणच आहे म्हणा!...पण तूं मात्र,..पंचवीस वर्षांपूर्वी होतीस तशीच राहिली आहेस बरं कां? तुम्ही बायका ह्या अशाच! वर्षे गेलीं तरी तुमच्या स्वभावांत फरक नाहीं पडायचा काहीं!...''

आणि ते किंचित् थांबून, पुन्हा दोघींकडे एकदां प्रेमळपणें पहात जाईला म्हणाले, ''जाई, थोडं धीरानं घ्यायला पाहिजे. प्रत्येक प्रामाणिक व ध्येयवादी मनुष्याच्या आयुष्यांत असाच एक काळ येत असतो!..त्यावेळीं त्याच्याच कलानें सारं होऊं देणं जरूर असतं. अरुण येथून मुद्दाम निघून गेले हें माहीत असतांना, उद्यां त्यांना मी भेटून काय होणार, सांग बरं?..यावेळीं ते पुन्हा भेटले एवढ्यावरच समाधान मानून, उलट तूंहि त्यांच्याबरोबर सावधगिरीनें वागावयास पाहिजेस, मला वाटतं!...''

बाबांच्या या गंभीर वाक्यांनी त्या दोघीहि गप्प राहिल्या!...त्यांच्या त्या विचारी उद्गारांतून मनाला विश्वासानें नवा धीर आणीत जाई जेवून उठली; आणि तिनें आपल्या समाधानासाठीं बऱ्याच दिवसांनी मिरेला पत्र लिहावयास घेतलें.

: ४५५ :

गड्यानें आणून ठेवलेल्या डब्यांतील जेवण भरभर संपवून अरुण उठला,..व सुपारीचें खांड तोंडांत टाकून तो बाहेरच्या खोलींत आला!-

सव्वा दहा झाले होते. त्यानें घाईघाईनें कपडे अंगावर चढवले व खोलीला कुलूप घालून, तो जिना इतरूं लागला. इतक्यांत पोष्टमननें एक पाकीट त्याच्या हातीं आणून दिलें.



'आपल्याला पत्र!..आणि कोणाचं?..आपला पत्ता कोणाला समजला कीं काय?' या विचारानें त्यानें घाबरल्या मुद्रेनें पाकिटाकडे पाहिलें;..तों त्यावर तांबड्या शाईची बरीच खोडाखोड होती, चौफेर पोस्टाचे शिक्के होते, व शेवटीं पोस्टमननें किरट्या अक्षरांत पेन्सिलीनें लिहिलें होतें- 'मालक मिळत नाहीं; सबब परत.'

त्यामुळें मात्र त्याला त्यांतल्यात्यांत थोडें हायसें वाटलें! कोणाला पत्ता मिळाला या अकारण भीतीचें हसूंहि आलें. तें स्वतःच लिहून बंद केलेलें पत्र, आतां परत आल्यामुळें स्वतःच पुनः फोडून उघडीत उघडीत, अरुण जिना उतरून खालीं आला; व पत्राकडे पहात आपल्याशींच म्हणाला,..'सांपडत नाहींत तर मग गेले तरी कोठें भाईऽ?'

पंधरा दिवसापूर्वी त्यानें लिहिलेली ती छोटी चिठी बाहेर काढून, वाचत वाचत तो रस्ता चालूं लागला.

बटाट्याची चाळ, भुलेश्वर
मुंबई, ४ जून १९३१.

''प्रिय भाई,

तुमच्याकडून निघाल्यावर निरनिराळ्या प्रसंगांतून वाट काढीत, शेवटीं आतां एका नोकरींत शिरलो आहे. तुमची मदत अमूल्य व निरपेक्ष होती खरी, पण आतां मी थोडा फार समर्थ झालो असांना तिची अंशतः तरी परतफेड करणें योग्य होईल! नव्हे का? कशी व केव्हां करूं? पत्रोत्तर वरील पत्त्यावर जरूर यावें. लोभ असावा.

आपला
अरुण ठाकूर.''

त्यानें खिन्नपणें एक निःश्वास टाकला व पत्राची घडी करून ते मुग्धपणेंच खिशांत टाकलें-

चतर्जी भेटला नाहीं, पण भाईंचा पत्ता त्याला ठाऊक होता; म्हणून नोकरी लागतांच, प्रथम त्यानें त्यांना तें पत्र लिहिलें होतें. तें गेलें तसेच आज परत आलेलें पाहून, त्याला थोडें वाईट वाटल्यावाचून राहिलें नाहीं!

ट्रामची वाट पाहात रस्त्यांत असें उभे असतांना, त्याच्या मनांत भाईच्या सहवासांतील कित्येक प्रसंग अगदीं सहजासहजी येऊन गेले.

: ४५६ :

त्याचे गेले कित्येक दिवस असेच जात होते. सकाळीं थोडें उशीरा उठावें, नंतर स्नान, गड्यानें

आणलेला डबा, ट्रॅम, ऑफीस, हातीं घेतलेल्या एखाद्या चित्राचें पुढलें काम, संध्याकाळीं एकाद्या लांबच्या रस्त्यानें भटकत भटकत घरीं, रात्रीचें जेवण आणि त्यानंतर तसेच कॉटवर पडणें...झालें, संपला दिवस!

त्याच्या आयुष्याला पूर्वीपेक्षां कितीतरी यांत्रिकता आली होती!

असलेच कांहींतरी विचार करीत, फ्लोराफाउन्टनला तो ट्रॅममधून उतरला आणि झपझप चालत त्यानें ऑफीस गांठलें!

जाई त्याच्या आधींच येऊन, कांहींतरी वाचत कोचावर बसली होती. त्याला आलेला पाहतांच, ती हंसून उभी राहिली. तिनें अर्धवट झालेल्या चित्राचा फलक व स्टूल, तो नेहमीं बसे त्या ठिकाणीं ओढलें,.. आणि कांहीं न बोलतां, आदल्या दिवशीं बसली होती त्या पोझमध्यें, ती अरुणच्या समोर मुकाट्यानें येऊन बसली.

अरुणनें आपला कोट काढून ठेवला; जाईला वाईट वाटूं नये, म्हणून किंचित् कृत्रिम हास्य चेहऱ्यावर आणून, तो स्टूलाजवळ गेला. हातांत प्यालेट व कुंचले घेऊन तेथें बसल्यावर, पहातो तों, त्यानें काल सांगितली होती तशी पोझ घेऊन, जाई समोर बसली होती; आणि मधून मधून त्याच्याकडे पाहात होती.

रंग तयार करून, अरुण आपल्या समोरच्या चित्रांतील स्त्रीच्या डोळ्यांना फिनिशिंग टचेस् देत होता. त्यावेळीं, म्यानेजरच्या त्या दिवशी संध्याकाळीं सांगितलेल्या सूचना, त्याच्यापुढें उभ्या राहिल्या. चित्रांच्या डोळ्यांत जी थोडीशी विलासी छटा रंगवण्याविषयीं, त्याला सांगितलें गेलें होतें,..तें कांहीं त्याला जाईच्या डोळ्यांतून मिळेना!..

'जरा या बाजूला डोळे फिरवाल कां? हं, काल सांगितलं तसंच! आपल्या हातांतील त्या तेलाच्या बाटलीकडे व तुमच्या खांद्यावरून पुढें सुटणाऱ्या तुमच्या केसांकडे..थोडं हंसून पाहा!' शेवटीं किंचित् अडखळतच,..अरुणनें तिला सूचना केली.

पण मग त्याला वाटलें, ''काय हा आपला मूर्खपणा! जे भाव चित्रांत पाहिजे आहेत,..ते मुळांत मॉडेलमध्येंच नसले, तिच्या वृत्तीलाच ते परके असले,..तर ते असल्या खटपटीनें चित्रांत तरी आणतां कसे येणार?..''

आपण दोन दिवस या डोळ्यांसाठीं धडपडत आहों,..पण ते कांहीं आपल्याला साधत नाहीं!..यांत दोष कोणाचा? जाईचा?..आपला?..

छे, तिच्यासारख्या सुंदर मुलीचा असला उपयोग करून घेणं,..आणि एवढ्या यातायातीनंतर असली फक्त हीन कलाकृति निर्माण करणं,..हाच मुळी कलेचा अपमान आहे. जाईला ज्या भावना



परक्या आहेत, त्या तिच्या निरनिराळ्या अवयवांत तिला प्रतीत करावयास लावणं,..हा आपला व म्यानेजरचा केवळ अट्टाहासच आहे!..आणि हें जे आपण सारं करीत आहों, त्यांत आपल्याला तरी आनंद किंवा समाधान मिळण्याची आशा आहे का?..जाई काय, आपण काय...दोघेहि,...दुसऱ्याच कसल्या तरी आशेनें आपल्या परिस्थितीला तोंड देत आहों, एवढंच!...''

: ४५७ :

आणि या विचारमालिकेमुळें,.. मधून मधून जाईला होणाऱ्या डोळ्याविषयींच्या,.. बसण्याचा ढबीविषयींच्या,..आपल्या असल्या सूचना अरुणला मूर्खपणाच्या वाटल्या व शेवटीं तो चित्रांतील केसांकडे वळला!

पोझसाठीं सुट्या सोडलेल्या, वाऱ्यानें भुरभुरणाऱ्या जाईच्या केसांकडे पाहून त्याच्या मनांत पुन्हा विचार आला, '' किती सुंदर केस आहेत हिचे! पण,..बाटलींतील तेलाचा नसलेला गुण दाखविण्यासाठीं, म्यानेजरच्या सांगण्यावरून ते चमत्कारिकपणें तिच्या छातीवर आणून सोडावे लागले आहेत!..जाईचा पदर थोडासा बाजूस सारावा लागला आहे,...तिचा गौरवर्ण गळा बराच उघडा टाकावा लागला आहे!...''

त्या साऱ्या उपायांनीं, मॅनेजरनें समजावून सांगितलेली मादकता येत होती खरी; पण तो जाईचा तरी धडधडीत अपमानच होता!... अपमान कसा? ती त्यासाठीं मोबदला घेत नव्हती का? पण त्यामुळेंच तर त्याला तें विशेष जाचत होतें!..एखाद्या उत्कृष्ट कलाकृतीसाठीं, तिच्या पोषाखांत, तिच्या बैठकींत, कमीजास्त फेरफार करण्यांत, त्याला वैषम्य अगर तिचा कमीपणा वाटला नसता!..पण ज्या एका विकाऊ व्यापारी चित्रासाठीं, तिच्या सुंदर देहयष्टीचें असलें वेडेंवाकडें प्रदर्शन मांडलें जात होते,..हो, आणि त्याच्या कलेची मारूनमुटकून होणारी नाखुषीची धडपड चालली होती,..त्यांतच त्याला तिच्या परिस्थितीचा अगर सौजन्याचा फायदा घेऊन चाललेला तिचा अपमान,..व दोघांचाहि एक प्रकारचा अधःपात वाटत होता!..

पण असल्या विचारांना बळेंच आळा बसवून, कांटेरी म्हणा किंवा त्याला आज जरूर वाटणारी रुपेरी म्हणा,...त्यानें कुंपणें घालीत आणली होतीं!..आणि म्हणूनच हें सारें विचार पुन्हा बाजूस सारून, तो आपलें कामहि शक्य तितक्या घाईघाईंने संपवीत होता!...

: ४५८ :

त्यानें पुन्हां एकदां समोरच्या चित्रामधील डोळ्यांवरून कुंचला फिरवावयास घेतला. तो जाईला कांहीं न सांगतांच तिच्या डोळ्याच्या रचनेकडे व त्यावरील छायाप्रकाशाकडे निरखून पाहूं लागला!

तिला सांगितलेली दृष्टि मधून मधून बदलून, तीहि त्याच्याकडे पहात होती. खोलींत अगदीं

शांतता पसरली होती. आणि त्या जाणिवेनें व जाईच्या चेहऱ्यावरील निष्पाप प्रेमळ भाव प्रतीत होऊन,..अरुणच्या मनांत, त्या तसल्या बेफिकीर मनोवृत्तींतहि, आपल्या तिजबरोबरच्या अगदीं कठोर वागणुकीविषयींचे विचार एकदम गर्दी करून आले!

जाईची त्याला विशेष माहिति नव्हती खरी! पण तिच्या डोळ्यांतील नैसगिर्क सौजन्य, तिचा नेहमीं दिसून येणारा निष्कलंक व प्रेमळ चेहरा, साधारणपणें साध्या राहणीची तिला असलेली आवड,..या साऱ्या गोष्टींचा, प्रथम भेटीपासूनच, त्याच्या मनावर अतिशय अनुकूल परिणाम झाला होता. आणि त्यानंतरच्या तिच्या सहवासांतील सारे प्रसंग, तिच्याविषयीं झालेल्या या चांगल्या ग्रहाला सर्व दृष्टीनें पोषकच ठरले होते!

पण तरी त्याच्या त्यानंतरच्या एकंदर वागणुकींतील वाढलेली बेफिकिरी व कठोरता! तिच्या प्रथमपासूनच्याच प्रेमळवृत्तींत त्यामुळें देखील किंचित् सुद्धा फरक झाल्याचें दिसत नव्हतें! त्याला त्रास होऊ नये म्हणून ती अगदीं जरूर तेव्हांच काय तें त्याच्याशीं बोले. पण एरव्ही, त्याच्या हाताखालची दुय्यम, या दृष्टीनेंच ती उघड उघड कृत्रिम दिसत असलेल्या परकेपणानें वागे!..

त्याच्या सूचनांच्या बाबतींतील, स्वतः त्रास सोसूनहि होत असलेला हा तिचा आज्ञाधारकपणा, त्याला शेवटीं मनांतल्या मनांत जास्तच जाचू लागला व मग त्याला वाटलें, ''छे, आपण तिजबरोबर उगीचच कठोरपणें वागतो!..''

: ४५९ :

याचवेळीं त्याचे हातांतील काम संपलें. त्याला वाटलें, आज आपणच तिला कांहींतरी बोलण्यास संधि करून द्यावी. आणि म्हणून तो म्हणाला, ''हं!..आपलं हें चित्रं संपलं, मिस् पै!..त्यापुढलं उद्या!.. आतां आज तुम्हाला मोकळीक आहे जायला घरीं!..उद्यां नेहमीच्या वेळेपेक्षां थोडं लौकर या मात्र!''

जाई आपल्या आखडलेल्या अंगाला मोकळेपणें आळेपिळे देत उठली! त्यावेळीं ती अतिशय मोहक दिसत होती. पण अरुणनें तिजकडे ओझरती दृष्टि टाकून, पुन्हा तो निर्विकार चेहऱ्यानें खालीं पाहूं लागला. शेवटीं, त्याच्याकडे तिच्या नेहमींच्याच बोलक्या प्रेमळ डोळ्यांनी पहात जाई म्हणाली, ''मला आज घरीं जायची मोकळीक असली,..तरी इथंच बसून थोडा वेळ वाचायला आहेना परवानगी तुमची?''

''हो हो!'' अरुण थोड्या आश्चर्यानेंच, पण निर्विकार चेहरा कायम ठेवून म्हणाला, ''पण काम नाहीं आतां संध्याकाळपर्यंत!..मग कां बसतां इथं?''

''खरं सांगूं कीं खोटं?'' जाई पुन्हां हंसून म्हणाली.



''खरं सांगा कीं!'' अरुणहि स्मित करीत म्हणाला.

''तुमच्या अबोल का होईना, सहवासासाठीं!..'' जाई त्या प्रेमळ शब्दांत तिचें हृदयच ओतीत होती. त्यामुळें अरुण मात्र एकदम चपापला. आपल्या साऱ्या बेफिकीर वागणुकीचा, या प्रेमळ मुलीवर कांहींच परिणाम होत नाहीं, याचें त्याला फार आश्चर्य वाटत होतें.

तो त्यावर कांहींच बोलला नाहीं; व किंचित् त्राग्यानेंच, मॅनेजरच्या इच्छेप्रमाणें एका इंग्रजी कार्डाला हिंदी पोषाख चढविण्यासाठीं, त्यानें तयारी सुरूं केली.

जाईनेंहि मुग्धपणेंच टेबलाजवळील एक खुर्ची भिंतीजवळ ओढून घेतली व तिच्यावर मागें रेलून, ती वाचीत बसली.

तसल्या मुक्या सहवासांतहि, जाईला अतिशय आनंद वाटत होता; आणि त्यामुळेंच, हातानें काम करीत असूनहि, अरुण मात्र जास्त जास्त अस्वस्थचित्त व खिन्न होत होता.

: ४६० :

जवळ जवळ दोन तास असे गेले असतील. मधून मधून जाईकडे अरुण वळून पाही. पण ती मात्र वाचनांतच गर्क होती;..निदान तसे ती दाखवी. अरुणला तिच्या तसल्या मुग्धतेचें आश्चर्य वाटलें;..तिच्या त्या सहनशीलतेमुळें, क्षणभरच तिजविषयींच्या स्नेहात्मक आपुलकी वाटली;..तिच्या चिकाटीची मौज वाटली;..आणि आपल्या तिजविषयींच्या एकंदर बेफिकिरीमुळें दुःख झालें.

तिनें एक पुस्तक बाजूस टाकून दुसरें जेव्हां हातीं घेतलें, तेव्हां मात्र त्याला आपल्याच कठोर मुग्धतेचा संताप आला. पण आणखी थोडा वेळ गेला तरी तो स्तब्धच होता. शेवटीं, त्याची जाण्याची वेळ होत आली, तसें त्यानें आपले कुंचले वगैरे गोळा केले,..आणि उठतां उठतां थोडें हंसून तो जाईला म्हणाला, ''इतकं काय महत्त्वाचं वाचतां आहां,..त्यांत गुंग होण्यासारखं?..''

त्याच्या या शेवटच्या हालचालींकडे व शब्दांकडे जाईचें लक्ष होतेंच. तरी ती वाचनांत गढल्यासारखेंच करून राहिली.

अरुणला वाटलें, तिनें आपला प्रश्न ऐकला नसावा. म्हणून त्यानें कोट चढवता चढवतां पुन्हा म्हटलें, ''तुम्ही वाचतांहां तरी काय एवढं?..घरीं जाणार नाहीं कां?.. माझीसुद्धा जाण्याची वेळ आली!..''

''अं ऽ !'' जाई एकदम उठून म्हणाली, ''नुकतीच हार्डीची 'टेस' अर्धी राहिली होती ती वाचून संपवली. आतां हा एका जुन्या मासिकांचा जुडगा चाळून त्यांतील चित्रें पहात आहे!...''

''त्या उघड्या पानावरचं चित्रं कोणाचं आहे, एवढं निरखून पहातांहा तें?'' अरुणनें सहज आस्था दाखविण्यासाठी विचारलें.

‘‘आहे कोणी ‘अरुण ठाकूर’ म्हणून?...’’ जाई प्रेमळ हास्य करीत त्याच्याकडे पाहून, मुद्दामच अनोळखी स्वरानें म्हणाली. ‘‘माझ्याकडे या ‘कलावती’चे रस्त्यांत स्वस्त मिळाले म्हणून परवां घेतलेले पुष्कळ जुने अंक आहेत. बहुतेकांत या चित्रकाराच्या सुंदर सुंदर चित्रांचे ब्लॉक्स आहेत.’’

अरुण या एकाएकी घडलेल्या प्रसंगाने चमकला. ‘जात्या प्रेमळ आशावंत जाई, आपल्या जुन्या आयुष्यांतहि डोकावून पाहूं लागली आहे’ या कल्पनेनें, व आपल्या बेफिकीरीनंतरहि तिच्या आपल्याविषयींच्या आस्थेनें, अरुण अगदीं भांबावला होता!...

त्यावर कांहींच न बोलतां, तो दरवाजाकडे वळूं लागला;..तशी घाई घाईनें पुढें होऊन, अरुणकडे स्नेहादरानें पहात जाई उतावीळपणें म्हणाली, ‘‘हें हो काय?..अरुण, तुम्ही हें सुद्धां सारं माझ्यापासून लपवून कां ठेवता?...’’

तरीहि अरुण कांहींच बोलला नाहीं. तेव्हां, बिचारी जाई खिन्न मनानें त्याच्याबरोबर लिफ्टमधून खालीं आली!

: ४६१ :

चार दिवस घरांत असलेले पाहुणे जसे एकाएकी आले होते, तसेच आज दुपारीं एकाएकी निघून गेले!.. आणि त्यांच्याबरोबर आयत्यावेळीं पटकन् वासुदेवरावभाऊहि कोटटोपी घालून घरांतून निघून गेले.

कोठें आणि कशाला? कधीं परत येणार? कमळामावशीला त्याविषयीं कांहींच कल्पना नव्हती; आणि तें तिच्या आतां अंगवळणींच पडलें होतें.

मुलेंहि शाळेंत निघून गेलीं होती;..आणि साऱ्या घरांत तीच एकटी वांवरत होती. तिने स्वयंपाकघरांतील उष्टें खरकटें काढलें, शेणपोतेरें केलें आणि ती कचरा काढूं लागली.

भर दुपारीं,..सोनगांव खेड्यांतील, तीं चारदोन घरें अगदीं शांतपणें वामकुक्षी घेत असल्यासारखीं दिसत होतीं. त्या उन्हाच्या वेळीं, कोणी एखाददुसराच वाटसरू, मधून मधून रस्त्यावरून फिरके. अजून पाऊस सुरूं झाला नसल्यामुळें, सोडलेलीं गुरें, पाण्याच्या आशेनें घराजवळपासच घुटमळत होतीं. मागील दारच्या कुंडींतील पाणी सगळें संपेपर्यंत, कांहींनीं आपली तहान भागवून घेतली होती. काहीं रंवथ करीत, मिचमिच्या डोळ्यानें पहात, धांपा टाकीत,..झाडाच्या सावलीला, किंवा घराच्या वळचणीला,..कोठें गारवा सांपडेल तेथें, उभी राहून विश्रांति घेत होतीं!..रात्रभर मर्दुमकी गाजवणारीं सोनगांवांतील रोडकीं कुत्रीं,..मांडवांत, विहिरीजवळच्या गच्चीवर, अगर रहाटोडीवरील, टोणगा चालून चालून मऊ झालेल्या, गार मातींत,...तोंड उघडें टाकून लोळत



पडलीं होतीं..मागील बेड्यांतील एखाद्या गड्याच्या बिऱ्हाडांतून, पोरांच्या रडण्याचा आवाज ऐकूं येत होता...कुंडीवर कोणी गड्याची बायको कपडे धूत होती. जवळपासचीं चरत असलेली कोंबडीं, आपल्या चिल्लापिल्लांसह, आळवाच्या खाचींत पायानें वाखरत होतीं..

: ४६२ :

इतक्यांत, मुलांना शाळेंत न्यावयास गेलेली गाडी परत आणून उभी करून, सदू स्वयंपाकघराकडे वळला; आणि लांबूनच हांक मारीत मारीत म्हणाला, ‘‘वैनीऽवैनीऽ, पोस्टमननं तुमचं ह्यें पत्र दिलं आहे माझ्याकडे?-’’

कमळामावशीनें हातांतील केरसुणी तशीच जमिनीवर टाकली व पुढें होऊन तिनें सदूच्या हातीं असलेलें तें जाड पाकीट घेतलें.

तिला एकदां वाटलें, अरुण बरेच दिवस भेटला नाहीं;...तुरुंगातून सुटल्यावर कोणालाच त्याचा पत्ताहि ठाऊक नाहीं. आज आपली आठवण होऊन त्यानें त्याच्या नेहमीच्या पद्धतीनें, प्रथम आपल्यालाच लांबलचक पत्र पाठविलें असेल..

मग तिला वाटलें, बाबांची प्रकृति हल्लीं पूर्वीप्रमाणें निरोगी नसते. त्यांना कांहीं तरी मनमोकळें लिहावें असें वाटून, त्यांनींहि कदाचित् पत्र पाठविलें असेल.

तेवढ्यांत एकदां तिच्या मनांत डोकावून गेलें- अरविंदभाओजींचं तर नसेलना?...सुनीतीबरोबर बिऱ्हाड थाटल्यावर ते एकदांच दोन तीन दिवस आपल्याकडे राहून गेले तेवढेच! पण त्यानंतर त्यांची भेट नाहीं कीं पत्रहि नाहीं!...

पत्याचें अक्षर ओळखीचें दिसलें खरें; पण कोणाचें ते प्रथम कांहीं चटकन् तिच्या लक्षांत येईना!..

तिला दुसऱ्या कोणाचें बरं पत्र येणार?...मिरा? हो, तिचंच हें अक्षर! तिनें घाईघाईनें घरांत जाऊन अर्धवट राहिलेलें काम आटोपतें घेतलें. उरलें सुरलेलें जेवण, थांबून राहिलेल्या धर्मा म्हाताऱ्याच्या हवाली केलें आणि खरकट्या भांड्यांत पाणी ओतून, सर्व नीट झालें आहे ना, या दृष्टीनें एकदां स्वयंपाकघराकडे दृष्टि फिरवून, ती लगबगीनें मिरेचें पत्र उघडीत माजघरांत आली.

त्या एकाकी वाटणाऱ्या तिच्या घरांत, तिला आज बऱ्याच दिवसांनीं,..जणूं तिची लहानगी मिराच भेटावयास आली आहे, अशा समाधानानें तिनें एक सुस्कारा टाकला;..

कु. मिरा पाटील बी.ए.,
C/o मेरी होप,
मिशनगर्लस्कूल,

आशानगरी; (कोल्हापूर नजीक)
ता. २९ जानेवारी १९३२

प्रिय मावशी,

तुला कबूल केल्याप्रमाणें वर पत्ता लिहिला आहे. पण तो फक्त तुझ्यासाठींच आहे हें लक्षात ठेव.

माझ्या नांवापुढें पदवी पाहून तुला आश्चर्य वाटलें असेल नाहीं? पण मावशी, मी गेल्या जूनमध्येंच बी.ए. परीक्षा पास झाले.

त्यावेळची तुझ्यासमोरच वाढत असलेली लहानगी मिरा आतां पदवीधर झाली आहे, ही बातमी वाचून तुलाहि आनंद होईल हें मी जाणते. पण जिच्या मदतीनें व जिच्या प्रेमाच्या आसऱ्यानें मी या पदापर्यंत येऊन पोहचलें, ती माझी म्हातारी ममा, आज हें माझें यश पाहावयास माझ्याजवळ नाहीं, याचें मला अतिशय वाईट वाटत आहे. परीक्षेच्या ऐन संधीला, गेल्यावर्षी, माझी प्रेमळ 'ममा' मला सोडून गेली. त्यानंतर मी इतर कामांत गुंतल्यामुळेंच तुला आतांपर्यंत लिहिलें नाहीं.

: ४६४ :

ममाच्या आयुष्याचा मागला वृत्तांत तुला ठाऊकच आहे. दिवसेंदिवस म्हातारी अगदीं थकत चालली होती. शेवटीं शेवटीं तर ती रात्रंदिवस ईशप्रार्थनेंतच रममाण असे! - व्हर्जिन मेरीची बाल येशूला घेतलेली मोठी थोरली तसबीर तिनें आपल्या निजण्याच्या खोलींत लाविली होती;.. तिजकडे पाहात, आपल्या गळ्यांतील क्रॉस ती पुन्हा पुन्हा कपाळाला व छातीला टेकी. अशक्त झाल्यामुळें, गादीवर पडल्यापडल्याच नव्या करारनाम्यांतले तिच्या आवडीचे अनेक विभाग, आपल्या म्हाताऱ्या मिचमिच्या डोळ्यांना आपला म्हातारपणचा चष्मा लावून, ती तासचे तास वारंवार वाचत असे.

तिची येशूवरील अमर्याद भक्ति व त्याच्या संदेशावरील श्रद्धा, दिवसेंदिवस वाढतच होती. अगदीं शेवटच्या दिवसांत तर मला जवळ बोलावून ती, तासचे तास, अश्रू ओघळणाऱ्या आपल्या डोळ्यांनीं मजकडे प्रेमानें पाही; व दम लागत असे तरी बायबलमधील तिला आठवणारे अनेक प्रसंग व धीरवचनें मला सांगे. मध्येंच आपल्या थरथरत्या हातांनीं माझा हात आपल्या छातीवर दाबून, भरून येणाऱ्या हृदयामुळें अडखळत अडखळत बाहेर पडणाऱ्या शब्दांत, ती मला सांगे, ''मिरा, पोरी, माझे म्हातारीचे हे शब्द पुन्हा एकदां नीट लक्षातं घे. भोवतालीं गजबजलेलें हें जग दुःखांनीं अगदीं भरलेलें आहे असें आपल्याला प्रथम वाटतें. पण तें तसें नाहीं. त्यांतून आनंद



हुडकून काढण्यासाठीं आपल्याच हृदयांत तो आनंदाचा साठा अव्याहत स्रवत असलेला झरा शोधून काढावयाचा असतो! किंवा असं म्हणूं या आपण, कीं- आपलं हृदय साऱ्या चांगल्या वाईट वस्तूंचा स्पर्श होतांच, त्यांचें सोनें करणारें परीसच असावयास पाहिजे. आपल्या वैयक्तिक सुखदुःखांना विसरून, जगांतील दारुण दुःखांशी झगडत, आपल्याभोंवती आनंदाचा सुगंधच दरवळवण्यास दुबळ्या मानवाला समर्थ करणारा, एकच एक जागतिक धर्म आहे!...आणि तो म्हणजे येशूनें सांगितलेला!

: ४६५ :

नंतर ती थोडा वेळ तशीच गप्प बसे व कांहीं काळ तळमळून पुन्हां म्हणे, ''माझ्या मागें, माझ्याच श्रद्धेनें पुढें चालणारा हा माझा पसारा सांभाळण्यास समर्थ अशी,..माझी एखादी मुलगी असती, तर किती समाधान वाटलं असतं मला,...आतां असं मरतां मरतां!''

आणि मग मान बाजूस फिरवून ती पुन्हा गप्प पडून राही, तेव्हां त्यावर मी तिला म्हणे, ''पण ममा, सारं जगच बदलत आहे! अशा वेळीं तुझ्यामागून ती तुझाच मार्गानें चालली असती कशावरून ग? तिलाहि तिची कांहीं ध्येयें, मतें असतीलच कीं नाहीं?...''

एकदां मी असें म्हटलें, तेव्हां ममा त्यावर हंसली व मला आपल्या थरथरत्या हातानें पाठीवर थोपटून म्हणाली, ''वेडे, जग बदलतं आहे ही तुझी कल्पनाच मुळीं चुकते अगोदर! असेल,..तें कदाचित् वरवर बदलतहि असेल! पण जगांतील चांगल्या गोष्टींच्या मूल व्याख्या बदलतील थोड्याच?..आणि जोंपर्यंत माझ्या मागून माझं काम पुढें चालवणारी माझीहि मुलगी, या चांगल्या गोष्टींसाठींच तळमळत असेल,...तोपर्यंत तिचा मार्ग माझ्याहून बाह्यतः भिन्न असेल तर तेवढ्यानें मला वाईट वाटणार नाहीं!...माझाच मार्ग कायमचा असा माझा मुळींच अट्टाहास नाहीं! कोणत्याहि गोष्टीच्या प्राप्तीचे अनेक मार्ग असतात!...त्यांतील ती तिला संमत असा एकादा मार्ग आक्रमील!...

त्यावेळीं, मृत्युशय्येवर पडलेल्या त्या म्हातारीच्या तसल्या उदार विचारसरणीचें, मला केवढें आश्चर्य व कौतुक वाटलें होतें!

त्यानंतर तिची प्रकृति दिवसेंदिवस खालावत गेली. माझ्या परीक्षेचे दिवस जसेजसे जवळ येऊं लागले, तसतसें माझ्या कर्तव्यापासून तिच्या प्रकृतीसाठीं च्युत न होण्याबद्दल ती मला सारखें बजावून सांगे! पण मला तर तिला सोडून जाणेंदेखील जिवावर येई.

एके दिवशीं असेंच आम्हीं बसलों होतों. मेरीच्या समोरील तसबिरीकडे पाहून ती मला म्हणाली, ''मिरा, मी आता दोन दिवसांनी हें जग सोडून जाणार आहे! मला इच्छा कांहींच नसत्या तर बरं झालं असतं! पण तरी एकच इच्छा पुन्हापुन्हा सारखी मनांत येत आहे मजप्रमाणेंच

दयाळू येशूचें कोंकरू असलेली एखादी मुलगी मला असती तर...पण-''

एवढें बोलून, ती दुसऱ्या कुशीवर वळली; आणि थोड्या शांततेनंतर, आम्हीं एकमेकांबरोबर शेवटचेंच असें कितीतरी वेळ बोलत होतों.

आणि मावशी, तिच्या म्हणण्याप्रमाणेंच, ती बरोबर दोन दिवसांनी अतिशय समाधानांत व शांततेत आपला देह ठेवून निघून गेली. त्या आधीं तिची मुलगी मेरी होप तिला अचानक लाभली; आणि तिच्यावरच तिनें आपल्या शाळेचा वगैरे सारा पसारा सोपवला आहे. या मेरी होपची व तुझी ओळख, केव्हांतरी मागाहून करून देईन मी!

: ४६६ :

तोपर्यंत, बऱ्याच दिवसांनी मला येणाऱ्या तुझ्या मोकळ्या सविस्तर पत्राची, माझ्या वरील पत्त्यावर मी वाट पाहते-

माझी दुसरी मैत्रीण जाई पै! तिच्याविषयीं तुला आधींच पुष्कळ ठाऊक आहे म्हणा! तिच्या अलीकडेच मला आलेल्या एक पत्रावरून तिजविषयीं नवीन सांगावयाचें, म्हणजे ती पुन्हा नव्यानें आपले आयुष्य जगूं लागली आहे. मुंबईतच एके ठिकाणी ती नोकरीस आहे; येवढें सांगितलें म्हणजे सध्यां पुरे तुला!

अरुणची तुझी भेट नसेल ना अगदीं? पण मला त्यांची माहिती लागली आहे थोडी फार! त्यांना मात्र मजविषयीं कांहींच माहीत नाहीं. तुला अरुणांविषयीं कांहीं माहीत नसलें, तर मी तुला आज एवढेंच सांगू शकतें, कीं ते सध्यां त्रस्त मनःस्थितींत आहेत पण अगदी सुखरूप आहेत! कोठें आहेत, काय करीत आहेत? मला विचारूं नकोस!

आतां आज मला स्वतःच जास्त लिहीत बसण्यापेक्षा, तुझ्याकडून येणाऱ्या पत्राचीच तीव्र उत्कंठा लागली आहे. तेव्हां हें पत्र येथेंच थांबवतें, प्रथम पोष्टांत टाकते आणि तुझ्या पत्राचीच वाट पाहात बसते.

विनायक, गंधा आतां मोठमोठीं झालीं असतील, नाहीं ग मावशी? सारें सारें लिही हं अगदी! असेंच समजना,..मी तुला कितीतरी दिवसांनी भेटायला, तुझ्याकडे बसायला आले आहे म्हणून! कळावे.

तुझी - मिरा पाटील

: ४६७ :

तें पत्र वाचून, मावशीनें मिरेबद्दलच्या प्रेमानें एक समाधानाचा सुस्कारा टाकला!

ती जागेवरून उठली; कुंदाची जुनी वही कपाटांत पडली होती; त्यांतील कांहीं आखलेली



पानें तिनें फाडली; व कोनाड्यांत सांपडलेल्या लहानशा पेन्सिलीच्या तुकड्याने, तिनें मिरेला पत्र लिहावयास सुरवात केली!

मिरा आतां शिकली, मोठी झाली; आपल्या लिहिण्यांतील शुद्धाशुद्धांच्या चुकांना ती हंसणार तर नाहीं? या विचारानें,..आपल्या लहानपणच्या खोडीप्रमाणें पेन्सिलीचें टोक तोंडांत घालून, मावशी बराच वेळ कागदाकडे पहात थबकली.

पण, मग एकदां सुरवात करतांच, मनांत येईल तें सारे ती भराभर कागदावर उतरून काढीत होती!..

: ४६८ :

साडेपांचचा ठोका पडल्यावर, अरुणनें फलक बाजूला सारला व सामान गोळा करून ठेवीत ठेवीत, तो उठून जाईला म्हणाला, 'जा तुम्हीं.'

जाई उठली; तिनें केसांचा आंबाडा आरशाकडे पहात पहात नीट केला. कोपऱ्यांतील वॉशमध्यें तिनें तोंड नीट धुतलें, पुन्हा कुंकवाची टिकली लाविली व पदर सांवरीत ती कोचाजवळ गेली.

खालीं वांकून कोचावर पडलेलें आपलें पुस्तक व मनीपर्स हातीं घेऊन तिनें कोपऱ्यांतील छत्री उचलली;..आणि चपला घालून दाराकडे वळता वळतां, ती अरुणकडे पाहून म्हणाली, 'तुम्हीं येतां ना?'

'नाहीं, मला वेळ आहे थोडा! तुम्ही जा.' अरुण आपला काळा कोट अंगावर चढवीत म्हणाला.

अरुणकडे पहातां पहातां, जाईची दृष्टी, बरीचशी धूळ बसलेल्या त्याच्या त्या अंगांतील कोटाकडे गेली. त्यानें पायांतील स्लीपरला बरेच दिवस पॉलिश केलें नव्हतें. धोतराचा बंगल्यासारखा सोगा, निष्काळजीपणें मागें फिरवलेले केंस, व गौरवर्णावर उठून दिसणारी बरीचशी वाढलेली त्याची काळीभोर दाढी!...

अरुणच्या पोशाकांतील ही एकंदर बेफिकिरी, जाईच्या मनाला त्याक्षणीं थोडीशी जाचलीच!

ती दरवाजाकडे वळण्याऐवजी पुन्हा टेबलाजवळ आली. आपल्या हातांतील छत्री खुर्चीला ओडगून ठेवली. पर्स व पुस्तक टेबलावर टाकून तिनें झटकन् टेबलाचा खालचा ड्रावर उघडला; आणि त्यांतून कपड्याचा ब्रश काढून ती अरुणजवळ जात म्हणाली, 'कोट अगदी मळला आहे, झाडूं कां?'

अरुणनें तिजकडे पाहून, पुन्हा आपल्या कोटाकडे एकदां बेफिकीर दृष्टि फिरवली व तो बळेंच तिला हंसून म्हणाला, ''असूं द्या!...''

पण मग पुन्हा त्याला काय वाटलें कोणास ठाऊक? जाईनें जवळ आणलेला ब्रश घेण्यासाठीं हात पुढें करीत तो म्हणाला, 'बरं तर, आणा इकडे ! मी झाडतो...'

कांहीं एक न बोलतां, त्याच्या हातीं ब्रश देऊन, जाई जवळ उभी राहिली. अरुणनें ब्रश हातीं घेऊन, पुढला भाग भरभर साफ केला व पाठीवरील कोट साफ करण्यासाठीं, तो आपला हात मागें पोचवूं लागला. जाईला त्याच्या या मुग्ध धडपडीची,..एकप्रकारच्या अट्टाहासाची, गंमत वाटली; आणि ती आपल्याशींच गालांतल्या गालांत हंसत राहिली!...

: ४६९ :

शेवटीं, ती स्वतःच पुढें झाली; आणि प्रेमळपणें त्याच्याकडे हंसून पहात, आपला हात पुढे करून, ती अगदी हुकमी आवाजामध्यें त्याला म्हणाली, ''आणा तो ब्रश इकडे! तुमचे नाहींत हात पोचणार पाठीला! मी करते साफ!''

तिच्या दृष्टींत व शब्दांत इतका आपलेपणा भरला होता, की अरुणच्या दृष्टींतील कठोरता क्षणभर जागच्या जागींच विरघळली!..आणि त्यानें ब्रश तिच्या हाती देऊन, कांहीं एक न बोलतां आपली पाठ तिजकडे फिरवली.

थोडा वेळ जाई सौम्यपणें त्याच्या पाठीवरून ब्रश फिरवीत होती; तिनें आपला हात खालीं करतांना तिच्या बांगड्यांचा झालेला आवाज ऐकून, अरुणनें तिच्या बाजूस पुढा केला. यावेळीं ती त्याच्याकडे पाहात सौम्यपणें हंसत होती. जणुं काय, तसली त्याची लहानसान कामगिरी करावयास त्यानें तिला आज परवानगी दिल्यामुळें, तिला अभिमान व आनंदच वाटत होता!..

तरी त्याला राहवेना व तो म्हणाला, ''तुम्ही कां उगाच मजसाठीं त्रास घेतां, हो?''

त्याच्या त्या शब्दांनीं मात्र जाईला थोडें दुःख झालें, तरी त्याच्या त्या वाक्याकडे दुर्लक्ष करून, त्याच्या केसांकडे व पायांतील स्लीपरकडे पहात ती म्हणाली, ''केस पाहा कसे विस्कटले आहे तुमचे? माझा कंगवा देते हं, मी कां? आणि हें पाहिलंत का, अरुण? स्लीपर बघा किती खराब आहेत ते? जातांना कुठें तरी आज पॉलिश लावून घ्याना जरा! झाली एखादी दिडकी अशा कामासाठी खर्च,..तर हरकत नाहीं कांहीं?...''

'राहूं द्या!' तिच्या त्या साऱ्या शब्दांनी मनांत उडणारी खळबळ तशीच आंतल्या आंत दडपून अरुण म्हणाला; आपल्या थोड्या लांब वाढलेल्या व बरेंच दिवस तेल न लावलेल्या केंसांतून त्यानें आपली बोटें मागें फिरवलीं; आणि टेबलावरील एक पुस्तक घेऊन तो खुर्चीवर बसला.

: ४७० :

त्याला पुन्हां बसतांना पाहून जाई आश्चर्यानें म्हणाली, ''हें काय? सहा वाजायला आले!..तुम्हीं



घरीं नाहीं का जाणार आतां?''

''नाहीं. मला थोडा वेळ आहे!'' समोर घेतलेल्या पुस्तकाची पानें चाळत तो जाईकडे अर्धवट वर पहात म्हणाला.

त्याच्या मनांतील अस्वस्थता पाहून जाईला वाईट वाटलें; पण तिचा अगदीं नाइलाजच होता!

तिला ठाऊक होतें, अरुण आपल्याला टाळण्यासाठींच हें सारें नाटक करीत आहे. हें तिला समजलें तरीहि कांहीं एक न बोलतांच, पर्स व छत्री उचलून हातांत घेत ती दाराकडे वळली. दाराबाहेर पडणार, इतक्यांत तिला कसलीशी आठवण झाली; आणि ती पुन्हां मागें वळून अरुणला म्हणाली, ''तुम्ही आज पगार घेतलात कां? उद्यां पुन्हां बँक हॉलीडे आहे हो!''

''अरेऽ खरंच! विसरलोच मी ते गडबडीत!'' अरुण खुर्चीवरून पटकन् उठून, तिजकडे पाहात भांबावल्यासारखे होऊन म्हणाला, ''मेनी थँक्स् हं, पै!''

''बरं, जाते मी आतां. परवां सकाळी भेट!'' जाई बाहेर पडतां पडतां म्हणाली.

तिची खात्री होती. अरुणना वाचावयाचें वगैरे कांहीं नव्हतें; आपण निघून जावें, म्हणूनच केवळ त्यांची ही सारी खटपट होती!

: ४७१ :

मग तिच्या मनांत विचार आला- 'ते इतकं कठोर होण्याचा प्रयत्न करीत आहेत खरा; पण तरीहि, त्यांच्या जात्या हळुवार हृदयाचं सौजन्य, आपल्या दृष्टीस पदोपदी पडल्यावाचून रहात नाहीं!..'

मिरेच्या पत्रांत, तिने अगदी मोकळेपणें लिहितांना, अरुणविषयीं तिला पुष्कळ गोष्टी कळविल्या होत्या; आणि तिच्याकडून आलेल्या दोनचार उत्तरांमध्ये तिनें लिहिलेल्या तुटपुंज्या माहितीवरून, अरुणच्या मागच्या आयुष्याचीहि जाईला बरीच कल्पना आली होती!

'पण तेच एका वेळचे श्रेष्ठ कलावंत अरुण- आज अगदीं प्रवाहपतितपणें जीवनसागरांत केवळ तरंगत, सर्वस्वी अयोग्य अशा आपल्या नोकरीच्या चाकोरीतून आपलें जीवन कसेंतरी ओढून नेत आहेत! तसं म्हटलं तर, त्याच्या त्या निराशेंतच त्यांच्या सध्यांच्या कठोरतेचा, बेफिकीरीचा साऱ्याचा समावेश होतो!'..असें जाईला वाटलें!

पण तरीही 'आपल्याला त्यांचा मुग्ध कां होईना, सहवास लाभण्याचा सुयोग आला, हें तरी काय थोडं आहे?' या विचारानें तिला पुन्हा समाधानच वाटलें!

बसची वाट पहात, जाई अशीच थोडा वेळ कोपऱ्यावर उभी होती!

इतक्यांत, त्यांच्या ऑफीसच्या बिल्डिंगमधून उतरून, इकडे तिकडे पहात, अरुण तिच्याच

बाजूस येत असलेला तिला दिसला!

ती पटकन् थोडी मागे सरते न सरते, तोंच, तोंडांत धरलेल्या सिगारेटमधून धुराचे फवारे सोडीत, अरुण तिच्या समोरूनच पुढें निघून गेला!

त्याची आपल्याकडे दृष्टि नव्हती हें जाणून जाई पुढें आली;...व घाईघाईनें चालत जमावांत शिरणाऱ्या अरुणच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून, तिनें खिन्नपणें एक सुस्कारा सोडला!..

जाधवबाबांचे त्या दिवशीं रात्रीं जेवतांनाचे शब्द आठवून, जाईला पुन्हा त्या दिवशींप्रमाणेच वाटलें, ''या वर सांचलेल्या राखेला आपण निदान सध्यां तरी फुंकर घालण्यांत अर्थ नाहीं!..''

: ४७२ :

केवळ जाईनें निघून जावें म्हणूनच अरुण वाचण्याची बतावणी करीत होता! तिनें जातांना पगाराची आठवण करतांच, ती गेल्याबरोबर अरुण उठला; आपल्या फर्मच्या कॅशियरकडे जाऊन पे बिलवर त्यानें सही केली, व हातीं आलेल्या दहा दहाच्या सहा व पांचाच्या दोन नोटा खिशांत घालून, तो जिना उतरूं लागला!

अरुण स्वतः जाईबरोबर कठोरपणें वागत होता, तरी आजपर्यंतच्या सहवासांतील तिची निरपेक्ष आपुलकी, त्याच्या दृष्टींतून सुटली नव्हती. त्याच्याविषयींच्या तिच्या आस्थेच्या वागणुकीचें, नुकतेच पांच मिनिटांपूर्वी घडलेलें ताजें उदाहरण तर त्याच्या दृष्टीसमोरच होतें!

त्यामुळें त्याच्या हृदयांत जमूं लागणाऱ्या तिच्याविषयींच्या हळुवार भावनांचा कल्लोळ लांब हाकलण्यासाठीं, त्यानें खिशांतील काड्यांची पेटी व चेस्टरफिल्डचें काल संध्याकाळी जातांना घेतलेले विसांचें पॅकेट बाहेर काढिलें!

तें वापरून बरेंचसें दुमडलें होतें. त्यांत असलेली शेवटचीच सिगारेट त्यानें ओठांत धरली; आणि अभ्रकांचे वेष्टण असलेली ती सिगारेटची रिकामी पुडी, दुसरा जिना उतरतांना लागलेल्या काळोख्या कोपऱ्यांत झुगारून देऊन तो एकएक पायरी खालीं उतरूं लागला.

त्यानें एक काडी ओढली; पण व्यग्र मनस्थितीमुळें, ती सिगारेटला लावण्यापूर्वी तशीच जळत जळत येऊन त्याच्या चिमटीला चरका बसला. त्यामुळें एकदम विचारांतून भानावर येत, तो जागच्या जागींच एका पायरीवर उभा राहिला. पुन्हा दुसऱ्या काडीनें त्यानें सिगारेट शिलगावली व राहिलेले दोन जिने भराभर उतरून तो फुटपाथवर आला!

: ४७३ :

बाहेरच्या रस्त्यावरून, माणसांची वर्दळ नेहमींप्रमाणें तशीच अव्याहत चालू होती. दुसऱ्या दिवशीं सुटींत होती!...मग आतां लवकर घरीं जाऊन तरी काय करायचें? या विचारानें तो ट्रॅम



किंवा बसकडे न वळतां, तसाच पुढें चालत जाऊन गर्दीत मिसळला!

जातां जातां त्याला समोर एक इराण्याचें हॉटेल दिसलें. तो आंत शिरला व त्यानें एक कप चहा मागविला. एक एक घोट पीत भोंवतालचा गजबजाट अगदी शून्यमनानें पहात, तो किती तरी वेळ तसाच बसला होता!...

पैसे चुकते करतांना त्याला वाटलें, 'आपल्या खिशांतील सिगारेट संपल्या आहेत; नवीन घ्याव्यात!'..हत्ती, पासिंग, कॅव्हेन्डर, गोल्डफ्लेक.. आतापर्यंत साऱ्या झाल्या होत्या. काल नवीन घेतलेल्या चेस्टरफील्डचें पॅकेटहि आतांच संपले होतें..इतक्यांत समोरच्या भिंतीवरील एक सुंदर चित्र त्याला दिसलें-

त्यानें पांच रुपयांची नोट इराण्यापुढें टाकून म्हटलें, ''अंदर एक चाय्.. और अभी एक कॅमेलका टिन लाव.'' आणि इराण्यानें परत केलेले उरलेले पैसे व सिगारेट टिन, न पाहातांच खिशांत घालून तो पुन्हा रस्त्यांत आला!..

थोडेसें विमनस्कपणें चालल्यावर मात्र त्याचा एकदम विचार बदलला,..

'प्रथम आपण ट्रॅमनें घरीं जाऊं, थोडा वेळ कॉटवर स्वस्थ लोळूं, व मगच फिरावयास बाहेर पडूं!' या विचारानें, शेवटीं तो झटकन् धांवत धांवत, समोरून जात असलेल्या दोन नंबरच्या ट्रॅममध्यें उडी मारून शिरला; व मागच्या कॅरेजच्या अगदीं शेवटच्या बांकाजवळ जाऊन बसला!

: ४७४ :

नवीन घेतलेलें टिन उघडावयाची थोडा वेळ व्यर्थ खटपट करतां करतां, त्यानें एकदोनदां खिडकींतून बेफिकीरीनें बाहेर पाहिलें. शेवटीं वरच्या स्क्रूच्या साह्यानें झांकणाभोंवतालचा पत्रा नीट सोडवला व एक सिगारेट बाहेर काढून पेटविली. दोन झुरके मारून खिडकींतून बाहेर धूर सोडल्यावर मात्र अरुणच्या मनाला थोडें समाधान वाटलें !...

बोरीबंदरच्या वळणावर ट्रॅम फिरतांना, त्यानें खाली वांकून मोठ्या घड्याळाकडे पाहिलें; सव्वादहा होऊन गेले होते.

कापाच्या मैदानावर खेळाडू लोकांच्या उत्साहाला अगदीं पूर आला होता. जणूं काय, 'ते सारे वेडेच!' अशा दृष्टीनें त्यांजकडे पाहून, त्यानें सिगारेटची राख बाहेर झाडली; आणि ट्रॅममध्येंच एकदां शून्यपणें आपली नजर फिरवली.

कंडक्टरनें दोनदां हालवल्यावर कोठें तो भानावर आला. आपल्या आंतल्या बारक्या खिशांतून एक पावली काढून त्याच्या हातावर ठेवीत, अरुण त्याला म्हणाला, 'एक पायधुणी-'

पण कंडक्टरनें ती वर खालीं निरखून पाहून अरुणकडे परत देत म्हटलें, 'ये नै चलेगा, साब'

अरुणच्या खिशांत आज पुष्कळ पैसे होते; ती परत घेऊन त्यानें न पाहतांच आपल्या दुसऱ्या खिशांत टाकली; निराळी आणेली कंडक्टरच्या हातावर ठेवली व त्यानें दिलेला तिकिटाचा कपटा हातीं घेतला. सारें अगदीं निर्विकारपणें चाललें होतें!..

कंडक्टर पुढें निघून गेल्यावर मात्र, ती खोटी ठरलेली कथली पावली अरुणनें खिशांतून बाहेर काढली; आणि तिजकडे पाहून, एकदां आपल्याशींच हंसून, त्यानें ती पुन्हां खिशांत टाकली.

: ४७५ :

एकएक स्टँड मागें टाकीत ट्रॅम पुढें चालली होती; त्यानें सहजच बाहेर दृष्टि टाकली!..लहान लहान बैठकींजवळ एक दोन फोन!..तेथील लहानमोठ्या शेट्यांचे कसलें तरी बोलणें चाललें होतें. तेथे जवळच, रस्त्याच्या कोपऱ्यावर जमून ओरडाओरड करणारा अळशी बाजार, तो सकाळी जातांना त्यानें पाहिला होता, तितक्याच उत्साहानें अजूनहि चालला होता. अरुणनें आपल्याशींच हंसून दोन्ही बाजूच्या त्या गर्दीगडबडीकडे ओझरती नजर टाकली.

पुढले दोन स्टँड टाकून, तो आपल्या नेहमींच्या ठिकाणीं उतरला, जरा आंतल्या बाजूच्या आपल्या चाळीकडे वळला; आणि जिना चढून आपल्या खोलीचें कुलूप काढल्यावर, तो कोटासहच आपल्या कॉटवर आडवा झाला!

थोडा वेळ तसेंच बेफिकीरपणें बिछान्यावर लोळल्यावर, एकदम उठून उभें राहून, अरुणनें एक सिगारेट शिलगावली आणि ती तशीच ओठांत धरल्या धरल्या, कपाळाला त्रासिक आठ्या घालून, आपल्या आंतल्या खिशांतील नोटा त्यानें बाहेर काढल्या!..क्षणभर त्यांच्याकडे पहात तो आपल्याशींच खिन्नपणें हंसला व एकदां..दोनदां..तीनदां.. त्यानें त्या उगाच मोजल्या!..

महिनाभर आपल्या कलेचा एक प्रकारचा हीन व्यापार मांडून धडपड केल्यावरच, त्याच्या हातीं आलेले ते त्याच्या मालकीचे पैसे!..ते तसे पुन्हां पुन्हां मोजतांना अरुणला जणूं कैफच चढला होता!..अगदीं मादक आनंद होत होता!...महिन्यांतून एकदांच येणाऱ्या या एका दिवसावर दृष्टि ठेवून, स्वतःला अगदीं न आवडणारें आपलें काम, त्यानें गेल्या आठनऊ महिन्यांत आपल्या अंगवळणीं पाडलें होतें. सुरवातीसुरवातीस, त्याला त्यांत वाटणारें उत्कट दुःख आतांपर्यंत हळूहळू कमी होत गेलें होतें -आणि म्हणूनच, जगांत वावरतांना प्रत्येक पावलापावलाला लागणारा, त्याच्या गरजा भागवणारा पैसा..आज त्याच्या हातीं खेळत आहे,..या कल्पनेनेंच त्याला तसा बेफिकीरीचा कैफ आला होता!..पैशाच्या अभावीं तो एकदां रस्त्या-रस्त्यांतून वणवणत होता आणि त्याच्याच प्राप्तीनें, आज जगांत कोणाचाहि लाचार न होतां, बाहेरील अफाट जनसंमर्दातून, निदान त्या घटकेला तरी आपल्या अशा मानलेल्या भाड्याच्या खोलींत दिमाखानें येऊन,..तो मन



मानेल तसा ऐसपैस पडूं शकत होता!

असल्या विचारांचे काहूर उठल्यामुळें, अरुण जागच्या जागीं थबकला व पटकन् पुन्हा कॉटवर आडवा झाला. आणि धुराचा एक भला मोठा भपकारा सोडून, त्यानें हातांतील सिगारेटचें थोटुक बेफिकिरीनें दाराजवळच्या कोपऱ्यांत भिरकावून दिलें!..

: ४७६ :

धुराच्या वलयांबरोबरच, शून्य दृष्टीनें खोलीच्या छतापर्यंत प्रवास करीत, अरुण तसाच पडून होता!..इतक्यांत, रस्त्यावरून येणाऱ्या पेटीच्या आवाजाबरोबरच्या कोमल लकेरीनें, त्याच्या त्या शून्य समाधीचा एकदम भंग झाला. बाहेर येऊन तो गॅलरीत उभा राहिला व त्या गान मधुरीच्या दिशेनें खालीं रस्त्याकडे पाहूं लागला.

..गळ्यांत एक मोडकी जुनाट पेटी अडकवून, एक म्हातारा तिजवर आपलीं बोटें फिरवीत होता. त्याच्या जवळूनच, एक काळ्यासावळ्या सुकलेल्या चेहऱ्याची, लक्तरें पांघरलेली तरुणशीच बाई, आपल्या एका मुलाच्या खांद्यावर हात ठेवून व दुसरे चिरगुटांत गुंडाळलेलें मूल पाठकुळीस मारून,..दीनपणें वर पहात गात गात चालली होती!..

अरुणनें क्षणभर कान देऊन, तीं म्हणत असलेलें गाणें ऐकलें. भोवतालच्या कोलाहलांत त्याच्या कानावर फक्त एकच वाक्य पडलें; '...मरनेवालेऽलाख्खोऽ थे...अब रोनेवालाऽकोइ नही!..'

किती सुंदर होता तिचा आवाज! अरुणच्या कलाप्रेमी हृदयाला, तिचें तें भावनाप्रधान मधुर गायन अतिशय आनंददायक वाटलें. त्या गाण्यांतील अर्थ, अरुणच्या मनांत त्या क्षणीं चाललेल्या विचारांबरोबर धांवत होता. ते गाणें ऐकण्याच्या त्याचा मोह अनावर होऊन, तो तल्लीन मनःस्थितींतच त्या म्हाताऱ्याला वर येण्यास खुणावूं लागला. क्षणभर पेटीवर हात फिरवीत जागच्या जागी थांबून, त्या म्हाताऱ्यानेंहि होकारार्थी मान हलवली;..लाचारीनें कपाळाला हात लावला व तो जिन्यांकडे वळला.

: ४७७ :

थोड्याच वेळांत, त्या चाळीच्या कोपऱ्यावरील अरुणच्या खोलींत तें भिकाऱ्याचें कुटुंब येऊन बसले होतें. म्हातारा पेटी घेऊन दाराजवळ बसला होता. त्या बाईने आपल्या झोळींतील मुलाला बाहेर काढून, न लाजतां दुधाला धरलें होतें; व कांहींशा विनम्र लाचारीनें ती अरुणकडे व म्हाताऱ्याकडे आळीपाळीनें पाहूं लागली होती. म्हाताऱ्यानें त्या बाईला गाणें म्हणण्याची खूण करून, पेटीवर आपली सुरकुतलेलीं बोटें फिरवावयास सुरवात केली.

तिनेंहि एकदां हळूच खांकरल्यासारखें करून, आपल्या काळ्या मळकट जुनेऱ्याच्या फाटक्या पदरानें तोंड पुसत, मंजुळ आवाजात गावयास सुरवात केली..ताल नव्हता, कसल्या विशेष उंची वाद्याची साथ नव्हती!...म्हाताऱ्याच्या समोरील पेटीचा सूरहि यथातथा व कर्कश होता!..पण तिचा मोहक भरदार आवाज, त्या गाण्यांत प्रतीत होणारा करुण भाव, तो प्रतीत करतांनाच्या हळुवारपणामागील तिची प्रत्यक्ष दीन परिस्थिती...

अरुण स्वतःहि तसल्याच मनःस्थितींत असल्यामुळें, ती म्हणत असलेल्या त्या गाण्यांत, अरुणचें मन अगदीं तन्मय झालें होतें!.. म्हातारा मोडक्या सुरांवरून आपला कांपरा हात फिरवीत होता; आणि बाई अगदीं मोकळ्या मधुर आवाजानें चौथ्या पांचव्या काळ्या पट्टींत गात होती!-

''आराम साथेऽ सब कोईऽ, जब बखत पडीऽ तब कोइ नहीं!...

मरनेवाले ऽ लाख्खो थे ऽ,...अब रोनेवाला ऽ कोइ नहीं !...

- अब वख्त पडी ऽ है मुसिपतकी,...दुनियामे किसीऽका कोइ नही! आराम साथे सब कोईऽ!

पैसे हमारे पाऽस थे ऽ...तब दोस्त हमारे ऽ लाख थे!...

- पैसे हमारे पा ऽ स नहींऽ...अब दोस्त हमारा ऽ कोइ नही!

- अब वख्त पडी ऽ है मुसिपतकी... दुनियामें हमारा कोइ नही ऽ ऽ''

पुन्हा षड्जावर येऊन, गाणें अस्पष्ट करीत करीत ती थांबली!.. जणुं काय, आपलेच विचार या गाण्यांतून ती आपल्यापुढें मांडत आहे, असें अरुणला वाटलें;..आणि त्या गाण्याचा नाद त्याच्या कानांत घुमत राहिल्यामुळें, थोडा वेळ तो तसाच अगदीं स्तब्ध बसला!..

: ४७८ :

दोन मिनिटें अशीच स्तब्धतेंत गेल्यावर, त्या भिकारणीच्या लहानग्या मुलानें रडून त्याला भानावर आणलें. तो उठून टेबलाजवळ गेला. डब्यातील एक सिगारेट काढून त्यानें आपल्या तोंडात धरली व दुसरी त्या म्हाताऱ्याच्या हातांत दिली. आपली सिगारेट पेटवून झाल्यावर, ती जळती काडी पुढें करून, त्यानें म्हाताऱ्याच्या तोंडांतील सिगारेट शिलगावली!

पुन्हा क्षणभर सारें शांत होतें. म्हाताऱ्याच्या लाचार चेहऱ्याकडे सहानुभूतीनें पहात, त्याची, त्याच्या त्या लहानग्या नातवांची,.. साऱ्यांची चार दोन प्रश्न करून, अरुणनें माहिती काढली;..आणि शेवटीं, आपल्या खिशांतून एक पावली काढून, ती त्याला देण्यासाठीं, त्यानें सुन्न मनानें आपला हात पुढें केला.

तोंच, त्याचें लक्ष त्या नाण्याकडे जाऊन तो एकदम दचकला. आपला हात मागें खेंचून त्यानें दुसरे नाणें खिशांत शोधलें; पण मग शेवटीं, त्या म्हाताऱ्याच्या हातावर आठ आणे ठेवून, त्यानें



प्रथम काढलेली पावली पुन्हा खिशांत टाकली!

दुसऱ्याच क्षणीं,..तो म्हातारा, ती लक्तरें पांघरलेली बाई व तिची मुलें, दीन लाचारी व कृतज्ञता यांनी भरलेले डोळे एकदां अरुणकडे लावून, खालच्या रस्त्यावरील मानवी कोलाहलांत मिसळलींहि होतीं!

त्यांना तसें मागें वळून बघत रस्त्यानें जातांना पाहून, अरुण गॅलरींतून खोलीकडे वळला...जवळच्या चारपांच बिऱ्हाडांतील बायकांचा, गॅलरींत जमून गोंधळ चालला होता. एका रस्त्यावरील भणंग भिकारणीचें आपल्या शेजाऱ्याच्या खोलींत गाणें झालें, ही कल्पनाच, त्यांच्या त्या मनांतील गोंधळाच्या व त्यांच्यांतील खळबळीच्या मुळाशीं होती!..

या जाणिवेनें अरुणला मानवी मनाची गंमत वाटली! त्या बाजूस एकदां तुच्छतेचा एक दृष्टिक्षेप टाकून तो आपल्या खोलींत शिरला,..टेबलावरील कॅमलचा डबा व काड्याची पेटी त्यानें खिशांत कोंबली; व खोलीला कुलूप लावून तो बाहेर पडला!...

: ४७९ :

त्या प्रसंगामुळें क्षुब्ध झालेलें अंतःकरण अतिशय मोठ्या प्रयासानें स्थिर करीत, विजेच्या दिव्यांनी चोहों बाजूस चकाकणाऱ्या रस्त्यांतून अगदी मंदमंद पावलें टाकीत, अरुण एकटाच पुढें चालला होता..

आपली दृष्टि सहज इकडेतिकडे फिरवतांच,.. त्याच्याभोवतीं प्रत्येक पावलापावलाला लहानमोठा व्यापारच चालला आहे, असें त्याला क्षणभर वाटलें!..पण मग तो एकदम थबकून आपल्या मनाशींच म्हणाला, ''नाहीं तरी प्रत्येकजण आपापल्यापरीनें कांहीं तरी श्रम करूनच पैसा मिळवीत आहे!..

'अकलेचा, श्रमाचा मोबदला पैशाच्या रूपानें घेणं!'..हाच आपण आतां म्हणत आहों तो व्यापार ना? आपण तरी नाहीं कां आज पैशासाठींच आपलं मन मारून कांहींतरी धडपड करीत आहों?? मग..प्रामणिकपणे, निदान राजरोस...कोणी अशीच धडपड करीत असलं, तर तिकडे पाहतांनांची आपली ही कुत्सित दृष्टि कां बरं??..''

: ४८० :

इतक्यांत, लगबगीनें चालण्याचा प्रयत्न करीत असलेल्या एका कुबड आलेल्या म्हाताऱ्या पाटीवाल्याचा, अरुणाला एकदम धक्का लागला. त्यामुळें, अरुणनें चटकन् वळून त्याच्याकडे पाहिलें;.. म्हाताऱ्याची दीन दृष्टि अरुणकडे लागली होती. हातांतील पाटी संभाळीत, तो विनवणीच्या स्वरांत म्हणाला..'साहेऽब!'

तसल्याहि मनःस्थितींत, खिन्नपणें हंसून अरुण त्याला म्हणाला, ''कां?..असल्या भडकलेल्या मनानें रस्त्यांतून चालावयास नालायक, म्हणून साहेबाला टोपलींत घालून कां नेणार आहेस कुठं?...वेड्या म्हाताऱ्या, माझ्याकडे रे काय सामान आहे तर तूं मला हेल विचारतो आहेस?...''

''तसं न्हवं, साहेब!..'' पुन्हा केविंलवाणे पहात, अडखळत अडखळतच म्हातारा अरुणला म्हणाला, ''इलाजच चालना बगा..पाटी घेऊनशान् दुपारपून हिंडतोय्...पन् चार पैसेबि गवसनात! आतां म्यां म्हाताऱ्यांनं काय करावं सांगा? साहेब, एखादा दिडकीपैसा देत्याला,..तरी बी लइ उपकार व्हतील बगा!..म्हातारा चणेकुरमुरे घेऊनशान् पोट जाळील!...''

कांहीं महिन्यांपूर्वीची आपली असहाय्य धडपड व वरळी बीचवर चतर्जीबरोबर खाल्लेले चणे कुरमुरे... अरुणला सारे प्रसंग एकदम आठवले!..त्यानें त्या म्हाताऱ्याच्या सुरकुतलेल्या चेहऱ्याकडे क्षणभर सहानभूतीनें पाहिलें; व मुग्धपणें आपल्या खिशांतून एक आणेली काढून त्याच्या हातावर ठेविली!...पण ती घेऊन जातांना, त्या म्हाताऱ्याची आपल्याकडे लागलेली कृतज्ञतेची दृष्टि पाहून, अरुणला किंचित् दुःखच झालें; आणि तो आपल्याशींच पुटपुटला, ''कां बरं हें असं?.. मनुष्य म्हणून जिवंत असेपर्यंत याला आपल्या पोटाचा तरी जगांत हक्क आहे कीं नाहीं?.. प्रामणिक श्रमाची तयारी असूनहि तो आज असा कंगालपणें फिरत आहे!.. अशा वेळीं, त्याच्या आयुष्यांतील कमीत कमी व योग्य ती गरज, आजच्या एक दिवसापुरती तरी आपण अंशतः पुरवली!..या कर्तव्याबद्दल,..या माणुसकीबद्दलच,..त्याची ही उपकृत दृष्टि कां?''

पण मग अरुण स्वतःशींच हंसला. त्याच्या मनांत विचार आला..'जगाच्या भोंवतालच्या गोंधळी व्यवहारांत साधारणतः जें आढळत नाहीं, तें आपल्याकडे आहे, असं त्या म्हाताऱ्याला वाटलं, म्हणून'

: ४८१ :

असल्याच विचारांचा डोंब त्याचा हृदयांत धडधडत होता. अरुण व्यग्र मनानें चार पावलें पुढें चालून गेला. नेहमींच्या कोपऱ्यावरील पानपट्टीवाल्याकडून, त्यानें एक सुका कात मसाला बनवून घेतली, नवी सिगारेट पेटविली व तो पुन्हां गजबजलेल्या जनसंमर्दाकडे वळला.

थोडीशी दाढी वाढलेली, अंगांत फाटका सदरा, नेसलेलें काळें मचकट धोतर,..अशा वेषांतील एक मनुष्य तेथेंच कोपऱ्यावर उभा होता. अरुणाला पान खाऊन रस्त्याकडे वळतांना पाहातांच, तो लगबगीनें पुढें आला;..व त्याला हात जोडून म्हणाला, 'साहेब, एक दोन आण्यांचे पैसे देतां कां पोटाला!'

त्याच्याकडे न पाहिल्यासारखें करून, अरुण पुढें चालूं लागतांच,..तो त्याच्याजवळून हळूहळूं



चालत, आपल्याशींच बोलल्याप्रमाणें पुटपुटूं लागला. ''अरे राम राम राम!... आपलंच नशीब फिरलं त्याला कोण काय करणार? आई गऽ, पोटांत काही उठली आहे!...आतां अगदीं मरणाची पाळी आली; ईश्वरा, तुलाच रे दया या ब्राम्हणाची!...''

त्याची बतावणी तशीच पुढें चालली असती; आणि तिऱ्हाइताची सहानुभूति जागृत होऊन, त्याला ती खरीहि वाटली असती. पण अरुण मात्र कांहींएक न बोलतां, तसाच पुढें निघून गेला. कांहीं पावलें चालून लांब गेल्यावर एकदां तुच्छतेनें मागें वळून पहात, अरुण आपल्याशींच हंसून म्हणाला, ''वेड्या,...तुझीं हीं असलीं नाटकं मला आतांहि समजत नाहींत इतका दुधखुळा, दुर्बल बुद्धीचा मला ठरवतोस कां रे तूं?.. आज सहा महिने तुला पहातो आहे मी! तुझं नशीब अजूनहि कांहीं फिरत नाहीं अंऽ?.. आणि तरी, दोन आण्यांचे पैसे म्हणजे तुझ्या अगदीं हातचा मळच जणुं! दोन तीनदां कींव आली...पैसे दिले!...आतां ही तुझी लबाडी आणखी किती दिवस चालणार, बाबा?''

पण मग पुन्हा अरुणला वाटलें, ''हो, ही लबाडी खरीच..तरी पण जगांतील दुर्मिळ पैशासाठींच चालविली आहे ना त्यानें ती? नाहीं तरी...दुसऱ्याला नाहीं तर स्वतःला तरी फसवूनच, मनुष्य मिळवतो ना पैसे, या जगांत?...स्वतःची लबाडी मनुष्याला कधींच दिसत नाहीं एवढंच !...तेव्हां तुला त्याची लबाडी समजली, तर तू पाहिजे तर बाजूस हो!...पण त्याच्याकडे असं तुच्छतेनें पाहून हंसायचा, तुला तरी काय अधिकार, बाबा?''

: ४८२ :

चालतां चालतां सिगारेट तोंडांत धरून, ती शिलगावण्यासाठीं त्यानें काड्याची पेटी बाहेर काढली; पण तीमध्यें एकहि काडी नव्हती; नवीन पेटी घ्यावी म्हणून तो जवळच्या पानपट्टीवाल्याकडे वळला; आणि एक बॉक्स हातांत घेऊन, त्यानें बेभानपणें खिशांतून एक नाणें बाहेर काढलें व मोडीसाठीं वाट पहात उभा राहिला.

तेवढ्यांत, तो दुकानदार हात पुढें करून त्याच्याकडे हंसून पहात म्हणाला, ''साहेब, ही पावली रातपाळीची खरीऽ! पण आमच्या दुकानांत नाहीं चालणार!''

अरुण केवढ्यानें तरी दचकला. दुकानदाराच्या बोलण्याचा अर्थच त्याला प्रथम समजेना. पण त्यानें हात पुढें करून परत दिलेलें नाणें पहातांच, अरुणच्या डोळ्यांत चक्क प्रकाश पडला. मघापासून पुन्हा पुन्हा त्याच्याकडे परतणारी त्याच्या खिशांतील बद्द पावलीच होती ती!- अरुणला क्षणभर दुःख झालें, खिन्न वाटलें.. त्यावेळीं, त्यांच्या मनांतहि, तसला कांहीं विचार नव्हता! अगदीं निमूटपणें बारक्या खिशांतील सारीं नाणीं बाहेर काढून, त्यानें त्यांतील एक सुटी दिडकी

दुकानदाराच्या हातीं ठेवली, व तो पुढें चालूं लागला.

: ४८३ :

धुराच्या एक लोट सोडून, नुकताच घडलेला तो सारा प्रसंग आठवत, अरुण आपल्याशींच हंसला. चालतां चालतां क्षणभर थबकून, ती मघांपासून पुन्हा पुन्हा त्याच्याकडे मोर्चा वळवणारी व त्याला धक्के देणारी खोटी पावली, त्यानें खिशांतून बाहेर काढली; आणि रस्त्यांतील दिव्याच्या उजेडांत तिजकडे निरखून पहात, जणुं तिला उद्देशूनच तो खिन्नपणें हंसून म्हणाला, ''बाईऽग, माझ्या खिशांतील या पैशांपैकीं, प्रत्येक पैपैसाठीं मी माझं मन मारलं आहे;...रक्त आटवलं आहे!..पण तरी तुला माझ्या पदरीं बांधून, मला कोणीतरी फसवलं!..त्यांत माझा काय दोष सांग बरं?...तरी कंडक्टरनें किंचित् कुत्सिपणें मजकडे पाहूनच पुन्हा तुझी माझ्याकडे बोळवण केली!...मघांशीं, त्या आशानिराशेशीं झगडणाऱ्या भिकाऱ्यालाच तुला देऊन टाकणारा, निर्लज्ज घोर अपराधी ठरविलं असतेंस, मला तूं!...आणि आतां तर..त्या रस्त्यांतील दुसऱ्या भीक मागणाऱ्या माणसाकडे लबाड म्हणून कुत्सितपणें पहातां पहातां, माझी कल्पनाहि नसतांना, त्या तंबाखूवाल्याकडे भर रस्त्यांत, मलाच लबाड ठरवूं पहात होतीस तूं! आतां तूंच दुर्दैवी,..परिस्थितींनें खोटी ठरलीस!..त्याचा दोष मजवर कां बरं?''

आपल्या या विचारसरणीचें, अरुणला तसल्या मनःस्थितींतहि हसूं येत होतें. हळूहळू पावलें टाकीत, त्या पावलीकडे तसेंच पहात, तो पुढें चालूं लागला;...त्याच्या मनांत विचार येत होते...''पण आतां तुला मी देऊं तरी कोणाला?...हात उचलून कोणाला देईन म्हटलं तर अशक्य!..रस्त्यांत कुठं टाकून देईन, तर कोणी तुला उचलून घेईल;...फसेल...आणि त्याच्या फसवणुकीचं मीच कारण ठरून दोषास्पद होईन!...छेः छेः ! अप्रामाणिकांच्या हातींच यापुढे जेवढा वेळ, तूं घोटाळशील, तेवढा वेळेच फक्त तुला खरें नाणें म्हणून मिरवितां येईल! पण बाईऽग, जगांत तुला कुठंच स्थान देण्यांत अर्थ नाहीं! तुझा खोट्या खरेपणामुळें तूं आणखी किती अप्रमाणिकांना जास्त बिघडवशील,..आणि किती प्रामणिकांना चारचौघांत माझ्यासारखें मान खालीं घालण्याची पाळी आणशील,..कोणास ठाऊक?..माझ्या खिशांतील इतर खऱ्या नाण्यांत वागण्याची आपली अपात्रता तर आतां तूं खात्रीपूर्वक ठरविलीच आहेस!...तुला यापुढं जगांत कुठं स्थान द्यावं, तेंच मला या क्षणीं समजत नाहीं!...छे...किंबहुना तुला गटारांत टाकणंसुद्धा माझ्या जिवावर येत आहे!- त्यापेक्षां...हो असंच...अगदीं अमर्याद कालपर्यंत, कोणाच्याहि हातीं न आल्यामुळें,...तुला जगांत वावरतांच येणार नाहीं,...अशी खात्रीपूर्वक अपेक्षा करून चौपाटीवरील वाळूंतच अगदीं खोल समाधि देतो तुला आतां!..''



पाठीमागून येणाऱ्या मोटारीचा भोंगा मोठ्यानें वाजला;...आणि अरुण दचकून भानावर आला! -क्षणापूर्वीच आपण कोणत्या चमत्कारिक विचारसरणींत घोटाळत होतों हें आठवून, अरुण आपल्याशींच वेड्यासारखा पुन्हा खिन्नपणें मोठ्यानें हंसला!...

: ४८४ :

चौपाटीसमोर,...अपोलोबंदरापासून तो गव्हर्नर हाऊसच्या लाल बत्तीपर्यंत, साऱ्या बाजूनें त्याच्या दृष्टीला झगझगाट दिसत होता. फ्रेंच ब्रिजच्या कोपऱ्यावर '501' आणि '***SHELL***'च्या जाहिराती, दिव्यांनीं झळकत होत्या; पुन्हा विझत होत्या. तिकडे तसेच थबकत पहात पहात, अरुण सॅन्डहर्स्ट ब्रिजवरील रस्त्यानें 'एन. पॉवेल' कंपनीपर्यंत आला. त्यानें समोरचें घड्याळ पाहिलें. मागील दिव्याच्या उजेडांत, त्याच्या कांट्यांनी दाखविलें- नऊ वाजून चाळीस मिनिटें!

'अंः! इतकाच वेळ झाला?...' असें आपल्याशींच पुटपुटत, सिगारेटचा धूर सोडीत, मोटारीची हळूहळू कमी होणारी वर्दळ उगीचच पहात, अरुण थोडा वेळ तेथें उभा राहिला. 'आतां लौकर घरीं जाऊन तरी काय करायचं आहे? दुसऱ्या दिवशीं सुटीच! पण मग करायचं तरी काय? आणि जायचं तरी कुठं?..'

त्यानें लॅमिंग्टन रोडवरून लांबपर्यंत दृष्टि फिरविली. पहातां पहातां तेथील दोन्ही तीन्ही सिनेमांचे झगझगाट त्याला एकदम दिसले. कसलीहि कल्पना मनांत येण्यापूर्वीच त्याचे पाय त्या बाजूस फिरले!..कोठें तरी..कसें तरी...आपलें भकास मन रंजविण्याची आज त्याला फार इच्छा होती!...

थोडें पुढें चालून आल्यावर, बॅकरोडच्या नाक्याजवळील दोन हत्तींच्या दिव्यांकडे त्याची दृष्टि वळली. तो तसाच पुढें गेला. तेथील इम्पीरियल सिनेमाच्या कंपाऊंडच्या दारांत, कोपऱ्यावर बऱ्याच पाट्या दिव्याच्या झगझगाटांत झळकत होत्या. तिकडे त्यानें शून्य नजरेनें पाहिलें,.. वर लिहिलें होतें-'दर्दे दिल!..'

अरुण हंसला-अगदीं खिन्नपणें हंसला! आणि मग स्वतःशींच म्हणाला, ''या साऱ्यांची हृदयें अशीं फुटतात तरी कशीं? इकडे पोट सगळीकडे धिंगाणा घालत आहे!...आणि यांच्या हृदयांतून अश्रूंचे पूर वहाताहेत म्हणे!''

पुढील 'वेस्ट एन्ड'च्या दोन मोठ्या पुठ्ठ्याच्या पुतळ्यांकडे त्याचें तेवढ्यांतच लक्ष गेलें. तिकडे पहात तो दोन पावलें पुढें चालून गेला...'रणजित'चा एक काळा बुरखेवाला, दोन हातांत दोन बंदुकी घेऊन घोड्यावर सुटाच बसला होता!...आणि समोरच्या चित्रांतील अनेक माणसें भयभीत होऊन सैरावैरा पळत होतीं. तो तेथें अव्याहत चाललेला गोळीबार, जणुं काय अरुणच्या कानाचे

पडदेच फाडूं लागला. तिकडे खिन्नतेनें दृष्टिक्षेप टाकीत, स्मित करीत तो पुन्हा आपल्याशींच म्हणाला, ''बाबांनो, केवळ हिंदी म्हणून तुम्हाला उत्तेजन देण्यासाठीं, माझे पैसे खर्च करण्याची निदान आज तरी मुळींच इच्छा नाहीं! आज मला माझ्या मनाचं समाधान पाहिजे आहे! हो,...माझ्यासारख्या रक्तामांसाच्या साध्यासुध्या माणसाचं,..जिवंत जीवन पहावयास पाहिजे आहे!...माझ्या हृदयांतून काव्याचे पूरहि सुटलेले नाहींत!..आणि बंदुकींची मर्दुमकी गाजवण्याची तर मला त्याहूनहि कमी इच्छा आहे,...आज!''

: ४८५ :

अशा त्रस्त मनानें, अरुण थोडा पुढें चालून जातो, तों 'पाथे'च्या दारांतील निळसर दिव्यांची पाटी त्याच्या डोळ्यांत एकदम भरली. विजेच्या दिव्यांनी चकाकणारी ती पाटी! त्या दिवशींच्या फिल्मचें तें नांव होतें- ''The Least Necessity !''

तें नांव तर अरुणला अत्यंत आकर्षक वाटलें, ''जगांत जगतांनाची ही कमींत कमी गरज तरी कसली बरं, माणसाची?...पोट?- हो, अर्थातच जगण्यापुरता पैसा!..''

अशाप्रकारें त्याचें कुतूहल जागृत होऊन, त्यानें त्या पाटीखालचें मोठें चित्र फिरून एकदां निरखून पाहिलें- पुष्कळसा जमाव धांवाधांव करीत आहे;..सारा गोंधळ माजला आहे!..आणि कोपऱ्यांतील एक म्हातारा मनुष्य, अगदीं गांगरलेल्या दृष्टीनें त्या समोरील धडपडीकडे पहात आहे!-

अगदीं नकळत त्या म्हाताऱ्याच्या ठिकाणीं स्वतःलाच कल्पिलें गेल्यामुळें, अरुणला त्याखालच्या अपरिचित नटनटींची नांवें पहाण्याचेंहि भान राहिलें नाहीं!...आणि तो पाथेच्या मोठ्या फाटकांतून आंत शिरून, फुटपाथनें तिकिट ऑफिसकडे जाऊं लागला. तेवढ्यांत, आपण नटांची नांवें न पाहिल्याची त्याला आठवण होऊन तो थबकला; पण मग स्वतःशींच पुटपुटला, ''या नटांच्या नांवावरच नेहमीं जाऊन फसण्यापेक्षां, आज यांत कांहीं तरी जास्त सांपडेल खास!..''

: ४८६ :

गर्दी जवळजवळ नव्हतीच. तरी आपल्याकडे पैसे आहेत या कैफांतच, अरुणनें एक रुपाया दोन आण्याचें तिकिट काढलें. आंत शिरून तो शेवटच्या रांगेंत एका बाजूस बसला. पेटविलेली नवी सिगारेट चिमटींत धरून धूर सोडीत, त्यानें एकदां सबंध थिएटरमध्यें चौफेर नजर फिरविली!..तें चिक्कार भरलेलें त्यानें अनेकदां पाहिलें होतें. पण आज चार आण्यांत वीस पंचवीस, नऊ आण्यांत आठ दहा, त्याच्या आजूबाजूस चार पांच व मागील वर्गांत पंधरा वीस,...असा सगळ्या थिएटरमध्येंच एकंदर पन्नाससाठ माणसांचा जमाव होता!...



त्या दृश्यानें त्याच्या उत्साहावर क्षणभर पाणी पडल्यासारखें झालें. किंचित् उद्विग्न होऊन तो स्वतःशीच पुटपुटला, ''वाः!..केवढा मोठा उत्साह हा!..पण साहजिकच आहे म्हणा...हें कांहीं प्रेक्षकांच्या बदलत्या आवडीनिवडीप्रमाणें काळीं पांढरीं तोंडें करणारे एडी कँटर किंवा व्हीलर-वूल्से नव्हत!..जिवंत जीवन आहे हें!..तेव्हां केवळ विलासी बाजारबुणग्यांची गर्दी न लोटणें, हीहि आज 'least necessity'च आहे!

: ४८७ :

इतक्यांत घंटा वाजली; व पडदा उघडला!...

पहिल्या जाहिराती संपेपर्यंत, अरुण डोळे बंद करूनच खुर्चीवर स्वस्थपणें मागें टेकला होता!...पॅरामाऊंट न्यूजचें परिचित संगीत कानावर पडतांच, त्यानें पडद्याकडे पाहिलें. उत्तुंग शिखरावरून ढग हळूहळू जात होते;..तोंच राजेसाहेबांच्या भेटी व सोल्जरांच्या कवायती यांची फैर झडली!...अरुणचें सारें लक्ष मुख्य फिल्मकडे लागलें होतें...त्यामुळें शेवटीं, अगदी त्रासून तो स्वतःशींच पुटपुटला, ''सार्वभौम बादशहांचेच आम्ही प्रजानन आहों!...सैन्य, तोफा, बंदुका, यांनीं मनांत आल्यास तुम्ही हां हां म्हणतां आमचा फडशा उडवाल! आम्हाला पूर्ण कबूल आहे तें! पण आतां पुढली फिल्म तर कराल सुरू, कृपा करून!..''

तेवढ्यांत, तोंडांतल्या पाइपमधून धूर सोडीत, पॉपय खलाशी पडद्यावर नाचूं लागला. त्यानें शेवटीं आपलें रामबाण औषध खाल्लें व मग शक्तीच्या प्रयोगाचा एकच एक मोठा धुमाकूळ घातला!..त्यावेळीं मात्र, तसल्याहि खिन्न मनःस्थितींत अरुण क्षणभर खुदकन् हंसल्यावाचून राहिला नाहीं.

तोच फिल्मला सुरवात झाल्यामुळें अरुण पडद्याकडे पाहूं लागला!

: ४८८ :

स्कॉट हा, आंतरराष्ट्रीय गुप्तपोलीस खात्यांतील सूत्रधारी अंमलदारांना मदत करणारा गुन्हेगारशास्त्राचा प्रोफेसर! आपली सारी अक्कल जगांतील एकंदर गुन्हेगारीशीं लढण्यांत खर्च करून, त्यानें पोलिसांना फार मदत केली; लहानशा पगारावर गरिबींत दिवस काढले; आणि त्यांतूनच काय ती तुटपुंजी शिल्लक टाकली होती!...गुन्हेगार त्याला एरवीं घाबरत असले, तरी एक मनुष्य या दृष्टीनें, त्याच्या पुंजीवर डल्ला मारण्यास ते कचरत होते असें नव्हे!..एके दिवशीं बरोबर वेळ साधून, एका टोळीच्या मुख्यानें, पै पै करून साठवलेली स्कॉटची सारी मिळकत अचानक लंबे केली!...

ही हकीकत समजतांच, त्याच्या खात्याच्या निरनिराळ्या केंद्राहून त्याला सहानुभूतीचे संदेश

आले; चोर शोधून देण्याचीं त्याला सरकारी आश्वासनें मिळालीं..पण..त्या एकाकी अविवाहित म्हाताऱ्याची वृद्धापकाळांतील निर्धन व असहाय्य स्थिति, तेवढ्यानेंच कांहीं सुधारणार होती थोडीच?..

: ४८९ :

हजारों साळसूद चोरदरोडेखोर, त्याच्या पहाण्यांतच, लुटारू पद्धतीनें लाखों डॉलर मिळवून, केवळ पुराव्याच्या अभावीं सुटल्यामुळें, ते पचवूं शकल्याचें आपल्या आयुष्यभर तो पहात आला होता,..त्यांतील कांहीं तर उजळ माध्यानें जगांतील श्रीमंतांत गणले जात होते,..सभ्य गृहस्थाचें कातडें पांघरून वावरत होते!..पण इतकें असूनहि, ध्येयवादी दृष्टिनें अत्यंत गरिबींत सुरू केलेल्या आपल्या प्रामाणिक आयुष्याच्या सुरवातीस स्कॉटची जी परिस्थिति होती, तशीच तीं आज त्याच्या म्हातारपणींहि आली होती!...किंबहुना जगांतील फसवेगिरीबरोबर, आपल्या तीक्ष्ण बुद्धीचा आटोकाट उपयोग करून, धीरानें व प्रामणिकपणें साऱ्या आयुष्यभर असे लढतां लढतां,..आपल्या तुटपुंज्या मिळकतींतून त्यानें आतांपर्यंत जी शिल्लक टाकली होती,...तीहि सारीच्या सारी, तो आज एका क्षणांत चुटकीसरशीं गमावून बसला होता!...प्रामाणिक गरीब माणसांनादेखील फसविणाऱ्या गुन्हेगारांची संख्या, त्याच्या आयुष्याच्या साऱ्या लढ्यानंतरहि आहे तशीच होती!.. तें जाणवून, त्याला प्रत्येक क्षणाला जास्त जास्तच दुःख वाटत होतें.

किती तरी वेळ तो तसाच विचार करीत होता,-''हल्लींच्या समाजव्यवस्थेंत ही गुन्हेगारी नष्ट होणं कधींच शक्य नाहीं! मुळांतच बदल झाल्याशिवाय आपली ही धडपडहि एकंदरींत व्यर्थच!..आणि ज्या प्रामणिक जगासाठीं- त्याचा एक प्रतिनिधी म्हणून आपण या गुन्हेगारवर्गाशीं स्वतः गरिबी सोसूनहि मोठ्या धीरानें आयुष्यभर झुंजलों,...त्या जगानें तरी आपल्याला आजच्या असहाय्य गरिबींत शाब्दिक सहानुभूतिशिवाय काय दिलं?..आणि तरीदेखील हे सारे वेडे लोक,...आजहि आपल्याला तसंच पुढें जाण्यास सांगत आहेत उलट!...पण साऱ्या आयुष्यभर धीर धरून, ध्येयप्रेरित चिकाटी व प्रामणिकपणा हृदयाशीं बाळगून, मिळविलेलं सारं सर्वस्वच जिथें आपण चुटकीसरसं गमावून बसलों,.. तेथें आपल्या राहिलेल्या लहानग्या म्हातारपणच्या सरत्या आयुष्याची पळतीं पळें...त्याच प्रामणिकपणाचा आश्रय घेऊन जगांत घालवून कसं चालणार? पैशाशिवाय कोण कोणाला विचारणार?...''

: ४९० :

असल्याच खिन्न व हताश विचारांचा वणवा, स्कॉटच्या हृदयाला लागला होता! आणि आपल्या बंडखोर मनाला लगाम घालीत, तो बिछान्यावर तळमळत पडला होता.



-याच ठिकाणीं कथानकाची सुरवात झाली होती. पुढे काय होणार या उत्कंठनें अरुण धडधडत्या छातीनें चित्रपटाकडे पाहूं लागला!-

...इतक्यांत, त्या काळोख्या खोलीच्या खिडकीच्या तावदानाला भोंक पाडून, एक हात आंत आला. तिची कडी उघडली गेली व हातांत रिव्हाल्व्हर घेतलेला एक चोर, दबकत दबकत आंत शिरला.

स्कॉटनें ते पाहिलें. पण तो तसाच बिछान्यावर पडून राहिला होता...चोर हळूहळू चालत टेबलाजवळ गेला. आपल्या खिशांतील चाव्याचा घोंस काढून, टॉर्चच्या प्रकाशांत त्यानें भरभर सारे खण उघडले; आणि त्यांतील सामान टेबलावर अस्ताव्यस्त टाकून त्यांत तो कांहीं तरी शोधूं लागला.-

''अं हं,..एक कपर्दिकहि सांपडणार नाहीं त्यांत तुम्हांला!'' स्कॉट बिछान्यावर पडल्या पडल्याच, कांहींएक हालचाल न करतां, खिन्नपणें हंसून त्याला म्हणाला, ''कारण तुमच्या एका धंदेवाईक दोस्तानें, मला चार दिवसांपूर्वीच नागवलं आहे!...तुम्ही जरा उशीरां आलांत...''

काळोखांतून अचानक आलेले स्कॉटचे ते शब्द ऐकतांच, तो चोर पटकन् उलट फिरला; आणि रिव्हाल्वर व टॉर्च त्या बाजूस रोखून, दबल्या आवाजानें त्याला दम देत तो म्हणाला, ''खबरदार,- जरा हालचाल कराल तर जीव गमावून बसाल आपला!...

''माझ्याकडे आज पैसे नाहींत त्यांत माझा काय बरं दोष?..'' स्कॉट तसाच बिछान्यावर स्तब्ध पडल्या पडल्या त्याला पुन्हा म्हणाला, ''पण थांबा, अशी अविचारानें मला गोळी घालूं नका! मला मारून टाकून तुमचं मुळींच चालणार नाहीं!..मी कफल्लक झालो असलो, तरी माझा उपयोग करून घेतां येईल तुम्हाला अजून...आतां तुम्ही उभें आहां त्याच्या मागल्या बाजूस, भिंतीला दिव्याचं बटन आहे; तें दाबून प्रथम दिवा लावा!..आणि नंतर आपण थोडा वेळ स्नेहानें बोलूंया. मी बोलतो तें तुम्हाला पटलं तर ठीकच;.. नाहीं तर तुमची इच्छा असल्यास मला खुशाल मारा मागाहून!...''

: ४९१ :

आश्चर्यानें गांगरूनच,..चोर थोडा वेळ जागच्या जागीं थबकला! त्यानें स्कॉटच्या बाजूस काळोखांत पिस्तूल तसेंच रोखलेलें धरून, दुसऱ्या हातानें बटन दाबून खोलींत उजेड पाडला, व स्कॉटकडे पिस्तूल रोखून तो दबकत दबकत पुढें पावलें टाकूं लागला.

स्कॉटजवळ कांहीं एक शस्त्र नव्हतें. उलट तो त्याच्याकडे पाहून हंसत, कॉटवरून उठला व आपल्या हालचालीवरून फिरणाऱ्या चोराच्या संशयी डोळ्याकडे पाहून हळूंच म्हणाला, ''माझ्यावर

आतां थोडा विश्वास ठेवा;...तुम्हाला माझ्याकडून कसलाच धोका पोहोचणार नाहीं. असं पहा, तुम्हाला भूकबीक लागली असेल कदाचित्...तर आपण त्या मधल्या टेबलाजवळ बसून चार मस्कास्लाइस खाऊं, दूध पिऊं; आणि मग एकमेकांशी अगदीं महत्त्वाचा विचार विनिमय करूं!''

आणि चोराच्या उत्तराची किंचित् देखील वाट न पहातां, स्कॉट खाद्यपेयांची जमवाजमव करूं लागला. चोर आपलें पिस्तूल त्याच्यावर रोखून धरून, त्याच्या मागून मागून, तो जाई तेथें सारखा फिरत होता. शेवटी साऱ्या वस्तू टेबलावर ठेवून स्कॉट बसल्यावर तो त्याच्या समोरच्या खुर्चीवर बसला. त्यालाहि आतां विश्वास वाटूं लागला होता. इतक्यांत, निर्विकार दृष्टीनें पावाला मस्का लावतां लावतां, स्कॉट त्याच्याकडे अर्धवट वर पाहून म्हणाला, ''हंः आतां माझी ओळख करून देतो मी तुम्हांला!- गेलीं अनेक वर्षे, तुमच्या धंद्याचा शत्रु म्हणून ज्याचं नांव तुम्ही ऐकलं असेल,..तो 'ऑलिव्हर स्कॉट' मीच!-''

: ४९२ :

ते शब्द ऐकतांच, तो चोर पुन्हा एकदम मोठ्यानें दचकून, आपलें पिस्तूल सरसावत स्कॉटसमोर पटकन् उभा राहिला. तरी पण, स्कॉट तितक्याच शांततेनें पावाला मस्का लावीत, बसल्या ठिकाणाहून जरा सुद्धा न हलतां, त्याच्याकडे स्मितयुक्त पहात पुढें म्हणाला, ''थांबा..असं घाबरून जाऊं नका मुळींच!..तो कालपर्यंतचा प्रामाणिक ध्येयवादी स्कॉट आज जिवंत नाहीं. आज या घटकेला समोर दिसत आहे तुमच्या, तें त्याचं भूतच आहे म्हणाना! पण म्हणूनच तुम्हाला आशेला जागा आहे! कारण, आतां ती परिस्थिति वरवर तशींच कायम ठेवून, मी व माझ्यावरील आंतरराष्ट्रीय पोलिसखात्याचा असलेला विश्वास, यांचा तुम्हां लोकांना व मलाहि किती मोठ्या प्रमाणांत उपयोग करून घेता येईल? आणि तें आपणां दोघांनाहीं किती फायदेशीर होऊं शकेल?...त्याचा क्षणभर विचार करा! एक अगदीं चुणुक म्हणून सांगतो,...माझ्या माहितीप्रमाणें दहा दिवसांनतर, सोन्याच्या लगडी भरलेलें एक सरकारी जहाज एका खाडींतून एक ठिकाणीं जावयाचं आहे!...हीच बित्तंबातमी तुम्हाला समजली तर?..अशाच अनेक गोष्टी या माझ्या लहानग्या डोक्यांत आहेत! तेव्हां तुमचा विश्वास असेल, तर आपण एकमेकांवर विश्वास टाकून उद्यांपासून एकंदर तीन महिन्यांचा कार्यक्रम आंखूं या! तुमच्या साऱ्या टोळीचं कर्तृत्व,.. व हें माझं लहानगं डोकं! एवढ्याशा लहान मुदतींतहि,...आपणा सर्वांना लाखानें डॉलर मिळवितां येतील!..''

: ४९३ :

यानंतर एकदम इन्टर्व्हलचा पडदा पडला!...अरुण स्कॉटशी समरस होऊन तिकडे पहात असल्यामुळें, त्याच्या भावना अगदीं उचंबळून आल्या होत्या! आणि मध्येंच असा एकाएकीं खंड



पडल्यामुळें, त्याचा एकदम विरसच झाला!- 'आतां दहा मिनिटं करावयाचं काय,' या विचारानें अरुणनें खिशांतून एक सिगारेट काढून पेटवली, व धूर सोडीत तो जागेवरून उठून बाहेर आला.

स्कॉटच्या विचारसरणीशीं अरुण अगदीं एकरूप झाला होता. त्यानें यापुढें लाखो डॉलर्स मिळविले असते, तर अरुणला अतिशय आनंदच झाला असता!...आणि जहाजांच्या हालचालीची वगैरे एकंदर बित्तंबातमी, मोठमोठ्या पोलिस अंमलदारांशी प्रत्यक्ष ओळख व त्यांच्यावरील वजन, आणि सर्वात महत्त्वाचें म्हणजे स्कॉटनें ठरविलेली ही नवी धूर्त व दुटप्पी वागणूक,...या साऱ्यांच्या बळावर, तो त्या कार्यक्रमांत नक्कीच यशस्वी होणार!...अशी अरुणच्या मनाला खात्री वाटत होती;...त्याचें मन त्याला तशी ग्वाही देत होतें!...आणि खरेंच, तसेंच सर्व घडून येतें, तर त्या मनःस्थितींतील अरुणइतका दुसरा कोणीहि आनंदित होता ना!..

याच प्रकारच्या साऱ्या उत्कंठेने, अरुणला मधला वेळ धीर धरवेना. तोंच त्याच्या मनांत पटकन् एक कल्पना आली- तो घाईघाईनें मॅनेजरच्या ऑफिसकडे गेला. त्यानें खिडकींतून एक नाणें टाकलें व पॅम्फ्लेट हस्तगत केलें. अत्यंत धडधडत्या छातीनें त्यानें तें उघडलें;...आणि त्यांतील आतांच पडद्यावर पाहिलेल्या प्रसंगांपुढील कथानकाचा गोषवारा भरभर वाचून काढला!...

: ४९४ :

...त्या बैठकींत व त्यानंतर झालेल्या विचारविनिमयांत ठरल्याप्रमाणें, स्कॉट त्या बदमाशांच्या टोळीला गुप्तपणें जाऊन मिळाला. त्यानें आपल्या करारांप्रमाणे योग्य त्या वेळीं योग्य त्या सूचना त्यांना दिल्या. पहिली लूट त्या सोन्याच्या जहाजाचीच करावयाचें ठरलें होतें. स्कॉट त्या जहाजाच्या दिशेनें, संकेतात्मक संदेश देत, निरनिराळ्या मुख्य अंमलदाराना नेहमींप्रमाणे मानाच्या व विचार विनिमयाच्या भेटी देत, देशाच्या प्रत्येक भागाभागांतून फिरत होता!...आणि त्याच्या त्या दुटप्पी धोरणांत त्याला बरेंच यशहि येत होतें!...

...इतक्यांत, कोलंबियाच्या एका मानसशास्त्रीय संस्थेतर्फे गुन्हेगारांच्या मानसशास्त्रविषयीं झालेल्या त्याच्या अधिकारी व्याख्यानांत, गुन्हेगारीविरुद्ध तो आवेशानें बोलत असतांना, त्याच्या मनांतहि एक भयंकर झगडा उभा राहिला! ''तूं तर जगांतील सर्वांत मोठा गुन्हेगार!-'' अशा प्रकारें त्याचें मन त्याला ओरडून सांगूं लागलें; आणि साऱ्या आयुष्यभर प्रामणिकपणें जगलेला तो म्हातारा, आपल्या या नवख्या गुप्त गुन्हेगारीच्या तीव्र जाणीवेनें, व्याख्यान देतां देतां दचकून, एकदम हृदयक्रिया बंद होऊन स्टेजवरून धाडकन् खालीं पडला!...

आणि पुढें?..तें ठराविकच होतें!..एकाएकीं सारे मनोरे ढांसळले,...बेत विस्कळीत झाले;..त्यामुळें त्या बदमाशांच्या टोळीची अगदीं दाणादाण उडाली!..आणि शेवटीं, प्रामाणिकपणासाठीं झगडणाऱ्या

पोलिसखात्याच्या बेड्या पडून, ते सारे तुरुंगाकडे चालूं लागले!...

: ४९५ :

सारें वाचून झाल्यावर, निराशेच्या खिन्न सुस्काऱ्याबरोबर, अरुणानें तोंडातील धुराचा एक मोठा थोरला भपकारा सोडला!...तें हातांतील बुकलेट सटकन् रस्त्यावर झुगारून दिलें!.. आणि पाथे सिनेमाच्या लॅमिंग्टनरोडकडील मोठ्या फाटकाकडे तो वळला-

चालतां चालतां, खिन्नपणें स्वतःशींच हंसून तो म्हणाला, ''एथून तेथून सारेच दांभिक साले! आपल्या न्यायीपणाच्या लौकिक प्रदर्शनासाठीं,...कृत्रिमतेचें, दंभाचें पांघरूण घेतलेल्या या लेखक-डायरेक्टरांनीं, स्कॉटसारख्या बुद्धिमान् माणसालाहि,..आपल्या हातांतील कचकड्याच्या बाहुल्याप्रमाणें वागविलं आहे! आणि म्हणतात मारे-'पुढील चमत्कारिक भाग रुपेरी पडद्यावर बघा!'...छेः आतां हा सारा भिकार भाग पहातो कोण?...''

: ४९६ :

असेंच बेभानपणें आणखी थोडें भटकून, शेवटीं आपल्या भुलेश्वरच्या खोलीकडे परतण्यासाठीं अरुण बॅकरोडनें चालूं लागला!

रस्त्यांतील वर्दळ बरीच कमी झाली होती. बहुतेक दुकानें बंद झालीं होतीं!. एखाद दुसरी व्हिक्टोरिया जातां येतांनाचा घोड्यांच्या टापांचा टप्‌टप् आवाज,..किंवा भर्कन् निघून जाणाऱ्या एखाद्या मोटारीच्या हॉर्नचा धांवता आवाज;...कोठें तुरळक तुरळक जात असलेल्या माणसांचे शांतता स्पष्ट भासविणारें हळूंहळूं बोलणें;..याशिवाय त्याच्या आधींच सुन्न झालेल्या कर्णपटावर, तेथें कांहीं देखील पडत नव्हतें!..

प्रार्थनासमाजजवळील एका पानपट्टीवाल्याकडून त्यानें 'देशी मसाला' बनवून घेऊन तोंडांत कोंबलें!..आणि एक नवी सिगारेट पेटवून, तो रस्त्याच्या कडेनें हळूहळू पुढें चालूं लागला!

स्कॉटचें चित्र त्याच्या डोळ्यासमोर पुन्हांपुन्हां उभें रहात होतें;..आणि त्याला वाटत होतें- ''बाबूलालला आपण मागें दोषी ठरविलें;..कुळकर्णी वार्डरविषयीं आपल्याला सहानुभूति वाटली, तरी आपण त्यांची कींवच करीत होतों;..दोन आणे मागणाऱ्या त्या संभावित भिकाऱ्याकडे पाहूनहि आपण आजच तुच्छतेनें हंसलों होतों. कां बरं?..त्यांची तरी जगांत कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें जगण्याची ती धडपडच ना,..साऱ्यांची?..मग त्यांना कां हंसायचं आणि वाईट म्हणायचं?..जगांतील प्रत्येक पाऊल जर केवळ पैशानेंच पडतं, तर मग प्रामणिकपणा आणि इतर मोठमोठीं ध्येयें तरी कसलीं आलीं त्यांच्यापुढें?..''



समोरील एका हॉटेलामधून येणाऱ्या प्रकाशाच्या झोतांत, त्याच्या पुढून भर्कन निघून जाणाऱ्या धावत्या व्हिक्टोरियांत, आनंदानें हंसत कुजबुजत अगदीं जवळ जवळ बसलेलें एक जोडपें त्याला दिसलें!

अरुणनें तिकडे दृष्टि वळवली; पण त्यांच्या त्या सुखामुळें अरुणला आनंद होण्याऐवजीं, त्याच्या मनानें एकदम दुसऱ्याच टोकाला उडी मारली! आणि मागें सोनापुरांत बाबुलालकडे तो दोन तीन दिवस असतांना, त्याच्यासमोरून सारखी होत असलेली, लडलड हालणाऱ्या निर्जीव प्रेतांची हालचाल, एकदम त्याच्यापुढें उभी राहिली!

आपल्याशींच खिन्नपणें सुस्कारा टाकून तो म्हणाला, ''काय मूर्ख आम्हीं मनुष्य प्राणी! असल्या या क्षणिक आनंदाचा कैफ चढून, त्यांना वाटत असतें, आपण अगदीं जग जिकलें! पण त्या पलीकडच्या प्रेतांकडे जरा दृष्टि टाका म्हणावं!..जग म्हणजे बजबजपुरी!..हें ठाऊक असून तुम्हीं जाणून बुजून डोळ्यावर कांतडें ओढतां! आणि मूर्खासारखे आंतल्या मातीला वर रंग लावून त्यांतच रममाण होऊन राहतां! तुम्ही सुखी आहां असं तुम्हांला वाटतं!...पण ते तिकडे लाखो दुःखी आहेत! आज आपल्याला कसली ददात नाहीं असें तुम्हांला वाटत असेल!.. पण दुसरे असंख्य - कदाचित् तुमच्याहूनही जास्त श्रेष्ठ - केवळ चण्याकुरमुऱ्यासाठीं तळमळत आहेत!...''

चतर्जीच्या चणे वेंचून खाण्याची अरुणला आठवण झाली!

: ४९६ :

पण मग त्याला पुन्हा वाटलें, ''विषमता जगांत कोठें नाही? चौफेर आहे! कबूल!.. दुःख सगळीकडे भरपूर भरलेलं आहे! मान्य!... पण मग एकच व्यक्ति, अशा किती किती संस्कारांना तोंड देणार?... त्यांच्या भोंवतालच्या स्वार्थाच्या या लहान लहान कक्षा पाहून, त्यांना हंसण्यांत तरी अर्थ काय? आपल्या कक्षा तशा ते लहान लहान करीत आहेत, म्हणूनच ठीक! म्हणूनच आहे तेवढं तरी सुख जगांत पहावयास मिळतं! कसलीं.. मोठमोठीं ध्येयें? कसलं प्रामाणिक - अप्रामाणिक जीवन??... सारे वेडे विचार!.. जगांत तसं चांगलं वाईट कांहीं एक नाहीं! सुख - मग तें लहानमोठं कसंहि असो - हेंच प्रत्येकाचं ध्येय आहे!- शेवटीं या भोंवतालच्या कोलाहलांत, या जीवन-कलहाला... जो जोरानें धीरानें तोंड देतो,... खूब खूब पैसा मिळवतो,... तोच यशस्वी!.. तोच मोठा!..''

-शेवटीं, बराच वेळ चघळलेला आपल्या तोंडांतील पानाचा चोथा अरुणनें थुंकून टाकला!... दुसरी एक सिगारेट शिलगावली आणि जणूं, त्या धुराच्या लोळाबरोबर व तिच्या जळत्या टोंकाच्या उजेडांतच,... आपल्या खोलीकडे वळण्यासाठीं तो एका काळोख्या बोळांत शिरला!..

: ४९७ :

इयूक्स नोझजवळून गाडी दुसऱ्या बाजूस वळल्यावर, अरुणला समोरची खोल रखरखलेली दरी दिसूं लागली. डब्यांत तो एकटाच होता!...

काळसर जांभळ्या रंगाची खिडकीची कांच अरुणनें खालीं पाडली व मऊ गादीवरून उठून, तो बाहेर तोंड काढीत चौफेर दृष्टि टाकूं लागला. किंचित् उष्ण वारा वहात होता; आणि अरुणच्या डोक्यावरील केस भुरभुरत होते. दाढीचा दाट थर किंचित् लवलवत होता. छाया-प्रकाश, दरी-दरडी, वाळलेलें तृण व झाडांची हिरवळ,... हा एकच एक विरोधाभास,... तो ज्या बाजूस दृष्टि वळवील तिकडे त्याला दिसत होता!..

शेवटीं, खालीं वांकून रुळाजवळील मागें धांवणाऱ्या जमिनीकडे त्यानें पाहिलें; तशीच आणखी आपल्या धांवत्या गाडीच्या खडखडाट करणाऱ्या चाकांकडे व मग त्यावरीलच आपल्या डब्याच्या बाहेरील बाजूच्या $\frac{\text{G.I.P.}}{1}$ या दाराजवळील अक्षरांकडे ओझरती नजर टाकली; आणि हातांतील सिगारेटचें जळतें थोटूक एकदा ओठाला लावून, त्यानें तें खालीं भिरकावलें! त्याच्या तोंडातून बाहेर पडलेला धूर, हवेंत पटकन् कोठच्या कोठें मिसळला;... खालच्या मागें सटकणाऱ्या जमिनीवर पडलेल्या जळत्या थोटकांतून चटकन् किटाळें उडून अदृश्य झालीं!..

किंचित् चमकूनच आपलें तोंड आंत घेऊन, अरुणनें खिडकीची कांच लावली. जवळचीं बटनें दाबून, डोक्यावरील पंखे सुरूं केले; आणि खिडकीजवळच्या मऊ गादीवरील प्लेअरचा डबा हातांत घेऊन, त्यानें तेथेंच ऐसपैस अंग टाकलें!. तोंडांत धरलेली सिगारेट शिलगावून, त्यांतून निघणाऱ्या धुराकडे पहात तसें निश्चल पडून रहाण्यांतहि, त्याला एक प्रकारचा आनंद वाटत होता त्याक्षणीं!..

: ४९८ :

तो उजव्या कुशीवर वळला; तेव्हां त्याच्या आंतल्या खिशांतील लठ्ठ पाकीट त्याच्या अंगाला बोचलें. तो झटकन् उठला; त्यानें अंगांतील कोट काढला व तो उशाशीं ठेवावा म्हणून, त्याची तो घडी करूं लागला.. तोंच, खिशांतील पाकिटानें पुन्हा 'खळ्ळ्' असा मंजुळ ध्वनि करून, 'तूं खूप श्रीमंत आहेस आज, बेट्या!' असा जणूं त्याला कौल दिला. अरुण आपल्याशींच हंसला. त्यानें पाकीट बाहेर काढलें व तें उघडून त्यांतील नोटांची पुडकीं तो मोजूं लागला.

तोंडांत सिगारेट धरून, डोळे किंचित् बारीक करीत, तो पाकिटांतील पैसे मोजीत होता. प्रथम,.. पंख्याच्या कृत्रिम वाऱ्यावर फडफडणाऱ्या सहा सात शंभराच्या नोटा, त्यानें नंबर, अक्षरें आणि सही यांसह किती तरी वेळ न्याहाळल्या. नंतर दहांचीं टांचलेलीं दोन तीन पुडकीं तो चाळूं



लागला. तशाच अस्ताव्यस्त आंत कोंबलेल्या पांचांच्या नोटा, नीट घडी करून एकेठिकाणीं ठेवतांना, त्याचे डोळे क्षणभरच चमकले. शेवटीं, रोख रुपयांनीं फुगलेला पाकिटाचा कप्पा एकाग्र डोळ्यानें पहात, एका कडेला पाकीट धरून त्यानें तें खळखळविलें!..

-आणि मग, तो स्वतःशींच एकदां वेड्यासारखें खदखदां हंसून, किंचित् गर्विष्ठ नजरेनें हातांतील पाकिटाकडे व त्या नोटांच्या पुडक्यांकडे पहात पुटपुटला, ''हँः-!... मुंबईचा सत्तर पंचाहत्तर रुपये पगाराचा एक गुलाम - नोकरडा,... विड्याच्या बंडलासारखीं 'प्लेअर' चीं टिनें जाळीत, फर्स्ट क्लासच्या गादीवर तो आज ऐसपैस पहुडला आहे!... हँः हँः!...''

: ४९९ :

त्या दिवशीं, स्कॉट हृदयक्रिया बंद पडून मेल्याचें पडद्यावर पाहिल्या-ऐकल्यापासून, अरुणच्या अंगांत त्याचेंच भूत संचारलें होतें, जणुं काय!.. पण अरुण स्कॉटसारखा एखादा आंतरराष्ट्रीय गुप्त पोलीस खात्याचा जबाबदार अंमलदार नव्हता, कीं त्याला त्याच्यासारखी दुटप्पी वृत्ति पुढें चालवून, अमाप पैसा गांठीं बांधतां येणार होता!... साधा व्यापारी चित्रकार - नोकर तो!.. मॅनेजरच्या आवडीचें 'झटपट रंगाऱ्या'चें काम करतां करतांच, त्याचें आतांपर्यंतचें नोकरीचें आयुष्य निघून गेलें होतें!...

पण मग - तरी देखील तसले पैशाच्या अगणित माहात्म्याचे विचार, त्याच्या डोक्यांत सारखे घोळत रहावेत, यांत नवल नव्हतें!... त्या मनःस्थितींत, श्रीमंतीच्या लोडाला टेकून पैसे मोजल्याच्या स्वप्नांतून, अनेक वेळां तो दचकून जागा होत असे.-

: ५०० :

पण आजचें मात्र हें स्वप्न नव्हतें!... तो सत्यसृष्टींतच तें सारें करीत होता!...

''रेसचे घोडे व त्यावर बसलेले जॉकी दारूनें धुंद होऊन, धांपा टाकीत गरगर वाटोळे धांवतात - आणि लोकांचीं नशिबें उघडून वाटोळ्या रुपयांच्या थैल्या बांधून, ते घरीं आणतात!'' हें वाक्य त्यानें प्रथम ऐकलें, तेव्हां... 'मूर्ख बेटे!' असें म्हणून तो हंसला होता. तें पुन्हा ऐकलें, तेव्हां त्याचा संशय द्विगुणित होऊन त्यानें त्यांतील माहिती मिळविली होती आणि शेवटीं, पैसे मिळतात कीं नाहीं हें नक्की माहीत नव्हतें, तरी पैसे मिळाले तर मात्र तेथील रुपयाचीहि किंमत सोळा आणे असते असें समजल्यामुळें, त्यानें चार आणे खर्चून एक पिवळ्या रंगाचा 'लखपतीऽ' विकत घेतला होता!..

: ५०१ :

त्यानंतर, त्यामुळेंच त्याला जगाकडे पहाण्याची नवी दृष्टि आली!..

जास्त माहिती डोक्यांत शिरली नाहीं, तरी हळूंहळूं त्याला घोड्यांचीं नांवें मात्र पाठ झालीं!.. द्विपाद वीरकुमार आज जगांत सहसा आढळणें एकाद्या वेळीं अशक्य!.. पण चतुष्पाद 'वीरकुमार' प्रत्येक क्षणाला घोडा-मैदान जवळ आहे असें दाखवितात! 'जयभवानी' म्हणून इतिहासकालीं मराठ्यांनीं राज्यवैभव संपादिलें; पण आतांहि, 'जयभवानी' म्हणत कांहीं मराठे वैभव घरीं आणतात!.. 'कंदाहार' वाळवंट असलें तरी तेथेंहि क्वचित् पैशाच्या खाणी सांपडतात!.. 'बिस्मार्क'नें जर्मनीला एकदां स्वातंत्र्य दिलें. हा 'दुसरा बिस्मार्क' केव्हां कोणाला स्वतंत्र करील सांगतां येणार नाहीं! वर्तमानपत्री फोटोंत 'हिटलर' किंचित् क्रूर दिसतो खरा; पण रेसच्या राज्यांत मात्र कधीं कधीं त्याला कवटाळावेसें वाटतें!.. 'फिलिप सिडने' मागें रणांगणावर मरतां मरतां म्हणाला होता, 'माझ्यापेक्षां तुझीच जरूरी जास्त आहे' - पण मग, तो आतांहि कधीं कधीं धावतां धावतां तसंच म्हणतो कीं!..

या असल्या सगळ्या ठोकताळ्यांवरून त्याची शेवटीं खात्री झाली, कीं, ''घोडे पळतात आणि कित्येक गाढवांचे नशीब फळफळतें!-''

पण रस्तोरस्तीं 'लखपतीऽ' होणाऱ्यांची थबकणारी दाटी पाहून, अरुणनेंहि शेवटीं ठरविलें, की... या नशिबवान् गाढवांच्या यादींत स्वतः शिरावयाचें!...

ईस्टरमुळें चार दिवसांची अचानक सुटी आली होती. कधीं काळीं, भाई टागोर भेटले तर त्यांना द्यावयासाठीं बाजूस राखून ठेवलेले सव्वाशे रुपये अरुणनें पोष्टांतून काढले व खिशांत कोंबले!.. आणि दुसऱ्या दिवशींच्या शेवटच्या कोल्हापूर रेसला हजर रहाण्यासाठीं, जास्त विचार न करतां, संध्याकाळीं बोरीबंदरावर गाडींत पाय टाकला!

: ५०२ :

सिल्कचा लांब अंगरखा, धोतराचा सुटा बंगाली सोगा, उघड्या डोक्याचे भुरभुरते केंस... आणि एका हातांत पिवळें पुस्तक व दुसऱ्या हातांत - चार लोक घेतात म्हणून - एक पेन्सील, अशा थाटांत सेकंड क्लास एन्क्लोजरमध्यें, रखरखत्या उन्हांतून, अरुण एकडे तिकडे भटकत होता!...

तेथील तें खवळलेलें वातावरण, त्याला सारेंच नवीन होतें,... सर्व प्रकारचे लोक तेथें जमले होते. कोणी कंपूकंपू करून, 'बुकी' कडे मिळणारीं फुकटीं पत्रकें, कोणी वर्तमानपत्राची फाडून आणलेलीं पानें, कोणी मराठी रेस पुस्तकें, तर कोणी इंग्रजी 'मोती लखपतीं'चे भारेच्या भारे चाळत,... पंचवीस मिनिटांनीं धावणाऱ्या घोड्यांमध्यें येणाऱ्या पहिल्या तीन नंबरांचें भविष्य वर्तवीत होते!... कोणी फळ्यावर खडूनें लिहिलेल्या जॉकींचीं नांवें घाईघाईनें उतरून घेऊन,



त्यांतील प्रत्येकाच्या हुषारीचा चित्रगुप्ती पुरावा, आपापल्या टिपणावरून गोळा करीत होते. गलगला चालूंच होता!- ''नक्की आजचीही रेस मॅकेंडचीच!..'' ''बोंबला!.. व्हाइट साईड आणि ब्रीट आहेत, माझे आईऽ!.. ते काय झोंपा घेणार आहेत वाटतं रेसमध्यें!'' ''अरे, फेवरिट जॉकी-घोड्यांवर जाऊं नका!.. आजची रेस आहे... फ्लूकची!'' ''राइट् यू आर बाबूराव, पण कोणावर भर आहे तुमचा म्हणतां?.. खलील कीं भीमराव?'' ''मरा!... आम्हाला भागीदारी नको आहे तुमची!... एकटेच मरूं किंवा तरूं!...''

: ५०३ :

सबंध एक चक्कर मारून, पुन्हां टोटलायझरच्या ऑफिसपाशीं येईपर्यंत, अरुणनें असे अनेक आवाज ऐकले व विविध चेहरे पाहिले. तेथला टोटचा भव्य यांत्रिक फळा, क्षणाक्षणाला आपलें स्वरूप पालटत होता. ग्रँड टोटलचा आंकडा सारखा गरगरत होता. नंबरांखालचीं तिकिट विक्री विषम पद्धतीनें वाढत होती. कांहीं नंबरांखालचें ००००० अजून होतें तसेच होतें. 'विन' 'प्लेस'च्या खिडक्या रस्सीखेंचेचा सामना दाखवीत होत्या!...

अगदी बेफिकीरीनें सभोंवार पाहून, अरुण मागें फिरला;... आणि उगीचच त्यानें हातांतील पुस्तक 'फर्र्'कन् चाळून, शेवटीं पहिल्या रेसचें पान उघडलें. त्यांतील एकाहि घोड्याची किंवा जॉकीची कर्तबगारी त्याला ठाऊक नव्हती! कशांवर व कसलें गणित करणार होता तो, पैसे लावायचेच म्हटलें तरी?-

तोंच, 'घोडे आले,... घोडे आले!' असा ओरडा व घंटानाद झाला. अरुण लगबगीनें कठड्याजवळ गेला. खेडवळांना पोलीस मागें ढकलीत होते. तेवढ्यांत एक एक जॉकी आपल्या घोड्याचें प्रदर्शन करून पुढें जाऊं लागला;... आणि दर्दी लोकांचे 'बक् अप व्हाइटसाईड!...' 'का भीमराव, मारणारना रेस?-' असले विनोद सुरूं झाले! तर 'पाहून घे हं नंबर सात- 'हुर्रे'! असलेहि कांहीं ठोकताळे ऐकूं येऊं लागले!...

अरुण त्यामुळें जास्तच गोंधळला. पण त्या हळूंहळूं चालणाऱ्या घोड्यांकडे तसें पहातां पहातां, का कोणास ठाऊक, त्याच्या डोळ्यापुढें, सारखा तीन हा आंकडा उभा राहूं लागला!... घोडे परत फिरले; तेव्हांहि त्यानें एकदां तीन नंबराच्या तुळतुळीत दिसणाऱ्या तरतरीत घोड्याकडे पाहिलें. पुन्हां त्याला तोच आंकडा दृष्टीसमोर दिसूं लागला!...

: ५०४ :

मागें वळून त्यानें बोर्डाकडे पाहिलें. तिकिटें घेणाऱ्या लोकांची शेवटची धांवाधांव सुरूं झाली होती. आंकडे गरगर फिरत होते. आपापाल्या कल्पना करून लोकांमध्यें टोट-तिकिटें खपत

असल्याचें, साऱ्या नंबराखालचे फिरते आंकडे दाखवीत होते. पण तीन नंबराखालीं,... ०००७३, ०००७४, ०००७५ करीत, आंकडा तेथेंच थांबला होता!...

अरुण चमत्कारिकपणें एकदां हंसला. गडगंज पैसे मिळविण्याची त्याला नवखी इच्छा होती, तरी तो तेथें आल्यावर तेथील मूर्खपणानें जास्तच खिन्न झाला होता. म्हणून त्यानें खिशांतील तीस रुपयांच्या नोटा काढल्या व घाईघाईनें विन प्लेस खिडक्यांकडे जाऊन, नं. ३ चीं आठ विन व सात प्लेस तिकिटें घेतलीं. तीं तिकिटें मोजीत तो स्वतःशीच हंसत कठड्याजवळ आला!

इतक्यांत, पुन्हां 'घणऽण्ण्' आवाज होऊन, दोरी वर होतांच लांबच्या सहाव्या फर्लांगाजवळून घोडे सुटल्याचें त्याला दिसलें!... त्यानें मागें वळून पाहिलें व बोर्डावर तीन नंबराखालचा आंकडा ०००९० पाहून तो आपल्याशींच हंसून म्हणाला, ''तीन नंबरचा घोडा!... तीस रुपयांचीं तिकिटें!... माझ्यासकट हा मूर्खपणा करणारे नव्वद गाढव!!...''

-ओरडाओरड वाढत चालली होती; तरी अरुणला किंचित् देखील उत्सुकता राहिली नव्हती. वीस रुपये, हॉटेलच्या मॅनेजरकडे, मुंबईस परतण्यासाठीं ठेवून देऊन, तो राहिलेले नव्वद रुपये येथें आज केवळ उडवावयास आला होता आणि हा खात्रीपूर्वक मूर्खपणा आहे... हेंच त्याला समजून घ्यावयाचें होतें!... याच विचारामुळें बुकिंग वुइंडोच्या सावलींत उभा राहून अरुण स्वतःशींच म्हणाला, ''मूर्खपणा समजून घ्यावयास, नव्वद रुपये किंमत द्यावयास नको कांहीं तुला!... आतां क्षणानंतरच तीस रुपयांत खात्री होईल तुझी!...''

: ५०५ :

तोंच एकदम ओरड झाली!.. जॉकी पायावर रिकिबींत उभे राहिले होते. आणि घोडे चौखूर धांवत वेगानें पुढून जात होते!.. 'भवानी..भवानी!..' 'मॅकेंडनें रेस मारली!..' 'खलील आला!..' प्रत्येकजण धांवत्या घोड्यांकडे पाहून, असेच आपल्याला पोषक निर्णय देत होता!..

घोडे विनिंगपोलकडे भरधांव निघून गेले!.. आणि गाढव माणसें जज्जच्या उंच खुर्चीकडे लांबूनच आशावंत मनानें पाहूं लागलीं!!..

कित्येकांना खुळखुळणाऱ्या भरीव थैल्या दिसत होत्या; पण अरुणनें मात्र कल्पनेप्रमाणें तीस रुपये गेल्याच्या समाधानाचा; बसल्याबसल्या एक सुस्कारा टाकला!..

सारा उत्साह ओसरून गेल्यावर, लोक पुन्हा आपापसांत बोलत, पुढल्या रेसच्या जॉकींचीं नांवें पहावयास जाऊं लागले, अरुणच्या कानावर त्या हालत्या घोळक्यांतून विजयी घोड्यांचीं नांवें पडत होतीं. '' 'लिटल् वंडर' पहिला... म्हणजे अन्याय आहे!...'' ''व्हाइट साईड' 'मॅकेंड' अगदीं मेले बेटे आज!..'' आणि... '''झोब्बा' किंवा 'वान्सा' आज प्लेस घेतील ही कल्पना तरी



होती कां?-''

''तेव्हां मूर्खा, ... म्हणजे तुझा तीन नंबर गेलाच कीं नाही?'' असें आपल्याशींच पुटपुटत, अरुण उभ्या ठिकाणाहून बोर्डाकडे गेला!...

-पण त्याला भयंकर धक्काच बसला! -तीन नंबरच विन आला होता!

-आणि तेवढ्यांतच त्या नंबरासमोरच्या बोर्डावरील रिकाम्या जागेंत भाव आणून लावले गेले-

| | WIN | PLACE |
|---|---|---|
| 3 | 75 4 | 50 8 |

अरुणचा आपल्या डोळ्यावर प्रथम विश्वासच बसेना. त्यानें आपल्या खिशांतील सारीं तिकिटें बाहेर काढलीं. व पुन्हा एकदां त्यांवरचा नंबर पाहिला. केवढीं तरी मोठीं अक्षरें त्याला दिसलीं - '३'!

तो वेड्यासारखा हंसून म्हणाला, ''माझ्या मूर्खपणाची किंमत फारच केली या बेट्यांनीं!... Oh - what a wonder!"

शेजारींच, मळकीशी सुरवार चढवलेला, कोल्हापुरी पद्धतीनें दिडकीच्या रंगांत आजच ताजा रंगविलेला तलम फेटा भरघोंस बांधून, एक गिड्डा काटकोळा काळा मनुष्य उभा होता! -पलीकडचा दुसरा मनुष्य 'म्हादबाऽ म्हादबाऽ!' म्हणून, त्याला हाक मारीत होता. पण तिकडे त्यानें दुर्लक्ष केलें.

हातांतील तिकिटांकडे पहात, 'वंडर' असें कांहीसें अस्पष्ट शब्द अरुणला उच्चारतांना त्यानें बाजूनें जातां जातां ऐकतांच, ती स्वारी अरुणकडे झुकली. आपल्या अंगांतील मळकट कोटाच्या गुंड्या लावीत, व फेट्याच्या शेव फलकावीत, तो पुढें होऊन अरुणच्या हातांतील तिकिटांकडे पहात त्याला उत्सुकतेनें म्हणाला, ''काय राव, 'लिटल् वंडर' लावला होता वाटतं तुम्ही?..''

त्याचें जवळ येणें देखील अनपेक्षित असल्यामुळें, अरुण दचकून जास्तच गांगरलेल्या नजरेनें म्हणाला,'' ''अंऽ?.. नाहींऽ! तीन नंबर..''

''अहो तोच हो!... 'लिटल् वंडर'!.. म्हादबाचे त्यावर पुन्हा ठांसून आलेले हे शब्द ऐकून तर अरुण अधिकच भांबावला!

जणूं काय, -अपराधी मनानेंच, तो आपल्या हातांतील साऱ्या तिकिटांकडे पहात म्हणाला, ''अहो, मला कांहींच ठाऊक नव्हतं यांतलं!..

''काऽय?.. सारीं तिकिटं -एकाच नंबराचीं!..'' म्हादबा एकदम अरुणच्या खांद्यावर हात टाकीत, तिकिटें निरखून म्हणाला, ''साहेब, बनवूं नका हं आम्हाला!.. दर्दी माणसं आम्हीं लागलींच ओळखतों! उगीच म्हादबानें या भानगडींत पांच सहा वर्षे नाहीं काढलीं, राव!''

आतां या सद्गुरुची समजूत तरी कशी करावी हें अरुणला समजेना! इतक्यांत, लांब गेलेल्या आपल्या जोडीदाराला, म्हादबा उतावीळपणें मोठ्यानें हाक मारून म्हणाला, ''अहो राव,.. मणीलालभाई! अरे, इकडे या कीं लौकर!''

: ५०७ :

मणीलालभाई त्याच्या बोलावण्याचीच वाट पहात, लांब विडी फुंकीत उभा होता. नेहरु अंगरखा, गांधी टोपी, फिनले तलम धोतर, गंधर्व चपला,.. अशा वेषाची ती छोटी सडपातळ मूर्ती, हिरव्या धाग्याची फर्मास सिन्नर विडी तोंडात धरून, पानानें रंगलेल्या आपल्या तोंडांतील पुढले तीनचार पडलेले दांत दाखवीत, एकदां 'पिचिक्' करून पुढें झाली.

''अरे मणीलाल, मी बोललो नव्हतो मघां?'' म्हादबा त्याच्यावर जरा रुबाब मारण्यासाठीं म्हणाला, '' 'लिटल् वंडर' विन येणार म्हणून म्हणालो नव्हतो?.. काल प्रेसमध्ये रेस टिप्सचे कंपोझिंग करतां करतांच, माझा हात थबकला होता लिटल् वंडरजवळ!.. ह्या शेटकडे बघ तीन नंबरचीं किती तिकिटें आहेत! तुला गुजराथी भाईला अशी अवदसा आठवायचीच!..''

''अरे पण म्हादबा, तूं तो तद्दन घाटा अदमीच छे! भाई!'' म्हादबाला त्याच नाण्यांत सहज जातांजातां परतफेड करून, मणीलाल धूर सोडून म्हणाला, ''असा कदीबी घोडा येते काय? धंदा एटले धंदा!.. डोळ्यामंदी तेल घालून 'फॉलो' कराला पडते घोडा! खबर हाय?.. अवे ए आवते रेसमंदी ज्यो,... मॅक्ड- खलील जोडीकाढीजासे के नथी तो?.. ए, शेठालाच पूछ! केम शेट, बराबर बात छे के नयी?..''

: ५०८ :

आपल्याला उद्देशून त्यानें उच्चारलेलें तें शेवटचें वाक्य ऐकून, अरुणला तसल्या बिचकलेल्या मनःस्थितींतहि हंसू येत होतें. घोड्याचें नांवगांवहि बिचाऱ्याला ठाऊक नव्हतें!.. तर आतां 'फॉलो करण्याची' आणि 'हात थबकायची' यांची आपापसांतील मारामारी कशी समजणार त्याला?..

''मरा राव तुम्ही!...'' म्हादबा फेटा नीट बसवीत मणीलालला दबावीत म्हणाला, ''तुझी भागीदारी नको मला!.. हं साहेब चला, डिव्हिडंड घेऊन टाका पाहूं त्या खिडकींतून! दुसरी रेस सुरू व्हायची वेळ जवळ आली!..''

अरुण कांहीं न बोलतांच त्याच्याबरोबर 'पेइंग आऊट वुइंडो' जवळ गेला!.. पैसे घेणाऱ्यांची गर्दी बहुतेक ओसरली होती. आंतल्या दोघां क्लार्कनीं त्याच्या हातांत, शंभराच्या सहा नोटा, दहा दहांची तीन बंडलें, पांचांच्या अकरा नोटा व सुटे आठ आणे दिले!..



क्षणभर अरुणला अगदीं आश्चर्यच वाटलें!.. आणि त्याला कळेना - हा प्रसंग आपल्या कल्पनेंतला,... कीं आपण तो प्रत्यक्ष जगांत अनुभवीत आहों??..

: ५०९ :

म्हादबा व मणीलाल यांनीं वीस रुपये 'खलील' व 'हुर्रे'वर भागींत लावले होते. त्यांनीं अगदीं शास्त्रीय पुरावा गोळा केला होता!... पण शेवटीं, पैसे घालवले!.. आणि आपण मूर्खपणाचा अतिरेक केला होता!.. आपण अचानक पैसे मिळवले!.. या वस्तुस्थितीमुळें अरुणला जास्तच विषण्णता वाटत होती. आणि त्या एकंदर प्रकाराबद्दल हंसूंहि येत होतें...

दुसऱ्या रेसची वेळ होत आली! तशी शेवटीं, म्हादबा मणीलालची पुन्हा धडपड सुरूं झाली. त्या दोघांचे मागील अनेक रेसचे निकाल पाठ म्हणण्याइतके आणि घोड्यांचीं वजनें व भाव घडाघड म्हणण्याइतकें ज्ञान पाहून अरुण तर दचकलाच!..

त्याला काय करावें तें समजेचना!.. तो दडपल्या अंतःकरणानें, किंचित् बाजूस वळून, जवळपास बसलेल्या निरनिराळ्या घोळक्यांवरून दृष्टि फिरवूं लागला!.. फाटक्या मळकट कपड्यांनीं विभूषित अशा, आठ बारा आण्याच्या भागीदारींत खेळणाऱ्या एका खेडवळ कंपूंत, हाःहाःकार उडाला होता!.. कोणी आपले फाटके फेटे सोडून, त्यांना गांठलेला उरला सुरला आठबारा आण्यांचा खुर्दा, आपल्या जाणत्या म्होरक्याकडे देत होते. त्यावेळचा त्यांच्या चेहऱ्यावरील आशानिराशेचा दारुण... केंविलवाणा झगडा पाहून, अरुणला अतिशय दुःख होत होतें!.. गेल्या रेसमध्यें गेलेलें रुपयादोनरुपयांचें भांडवल त्यांना सारखें आठवत होतें!.. पण गमावण्यासाठीं केवळ कुत्सितपणें लावलेले अरुणचे तीस रुपये मात्र, तीसपट होऊन त्याच्या खिशांत त्याक्षणीं सुरक्षित पडले होते!..

: ५१० :

तेवढ्यांत, म्हादबा-मणीलालची जोडी पुन्हा त्याच्याजवळ आली. अरुणचें त्यांच्याकडे लक्षच नव्हतें. पण मणीलाल एकदम मोठ्यानें म्हणाला, ''काय शेट, 'खलील' पकडणारना ए वखताला?.. एला तो फॉलो करालाच पायजे!.. फेवरिट घोडा खेलेल तो काय भाव पडते, आला तोबी?..''

अरुण त्या दोघांकडेहि मुग्धपणेंच टकमक पहात होता. 'आशेनें मनुष्य वेडा होतो!'.. अरुणच्या डोक्यांत विचार येऊन गेला; आणि तो त्यांच्याकडे वळून त्यांना म्हणाला, ''तुमचं तुम्ही पहा बुवा!.. मी अजूनहि कांहीं ठरवलेलं नाहीं त्याविषयीं!..''

''शेठजी, तुझा आता पुन्हा गाढवपणा होणार आहे!..'' म्हादबा कचरत कचरत घाबऱ्या अंतःकरणानें मणीलालला म्हणाला. पण त्याला कोणत्याच नंबराची खात्री नव्हती कसली!..

एकदा वाटे हा घोडा येईल, एकदां वाटे तो!.. त्या रेसमध्यें धांवणाऱ्या बहुतेक सगळ्या घोड्यांचींच तो नांवें घेत होता!..

: ५११ :

ते बाजूस गेल्यावर, अरुणनें टोटलच्या बोर्डावर व घोड्यांच्या नंबराखालच्या तिकिटांच्या आकड्यांवर आपली दृष्टि टाकली. घोडे येत होते म्हणून पहावयास लोकांची पळापळ झाली! पण अरुण कांहीं जागचा हलला नाहीं!.. रेस सुरूं व्हायला पांच मिनिटें होतीं! लोक धावूं लागले. तेव्हां अरुणला मणीलालचे मघाचे शब्द आठवले. ''फेवरिट घोड्याला भाव पडत नाय, आला तोबी!'' अरुणनें जास्तींत जास्त तिकिटें कोणत्या घोड्यांवर खपलीं आहेत तें पाहिलें. आणि धांवत जाऊन प्लेसच्या खिडकीवाटें, जवळ असलेल्या तीनशेच्या साऱ्या दहांच्या नोटा पुढें करीत पुकारा दिला, 'नंबर वन्, - वन् हंड्रेड ॲन्ड फिफ्टी टिकेट्स प्लीज!..'

आंतला क्लार्क प्रथम दचकला. पण मग त्याने खात्री करून घेऊन, एका तिकिटावरच छाप मारून दिला! अरुणनेंहि त्या एकाच तिकिटाबद्दल खात्री केली व तें तिकिट हातीं घेतलें.

-तोंच घंटा होऊन, रेस सुरूहि झाली होती!..

: ५१२ :

''या वेळीं तरी - नको असतां विनायासें मिळालेले कांही पैसे जातील!..'' असें स्वतःशीं म्हणत अरुण एका कोपऱ्यांत जाऊन जमिनीवर स्वस्थ बसला.

गर्दीत सळसळाट चालला होता!.. घोडे तिसऱ्या चौथ्या फर्लांगांमध्यें आल्यावर दिसेनासे झाले.. प्रत्येकाची आपापल्या घोड्यांच्या नांवाची ओरड सुरूं झाली!.. टापा जवळ जवळ ऐकूं येऊं लागल्या!.. तसा अरुण पुन्हा हंसून बसल्या ठिकाणाहूनच पुटपुटला, ''बेट्यांनों, आतां तरी घ्याल कीं नाहीं माझे सारे लावलेले पैसे!..''

पण मध्यें चार पांचच मिनिटांचा अवधि गेला; आणि लोक एकदम ओरडले, ''एक नंबर थर्ड प्लेसला आला!''

- आणि 'खलील' पुन्हा आऊट झाला होता!!..

अरुणनें निराशेनें एक दीर्घ निश्वास सोडला!!!..

: ५१३ :

बाजूच्या घोळक्यांत चुळबूळ चालली होती. तो मघाचा खेडवळ कंपू रडकुंडीला आला होता. त्यांचा म्होरक्या उलट त्यांनाच दोष देत होता. पण,... आतां पुढेंहि कांहीं खेळतां येणार नाहीं व बरोबर आणलेली जवळची पुंजीहि संपली!.. या जाणिवेमुळें ते अगदी दीन चेहरा करून इकडे



तिकडे पहात होते!..

थर्ड प्लेस फेवरिट म्हणून 'निकल' घोड्याला ३ रु. भाव पडला होता. अरुणनें आपलीं तिकिटें हजर करून, साडे चारशे रुपयांच्या नोटा हातीं घेतल्या. पण त्याची विषण्णता जास्तच दाटली होती. या रेसमध्येंहि त्याला दीडशे रुपये फायदा झालेला पाहून त्याला वाटलें, ''येथल्या या मूर्ख बेट्यांनीं मला पैसे देण्याचा कटच तर केलेला नाहीं ना??.. 'निकल' ला सुद्धां रुपये देत आहेत मला!!..''

- आणि या विचारांमुळेंच तो पुढल्या दोन तीन रेसेस न खेळण्याचें ठरवून एका बाजूस बसला!

: ५१४ :

तोंच, डाव्या हातांत धोतराचा सोगा उचलून धरून, उजवा हात, तोंड व भुंवया यांची विलक्षण हालचाल करीत, आपल्याच विचारांत किंचित् वेड्यासारखा चालणारा, मणीलालशेट अरुणला दिसला. मणीलालचा 'खलील' आतांहि आऊट गेला असावा, याबद्दल त्याच्या चेहऱ्यावरूनच अरुणला, खाली पटली! मणीलालनें लावलेला घोडा 'फॉलो' करूनहि गेला; व त्यामुळें, आपण बरोबर आणलेले जवळ जवळ सगळे पैसे भागीदारींत गेले!.. या दुःखानें व रागानें, आपल्या गुलाबी भगव्या फेट्याला पीळ घालीत, म्हादबा लांबलांब टांगा टाकून, मणीलाललाच 'फॉलो' करीत होता!.. आणि ते दोघेहि जवळपास येतांच, त्यांच्या अस्पष्ट बोलण्यांतील आवेश, राग, दुःख, ... सारे उत्कट भाव जाणून, त्या साऱ्याच वस्तुस्थितीचें, अरुणला एकदां हंसूं येत होतें,... तर एकदां अधिकच दाट विषण्णता वाटत होती!

त्यांच्याबरोबर उगीच कांहीं तरी बोलावें, म्हणून अरुणनें हळूच टाळी वाजवीत, 'शुक्शुक्' करून त्यांना जवळ बोलावलें.

: ५१५ :

म्हादबाचा मघाचा नूर पार नाहींसा झाला होता. जवळ येतांच डोक्याचा फेटा सोडून हातांत घेत, व पायांतील तंग सुरवार किंचित् वर खेंचीत त्यानें कांहीं न बोलतांच, अरुण उभा होता तेथें खालीं बसकण घेतली. तोंच मणीलालनें हातांतील 'खलील'च्या नंबराची पांच तिकिटें रागानें टरकावून, अरुणच्या पायाजवळ टाकली; व मग तो आवेशानें म्हणाला, ''ज्यो शेट, ए लोक साला हमेश रेस बनावते! - अने आम्ही लोकला न काम हैराण करते! - तीस रुपया तद्दन नुकसान, -माझ्या अने म्हादबाच्या मिलून!..''

अरुण त्यावर कांहींच बोलला नाहीं!..

''अवे आवती तीन रेसमंदी तो छे छे अने सात सात घोडा धावते हाय!'' मणीलाल पुन्हा

म्हणाला, ''अने ए मदीथी पण, ए लोक 'स्क्रॅच' किती करेल खबर नाय!.. चार चार घोड्याची रेसमंदी भाव कसा पडल, भाई?.. आपण तो खेलतेच नाय!-''

तरीहि अरुण कांहींच बोलला नाहीं. पण हा दर्दी शेठयादेखील, शेवटीं आपण न खेळावयाच्या ठरविलेल्या निकालापर्यंत, अगदीं शास्त्रीय पद्धतीनें विचार करून येतो, याचें अरुणला आश्चर्य वाटलें! हसूंहि आलें!..

''अवे अखरची रेस-गुडबाय प्लेट! तेमदी 'खलील' हाय! बस्स!.. तेवढा आपन खेलनार!..'' मणीलाल पुन्हां आशेनें, जणूं आपल्याशींच म्हणाला.

''अरे मरो तुझा खलील, मणीलाल!...'' इतका वेळ गप्प बसलेला म्हादबा एकदम उसळून उठला; व तसें ओरडत मणीलालच्या अंगावर धांवत जाऊन म्हणाला, ''माझ्या पगारांतले सारे उरलेसुरले पैसे गमावून बसलो - अन् आतां येथें लेमन घ्यायला दोन आणे खर्चीन म्हटलं, तर जवळ दिडकी नाहीं!.. आणि म्हणतोय्.. ॲवते रॅस्मदी ख्यऽलील यॅनार!..''

म्हादबा आपल्याला रागानें वेडावीत असलेला पाहून, मणीलाल चमकून मागें सरला; तेवढ्यांत म्हादबाहि बोलतां बोलतां शांत होऊन आवरतें घेत मागें झाला.

त्या दोघांची ती केविलवाणी स्थिति पाहून, अरुणला वाईट वाटलें; व तो सहानुभूतीनें म्हणाला, ''चला दोस्त, आपण लेमन पिऊं या!''

: ५१६ :

त्यानंतर अरुणची रेस खेळण्याची उत्सुकता जवळ जवळ ओसरलीच होती. मधल्या तीन्ही रेसेस केवळ निर्विकार मनानें पहाण्यांत व मणीलाल-म्हादबा या दुकलीबरोबर सिगारेट फुकण्यांतच त्यानें घालवल्या.

शेवटची 'गुडबाय प्लेट' सुरूं होण्यापूर्वी, मणीलालला पुन्हा पांच वाजतां उत्साहाचा झटका आला. आपल्याकडे राहिलेले सारे पैसे एकवटून, ते 'खलील' वर रेस खेळण्यासाठीं तो मोजूं लागला. म्हादबाला त्यानें भागीदारीविषयीं विचारतांच तो पुन्हा एकदम त्याच्यावर खेंकसला; पण तरीहि मणीलालची चिकाटी ढळली नाहीं. तें पाहून, अरुण शेवटीं त्याला म्हणाला, ''आपण दहा रुपये लावूं प्रत्येकासाठीं. हे घ्या मणीलालशेट तीस रुपये!..''

दोघांचेहि डोळे एकदम चकाकले. अरुणला त्यांची गंमतच वाटली...

मणीलालनें तिकिटें आणलीं. प्रत्येकाच्या हातीं प्रत्येकाची पांच पांच दिलीं! आणि त्यानें आपल्या आंतल्या खिशांतील आणखी दोन तिकीटें काढून मुठींत घेत अरुणला म्हटलें, ''शेट, ए वखताला 'खलील' विन नाय आवेल तो नांव बदला मणीलालचा!.. अरे, इथे कोल्हापूरमंदी नाय



'खलील' विन येते तो काय उटकमंड, मुंबईमदी? - अशा कवा होएलच नाय!..''

त्या प्राण्यानें, त्या गडबडींतहि आपल्यासाठीं जादा दोन तिकिटें काढल्याबद्दल अरुणला, गंमत वाटत होती. मणीलालचा मूर्ख आशावाद पाहून त्याला मनुष्यस्वभावाचें हसूंच आलें, आणि तो आपल्याशींच पुटपुटला, ''आतां तुझा खलील आला, समज, आणि तुझं नांव कदाचित् बदललं नाहीं, समज,... तरी निदान तुझी परिस्थिति किती बदलली आहे, हें कसं लक्ष्यांत येत नाहीं बाबा तुझ्या?...''

: ५१७ :

शेवटच्या रेसचे घोडे सुटले.. अगदीं भरधांव धांवले. त्यांत 'खलील' होता! जज्जाच्या उंच खुर्चीसमोरून ते पुढें गेले!.. मणीलाल पाय वर करून व मान उंच करून पाहूं लागला; आणि दुसऱ्याच क्षणीं, जज्जाच्या खुर्चीजवळील नंबर पहात तो मोठ्यानें आरेडला, ''अरे, खलील विन.. खलीऽऽल विन!..''

त्याचा व म्हादबाचा चेहरा आनंदानें प्रफुल्ल झाला होता!..

अरुणला या योगायोगाची गंमत वाटली. आणि तो कांहीं बोलण्यापूर्वीच, म्हादबा व मणीलाल लगबगीनें त्याला 'पे आऊट' वुइंडोकडे खेंचीत होते.

दहा रुपयाला पंचवीस रुपये भाव पडला होता. मणिलाल गर्दीतून बाहेर पडला. त्याच्या हातांत पंचाऐंशी रुपयांच्या नोटा होत्या. प्रत्येकाला पंचवीस रुपये देऊन, मणिलाला क्षणभर घुटमळला; व मग आपल्या हातांतील नोटांपैकीं दहा रुपये अरुणच्या हातीं देत तो म्हणाला, ''शेटजी, ए आपला भांडवल!''

म्हादबाच्याहि मनाची क्षणभर चलबिचल झाली. तोहि नोटा काढूं लागणार, तोंच अरुण म्हणाला, ''राहूं द्या म्हादबा,.. ते दहा रुपये! ही रेसच गेली असती आपली तर? - पण एक हं मात्र म्हादबा!.. पुन्हा रेस खेळूं नका!..

: ५१८ :

फर्स्ट क्लासच्या डब्यांतील गादीवर पडल्या पडल्या, अरुणला कालचीं हीं सारीं दृश्यें समोर दिसत होतीं. शेवटीं त्यानें एक दीर्घ निःश्वास टाकला व आपल्या रिकाम्या डब्यांत दृष्टि फिरविली!..

रेसच्याच दिवशीं कोल्हापूर लागलींच सोडावें, म्हणून तो गाडीवर घाईघाईनें येतांना, रस्त्यांत घडलेला शेवटचा प्रसंग अरुणला तेवढ्यांतच एकदम आठवला. शाहूपुरीच्या पहिल्या कोंपऱ्यावरून त्याचा टांगा वळत होता. रस्त्यांतील एका मोठ्या हॉटेलच्या उजेडांत, मिशनच्या शाळेंतील चाळीस पन्नास मुली रस्त्याच्या कडेनें रांगेंत जात असतांना त्याला दिसल्या आणि त्यांच्याकडे पहातां

पहातां, पांढरे शुभ्र पातळ, किंचित् सैल केस वेशभूषा,.. अशा पद्धतीनें त्या मुलींच्या घोळक्यामागूनच मंद पावलानें चालणारी तरुणी - बहुतेक त्यांची अध्यापिकाच - अरुणला दिसली. तेव्हां तो एकदम चमकला होता त्याच्या तोंडून स्वतःशीच पटकन् उद्गार बाहेर पडले होते, ''कोण? मिराऽच कां ती?.. पण ती कशाला येणार इकडे?-''

शेट कांही तरी आपल्यालाच सांगत आहे असें वाटून, टांगेवाल्यानें लगाम खेंचली; पण त्यापूर्वीच अरुणनेंहि आपल्या विचारांची लगाम पटकन् खेंचली होती! आणि तो त्याला म्हणाला, ''कांहीं नाहीं. ने लौकर स्टेशनावर टांगा!.. गाडी मिळाली पाहिजे मला!..''

या प्रसंगाचेंच चित्र, अरुणच्या डोळ्यापुढें येत आहे, तोंच गाडीचा मंदगतीचा 'खट्-खट्क् .. खट्-खट्क्' असा मंद आवाज ऐकून, तो दचकून भानावर आला!.. आणि त्यानें खिडकी उघडून बाहेर डोकावलें!..

उन्हाच्या झळा लागत होत्या; तरी, घाटमाथा उतरून त्याची गाडी सखल प्रदेशावर आली होती!- कल्याण जंक्शन जवळ येत होतें!..

: ५१९ :

इन्डिकेटरवर '१८-४० कुर्ला-प्लॅटफॉर्म ४' वाचून, वसंत त्या बाजूस वळला.

सूर्य मावळून गेला होता; पण सगळे दिवे अजून लागले नव्हते. बोरीबंदरच्या त्या लांबच लांब प्लॅटफॉर्मावर बराच काळोख होता. नोकरीवर येणाऱ्या डेली पॅसेंजरांची घरीं परतण्यासाठीं गर्दी उडाली होती!..

गाडी अजून स्टेशनांत आली नव्हती; म्हणून वसंत प्लॅटफॉर्मच्या टोंकापर्यंत अहेतुकपणें पुढें पुढें चालत जात होता!

इतक्यांत, प्लॅटफॉर्मच्या कडेजवळच, त्याला आपले चुलतबंधु पांडोबा उभे असलेले दिसले. त्यांचेहि लक्ष त्याचवेळीं वसंताकडे गेलें. पण जणूं पाहिलेंच नाहीं असें करून पांडोबांनीं आपली दृष्टि दुसरीकडे वळविली.

आपला कौटुंबिक रक्तमांसाचा संबंधपाश, यशवंतदादांनीं स्वार्थी लोभानें सुरूं केलेल्या यादवी वादळामुळें एकाएकीं कसा तुटला, व तें वादळ आतां शांत झाल्यावर देखील तीं नातीं हळूहळू कशीं दुरावत जात आहेत, याचें अगदीं प्रत्याक्ष उदाहरणच, वसंत त्याक्षणीं अनुभवीत होता! त्यामुळें त्याच्या स्नेहशील मनाला अतिशय दुःख झाल्यावांचून राहिले नाहीं!

दादांचा मृत्यु महिन्यापूर्वीच घडला होता; त्यानंतर पांडोबा नाशकास जाऊन क्षौर वगैरे करून आलेले दिसत होते. दादा तसे एकाएकीं आजारी पडल्याची बातमी समजल्यावर, बाबासाहेब



आपल्याकडे मुद्दाम कल्याणास येऊन, घाईघाईनें आपल्याला घेऊन दादरला कसे गेले होते; त्यानंतर दादांच्या प्रत्यक्ष मृत्युसमयीं तरी त्यांच्याजवळ आपण दोघेहि कसे हजर राहूं शकलों होतों; दादा व यशोदाकाकी यांची चिरचिर चालू असूनहि, त्या शेवटच्या प्रसंगीं, बाबासाहेब दादांबरोबर किती प्रेमानें वागले होते;.. हे सारे प्रसंग, वसंताला पांडोबांकडे तसें पाहतां पाहतां, विरोधाभासामुळेंच आठवले!

: ५२० :

'पांडोबा आपल्याबरोबर थोडे परकेपणें वागत असले, तरी आपण आपलें सौजन्य कां सोडावें?' या विचारानें वसंत शेवटीं आपणच पुढें झाला; व त्यानें आपुलकीनें पांडोबांना प्रश्न केला, ''कसं काय? याच गाडीनें परततां वाटतं दादरला नेहमीं?''...

''कोण? वसंत कां?.. अंऽ.. नाहीं, तसं कांहीं नाहीं!'' आपण आतांच त्याला पाहिलें असे दाखवीत, पांडोबा त्याच्याकडे कृत्रिमपणें हंसून म्हणाले, 'जसं काम संपेल, तशी पुढली मागली गाडी पकडतो झालं!.. आणि हल्लीं आमचा नवीन साहेब आला आहे ना?... त्याची तर फार चिरचिर असते!..''

गेलीं अनेक वर्षें, पांडोबांची स्वतःचीच ही असली चिरचिर वसंतानें ऐकली होती; त्यामुळें त्यांच्या त्या कायम खिन्नवृत्तींत, त्याला विशेष नवल कांहींच वाटलें नाहीं!

''तूं कुठं चाललास आतां? माटुंग्याला?'' पांडोबांना तो प्रश्न पुढें निरुपायानें विचारावाच लागला, ''बाबांची प्रकृति कशी काय आहे? आणि अरुणचा कांहीं पत्ता?''-

नाहीं. मीं आतां जरा जातों आहें सींवला, कांहीं कामासाठीं!'' स्टेशनांत येऊन उभ्या राहिलेल्या लोकल गाडींतील गर्दीला वाट देण्यासाठीं, थोडें बाजूला होत वसंत म्हणाला, ''पण मी कालच गेलो होतो माटुंग्याला! बाबांची प्रकृति काय, आहे तशीच आहे. आतां ते बरेच खंगले आहेत मात्र! पुन्हा त्यांत अजून आम्हां कोणालाच अरुणचा पत्ता देखील लागलेला नाहीं ना!''

केवळ चौकशी म्हणून पांडोबांनीं तो प्रश्न औपचारिकपणेंच त्याला विचारला होता; त्यामुळें ते त्यावर कांहींच न बोलतां गाडींत शिरण्यासाठीं तिकडे वळले.

वसंतहि समोरील त्या गाडीच्या एका डब्याच्या दाराजवळ थांबून फळीवर चढत म्हणाला, ''हा डबा रिकामाच आहे. तुम्ही कुठं दादरला जाणारना? मग चला कीं!''

पांडोबा एक क्षणभरच थांबले!- व मग म्हणाले, ''नको, मी जातो तिकडे! माझा सेकंडक्लासचा पास आहे!''

: ५२१ :

वसंता त्यापुढें कांहींच बोलला नाहीं; एका चाकोरींतून एका पद्धतीनें व अगदीं फक्त स्वतःच्याच सुखदुःखांत रममाण असलेल्या पांडोबांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे खिन्नपणें त्यानें पाहिलें; आणि तो आपल्याशींच खिन्नपणें हंसला. एका अगदीं कोपऱ्यांतील बांकाची खिडकीजवळील जागा आपल्या रुमालानें झाडून, तो तेथें बसला व गाडी चालूं होण्याची वाट पाहूं लागला!

पण त्याच्या मनांतून, पांडोबा दुसऱ्या डब्यांत बसावयास निघून गेल्याचा तो प्रसंग, कांहीं केल्या पटकन् जाईना. नानांच्या संपत्तीबाबत आलेल्या मनोमय तेढीनेंच प्रेरित होऊन, पांडोबा आपल्याला टाळण्यासाठीं सेकंडक्लासकडे वळले? कीं... रेल्वेकंपनीकडून त्यांना मिळालेला सेकंडक्लासचा पास वापरण्यासाठीं व स्वतःच्याच व्यक्तिगत सुखासाठी? - आपण त्यांना इतर परिस्थितींत भेटलों असतों तरीहि, त्यांनीं आपल्याला तसलीच बेफिकीरी दाखवली असती?..

प्रसंग अगदीं क्षुल्लक होता!- पण दादरपर्यंतच्या अगदीं मामुली प्रवासांतही तो घडून आल्यामुळें, भायखळा येईपर्यंत वसंताच्या स्नेहशील मनाचे त्यावरच विचार चालले होते!..

आणि त्यावरून त्याला त्याच्या दुसऱ्या चुलतभावाची - विठोबाअण्णाची - आठवण झाली. त्याची जगांत खूपसे पैसे मिळवण्यासाठीं चाललेली अव्याहत लटपट व धडपड, वसंतासमोर एकदम उभी राहिली! यशवंतदादांचा अंत झाला, त्यावेळीं, त्यांचा हा एक लेक जेमतेम नोकरीवरून परत आला होता. आणि तो दुसरा, अनेक ठिकाणीं फोन केल्यावर किती तरी वेळानें, त्यांचें फक्त कलेवर पहावयासच घरीं येऊं शकला होता!

आणि तरीहि, वेदांतांत पारंगत असलेल्या यशवंतदादांचीं, शेवटपर्यंत, पैशाच्या व्यवहारासाठींच सारी धडपड चालली होती!..

यावरूनच, लहानपणीं एका कथेकऱ्यानें सांगितलेली - अगदीं मरत असतांना सुद्धां 'वा, - वा, -के, के,' असल्या अडखळत्या शब्दांतून, जवळच असलेलें 'वासरूं केरसुणी खातें आहे' असा, आपल्या मुलांबाळांना संदेश पाठवणाऱ्या, जाड्या वेदांत्याची - गोष्ट त्याला आठवली!..

तेवढ्यांत गाडी थांबली; आणि दादर स्टेशनवर पांडोबा सेकंडक्लासांतून उत्तरतांना वसंताला दिसले. त्याचा डबा पुलाजवळच होता; साहजिकच त्यानें खिडकींतून हात बाहेर काढून, हंसत हंसत त्यांच्या बाजूस करून हालवला.

पण आपल्याच तंद्रीत चाललेले पांडोबा, गर्दींत मिसळून पुढेंहि गेले होते!..

वसंताच्या मनांत विषण्णता जास्तच दाटली!.. पण, एक बायको माहेरीं पाठवल्यावर, दुसऱ्या नव्या बायकोलाहि मूल नाहीं, म्हणून सदा रंजीस असलेल्या त्या प्रवाहपतित पांडोबांकडे, अशा विचारांत दृष्टिक्षेप टाकतां टाकतां, लोकलगाडी, वसंताला घेऊन झटकन् दादर स्टेशनांतून बाहेर



पडली!..

: ५२२ :

माटुंगा स्टेशन जसजसें जवळ येऊं लागलें तसतशी वसंताला बाबासाहेबांची व त्यावरून अरुणची आठवण होऊं लागली!

अरुण निघून गेला. त्यानंतर वसंताच्याहि आयुष्यांत बऱ्याच लहानमोठ्या घडामोडी झाल्या होत्या. पण त्यांपेक्षां, अरुण कोठें गेला असेल, काय करीत असेल, इतके दिवस तो आपणां कोणालाच कसा भेटला नाहीं?- हे विचारच वसंताच्या मनांत त्यावेळीं काहूर उठवीत होते!.. तोंच सींव स्टेशन आलें. तो खालीं उतरला, त्यानें कलेक्टरला पास दाखविला आणि रेल्वेपुलावरून चालत जाऊन, तो आग्रारोडवरील पुलाच्या टोंकाजवळ येऊन पोंचला.

काळोख बराच झाला होता. वसंताला पोष्टाजवळील एका चाळींत जावयाचें होतें. नानासाहेबांच्या वेळीं एका ड्रायव्हरनें, त्यांच्याजवळून घेतलेल्या पैशांबद्दलच्या प्रामिसरी नोटीची, लवकरच मुदत संपणार होती. त्याविषयीं व्यवहारी बोलणें करावयासच वसंत तिकडे चालला होता -

आणि तो तसा त्या बाजूस वळणार, इतक्यांत... बरीचशी दाढी वाढलेला, बंगाल्यासारखे धोतर सोडलेला, उघड्या डोक्याचे केस मागें फिरवून मंद मंद पावलें टाकीत समोरच्या दिशेनें त्याच्याच बाजूस येत असलेला एक तरुण त्याला दिसला. तो तोंडांतील सिगारेटचा धूर सोडीत, इकडे तिकडे पहात आपल्याच तंद्रीत चालला होता.

वसंत दचकून क्षणभर जागच्या जागींच थबकला! अगदीं पूर्ण ओळखीचा चेहरा खरा!.. पण कोण तें पटकन् त्याच्या लक्षांत येईना.

: ५२३ :

तो बराच जवळ आल्यावर मात्र वसंताला संशय आला - तो अरुण तर नव्हे? हो, खासच; ... तो अरुणच! तशी खात्री वाटून वसंत त्याला हाक मारणार, इतक्यांत त्याआधीं त्याचीच दृष्टि वसंताकडे गेली!

दुसऱ्याच क्षणीं, तो झपझप पावलें टाकीत वसंतापासून लांब जाऊं लागला!

आतां मात्र वसंताची पूर्णच खात्री झाली कीं, तो अरुणच!... आणि 'अरुण, अरुण, थांब ना रे!' असें तोंडानें हाक मारत तो पुलाच्या बाजूस वळून, त्याच्यामागें थोडासा धांवलाहि!

पण तो लगबगीनें पुढें चालला होता. शेवटीं वसंतानें त्याला गांठलें; त्याच्या पाठीवर हात ठेवला आणि त्याच्याबरोबर चालत चालत वसंत त्याला म्हणाला, ''अरे आहेस तरी कोठें तूं अरुण? करतोस काय? आणि आम्हाला कोणालाच अगदीं सुगावा लागूं दिला नाहींत तो?

मुंबईसच आहेस तर तूं? पुष्कळ दिवस तुझी वाट पाहून पाहून बाबा आतां दमले!..''

पण अरुण कांहींच बोलला नाहीं. त्याचें धूम्रपान तसेंच चालूं होतें!.. आणि तो पुढें पुढें चालत होता.

: ५२४ :

थोडा वेळ वसंतहि कांहीं बोलला नाहीं. खाडीच्या बाजूस उतरणाऱ्या रस्त्यानें, ते दोघेहि न बोलतां बरोबरच पुढें पुढें चालले होते.

मोकळा वहात असलेला वारा त्यांच्या अंगाला स्पर्शून जात होता. भरतीचें पाणी आपटत असलेले दगड, काळोखांत विलीन झाले होते; आणि आकाशांतील असंख्य चांदण्या लुकलुक करीत होत्या -

शेवटीं अरुणनें एक झुरका घेऊन सिगारेट पायाखालीं टाकली, किंचित् काल थांबून आपल्या स्लिपरखालीं ती विझविली; आणि आपण जणूं एकटेंच आहों अशा तऱ्हेनें तो पुढें चालूं लागला!..

बराच वेळ झाला तरी अरुण बोलत नाहीं,... म्हणून वसंतच शेवटीं त्याच्या अगदीं जवळ सरून म्हणाला, ''अरुण, कांहींच कां रे बोलत नाहींस? मला सांगना तुला काय वाटत आहे तें?.. माझ्यावरहि रागावलास, वेड्या?.. अरे, मी तुझा भाऊ खरा; पण त्यापेक्षां तुझा मित्रच नव्हे का जास्त?''

''कोणी कोणाचा मित्र नाहीं जगांत!'' अरुण काड्याच्या पेटीवर नवी सिगारेट आपटीत, अगदीं कोरड्या शब्दांत म्हणाला, ''वसंता, मला कां रे तुम्ही सारीं मंडळी असा त्रास देतां उगीच? मी तुमच्यांतून बाहेर पडलो,... स्वतःच्या पायांवर उभा राहण्यास आतां समर्थ झालो; आतां माझा तुम्हां कोणावरती भारहि नाहीं! मग माझ्या या नव्या आयुष्यांत तुम्ही आतां पुन्हां पुन्हां कां घुसूं पाहतां? मला माझं स्वतंत्र एकाकी आयुष्य जगण्याचा देखील अधिकार नाहीं का जगांत...?''

: ५२५ :

वसंत त्यावर थोडा वेळ अगदीं गप्प राहिला. पण नंतर त्याच्या पाठीवर हळू हळू थोपटीत तो म्हणधाला, ''अरुण, मी तुझ्या भावना जाणतो! पण असा त्रागा करून कसं चालेल रे? तूं तुझं आयुष्य खुशाल सुरूं कर!- पण अरविंद, मी यांच्यासारख्या तुझ्या जुन्या दोस्तांनासुद्धां त्यांत कांहींच कां स्थान नाहीं? निदान आम्ही त्यांत घुसण्याचा प्रयत्न केला, तर तोहि अपराधच ठरेल कां?''



अरुण अगदीं निःशब्दपणें कपाळाला आंठ्या घालून, सिगारेट फुंकीत चालला होता. त्याला वसंताचें तें बोलणें मनांत थोडें पटत होतें; तरी तो त्याच्याकडे वळून म्हणाला, ''हें पहा, वसंता, तुझं म्हणणं कदाचित् खरं असेल! माझ्याकडे तुम्ही मित्र म्हणून पाहतां!.. पण पदोपदीं, माझ्या असहाय्यतेची, द्रव्यहीन ध्येयवादाची, मला जाणीव करून देणाऱ्या ज्या उपकारी माणसांना सोडून मी एकदां बाहेर पडलो, त्यांच्याशींच तुमचीं आयुष्यें निगडीत आहेत, हें तुम्हीं विसरतां! तुम्हाला माझ्या आयुष्यांत स्थान,... म्हणजे त्या बाकीच्यांनाहि! याची तुम्हाला कांहीं कल्पना आहे का? पण तें असो! मला वाद मुळींच घालायचा नाहीं इथं!.. आपण हा विषय तात्पुरता थांबवूं या. कृपा कर, आणि माझ्याविषयीं तुला थोडा देखील स्नेह वाटत असेल, तर मला इथें आतां स्वस्थ एकटं बसूं दे! अगदीं मनाविरुद्ध असलेली कामगिरी सारा दिवसभर करतां करतां, माझ्या डोक्याला आलेला शीण घालवण्यास,... हा चौफेर भरारा फिरत आलेला एकटा वाराच काय तो समर्थ आहे!..''

वसंत कांहींच बोलला नाहीं! आतां याक्षणीं तरी, अरुणला असें एकटें सोडणेंच जास्त श्रेयस्कर, असें वाटून तो चालतां चालतां थांबला व मागे फिरला.

त्याच्या डोळ्यांत अश्रू दाटत होते; शेवटीं तो पुन्हा अरुणकडे मागे वळून पाहत प्रयासानें म्हणाला, 'बरं दोस्त, जातो मी!.. पण तूं इथं कुठं जवळ राहातोस कां अरुण?'

''नको! तेंहि मला तूं न विचारणंच बरं!'' अरुण खाडीच्या कडेजवळच्या एका दगडाकडे वळत म्हणाला.

वसंतहि बिचारा कांहींच न बोलतां, पुलाच्या बाजूस वळून चालूं लागला.

- आणि आपल्या धोतराचा सोगा किंचित् वर करून, त्यानें आपले डोळे पुसले!

: ५२६ :

आंध्र व्हॅली पॉवर हाउसचे विजेचे खांब व सींवच्या खाडीचे खडक, यांतून पाणी डुबुक् डुबुक् खेळत होतें... लाटा आपटून सळसळत होत्या. जोराचा वारा सूं सूं आवाज करीत वहात होता. रस्त्यापलीकडील रेल्वेलाइनवर हिरवे तांबडे दिवे लागले होते. मधून मधून कुर्ल्याकडे किंवा सींव स्टेशनाकडे जाणाऱ्या झगझगत्या डब्याच्या गाड्या 'खट्कखट्' करीत वांकणावर अदृश्य होत होत्या!

वसंत निघून गेल्यावर, तिकडे शून्य दृष्टीनें पहात, अरुण कितीतरी वेळ तेथें बसून होता. शेवटीं अगदीं बेचैन होऊन तो जागेवरून उठला व पुन्हां रेल्वे पुलाच्या दिशेनें चालूं लागला. विविध विचार त्याच्या मनांत वायुवेगानें येऊन जात होते!..

''वसंत, अरविंद हे दोघेहि आपलेच मित्र! सुनीतीसारख्या प्रेमळ पत्नीच्या सहवासांत अरविंद आतां सुखानें आयुष्य घालवीत असेल! पण हा वसंत? बिचाऱ्याचें दुःखी आयुष्य!.. सुधावहिनी पूर्वीसारखीच घरीं आजारी असेल; तिच्या शुश्रूषेंतच त्याचा सारा फावला वेळ निघून जात असेल. आणि आतां तर नाना वारल्यामुळें, आणखी व्यवहाराची सारी जबाबदारीहि एकट्या वसंतावर येऊन पडली असेल!''

पण मग अरुणला वाटलें, ''हे विचार आतां आपल्याला कशाला? वसंत काय, अरविंद काय, एके काळचे आपले मित्र खरे! पण आतां मात्र, त्यांच्याविषयींचे विचार जितक्या लौकर आपल्या मनांतून निघून जातील तितकं बरं! भोंवतालीं कोठेंहि पाहिलं, तरी सगळीकडे अपेक्षाच भरली आहे. तरीपण त्याच अपेक्षापूर्ण जगांत, आपण आतां स्वतंत्रपणें वागूं शकत आहों! मग कशाला पाहिजेत उगीच हे जुने स्नेह, जुनी मंडळी?''

आतांपर्यंत रेल्वे पूल ओलांडून, अरुण तिकिट ऑफिसजवळ येऊन पोंचला होता. एकदां त्याला वाटलें, 'आपण इकडेच नवीन घेतलेल्या आपल्या खोलीकडे वळावं व घरीं जाऊन कॉटवर स्वस्थ पडावं!'.. पण मग त्यानें तो विचार लागलीच बदलला. 'वसंत त्याच बाजूला गेलेला असला आणि आपल्याला मघासारखा तो वाटेंत पुन्हां भेटला तर?'

तेव्हां लोकल गाडींतूनच कोठेंतरी दुसरीकडे भटकावयास जावें असेंच शेवटीं ठरवून, मुंबईकडे जाणाऱ्या गाडीच्या प्लाटफॉर्मवर तो उतरला; आणि गाडीची वाट पाहूं लागला.

: ५२७ :

'' 'बाबा आपली वाट पाहात आहेत!' वसंत मघां म्हणाला! कशाला? पुन्हा पैशाविषयींचीं व्याख्यानं द्यायला? त्यांना वाटत होतं,... त्यांचा अरुण जगांत तसाच कफल्लक राहील! त्यांच्या पैशावर उड्या मारण्याची अपेक्षा करील! आणि मग पावलोपावलीं कानपिचक्या देण्याचा आपला हक्क ते त्याच्यावर गाजवूं शकतील!.. पण त्यांना म्हणावं, आज तोहि याच तुमच्या कृत्रिम जगांत पैसे मिळवतो आहे. आपलं स्वतंत्र आयुष्य आक्रमीत आहे!''

पण स्टेशनांत येऊन उभ्या राहिलेल्या गाडींत चढतां चढतां, याच विचारानें अरुण केवढ्यानें तरी एकदम दचकला! पाठीमागच्या एका बाकावर बसतां बसतां तो आपल्याशींच पुटपुटला, ''स्वतंत्र आयुष्य! हो, खास स्वतंत्रच! पण काय? - आपलीं पूर्वींची मोठमोठीं ध्येयें? गगनचुंबी भराऱ्या??... भोंवतालच्या अपेक्षापूर्ण व्यवहाराच्या काळ्या रंगामुळें, आतां तीं बरीचशीं बरबटलीं. आपली पूर्वींची कला आतां थंडावली! छे! नाहींशींच झाली!- पैसा मिळवणं या एकाच विचारानें, यांत्रिकपणें नौकरी करणं व फावल्या वेळांत, जगाकडे त्यांतील व्यंगे शोधण्याच्या अशाच कांहींशा



कुत्सित दृष्टीनं पाहणं... त्यांतच आपण रममाण आहों!... मग मन मानेल तसं भिरीभिरी फिरणं, याशिवाय दुसऱ्या दृष्टीनें पूर्णपणें निष्क्रिय... निष्प्रेम, असंच आपलं हें जीवन नव्हे कां?''

: ५२८ :

कधीं कधीं डोकावणाऱ्या असल्या विचारांनीं मात्र अरुणचें डोकें भणाणून येई - आणि तसेंच यावेळीं झालें!-

त्यानें झटकन एक सिगारेट बाहेर काढली व ती पेटवून तिचे एकामागून एक दोन चार झुरके घेऊन, तो मागें बाकावर मान टाकून स्वस्थ पडला. इतक्यांत परळ स्टेशन आलेलें पाहतांच, तो पटकन् उठला व विमनस्कपणेंच खालीं उतरला.

स्टेशनांतून बाहेर पडल्यावर, तो पाय नेतील तिकडे थोडा वेळ चालला होता. मध्येंच आपल्या भोंवतालचा परिचित भाग पाहून, अरुणला आपलें मागलें सारें आयुष्य आठवलें!-

''बाबांची इच्छा डॉक्टर व्हावं!.. त्यामुळेंच, कांहीं वर्षांपूर्वी हा भाग आपलं कर्तव्यक्षेत्र झाला होता!.. त्यापूर्वी, त्यावेळीं व त्यानंतर आपल्या आकांक्षा व बाबांच्या अपेक्षा यांचा आपल्या मनांत झगडा सुरू झाला, म्हणजे तेव्हां आपण असेच रस्त्यांतून इकडे तिकडे कोठेंतरी भटकत फिरत असूं!.. त्यावेळीं बाबांना नकळत-हो, त्यांना फसवूनच-शेवटीं आपण मुख्यतः चित्रकला, गायन यांच्या नादीं लागलों! त्यावेळीं, आपल्या भराऱ्या केवढ्या मोठ्या होत्या? आपल्याला तेव्हां वाटत होतं, आपल्या कलेनें आपण सारं जग जिंकूं!... हो, रवींद्रांसारखीच आपल्या मनाची उडी होती तेव्हां! -आणि आज?.. आजच्या आपल्या आकांक्षा काय? आपलं ध्येय काय? पैसा??-''

अरुणच्या मनाचा एकाएकीं एकदम गोंधळ उडाला! सध्याच्या परिस्थितींत त्याला अपरिचित असे पूर्वीचे मोठमोठे विचार, पुन्हा त्यांत एकाएकीं कल्लोळ उठवूं लागले! शेवटीं तो सुस्कारा टाकून आपल्याशींच पुटपुटला, ''पण-अपेक्षा व पैसा त्यांच्या जोरावर चालणाऱ्या या भयानक जगांत,... अनेकांच्या आकांक्षा,.. अनेकांचीं ध्येयें,... अनेकांचीं आयुष्येंच्या आयुष्यें,.. केवळ जीवनकलहासाठीं, साध्या जगण्यासाठींच, मातीमोल होत आहेत!- तिथें आपल्यासारख्या एखाद्या क्षुद्र व्यक्तीचं काय मोठंसं?''

: ५२९ :

पुढें चालतां चालतां, असें मनाचें समाधान करण्याचा त्यानें अतिशय प्रयत्न केला! पण, कितीतरी दिवस दबा धरून बसलेलीं त्याचीं मनोमय ध्येयें, त्याचें श्रेष्ठ कलाप्रेम, आपल्याविषयींच्या त्याच्या साऱ्यासाऱ्या आकांक्षा, आज इतक्या प्रबळ झाल्या होत्या, कीं असल्या साध्यासुध्या

दडपणानें त्या खालीं बसेनात!..

मनाच्या समाधानासाठीं त्यानें एकामागून एक दोन तीन सिगारेट ओढल्या; पण त्याचा हेलावलेला हृदयसागर कांहीं केल्या आज शांत होईना!

-आणि अशाच वेळीं, मोठ्यानें आक्रोश करणाऱ्या बाळाप्रमाणें मनाला तात्पुरती गुंगी आणण्यासाठीं, मागील एक दोन वेळेप्रमाणें,.. सिगारेटपेक्षां जास्त प्रबळ अशा दुसऱ्या एखाद्या साधनाची त्याला इच्छा झाली!-

तो उत्कंठेने चौफेर नजर फिरवितो आहे, तोंच त्याला पलीकडील बाजूस जवळच 'फ्रिव्होलिटी बार' ची पाटी दिसली!

क्षणभरहि दुसरा विचार न करतां, अरुण त्या बाजूस वळला!

तिकडे जाण्यासाठीं तो फूटपाथ ओलांडू लागणार, इतक्यात - त्याला मागून कोणाची तरी हाक ऐकूं आली, ''अरुण, अहोऽ अरुण! थांबा ना जरा! इतक्या लगबगीनें कुठं चाललांत्?''

एखाद्या अपराधी माणसाप्रमाणें एकदम चपापून, त्यानें मागें वळून पाहिलें!..

आपल्या प्रेमळ हंसऱ्या मुद्रेनें त्याच्याकडे पाहात, जाई घाईघाईनें त्याच्याजवळच येत होती!

: ५३० :

जाई अचानक समोर दिसतांच, मात्र अरुण एकदम दचकला!.. आणि स्वसमाधानासाठी बारमध्यें शिरावयाची आपल्या मनाची तयारी करण्याचा, त्यानें क्षणापूर्वी धीर दाखविला होता, तो जागच्या जागीं थिजून, तो क्षणभर गलितगात्र होऊनच उभा राहिला!..

'जाई कोण आली मोठी?.. तिची आपल्याला अशी काय भीति आली?' असें आपल्या मनाला पुन्हां पुन्हा सांगून, तो त्याला चेतावणी देत होता. पण तरीहि त्याचा पाय कांहीं जागेवरून उचलेना.

त्याच्या अंगांत आतां तें धैर्यच राहिलें नव्हतें!

''आतां पावणे दहा झाले!..'' जाई आपल्या मनगटावरील घड्याळाकडे पहात म्हणाली व त्याच्याजवळ येऊन उभी राहिली. किंचित् थांबून त्याच्याकडे हंसून पहात ती पुढें स्नेहशीलतेनें म्हणाली, ''हल्लीं तुम्ही सींवला रहातां असं परवां म्हणाला होता ना, अरुण?.. मग हें काय बाई? कीं थाप मारलीत? आणि या बाजूस आतां असं लगबगीनें कुठं चालला होतां तुम्ही?..''

अरुण तिच्या या प्रश्नानें तर मनांत जास्तच कचरला; पण तरी आपल्या गोंधळलेल्या मनाला धीर देत, तो स्वत:शींच मनांत म्हणाला, ''ही कोण मला अशी मध्येंच आडवणारी? असले प्रश्न आपल्याला विचारण्याचा हिला अधिकार तरी काय?.. आणि विचारलेन् तरी आपण आतांच्या



आतां हिला सांगावं - 'तूं येथून जा!.. मला तुजबरोबर येथें बोलत बसावयास मुळींच वेळ नाहीं!'...''

पण हे सारें तिजकडे बोलून दाखविण्याची मात्र, प्रयत्न करूनहि अरुणला छातीच होईना!

''जाई भेटल्यामुळें, आपलं मघाचं धैर्य सारं एकदम गेलं तरी कुठं?.. तिची आपल्या मनाला इतकी फिकीर कां वाटावी या प्रसंगी?..''

अरुणला कांहीं केल्या असल्या प्रश्नांची उत्तरें देतां येईनात. अगदीं हतबलतेनें त्यानें फक्त एक नि:श्वास सोडला; व अगदीं गांगरल्या चेहऱ्यानें जाईकडे तसेंच पहात, तो जागच्या जागीं उभा राहिला. त्याच्या तोंडून एकहि शब्द बाहेर पडेना!..

: ५३१ :

''मला कसलं तरी पेय घेण्याची इच्छा झाली आहे - अरुण!..'' जाई त्याला उद्देशून त्याच्याकडे मोहक दृष्टीने पहात म्हणाली, ''इथं मध्येंच उभं रहाण्यापेक्षां, कुठल्या तरी हॉटेलमध्यें बसूं या कां आपण? - चला ना? येतां?''

त्यावेळीं, जाई त्याच्याकडे इतक्या आपुलकीनें पहात होती, की अरुणला त्याविरुद्ध कांहींच बोलतां येईना.

तोपर्यंत तिनें आपणच सगळा निर्णय केला होता व ती फुटपाथवरून चालूं लागली होती! अगदीं निरुपाय होऊन, किंचित् हतबलतेनें तिजबरोबर चालत अरुण म्हणाला, ''चला पाहिजे तर!.. कोठें जाणार?... इराण्याकडे चालेल?''

''कोठेंहि! तुम्हीं म्हणाल तिथं!..'' तिच्या त्या शब्दांत अरुणविषयींचा जिव्हाळा व विश्वास इतका ओतप्रोत भरलेला दिसत होता, कीं अरुणलाही एक क्षण, - दोन मिनिटांपूर्वींच तिजविषयीं आपल्या मनांत आलेल्या बेफिकीर विचारांचा राग आला. आपल्या कठोरपणाबरोबर जाईच्या प्रेमळ मनाचें सौजन्य झगडत आहे, अशी जाणीव होऊन, त्याला आपलाच राग आला; आणि मघाच्या आपल्या वागणुकीची भरपाई करण्यासाठीं तो हळुवारपणें तिला म्हणाला, ''चला तर!.. या समोरच्या कोपऱ्यावरील इराण्याच्या हॉटेलांत बसूं!..''

: ५३२ :

अरुणच्या त्या आस्थेच्या शब्दांनीं जाईला अतिशय आनंद झाला होता. उत्साहानें पुढें चालत हॉटेलच्या पायऱ्या ती भराभर चढली, आणि एका टेबलाकडे वळूं लागली. इतक्यांत, अरुणनेंच तिला 'फॅमिली' अशी पाटी लावलेल्या वरच्या बाजूच्या एका टेबलाकडे बोलावलें.

दोघेहि जाऊन तेथें बसल्यावर जाईनें विचारलें. ''काय? थंडच पेय ना?.. हं,.. मग..

सोडालेमन मिक्सच आण!..'' पोऱ्या लागलीच तें आणण्यासाठीं निघून गेला.

थोड्या वेळानें जाई हंसून भरभर बोलूं लागली, ''तुम्हाला ठाऊक आहेच,.. मी जाधवांकडे रहाते तें!.. तो त्यांचा मुलगा गोपा! किती दिवस सारखं म्हणत होता, 'ताई आपण सिनेमाला जाऊं, सिनेमाला जाऊं!' - उद्यां रविवार! तेव्हां म्हटलं जाऊं या आज गोपाला घेऊन! आई कांहीं येईना. तेव्हा जाधवबाबा, मी अन् गोपा गेलों, या जवळच्या लक्ष्मी सिनेमाला. मायामच्छिंद्र लागला आहे!.. मला कांहीं तो इतका आवडला नाहीं बाई!.. शेवटीं कंटाळून मी जाधवबाबांना म्हटलं, 'तुम्ही बसा शेवटपर्यंत-मी जाते. हळूंहळूंच घरीं येईन आपली सावकाश. माझी काळजी करूं नका.' सिनेमा संपल्यावर गोपाला घेऊन घरीं जायचं बाबांनीं कबूल केलं.. आणि नंतर भटकत भटकत अशीच या बाजूला मी फिरत होते! - तों तुम्ही दिसलां!... कोठें हो चालला होता, अरुण?''

: ५३३ :

अरुणला तिच्या या शेवटच्या प्रश्नानें पटकन् मघांच्या बारची आठवण झाली व तो पुन्हां गांगरला; पण आपली गांगरलेली वृत्ति लपवण्यासाठीं त्यानें खिशांतील सिगारेट काढून पेटवीत म्हटलें, ''कोठें नाही!.. असाच भटकत होतो!..''

पोऱ्यानें दोन ग्लासें आणून समोर ठेवल्यावर आंतील स्ट्रॉनें एक घोट घेऊन अरुण तसाच स्वस्थपणें धूम्रपान करीत इतकडे तिकडे पहात राहिला!..

त्याच्या त्या विमनस्क चेहऱ्याकडे, जाई मुग्धपणें चिंतायुक्त चेहरा करून पहात होती. तिनें आजपर्यंत मिळविलेल्या अरुणच्या मागील आयुष्याविषयींची तिला आठवण झाली व त्याच्याकडे तसेंच हळुवारपणें पहातां पहातां तिला वाटलें, ''अरुणांची पूर्वीची कला - ती एक प्रकारची व्रतस्थता - आज गेली तरी कोठें सारी? आजचे अरुण आणि तुरुंगांत जाऊन येण्यापूर्वीचे अरुण! - दोहोंत किती फरक हा! एक श्रेष्ठ कलावंत,.. आपलीं सारीं मोठमोठीं ध्येयें विसरून, आतां पोटापाण्याची, जडजीवनाची निश्चिति झाल्यापासून, अगदीं बेफिकीरीचं,.. निष्क्रिय, निष्प्रेम आयुष्य कंठीत आहे!''

अरुणविषयीं आधींच आपुलकीची चुटपुट लागलेले जाईचें हृदय, या विचारसरणीनें जास्तच व्यथित झालें!.. त्याच दुःखी हळुवार नजरेनें तिनें अरुणकडे एकदां वळून पाहिलें तों अरुण अगदीं शून्यपणें हॉटेलच्या समोरील दारांतून दिसत असलेल्या माणसांच्या वर्दळीकडे पहात, हातांतील सिगारेटच्या धुराचे मधून मधून लोळ सोडीत होता! भोंवतालच्या साऱ्या परिस्थितीचें जणूं भानच विसरल्याप्रमाणें, तो त्यावेळीं आपल्यांतच रममाण होऊन स्वस्थ बसला होता.



''मघां आपण एकाएकीं भेटतांच, अरुण असे एकदम चपापले कां? त्यांच्या मनांत तरी काय होतं त्यावेळीं?..'' - कांहींच जाईच्या लक्षांत येईना. पण श्रेष्ठ कलेविषयींच्या मोठमोठ्या आकांक्षांनीं प्रेरित असें, आशापूर्ण आयुष्य घालवीत असलेला तोच पूर्वीचा अरुण, आज तसा अगदीं आपल्या भकास हृदयाची शून्य दृष्टि, उगीचच इतकडे तिकडे फिरवीत, सिगारेट फुंकीत समोर बसलेला तिला दिसत होता! तें दृश्य असह्य होऊन, त्यामुळें मात्र जाईचें जात्या आशावंत हृदय अगदीं भरून आलें.

तिला शेवटीं रहावेचना. त्याच्या बऱ्याच वाढलेल्या दाढीमुळें गंभीर दिसणाऱ्या चेहऱ्याकडे व मोठ्या कपाळाकडे अत्यंत स्नेहपूर्वक पहात जाई त्याला म्हणाली, ''अरुण, सहज विचारते हं आपलं!.. तुम्हांला दिवसाला एक डबा पुरतो कां हो सिगारेटचा हल्लीं?..''

: ५३४ :

''मघा वसंत भेटला, त्यावेळीं त्याला आपण अगदीं विशेष प्रयासाशिवाय बाजूस सारलें. पण आतां जाईला आपल्याला कां टाळतां येत नाहीं?.. आपण तिला दुःख होऊं नये म्हणून कां जपतों?.. नोकरीच्या वेळांत आपण आतांपर्यंत अनेकवेळां जाईला धुडकावून लावलं; आपल्या,.. अगदीं आपल्या स्वतःच्याच सुखदुःखात रममाण होण्याचा प्रयत्न केला; पण तरी देखील जाई आपल्याविषयींचं तिचं प्रेम, तिची आपुलकी, अनेक वेळा प्रकट करीत आल्यावांचून राहिली नाहीं! आणि आज तर दहा मिनिटांपूर्वी आपण ज्या आत्यंतिक विचारसागरांत पोहत होतों, त्याला अशी एकाएकीं ओहोटी लागून, या मुलीच्या स्नेहानें, आपल्या इच्छेविरूद्ध आपण मागें खेचलें जात आहों! कां?''-

त्याला कांहीं समजेना व अगदीं गोंधळून तो बराच वेळ गप्प बसला. पण शेवटीं अरुणला वाटलें, ''हा आपला केवळ दुबळेपणा आहे. पुन्हां सारं धैर्य एकवटून तिजपासून आपण पटकन् दूर होऊं या!-''

याच विचारानें त्यानें सिगारेटचे एकदोन झुरके घेतले व तसें बोलण्यासाठीं तिजकडे तो दृष्टि फिरविणार, इतक्यांत, त्याला उलट जाईचाच तो मघाचा प्रश्न एकदम ऐकूं आला, ''अरुण, सहज विचारतें हं आपलं! दिवसाला एक डबा पुरतो कां हो सिगारेटचा हल्ली?''

: ५३५ :

त्या अनपेक्षित प्रश्नानें अरुण पुन्हा एकदां चमकला. त्या प्रश्नामागील रोख समजण्यासाठीं किंचित् गांगरल्या दृष्टीनें त्यानें जाईकडे पाहिलें. तिला तो प्रश्न विचारण्याचा कांहीं अधिकार नाही याची जाणीव तिच्या स्वरांत प्रतीत होत होती; तरी तिच्या दृष्टींत अरुणच्या स्वातंत्र्याइतकीच

त्याच्याविषयींची हतबल कींवहि स्पष्ट दिसत होती.

या जाणिवेनें अरुणला वाटलें, ‘‘आपण बाहेरच्या उपायानें आपल्या हृदयांतील रसरसणारी आग मारण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत आहों! पण हें या प्रेमळ चाणाक्ष मुलीलाहि पूर्णपणें समजलं आहे!’’ त्याच्या मनांत क्षणभर आलेला पूर्वीचा विचार पुन्हा बाजूस सारून, त्यानें जाईकडे स्नेहानेंच पाहिलें; आणि मग घाबरल्या अंतःकरणानेंच तिला विचारलें, ‘‘कां बरं?..’

जाईला वाटलें होतें, या प्रश्नानें कदाचित् तो थोडा रागावेल. पण तो उलट घाबरलेलाच पाहून, ही वेळ त्याच्याबरोबर मोकळेपणें बोलून घेण्यास बरी आहे, असें तिनें ठरविलें; आणि त्याच्याकडे हंसून पहात ती म्हणाली, ‘‘तसं नाहीं कांहीं!.. उगीचच!.. किती तरी दिवस पहाते आहे मी... तुमच्या तोंडांत अग्निहोत्र आपलं चालूंच असतं अव्याहत! म्हणून म्हटलं आपलं, एवढंच!..’’

: ५३६ :

‘‘आपण पैसा पैसा असें म्हणणाऱ्या, अपेक्षेनें पाऊल टाकणाऱ्या लोकांना एकदां हंसत होतों. पण आतां, आपलाहि तसाच अधःपात झाला आहे!’’... अरुणच्या मनांत असलेंच तुंबळ सुरूं झालें, कीं, त्याच्या मनाच्या समाधानासाठीं, त्याला एक प्रकारची शून्यता प्राप्त करून देण्यासाठीं, कशाची तरी आवश्यकता वाटे व म्हणूनच त्याचें धूम्रपान दिवसेंदिवस वाढत गेलें होतें. पण आपल्या मागल्या ध्येयांची, आकांक्षांची वाताहत झाल्याचें कधीं कधीं त्याच्या मनांत प्रखरतेनें डोकावूं लागलें, की त्याचें त्यांतहि समाधान होत नसे.

जाई आतां भेटली, त्यावेळचा तोहि असलाच एक प्रसंग होता. आणि जाई भेटली म्हणूनच, आतां जो विचारांतीं कनिष्ठ वाटतो, तो बारमध्यें जाण्याचा आपला अधःपात टळला, या विचारानें अरुणला वाटलें, ‘‘असले अनेक प्रश्न आपल्याला विचारण्याचा जाईला एका दृष्टीनें मोठा अधिकारच आहे! तिचं आगमन व आपल्या जवळची सिगारेट, या दोहोंच्या तटामुळेंच आपलं बारमध्यें जाणं टळूं शकलं!’’

आणि क्षणभर थांबून, तो अत्यंत सौम्य शब्दांत जाईकडे हंसून पहात म्हणाला, ‘‘हें पहा पै, आहे खरी तुम्ही म्हणतां तशी वस्तुस्थिति!.. पण तुम्हाला एक सांगूं का? थोडा विचार करा - माणसाला कोणतंहि व्यसन नसावं, असं आपण म्हणूं या पाहिजे तर!.. पण व्यसन नसण्याचं व्यसनहि त्याला नसावं! पटतं ना तुम्हांला माझं म्हणणं?’’

: ५३७ :

एक क्षणभरच, आपल्या चमकत्या डोळ्यांनीं त्याच्याकडे पहात, जाई स्तब्ध राहिली; पण मग हंसून म्हणाली, ‘‘कबूल!.. आम्हाला तुमच्या म्हणण्याचा मथितार्थ जाणण्याइतकी थोडी फार



बुद्धि आहे कीं जन्मतः!.. पण तुम्हाला हें सिगारेटचं व्यसनच आहे नाहीं कां?.. मीं अमुक एक गोष्ट जन्मांत केली नाहीं असा टेंभा मिरवणं हेंहि एक व्यसनच आहे व तें वाईट! - पण हें जितकं खरं, तितकं तुम्ही म्हणतां त्या नियमाप्रमाणेंच, हें असलं अमर्याद व्यसनहि वाईट!.. नव्हे कां? - तुमच्याच गहन तत्त्वाचा पहिला भाग कितीसा खरा ठरतो तुमच्या बाबतींत?-’’

या जाईच्या रोखठोक बोलण्यावर अरुणला कांहींच बोलतां येईना. क्षणभरच तो स्तब्ध राहिला! पण मग नवी सिगारेट पेटवीत, जाईकडे हंसून पहात तो म्हणाला, ‘‘हो कबूल!.. तुम्हाला किंवा मला चकविण्यांत कांहीं अर्थ नाहीं!.. हें व्यसन आहे खरं मला!.. पण मन मारूनच जगांत चालावयाचं असतं माणसाला साधारणतः, नाहीं कां? तेव्हां मी तरी आपलं मनाचं असंच समाधान करतो अशा परिस्थितींत - कीं, ‘बाबारे, जगांत एखादं मोठं व्यसन लागूं नये अशी इच्छा असेल, तर कोणतं तरी एखादं लहानसं तरी आपण होऊन धर!’’-

: ५३८ :

‘‘काय अक्कल लढवाल तेवढी थोडीच आहे.’’ जाई त्याच्या उत्तरानें थोडीशी गोंधळली व त्याच्याकडे जरा हंसून पाहूं लागली. पण मग पुन्हां कांहीं सुचल्यासारखें करून, ती अरुणला म्हणाली, ‘‘हें व्यसन लहान कां मोठं, हें सध्यां ठेवूं बाजूला! -पण एवढ्यानं एखादं मोठं व्यसन लागणार नाहीं, अशी तरी खात्री आहे ना तुम्हांला?-’’

जाईच्या त्या प्रश्नानें मात्र, अरुण पुन्हा मघाचा त्याला झालेला फ्रिव्हॉलिटी बारचा मोह आठवून मोठ्यानें दचकला!

जाईच्या भेटीपासून व गेल्या जवळजवळ साडेतीन वर्षांच्या त्यांच्या मुग्ध सहवासांत, जाई ज्या उत्कट आपुलकीनें अरुणच्या सुखदुःखांत सहानुभूतिपर लक्ष घालीत आली होती व आतांहि घालीत आहे, तें सारें त्याला आठवलें; आणि त्यानें तिजकडे अगदी प्रेमभरल्या डोळ्यांनीं निरखून पाहिलें.

: ५३९ :

जाई इतके दिवस त्याच्या हाताखालींच नोकरी करीत होती. पण अरुणला आपल्याकडे इतक्या प्रेमानें पहातांना तिनें पाहिलें नव्हतें! यामुळें तिला प्रथम अतिशय आनंद झाला व नंतर तिच्या मनाला एक नवाच धीर आला! जात्या प्रेमळ मनाचा अरुण केवळ या प्रवाहपतित जीवनामुळेंच इतरांप्रमाणें आपल्या बरोबरहि असा कठोरपणें व बेफिकीरीनें वागत आला, याची पुन्हा एकदां जाईला खात्री झाली.

टेबलावर टेकलेल्या कोंपरांवरील आपल्या हातांच्या बैठकींत आपली हनुवटी ठेवून व समोर

बसलेल्या अरुणकडे आपली प्रेमपूर्ण दृष्टि रोखून, शेवटीं जाई अगदीं कळवळ्यानें त्याला म्हणाली, ''अरुण, पूर्वी आपण एक ध्येयवादी श्रेष्ठ कलावंत होतो, हें आतां तुम्हीं हळूंहळूं विसरत चाललां आहां कां हो? मनुष्याला जगण्यासाठी धडपडावं लागतं, भोंवतालच्या जीवनकलहाला तोंड देतां देतांच त्याच्या मोठमोठ्या महत्वाकांक्षा विरूं लागतात!... कबूल! पण त्यामुळें आपण आपली सारीं ध्येयं विसरणं, निष्क्रिय होणं योग्य ठरतं कां सांगा बरं मला?...''

आपण आपली सारी बेफिकीरी, सारी कठोरता विसरून, या मुलीपुढें आज अगदीं मऊ मेणाप्रमाणें जास्तजास्तच वितळत आहों, हें जाणून, अरुण अगदीं स्तब्ध बसून, तिजकडे पहात तिचें बोलणें लक्षपूर्वक ऐकत होता.

: ५४० :

समोरच्या दिव्याच्या उजेडांत, जाई फारच मोहक दिसत होती! तिनें आपल्या पिंगट केसांची सैलशीच पण लांबलचक वेणी घातली होती आणि तो शेपटा, तिनें तेथें बसतांना आपल्या खांद्यावरून पुढल्या बाजूस टाकला होता. डोक्याच्या मध्यभागावरील भांगापासून थोडेसे फुगीर केलेले केंस, तिच्या दोन्ही कानांच्या मध्यापर्यंत खालीं आले होते; आणि त्यामुळें त्या खालच्या गौर कानांतील तांबड्या खड्याच्या कुड्या तिला जास्तच शोभून दिसत होत्या. कुंकवाच्या बारक्या टिकली जवळपास, केशकलापांतून खालीं सुटलेली एक लहानशीच कुरळी बट, अगदीं सहजतेनें - जणूं स्वच्छंदानेंच तिच्या रुंद कपाळावर हालत-रुळत होती. तिचें उंच नाक, तांबड्या चमकीनें व त्या जवळच्याच लांब भिवयांखालच्या काळ्याभोर डोळ्यांनीं जास्तच डोळ्यांत भरत होतें. तिचें पातळ ओंठ तिच्या लांब चेहऱ्याला जास्तच मोहकता आणीत होते. मध्येंच बोलतां बोलतां हंसतांना तिच्या उजव्याच गालाला पडणारी खळी व दांतांची रेखीव ओळ, तिच्या बोलण्यांतील व डोळ्यांतील सौजन्याच्या सौम्य भावांत जास्त भर टाकीत होती. थोडासा उघडा टाकलेला गळा, तेथून सुटून त्या खालच्या वेलबुट्टीच्या कापडाच्या ब्लाउजवर लोंबणाऱ्या सोन्याच्या छड्यामुळें, अधिकच सुंदर दिसत होता. बोलतां बोलतां, तांबडी किनार असलेल्या सांगली मिलच्या तिच्या काळ्या पातळाचा लांब पदर, थोडा बाजूस सरल्यामुळें, तिच्या गौरवर्ण उघड्या हातांतील दोन कचकड्यांच्या बांगड्यांमधील एकाच सोन्याच्या बांगडीवरचा तास चकाकत होता!..

जाईच्या बोण्यांतील तन्मयता, सहानुभूति व प्रेमळपणा यांमुळें अरुणचें तिजकडे लागलेलें लक्ष, या तिच्या पोषाकांतील एकंदर आकर्षकतेमुळें व शरीरसौष्ठवामुळें तिजकडे जास्तच वेधलें; आणि त्याला वाटलें, ''किती प्रेमळ गोड मुलगी!.. आणि हीच आपल्या स्नेहासाठीं धडपडत असतांना आपण तिजबरोबर उगाचच किती कठोर बेफिकिरीनें वागलों!''



आणि हें आठवून त्याला स्वतःचा रागच आला. 'तिला आपल्या साध्या स्नेहाचा हक्क नाहीं कां?' या विचारानें त्याचें मन उद्विग्न झालें; आणि आपली आतापर्यंतची तिजबरोबर नाहकच झालेली कठोर वागणूक सुधारण्यासाठीं, तो तिला स्नेहानें म्हणाला, ''हें पाहा पै, तुम्ही म्हणतां तसं थोडं फार आहे खरं! पण मी तरी काय करूं सांगा? माझ्या आयुष्याच्या गाडीचे रूळच जणूं काय बदलल्यासारखं मला वाटतं अनेकदां! या निष्क्रियतेंतही मला आनंद वाटेनासा झाला आहे. पण काय करावं, तेंहि समजत नाहीं!.. कधीं कधीं माझ्या नोकरीमुळंच माझा अधःपात झाला असं मला वाटतं! -पण मग नोकरीमुळेंच माझं सध्याचं स्वतंत्र आयुष्य मला जगतां येतं आहे! आणि या विचारानें उलट मी त्यांत समाधान मानतो!''

: ५४१ :

आज जवळ जवळ प्रथमच आपल्याकडे अरुण इतका बोलका झालेला! त्यामुळें आनंदून, त्याच्याकडे अत्यंत आपलेपणानें पाहात, जाई त्याला प्रेमळ शब्दांत पुन्हां म्हणाली, ''कबूल, अरुण! पण तुमचं नोकरीबाहेरचं जीवन? ते तरी सध्यां तुम्हांला मोकळं आहे ना?... त्याचा कितीसा चांगला विनियोग करतां तुम्ही??- नाहीं, अरुण! तुम्ही तुमची केवळ फसवणूक करून घेतांहां! स्वतः तुम्हांला कदाचित् तुमच्या कलेच्या श्रेष्ठत्वाची किंमत वाटत नसेल!.. पण तुम्हींच तुमचीं जुनी चित्रें पुन्हा पाहण्याचा कधीं प्रयत्न केला आहे कां? आणि तीं पाहिल्यावरही तुम्हाला पैसा हेंच केवळ मनुष्याचं ध्येय वाटतं कां? चुकतां अरुण तुम्हीं! समाजाला तुमच्या कलेची मुळींच किंमत-जरूरी नाहीं, - अशी आपली फसवी समजूत करून घेऊं नकां!''

जाई बोलतां बोलतां थांबली! अरुण मुग्धपणें विचार करीत तसाच बसून राहिला होता. 'आपल्या हृदयांतील झगडा, इतक्या सौम्यपणें साध्या शब्दांत सोडवावयाचा, निदान जाई असा आपुलकीनें प्रयत्न करीत आहे!' या विचारांतच तो मग्न होता.

तेवढ्यांत, जाईच पुन्हा हंसून त्याला म्हणाली, ''याचं कारण सांगूं मी तुम्हांला, अरुण! तुमचं सध्याचं अनिर्बन्ध निष्प्रेम आयुष्य! अपेक्षा, अपेक्षा! असली तुमच्या मनानेंच तयार केलेली कावीळ तुम्हांला झाली आहे? त्या दृष्टीनेंच सगळीकडे पाहाण्याची, तुमच्या मनाला आतां चटक लागली आहे!- होय ना?... आणि या कैफांत तुम्हाला इतरांच्या साध्यासुध्या स्नेहाचीसुद्धां गरज वाटेनाशी झाली आहे! खरं कीं नाहीं?-''

: ५४२ :

मघां एकाएकीं भेटलेल्या वसंताची, अरविंदाची,... आणि समोर बसलेल्या खुद्द जाईबरोबरच्या आपल्या कठोर वागणुकीची, अरुणला पटकन् आठवण झाली! आणि जाई आपल्या भावभावनांशीं

किती समरस होऊन आपल्याला सारें सांगत आहे, याची नुकतीच प्रचीति आल्यामुळें, त्याला तिचें कौतुक वाटलें! - स्वतःविषयीं दुःख झालें!...

जवळजवळ आपल्यासारख्याच परिस्थितींत, मन मारून नाइलाजानें वावरणाऱ्या या मुलीला, इतक्या शांतपणें विचार तरी कसा करतां येतो? याचें त्याला आश्चर्य वाटलें; आणि तो कांहींहि न बोलतां, तिजकडे आपलेपणें हळुवार दृष्टीनें पाहूं लागला. ती आतां पुढें काय म्हणते, याची अत्यंत उत्कंठेनें तो आपल्या जिवाचे कान करून वाट पाहूं लागला!

जाई, त्यावेळीं त्याच्याचकडे हंसून पहात होती. थोडा वेळ तसाच शांततेंत गेला; म्हणून अरुण स्वतः काहीतरी बोलणार, इतक्यांत जाईच त्याला एकदम पुढें म्हणाली, ''अरुण, आशा आणि उत्साह या दोन गोष्टी सोडल्या, कीं माणसाचं आयुष्य संपलंच!.. असं नाहीं का तुम्हांला वाटत? निदान माझा तरी तसा अनुभव आहे!''

तिच्या या लहानग्या वाक्यांत बराच अर्थ भरलेला असल्यासारखें अरुणला वाटलें, पण मग तो मनाशीं म्हणाला, ''आशा आणि उत्साह! कशाच्या जोरावर या दोन गोष्टी माणसानें मनांत वागवायच्या? जगांत पहावं तिकडे मनुष्य धंदा उभारून बसला आहे. सारा व्यापार चालला आहे चोहों बाजूंस. स्वार्थ आणि अपेक्षाच दिसतात नव्हे कां जिकडे तिकडे? आणि तिथं ही निष्फळ आशा आणि वेडा उत्साह काय कामाचा?''

: ५४३ :

तोंच, त्यांच्या टेबलावरील रिकामी ग्लासें चिमटींत धरून उचलतांना, ती एकमेकांवर आपटल्याचा खट्कन आवाज झाला; आणि अरुणनें वर मान करून पाहिलें! त्याला आश्चर्य वाटलें, त्याच्या ओळखीचा तो जुना जाडा इराणी, आपल्या खांद्यावर टाकलेला फडका पुढें मागें करीत, आपल्या बारक्या सुजलेल्या डोळ्यांनी अरुणकडेच निरखून पहात उभा होता!

क्षणभरच त्याच्याकडे पाहिल्यावर, अरुणला आठवण झाली - 'आपल्याच विचारांत आपण आज जाईबरोबर ज्या इराण्याच्या हॉटेलमध्ये शिरलों आहों, तें आपलं मागचं एका काळचं, सकाळ-संध्याकाळ चहा प्यावयास येण्याचं हॉटेल होतं!... आणि समोर उभा असलेला इराणी तेथलाच आपल्या परिचयाचा मालक! 'पण तो आपल्याला आतां कसचा ओळखतो?'

अशा कल्पनेनें त्याच्याकडे एकदां सहज ओझरती नजर टाकून, अरुण खालीं पाहूं लागतो न लागतो, तोंच तो इराणी हातांतली ग्लासें एकदम खालीं ठेवून, अरुणच्या खांद्यावर हाताची झांप टाकीत भरभर म्हणाला, 'ये सायबा ठाकूर, अरे यकदम ओलखबी नाय देते काय?'

आणि पटकन पुढें होऊन, हंसत हंसत अरुणच्या दाढीला हात लावून तो पुढें म्हणाला,



''आणि ये दाढी राखते? कवापासून?... अरे गेला होतां कुटें? हाय कुटें तूं हाली? आंऽ?...''

इराण्याच्या त्या अनपेक्षित प्रेमळपणानें आणि त्याच्या त्या परिचित आवाजांतील प्रश्नांच्या भडिमारानें, गुदमरून, अरुण त्याच्याकडे आश्चर्यानें पण हंसून पाहात खुर्चीवरून उठला!-

: ५४४ :

ठाकूरनेंहि आपल्याला जुनी ओळख दिली व तो उभा राहिला, हें पाहातांच त्या इराण्याला जास्तच जोर चढला. पूर्वीप्रमाणें त्याच्या गळ्यांत हात टाकून, अरुणला आपल्याबरोबर ओढत ओढत नेऊन, त्यानें धांदल सुरू केली - 'पोऱ्या, ये ग्लास लेके जाव! और ये आपने साबकू दो स्लाइस, दो जाम मस्का, और दो कप चाय लाव! एकदम स्पेशल हां!... जलदी!'

आणि तो अरुणकडे वळून म्हणाला, 'केला खायेगा केला, - खायेगा? एकदम अच्छा है!'

अरुण हंसून त्याला अजीजीनें सांगत होता, 'ये शेट्या, बाबा अबी कुच नय खायेगा!'

'नय कैसा खायेगा? सब खायेगा!' तो इराणी अरुणच्या खांद्यावर भार टाकून, त्याला हळूहळू आपल्याबरोबर ओढतच नेत म्हणाला; आणि शेवटीं अरुणनेंहि त्याच्या खांद्यावर आपला हात टाकला!

: ५४५ :

जाई आपल्या खुर्चीवर बसून, हंसत हंसतच, त्या इराण्याचा तो राक्षसी पाहुणचार पाहात होती! शेवटी थोडेसें कुतूहल जागृत होऊन, कांहीं अंतरावरील त्या दोघांच्या कुजबुजण्याकडे ती लक्ष देऊं लागली-

तो इराणी, अगदीं मोकळेपणें व आपल्या थट्टेखोर स्वभावाप्रमाणें आपल्या पुष्ट उघड्या हातांनीं अरुणची दाढी हळूहळू ओढत, त्याला हंसून विचारत होता, ''साला, येकदम पलाला होता कुटे तूं? आं?... आणि ए संगती पोरगी कोण आनली? तुझी बायको? -चल तुला पार्टी देईल शादीची!'' आणि तो वाकड्या मिस्कील डोळ्यानें जाईकडे हळूच पाहात असलेला पाहून, अरुणनेंही तिच्याकडे पाहिलें. पण, आपलें त्यांच्याकडे लक्षच नाहीं असें दाखविण्यासाठीं, त्यावेळीं ती खालीं पहात होती. अरुणला अगदीं हायसें वाटलें! पण मग इराण्याच्या जाडजूड पाठींत एक गुद्दा लगावून, समजावणीच्या स्वरानें त्याच्याकडे हंसून पहात अरुण कुजबुजला, ''ए बाबाऽ, बायको बियको कोण नाय! चूप बेसनी जरा! पण ॲस्पेन्, तुझा झाला का लगीन?''

इराणी त्यावर मोठ्यानें हंसला; आणि छातीपासून पायापर्यंत हात दाखवीत म्हणाला, ''अरे ठाकूरशेट, ए ॲस्पीला कोण देल पोरगी?''

इतक्यांत पोऱ्यानें खाण्याचे पदार्थ आणलेले पाहून, ॲस्पेंदिओर जाई बसलेल्या टेबलाच्या

बाजूस अरुणला लोटीत म्हणाला, ‘‘अच्छा, अच्छा! जा जा! ते पोरगी वाट पाहते तुझी.’’

आणि तो जिना उतरून, चालतां चालतां अरुणकडे वळून म्हणाला ‘‘ठाकूरसाब, आज तूं देल तोबी पैसा नाय हां घेल तुझ्यापास?’’

: ५४६ :

जाई त्या साऱ्या दृश्याकडे पाहतां पाहतां त्यांचा अस्पष्ट संवाद ऐकून आपल्याशीच हंसत होती. अरुण इराण्याच्या प्रेमळपणामुळें आनंदून, पण त्याच्या जाईविषयींच्या चौकशीमुळे थोडा लाजून, येतां येतां मध्येंच घुटमळला. पण, जाईनें त्यांतलें कांही ऐकलें नसेल अशी मनाची शेवटीं समजूत करून, तो पुन्हा आपल्या खुर्चीवर हळूंच येऊन बसला.

पण कपांतील चहाचा एक घोट घेऊन, जाईनें आपण सहजच विचारीत आहों अशा तऱ्हेनें अरुणकडे पहात प्रश्न केला, ‘‘कोण हो तो इराणी? आणि कुजबुजून काय विचारीत होता तो तुम्हांला?’’

जाईच्या त्या प्रश्नानें अरुण अगदीं गांगरला. पांच मिनिटांपूर्वी त्या आडदांड प्राण्यानें जाईविषयीं केलेली आपली थट्टा, तिनें ऐकली तर नाहींना? त्यांत इराण्याचा किंवा आपला कांही हेतू नसला, तरी त्यामुळें जाईला काय वाटलें असेल, या विचारामुळे अरुण थोडा गोंधळला; व शेवटीं तिला कांहींच उत्तर न देतां स्वस्थ बसला.

इतक्यांत जाईच त्याला पुन्हा म्हणाली, ‘‘मोठा प्रेमळ प्राणी आहे हं अगदीं! तुमच्या कोणी जुन्या ओळखीचा आहे वाटतं तो?...’’

: ५४७ :

‘‘हो, सहा सात वर्षांपूर्वीची त्याची माझी ओळख!’’ विषय आपोआपच बदललेला पाहून अरुणला थोडें हायसें वाटलें होतें, ‘‘त्यावेळीं मी मेडिकल कॉलेजांत जात असे. रोज सकाळ संध्याकाळ इथेंच चहा प्यायला यायचा मी! हें टेबलावर आतां दिसत आहे, तें माझं साधारणतः नेहमींचं खाद्य! थट्टा मस्कऱ्या खूप चालत आमच्या त्यावेळीं! आणि इराण्याच्या जातीला हा असला प्रेमळ अचरटपणा तर कांहीं सांगायलाच नको! ॲस्पेन्दिऑर अपवाद नाहीं त्या नियमाला!’’

अरुण थोडा वेळ चहाचा घोट घेत गप्प राहिला; आणि मग स्लाइसचा बारीकसा तुकडा तोंडांत टाकून म्हणाला, ‘‘पण गंमत वाटते आहे मला! या प्राण्यानें इतक्या वर्षांनंतरहि, -माझी नुसती ओळखच नव्हे, तर माझ्या आवडीच्या पदार्थांचीहि आठवण ठेवली!.. आणि आतां म्हणतो आहे, -फार दिवसांनीं भेटलास! दिडकी घेणार नाहीं! काय चक्कर आहे बेटा! -यांत त्याचा काय हेतु कोणास ठाऊक?’’



थोडा वेळ, जाई कांहीं एक न बोलतां, इराण्यानें प्रेमानें पाठवून दिलेलें सारे पदार्थ संपवीत होती. पण मग अरुणकडे हंसून पाहात ती त्याला म्हणाली, ‘‘मग काय अरुण? जगांत सगळीकडे केवळ अपेक्षाच आहे, असंच म्हणणं ना तुमचं एकूण!...’’

: ५४८ :

त्या तिच्या अचानक आलेल्या प्रश्नानें गोंधळून, चहाचा शेवटचा घोट घेऊन पटकन उठत अरुण म्हणाला, ‘‘हें पाहिलंत - अकरा वाजायला आले! - झालं ना तुमचं? जाऊं या आतां!...’’

आपल्या प्रश्नाच्या उत्तराची, अरुणनें केलेली टाळाटाळी जाईच्या लक्षांत आली होती. पण तिकडे दुर्लक्ष करूनच तीहि उठली व हंसत म्हणाली, ‘‘हो, चला मलाहि उशीर झाला फार!’’

तीं दोघेंहि खालीं उतरतां उतरतां अरुणनें खिशांतून पैशांचें पाकीट काढलें; व काऊंटरजवळ येतांच, तो त्यांतून रुपाया बाहेर काढूं लागला.

तोच ॲस्पेन्दिऑर त्याच्यावर लटकेंच ओरडून म्हणाला, ‘‘अरे नै बोलता है तो ये क्या?’’

अरुणनें दचकून आपला हात नाइलाजानें मागें घेतला; व त्या इराण्याकडे हंसून पहात तो चालूं लागला!

तेवढ्यांत त्या इराण्यानें त्याला ‘शुक् शुक्’ करून पुन्हा हाक मारली व कपाटांतून काढलेला एक जाड ड्रॉइंग पेपर, हंसत त्याच्या हातीं दिला!

मागें एकदां अशीच थट्टा करतां करतां, अरुणनें ॲस्पेन्दिऑरला काढून दिलेलें, त्याचें तें पेन्सिल स्केच होतें! जाईहि त्याच्याजवळ उभी राहून तिकडे पाहूं लागली!

ॲस्पीचे मोठें पोट व बारके उंदरासारखे डोळे, हंसरा गोल चेहरा, अरुणनें काढलेल्या त्या चित्रांत, किंचित् विकृत पद्धतीनें पण अगदीं हुबेहुब आलें होतें! त्या समोरच्या व्यक्तीकडे व त्याच्याच त्या चित्राकडे आळीपाळीनें पाहून, जाई अगदीं मोहकपणें मनापासून हंसली!

अरुणच्याहि चेहऱ्यावर तो मागला प्रसंग आठवून, एकदां मंद स्मित झळकलें!-

ॲस्पीनें तें चित्र, अरुणकडून हंसत हंसत पुन्हा हिसकून घेतलें; आणि त्याच्या पाठीवर एक थाप मारून तो म्हणाला, ‘‘आच्छा, अबी जाव जाव! हमाराबी काम है, ठाकूरशेट!’’

जाई व अरुण पायऱ्या उतरून फुटपाथवर आलीं; त्यावेळीं दोघांच्याहि डोळ्यासमोर ॲस्पेन्दिऑरचीच आकृति प्रामुख्यानें उभी रहात होती.

आणि जाईला वाटलें, ‘ॲस्पीच्या पोटाइतकंच त्याचं हृदयहि मोठं आहे!..’

: ५४९ :

‘‘आतां तुम्ही कुठं जाधवांकडे जाणार?’’ अरुणनें चालता चालतां जाईला विचारलें.

‘‘हो! -पण जाईन मी एकटी! तुम्हांला वेळ झालाना बराच?’’ जाई त्याच्याकडे प्रश्नार्थक चेहऱ्यानें पाहून म्हणाली; मनांत मात्र ती कचरलीच होती.

जाधवांचें घर जरा आंतल्या अंगाला; आणि मधला भाग बराच निर्जन! ‘अरुण आपल्याबरोबर घरापर्यंत आले तर किती बरं होईल! जाधवबाबांना, आईला, दोघांनाहि आनंदच वाटेल. पण त्यांना सांगणं म्हणजे एकतर आपण त्यांना त्यांची इच्छा नसतांना त्रास देणं आणि दुसरं, आपण एकप्रकारं आपल्या हतबलतेचा कबुलीजबाबच देणं!’

जाईचा असा विचार चालला आहे, तोंच अरुणनें पुन्हा तिला प्रश्न केला, ‘‘तुम्हाला भीति नाहींना वाटत एकटं जायला?... आतां रस्ते अगदीं निर्मनुष्य होत चालले आहेत, म्हणून म्हणतो!..’’

‘‘-म्हणून काय म्हणतां? - मला कोण खाणार आहे?...’’, जाई वरवर हंसून बेफिकीरी दाखवीत म्हणाली; पण तिला तिजवर आलेला तो मागला प्रसंग एकदम आठवून मनांत जास्तच भीति वाटत होती.

अरुणलाहि तो प्रसंग त्याचवेळीं एकदम आठूवन, तिला तो थट्टेनेंच म्हणाला, ‘‘खाणार नाहीं कोण म्हणा! -पण तुम्हाला तो मागला प्रसंग आठवतो ना?’’

जाईला आजच्या अरुणच्या एकंदर सहानुभूतीचा व मोकळ्या वागण्याचा आनंद वाटत होता; आणि म्हणून कांहींशा आपुलकीच्या भावनेनेंच, ती मोकळ्या मनानें म्हणाली, ‘‘हो! पण नुसतं आठवून काय करायचं बरं, अरुण?.. मला घरीं तर जायला पाहिजे ना? - आणि तुम्हाला आतां यानंतर सींवला जायचं! तेव्हां -’’

वास्तविक, तिला यावेळीं अपेक्षा होती, अरुणच पटकन् म्हणेल, ‘मी येतो तुम्हाला पोहोचवायला!’ ‘‘खरंच एवढासुद्धां आपला त्याच्यावर इतक्या सहवासानंतर हक्क नाहीं का पोहोंचत?’’

पण अरुण तसें कांहींच न करितां नुसती संकटाची तिच्यासमोर कल्पना उभी करीत होता. त्यामुळें तर त्याचा तिला थोडा रागच आला. तरी ती प्रेमळपणें त्याच्याकडे पहात उभी राहून म्हणाली, ‘‘नुसते प्रश्न तेवढे विचारीत रहा तुम्ही!...’’

जाईच्या त्या सौम्य रोषाची अरुणला गंमतच वाटली. त्यालाहि वाटत होतें, ‘‘अशा रात्रींच्या वेळीं आपण जाईला इथं रस्त्यांतच एकटी सोडणं चांगलं नव्हे!’’

-पण मग तिजबरोबर घरीं जावयाचें म्हणजे पुन्हा जाधव मंडळींची भेट! आणि त्यांना भेटण्याचं तर त्याच्या जिवावर येत होतें!‘‘पण त्यांना न भेटण्याचें कारण तरी काय? - आज



जाईच्या सहवासामुळें आपल्याला जसा एक प्रकारचा अनपेक्षित, साहजिक विरंगुळा वाटला, त्याप्रमाणेंच, त्यांच्या बऱ्याच दिवसानंतरच्या भेटीनेंहि समाधान वाटेल कदाचित्! निदान जाईला तरी घरापर्यंत पोचवणं आपलं कर्तव्यच आहे, नाहीं कां?...’’

आणि मनांत आलेल्या या साऱ्या विचारांच्या गोंधळांत, त्यानें एकदम जाईला म्हटलें, ‘‘चला! मी येतो तुमच्याबरोबर तुम्हाला पोहोंचवायला!...’’

: ५५० :

अरुणनें जवळची एक व्हिक्टोरिया बोलावली. त्याच्या बरोबर व्हिक्टोरियांत चढतानां, जाईला अगदीं मनस्वी आनंद वाटत होता. तिनें मागें वळून अरुणला विचारलें, अगदीं जाधवबाबांच्या घरापर्यंत यायचं हं?... खरंच, तुम्ही यावं म्हणून त्यांना कितीतरी दिवस वाटतं आहे! मग याल ना आतां घरीं पण!...’’

अरुण थोडा वेळ खालींच थांबला; आणि नंतर आंत चढतां चढतां म्हणाला, ‘‘हो! चला’’

व्हिक्टोरिया चालूं लागली, तेव्हां जाई आपल्याजवळ शेजारींच बसलेल्या अरुणकडे पाहून, अगदीं मोहकपणें हंसली. तिला बोलका झालेला अरुण आपल्यापाशीं बसल्याचा अतिशय आनंद झाला होता!

व्हिक्टोरिया चालूं लागली आणि घोड्याच्या खुरांचा त्या शांत वेळीं मोठ्यानें टपटप् आवाज येऊं लागला. एका आंतल्या रस्त्याला जेव्हां घोडा वळला, तेव्हां अरुण व जाई दोघांनींहि बांकणावर एकमेकांकडे पाहिलें.

नंतर बराच वेळ, कोणी कोणाशीं बोललें नाहीं!... पण दोघांच्याही मनांत, गेल्या तास दीड तासांतील सारे प्रसंग काहूर उडवीत होते!...

: ५५१ :

वसंताची भेट,... त्यानंतर, आपलीं पूर्वींचीं ध्येयें, महत्वाकांक्षा व सध्याचं केवळ पैशामागं वहात चाललेलें चाकोरीचं आयुष्य, यांमध्यें झालेला मानसिक झगडा!.. मनःशांतीसाठीं बारचा मोह, - तेवढ्यांतच झालेली जाईची अचानक भेट! -तेव्हांपासूनआपण विरघळत कां गेलों तें अरुणला समजेना!.. पण मग,... आजपर्यंत गेल्या साडेतीन वर्षांत, जाईनें आपल्याविषयीं दाखविलेलें मुग्ध सौजन्य व आस्था, - तिचा जात्याच प्रेमळ स्वभाव,... हें सर्व आठवून, त्याला त्यांत विशेष नवल असें कांहीं वाटेनासें झालें!.. जाईमुळेंच आपण एका मोठ्या मोहांतून सुटलों, हे जाणून, तिच्याविषयींचा त्याला वाटणारा स्नेह द्विगुणित झाला! - आपल्या अकारण व अनैसर्गिक बेफिकीर कठोरपणाचें त्याला वैषम्य वाटलें!.. विशेषतः, हॉटेलांत जाईबरोबर आज

प्रथमच झालेलें मनमोकळे बोलणें-इराण्याचें अकारण सौजन्य पाहून जाईनें हळूंच विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्याची आपण केलेली टाळाटाळ, हें सारें आठवून अरुणला वाटलें, ''खरंच, आपण त्या प्रश्नाचं उत्तर कां टाळलं बरं?''

त्यावरूनच त्याला ॲस्पेन्दिऑरच्या हॉटेलांत, सहा सात वर्षांपूर्वी अनेक वेळां घडलेले लहान मोठे सारे प्रसंग आठवले! -''त्या इराण्यासमोरून, दिवसांतून शेकडों माणसें गेलीं असतील - जात असतील!... पण तरीहि, आपण आज इतक्या काळानंतर, जवळजवळ निराळ्या वेषांतच त्याला भेटूनहि, आपली ओळख काढून, आपल्या आवडीचे पदार्थ आठवणीनें आपल्यापुढें ठेवण्याइतकी आपल्याविषयींची अकारण आस्था,... तो धंदा मांडून बसलेला व्यापारी दाखवितो! -किती अनपेक्षित!... यांत कसली अपेक्षा? कसला हेतु होता त्याचा?''

त्याला पटकन् जाईच्या वाक्याची आठवण झाली, -''अपेक्षा-अपेक्षा -अरुण, असली तुमच्या मनानेंच तयार केलेली कावीळ तुम्हांला झाली आहे!'' हो, या वाक्याची प्रचीति दाखवण्यासाठींच जणूं काय, जाईनें अरुणला हॉटेलमधून उठतांना तो प्रश्न विचारला होता!... त्यांतील सत्य केवळ हुज्जतीनें खोडून टाकण्याची त्याच्यांत धमक नव्हती! अरुणला आत्मविश्वास वाटत नव्हता!

शेवटीं, त्याला वाटलें, ''आपल्या साऱ्या कठोरपणाला धुडकावून लावून, जाई आपल्याशीं फारच प्रेमानें वागली!... खरंच!.. फार न बोलतां चटकन् लोभ लावणारी, अगदीं प्रेमळ मुलगी आहे... जाई म्हणजे! खरी सहनशील म्हणूनच ती आपल्याबरोबर इतके दिवस आपल्या बेफिकिरीशीं झगडत वागूं शकली!''

आणि याच विचारमालिकेमुळें, अरुणनें जवळ बसलेल्या जाईकडे वळून पाहिलें! व्हिक्टोरियाच्या पाडलेल्या टपावर डावा हात ठेवून, जाईनें त्यावर आपलें डोकें टेकलें होतें; व पुढल्या फिरणाऱ्या चाकाकडे शून्य दृष्टीनें पाहात ती कसला तरी विचार करीत होती!-

: ५५२ :

हो, जाई विचार करत होती! -तो चक्राप्रमाणें फिरणाऱ्या आपल्या लहानग्या आयुष्याचा!-

मिरेच्या वियोगानंतर, शांताराम एकाएकीं तिच्या आयुष्यांत आला. अगदीं प्रेमळ मोकळेपणानें ती त्याच्यावर प्रेम करूं लागली होती! त्यावेळीं आपलें आयुःचक्र त्या स्थितींतच स्थिर राहील असें तिला वाटलें होतें.

पण तें फिरलें. शांतारामहि गेला!

त्यानंतर थोडावेळ लहानग्या नंदानें तिचें आयुष्य व्यापलें. किंचित्काळ जातो, तोंच तोहि चटका लावून निघून गेला! पण त्या घटनेमुळेंच ती पतित ठरली व प्रवाहपतित झाली!



त्यानंतर, अरुण तिच्या आयुष्यांत आला. अगदीं लहानग्या सहवासानंतर एकदम नाहींसा झाला. ती वणवण भटकून हताश झाल्यावर, तो एकाएकीं पुन्हा भेटला. त्याचा सहवासही सुयोगानें तिला लाभला. पण तो त्यावेळी कठोर झाला होता. तो परकेपणें स्वतःमध्येंच रममाण होऊन वागत होता!

यावेळीं तिला फक्त जाधवांच्या प्रेमाचा व आपल्या आशावंत हृदयाचाच काय तो आसरा होता! ती तशीच मुग्धपणें अनुकूल कालाची वाट पहात होती.

-आणि शेवटीं आज, अरुणचा मोकळा सहवास तिला अचानक लाभला होता. आणि अगदीं याक्षणीं तर, तो तिच्याजवळच बसून तिच्याबरोबर चालला होता!

यामुळें व त्या इराण्याची थट्टा तिला त्यावेळींच आठवल्यामुळें, त्यांत कसलेंहि सत्य नव्हते, तरी जाईचें हृदय आनंदानें भरून आलें!...

याच विचारचक्राच्या गतीनें, तिच्या हृदयभावनांना भरती आली होती; तिनें अरुणकडे वळून पाहिलें, तों तो सिगारेट पेटवीत होता!

: ५५३ :

जाई एवढा कसला विचार करीत आहे, या विचारानें थोडा वेळ तिजकडे पाहून अरुणनें खिशांतून सिगारेट काढली होती! पण ती शिलगावतां शिलगावतां, त्याला जाणीव झाली, ''आपल्याला जवळ जवळ गेल्या तास दीडतासांत एकदांही धूम्रपानाची आठवण झाली नाहीं!...''

प्रसंग साधाच - पण त्याला त्याचें आश्चर्य वाटलें! ''कां बरं? जाईचा सहानुभूतिपूर्ण स्नेहाळ सहवास? ॲस्पेन्दिऑरची फार दिवसानंतरची भेट? जाईला घरीं पोंचवण्याची व जाधवबाबांना भेटण्याची आपल्या मनाची तळमळ? या साऱ्या प्रसंगांमुळेच आपण तें विसरलों कां?''

आणि मग त्याला जाईचें दुसरें एक वाक्य आठवलें, ''तुमच्या या साऱ्या मनःस्थितीचं कारण सांगूं मी, अरुण? तुमचं सध्याचं अनिर्बंध निष्प्रेम आयुष्य!''

खरंच! भकास मन म्हणजे सैतानाचा राजवाडाच!

आणि मग मात्र, मघां वसंताला धुडकावून लावल्याबद्दल त्याला जितकें वाईट वाटलें,... तितकेंच जाईबरोबर जाधवमंडळींसारख्या प्रेमळ माणसांमध्ये आपण आतां जात आहोंत, याबद्दल मनाला आनंद झाला!-

: ५५४ :

असल्याच मनःस्थितींत दोघेंही बसली असतांना, त्यांची व्हिक्टोरिया जाधवबाबांच्या घराजवळ जाणाऱ्या गल्लीपाशीं येऊन पोंचली!

खालीं उतरल्यावर, अरुणनें आपल्या खिशांतील पांच आणे व्हिक्टोरियावाल्याच्या हातावर ठेवले. दोघांसाठीं एकट्या अरुणनेंच खर्च केल्याचा, तो जाईच्या आयुष्यांतील पहिलाच प्रसंग! त्यामुळें तिच्या मनाला किती आनंद वाटला?..

दोघेंहि न बोलतांच, हळूंहळूं चालत होतीं. जाधवांची चाळ अगदीं निःशब्द झाली होती; त्यांच्या गाळ्यांत दिवा वगैरे कांहीं नव्हता!

गोठ्याजवळ आल्यावर, दोघांनाहि आपल्या आयुष्यांतील, चतर्जींच्या सहवासांतील तो मागला प्रसंग पुन्हा घडत आहे, असेंच एक क्षणभर वाटलें!

अरुण मंद पावलानें गोठ्यापर्यंत गेला. गाय तशीच वासराजवळ बसून रवंथ करीत होती. तो थोडा पुढें झाला आणि त्यानें गसड्यांकडे पाहिलें!- जाई त्या दिवशीं झोपली होती, तो वरला गसड्यांचा थर तेथें नव्हता. चतर्जी त्या दिवशीं सारंगी वाजवीत बसला होता, तेथेंच अरुण थोडा वेळ बसला.

सर्व दिशेनें काळोखांतच नजर फिरवतां फिरवतां अरुणला वाटलें, आपल्या कानांत ते भैरवीचे कोमलस्वर घुमत आहेत!-

: ५५५ :

तोंच, जाईनें अरुणच्या खांद्याला हळूच स्पर्श करून म्हटलें, ‘‘चला ना अरुण! घरांत जाऊं या. जाधवबाबा आणि आई, माझ्या येण्याची वाट पाहात, उगीच बिछान्यावर तळमळत पडलीं असतील!...’’

अरुण उठला व तिजबरोबर चालतां चालतां, त्यानें खिन्नपणें हंसून पाहिलें!

जाई घाईघाईनें पुढें झाली; दाराजवळील पायऱ्या चढून, ती किंचित् काल तेथें थबकली; - आणि मग हळूंच दारावर टिचकी मारून ती म्हणाली, ‘‘बाबाऽ!’’

‘‘कोण? -जाई?’’ आंतून एकदम जाधवबाबा व आई यांचे दोन आवाज आले. आणि मग गोपाची आई उठून दाराजवळ येत असल्याची चाहूल, व तिचे शब्द ऐकूं आले, ‘‘का ग जाई? एकटीच कशी आलीस? आणि इतका उशीर कां झाला?’’

जाई बाहेरूनच म्हणाली, ‘‘तुला सारं सांगते हं आई, दार उघड आधीं!.. आणि मी एकटी नाहीं कांहीं? -माझ्याबरोबर अरुण आहेत!’’

: ५५६ :

अरुण तो दोघांचा प्रेमभरला संवाद गहिंवरलेल्या हृदयानें ऐकत होता! तेवढ्यांत जाधवबाबांचा आवाज ऐकूं आला, ‘‘कोणऽ? अरुण आले आहेऽत?.. त्यांना आपल्याकडे घेऊन आलीस कां



शेवटीं, पोरी?’’

घाईघाईनें कडी उघडली गेली; आणि उघडलेल्या दारांत, जाधवबाबा व गोपाची आई उभीं राहिलीं. त्यांच्या हातांतील कंदिलाच्या प्रकाशाचा झोत, दाराजवळच उभ्या असलेल्या जाईवर व पायऱ्यांशीं थबकलेल्या अरुणवर पडला!..

क्षणभर,.. सगळीं एकमेकांकडे पाहून सौम्यपणें स्मित करीत होतीं!

नंतर जाधवबाबा हातांत कंदील घेऊन खालीं आले; आणि अरुणच्या खांद्यावर हात ठेवून, त्याच्याबरोबर पायऱ्या चढत, जड आवाजानें म्हणाले, ‘‘फाऽर दिवसांनीं भेटलांत, अरुण! हं.. कसं काय? ...ठीक आहेना?’’

अरुणला काय बोलावें तेंच समजेना. आंतल्या खोलींत जाणाऱ्या जाईकडे व गोपाच्या आईकडे पाहून, अर्धवट स्मित करीत त्यानें कपडे काढले; व तो जाधवबाबांच्या बिछान्याच्या उशाशीं येऊन मुग्धपणेंच बसला.

: ५५७ :

जाधवबाबाहि कंदील टेबलावर ठेवून, त्याच्याजवळ येऊन बसत म्हणाले, ‘‘आम्हांला भेटायला आलात अरुण? फार बरं केलंत!.. जाईकडून आम्हांला तुमची खुशाली समजत होती नेहमीं! पण-’’

‘‘आजहि जाईमुळेंच आलो!’’ आपण नेहमी पै म्हणतां म्हणतां, एकदम ओघानें सहजच ‘जाई’ असा आपुलकीचा शब्द आज वापरल्याची जाणीव होऊन, अरुण किंचित् चपापला; व जाईच्या तें लक्षांत आलें असेल, या कल्पनेनें लाजला!.. त्यानें मधल्या दाराकडे दृष्टि वळवली. जाई व गोपाची आई त्याच्याचकडे प्रेमळ दृष्टीनें पाहून हंसत होत्या!

इतक्या दिवसांत आजच, ‘जाई’ म्हणून अरुणनें आपल्याला संबोधिलेलें ऐकून, जाईला आज अरुण भेटल्यापासून आतांपर्यंतचा त्याचा प्रेमळ सहवास आठवला. त्या आनंददायक स्मृतींनीं उल्हसून, जाईनें अगदीं उत्साहानें आईच्या गळ्यांत हात टाकला; तिच्या डोक्यावर आपलें डोकें टेकलें; आणि तिला तिनें ओढून आंत नेलें. जाईच्या उत्कंठित मनाच्या साऱ्या धडपडी त्यांतच प्रतीत होत होत्या!..

‘‘बरं, आतां बरीच रात्र झाली आहे!’’ अरुणला आपल्याजवळ बिछाना घालून देतां देतां जाधवबाबा म्हणाले, ‘‘उद्यां रविवार ना? तुम्हाला कामावर जायचं नसेलच! -उद्यां आपण फार दिवसांच्या सांचलेल्या साऱ्या गप्पा मारूं!’’

तसें बिछान्यावर पडल्या पडल्या, अरुणला त्या साऱ्यांच्या आपल्याबद्दलच्या निरपेक्ष प्रेमानें

भारल्यासारखें वाटत होतं!

आपल्या एकाकी खोलींतील आपला नेहमीचा बिछाना, आणि जाधवबाबांच्या जवळचा हा आजचा बिछाना - त्या दोहोंत अगदीं जमीन अस्मानाचें अंतर आहे, असेंच अरुणला वाटलें!

: ५५८ :

जाधवबाबांजवळच्या बिछान्यावर पडल्यावर, अरुणला प्रथम फार समाधान वाटलें!.. पण मग आपल्या साऱ्या माणसांची आठवण होऊन, तो किती तरी वेळ बिछान्यावर तळमळत पडला होता!..

संध्याकाळपासून त्याच्यामध्यें जें पुन्हां जागृत झालें होते, तें कमींत कमी सौजन्य, ती माणुसकीदेखील, वसंताच्या भेटीच्या वेळीं त्याच्यामध्यें नव्हती!.. आपली असली कठोरता केवढ्या लांबच्या थराला पोहोंचली होती, याची अरुणला आतांच खरी कल्पना आली. आणि शेवटीं तो मनांत म्हणाला, ''अरेरे!... आपण उगीचच वसंत, अरविंद,... साऱ्यांनाच अतिशय दुखावलें!..''

जाधवबाबांच्या दारांतून आंत शिरतांना, गोपाच्या आईचा प्रेमळ मातेसारखा सौजन्यपूर्ण कटाक्ष आठवून, अरुणला आपल्या कमळामावशीची मूर्ति समोर दिसूं लागली!.. त्याच्या लहानपणीं कोडकौतुक करणारी ती साध्वी!.. ती म्हणजे, तो लांब असला, तरी मोठमोठीं पत्रें लिहून हृदय मोकळें करावयाचें त्याचें जिव्हाळ्याचें स्थान होतें! -ती कमळामावशी बिचारी आपल्या खेड्यांत, आपल्या खेडवळ घरांतील सुखदुःखांशीं समरस होऊन, - त्या वातावरणांतील लहानमोठ्या संकटांना - कधीं त्रागा करून तर कधीं दुसऱ्याच्या सुखाकडे आनंदानें पाहून - धीरानें तोंड देत आलें आयुष्य पुढें ढकलीत असेल! अरुणला वाटलें, 'आपल्या भवितव्यावर दृष्टि ठेवणं, हा तिच्या उदास आयुष्यांतील फावल्या वेळांतील उद्योग असेल, खासच!'

पण एकाएकीं तिला सोडून तो शांतिनिकेतनला गेल्यापासून, तिची त्याची भेट नव्हती!.. चळवळींत शिरल्यापासून पत्रव्यवहारहि थांबला होता!... या साऱ्या प्रकारामुळें व आपल्या आतांपर्यंतच्या बेफिकीरीनें, तिला किती दुःख झालें असेल याची अरुणला कल्पनाहि करतां येईना!-

: ५५९ :

मावशीसारखीच त्यागी मंजुळा त्याच्या आयुष्यांत येऊन गेली होती!.. पण तिच्याविषयीं विचार करण्यापूर्वीच बाबासाहेबांची गंभीर मूर्ति त्याच्यासमोर दिसूं लागली!.. ''वसंत म्हणाला त्याप्रमाणें, खरोखरच बाबा आपली वाट पहात असतील कां?... पण आतां त्याचा उपयोग काय? -कदाचित् आपल्या उज्ज्वल भवितव्याच्या हेतूनेंच असेल, - पण बाबांनीं पैसा हें आपलें



ध्येय ठरवून, आपल्या मुलाला त्याच्या प्रत्येक लहानमोठ्या आकांक्षेंत विरोध करून, दुःखीच केलं नव्हतं कां? -''

तरी, आपलें मधलें आयुष्य कसें बेभान व द्रव्यकेंद्रित भकास होतें, याची नवखीच जाणीव होऊन, अरुणला बाबांना सर्वस्वी दोष द्यावयाची छाती होईना! पण कांही असलें, तरी त्यांना लागलीच जाऊन भेटण्यासहि त्याचें मन तयार होईना!..

आज कितीतरी दिवसांनीं, आपल्या या साऱ्या माणसांची अशी आठवण होऊन, अरुणच्या मनांत मिश्र भावना उसळत होत्या! -'आणि त्या आपल्या मनांत आज अशा हेलावण्याचं कारण - मुख्यतः जाई,.. आणि त्यानंतर आतांचा जाधवबाबांचा सहवास!..' या विचारमालिकेमुळेंच त्या दोघांविषयींच्या अकारण व अकृत्रिम स्नेहानें, अरुणचें हृदय भरून येत होतें!..

या बऱ्याच दिवसांनीं लाभलेल्या मनोमय स्नेहपूर्ण वातावरणामुळें, आज संध्याकाळचें, कालपरवांचें, -किंबहुना गेल्या तीन साडेतीन वर्षांचे - सारें भकास आयुष्य, अरुणला अगदीं क्षुद्र वाटूं लागलें! -आणि त्यामुळेंच भाईंच्या वियोगापासूनचे सारे प्रसंग आठवून, तो बिछान्यावर पडल्या पडल्या तळमळूं लागला!-

शेवटीं, त्यानें मनाशीं ठरविलें, 'वसंत, अरविंद यांना तरी भेटणं हें आपलें कर्तव्य आहे! - वसंत अनायासें भेटूनहि आपण आज त्याला दुखावलं! पण आतां उद्या पुन्हां त्याला भेटायचंच!-

आणि असल्या मनाच्या तयारीमुळें समाधान वाटून शेवटीं त्यानें एक सुस्कारा टाकला व तो दुसऱ्या कुशीवर वळला!

: ५६१ :

याच वेळीं, पलीकडच्या खोलींत, गोपाच्या आईजवळ जाई झोंपण्याचा प्रयत्न करीत होती!-

अरुण व जाधवबाबा बाहेर बोलत बसलेले पहातांच, गोपाच्या आईबरोबर ती आंत गेली; त्यावेळीं तिच्या हृदयाला जणूं आनंदाचा पूर आला होता! आधींच तिच्यासाठीं आईनें घालून ठेवलेल्या बिछान्यावर ती पडली; जवळ बसलेल्या आईनें पाठीवर हात ठेवल्यावर, जाई तिला कितीतरी वेळ, त्या दिवशीं घडलेले सारे लहानमोठे प्रसंग मोकळ्या मनानें सांगत होती!.. शेवटीं, गोपाची आई दिवसभराच्या दगदगीनें, 'हूं हूं' म्हणत झोंपीं गेली. जाईच्या पाठीवरील तिचा हात तसाच राहिला होता; व त्यामुळें अगदीं हलकें वाटून जाईहि स्वतःशीं पडल्या पडल्या विचार करीत होती!..

तीन चार महिन्यांपूर्वी स्वतःच्या दडपल्या भावना मनांत सामावेनात, म्हणून जाईनें मिरेला पुन्हां पत्र लिहिलें होतें. त्याचें मिरेकडून उत्तर आलें; त्यांत तिनें लिहिलें होतें '' जाई, वेडे,

अरुणांना पुन्हां त्यांच्या पूर्वध्येयांची आठवण करून देणें तुझ्याच हातीं आहे!.. पण थोडें धीरानें घे मात्र! ते प्रेमळ आहेत. तरी तूं म्हणतेस त्यावरून, त्यांच्या सध्यांच्या मनःस्थितींत, त्यांच्या कलानेंच सारें घेतलें पाहिजे. तुला त्यांचा प्रत्यक्ष सहवास लाभला, हें तुझें खरोखरच भाग्य! - लहानपणीं मलाहि तें सौख्य लाभलें होतें!.. अगदीं मोकळें लिहिते, एके काळीं, त्यांचा चिरसहवास हेंच माझें आयुष्याचें ध्येय होतें!.. पण आतां तें कायम राहिलेलें नाहीं! -माझ्या आयुष्याच्या आकांक्षा निराळ्या झाल्या आहेत. अरुणांचा आतां माझ्या आयुष्यांत पुन्हा प्रवेश ही घटना माझ्या ध्येयांविरुद्ध होईल - तुला त्यांचा चिरसहवास घडला तर मलाहि किती किती आनंद होईल म्हणतेस?..''

: ५६२ :

त्या वेळीं त्या पत्रानें जाईला फार धीर आला होता. मिरा! -आपली खरोखरीच जिव्हाळ्याची मैत्रीण ती! असें जाईला वाटलें होतें. आणि तिच्या त्या पत्रानंतर - अरुणांच्या स्नेहासाठीं, प्रेमासाठीं, झालेला आपला आतांपर्यंतचा मुग्ध प्रयत्न, आज एकाएकीं बोलका झाला! या आठवणीनें जाई अतिशय आनंदित झाली होती. त्यामुळेंच पडल्या पडल्या, तिला एकूणएक प्रसंग आठवत होते-

हॉटेलमधील सारे प्रसंग, अरुणनें आपुलकीनें तिला संबोधिलेलें 'जाई' हें नांव,... त्याचा आजचा साराच पालटलेला नूर,... जाईला तें सर्व आठवून मुग्ध आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या!

आणि तें साहजिकच होतें. नोकरीपासूनच्या साऱ्या आयुष्यांत, ती अरुणच्या असल्या दाट स्नेहासाठींच, आपल्या भावनाशील मनावर क्षणभर ताबा मिळवून, आशावंत मनानें जगत होती. तिचें अरुणविषयींचें प्रेम, ती त्याच्या पूर्वायुष्यांत जास्त जास्त शिरल्यावर तर वाढतच गेलें होतें. त्याची ध्येयप्रबळता, त्याचीं मागलीं यशें तिला मनोमय सुख देत आलीं होतीं!

'आणि तेच अरुण, आज एकाएकी आपल्याकडे बोलके झाले; त्यानीं पुन्हां असं पूर्वीसारखं ध्येयनिष्ठ व्हावं, आशावादी व्हावं, त्यांच्यामध्यें आज दिसत असलेला उत्साह कायम टिकावा, वाढावा आणि त्यामुळें ते व आपण दोघेहि सुखी व्हावें,' -ही जाईची साधीसुधी अपेक्षा होती!.. पण ती अपेक्षा, मधूनच तिच्या स्वतःच्या पूर्वायुष्याचीं काळवंडलेलीं अभ्र-पटलें दाटून, अस्पष्ट होई! 'आपल्या पूर्वायुष्याविषयीं अरुणांना समजलं तर? -त्यांच्या आपल्याविषयीं आज असलेल्या साध्यासुध्या भावनाहि कदाचित् नाहींशा नाहीं ना होणार? -आपण त्यांना मोकळ्या मनानें सांगावयाचं म्हटलं तरी तें कसं? केव्हां?'



पण अशा झगड्यांतूनहि, ती आपल्या भावी आयुष्यांविषयींचीं गोडगोड स्वप्नें कायम जागविण्याचा प्रयत्न करीत होती. आज रात्रीं अरुणला जाई पुष्कळ बोलली; पण तें सारें शांतपणें ऐकून घेण्याची त्यानें तयारी दाखविली. त्याच्या दृष्टींतहि, नेहमीं न आढळणारा एक नवखा प्रेमळपणा पुरेपूर दिसत होता. -तें सर्व आठवून, जाईला आतां बिछान्यावर पडल्या पडल्या, आनंद कोंदटल्यासारखें वाटत होतें!.. अरुणची मघाची प्रेमळ दृष्टि आठवून, तिला क्षणभर तो आतांहि आपल्याकडे तसा पहात आहे, असें वाटलें; आणि ती काळोखांतच आपल्याशीं लाजून हंसली!

: ५६३ :

''अरुणदादा, अरुणदादा, उठा ना!'' गोपा आपल्याला हलवीत आहे ही जाणीव होऊन, अरुणनें डोळे उघडून, किलकिल्या दृष्टीनें जेव्हां पाहिलें, तेव्हां त्याच्या कानावर त्याचवेळीं जाधवबाबांचे सौम्य शब्द ऐकू आले, ''अरे थांब रेऽ गोपा! झोंपूं दे ना त्यांना; रात्रीं उशीर झाला होता झोंपायला!''

त्या शब्दांतील मार्दवामुळें, अरुणनें डोळे साफ उघडून त्यांच्याकडे जेव्हां पाहिलें, तेव्हां त्याला तेहि आपल्याकडेच हंसून पहात असलेले दिसले.

अरुणनें बाहेर पाहिले तों उन्हें पडलीं होतीं!.. तो उठून बसला, तोंच जाधवबाबा म्हणाले, ''झालं! शेवटीं उठवलंच कां त्यानें तुम्हाला?.. मघांपासून सारखां तुमच्या जवळ जवळ जाऊन, मला पुन्हां पुन्हा विचरतोय 'बाबा, उठवूं कां त्यांना?'..''

गोपाच्या बालिश मनाचा उत्साह पाहून, अरुणनें त्याला जवळ ओढून घेतलें; आणि त्याला धरूनच पटकन् उठत तो म्हणाला, ''अरेऽ! बराच उशीर झाला कीं!..''

पांघरुणाची घडी करण्यासाठीं अरुण तें उचलूं लागतांच, जाधवबाबांनीं तें मुग्धपणेंच त्याच्या हांतांतून ओढून घेतलें! त्यावेळचा, त्यांच्या डोळ्यांतील प्रेमळ हुकमीपणा पाहून, अरुण तसाच दारापाशीं गेला. जाईनें पाणी वगैरे आणून ठेवलें होतें. आणि घरांत निघून जातां जातां, ती त्याच्याकडे वळून स्मितयुक्त पहात होती! अरुण तोंड धुवून वर येतो, तों, कपांतून बशींत चहा डचमळत - सांडवत, गोपाची स्वारी टेबलापाशीं जात होती. त्याच्याकडे व अरुणकडे हंसून आळीपाळीनें पहात त्याची आई मधल्या दारांत उभी होती!. अरुणला वाटलें, ''किती प्रेमळ ही सारी मंडळी!.. किती नवं वातावरण!'

: ५६४ :

'अरे गोपाऽ! -बाळ सांडवशील' असे जाधवबाबा त्याला खुर्चीवर बसल्या बसल्या म्हणत होते; आणि आपला ओंठ घट्ट आवळीत कप टेबलावर ठेवतां ठेवतां, गोपा त्यांना आत्मविश्वासानें

म्हणत होता, 'नाहीं सांडवायचा मी!-' शेवटीं त्यानें कप खालीं ठेवला व अरुण जवळ येत असलेला पाहून, तो त्याच्याकडे आपल्या बालिश प्रेमळ नजरेनें पहात तेथेंच उभा राहिला.

आपण आल्यामुळें गोपाच्या उत्साहाला आलेली ही भरती पाहून, अरुणला अतिशय आनंद वाटला. गोपाला जवळ घेऊन खुर्चीवर बसतां बसता, त्यानें त्याला उगीचच प्रेमळ स्वरांत विचारलें ''काय रे, कितवींत आहेस हल्लीं तूं?''

''मराठी पांचवी आणि इंग्रजी पहिलींत!'' तो अरुणच्या मांडीवर रेलून लाडुकपणें म्हणाला.

त्या उत्तरानें अरुण हंसला. जाधवबाबा गोपाकडे कौतुकानें पहात अरुणला म्हणाले, ''जाईमुळेंच एक यत्ता त्याला गाळतां आली!.. आणि तोहि जाईबरोबर मोठ्या हौसेनें अभ्यासाला बसतो.''

जाईवरून अरुणला आठवण झाली रात्रीच्या सिनेमाची! आणि त्यानें चहा पिता पितां गोपाला प्रश्न केला - ''काल तूं सिनेमाला गेला होतास म्हणे? काय काय पाहिलंस सांग बरं?''

''मायामच्छिंद्र!.. जय् मच्छिंऽऽद्रनाथ!..'' वर उडत जात असल्यासारखा अभिनय करून, गोपा ओरडून म्हणाला. फारसें न बोलतां केलेल्या त्याच्या त्या अभिनयामुळें, कालची आठवण होऊन जाधवबाबांना, व त्याच्या बालिश थट्टेखोरपणामुळें अरुणला हसूं आलें.

तेवढ्यांत आंतून आईची हांक ऐकून गोपा आंत गेला.

दोघे असे अचानक एकटेच राहिल्यामुळें, जाधवबाबा व अरुण एकमेकांकडे पाहून हंसले. पण थोडा वेळ गप्पच राहिले.

अरुणनें चहा संपवून कप टेबलावर ठेवल्यावर, जाधवबाबा एक लहानसा सुस्कारा टाकून अरुणकडे स्मितपूर्वक पहात म्हणाले, ''हंः!.. मागें एकाएकीं गेलांत! -त्यानंतर किती तरी दिवसांनीं आज आम्हांला असेच एकाएकीं भेटतांहां!.. आज आपण होऊन आलांत हें खरोखरंच बरं केलंत!..''

अरुण कांहींच बोलला नाहीं. तो मुग्धपणें त्यांच्याकडे पहातच होता.

: ५६५ :

''तुमची मनःस्थिति मी जाणतो, अरुण!..'' जाधवबाबा कांही वेळानें त्याच्याकडे बोलतां बोलतां प्रेमानें पहात पुन्हां पुढें म्हणाले, ''मला वाटतं प्रत्येकाच्याच आयुष्यांत असले कांहीं दिवस येत असतील!.. पण तो प्रामाणिक असला तर त्यांतून शेवटीं त्यानें सुटलं पाहिजे! आणि तसा तो सुटतोहि म्हणा!.. तुम्हीं केव्हां तरी माझ्याकडे याल, अशी मला पूर्ण खात्री वाटत होती!..''

अरुणला त्यांचें तें बोलणें किती अचूक वाटत होतें!

जाधवबाबा आपल्याकडे अजूनहि तसेंच प्रेमानें पाहून सौम्यपणें हंसत आहेत, याकडे लक्ष



जाऊन त्याला वाटलें, ''किती थोडं बोलून, हा म्हातारा आपल्या मनाशीं सहानुभूतीनें समरस होत आहे पहा!''

इतक्यांत जाधवबाबा पुन्हां बोलूं लागले, ''बरं तें असो - तुम्ही अगदीं आठवणीनें आलांत, किती आनंद वाटला!.. माझं म्हणाल तर, आपलं चाललं आहे कसं तरी! तुम्ही गेलांत, त्यानंतर नव्या नोकरीचा फंद न करतां, लहान लहान छपाईचीं कॉन्ट्रॅक्टें घेऊन पुरीं करतो झालं! मिळतात साठ पासष्ट रुपये. आणि जाई कांहीं ऐकत नाहीं. तेव्हां तिच्या व माझ्या मिळकतीवर आमचं ठीक चालतं!''

हें ऐकून, जाईच्या या अनपेक्षित प्रेमळपणाबद्दल, अरुणला केवढा आदर वाटला! 'आपण दोघेहि एका परिस्थितींतच जाधवांना भेटलो; पण जाई, त्यांच्या सुखदुःखाशीं समरस होऊन रहात होती, त्यावेळीं आपण मात्र निष्क्रिय एकाकी आयुष्यांत रममाण झालों होतों!'

या विचारानें, त्याला मनांत किंचित् लाजच वाटली; आणखी थोडा वेळ कसल्याशा विचारांत गढल्याप्रमाणें जाधवबाबा शांत राहून नंतर म्हणाले, ''खरंच, अरुण, कोणाची कोण जाई! - नुसती प्रेमळपणाची पुतळी आहे! आमच्या घरांत ती कोणत्या वेळीं शिरली तुम्हांला ठाऊकच आहे! -पण त्यानंतर, आमच्या घरांत जें आनंदाचं वातावरण पुन्हा निर्माण झालं, ते अजून तरी कायम आहे!.. किंबहुना वाढतच आहे दिवसेंदिवस! गोपाच्या आईला व मला तर फार दिवस आम्हांला अंतरलेली आमची ताईच पुन्हा कायमची लाभली-असं वाटतं! त्याच्या ताईशिवाय गोपाचं पानहि हलत नाहीं!-''

''खरंच! ती आहेच तशी प्रेमळ मुलगी!'' असा विचार अरुणच्या डोक्यांत येतो आहे, तोंच जाधवबाबा पुन्हा म्हणाले, ''आणि अरुण, तुमच्यामुळेंच आम्हांला जाई लाभली!-''

: ५६६ :

या त्यांच्या वाक्यानें अरुण केवढ्यानें तरी चमकला; -त्याच प्रेमळ जाईशीं आपण आपल्या साऱ्या सहवासंत कठोर व बेफिकीर वृत्तीनें वागलों, ही जाणीव होऊन त्याला दुःख झालें; आणि त्यानें मनाशीं ठरविलें, 'आपण निदान यापुढें तरी जाईशीं स्नेहानें वागायचं!'

या विचारानें, तो मधल्या दाराकडे जाई दिसेल या अपेक्षेनें पाहूं लागला, पण ती तेथें नव्हती.

इतक्यांत आधवबाबा जागेवरून उठले; व कोट टोपी चढवीत, त्याच्याकडे क्षणभर हंसून पाहत म्हणाले, ''मला तर वाटतं अरुण... तुम्हाला तुमची दाढी फार शोभून दिसते!- पण...''

आणि मधल्या दाराकडे जाऊन ते एकदम म्हणाले, ''अगं, जाई कुठें गेली? इतका वेळ करते आहे काय घरांत? - तिला बाहेर ये म्हणावं!...''

'आले हं' असें आंतून म्हणून, थोड्याच वेळांत ओचे सोडीत, जाई बाहेर आली.

तिला उद्देशून जाधवबाबा म्हणाले, ''जाई, मला तर यांची दाढी बरी दिसते बुवा! तूं काय परवां म्हणत होतीस त्याविषयीं? - ... हिच्या ... अरुण, -काय म्हणालीस त्या दिवशीं तूं?.. एस्थेटिक सेन्सला? -आम्हाला नाहीं तो मोठा शब्द येत - त्याचा अर्थ काय? सौंदर्यदृष्टीला वाटतं म्हणे, - अरुण दाढीमुळं दिसतात त्यापेक्षां दाढीशिवाय जास्त चांगले दिसतील!.. होय नाऽग जाई?''

जाधवबाबा हंसत होते! अरुण किंचित लाजला! -जाई गोंधळली!

आपण अरुणाच्या दाढीविषयीं, जाधवबाबांकडे मागे केव्हां तरी चर्चा केली होती; तें बिंग त्यांनीं असें एकदम फोडलें! पण त्यामुळें, अरुणला काय वाटेल, अशा भीतीनें जाई अरुणकडे पाहूं लागली. तरी ती थोड्या धीरानेंच म्हणाली, ''हो!.. कां बरं?''

'कांऽ कांही नाहीं गं!'' जाधवबाबा कोंपऱ्यांतील चपला पायांत चढवीत म्हणाले, ''मी जरा थोडं बाहेर जातो आहे कामाला!... गोपाची आई करील जेवणाची तयारी!.. तोपर्यंत तुझे कसले मुद्दे असतील तें त्यांनाच सांग! -गोपा येणार होतास ना माझ्याबरोबर?...''

तो तयारच होता. दोघेहि बापलेक बाहेर पडले. गोपाच्या आईनें हंसत हंसत दारापर्यंत येऊन बाजारासाठीं पिशवी त्यांच्या हातांत दिली; आणि ती परत आंत निघून गेली.

जाई लाजली होती; थोडीशी घाबरली होती. त्याच दृष्टीनें अरुणकडे पहात ती मुकाट्यानें उभी राहिली!-

पण अरुण उलट जाईच्या त्या चर्चेतील तिची आपल्याबद्दलची आस्था व आपुलकी जाणून गोंधळला होता...

दोघांनींहि भांबावल्या नजरेनें एकमेकांकडे एकाच वेळीं पाहिलें. त्याचवेळीं, जाधवबाबांची मघाची प्रेमळ चर्चा आठवून, त्यांना दोघांनाही तसें पहातां पहातां खुदकन् हंसू आलें!-

: ५६७ :

कालपासून वाढलेला अरुणचा मोकळेपणा अजूनही कायम आहे, आणि तो आपल्यावर आतांहि रागावला नाहीं, हें पाहून जाईला केवढा धीर आला!

ती अरुणसमोरच्या खुर्चीवर बसून, त्याच्याकडे पुन्हां हंसून पाहात म्हणाली, ''मी म्हटलं होतं खरं जाधवबाबांकडे तसं! -पण माझा कांहीं तुमच्या दाढीविषयीं कसलाच आग्रह नाहीं हो! मी आपलं उगीच माझं मत सांगितलं, एवढंच-''

''अस्संऽ?' अरुणहि तिच्या तसल्या समर्थनानें आनंदून तिजकडे पाहात हंसला; आणि



थोड्याशा थट्टेच्याच स्वरांत पुढें म्हणाला, ''जाई, आणखी काय काय मतं आहेत तुमचीं, तीं तरी कळूं द्या एकदां...''

अरुणच्या आजच्या मोकळ्या मनाच्या विनोदानें जाई एकदम लाजली! पण मग तितक्याच मोकळेपणें ती त्याला म्हणाली, ''आणखी पुष्कळ पुष्कळ मतं आहेत माझीं! पण इतक्या दिवसांच्या सहवासानंतर कालपासूनच काय तें तुम्हीं तीं ऐकण्याच्या मनःस्थितींत आहां! -होय ना?-'

तिच्या त्या योग्य टोमण्याचें, अरुणला कौतुक वाटलें! कालपासूनच्या या बदललेल्या वातावरणांत, आपल्याला किती आनंद होत आहे, या अनुभवामुळें त्याला त्याच्या मधल्या बेफिकीर आयुष्याविषयीं वाईट वाटत होतें. -आणि तो शेवटीं अगदीं स्नेहानें जाईला म्हणाला, ''जाई, मी तुम्हां साऱ्यांबरोबर - विशेषतः तुमच्याबरोबर - उगीचच कठोरपणें वागलो आजपर्यंत!.. तुम्ही काल संध्याकाळीं, माझे डोळेच उघडलेत जणूं काय! तेव्हांपासून, त्या मधल्या बेफिकीर स्वप्नांतून असा एकाएकीं जागा झाल्यामुळें, आतां मला पुन्हां तुमच्या साऱ्यांच्या स्नेहाची, आवडीनिवडींची, आणि मतांची - अतिशय जरूर वाटूं लागली आहे! म्हणूनच तुम्हाला म्हटलं, तुमची आणखी काय काय मतं आहेत?''

: ५६८ :

त्याच्या या स्नेहाळ उद्गारांनी जाईला आनंद वाटला आणि ती त्याला म्हणाली, ''खरंच अरुण, तुमच्यामध्यें असला पालट पडावा, याची किती दिवस मी वाट पहात होतें म्हणून सांगूं? -तुमची इच्छा नव्हती, पण मीच आपली, तुम्ही मला भेटण्यापूर्वीच्या तुमच्या आयुष्याची माहिती करून घेतली! आणि तुमच्यासारखा एक श्रेष्ठ दर्जाचा कलावंत असा प्रवाहपतित होऊन निराश व निष्क्रिय आयुष्य कंठीत आहे, हें समजल्यामुळें तर मला पावलोंपावली जास्तच वाईट वाटूं लागलं होतं! पण मला समजेना, मी तुम्हांला हें सांगावं तरी कसं?...''

जाई थोडा वेळ गप्प बसली. अरुण खालीं पाहून विचार करीत होता, तोंच ती पुढें म्हणाली, ''मी किती तरी दिवस वाट पाहात होते, ती संधि काल एकदांची एकाएकीं आली! खरंच, तुम्ही असे माझ्याजवळ बसून, माझ्या आवडीनिवडी, माझीं मतें मला स्नेहपूर्वक विचाराल, हें अगदी कालकालपर्यंतच, माझ्या आशावंत मनाला वाटणारं एक सुखस्वप्नच होतं! पण आज'

जाई क्षणभर थांबली; तिचा गळा दाटला होता. अरुणकडे प्रमानें पाहून तिनें अगदीं एक समाधानी स्मित केलें!

नंतर ती मुग्धपणेंच, एकदम जाग्यावरून उठली व भिंतीजवळच्या कोपऱ्यांत ठेवलेल्या टेबलावर

असलेले, पुस्तकांचे, कटिंग्जचे व मासिकांचे जुडगे तिनें बाहेर काढले. त्यांतील कांहीं कांहीं चित्रें, पेन्सिलीनें खुणा केलेला मजकूर, ती एकामागून एक अरुणच्या हातीं देत होती. त्यांवर, भावना उचंबळून आलेल्या मनानें, पण खिन्न दृष्टिक्षेप टाकतां टाकतां, अरुणला आपल्या मागल्या साऱ्या यशापयशाविषयींचे एक एक प्रसंग आठवत होते!

शेवटीं, खुर्चीवर टेकलेल्या आपल्या त्रस्त डोक्याला, हाताचा आधार देऊन अरुण स्वस्थ बसला. त्याला त्याचीं तीं पूर्वीची ध्येयें, मोठ्या आकांक्षा व आतांचें त्याचें चाकोरींतील निकृष्ट प्रवाहपतित जीवन, यांतील दिसून येणारा विरोधाभास आज सहनच होत नव्हता!-

: ५६९ :

आपल्याच विचारांत गढलेल्या त्याच्या त्या उदास चेहऱ्याकडे पाहून, जाई अतिशय दुःखी झाली! सहानुभूतीनें त्याच्या भावनांशीं समरस होण्याचा प्रयत्न करीत थोडा वेळ तशीच स्तब्ध राहून, जाई शेवटीं अगदीं आपुलकीच्या हळुवार शब्दांत अरुणला म्हणाली, ''ते पूर्वीचे अरुण आतां कोठें आहेत? त्यांची ती कला... तिच्या श्रेष्ठत्वाविषयीं त्यांना वाटणारं प्रेम!... सारं आतां कुठं गेलं? तुम्हांला पुन्हा तसंच व्हावं, असं नाहीं का वाटत, अरुण? याहून मोठमोठीं यशें, तुमच्या आयुष्यांत यापुढेंच लाभणार आहेत नाहीं कां? जगाकडे पाहण्याची तुमची ती पूर्वीची उत्सुक सौंदर्यदृष्टि आतां कुठें गेली? तुमची माणसें तुम्हीं सोडून आलांत ते कोणत्या हेतूनें? प्रत्येकाला जगण्यासाठीं अव्याहत धडपडावं लागतं, -म्हणून ते सारंच आतां विसरावयाचं असतं कां अरुण?...''

जाईच्या त्या प्रत्येक प्रेमळ पश्नामुळें व त्याच्याकडे पाहात असतांनाच्या तिच्या दृष्टींतील स्निग्धतेमुळें, अरुणचें अंतःकरण पूर्वीच्या त्या साऱ्या ध्येयांनी पुन्हा एकदां उचंबळून आलें!

आणि एकदम जाईकडे स्नेहपूर्ण जनरेनें पाहात तो म्हणाला, ''मग मी आतां काय करूं? तुम्हींच सांगा!''

अरुणच्या त्या ळणभर गांगरलेल्या परिस्थितीमुळें, दुःख, आनंद, समाधान, साऱ्या मिश्र भावनांनीं, जाईला दाटून येत होतें. ती उठून थोडी अरुणजवळ गेली व टेबलाला टेकन उभ्या राहिल्या राहिल्या त्याला म्हणाली, ''पुन्हा तुमच्या पूर्वीच्या उद्योगाला लागाऽना अरुण? -मला सांगा बरं, मी तुम्हाला कोणत्या तऱ्हेनं साह्य करूं तें?''

जाईच्या त्या अगदीं जिव्हाळ्याच्या शब्दांनीं पुन्हा उत्साहित झालेला अरुण तिजकडे अगदीं जिव्हाळ्यानें पाहून म्हणाला, ''बरं तर, खरोखरच आपण उद्यां त्याचा विचार करूं!''

''मी आतां आईला मदत करायला घरांत जाते.'' जाई आतल्या खोलीकडे वळून पुढें



म्हणाली, ''अंघोळ करून घेतां ना? बाबा आले कीं लागलींच पानं मांडायचीं!.. -आणि नंतरचा तुमचा दुपारचा कार्यक्रम?''

''माझा चुलतभाऊ -वसंत! त्याला भेटायला जाणार आहे कल्याणला!'' अरुण उठत उठत जाईकडे हास्यमुद्रेनें पाहून म्हणाला.

जाईहि मंदस्मित करून आंत जात म्हणाली... ''हं! त्याचं भाग्य बऱ्याच दिवसांनीं आज उदेलं म्हणायचं!''-

***

# उपकारी माणसें

# - - अभ्र - पटल - -

# विभाग ३ रा.

नोकरीला लागल्यानंतर, अरुण ज्या एका मनःस्थितींत वावरत होता, ती अशी एकदम बदलल्यामुळें, त्याला आज एक नवाच उत्साह वाटत होता!

शेवटीं, आपल्या आयुष्यांत हा नवा उत्साह जाईनेंच आणला ही जाणीव अरुणच्या मनाला खात्रीपूर्वक झाली आणि त्यामुळेंच त्याला तिजविषयींचा सारा उत्कट स्नेह, आपुलकी पुन्हां वाटूं लागली. किंबहुना तिच्याविषयींच्याच साऱ्या कल्पना एकाएकीं त्याच्या मनांत प्रथम वावरूं लागल्या.

'कोणत्या परिस्थितीमुळें ती अशी घराबाहेर पडली असेल बरें?' हा प्रश्न त्याच्या मनांत आज अगदीं प्रथमच डोकावला! तरी त्याविषयीं त्याला कल्पना मात्र कांहींच करतां येईना. कसेंही असलें तरी आपल्या सौजन्याच्या, प्रेमळपणाच्या, जोरावर परिस्थितीशीं झगडण्याचा,... त्यांत अगदीं आशापूर्ण मनानें वागण्याचा, तिच्या आंगांत धीर आहे, याबद्दल अरुणची खात्री झाली होती. आणि त्या दृष्टीनें जाई आपल्याहून खासच श्रेष्ठ दर्जाची व्यक्ति आहे असें त्याला त्यावेळीं वाटल्यावांचून राहिलें नाहीं!

मॉडेल गर्लसारखें कांहींसें कनिष्ठ दर्जाचें काम! पण तें देखील ती तितक्याच उत्साहानें, तितक्याच धीरानें करीत आली. आणि आश्चर्य म्हणजे असल्याच प्रतिकूल वातावरणांतहि ती आपले वरच्या दर्जाचें व्यक्तित्व आपल्यासारखें विसरली नव्हती! एवढेंच नव्हे, तर आपल्या कुवतीप्रमाणें जाधवमंडळींसारख्यांना त्यांच्या पडत्या काळांत हातभार लावून, केवळ आपल्या प्रेमळपणाच्या जोरावरच ती त्यांच्या जवळजवळ घरांतली बनली. आणि काल व आज तिच्या सहवासामुळेंच आपल्यांतहि असला आश्चर्यकारक फरक पडला!

आपल्यासारख्या बेफिकीर चित्रकाराबरोबरच तिला नोकरी करावयाची होती, तरी तिनें स्वीकारलेलें काम, एक प्रकारें किती हीन दर्जाचें?.. आपल्या सुंदर देहाचें जाहिराती चित्रांसाठीं प्रतिदिन करावयाचें प्रदर्शन!.. तिला कांहींच कां दुःख झालें नसेल त्यामुळें? पण तरीहि तो एक प्रामाणिक आयुष्याचा मार्ग म्हणून सहनशीलतेनें तिनें त्याचा स्वीकार केला; इतके दिवस आपल्या हाताखालीं



ती काम करीत आली!-''

यावरून त्याला त्रिनिदादमास्तरांची आठवण झाली; ते नेहमीं त्याला म्हणत असत, ''चित्रकाराला आपल्या श्रेष्ठ कलाकृतीच्या यशस्वितेंत, सौजन्य, प्रेम, सौंदर्य, उत्साह अशा बाबतींत, एखाद्या खऱ्याखुऱ्या आदर्श (Model) व्यक्तीची जोड व सहाय्य मिळणें - म्हणजेहि प्रत्यक्ष अर्धे यशच!'' आणि त्यामुळें त्याला जाईच्या मघांच्या शब्दांची आठवण होंऊन, तो आपल्याशींच म्हणाला, ''खरोखर! आपल्या एखाद्या श्रेष्ठ कलाकृतींत तिचा मॉडेल म्हणून उपयोग करणं म्हणजे तिच्या या साऱ्या सद्गुणांचा - नैसर्गिक देणग्यांचा, योग्य उपयोगच ठरेल!''

: ५७१ :

स्टेशनांत गाडी थांबल्यामुळें व पुन्हां एकदम सुरू झाल्यामुळें त्याला बसलेल्या सौम्य धक्क्यानें, असल्या उत्साहवर्धक विचारांतून तो एकदम भानावर आला; त्यानें खिडकींतून बाहेर पाहिलें, तों डोंबिवली स्टेशन नुकतेंच निघून गेलें होतें.

'आतां थोड्याच वेळांत, आपल्याला पुन्हा वसंत भेटेल' या कल्पनेनें त्याला एकप्रकारें समाधान वाटत होतें. पण मग, वसंत कदाचित् आपल्या शेतजमीनीच्या कामानिमित्त गांवड्यावर गेला असला तर? आपण संध्याकाळपर्यंत बसूं घरीं त्याच्या! सुधावहिनी तर असेल घरीं!

तिची प्रकृति तरी कशी काय असेल कोणास ठाऊक? मागें आपण सत्याग्रहासाठीं निघून गेलों त्याचवेळीं ती फार खंगली होती. न जाणों, वसंताला आतांपर्यंत ती सोडूनहि गेली असेल!'

आणि ओघानेंच अरुणपुढें प्रश्न उभा राहिला, 'मग वसंतनें पुन्हा लग्न केलें असेल कां?'

पण तसें असेल तरी त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे?.. त्यांत वाईट काय आहे?.. जवळ जवळ गेलें नऊ दहा वर्षांचें वसंताचें वैवाहिक आयुष्य! आजारी सुधावहिनीच्या शुश्रूषेंतच गेलें नाहीं कां तें सारें? तरी त्या प्रेमळ प्राण्यानें तशा खिन्न मनःस्थितींतहि कधीं कसली कांकूं केली नाहीं! तिची अतिशय आस्थेनें शुश्रूषा करण्यांतच त्याचें सुख त्याच्या कनाचें समाधान सामावलेलें होतें! मग तिच्या मृत्यूनंतर त्यानें आतां दुसरें लग्न केलें असलें, तर काय चुकलें? आणि तशीच वस्तुस्थिति असली, तर आपली ही नवी वहिनी आपल्याला कदाचित् ओळखणारहि नाहीं!-

पण मग अरुणला वाटलें, -कदाचित् मंजुळेचें लग्न वगैरे अजून झालें नसलें तर ती तरी तेथेंच असेल. आणि तिची भेट तेथें झाली तर त्या प्रेमळ मलीला आपण आतां काय सांगायचं? तिजबरोबर बोलायचं काय?-

: ५७२ :

या शेवटच्या विचारांनीं अरुण गांगरला; त्यानें भोंवती पाहिलें, तो आतांपर्यंत कल्याण स्टेशनवर उतरून, असल्याच विचारांत वसंताच्या घरापर्यंतची बरीचशी वाटचाल करून आला होता!

त्यानें कोर्टाजवळील वळण घेतलें, तशीं त्याला लांबूनच, एकेकाळीं त्यांचें एकत्र कुटुंब ज्यांत नांदत होतें, त्या नानांच्या दोन मजली घराचीं कौलें दिसूं लागलीं!-

''त्या एकत्र कुटुंबाचे आतां भाऊबंदकीनें तुकडे तुकडे पडले! एक तिकडे, एक इकडे अशी वाताहत झाली. त्याचे मालक नानाहि गेले! आणि आतां वसंत, त्याची पहिली आजारी बायको किंवा एकादी नवपरिणीत वधू यांसह, -अगर कदाचित् अगदीं एकाकी असाहि - तेथें राहात असेल!'' असा विचार करीतच, अरुण फाटकांतून आंत शिरला आणि खालच्या बिऱ्हाडकरूंच्या गाळ्यांकडे अगदीं निर्विकार मनानें पाहात जिना चढून, तो चिरपरिचित ग्यालरींत आला!..

पाहातो तो एक वर्षा सव्वावर्षांचा लहानगा मुलगा, हंसत हंसत दुडुंदुडुं धांवून त्याच्याकडेच येत होता! आणि सहज कुतूहलानें म्हणून त्याच्याकडे पाहातांच, अरुण केवढ्यानें तरी दचकला!-

त्या बाळसेदार मुलाचा चेहरा बराच गौरवर्ण होता, तरी अगदीं हुबेहूब तो मंजुळेसारखाच दिसत होता!-

: ५७३ :

त्यानें पुन्हां एकदां गोंधळलेलेल्या नजरेनेंच, त्या मुलाकडे निरखून पाहिलें. त्याच्या मनांत प्रथम विचार आला, ''मंजुळेचं लग्न झालं असेल आणि ती आपल्या मुलासह वसंताकडे कांहीं दिवस माहेरीं रहावयास म्हणून आली असेल!''

पण मग त्या मुलाचे डोळे व नाक थेट वसंतासारखें दिसत असलेलें पाहून तो पुन्हा चमकला. असल्या गांगरलेल्या नजरेनें त्या चिमुकल्याकडे पाहतां पाहतां, तो खेळकर मुलगा आपलें लाळ गळणारें तोंड उघडें टाकून, आपले नवीनच आलेले दांत दाखवीत, अरुणकडे येण्यासाठीं आपली फेंगडीं पाऊलें टाकूं लागला!

अरुण भांबावून जागच्याजागींच उभा होता. अगदीं जवळ येऊन त्याच्या धोतराच्या निऱ्या आपल्या चिमुकल्या हातांत धरून, तो बाळ त्याच्याकडे वर पाहूं लागला. तेव्हां मात्र अरुणला निमूट उभे राहवेंना. त्यानें त्याला एकदम उचलून वर घेतलें व त्याचा कोमल गाल चिमटींत धरून, तो त्याच्याकडे पाहूं लागला. तोहि गुलाम लाळ गाळत गाळत हंसत होंता.

पण कांहीं वेळ अरुणच्या मोठ्या दाढीकडे थोडें टवकारून पाहिल्यावर, त्याला काय वाटलें कोणास ठाऊक? तो हंसतां हंसतां एकदम रडूं लागला!-



आपण त्याच्या रडण्यास कारण झालों असें वाटून भांबांवल्यामुळें अरुणला काय करावें तें समजेना. तो बाळाकडे पाहात त्याला खेळवण्यासाठीं हळूंहळूं टिचक्या वाजवूं लागला.

तोंच आंतून लाडिक आवाजांतील शब्द आले -''काय झालं रेऽ बाळ, सुहास, तुला रडायला? आले हं!''

ते शब्द मंजुळेचेच होते. हें अरुणला चटकन् ओळखतां आलें! -आणि तीं आतां पुढे येणार, या विचारानें तो जास्तच बावरला!-

: ५७४ :

मंजुळा हळुहळू चालत दारांत आली; क्षणभरच तिनें गॅलरींत पाहिलें! -दाढी बरीचशी वाढलेला अरुण, दारांत उभा आहे व त्यानें आपल्या सुहासला वर उचलून घेतलें आहे! -तें अकल्पित दृश्य एकदम समोर पाहून प्रथम ती दचकली!

पण मग स्वतःला चटकन् सांवरून, तिनें अरुणकडे हास्य मुद्रेनें पाहिलें व त्याला ती सौम्यपणेंच म्हणाली, ''कोण अरुण? या ऽ ना! केव्हां आलांत इथं?''

काय बोलावें तें न समजून, अरुण खालीं पहात गप्पच उभा राहिला!..

मंजुळा, रडणाऱ्या सुहासला त्याच्याकडून आपल्या हातीं घेत, आपल्या त्या लहानग्याला उद्देशून हंसून म्हणाली ''कायरे, सुहास!.. हात् तुझीऽ! आपल्या अरुणकाकांनाच का घाबरलास? -वे ऽ डा!-''

मंजुळा पुढें गेली आणि साऱ्या प्रकारानें, गांगरल्या मनानें, जणूं काय तिच्यामागून, यांत्रिक पावलें टाकीत, अरुण हॉलपर्यंत येऊन पोचला!.. दोघेंहि कांहींच बोललीं नाहीत!

तेवढ्याच मंजुळा घड्याळाकडे पाहून आपल्याशींच म्हणाली, 'अगं बाई! साडेपांच झाले कीं!' -आणि मग ती आंत पाहून मोठ्यानें म्हणाली, ''अरे रामाऽ, बाळाला गाडींतून फिरायला नेणार आहेस ना? आतां उशीर झाला हो! जा पाहूं! -भांडीं विसळायचीं असतील तर मी विसळीन! तूं चल आतां!-''

आणि मंजुळा पुन्हा अरुणकडे वळून, पूर्वीच्याच सौम्य हंसऱ्या चेहऱ्यानें त्याला म्हणाली, ''थांबा हंऽ! मी बाळाला कपडे घालून रामाकडे देऊन येते-''

: ५७५ :

मंजुळा आंत निघून गेल्यावर अरुण कोचावर बसला. प्रथम तो अगदीं गोंधळलाच होता. तरी मागाहून त्याला साऱ्या प्रकाराचा स्वतःशी उलगडा करतां आला-

सुधावहिनीचा आजार वाढला असेल! वसंतानें आपल्या नेहमीच्या कर्तव्यबुद्धीनें, शक्य ते सारे

प्रयत्न करून, शेवटपर्यंत शुश्रूषा केली असेल! मंजुळा त्यावेळीं येथेंच असल्यामुळें, तिनेंही तिच्या स्नेहशील स्वभावाप्रमाणें त्याला जिवाभावानें मदत केली असेल! पण इतकें होऊनहि, इतक्या अनेक वर्षांच्या आजारानें जर्जर होऊन, शेवटीं सुधावहिनी वसंताला सोडून निघून गेली असेल!

आणि मग अर्थात्‌च वसंतानें कांहीं दिवसांनीं मंजुळेबरोबर लग्न केलें असेल!

पण तरीहि, मंजुळेच्या मनःस्थितीचें, स्पष्टीकरण मात्र त्याला पटकन् कांहींच करतां येईना! - हो, एकंदर चार वर्षांपेक्षां जास्त अवधि! मंजुळेला अरुणनें शेवटचें पत्र लिहिलें होतें; तिचें त्याला उत्तर आलें. त्यावेळीं नाहीं म्हटलें तरी तिला प्रथम दुःखच झालें असेल! पण मग तिनें आपल्या मनावर ताबा मिळवविला असेल! आणि -

पण वसंताला आपला तिचा संबंध ठाऊक होताना? मग...

त्याला कांहींच सुचेना. त्यानें खिशांतून एक सिगारेट काढली व ती पेटवून तो कोचावर मागें मान टाकून कांहीं वेळ स्वस्थ पडून राहिला!

: ५७६ :

इतक्यांत रामा व मंजुळा सुहासला घेऊन बाहेर आली. दाराजवळ तिनें आपल्या गोजिरवाण्या छकुल्याचें चुंबन घेऊन, त्याला रामाकडे देत म्हटलें, ''लामाबलोबल भुलऽऽ ज्या हां आतां!''

तो लहान बाळहि ''भुऽलऽ'' असा कांहींसा बोबडा स्वर काढून, हात वर करीत, जातां जातां रामाच्या हातांतून आपल्या आईकडे कौतुकानें पाहात होता.

रामा जिना उतरून खालीं गेला; तरी थोडा वेळ मंजुळा ग्यालरींतच उभी होती! आणि वरून त्यांच्याकडे हात हालवून हंसत हंसत पाहात होती-

तसल्या मनःस्थितींतहि, अरुणला त्या वत्सलतेच्या दृश्याचें मनोमय कौतुक वाटलें!

त्यानें हातांतील सिगारेट विझवली. तो उठून खिडकीजवळ गेला व त्यानें ती बाहेर फेंकून दिली. अरुण कोचाजवळ परत फिरला, तों मंजुळा हळूं हळूं त्याच्याकडेच येत होती. आणि तिच्या चेहऱ्यावर, त्याच पूर्वीच्या सौम्य हास्याची छटा कायम होती!

अरुण कांहींशा विमूढ अंतःकरणानें कोचावर बसला. मंजुळेनेहि जवळची खुर्ची त्याच्यासमोर ओढली व ती तिजवर बसली.

थोडा वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं!

: ५७७ :

मग अरुणनेंच मंजुळेकडे पाहून विचारलें, ''वसंत कोठें गेला, मंजुळा?''

''गांवड्यावर गेले आहेत सकाळींच उठून!'' मंजुळा त्याच्याकडे पाहून म्हणाली, ''झाली,



आता येण्याची वेळ, झालीच बहुतेक!''

पण अरुणला आणखी पुढें काय बोलावें तें एकदम सुचेना; म्हणून तो खालीं पहात कोचाच्या हातावर बोटें फिरवीत स्वस्थ राहिला.

इतक्यांत, मंजुळाच पुन्हां बऱ्याचशा आपुलकीनें म्हणाली, ''अरुण? तुरुंगांतून सुटल्यावर एकाएकीं कुठें हो नाहींसे झालां होतां? -तुम्हीं काल रात्रीं सींवला अचानक भेटला म्हणून हे सांगत होते. कांहींच कां बोललां नाहींत काल त्यांच्याबरोबर?''...

आणि थोडा वेळ थांबून ती पुढें म्हणाली, ''असा अगदीं त्रागा कां बरं? तुम्हांला यांतलं कांहीं कळलं होतं?''-

''यांतलं?'' अरुणला तिच्या प्रश्नाचा आशय थोडासा समजला होता; तरी केवळ विषयाला तोंड फोडावें म्हणून मुद्दामच त्यानें तिला तो उलट प्रश्न केला.

''हो?'' मंजुळा सौम्यदृष्टीनें त्याच्याकडे प्रश्नार्थक चेहऱ्यानें पाहात म्हणाली, ''तुम्ही चळवळींत निघून गेल्यावर यांच्याबरोबर झालेल्या माझ्या लग्नाविषयीं? -आणि सव्वा वर्षांपूर्वी झालेल्या सुहासच्या जन्माविषयीं?''

''नाही! मला त्यांतलं आतांपर्यंत... या क्षणापर्यंत.. कांहींच माहीत नव्हतं!'' अरुण थोडेसें गोंधळून जाऊन, खिशांतून नवीन सिगारेट काढीत म्हणाला.

थोडा वेळ मंजुळाहि स्वस्थ राहिली. मग ती आपण होऊनच म्हणाली, ''बरं कां अरुण, याबद्दल त्यांच्याविषयीं,.. माझ्याविषयीं,.. किंवा कोणाविषयींच तुम्हीं राग धरूं नये! अनेक चमत्कारिक घटना आपल्या भोंवती घडून येतात नेंहमीं!.. एवढंच मी आज तुम्हाला पूर्वीच्याच स्नेहानें सांगते - मला आतां वाटतं,... मी तुम्हाला मुळीं योग्य नव्हते,... हेंच खरं!''

मंजुळेच्या त्या मनापासून आलेल्या शब्दांतील सौजन्य, स्नेह व त्याग, यांच्या स्पष्ट दिसत असलेल्या तिच्या चेहऱ्यावरील छटांची जाणीव होऊन, अरुणचे डोळे पाण्यानें भरून आले! ते लपवण्यासाठीं, सिगारेट टाकून देण्याच्या मिषानें तो पटकन उठला व पाठ फिरवून ग्यालरीच्या बाजूस चालूं लागला.

पण तो दारापर्यंत येऊन पोहोंचतो, तोंच - ''कोण अरुण? - आलास ना शेवटीं?''... असे शब्द उच्चारीत, त्याच्याकडे प्रेमानें पहात, त्याच्यासमोर वसंतच उभा राहिला!..

: ५७८ :

अरुणनें हातांतील सिगारेट बाहेर फेकली व तो वसंताच्या अगदीं जवळ गेला. वसंतानें तर त्याला मिटीच मारली! -फार दिवसांनीं ते दोघे भाऊ, ते दोघे मित्र...एकमेकाला तसे प्रेमानें

भेटतांना पाहून, खुर्चीवरून उठतां उठतां, मंजुळेचे डोळेहि आर्द्र झाले होते!

''सुहास गेला कां बाहेर फिरायला?' वसंतानें अरुणच्या खांद्यावर हात टाकून, आंत येतां मंजुळेला पहिलाच प्रश्न केला. आणि तिनेंहि 'होय,' अशा अर्थाची त्याच्याकडे पाहून हास्यमुद्रेने मान हालवली; पण क्षणभर झालेली स्तब्धता मोडून, वसंतच पुढें घाईघाईनें तिला म्हणाला, ''हं, आतां बऱ्याच दिवसांनीं दोस्त दोस्त भेटलों आहों! - जा बरं लौकर! प्रथम आमच्यासाठीं चहा आणि पोहेबिहे कांहीं तरी आण!

पूर्वीच्याच सौम्य चेहऱ्यानें दोघांकडे पाहात मंजुळा आंत निघून गेली!

वसंताच्या जीवनांत, कांही तरी नवा आनंद निर्माण झाला आहे; तो पूर्वीपेक्षां खासच जास्त सुखी झाला आहे! - या जाणिवेनें, त्याच्याजवळच कोचावर बसतां बसतां, अरुणनें एक समाधानाचा सुस्कारा सोडला!

वसंत त्याच्याकडे हंसून पहात, मुग्धच बसला होता; शेवटीं एकदम भानावर आल्यासारखें करून तो म्हणाला, ''हं दोस्त! बोला आतां! काल तर, काय करावं तें न समजून, मी गांगरलोच होतो! बरं झालं, तूं आज आपण होऊनच आलास तो! -''

त्यानंतर दोघेहि बराचवेळ कांहींच बोलले नाहींत! विषय, कोणी व कसा सुरूं करावयाचा, तें दोघांनाहि समजत नव्हतें! -

: ५७९ :

पण शेवटी अरुणचा हात आपल्या हातीं घेऊन अत्यंत स्नेहभरल्या दृष्टीनें त्याच्याकडे पाहात वसंतच म्हणाला, ''तूं तर काय आम्हां साऱ्यांना सोडूनच गेला होतास, अरुण?.. अगदीं दाढीबिढीहि चिक्कार वाढवली आहेस कीं!- काय साधू व्हायचा का विचार आहे?..''

अरुण मुग्धपणेंच त्याच्याकडे पाहून खिन्न मनानें हंसला! आपल्या खिशांतील पेटींतून त्यानें एक सिगारेट बाहेर काढली. वसंतानेंहि आपण होऊनच हात पुढें करून, त्यांतील दुसरी एक स्वतःसाठीं घेतली!-

अरुणनें काडी ओढली; दोघांनीं एकाच काडीवर आपापल्या सिगारेटी पेटवल्या; आणि ते मुग्धपणें धूर सोडूं लागले!-

कांही वेळ असा धूम्रमय गेल्यावर, वसंतानेंच शेवटीं शांतता मोडली, - ''सुनीतीच्या लग्नानंतर तूं एकदम निघून गेलास! आणि मग अरुण, इकडे बऱ्याच घडामोडी झाल्या! माझ्याचपासून सुरवात करतो झालं!''-

: ५८० :



थोडा वेळ पुन्हा कोणी कांहीं बोललें नाही. मग वसंत धूर सोडीत हळूहळू म्हणाला, ''नाना गेले!.. त्यानंतर तुझी सुधावहिनीहि बरीच आजारी झाली!.. शक्य ते सारे इलाज केले. पण त्याहून दुसरं माझ्याहातीं तरी काय होतं?- दुर्दैवी बिचारी! इतकीं वर्षे अंथरुणाला खिळून यातना भोगल्यान् - आणि शेवटीं गेलीच!..''

वसंताच्या त्या वेळच्या हतबल पण प्रेमळ चेहऱ्याकडे, अरुण सिगारेट ओढीत मुग्धपणें पहात होता. वसंतानेंहि एकदां शेवटचा झुरका घेऊन हातांतील सिगारेट अर्धवटच विझवली, आणि खिडकींतून फेंकून देऊन तो पुन्हां अरुणजवळ येऊन बसला!

नंतर किंचित् थांबून तो पुढें म्हणाला. ''तिच्या आजारांत व त्यानंतरच्या माझ्या भकास मनःस्थितींत - मंजुळा येथेंच होती, अरुण!''

वसंत येथें थोडा वेळ घुटमळला; आणि नंतर म्हणाला, ''मंजुळेविषयींच्या तुझ्या भावना व तिच्याबराबरच्या तुझ्या संबंधाची एकंदर कल्पना, प्रथम कांही निराळीच होती माझी, पण मग, तिनेंच मला वेळोवेळीं कांहीं सांगितलं. मी त्या बाबतींत पुष्कळ दिवस आपल्याशींच विचार केला! -आणि शेवटीं, तूं तुरुंगांत होतास त्याच सुमारास - एकमेकांच्या संमतीनें आम्हीं विवाहबद्ध झालों!''

: ५८१ :

वसंत पुन्हा थोडा वेळ थांबला!

अरुणच्या मनांत अभावितपणें एक चमत्कारिक खळबळ झाली. ती चमत्कारिक परिस्थिति त्याच्यासमोर एकदम उभी राहिली होती, म्हणून तो मघांशीं प्रथम दचकला होता! तरी थोडा शांतपणें विचार झाल्यावर त्याला वाटलें, ''झालं तें चांगलंच झालं. मंजुळेचें लग्न व्हावं, आणि होणारहि - ही आपल्या मनांत कल्पना होतीच. पण तें आपल्या वसंताबरोबरच झालं! या कांहींशा अनपेक्षित घटनेनेंच आपण प्रथम दचकलों होतों!''

आणि हें एक निराळेंच समाधान मनाला लाभल्यावर, वसंताकडे आल्यापासून त्याच्या दृष्टीस पडत असलेलें तेथील सारें नवें उत्साही वातावरण,.. वसंताचा पूर्वीपेक्षां जास्त आनंदी व मोकळा दिसत असलेला स्वभाव,.. हें सर्व त्याच्या डोळ्यापुढें उभें राहिलें; आणि त्याला उलट आनंदच वाटला!

इतक्यांत वसंत म्हणाला, ''आमच्या सुहासला पाहिलंस का रे तूं?-''

''कोण तुझा मुलगा ना? हो हो! तोच तर मला प्रथम भेटला आज इथं!- मोठा गोड पोरगा आहे बरं कां?'' अरुण वसंताकडे मिश्र भावनांनी पाहात, कौतुक करीत म्हणाला.

चहाचे कप व फराळाचें, एका तबकांत घालून, आंतल्या दारांतून बाहेर येतां येतां, मंजुळेला अरुणचे ते शब्द ऐकूं आले!-

: ५८२ :

''पण तुमच्या दाढीला घाबरला ना तो!-'' तें सर्व टेबलावर ठेवतां ठेवतां मंजुळा म्हणाली. आपल्या मनांतील भावच, ती आपल्या बालकाच्या माथीं मारत आहे, जणूं काय, - असें तिच्याकडे पहातां पहातां, अरुणला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आणि त्यामुळें तर तो जास्तच लाजल्यासारखा झाला. वसंताहि त्याच्याकडे पाहून हंसत होता!-

पण, अरुण तेंच थट्टेचें वातावरण कायम ठेवून म्हणाला, ''त्यानें काय मला दाढीशिवाय पाहिलं होतं थोडंच?''

त्यावर तीं तिघेंहि मोठ्यानें हंसली!-

''पण एखाद्याला एकदम दाढी वाढवलेला पाहिलं, कीं चमत्कारिक वाटल्यावांचून रहात नाहीं मात्र! -नाहीं?..'' मंजुळा पुन्हा हंसून, वसंत व अरुण दोघांकडे पहात म्हणाली.

त्यावरून कालच भेटलेल्या एकदम श्मश्रू केलेल्या पांडोबांची, वसंताला पटकन् आठवण होऊन तो म्हणाला, ''हो अरुण, तुला एक वाईट बातमी सांगायची राहिली! - आपले यशवंतदादा महिन्यापूर्वीच वारले!''

अरुणला ते ऐकून थोडेसें वाईट वाटलें; आणि त्यानें कांही तरी म्हणायचें म्हणून म्हटलें, ''अस्सं!-''

थोडा वेळ तसाच गंभीरपणें गेल्यावर, अरुणनेंच पुन्हां विचारलें, ''शेवटीं तरी त्यांच्या वृत्तींत फरक पडला होता कां कांहीं?..''

''अं हं!'' वसंत आठवल्यासारखें करून नकारात्मक म्हणाला, ''चिरचिर, दीर्घद्वेष,.. त्यांचा पहिल्यापासून दिसून येणारा अमर्याद स्वार्थ, सारें तसेंच कायम होतें अगदीं!.. वास्तविक आपले नाना हट्टी!- तरी आजीनें सांगितलं म्हणूनच, बाबांच्या सल्ल्याप्रमाणें, त्यांनी दादांना सारं कांहीं दिलं. पण नानांच्या मृत्यूनंतरहि, दादा त्यांना शेवटपर्यंत शिव्या देत होते! -एवढंच कशाला?.. बाबांची प्रथमपासूनची कुटुंबासाठींची धडपड उघडच दिसत नव्हती कां?- पण इतकं असूनहि, नानांच्या त्यांना झालेल्या न्याय्य विरोधास बाबांनीं मदत केली, म्हणूनच केवळ बाबांवरहि दादांचा राग! - 'अरुण नाहींसा झाला त्याचें कारण माझा छळ!'.. असें बाबांना वारंवार म्हणून, त्यांच्या दुःखावर शेवटींहि डागण्या द्यावयाचं, दादांनीं कमी केलं नाहीं!.. एवढा मोठा वेदान्ती! पण''-



: ५८३ :

वसंत बोलतां बोलतां मध्येंच थांबला. त्याला शेवटच्या प्रसंगावरून, बाबांची आठवण झाली! - आणि तो अरुणला स्नेहानें म्हणाला, ''अरुण, बाबा बरेच अशक्त झाले आहेत हल्लीं! तूं त्यांना सोडून निघून जाण्याचा, त्यांच्या मनावर फारच परिणाम झाला आहे रे, नाहीं म्हटलं तरी!''

आणि कांहीं वेळ पुन्हा थांबून, तो पुढें अरुणला म्हणाला, ''ते तुझी वारंवार आठवण काढीत असतात, अरुण!.. खरंच, त्यांना भेटलास कां नाहीं रे आतांपर्यंत? - अरुण, आतां तरी भेट ना!''

अरुण कांहीं वेळ गप्प राहिला. आणि मग तो वसंताला म्हणाला, ''विशेष आजारी बिजारी नाहींत ना बाबा?..''

''नाहीं, तसे आजारी नाहींत!-'' वसंत सहानुभूतीनें म्हणाला; ''पण त्यांच्यांत आतां बराच फरक झाला आहे, अरुण! तूं भेटशील तर बरं!..''

मग जरा थांबून वसंत म्हणाला, ''आज अनायासेंच तूं इथें आला आहेस! - बाबाहि आज वस्तीला येथें येणार आहेत असा निरोप आहे, त्यांचा मला!''

या बातमीनें मात्र अरुण एकदम दचकला. बाबांना भेटण्याची त्याच्या मनाची अजूनहि तयारी नव्हती! - त्यामुळें तो एकदम जागेवरून उठला व भांबावून अडखळत म्हणाला, ''काय? - बाबा? - आज? इथं? - मग वसंत, मला लागलीच गेलंच पाहिजे!.. मी फक्त तुला भेटायला आलो होतो!..''

कपांत राहिलेला चहा अरुण उभ्याउभ्याच प्याला, आणि चालतां चालतां म्हणूं लागला, ''आतां मी जातो, वसंता!.. पुन्हा येईन केव्हां तरी!-''

मंजुळा त्याच्याकडे कांहींशा केविलवाण्या दृष्टीनें व त्रस्त मनःस्थितींत पहात होती. पण वसंताला त्याची कालच्या रात्रीच्या तऱ्हेवाईक वागण्याची आठवण झाली; आणि थोड्याशा दुःखानेंच शेवटीं तो म्हणाला, ''बऽरं बाबा! तुझी मर्जी!''

: ५८४ :

बरी वेळेवर सूचना मिळाली; आणि आपण निघून आलो, म्हणून आज तरी बाबांची भेट टळली! या विचारानें, चालतां चालतां अरुणला एक प्रकारचें समाधानच वाटत होतें. पण वसंताकडे गेल्यावर अचानक समजून आलेल्या अनेक गोष्टीमुळें त्याच्या मनांत काहूरहि उठलें होतें!

मंजुळेचें वसंताशीं लग्न, यांत कांहींच आश्चर्यकारक नाहीं! - हें त्याला आतां पूर्णपणें पटलें. तरी ती घटना त्याला आज प्रत्यक्ष समजेपर्यंत, त्याच्या मनाला शिवलीहि नव्हती; आणि म्हणूनच

तो प्रथम इतका दचकला होता!

पण मंजुळेचे मघांचे शब्द आठवून त्याला वाटलें, 'आपल्या पत्रामुळें आपल्या विषयींच्या तिच्या मनांतील आशा नाहींशा होऊन, तिनें बराच विचार केला असेल आणि आपल्या मूर्खपणासाठीं आजन्म अविवाहित रहावयास, ती कांहीं एखाद्या कादंबरींतील नायिका नव्हे! इतर जरुरी, इतर आकांक्षा खासच भासल्या असतील तिला!'

पण यामुळें त्याला शेवटीं एकच वाईट वाटलें, ''जर तिला कधीं आपल्या बरोबरच्या तिच्या पूर्व आयुष्याची व त्यावेळच्या तिच्या सुखस्वप्नांची आठवण झाली, तर त्या वेळीं तिच्या मनाला जें दुःख होईल त्याला आपणच सर्वस्वी कारण होत!..''

: ५८५ :

तो असाच विचार करीत, कल्याण स्टेशनाजवळ आला होता. सगळीकडे काळोख पडून दिवे लागूं लागले होते. वसंताच्या भेटीमुळें, मंजुळेच्या आयुष्याविषयीं सर्व अचानक समजल्यामुळें व तीं दोघेहि सुहासच्या प्रेमांत सुखी आहेत हें प्रत्यक्ष पाहिल्यामुळें, अरुणला एक नवेंच समाधान वाटत होतें!.. किंबहुना थोडा वेह आणखी आपण तेथें बसलों असतों तर बरेंच झालें असतें असेंहि त्याच्या मनांत येऊन गेलें!-

'पण मग आपण तेथून एकदम कां निघालों?.. बाबा येणार? हो, त्यांच्या भेटीची भीति!... त्यामुळेंच आपण तेथून झटकन् निघालों! कां?'

बाबांविषयीं त्याला द्वेष, राग वाटत नव्हता! त्याच्या अंतःकरणांत उलट त्यांच्याविषयीं आदरयुक्त प्रेमच वसत होतें! त्यांनीं त्याच्या आयुष्याच्या घडणीला लहानपणापासून मदत केली होती, याबद्दल तर त्यांच्याविषयीं त्याला कृतज्ञताच वाटत होती!

पण तरी त्यांच्या एकंदर वागणुकीमुळें, त्याच्या लहानशा आयुष्यांत, अनेक लहानमोठीं वादळें, दुःखेंच निर्माण झालीं होतीं! त्यांत त्याला न समजणाऱ्या इतर अनेक भावनाहि निगडित होत्या!

त्यामुळें तर शेवटीं त्याला एवढें खासच वाटलें, कीं, 'त्यांचीं आपली आज तरी भेट मुळींच होऊं नये!-' हो, तो अगदीं त्या मनःस्थितींतच नव्हता!-

स्टेशनांत येतांच, अरुणनें एक सींवचें तिकीट घेतलें आणि तो दादर चढूं लागला!-

: ५८६ :

पण असा आपल्याच विचारांत गढून, तो पुढें चालला आहे, - तों, प्रत्यक्ष बाबाच पुढून येत असलेले त्याला दिसले! त्याला एकदम धडकीच भरली! आपल्या डोळ्यावर त्याचा प्रथम विश्वास



बसेना! पण जें त्याला नको होतें, तेंच त्याच्यासमोर प्रत्यक्ष घडत होतें! -

थोडासा फाटलेला जरीकाठी रुमाल त्यांनीं डोक्याला बांधला होता. खांद्यावर दोन मोठीं ठिगळें लावलेला, त्यांच्या नेहमीचा मोठा काळा डगला, त्यांनीं अंगांत घातला होता. नेहमीसारखेंच शुभ्रकाठी, किंचित् मळलेलें, धोतर ते नेसले होते. घट्ट बंद बांधलेले सॅन्डल त्यांनीं पायांत घातले होते. हातांत त्यांची नेहमींची, जाड मुठीची, वळलेल्या दांड्याची, लठ्ठ काठी होती. आणि म्हातारपणानें हल्ली दृष्टि कमी झाली असल्यामुळें, आपल्या किलकिलत्या कष्टी डोळ्यांनी अरुणच्या बाजूंसच पहात, थोडेसें पोंक काढून, हळूंहळूं काठी टेंकीत बाबासाहेब दादर उतरून खाली येत होते! -

त्यांच्या त्या साध्या बावळ्या पोशाखाकडे आणि म्हातारपणा व काळजी यांमुळे निस्तेज झालेल्या चेहऱ्याकडे पाहून, अरुणला क्षणभर प्रेमाचें भरतें आलें! आणि त्याला वाटलें, ''आपण पुढें होऊन, बाबांना एकदम कडकडून भेटावें!''

पण मग त्यानें झटकन् मनावर ताबा मिळवला; पुन्हां आपला पूर्वीचाच बेत कामय केला; - आणि तो पुढें चालूं लागला! -

इतक्यांतच, बाबांची दृष्टि अरुणकडे वळली. आणि किंचित्काळ त्याच्याकडे ओझरतें पहातां पहातं, त्यांच्या तोंडून शब्द आले - ''कोऽण -? अरुऽऽण?? - ''

पण तोपर्यंत, दुसऱ्या कठड्याच्या बाजूस होऊन, अरुण दादरावरील गर्दीत मिसळलाहि होता!

: ५८७ :

त्याची दाढी इतकी वाढलेली असूनहि, 'तो अरुण!' अशी बाबांना प्रथम खात्री वाटत होती. पण 'कोण? अरुण?' असे आपण मोठ्यानें विचारूनहि, तो मनुष्य ज्याअर्थी आपल्याच तंद्रींत गर्दीत शिरला, त्याअर्थी 'आपल्याला, त्याच प्रकारच्या आपल्या विचारामुळें, नुसता तसा भास झाला, तो अरुण नव्हता खास!' - असें बाबांनीं आपल्या मनाला शेवटी समजावलें!

आणि तें हळूंहळूं पावलें टाकीत, दादर उतरून पहिल्या फ्लॅटफॉर्मवर आले; दारावरील कलेक्टरच्या हातीं, त्यांनी आपल्या खिशांतील तिकिट काढून दिलें व ते बाहेर पडून, समोरच्या एका टांग्यांत बसले -

''गेला तो अरुण नसेल!..पण सध्यां अरुण आहे तरी कुठें? जवळ जवळ साडेतीन चार वर्षे होत आलीं, त्याला तुरुंगांतून सुटल्याला! आणि अजूनही पोरगा घरीं आला नाहीं! - काय करीत असेल कोणास ठाऊक? - आज इतक घरीं असूनहि, कदाचित् तो दुःखांत - हालांत, आपले दिवस काढीत असेल!..

आणि या विचारांनीं, बाबांनीं एक दुःखाचा सुस्कारा सोडला व ते आपल्याशीं म्हणाले, ‘‘त्या दिवशीं तो चळवळींत पडावयास जातांना, आपण त्याला थोड्या कठोरपणें कांहीं म्हणालों होतों खरं!..पण त्यानें तें इतकं मनाला लावून कां घ्यायचं? - त्याच्या दुःखासाठीं कां आपण तें बोललों होतों त्याला? - तरी पोरगा मानी खराच!...इतकी वर्षे आपल्याला साफ सोडून, स्वतःच्या हिंमतीवर राहिलाच कीं नाहीं?..येईल केव्हां तरी! - आपणच येऊन भेटेल सुखरूप असला तर! नकळतहि कधीं त्याचं अहित झालेलं नाहीं आपल्या हातून! - ’’

त्यांचे हे समजावणीचे विचार चालले आहेत, तों नेहमींची माहिती असलेल्या टांगेवाल्यानें, त्यांना वसंताच्या दाराशीं आणून सोडलें -

: ५८८ :

बाबा खालीं उतरले, टांग्याला लावलेल्या कंदिलाच्या उजेडांत, आपल्या जाकिटाच्या खिशांतील सारीं चिल्लर नाणीं डाव्या हाताच्या तळव्यावर घेऊन, त्यांतील एकएक उजव्या हातानें वरखालीं करीत, त्यांनी सारीं निरखून पाहिली; आणि शेवटीं त्यांतील कथली चवली काढून, त्यांनी ती टांगेवाल्याच्या हातीं दिली!

काठी टेंकीत टेकीत, बाबा फाटकाकडे चालूं लागत आहेत, तोंच मागून एक - दोनदां त्यांना हांका मारत टांगेवाला म्हणाला, ‘‘साहेऽब!..साऽहेऽब! - ’’

बाबा एकदम तेथेंच जागच्या जागीं थबकले व मागें वळून टांगेवाल्याला म्हणाले, ‘‘काऽयरे बुवा? - ’’

‘‘साहेब, दोनच आणे?’’ तो दीन स्वरानें म्हणाला!

‘‘मग किती?..तुझ्या वाजवी भाड्यापेक्षां कमी तर नाहींना दिलं? - - ’’

बाबासाहेब किंचित् रोखठोक कठोर शब्दांत म्हणाले व पुन्हां वळून चालूं लागले.

पण तों टांगेवाला, मागून दोन पावलें पुढें येत, अजीजीनें पुन्हां म्हणाला, ‘‘पण साहेऽब - मामलेदारसाहेबसुद्धा चार आणे देतात!...’’

ते शब्द ऐकून बाबा पुन्हा थबकले; आणि टांगेवाल्याकडे मागें वळून, पुन्हा किंचित् कठोर शब्दांतच म्हणाले ‘‘तुमचं नेहमीचंच असतं हें!..हें पहा - मामलेदार लाख देतील तुला! ते मोठे माणूस असतील! - त्यांच्याशी मला काय करायचंय? मी कलेक्टर असलो तरी गरीब आहे!..मला असली उधळपट्टी खपत नाहीं! माझे पैसे माझ्या मुलाबाळांसाठीं आहेत - ’’

त्या भडिमारानें बिचारा टांगेवाला अगदीं निरुत्तरच झाला! - आणि त्यानें घोड्यांच्या तोंडांतील आडवी काठी धरून त्यांना वळविलें! -



आणि हातांतील काठी आपटून, अर्धवट काळोखांत अंधुक दिसणारा समोरील रस्ता रापत रापत, बाबासाहेब नानासाहेबांच्या घराच्या फाटकांत शिरले! -

: ५८९ :

जिन्यावरून वहाणांचा आणि हळूंहळूं काठी आपटल्याचा आवाज ऐकून वसंत पुढें झाला व म्हणाला, ‘‘कोऽण? बाऽबा?’’

‘‘हो मीऽच वसंत! थोडा उशीऽर झाला मला यायला कारे?..’’दारांतून आत शिरतां शिरतां बाबा म्हणाले; आणि एका खुर्चीजवळ जाऊन तीवर बसले.

बाबांच्या नेहमींच्या पद्धतीचाच तो प्रश्न होता! - पण वसंत त्यामुळेंच एकदम दचकला! तरी लागलींच आपल्या मनाची चलबिचल सांवरून तो म्हणाला, ‘‘छे! उशीर कसला? - ’’

‘‘सुहास झोंपला असेल जेवून! नाहीं?..’’ बाबा बसल्या बसल्या कोट व फेटा काढून बाजूच्या खुर्चीवर ठेवीत म्हणाले.

‘‘हो! - ’’ वसंतहि जवळच्या खुर्चीवर बसत म्हणाला, ‘‘आम्ही तुमचा निरोप समजल्यामुळें वाटच पहात होतों! - ’’

‘‘अरे त्याचं असंऽ! - ’’ त्याच्याकडे पाहून, बाबा हळूंहळूं बोलूं लागले, ‘‘काल सोनगांवहून भाऊ आले एकाएकी माझ्याकडे! आपल्या कमळीची मुलगी - गंधा! तिच्यासाठीं म्हणाले एक स्थळ पहायचं आहे - कल्याणास! मी प्रथम त्यांना सांगितलं काळ बदलला आहे!..आतां मुली वाढल्या तरी चालतं! कशाला उगीच घाई करतां? शिकते आहे ती शिकूं द्या! - सहावींत आहे वाटतं. बरं, वयहि कांहीं फार नाहीं - सतरा संपून आठरावं नुकतं लागलं असेल! म्हणून मी म्हटलं तसं! पण त्यांचा फार आग्रहच दिसला, आपल्या मुलीचं लग्न करायचा! मला तरीहि ते म्हणाले ‘तुम्हीच कल्याणला जा आणि पाहून - बोलून या सारं कांहीं!’ तेव्हां म्हटलं, मग वेळ कशाला घालवावा? आज ठरवलं झालं - लागलीच यायचं! - आणि पाठवला तुला निरोप! - ’’

: ५९० :

तितक्यांतच मंजुळेला आतल्या दारांत उभी पाहून, बाबा लागलीच खुर्चीवरून उठत म्हणाले, ‘‘बरं! आतां काय? ..जेवायला उठायचं म्हणतोस? - ’’

‘‘हो, झालंय सारं!..’’ वसंत मंजुळेकडे आंत पाहत म्हणाला.

‘‘बरं, चला तर! - आजकाय संध्या वगैरे बंद आमची!..’’ बाबा थोडें हंसून, वसंताकडे व आंत मंजुळेकडे पहात म्हणाले, ‘‘बऽरं!..तुमचं राज्य चालवूं लागला कीं तुमच्यासारखं! देश तसा वेष! नाहीं? - ’’

बाबा वसंतामागून आंत जाऊं लागले. मोरीवर हातपाय धुवून, टॉवेलनें पाय पुसतां पुसतां, त्यांना एकदम स्टेशनवरील प्रसंगाची आठवण झाली! - आणि ते वसंताकडे टॉवेल परत देतां देतां म्हणाले, ''काय रे वसंऽत?..अरुणला अलीकडे कधीं पाहिला आहेस कां तूं? - ''

कांहीं न बोलतांच, वसंतानें बाबांची दृष्टि टाळली; आणि वाढण्याच्या तयारीनें चुलीजवळ उभ्या असलेल्या मंजुळेकडे, तो धडधडत्या छातीनें पाहूं लागला.

''दुसरं नाहीं! - आज आतां स्टेशनवरून येतांना - त्याच्यासारखाच कोणीतरी - पण दाढी वाढली होती - पुलावरून खाली उतरत असतांना दिसला!'' बाबा तो प्रसंग आठवीत, पुढें सांगत होते, ''मला वाटलं - आपला अरुण!..म्हणून मी हांक मारली त्याला! पण तरी तो पुढें निघून गेला!..हल्लीं मला नीट दिसतहि नाहीं म्हणा!..म्हणून झाला घोटाळा तसा!..पण कोणी दुसराच होतां मला वाटतं!...थोड्या वेळानें समजलो मनांत तो भासच असं!''

वसंत अतिशय घाबरला होता. इतका वेळ, जो प्रसंग प्रयत्न करून टाळण्याची तो खटपट करीत होता, तोच प्रसंग - त्यांच्यापुढें असा एकदम उभा राहिला! - तरी त्यानें मन घट्ट करून प्रथम मौन स्वीकारून पाहिलें!..

पण शेवटीं बाबाच पुढें म्हणाले ''तुला नाहींच ना अजून कुठें भेटला तो? - ''

: ५९१ :

क्षणभरच वसंत टाळाटाळ करण्याच्या हेतूनें घुटमळला! पण त्याच्यावर प्रश्नार्थक रोखलेली बाबांची दृष्टि पाहून, त्याला आतां सारें लपवण्याचें धैर्यच होईना; - आणि शेवटी तो अगदीं नाइलाजानें म्हणाला, '' - तुम्हाला स्टेशनवर भेटला, तो अरुणच बाबा!..आजच तो मला प्रथम भेटायला इकडे आला होता, संध्याकाळपर्यंत इथेंच होता. पण मग तुम्ही - ''

''काऽऽय?..'' वसंताचे बोलणें संपण्यापूर्वीच, केवढ्यानें तरी दचकून बाबांनी त्याला मोठ्यानें विचारलें. आणि त्याच्याकडे पहातां पहातां, त्यांचा एकदम तोल गेला! - ते धाडकन् खालीच पडले असते. पण वसंत एक झांप टाकून, त्यांच्या जवळ गेला व त्यानें त्यांना सावरलें.

दोनतीन मिनिटें बाबा तसें सुन्नपणेंच वसंताच्या हातांत पडून होते. मंजुळा लगबगीनें कांदा आणण्यास धावूं लागली! - वसंत तिला पाणी पुढें करण्यास सांगूं लागला - इतक्यांत, बाबा पुन्हा चटकन् सावध झाल्यासारखें करून, खिन्नपणें हंसत म्हणाले, ''कांहीं नाहीं वसंत!..बरं आहे आतां! - सोड तूं मला!''

''तुम्हांला बाहेर खुर्चीवर नेऊन बसवूं कां वाऱ्यावर?'' वसंत आस्थेनें त्यांना विचारीत होता.

''छे ऽ रे!'' बाबा खिन्नपणे हंसून म्हणाले, ''मी इथें तुझ्याजवळ पाटावर बसतो तूं



जेवेपर्यंत! - मला मात्र जेवायला नको आतां!...एक कपभर दूधच पिईन नुसतं! - ''

वसंत कांहींच न बोलतां, मंजुळेकडे उद्विग्न चेहऱ्यानें पाहूं लागला. -

इतक्यांत, बाबा खचलेल्या स्वरानें त्याला म्हणाले, ''वसंत, उद्यां सकाळीं - त्या गंधाच्या लग्नाच्या कामासाठीं गांवांत जायचं आहे! तेथे तूं माझ्याबरोबर ये; आणि तेथलं आटोपलं कीं, मी तसाच माटुंग्याला जाईन! - मात्र तूं मला घरापर्यंत नेऊन पोचीव! - ''

: ५९२ :

''मी मुंबईहूनच संध्याकाळीं परत येईन!''असें सांगून वसंत बाबासाहेबांबरोबर बाहेर पडला. त्यावेळीं सुहासला हातीं घेऊन, मंजुळा ग्यॅलरींत उभी होती.

हळूंहळूं एक एक पायरीवर पाय टांकीत, बाबासाहेब जिना उतरत होते. वसंता त्यांच्या मागून निमूटपणें चालला होता, बाबासाहेब काल रात्रींपासून फारसें बोलले नव्हते. त्यांचा त्यावेळपर्यंतचा बोलकेपणा, एकदम बराच कमी झाला होता!

तरी खाली उतरल्यावर त्यांना सुहासची आठवण झाली; आणि ते मागें पहात वसंताला म्हणाले, ''कायरे? तुझा सुहास नाहीं दिसला कुठें सकाळपासून? - उठला नाहीं वाटतं अजून?''

त्यांच्याबरोबरच चालत चालत, वसंत ग्यालरीच्या बाजूस खाली उभा राहिला; आणि ''उठलायना!..''असें म्हणत, खालूनच तो मोठ्यानें मंजुळेला उद्देशून म्हणाला, ''सुहास, एऽ सुहास! हे बाबा - आजोबा बघ चालले!..हांक मारताहेत तुला! - ''

: ५९३ :

मंजुळेनें तें वरून ऐकलें - ती आतांपर्यंत विनयानें मागें राहिली होती, ती सुहासला घेऊन कठड्याजवळ गेली.

किंचित् लाजत, सुहासला तिनें पुढें केलें. खालीं बाबासाहेब आणि वसंत उभे होते. त्यांकडे अर्धवट व आपल्या मुलाकडे अर्धवट पहात, त्याचा चिमुकला हात आपल्या हाती घेऊन, तो हलवीत मंजुळा म्हणाली, ''ते बऽऽग, आज्योऽबा!''

तोहि आपल्याकडे बघून हंसत आहे हे पाहून, खालून त्याचें कौतुक करीत, बाबासाहेब त्याच्याकडे व त्याच्या आईकडे हंसून पहात, थोडावेळ जागच्या जागी उभे राहिले आणि मग हळूंहळूं जात, मागें वळून वसंताला म्हणाले, ''चल जाऊं या. आपल्याला बराच उशीर झाला आहे आधींच नाहीं? -

: ५९४ :

कांठी टेकीत, थोडेसें मागें पोंग काढून, वसंताबरोबर मंद मंद चाललेल्या बाबासाहेबांच्या

आकृतीकडे, मंजुळेनें एकदां प्रेमळ दृष्टिक्षेप टाकला; आणि 'गेऽऽल्हे आज्योबाऽ!' असें सुहासला हात हालवीत सांगत ती आंत आली.

आतां सावकाश बाकी सारें करूं, अशा विचारानें ती कोचावर बसली आणि सुहासला तिनें जमिनीवर सोडलें. - इतक्यांत, बाजारांत जाण्यासाठीं, रामा टोपी घालून निघालेला पाहून, सुहास त्याच्याकडे पावलें लटपटत - धांवत गेला व हात वर करून, कुरकुर करीत, आईकडे व रामाकडे पाहून तो बोबड्या स्वरांत म्हणाला, 'भुल्ल,ऽऽ.'

त्याच्या बालिश सूचकतेनें मंजुळा आपल्याशींच हंसली; आणि लाडिकपणें म्हणाली, ''जा रे रामा त्याला घेऊन, एवढं सांगतोय् तर?''

रामानेंहि हंसत हंसत त्याला पटकन् उचललें व तो त्याच्याबरोबर कांहीं तरी बोबडे बोलत बोलत जिना उतरूं लागला.

: ५९५ :

ग्यालरींतून त्या दोघांकडे कौतुकानें पहातां पहातां, मंजुळेला पांच मिनिटांपूर्वीच्याच बाबासाहेब केलेल्या सुहासच्या कौतुकाची आठवण झाली!

बाबासाहेब अलीकडे सात आठ वेळां वसंताकडे येऊन गेले; पण प्रत्येकवेळीं, मंजुळेला त्यांचें आपल्याबद्दलचें मुग्ध प्रेम व सुहासबद्दलचें असलें वत्सल कौतुकच दिसून आले होतें!.

आणि त्यावरून तिला काल रात्रीचे, बाबांनीं गंमतींत काढलेले उद्गार आठवले, ''बऽरं! तुमचं राज्य चालवूं लागला तुम्हीं - कीं तुमच्यासारखं! नाहीं? देश तसा वेष!''

त्यामुळें, आपल्या व अरुणांच्या विवाहाला त्याच बाबांनीं जोराचा विरोध केला होता, याचीहि तिला चटकन् आठवण झाली! तिच्या मनांत, नाहीं म्हटलें तरी बाबांबद्दल त्यावेळीं आलेला राग, आतांचे हे प्रसंग पाहून एकाएकीं सौम्य झाला! -

तिच्या मनांत सहजच कल्पना आली, ''आपलें अरुणांशीं लग्न झालं असतं, तरी बाबा आतां वागतात तसंच वागले असते कां प्रेमानें आपल्याशीं?''

: ५९६ :

या कल्पनेनें, ती कोचावर बसतां बसतां दचकली; आणि तिला आपल्या व अरुणांचा मागील प्रेमसंबंध, पत्रव्यवहार, त्यानंतरचा वियोग, सुधावहिनीचा मृत्यू व त्यामागून कांहीं महिन्यांनी वसंताबरोबर झालेला तिचा विवाह, याविषयीं भराभर आठवणी होऊं लागल्या.

'आपलं आतां अगदीं निराळं जबाबदार आयुष्य सुरूं झालं आहे! असल्या विचारांना आपल्या मनांत आतां मुळीच थारा देऊन चालणार नाहीं! - ' असें तिला पुन:पुन्हां वाटत होतें! तरी



कालची अरुणची अचानक भेट, बाबांना रात्रीं बसलेला धक्का, त्यांचें आपल्याविषयींचें प्रेमळ पितृप्रेम, - या सर्वांमुळें, तिने पुष्कळ प्रयास करूनहि, तिला तिच्या हृदयांत भयंकर काहूर उडविणाऱ्या त्या आठवणी, कांहीं केल्या स्वस्थ बसूं देईनात! -

तिनें पुढला दरवाजा लावला; आणि पुन्हा कोचावर पडून, आपल्या गळ्यांतील मंगळ सूत्राशीं खेळत खेळत, ती आपल्या गतायुष्याविषयीं विचार करूं लागली! -

: ५९७ :

मंजुळेचें सारें आयुष्यच कांहीसें चमत्कारिक झालें होतें -

तिच्या वडिलांची होती नव्हती ती सारी लहानगी इस्टेट गेली, तिची आई गेली; तिच्या मागून तिचे वडील गेले! - ती अगदी पोरकी असहाय्य झाली!

केवळ लोकांच्या उपकारांचें, लहानपणींच आपल्या मनावर दडपण घालीत, त्यापुढलें आयुष्य घालविण्यासाठीं, प्रथम ती नानांकडे आली! नानांकडून यशोदाआत्याकडे ती तिच्या उपकारांची ओझीं वहावयास गेली. तिचीं तेथील पुढलीं कांहीं वर्षे, अशीच प्रवाहपतितपणें गेलीं होतीं!

ठाकूर घराण्यांतील भाऊबंदकीमुळें, पुन्हां तिची मधल्यामध्यें असहाय्य स्थिती झाली. वसंताचें सौजन्य, नानांचा कांहींसा पश्चाताप, व यशवंतदादा - यशोदा आत्या यांचा अकारण रोष, यांमुळें शेवटीं पुन्हां ती एकाएकी नानांकडे कल्याणास आली.

आणि तेथें आल्यावर कांहीं महिने जातात न जातात, तों तिच्या साऱ्याच नि:सहाय्य एकाकी आयुष्यांत निर्माण झालेला, अरुणचा अतिशय उत्कट प्रेमपाश, झटकन् नाहींसा झाला! तिला उंच भराऱ्या मारतां मारतां आकाशाच्या पोकळींतून एकदम हजारों योजनें घरंगळत घरंगळत, जमिनीवर आपटल्यासारखें वाटलें, त्यावेळीं!

: ५९८ :

- त्यानंतर नानांची शुश्रूषा!..पण त्या आजारांतच त्यांचा मृत्यु! त्यामुळें तिला एकदां वाटलें, 'आतां आपला वास्तविक या घरावर कसला हक्क?..'

'पण मग जायचं कुठें आणि करायचं काय?' - हा मोठाच प्रश्न पडला तिला!

तरी वसंताचें सौजन्यच, तिच्या तेथील राहण्याला कारण झालें. त्यावेळीं, प्रथम प्रथम तिला अरुणची आठवण झाल्यावाचून मात्र रहात नसे! -

इतक्यांत अरुण तुरुंगात गेला! त्याच्या देशसेवेचीं वर्णनें तिला ऐकूं येत होतीं. आणि त्या साऱ्या प्रकारामुळें ती जेव्हां तासचे तास आपल्याशींच आपल्या भवितव्याचा विचार करीत राही, तेव्हां तिला जास्त जास्त वाटे - ''अरुणांना आपण कोणत्याच दृष्टीनें योग्य नाहीं. आपण त्यांच्या

ध्येयमार्गात एक मोठी अजस्त्र शिळा..धोंडच जणूं काय - येऊन पडलों आहों!''

आणि त्यामुळेंच, कां कोणास ठाऊक, तिला शेवटी वाटूं लागलें - ''आपण अरुणांच्या आयुष्यांतून बाजूस झालों, तरच त्यांच्यासारख्या प्रेमळ, भावनाप्रधान पण कर्तव्यशील माणसांच्या ध्येयवादी आयुष्याचा गाडा सुरळीत पुढें चालेल! - '

'पण तें शक्य तरी कसं करायचं?..आपण अरुणांना शेवटचं पत्र लिहून, आपली सदिच्छा तर विदित केलीच आहे!..परंतु तेवढ्यानं भागायचं नाहीं! अरुण तुरुंगांत गेले आहेत; तेथून ते परत आले - आणि आपल्या असहाय्य परिस्थितीविषयीं त्यांना कांहीं जरी समजलं, तरी त्यांचं हळवं हृदय उंचबळून येईल; ते आपल्यासाठीं पुन्हा नव्यानें धडपडूं लागतील! पण मग तसलं उपकारी प्रेम- '' असल्या गोंधळलेल्या मनःस्थितींत, मंजुळेला निश्चित कांहींच सुचत नसे! -

: ५९९ :

इतक्यांत, सुधावहिनी अत्यवस्थ आजारी झाली. वसंताच्या मनाची त्यावेळची हतबल धडपड, मंजुळेला अगदीं असह्य वाटे. अरुणनंतर अत्यंत सौजन्यानें जर तिजबरोबर कोण वागलें असेल तर वसंतच! त्यामुळें, सुधावहिनीच्या शूश्रूषेंत त्याला मनोभावें मदत करण्यांत, मंजुळेला अतिशय आनंदच वाटे! तिला तें आपलें कर्तव्यच वाटे. मंजुळेच्या त्रस्त मनाला त्यावेळीं तोंच एक विरंगुळा होता! -

मग, इतक्या वर्षांच्या आजारानंतर, सुधावहिनी शेवटीं मृत्यु पावली. मंजुळेला दोन दिवस चुटपुट लागली होती! त्यावेळीं वसंताचें मन दुःखी झालें; पण त्यापेक्षां 'सुधेचे हाल व आपले एकंदर मनःस्ताप थांबले!' या विचारानें त्याला शेवटीं तुलनात्मक समाधानच वाटलें.

आणि आपली स्वतःची दुःखे लौकरच बाजूस सारून, वसंत आपल्या सहानुभूतिशील अंतःकरणामुळें मधून मधून मंजुळेची जिव्हाळ्यानें चौकशी करूं लागला. तोपर्यंत तिचे कॉलेज पहिल्या वर्गातच पूर्णपणें थांबलें होतें. वसंत त्याबद्दल तिला पुष्कळ सांगून पाही. पण ती कांहींच ऐकत नसे! - अर्थातच मंजुळेच्या एकंदर मनःस्थितीची कल्पना अगर तिच्या खिन्नतेचें खरे कारण वसंताला कांहींच समजून येईना! -

: ६०० :

शेवटीं, एके दिवशीं, वसंतानें मंजुळेला अरुणविषयीं पुष्कळ विचारून, त्यांच्या भेटीसाठीं तुरुंगांत येण्याचा खूप आग्रह केला! - मंजुळा थोडा वेळ गोंधळली. ती त्याला नाहीं म्हणेना, होय म्हणेना! मुग्ध मार बसणाऱ्या तशा त्या मनःस्थितींत, मंजुळेला एकदम रडूं कोसळलें!

वसंताला त्या प्रकाराचा कांहींच बोध होईना - ''अरुण - मंजुळेचा विवाह होणार आहे ना?



मग असं कां?'' - त्याची मति गुंग होऊन, शेवटीं त्यानें मंजुळेला अगदीं सरळ पृच्छा केली -

किती तरी वेळ मंजुळेच्या तोंडून शब्द फुटेना! - पण शेवटी तिनें धीर केला, मन आंवरलें! आणि नंतर त्यावेळीं, आपण अरुणांच्या आयुष्यांतून शक्य तितक्या लौकर बाजूस होण्याची कां व कशी धडपड करीत आहों, याविषयीं अगदीं स्नेहानें वसंताला सारें कांहीं सांगितलें.

प्रथम वसंताला त्याचें आश्चर्यच वाटलें - आणि त्यावर, त्याला काय म्हणावें तेंच समजेना!

त्यानें उगीचच, मंजुळेची त्या बाबतींत अनेक प्रकारें समजावणी करून, तिचे मन पुन्हा वळवण्याचा प्रयत्न केला होता. - पण त्यांत त्याला यश येईना!

शेवटीं, त्यामुळेंच जास्त विचार करून, मंजुळेचें आतापर्यंतचें आयुष्य व तिच्या भावना यांच्याशी पूर्ण समरस होऊन, तिच्याच दृष्टीनें तो पाहूं लागतांच, दोन तीन दिवसांनी वसंताला वाटलें, ''तिचा विचार तिच्या परिस्थितींतील मुलीस योग्य असाच आहे! - ''

: ६०१ :

त्यानंतर, असेच कांहीं दिवस गेले. त्या मोठ्या थोरल्या घरांत, फक्त वसंत व मंजुळा हे दोघेच जीव, आपापल्या भकास मनःस्थितींत वांवरत असत!

आपलें आजपर्यंतचें निःसार वैवाहिक जीवन - आणि आतां यापुढील कंटाळवाणें एकाकी आयुष्य, यांविषयीं एकटेच विचार करतां करतां, वसंत कंटाळे; रंजीस होई! - आणि अगदींच बेचैन वाटलें, म्हणजे दिवसच्या दिवस बाहेर भटकत राही.

आणि मंजुळाहि, त्या अगदीं ओक्या ओक्या वाटणाऱ्या घरांत - वाचनांत, कशिदा शिवणकाम करण्यांत, कसा तरी वेळ घालविण्याचा प्रयत्न करी! - पण आपल्या असहाय, एकल्या, निष्प्रेम भवितव्याची, जणूं एक खोल दरीच आपल्यापुढें सारखी उभी आहे, असें वाटून ती अगदीं बेभान होई! - तिला चुकल्या चुकल्यासारखें वाटे! -

: ६०२ :

अशा परिस्थितींत, एके दिवशीं, माहेरपणासाठीं दादरहून ठाण्यास आलेली विठोबाअण्णाची बायको, मंजुळेला भेटायला म्हणून हळूंच कल्याणास आपल्या लहानग्या मुलासह आली. वसंत, मंजुळा व त्यांची ती वहिनी, - यांचा तो सारा दिवस, त्यांतल्या त्यात गप्पागोष्टींमुळें सुखाचा गेला होता! - विशेषतः त्या लाडुक मुलामुळें, घरांत अगदीं अपूर्व असा आनंद दरवळला होता!

- आणि ती संध्याकाळीं परत निघून जातांना, त्या लहानग्या मुलाचे, वसंत, मंजुळा दोघांनींही पटापट कितीतरी मुके घेतले होते!..कितीतरी लाड केले होते! -

: ६०३ :

तो प्रसंग अगदीं क्रांतिकारकच ठरला, त्या दोघांच्या आयुष्यांत! - वहिनी निघून गेल्यावर, वसंत मंजुळा दोघेहि, कितीतरी वेळ समोरसमोर अगदीं गप्प बसलीं होती! -

आपल्या लग्नापासूनचें, गेलें दहा वर्षाचें प्रवाहतति खिन्न आयुष्य, वसंताला सारखें आठवत होतें! आणि त्या नुकत्याच परत निघून गेलेल्या लहानग्यावरून, त्याच्या स्वतःच्या हृदयांतील पितृवात्सल्याला भरतें येत होतें! -

- मागें एकदां गाडींत भेटलेल्या त्या अज्ञात लहान मुलाची स्मृति, त्या प्रसंगाविषयीं तिनें आपल्या डायरींत अरुणसाठीं लिहिलेला मजकूर व तिच्या त्यावेळच्या आकांक्षा, यांची मंजुळेला आठवण होत होती! - त्यामुळेंच तिचें हृदय भरून आलें होतें. त्यावेळीं तिनें कल्पना केलेल्या चार्ल्स लॅंबप्रमाणें, आपल्याहि कल्पना बालकांची तिला एकाएकी आठवण झाली!

- आणि तिनेंहि एक दुःखाचा खिन्न सुस्कारा टाकला होता! -

: ६०४ :

‘‘खरंच, मला एखादा असाच गोजिरवाणा मुलगा असता तर?..’’ अशा वसंताच्या त्याचवेळी तिला उद्देशून, अचानक आलेल्या कळवळ्याच्या शब्दांनीं, मंजुळा दचकून भानावर आली होती!-

थोडा वेळ थांबून, मंजुळा वसंताला सहानभूतीच्या स्वरानें म्हणाली होती, ‘‘मग लग्न कां करीत नाहीं तुम्हा पुन्हां?..सुधावहिनी गेली - तें कोणाच्या हातचं कां होतं? - शक्य ते प्रयत्न केलेत नाहीं का तुम्ही? - ’’

त्यावर वसंतानें एक सुस्कारा टाकला होता; आणि एकदोन दिवस गेल्यावर, तीं दोघें पुन्हा घरांत तशीच एकटी बसलीं असतां, वसंतानें किती तरी वेळ संधि शोधण्याचा प्रयत्न करून, शेवटीं अडखळत अडखळत तिला प्रश्न केला होता,

‘‘मंजुळा, तूं करतेस का माझ्याशी लग्न?’’

त्या त्याच्या प्रश्नानें मंजुळा प्रथम दचकली! - ती अतिशय गोंधळली होती.

तिला तसेच विचार करीत बराच वेळ बसलेले पाहून, वसंताच्या मनाला चमत्कारिक चुटपुट लागली; आणि शेवटी तो अगदीं हतबलपणें तिला म्हणाला होता, ‘‘मंजुळा, माझी चूक झाली!.. मला क्षमा कर! - ’’

या त्याच्या शब्दांमुळें मंजुळेला अगदीं भरून आल्यासारखें झालें होतें! -

: ६०५ :

सारे सारे विचार, तिच्या मनांत पुन्हा पिंगा घालूं लागले होते. वसंताच्या सुखांची, त्याच्या स्नेहाची, आपल्या भवितव्याची, अरुणच्या आयुष्यांतून आपल्याला काढून घेण्याच्या स्वतःच्या



निश्चयाची, - साऱ्या कल्पना करतां करतां, तिलाहि आपलें एक लहानसें छबकडें आपल्या समोरून दुडुदुडू धांवत फिरत असल्याचा त्यावेळी नव्यानें भास झाला होता! -

आणि उत्कटपणें उचंबळून आलेल्या आपल्या हृदयांतील भावना स्थिर करण्यासांठीं, एक हात आपल्या हृदयावर घट्ट धरून, तिनें शेवटीं वसंताला हांक मारली होती, ‘‘हें पहा - ’’

पण तरी ती थोडा वेळ थांबली होती! - वसंत तिजकडे वळून, आशेनें पहात होता -

शेवटीं त्याचा हात आपल्या हातीं घेऊन, मंजुळा त्याला म्हणाली होती, ‘‘खरंच कां तुम्हाला माझ्यापासून सुख होईल? - तसं असेल तर - तुमचा विचार मला मान्य आहे! - ’’

‘‘होय मंजुळे, तीच एक शक्यता आहे!..’’ असें दाटून आलेल्या गळ्यानें तिला म्हणतांना, वसंत त्यावेळीं किती आनंदित झाला होता!...

आणि त्याचा तो आनंद पाहून, मंजुळेलाहि आपलें हृदय किती उंचबळून आल्यासारखें वाटलें होतें!...

: ६०६ :

आज त्या दोघांच्या सुहासमुळेंच त्यांचे ते घर सुशोभित झालें होतें. त्या घरांत सौम्य आनंद दरवळत होता! -

त्यांतच बसून, मंजुळा ठाकूर असा विचार करीत होती! - त्यावेळीं तिच्या हातांत असलेलें तें मंगळसूत्र! अरुणवर केंद्रित असलेलें मंजुळेचें आयुष्य बदलून, तिच्या मातेच्या व वसंत - स्नेहाच्या नव्या आयुष्यास सुरवात झाल्याचें तें प्रतीक! - या शेवटच्या प्रसंगानंतर एक महिन्यानंतरच, वसंतानें अत्यंत सौम्य अशा हास्यमुद्रेनें, मंजुळेच्या गळ्यांत बांधले होतें! -

: ६०७ :

बाबांना चुकवून, अरुण घाईघाईनें गर्दीत मिसळल्यावर, त्याला प्रथम थोडें समाधानच वाटलें!-

पण मग, त्याच्या मनांत विचार आला - ‘बाबांनीं आपल्याला हांक मारूनहि आपण थांबलों नाहीं...त्यांच्याबरोबर एखादा शब्दहि बोललों नाहीं, हें योग्य झालं का?’

म्हणूनच क्षणभरानें त्याला वाटलें, 'आपण परत फिरूं या; त्यांना गर्दीतून शोधून काढूं या!- त्यांच्याबरोबर बोलूं या! - '

पण तोपर्यंत, दुसऱ्या फ्लॅटफॉर्मचा दादर उतरून, अरुण गाडीच्या डब्यांतहि शिरला होता;..आणि असा जावें न जावें हा दुहेरी विचार चालत आहे, तोंच त्याची गाडी सुटली देखील! -

गाडी सुरू झाल्यावर मात्र, जणूं काय तें शक्य नाहीं म्हणूनच, बाबांच्या भेटीची त्याची इच्छा कांहीं क्षण उत्कट झाली. पण शेवटीं, हतबलपणें बाजूच्या एका बांकावर बसकण मारून, त्यानें

एक सुस्कारा सोडला.

वेळ घालविण्यासाठीं आपल्या खिशांतील एक सिगारेट काढून, त्यानें ती पेटवली; आणि तिच्या पेटत्या टोकांतून हळुहळू सुटत असलेल्या धुराकडे विमनस्कपणें पहात तो खिडकीला रेलून बसला. धांवत्या गाडीच्याबाहेरून येणाऱ्या सांजवेळच्या गार वाऱ्याचा झोत, त्याच्या डोक्याच्या व दाढीच्या केसांना थोडा वेळ हळुवारपणें चाटून - गोंजारून गेला व ते भुरभुर हालले! -

: ६०८ :

''बाबांनीं आपलं लहानपणापासून पालनपोषण, शिक्षण, सारं केलं! त्यांच्याच म्हातरपणीं, ते अशक्त, दुःखी कांहीसे हताश होऊन - एकाकीपणें इकडे तिकडे फिरत असतां, आपली त्यांची रस्त्यांत अशी अचानक भेट झाली. पण आपण त्यांच्या जवळ गेलों नाहीं! - कीं त्यांची जरादेखील चौकशी केली नाहीं!..आपली ती अक्षम्यच चूकच झाली - '' ही स्थिरपणें वावरणारी एकच एक विचारमालिका, अरुणच्या हृदयाला त्यावेळीं जाचत होती!

'बाबांना सोडून जाण्यापूर्वी, त्यांचे आपले अनेक खटके झाले! - आपापल्या प्रांजल मतांसाठी एकमेकांनी एकमेकांना दुखावलें! - पण त्यामुळें, त्यांच्या विषयींचा आपला आदर, प्रेम, कमी झालं कां? छे, खासच नाहीं! आणि त्यांचे? वसंताच्या सांगण्यावरुन तर, ते आपली सारखी वाट पाहात आहेत. आणि तसं खरंच नसतं तर आज आपला वेश असा बराचसा बदललेला असूनहि, आपल्या म्हाताऱ्या डोळ्यांनीं क्षणभरच पाहून, बाबांनी आपल्याला चटकन् ओळखलं नसतं खास!..किती उत्कंठेनें, किती प्रेमानें, त्यांनी आपल्याला त्यावेळी हांक मारली?' -

पण तो मात्र त्यांना चुकवून, कठोरपणाने त्यांच्यापासून दूरच झाला! - कां?

: ६०९ :

स्टेशनामागून स्टेशनें जात होती. अरुणचें धूम्रपान व विचारहि सारखे तसेच चालू होते! -

शेवटीं, तो सींव स्टेशनवर उतरला; आणि आपल्या खोलीकडे वळला. वसंत रस्त्यांत भेटण्यापूर्वी, त्यानें कुलुप बंद केलें होतें. आतां आज, पुन्हा कुलुप उघडीत असलेला अरुण, कालच्यापेक्षां अगदीं निराळा होता. त्याच्या मनःस्थितींत कल्पनातीत स्थित्यंतर झालें होतें! -

दार उघडून तो कॉटवर आडवा झाला, त्यावेळी त्याच्या मनांत एक विचार येत होता,''आपण बाबांना चुकवून गर्दींत मिसळलों त्याचे कारण, कदाचित् त्यांची आपल्याला भीति वाटण्याऐवजी, आपलीच आपल्याला जास्त भीति वाटत होती! - त्यांच्याविषयीं आपल्याला राग येण्यापेक्षां, आपल्याच आतांपर्यंतच्या एकंदर तिरसट वृत्तीविषयीं आपल्याला राग येत होता! - ''

: ६१० :



बाबा वसंताबरोबर आपल्या घरीं येऊन पोंचले, तेव्हांच कोठें त्यांच्या मनाला थोडें हायसें वाटलें! -

वसंताला पुढें मुंबईस जावयाचें होतें, म्हणून बाबांनी लौकर लौकर स्नान संध्या केली, आणि आपली नेहमींची देवपूजा आटोपती घेऊन, ते त्याच्याबरोबर पानावर बसले.

डोक्यावर डावा हात घेऊन, विचार करीत जेवतां जेवतां, ते वसंतकडे वळून म्हणाले, ''आतां जरा बरं वाटतं, वसंत! उद्यां सकाळीं सोनगांवला कमळीकडे जायला कांहीं हरकत नाहीं, मला वाटतं!''

पोळी वाढत असलेल्या मुरारीकडे, थोडेंसें हंसल्यासारखें करून वसंत बाबांना म्हणाला, ''कशाला घेतां उगीच त्रास बाबा? अशी दगदग करण्यापेक्षां, एखादा दिवस विश्रांती घ्या आणखी - आणि मगच जा!''

''छेऽरे! भाऊंना आणि कमळीला गंधाच्या लग्नाविषयीं समजलं पाहिजेना? ती वाट पहात असतील!...''मुरारीला भाजी पुरे असें हातानें दाखवीत, बाबा वसंताला म्हणाले, ''तशी अशक्तता वाटते! - पण अगदींच कांहीं नबळा झालेलो नाहीं मी, वसंत! - ''

: ६११ :

थोडा वेळ, दोघेहि कांहीं न बोलतांच जेवत होते! -

मग वसंताच पुन्हां म्हणाला, ''मला त्याचा नक्की पत्ता अजून ठाऊक नाहीं सींवचा. पण काल ज्याअर्थी तो मला मुद्दाम येऊन भेटला त्याअर्थी अरुण मला आपणहून दोनचार दिवसांत भेटल्याशिवाय राहणार नाहीं.''

''वेडा आहेस वसंत,!'' त्याच्याकडे कांहींशा निर्विकार चेहऱ्यानें पहाण्याचा प्रयत्न करीत बाबा म्हणाले, ''आपण त्याच्या भानगडींत सध्यां न पडणंच बरं! तो कांहीं आतां लहान नाहीं - कीं अगदीं अविचारीहि नाहीं! त्याला त्याच्या मनाप्रमाणेंच जाऊं द्या मला वाटतं सध्यां! तूं कांहीं धडपड करूं नकोस अगदीं!

..मी त्याचं कधीं अहित केलेलं नाहीं, हे त्याला कधींच समजणार नाहीं कां? आपणहून तो माझ्याकडे येईल कधींतरी! - मला खात्री आहे!''

जेऊन झाल्यावर, वसंताने कपडे चढवले व इकडे तिकडे येरझारा घालून, तो बाबांना म्हणाला, ''बऽरं! बाबा; जातो मी नाहीं तर वेळ होईल मला. मी दोन तीन दिवसांत पुन्हा चक्कर मारीनच इकडे म्हणा!''

बाबा कांहींच न बोलतां, 'बरं' असे मान हालवून म्हणाले; आणि दाराकडे वळत असलेल्या

वसंताकडे पाहात, आराम खुर्चीवर रेलले! -

: ६१२ :

वसंत जिना उतरत असलेला दिसतांच, मुरारी हातांतील भाताची परात तशीच झटकन् खालीं ठेवून, घाईघाईनें स्वयंपाकघरांतून जिन्याकडे गेला; आणि त्यानें हांक मारली, ''वसंतराऽव वसंतराऽव, थांबा जरा!''

वसंतानें चपापून मागें वळून पाहिलें, तों मुरारी त्याच्यासमोर खिन्न चेहऱ्यानें उघडाच उभा होता. त्याच्या म्हाताऱ्या ओढलेल्या डोळ्यांत, कांहीं तरी प्रश्न तरंगत असलेला पाहून, वसंतानें मार्दवानें त्याला विचारलें, ''कायरेऽ मुरारी?''

''अरुणदादा भेटले तुम्हांला? कुठें?'' - मुरारी त्याच्याकडे पाहून घाईघाईनें म्हणाला, ''त्यांच्याविषयीं काय सांगत होतां तुम्ही बाबांना, मघांशी जेवतांना?''

त्याची एकंदर बाबा - अरुणविषयींची आस्था पाहून, वसंत प्रेमळपणें म्हणाला, ''कांहीं नाहीं रेऽ, अरुण आला होता माझ्याकडे काल! त्याविषयींच बोलत होतों आम्हीं!...''

''कोण? अरुणदादा आले होते? - '' मुरारी थोड्याशा आनंदित चेहऱ्यानें, उतावीळपणेंच त्याला म्हणाला, ''मग बाबांची त्यांची तुमच्याकडे भेट झाली असेलच काल?''

वसंतानें न बोलतां, 'नाही' अशी मान हलवितांच, मुरारीचा चेहरा एकदम अतिशय खिन्न झाला.

पण नंतर, तो प्रेमळपणानें पण कांहींशा व्यथित अंतःकरणानें, एक सुस्कारा टाकून म्हणाला, ''बरं आहे! पण ते पुन्हा भेटले तर मात्र त्यांना सांगा - अगदीं जरूर हं - म्हणावं मुरारीनें सांगितलं आहे, आधीं बाबांना भेटल्याशिवाय राहू नका अगदीं!...''

इतक्यांत, जानकीकाकूचा स्वयंपाकघरातूंन आवाज ऐकूं आला - ''हा मुरारी वाढायचं टाकून गेलाय् कुठं मध्येंच भटकायला? - यानं तर हल्लीं अगदीं ताळतंत्रच सोडलाय् हो - ''

: ६१३ :

वसंत गेल्यावर, रिकाम्या रिकाम्या दिसणाऱ्या त्या हॉलमध्यें, बाबासाहेब आपल्या नेहमींच्या आरामखुर्चीवर बसेल. डावा हात आपल्या मानेखालीं टाकून व आपला उजवा हात कपाळावर हळूहळू चोळीत, घराच्या सीलिंगकडे तसे शून्य दृष्टीनें पाहात, ते किती तरी वेळ विचार करीत पडले होत! -

शेवटीं गेलीं साडेतीन चार वर्षे, अरुण त्यांना एकाएकीं सोडून गेला होता; याबद्दल त्यांना दुःख होत होतें खरें! पण त्यांतून दिसून येणाऱ्या अरुणच्या मानी स्वभावाबद्दल, त्यांना एकप्रकारें



समाधानहि वाटत होतें! - तो कदाचित हालांत दिवस काढीत असेल, दुःखी कष्टी झाला असेल, या कल्पनेनें मात्र त्यांना मधून मधून अतिशय वाईट वाटे! -

: ६१४ :

आणि त्याच्या वियोगामुळें, त्यांना वाटत असलेल्या दुःखाचे कारण - त्याच्या सद्यस्थितीची किंवा भवितव्याची काळजी, येवढेंच होतें! नाहीं तर अरुणविषयीचें त्यांचें प्रेम कधींच कमी झालें नव्हतें! अरुणचा त्यांना राग येई; त्याच्या मनाविरुद्ध ते अनेक गोष्टी करीत! - तरी त्याचें सुख, त्याचें हित,. या दृष्टीनेंच बाबांची सारी धडपड असे! -

पण तो आजचा प्रसंग! - अरुणला आपल्या मंडळींना भेटावेंसें वाटलें; तो वसंताकडे गेला! तरी बाबां तेथें जाणार हें समजूनहि, तो तेथून घाईघाईनें निघाला! स्टेशनवर दोघांची समोरासमोर गांठ झाली; एवढेंच नव्हे, तर बाबांनीं त्याला हांकहि मारली! - आणि तरीदेखील, त्यांना टाळून, अरुण गर्दींत मिसळला! तें सारखें आठवत असल्यामुळें मात्र, बाबांचे मन अतिशय खचलें होतें! -

त्यांना वाटलें, ''साध्या ओळखीच्या माणसामाणसांत दाखवितां येण्यासारखं सौजन्यहि, अरुणनें आपल्याला दाखविलं नाहीं! - हा त्याचा अपराध नसेल! त्याची मनःस्थितिच सध्यां तशी असेल! पण तें आपलं तरी दुर्दैव आहे खास!''

: ६१५ :

''म्हातारपण झालं आहे, तरी ही सारी यातायात,...धडपड, आपण करीत आहों! कां?...कोणासाठीं? - पण, एकट्या अरुणनेंच नव्हे, तर आपल्या आयुष्यांत, आपण आपल्या म्हटलेल्या साऱ्या माणसांनींच, आपल्याला असं वागवलं आहे! नाहीं कां? - ''

तोच दुःखी चित्रपट बाबांसमोर नाचत होता! - ''एकत्र कुटुंबाच्या हितासाठी व सौख्यासाठीं आपण प्रथम धडपड केली! त्याचं काय चीज झालं? दादांनी पसरवलेल्या कौटुंबिक कलहाच्या वणव्यांत, नानांच्या न्याय्य वैयक्तिक हितासाठी त्यांना आपण पाठीशीं घातलें; दादांशी प्रामणिकपणें झगडलों! पण त्याची कोणी कदर केली? उलट मृत्यूच्या घटकेपर्यंत, आपल्याला नाहीं नाहीं ते शब्द उच्चारतच, दादा महिन्यांपूर्वी निघून गेले! आणि आतां, हें आपलं कौटुंबिक मुलांमाणसाचं जीवन!..''

बाबांनीं एक दुःखाचा मोठा सुस्कारा सोडला; आपले लांब पसरलेले पाय जवळ केले व दोन्ही हात डोक्याखालीं घेऊन, पुन्हां उताणे पडल्या पडल्या ते छताकडे शून्यपणें पाहू लागले -

''तसं पाहिलं तर आपल्या आयुष्यांत आपण स्वत:साठीं काय भोगलं? आपलं वैवाहिक

जीवन तरी कितीसं सुखांत गेलं? पण मग आपली सारी धडपड आपल्या मुलाबाळांच्या सुखसोयींसाठींच झाली ना? तसं करतांना, त्यांतील कोणीकोणी दुःखी झालं,...आपलं करणं त्यांच्या मर्जीस उतरलं नाही! त्याला आपला तरी काय इलाज? - आपल्याला योग्य वाटलं, तें कर्तव्य म्हणून आपण आतांपर्यंत करीत आलो;..यापुढेंहि तें तसं करीत राहाणं हेंच आपलं कर्तव्य!.. निराशेमुळें कधीं कधीं मनाचा धीर सुटता खरा! - पण आतां आपले दिवस अगदी थोडे राहिले आहेत! - ''

: ६१६ :

अशा कांहींशा अर्धवट समाधानानें, बाबा आपल्या डोळ्यांच्या ओल्या झालेल्या कडा पुसत आहेत, इतक्यांत मुरारी पुढें आला व म्हणाला, ''कोणी भेटायला आले आहेत तुम्हाला!'' -

''कोण रे?'' बाबांनी जवळची खुर्ची समोर ओढीत, त्याच्याकडे चौकशी केली -

''नांव नाहीं मला माहीत; काल सकाळीं आले होते ना ते फेटेवाले?...तेच - '' मुरारी दारांत थबकून प्रश्नार्थक म्हणाला.

''हं हं! ते धोंड असतील!'' बाबा थोडी आठवण केल्यासारखें करून म्हणाले, ''कुठें आहेत ते? दे त्यांन पाठवून आंत.''

: ६१७ :

धोंड हे बाबांच्या ओळखीचे, साधारण मध्यम स्थितींतील सद्गृहस्थ! त्यांचा मुलगा इंग्लंडला जावयाचा, म्हणून त्यांनीं आपल्या मित्रमंडळींत कर्ज उभारण्याची एक नवी कल्पना काढली होती. शंभर - पन्नास - पंचवीस, जसे मिळतील तसे, ते उसने कर्जाऊ घेणार होते. कालच बाबांना भेटून, बाबांनीं दोनशें रुपये कर्ज द्यावें, अशी त्यांच्याकडे त्यांनीं मागणी केली होती.

बाबांनी थोडा वेळ विचार करून, त्यांना काल लागलीच सांगितलें होतें, ''हें पाहा धोंड, माझं बोलणं कदाचित् तुम्हांला कटु वाटेल! पण मी आहे एक मुलाबाळांचा संसारी मनुष्य!...तुमचा मुलगा इंग्लंडला जात आहे, याबद्दल मलाहि समाधान वाटतं! माझा गेला असता तर मला किती आनंद वाटला असता, यावरून मला ती कल्पना करतां येते! - पण आतां म्हातारपणीं सारी निरवनिरव करीत असतांना, मला या कर्ज देण्याच्या आणि तें पुन्हां वसूल करण्याच्या यातायाती करण्याची धमकच नाहीं! पुन्हां कर्जबिर्ज देण्यासारखी, मी जन्मांत कधीं सावकारीहि केलेली नाहीं! तेव्हां तो प्रश्न तर इथंच मिटतो. त्याविषयीं न बोलणंच बरं! - आतां, मी एक धार्मिक मनुष्य आहे! मला धर्म समजतो! तेव्हां तसे वीसपंचवीस रुपये देऊन, तुमच्या कार्याला थोडाफार हातभार लावण्याची मला ऐपत आहे. वेडा म्हणा तुम्ही पाहिजे तर मला! माझ्या मनाची मी तशी



समजूत करू शकेन! तेव्हां तसे पैसे घेण्याची तुम्हांला इच्छा आहे कां? असेल, तर तेवढी रक्कम, मी निश्चितपणें आतांच तुमच्या हवाली करतो म्हणजे तुमचंहि काम झालं; माझ्या मनालाहि कसली रुखरुख राहिली नाही!''

: ६१८ :

बाबांच्या तसल्या बोलण्यामुळें, धोडांना तो आपला अपमान वाटला होता; आणि ते काल तसेच रागारागानें निघून गेले होते! त्यावेळीं बाबांनी फक्त एक सौम्य सुस्कारा सोडला होता, एवढेंच! -

आणि आज तेच धोंड, बाबांना पुन्हां भेटावयास येऊन, त्यावेळीं त्यांच्या समोरील खुर्चीवर बसले होते.

बाबांनीं त्यांच्याकडे पाहात, हंसल्यासारखें करून, सूचक प्रश्न केला, ''काय?'' -

धोंड थोडा वेळ स्तब्धच बसले; आणि शेवटीं किंचित् नाखुषीचा चेहरा करून, ते बाबांना म्हणाले, ''तुमच्या कालच्या म्हणण्याप्रमाणें, तुम्हीं देतांहां ती रक्कम घ्यायला, कबूल आहे मी!''

''ठीक तर!'' - असें म्हणून, पुढें जास्त कांहीं न बोलतां, बाबा खुर्चीवरुन उठले; आपल्या जानव्यांतील किल्लीनें, हॉलच्या एका कोपऱ्यांतील आपलें आरशाचें कपाट त्यांनी उघडलें व त्यांतून आपली पैशाची मळकी पिशवी बाहेर काढली!

किलकिले डोळे करून, बाबांनीं तिचा बंद सोडला; आणि आंतून पांचापांचांच्या पांच नोटा काढून, त्यांनीं त्या धोंडांच्या हातावर ठेवल्या! -

धोंडांचा पीळ अजून कमी झाला नव्हता;..ते त्या नोटा खिशांत घालून, पावतीबुक काढूं लागले! तसें बाबा त्यांना पुन्हां स्पष्ट शब्दांत म्हणाले, ''छे छे! पावतीची कांहीं जरूर नाहीं - ! कर्ज नव्हे कांहीं तें! - ते पैसे, मी मजसाठींच खर्च केले आहेत, असें मी तरी समजतो! - ''

: ६१९ :

''काय दोन दिवस कामावर नाहीं आलां?'' अरुणला ऑफिसमध्यें शिरतांना पाहून, जाई उभी राहून हंसली व म्हणाली. ''बरी नव्हती प्रकृति?... मॅनेजर तुमची चौकशी करण्याच्या निमित्तानें पुन्हां पुन्हां येऊन, उगीचच, माझ्याशीं कांहींतरी गप्पा मारीत बसे! - ''

''अस्सं? नाहीं, माझी प्रकृति ठीक होती!'' अरुण अंगांतील कोट काढून ठेवून, खिन्नपणें हंसत म्हणाला, ''नाऽहीं आलो झालं!''

चित्रफलकासमोरील जाईनें मांडलेल्या स्टुलावर, अरुण जाऊन बसला. कुंचले, रंग, यांची जमवाजमव करून, त्यानें समोर पाहिलं, तेव्हां जाई चालूं चित्राच्या पोझमध्यें बसली होती. त्यानें

नेहमींसारखी कामाला सुरवात केली खरी; पण त्याचे आज लक्षच लागेना! - बराच वेळ तशी व्यर्थ खटपट करून, शेवटीं हातांतील ब्रश बाजूस टाकीत, अरुण खिन्नपणें जाईला म्हणाला, ''आज मला बरंच वाटत नाहीं आहे, जाई! मी थोडा वेळ अगदीं स्वस्थ पडतो कोचावर! - ''

जाई कांहींच बोलली नाहीं. ती जागेवरून उठली. तिनें आपल्या अंगावरील पोशाख नीट सांवरला. स्टूल, चित्रफलक, कुंचले जागच्या जागीं ठेवले; आणि सारें झाल्यावर, ती अरुणकडे वळून पहाते, तों कोचावर अस्वस्थ हालचाल करीत बसून, तो धूम्रपान करीत आहे! - मध्येंच त्यानें आपली मान कोचावर मागें टेकली व दाराकडे खिन्नमुद्रेनें एकाग्रपणें पाहिलें; मग कपाळावर हात ठेवून, तो कोचाच्या एका हातावर लवंडला;..आणि दुसऱ्या हातांवर पाय सोडीत,..पुन्हां तोंडांतील अग्निहोत्र जोराजोरानें चेतवूं लागला -

आल्यापासूनच्या, त्याच्या त्या साऱ्या मुग्ध दुःखी हालचाली पाहून, जाईला वाईट वाटत होतें. पण तिला त्याचें कारण कांहींच समजेना.

शेवटीं, ती त्याच्या जवळ उभी राहून म्हणाली, ''अरुण, असं काय करतांहां मघांपासून? - प्रकृति ठीक नाहीं? अंऽ? - ''

पण त्यावर नुसतें कृत्रिम स्मित करून, अरुण पुन्हां धूम्रपान करूं लागला! -

त्या दिवशीं, जाधवबाबांकडे तो तिच्याशीं अगदीं स्नेहानें, मोकळ्या मनानें बोलत होता. तेथून जातांना, 'कल्याणास - वसंताकडे! - ' हे शब्द उच्चारतांना, त्याच्या चेहऱ्यावर, नवा उत्साह..आनंद चमकला होता! आणि आज दोन दिवसांनी, अरुण नोकरीवर परत येतो, तो असा खिन्न, अस्वस्थ चेहऱ्यानें व जवळ जवळ मौन धरूनच! -

त्यामुळेंच जाई जास्त गोंधळली; दुःखी झाली. अरुणकडे थोडा वेळ तसें पहातां पहांत, तिला त्याचें दुःख जाणवून मनांत वाटलें, 'आपलं हृदयच कोणीतरी कुरतडत आहे! - '

आणि शेवटी, भावनबेग अगदी असह्य होऊन, जाई पटकन् अरुणच्या कोचाजवळ जाऊन, तेथें बसत म्हणाली, ''मला नाहीं कां सांगणार, अरुण, काय झालं ते?''

: ६२० :

जाईच्या त्यावेळच्या प्रेमळ दृष्टींत, 'मला सांगितलंच पाहिजे तुम्ही!' अशा प्रकारच्या हक्काचीच छटा आहे, असें अरुणला वाटलें; आणि तो आपल्या गोंधळलेल्या मनाला शांत करीत, स्वतःशींच म्हणाला, ''आपल्या आजच्या भयाण खिन्न मनःस्थितींत, इतक्या आपुलकीनें आपली आस्थापूर्वक चौकशी करणारं दुसरं आहे तरी कोण? आणि आजपर्यंत आपल्याला जाईनें दाखविलेल्या सौजन्यामुळें, तिला तरी तो हक्कच आहे - ''



तेवढ्यांत, जाईनेंच स्नेहशीलतेनें त्याला विचारून विषयाला सुरवात केली, ''कल्याणला वसंतरावांकडे गेला होता ना, त्या दिवशी तुम्ही! - भेटले तुम्हांला ते? - ''

''हो, तो भेटला - आणखीहि सारी माणसें भेटलीं!'' जाईकडे एकदां बघून अरुणनें आपला गोंधळलेला चेहरा एका बाजूस फिरवीत पुढें म्हटलें, ''माझे वडील देखील भेटले मला रस्त्यांत!''

''अस्संऽ? मग बोललांत त्यांच्याबरोबर मनमोकळं?'' अरुण आपण होऊन सांगेना, म्हणून त्याला बोलका करण्यासाठीं, जाई प्रश्नमालिका तयार करीत होती! -

: ६२१ :

''शेवटीं वडिलांना चुकूवून तुम्ही एकदम गर्दीत मिसळलांत, असेंच ना अरुण?'' अरुणच्या तुटक उत्तरानंतर, थोडा वेळ विचार करून, जाई दुःखानें म्हणाली, ''त्यांत तुमची चूक झाली,..असंच वाटतं आहे ना अरुण तुम्हांला आतां? - ''

''हो, अगदीं मोठी चूक! - त्यामुळेंच, गेले दोन दिवस डोक्यांत काहूर उठलं आहे माझ्या!..''अरुण जाईकडे भांबावून पाहात पुढें म्हणाला, ''जाई, माझ्या डोक्यावर कितीतरी दिवस दाटलेल्या, या मोठ्या थोरल्या अभ्र - पटलाची ती छाया - तसले दुर्दिनच,..मी गेले दोन दिवस अनुभवीत होतो! आणि मनांत जमलेले ते सारे दाट ढग विरल करायला,..नुसतं कॉटवर पडून, मी सारखे धुराचे लोट सोडीत होतो! - ''

अरुण क्षणभर थांबून पुढें म्हणाला, ''आतां तुम्हीच सांगा, जाई, मला कांही सुचत नाहीं - मी काय करायला पाहिजे होतं हो त्यावेळी?''

त्याच्या त्या दीन स्वरानें व दुःखी चेहऱ्यानें, जाईचें हृदय अगदी विरघळून गेलें! - कांहीं एक न बोलतां, तिनें जवळ बसलेल्या अरुणच्या हात अगदीं हळुवार सहानुभूतीनें आपल्या हातीं घेतला; आणि ती त्याच्याकडे स्नेहानें पाहूं लागली.

त्यामुळे किंचित् विरंगुळा वाटून, अरुणनेंहि तिच्याकडे पाहून हास्य केलें.

इतक्यांत, मॅनेजर हळुंहळूं दारांतनू पुढें येत, थोडेसें कुत्सितपणें हंसत म्हणाला, ''अरे ठाकूर, तुमी दोन दीस होते कुटे? अने ऑफिसमंदी ए अशा कशा करेल तो काम चालेल?

: ६२२ :

आपल्या गैरहजेरीबद्दल मॅनेजर रागावला असतां, तरी एकवेळ अरुणला वाईट वाटलें नसतें! पण मॅनेजरच्या त्या हास्यांत व आवाजांत, जो एक विकारी विषारीपणा भरला होता, तो पटकन् ध्यांनात येऊन, अरुणला त्याच्या त्या प्रश्नाचा मनस्वी रागच आला! -

तरी जाई पटकन् बाजूला उभी राहिल्यामुळें, तोहि मन आंवरून बसता झाला; आणि

मॅनेजरकडे चालून जात त्याला म्हणला, ''मला बरं नव्हतं! आणि आधीं कळवायलाहि वेळ झाला नाहीं! - ''

''अरे, तेची काय् फिकीर नाय्!'' मॅनेजर आपल्या मिचमिच्या डोळ्यांनीं जाईकडे मिस्कीलपणें पहात, अरुणला म्हणाला, ''अबे अहियां बेहो! - तुमीबी बेशा जाई! - ''

मॅनेजर फिरत्या खुर्चीवर बसला आणि अरुण व जाई, त्याच्या सांगण्याप्रमाणें त्याच्या समोरच्या दोन खुर्च्यांवर बसलीं.

'अबे ए ज्यो, ठाकूर!'' मॅनेजर अरुणकडे पहात म्हणाला, ''तुमी करते हाय ते चित्र बे धाडा पाछल होएल तोबि चालेल!..तेच्या आदी कंपनीला जुदा चित्राची तुरत आर्डर हाय!..तो अवे एच लेवा पडसे तमने! - ''

कसलीं चित्रें काय, हें समजण्यासाठीं, अरुणनें निर्विकारपणें पाहिलें.

त्याला आज काम करावयाचा उत्साहच नव्हता! पण नोकरीची दृष्टि पुढें ठेवूनच, तो गप्प बसला. जाईहि, अरुण व मॅनेजर या दोघांकडे आळीपाळीनें पाहत, निमूटपणें बसली होती.

तेवढ्यांत, मॅनेजर दोघांकडे पाहात हंसून म्हणाला, ''बेपार छे, ए तो! - दर एक गिऱ्हाकला खूष ठेवाला लागते! - ए तुमीबी आतां जानते.. एक शोकीन शेठ्या छे, तेने आमचेकड् ए बे फ्रेंच - कार्ड दिली हाय! - ते बोलते, एचे सरखा कोई पण सुंदर मोडल लेऊन, ए पोजमदी आमाला बे चित्र करीने आप! आमी बी ईचार केला, दाम देतो, तो काम सोडायचा नाय!''

कुतूहलाने पण संशयी दृष्टीनें, तीं दोघें मॅनेजरकडे पहात आहेत, तोंच त्यानें आपल्या हातांतील ती कार्डे टेबलावर उताणीं टाकलीं, आणि त्या दोघांकडे पण विशेषतः जाईकडे निरखून पाहत, तो पुढें म्हणाला, ''ए ज्यो, तुमी अने जाई ध्यानमंदी घेएल, तो चार धडामंदी सऽमदा होऊन जाएल!- ''

त्या कार्डांकडे ओझरती दृष्टि टाकूनहि, अरुण दचकला व एकदम टेबलासमोर उभा राहिला! - जाईनें त्या चित्रांकडे पाहिलें, तो ती नग्न व अर्धनग्न स्त्रियांची होती. नांगी सलल्यासारखें बिचकून, तिनें मॅनेजरकडे पाहिलें. तो बेडरपणें तिच्याकडे पहात होता. तिनें अरुणकडे दृष्टि वळवली; त्याच्या डोळ्यांत मनस्वी संताप भरला होता! -

: ६२३ :

नोकरीला लागल्यापासून, अगदीं आजपर्यंत, अरुणनें आपली सौदयदृष्टि गुंडाळून ठेवून, मॅनेजरच्या सांगण्याखातर मन मारलें होतें. अनेक वेळां, अगदीं मनाविरुद्ध, जाईला न साजणारा पोषाख त्यानें चढवला होता. आपल्या हातानें, तिच्या स्वाभाविक मार्दवास व विनयास न



शोभणाऱ्या निरनिराळ्या पोझीसहि दिल्या होत्या! - असल्या त्या लहानसान गोष्टींमुळेंहि, त्याच्या मनाला स्वतःपेक्षां जाईबद्दलच जास्त दुःख वाटे. त्याला प्रत्येक वेळीं वाटे, 'हा आपला व जाईचा अधःपात होत आहे!' पण त्याला कारण, जगांत अमूल्य ठरणारा पैसा - आणि तो त्यांना दोघांनाहि, जीवनांतील कमींत कमी गरजांसाठीं पाहिजेच होता. त्यावरच अरुणचें आजचे स्वातंत्र्य अवलंबून होतें. एवढ्याचसाठीं तो प्रत्येक प्रसंगाला तोंड देत, मॅनेजरचा आचरटपणा दुर्लक्षित आजपर्यंत निमूटपणें वागत आला होता.

पण आजच्या आधींच गोंधळलेल्या मनःस्थितींत, मॅनेजरनें पुढें टाकलेली ती कार्डे पाहून त्याला वाटलें - 'आपल्या आतांपर्यंत होत आलेल्या अधःपाताचा, हा परमोच्च बिंदु - कडेलोट आहे!' त्या तसल्या पोझेसमध्यें, जाईसारख्या सोज्वल मुलीला कल्पिण्यासही, त्याचें मन तयार होईना.

आणि 'आपल्या दोघांच्या गरजू परिस्थितीचा दुरुपयोग करून, हा मॅनेजर आपल्या गैरफायदा घेत आहे! या विचारामुळें अरुणचा राग अनावर झाला व त्याचे डोळे इंगळासारखे लाल झाले!

: ६२४ :

''मग काय? कालपासून शुरूं करते ना, ये पण चित्तर? - आम्ही बी तुमाला सजेशन देएल, पोजमंदी फेरफार कराला! खुषीवास्ते जादा पैसा लागंल, तो बी काय वांदा नाय!'' मॅनेजर त्या दोघांच्या विचारांची चांचपणी करीत, जाईकडे मिस्किलपणें पहात हंसून म्हणाला.

जाईला तर अगदीं संतापच आला होता त्याला! तिला वाटलें, चटकन पुढें व्हावें आणि धाडकन् मॅनेजरच्या थोबाडींत भडकवण्याची! पण मन आंवरून, ती अरुणकडे पाहूं लागली.

दाढीमधून दिसणारा अरुणचा गौरवर्ण चेहरा लालबुंद झाला होता. त्याचे ओंठ थरथर कापत होते. डोळे भयंकर तारवटल्यासारखे झाले होते. मॅनेजरचे ते नवे शब्द ऐकून तर, तो रागानें अगदी बेभान झाला व मोठ्यानें ओरडला, ''चुऽप - एकदम चूप! लाज नाहीं वाटत तुम्हांला आम्हांला असं कांहीं सांगायची? - शेठजी, मी तुमचा नोकर आहे, पण बंदा गुलाम नाहीं! - ''

''अरे, हो हो! - ठाकूर, अशा एकदम कावते काय?'' मॅनेजर तसाच थंड राहून, अरुणला हंसत म्हणाला, ''आमी तुम्हाला तुमचा काम सांगते, तो कराला नको, नोकरी कराची तवा?''

''असलीं हलकट कामें करायला नोकरीवर नाहीं राहिलेलो मी!'' अरुण त्वेषानें उसळून म्हणाला, ''पाहिजे तर नोकरीवरून काढून टाका मला! - पण आणखी दांत विचकून असला अचरटपणा करायचा तरी थांबा - ''

''अरे ठाकूर, तू मोटा शेट्या असेल, तवा नोकरीची कदर नाय तुला! - '' मॅनेजर गुर्मीनें

ओरडला; आणि पानानें लाल झालेल्या दंतपंक्तीचें प्रदर्शन करीत जाईकडे पहात म्हणाला, '' - पण ए जाई तो करेल काम का नाय? - आमचे पास दुसरे बी चित्रकार करते नोकरी! -

''बस्स झाला आचरटपणा! - '' अरुण त्याच्या अंगावर धांवून जात म्हणाला, ''तुमच्यासारखी यांनींहि कांहीं माणुसकी नाहीं सोडलेली! - त्याहि नाहींत या तुमच्या हलकटपणाला तयार!..आमचा पगार नाहीं मिळाला तरी चालेल!..त्यापेक्षां आम्ही आतांच नोकरी सोडतों दोघं! - ''

: ६२५ :

अरुणचा तो सात्त्विक संताप व आपल्याविषयीं त्यानें प्रथमच दाखविलेली प्रेमळ विश्वस्त आपुलकी, तसल्या विटंबनेच्या प्रसंगींहि, जाईला प्रिय वाटली! तिला आनंदानें अगदीं भरून आलें आणि ती अरुणकडे पाहूं लागली तो, 'आपल्या तोंडून जास्त शब्द गेले कां?' अशा गांगरलेल्या नजरेनें, अरुण तिच्याकडे पहात होता. त्याच्या त्या दृष्टींतील अर्थ समजून, जाईला त्या गडबडींतहि मनांतल्या मनांत हंसूं येत होतें.

- आणि आतां यापुढें आपलें मौन योग्य होणार नाहीं असें वाटून, ती कांहीं तरी बोलणार इतक्यांत मॅनेजरच तिच्याकडे लोचटपणें पाहून हंसत म्हणाला, ''तुमी खूप नोकरी सोडेल! - पण जाई तो आमचा ऐकेलच! - आम्ही ओळखते तेना चांगला! - तुमचे सरखी ए मगरूर नाय! तेना नोकरीची पर्वा हाय! - अने पैसा तो तरनेपनीच - ''

- पण ते मॅनेजरचें वाक्य अर्धवटच राहिलें. त्या ऐवजीं खाडकन् आवाज झाला!

: ६२६ :

अरुणनें इतकें सांगूनहि, तो लोचटपणें असली आपल्याविषयीं हमी देत हलकट शब्द पुढें बोलत असलेला पाहून, जाईनें आतांपर्यंत आवरून धरलेल्या तिच्या भावना भडकल्या होत्या. कांहीं एक न बोलतां ती पटकन् पुढें झाली. आणि तिच्याकडे, आपल्या मिचमिच्या विषयी डोळ्यांनी, गेले दोन तीन दिवस व आतांहि पहाणाऱ्या मॅनेजरच्या थोबाडींत, तिनें एक संतापानें सणकन् भडकावली! -

मॅनेजर या अचानक व अनपेक्षित झालेल्या जाईच्या प्रतिकारामुळें, एक क्षणभर सुन्न झाला. तो किंचित् वरमला व खुर्चीवरून एकदम उठून उभा रहात, आपल्या अपमानाची फेड उसन्या अवसानानें करण्यासाठीं, जाईकडे रागानें पहात, अडखळत्या शब्दांत म्हणाला, ''तुमी बे जण फिदा अशेल, तो ए तुमचे घेर च्यालल, समज्या? - एकदम च्यालता हो! - पगार बी नाय मिलल तुमच्या! -

''बरं बरं, समजलं! - '' अरुण झटकन् कोट अंगावर चढवून, थोडा शांत होत म्हणाला,



''मी एक खानदानी चित्रकार आहे!.. तुमचा गुलाम नाहीं! - आणि जाई पै या सभ्य कुमारिका आहेत. तुमच्या इतर बटक्यांपैकी नव्हत! एवढं लक्ष्यांत ठेवा! - हं चला जाई इथून!'' -

: ६२७ :

फुटपाथवर आल्यावर मात्र, अरुणला थोडें चमत्कारिक वाटलें. बरोबर चालत असलेल्या जाईकडे अपराधी दृष्टीनें पहात तो म्हणाला, ''जाई, मी चुकलो मला वाटतं!..उतावीळपणें, तुमच्या परवानगी - संमतीशिवायच तुमच्यातर्फेहि मी एकदम निर्णय दिला!''

जाई त्याच्यांजवळून चालतां चालतां, त्याच्याकडे अतिशय प्रेमानें पहात, मोहक हंसून म्हणाली, ''असं काय बरं म्हणतां, अरुण? - माझ्या चारित्र्याविषयीं इतका आपुलकीनें विश्वास दाखविलांत, हाच माझा केवढा तरी गौरव झाला! - आजच्या इतका आनंद कधींच झाला नव्हता मला! - मला न विचारतां माझ्यातर्फे काहीं करण्याइतकी, माझ्याविषयीं तुम्हांला आपुलकी वाटत असल्याचं मला कधीं अनुभवतां येईल, याची मी चातकासारखी मुग्धपणेंच वाट पहात होते, - गेली साडेतीन वर्षे! - आणि आज मला कृतकृत्य वाटलं!''

: ६२८ :

थोडा वेळ, तीं दोघें तसेंच मुकाट्यानें चालल्यावर, अरुण जाईकडे वळून म्हणाला, ''ही नोकरी तर गेली! - मग आतां पुढें?''

''आतां पुढें काय?'' जाई उत्साहानें खेळकर शब्दांत एकदम म्हणाली, ''तुम्ही काय किंवा मी काय, जन्मभर या नाकेरीवरच जगणार होतों कां हो, अरुण? - ''

तिच्या त्या शब्दांत आत्मविश्वास होता! उज्ज्वल भवितव्याची आशा होती! - आणि दोघांच्याहि जास्त मोठ्या दर्जाची स्पष्ट जाणीव होती! - त्यामुळेंच, अरुणला समाधान वाटलें, नवा धीर आला; - आणि तो मागील गोष्टी आठवीत म्हणाला, ''जितक्या एकाएकी आपणां दोघांना या नोकऱ्या लागल्या, तितक्याच अचानक त्या एकदम गेल्या! - किती आश्चर्यकारक योगायोग, जाई,? -

''खरंच!'' जाईहि अरुणकडे पाहून हंसली व म्हणाली, ''मला अरुण, सारंच अकल्पित वाटतं!.. तुमच्या भेटीपासून तो आजपर्यंतचीं ती चमत्कारिक स्थित्यंतरं? खरंच अरुण, नोकरी गेली खरी,...पण मला आज किती आनंद होत आहे म्हणून सांगू? - ''

: ६२९ :

अरुण आपल्या भवितव्याकडे ओढला जात होता. थोडा वेळ थांबून जाई पुन्हां म्हणाली, ''आणि खरं सांगू कां, अरुण? - मला त्या मॅनेजरचा पहिल्या भेटीपासून तिटकारा येत होता.

एकेकदां वाटे, नोकरी सोडून निघून जावं! आणि तुम्ही आपले गप्प! पण मन आवरूनच मी वागले - कारण - ''

जाई बोलतां बोलतां थोडीशी लाजून थांबली; अरुणकडे पाहून एकदां मोहक हंसली आणि मग पुढें हळूंच म्हणाली, ''कारण नोकरी सोडली असती, तर मला तुमचा निदान मुग्ध सहवास मिळे, तोहि नाहींसा झाला असता! आणखी, अरुण, - ''

जाईच्या त्या साऱ्याच स्नेहाळ मोकळ्या बोलण्यामुळें, अरुणचें हृदय भरून येत होतें ती अर्धवट उच्चारून थांबलेल्या त्या वाक्यानंतर, अरुण तिला आस्थापूर्वक म्हणाला, ''आणखी काय, जाई?''

''आणखी मला वाटे - '' अरुणकडे प्रेमपूर्वक दृष्टि टाकून,किंचित् चाचरतच जाई पुढें म्हणाली, ''मला वाटे, अरुणना एकटं सोडूं नये जगांत,..त्यांच्या असल्या मनःस्थितींत! - लांबून लांबून का होईना, त्यांच्यावर आपली दृष्टि ही हवीच! - ''

'किती गोड मुलगी ही! - आपल्या सहवासांत रहायचं, आपल्या निष्प्रेम अनिर्बंध आयुष्यांत - आपल्यावर लांबून लांबून तरी नजर ठेवायची, नियंत्रण घालायचं! - आणि तेवढ्यासाठीं, किती सहनशीलतेनें गेली साडेतीन चार वर्षे काढलीं तिनें! - पण आपण - '

मनांतील या साऱ्या उसळणाऱ्या भावना, जाईला सांगितल्याशिवाय अरुणला राहवेना. म्हणून तो स्नेहभरल्या दृष्टीनें जाईकडे पहात, जड आवाजानें म्हणाला, ''जाई, मी अगदीं दुष्ट आहे! - मी इतका कठोर वागलों तुमच्याशीं,..पण चिकाटीनें, प्रेमळपणानें तुम्हीच मला ही दृष्टि दिलीत! - मला अगदीं सर्व बाबतींतच सांवरलंत! - '

: ६३० :

पुढें काय करावयाचें, हे त्याचे चालतां चालतां मनांत बेत होत होते. जाईनें नक्कीच ठरविलें होतें, कीं मिरा फार दिवस आपल्याकडे बोलावीत आहे, तिकडे आपण जावयाचें! - पुष्कळ दिवसांच्या भेटीनंतर, खूपखूप मोकळ्या गप्पा मारायच्या, आणि मगच पुढलें पाऊल टाकायचें काय ते विचारानें! मिरेनें अरुणना मात्र आपल्याविषयीं काहीं कळवूं नकोस असे लिहिलें होतें. त्यामुळें जाईच्या मनांत विचार आला, 'अरुण मिरेला साफ विसरले नसतील खात्रीनें! - '

आणि जणूं त्याविषयीं चाचपणीच घेण्यासाठीं, जाई अरुणकडे वळून म्हणाली, ''मी अरुण, आतां ठरवलंय्, माझ्या एका मैत्रिणीकडे कांहीं दिवस रहायला जायचं! - फार दिवस भेटलों नाहीं आम्हीं एकमेकींना!''

''कोण तुमची मैत्रीण ही?'' अरुणनें उत्सुकतेनें जाईला विचारलें.

''मिरा!'' जाई त्याच्याकडे सहेतुक पहात म्हणाली.

''मिरा कोण?'' अरुण तें नांव ऐकून एकदम चपापला; आणि आपल्या भावना किंचित् दडपीत त्यानें कुतूहलानें पुढें विचारलें, कुठें असतात?''

'' - मिरा पाटील!'' अरुणच्या बावरलेल्या चेहऱ्याकडे पाहून जाई मिश्र भावनांनी हंसून म्हणाली, ''पण त्यापेक्षां जास्त प्रश्न नका विचारू मला, त्या बाबतींत! - ती रागावेल! - ''

कितीतरी दिवसांनी अरुणला मिरेचें नांव ऐकू येत होतें. कोल्हापुराहून मागें परततांना, त्याला तेथे रस्त्यांत मिरा दिसल्यासारखा भास झाला होता, तें त्याला आठवलें. - पण मिरेनें आतांपर्यंत साऱ्यांपासून आपल्याविषयींचें गूढ का ठेवलें, तें त्याला समजेना. म्हणून त्याविषयीं जाईला जास्त विचारावें, या विचारानें तो तिच्याकडे वळला. तोच जाई त्यांच्याकडे स्नेहानें पहात म्हणाली,

''आतां तुम्ही काय करणार, अरुण? - ''

मनांतील भावनांच्या दुसऱ्या कप्प्याला, जाईनें त्या प्रश्नरूपानें हात घालतांच तो गोंधळला, मध्यें कांहीं काळ विस्मरण झालेल्या, बाबांच्या भेटीनंतरच्या भावनाकल्लोळानें त्याला पुन्हा घेरलें. थोडा वेळ तसेंच निःशब्द चालल्यावर, त्यानें भांबावूनच जाईला विचारलें, ''तुम्हाला काय वाटतं, जाई?...शिल्लक आहे थोडी, तोंपर्यंत नव्या नोकरीचा शोध करावा, नाहीं?''

अरुणच्या मनाची ती दुबळी धडपड पाहून जाईला वाईट वाटलें, - पण क्षणभर हंसूहि आलें. किंचित् थांबून, ती चालतां चालतां अरुणला म्हणाली ''अरुण, किती पीळ बसला आहे हो, तुमच्या हृदयाला - पूर्वीच्या तुमच्या अपमानांचा?...बाबांपासून लांब रहाण्याचं कारण काय आतां?..चुकतांहां तुम्ही अरुण! मी सांगू कां तुम्हाला? - पण मी आहे आपली एक आशावंत मनाची मुलगी! - मला तर वाटतं,...तुम्ही तुमच्या बाबांनाच जाऊन भेटावं प्रथम! - ''

: ६३१ :

जाईच्या त्या स्पष्ट प्रेमळ सल्ल्यानें, अरुण किंचित् गांगरला; स्वस्थ राहिला. - आणि मग थोडा विचार करीत तो म्हणाला, ''असं म्हणतां, जाई? - विचार केला पाहिजे मला त्यावर!''

जाईनें एक समाधानाचा सुस्कारा सोडला. कांहीं वेळ न बोलतांच, ती त्याच्याबरोबर चालली. आणि मग अगदीं प्रेमभरल्या दृष्टीनें अरुणकडे पहात हळूंच म्हणाली, ''वेड्यासारखं जास्त विचार न करतां तुम्ही जाच अरुण त्यांच्याकडे!''

आणि मग थोडी घुटमळून, ती त्याला चांचरत पुढें म्हणाली, ''पण गेलांत तरी मला नाहीं ना साफ विसरणार तुम्ही, अरुण? - ''

बोरीबंदराजवळ ती दोघें आल्यावर, स्टेशनजवळ सूचकतेनें थबकून जाई अरुणला म्हणाली,

‘‘जा आतां अरुण! - माझी आठवण ठेवा हं! - आणि तुम्हाला मला भेटावसं किंवा लिहावसं वाटलं, तर माझा पत्ता केअर ऑफ जाधवबाबा ! - ’’

तेवढ्या मोजक्या शब्दांत, जाईनें,..आपली, जाधवमंडळींची, साऱ्यांची आठवण करून दिली होती. अरुणनें मुग्धपणेंच तिच्याकडे पाहिलें. जाईच्या अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांत,..तिची स्नेहशीलता, प्रेमळपणा, त्याच्या वियोगाचें दुःख..सारें उत्कटपणें तरंगत होतें! -

: ६३२ :

मुलांच्या सकाळच्या खाण्यापिण्याची व्यवस्था झाल्यावर, कमळामावशीनें गड्यांचे चहाचे वाटे काढून त्यांना हांका मारल्या. खेडेगांवांत चहा शिरल्यापासून, कमळामावशीचा तो सकाळचा तास दीड तासाचा उद्योग असे.

वासुदेवरावभाऊ घरी नव्हते. दारांतले बहुतेक गडी कामाच्या निमित्तानें ठिकठिकाणी चकाट्या पिटीत बसले होते. सदूची तेवढी मुलांच्या आंघोळी धुण्याची घालमेल चालली होती.

शाळेच्या वेळेपर्यंत मुलांना सारें जेवण मिळावें, म्हणून कमळामावशी लगबगीनेंच स्वयंपाकघरांत वावरत होती. पण तिच्या डोक्यांत मात्र सत्राशे विचार येऊन जात होते! -

कसले मोठे गहन विचार असणार ते? - खेडेगांवची खेडवळ सुखदुःखें ती! - पण कमळामावशीचे त्यांतच आतांपर्यंतचे आयुष्य गेले होते; तिला तिचें सारे पुढलें आयुष्यहि त्यांतच काढावयाचे होते!

आज सकाळपासून, भाऊंच्या गैरहजेरींत, जवळपासची पांच सहा खेडवळ माणसें येऊन गेली होतीं. - कोणी भाऊंच्या आश्वासनाप्रमाणें पैसे घेऊन जायला आला होता; कोणी रक्कम परत करावयास सध्या सवड नाहीं म्हणून सांगावयाला आला होता; कोणी पुढल्या वर्षासाठी नांगराला बेलजोडी मागायला आला होत; कोणी -

पण या साऱ्यांना सांगायचे तरी काय? कमळामावशीला त्या व्यवहारांतील कांहींच माहिति नव्हती. भाऊंच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांनी सगळ्या वावतींतच गुंतागुंत करून ठेवली होती. शेवटीं कमळामावशी त्यांना सांगे, ‘‘ते आल्यावरच काय ते करतील तुमचं काम!’’ -

पण त्यावर दुहेरी प्रश्न येई, ‘‘केव्हां येतील परत? - कुठे गेले आहेत? - ’’

‘खरंच, केव्हां परततील? - कुठें गेले आहेत?’ - कमळामावशीला तें देखील ठाऊक नव्हतें. ती बाहेर अब्रू जाऊं नये म्हणून कांहीं तरी उत्तरे देत होती खरी, पण आंतल्या आंत जास्तच दुःखी होत होती! - त्यामुळें, आपल्या पतीच्या असल्या साऱ्याच गोंधळी व्यवहाराचा, दुबळ्या बेफिकिरीचा, हतबल मौनाचा, तिला मनस्वी संताप येत होता! - पण मग, तसें आंतल्या आंत धुमसण्याशिवाय, तिच्या हातीं आणखी काय होतें? - असल्या गोष्टी सांगायच्या कोणाला? आणि कशाला? -



सकाळचे सारे गृहोद्योग करतां करतां, मावशीच्या डोक्यांत हेच विचार चालले होते!...

: ६३३ :

इतक्यांत गंधा आंत आली, आणि आईला म्हणाली, ‘‘ए आईऽ ! दहा वाजायला आले ग!..भात वैरलास ना? नाहीं तर जेवायला उशीर होईल हो! आज आमची इन्स्पेक्शन् आहे; म्हणून थोडं लौकर बोलावलं आहे शाळेंत आणखी !’’ -

‘‘बऽरं हो बाई ! होतंय सारं!’’ कमळामावशी आपल्याच विचारांत असल्यामुळें, त्राग्यानेंच भाताचें तपेलें खाली निखाऱ्यावर ठेवीत म्हणाली, ‘‘आतां पाटपाणी तरी कराल? कां तें पण मीच ठेवायचं? - ’’

तोंच, आपल्या मनांत धुमसणाऱ्या गोष्टींचा, आपण गंधावर उगीचच राग काढला, असें तिला पटकन् वाटलें; आणि ती तिच्याकडे पुन्हां हंसल्यासारखे करून पहात, प्रेमानें सौम्य शब्दांत म्हणाली, ‘‘कसलं बाई इनस्पेक्सन आहे? जा, शाळेंत जा हो माझं म्हणणं नाही?..पण..तुम्ही पोरी शिकून काय करणार आहां कोणास ठाऊक? - शेवटीं - हें आमच्यासारखंच आहे तुमच्या नशीबीं!.. नाहींऽ? कसं होणार ग तुमचं, गंधा? - ’’

गंधाला मुकाट्यानें पाटपाणी ठेवतांना पाहून मावशीला तिच्या भवितव्याविषयीं उगीचच काळजी वाटत होती. तिला चटकन्, आठवण झाली - भाऊ कधीं तरी कोणा स्नेह्याबरोबर चहा घेतां घेतां, गंधाच्याच लग्नाविषयीं तुटक तुटकपणें बोलत होते! - ‘होणार कां खरंच तिचं लौकर लग्न?..आणि ती एवढीशी पोर! - आतां लग्न झालं तर सारं संभाळणार तरी कसं?..तो नवरा चांगला मिळाला तर ठीक! नाहीं तर’ -

: ६३४ :

शाळेंत जाणारी मुलें पानावर बसलीं होतीं; त्यांना असला विचार करीत करीत वाढून, ती सहज वाजले किती तें पहावयास बाहेर आली.

घरांत भाऊ चारपांच दिवस नव्हतेच आले परत!...सहज मुलांपैकी कोणी तरी वाटेंत टाकलेले पुस्तक, ‘अश्शीं आडदांड पोरंऽ आहेत!’ असें कांहीसें पुटपुटत, तिनें तें दाराजवळून उचललें; आणि भाऊंच्या निजावयाच्या खोलींत, त्यांच्या टेबलावर तें नेऊन ठेवावयास गेली.

टेबलावर तें पुस्तक ठेवतां ठेवतां, तिनें सहजच नजर टाकली! - कसलें तरी कागदांत बांधलेलें पुडकें त्यावर पडलें होतें. ‘काय आहे?’ म्हणून तिनें तें उघडून पाहिलें; तों त्यांत गंधाचें जन्मटिप्पण, एक दोन पत्रिका - आणखी कांहीं पत्ते, असे कागद होते! -

मावशी एकदम दचकली - ‘गंधाच्या लग्नाचे विचार यांच्या मनांत सध्यां घोळत आहेत कीं

काय? आणि घाईघाईनें चारपांच दिवसांपूर्वी ते गेले आहेत तरी कोठें? कशासाठीं? यासाठींच गेले असले, तर विसरले वाटतं हे बरोबर न्यायला! - ' असा विचार करीतच, मावशीनें ते पुन्हां होते तसे बांधून ठेवले.

आणि ती आतां पुन्हा मुलांना वाढावयास जाण्यासाठीं आंत वळणार, इतक्यांत दारांत टांगा उभा राहिल्याचा आवाज तिला ऐकूं आला.

'कोण?' आले कीं काय परत?..कीं कोणी नवीन पाहुणे?' असल्या विचारानें ती दारापाशीं येते तो सुधीर ओरडत होता - ''ओऽ! बाबा आले! - बाबा आले! -

आश्चर्य वाटून, मावशी लगबगीनें दारापाशीं येऊन पहाते तर खरेंच! किती तरी दिवसांनीं, बाबा असे अगदी अचानक तिच्या गावीं आले होते आणि काठीवर तोल टाकून, रस्त्यावर उभ्या राहिलेल्या भाड्याच्या टांग्यांतून, ते हळूंहळूं खालीं उतरत होते.

: ६३५ :

बाबा आपल्याकडे बऱ्याच दिवसांनी आलेले पाहून, कमळामावशीला अतिशय आनंद झाला! पण पत्र नाहीं, निरोप नाहीं आणि असे ते एकाएकीं कां आले, हें कोडें मात्र तिला सुटेना!

सदूनें धांवत धांवत जाऊन, त्यांची टांग्यांतील लहानशी बॅग घेतली. सुधीरनें त्यांच्या हातून फळें बांधलेली रुमालाची पुरचुंडी घेतली. त्यांच्याबरोबर एखाद दुसरा शब्द बोलत, हांतांतील कांठी टेकीत टेकीत, बाबा हळूंहळूं येऊ लागले.

''आम्हांला तुम्ही पत्र कां नाहीं पाठवलं?..गाडी पाठवली असती स्टेनवर! - ''बाबांच्या पुढें चालत चालत, मागें वळून सुधीर त्यांना विचारत होता.

''हो चुकलं खरं बुवा आमचं!...'' बाबाहि त्याच्याकडे हंसत पहात, बालिश विनोदानें म्हणाले.

''आमच्या पवळ्याचा किनई खांद आला आहे!'' सुधीर आपण होऊनच बाबांना माहिती पुरवीत होता, ''पण आमचा नवा खोंड काढलाय ना आम्ही आतां! त्याला जोडून पाठवली असती गाडी!...मीं पण आलो असतो!''

बाबांना त्यांत विशेष कांहीं गम्य नसलें, तरी ते सुधीरच्या उत्साहाचें कौतुक करीत म्हणाले, ''अस्सांऽ? - ''

इतक्यांत ओचे पटकन् सोडून, पदर नीट करीत, हंसतमुखानें त्यांच्याकडेच पहात, कमळामावशी दारांत उभी असलेली त्यांना दिसली. तिच्याकडे बाबांचें लक्ष जाऊन, तेहि हंसले व म्हणाले, ''काय कमळेऽ, बरं आहे ना?''



: ६३६ :

कमळामावशी मागें वळून, थोड्याशा विनयानेंच हंसून म्हणाली, 'हो! - ' काठी कोपऱ्यांत ठेवून, व पायांतील सँडलचे बंद सोडून, बाबा मुग्धपणेंच माजघरांत आले;..आणि फेटा डागला खुंटीवर काढून ठेवत म्हणाले. ''भाऊ कुठें दिसत नाहींत? आले नाहीं वाटतं अजून परत? - ''

कमळामावशीनें 'नाही' अशी मान हालवली.

''अरे खरंच, म्हणाले होते खरे ते'' - बाबा जवळ आलेल्या सुधीरची लाडिळवाणें पाठ थोपटीत म्हणाले. ''मग ते बहुतेक आज रात्रीं किंवा उद्यां सकाळीं येतील तर!''

''मी येतें हां! मुलं जेवायला बसलीं आहेत, शाळेंत जायचं आहे म्हणून.'' कमळामावशी घरांत वळून, जातां जातां बाबांना म्हणाली, ''तुम्हांला चहा चालेल ना?''

''चहाऽ?'' बाबा सुधीरला घेऊन खालीं बैठकीवर बसत म्हणाले, ''चहाची आता जरुरी नाहीं, कमळे! माझं सगळं आटपूनच मी माटुंग्याहून निघालों. तेव्हां - जेवण झालं असेलना? आतां एकदम जेवायलाच बसूं, झालं!'' -

''हो, पण..'' कमळामावशी थोडीशी घुटमळून उभी राहिली. बाबांना आवडणारा एखादा तरी पदार्थ घाईघाईनें करावा, अशी तिची इच्छा होती.

''नको! - तूं जा'' तिच्या घुटमळण्यांतील भाव ओळखून बाबा पुढें म्हणाले,

''जेवणाला थोडा उशीर झाला तरी चालेल! तोपर्यंत मला सुधीरबरोबर खूप गप्पा मारायच्या आहेत! - होना रे सुधीर? - तूं जा कमळे, तुझ्या कामाला! - ''

सुधीर त्यांच्या जरा जास्त जवळ सरकला; कमळामावशीनें दोघांकडेही सौम्य हास्य करून पाहिले आणि ती घरांतून निघून गेली.

: ६३७ :

बाबा एकाएकीं फार दिवसांनी आपल्याकडे आले; ते आतांच म्हणाले, 'भेटले होते, ते आज संध्याकाळीं येतील किंवा उद्यां? ही सारी भानगड आहे तरी काय? - '

असल्या विचारांतच कमळामावशीनें मुलांचीं जेवणें संपवली; मुलें शाळेंत गेल्यावर, बाबांना आवडणाऱ्या कुरकुरीत फेण्या तुपांत तळून सुधीर व बाबा यांना तिनें पाटपाणी ठेवलें आणि हातपाय धुण्यासाठीं कोमट पाणी घेऊन ती बाहेर आली.

सुधीरच्या व बाबांच्या लहान मोठ्या विषयांवर गप्पा चालल्याच होत्या! - आणि त्यांत, खेडेगांव, शहर यांविषयींच्या आपल्या तुटपुंज्या ज्ञानाचा, सुधीर सढळ हातानें उपयोग करीत होता! -

कमळामावशीला आलेली पाहातांच, सुधीर उठला व धांवत धांवत तिजजवळ जाऊन म्हणाला, ''आई, तुला विमान कसं फिरतं ठाऊक आहे? बाबांनी सांगतलं मला आतां! - ''

''थांब हं सुधीर! तूं आता बाबांबरोबर बसून जेवणार आहेस ना?'' कमळामावशी त्याला समजावणीच्या स्वरानें म्हणाली, ''विमान कसं चालतं तें मग! आधीं आपल्या बाबांना हातपाय पुसायला टॉवेल आणून दे पाहूं.''

: ६३८ :

हातपाय पुसत बाबा पाटावर येऊन बसले. पानाजवळ चित्राहुति घातल्यावर डोळ्यांना पाणी लावून, ते कमळामावशीकडे वर पाहून म्हणाले, 'हंः! कायऽ?' आणि ते पुन्हां एक दोन घास घेत कांहीं मंत्र पुटपुटत क्षणभर मुग्ध राहिले.

कमळामावशीला काय बोलावें तें सुचेना! -

लहानपणीं ती बाबांच्या आंगाखांद्यावर खेळली होती, त्यांच्याबरोबर अघळपघळ बोलली होती; अगदीं तिचें लग्न झाल्यावरहि, प्रथम प्रथम, त्यांच्याबरोबर तसेंच मनमोकळें बोलावयास, तिला लाज वाटत नसे! पण आतां ती मोठी झाली व आपल्या संसारांत गुरफुटली; या जबाबदारीमुळें साहजिकच - आणि तसें पाहिलें तर जानकीकाकूच्या स्वाभावामुळेंहि - तिचा माहेरवास आणि बाबांचा सहवास अर्थातच कमी झाला - तो दुरावला होता! त्यामुळेंच, पूर्वीप्रमाणें बाबांजवळ अगदी मोकळ्या मनानें सारें काहीं बोलावें, असें कमळामावशीला आंत वाटत होतें; तरी बाहेर लाज वाटत होती! - तें धैर्य नव्हतें!

कमळामावशीला गप्प पाहून, मग बाबाच शेवटीं, पहिला भात संपवितां संपवितां म्हणाले, ''अग, भाऊ आले घाईघाईनें दोन दिवसांपूर्वी आणि मला म्हणाले, 'तुम्ही सारं करा!' - त्यांची फारच इच्छा दिसल्यावर, म्हटलं आतां वेळ घालवण्यांत अर्थ नाहीं! थोडा अशक्त झालो आहे मी अलीकडे!..पण गेलो तसाच कल्याणला परवां! चला! - खटपट केल्यासारखं जमलं शेवटीं!! बरं झालं!''

बोलता बोलतां बाबा मध्येंच थांबले; पण कमळामावशीला प्रथम कांहींच समजेना, ''जमलं? ..जमलं काय? - ''

: ६३९ :

इतक्यांत, बाबाच पुढें म्हणाले, ''प्रथम बरंच अडवलं त्यांनी! - पण गृहस्थ पडला माझ्या ओळखीचा. तेव्हां त्याला अगदींच तिऱ्हाइतासारखं करतां येईना! आणि मुलगी पुनः नेहमीं त्यांच्या पहाण्यांतली. भाऊंनीं माझ्याकडे टिपण वगैरे कांहीं दिलं नव्हतं - ''



बाबा हळूंहळूं बोलत होते. कशाविषयीं हें नक्की माहीत नसल्यामुळें, कमळामावशी धडधडत्या छातीनें तिकडे लक्ष देत होती. पण शेवटीं, बाबांच्या तोंडून 'टिपण' हा शब्द बाहेर पडल्यावर, तिला थोड्याच वेळापूर्वी टेबलावर पाहिलेलें पत्रिकांचें पुडकें आठवले! -

आणि मग एकदम बराचसा उलगडा होऊन, तिच्या मनांत विचार आला, ''म्हणजे गंधाचं लग्न ठरलं, कीं काय? आणि यांतलं आपल्याला जरासुद्धा कसं ठाऊक नाहीं'' - पुढला खिन्न विचार तिच्या मनांत येण्यापूर्वी, बाबा पुन्हा बोलूं लागले,

''पण पत्रिकेचें कांहीं कारणच पडलं नाहीं म्हणा! अलीकडला फोटो वगैरे बाकी सगळं एकदां पसंत पडल्यावर, माझ्या विश्वासानें, त्यानें लागलींच 'होय'हि म्हणून टाकलं - तो मुलगा आहे सत्तावीस अठ्ठाविशीचा; साठ पासष्ट रुपये पगार आहे वाटतं! ते घरचेहि तसे बरे आहेत, हें तुला ठाऊकच आहे! - बरं झालं चला! आतां मुहूर्त वगैरेच्या गोष्टी मात्र, भाऊ, ते आणि तुम्ही पाहून घ्या!''

: ६४० :

बाबांचें जेवण संपत आलें होतें. ही नवीन बातमी अचानक समजल्यामुळें कमळामावशीला अगदीं सुचत नव्हतें! -

ताक पीतपीत, बाबासाहेब पुढें म्हणाले, ''मुली शिकून तरी काऽय करणार म्हणा! - सगळीकडे निराशाच पसरली आहे अशी!..पण तरी मला वाटतं,...तुम्ही थोडी घाईच केलीत!..नाहीं कां, कमळे? शिकली असती गंधा आणखी एखादं वर्ष मॅट्रिक होईपर्यंत! - मी सांगितलं तें सारं भाऊंना परवां! - पण मग म्हटलं, त्यांची आणि कमळीची दोघांचीहि इच्छा दिसते आहे, तऽर - ''

कमळाबावशीला आतां मात्र मुळीच राहवेना; त्यावेळीं तिला तिच्या डोक्यावर हातोड्याचे घांव बसत असल्यासारखेंच वाटलें! - आणि तिनें अगदीं निराश स्वरानें बाबांना प्रश्न केला, ''माझी इच्छा? - ''

बाबांनी चमकून वर मान केली, आश्चर्यानें तिजकडे पाहिलें व उठता उठतां ते म्हणाले, ''हो? भाऊंचं आणि तुझं, बोलणं झालं असेल ना याविषयी? - ''

पण, बाबांना पुन्हा आश्चर्य वाटलें; कमळामावशी त्यांच्याकडे खिन्न चेहऱ्यानें पाहून एक सुस्कारा सोडीत गद्गदित जड आवाजानें म्हणाली, ''नाही, बाबा! - तुम्हीं आज आतां मुद्दाम येऊन, हें सारं सांगेपर्यंत, - मला गंधाचं लग्न होणार आहे हेंहि माहीत नव्हतं!''

: ६४१ :

जेवून झाल्यावर, बाबा जरा वामकुक्षी करण्यासाठीं कोचावर पडले! - तेव्हां त्यांना एकच विचार सारखा भंडावत होता - 'कमळीला आपण चांगलं घर पाहून दिलं - आणि त्या समाधानानें त्यावेळीं आपण एक निःश्वास टाकला होता! त्यानंतर आजपर्यंत ती अगदीं आपल्या वैभवांत..मुलाबाळांत सुखानें नांदत असेल - अशी आपण मनांत कल्पना करीत होतों! पण ती चुकीचीच होती तर! - ''

केवळ वैभवानें, नवऱ्याच्या साधारणतः सौजन्यानें, स्त्रीच्या मनाला सुख लागतें, असेंच कांहीं नाहीं! - तिच्या आकांक्षा त्याहून कांहीं निराळ्या प्रकारच्या असतात! पतीच्या सुखदुःखांत, ती जशी वांटेकरी व्हावयास तयार असते, तसें त्यानेंहि आपल्या पत्नीच्या सुखदुःखांत व्हावयास पाहिजे. नवऱ्याला मदत करणें, त्याचें घर संभाळणारी गृहिणी होणें, हें तिच्या आयुष्याचें साधारणतः ध्येय खरें; तरी पण नवऱ्याचा मोकळेपणा, त्याचा कांहीं तरी श्रेष्ठ पराक्रम, - यांचीहि तिला कांहींच का अपेक्षा नसते? आणि तसें नसलें, तर सौजन्यपूर्ण पण दुबळ्या व्यक्तीच्या आयुषयांतील तिचें अर्धांगीपद म्हणजे दुबळ्या, निराश, दुःखी मार्गाचीच ती वाटचाल नव्हे कां?

बाबासाहेबांना, आपल्या आयुष्याशेवटीं, आतां एवढें पूर्णपणें समजूं लागलें होतें. - आणि त्यावरून, अरुणबरोबर, मागें अनेक प्रसंगीं सहजासहजीं झालेले मोकळे वादविवाद, त्यांना पडल्या पडल्या आठवूं लागले. -

''वैभव ही जगांतील मोठी शक्ति असली, तरी केवळ तेंच माणसाला सुखी करूं शकत नाहीं! - हें आपल्या आयुष्यावरूनहि आतां आपल्याला हळुंहळुं पटूं लागलं आहे! पण, तरी केवळ वैभवाची कल्पना पुढें ठेवून, आपण अरुणला त्याच्या इतर अनेक आकांक्षांत विरोधच करीत आलों! - त्यांत आपली त्याच्या हिताची दृष्टि होती, हें खरं असलं, तरी तें सर्वस्वी योग्य होतं कां? - पण आतां राहिलेल्या आयुष्यांत, आपलीं मतें, आपला स्वभाव, थोडासुद्धां बदलणं शक्य नाहीं! तेव्हां तें आतां तसंच चालायचं व चालवायचं! - ''

: ६४२ :

घड्याळांत तीनचे ठोके पडल्यावर, बाबा कोचावरून उठले. कमळामावशी कांहीं तरी वाचत त्यांच्या उठण्याचीच वाटत पाहात होती. ते उठलेले पाहून, तिनें पाण्याची लोटी पुढें केली व म्हटलें, ''झाली झोंप?.. चहा घेऊन येते हं!..''

बाबा चूळ भरून बांकावर येऊन बसले; तेव्हां त्यांच्या मनांत आलें - 'लहानपणीं होती तशीच, कमळी अजूनही प्रेमळ व कर्तव्यदक्ष आहे! - ' आणि त्यामुळें तर तिच्या वैवाहिक आयुष्यांतील ती कुंचबणा, बाबांच्या मनाला जास्तच जाचली.



इतक्यांत, हातांत चहाचा कप घेऊन सुधीर व त्याच्यामागून कमळामावशी तेथें आली. सुधीरकडे कौतुकानें पाहातां पाहतां, बाबांना आपल्या बायकोची एकदम आठवण होऊन ते म्हणाले, ''पाहिलंस कमळे? तुझा सुधीर अगदीं हुबेहुब तुझ्या बहिणीसारखा दिसतो! नाहीं? ''

: ६४३ :

त्यांच्या त्या शब्दांमुळे, कमळामावशीला आपल्या बहिणीची एकदम आठवण होऊन, तीहि पटकन् म्हणाली, ''हं! आणि असा वटवट करतो अगदीं सारखा! कांहीं तरी प्रश्न विचारीत राहील!..त्याला कोणी उत्तरं देणारं मात्र भेटलं पाहिजे! कधीं कधीं तर,..अरुणच्या लहानपणाचीच अगदीं आठवण होते! - ''

पण मग, आपण बोलतां बोलतां अरुणचा उगीच उल्लेख केला, असें वाटून कमळामावशीनें चपापून बाबांकडे पाहिलें! - पण ते अगदीं शांतपणे चहाचा कप तोंडाला लावीत होते.

थोडा वेळ तसाच मुग्धतेंत गेला. शेवटीं कमळामावशीला राहवेनाच; तिनें एकदम बाबांना विचारलें, ''अरुणची काय माहिती? तो भेटला होता कां? - '

''हो, परवांच भेटला होता!' बाबा शेवटचे एकदोन घोट घेऊन, चहा संपवीत थोडा वेळ थांबले; आणि मग म्हणाले, ''पण त्याचं माझं कांहीं बोलणं झालं नाहीं! - तसाच गेला निघून तो!.. आतां पुन्हा केव्हां भेटेल तें पाहायचं!''

त्यांनीं रिकामा कप कमळामावशीच्या हातीं दिला; आणि जणूं काय, तो विषय तेथेंच संपवावा अशा हेतूनें एक सुस्कारा सोडून, ते म्हणाले, ''माझं आतां काऽय, कमळेऽ? - कोठूनहि तो सुखी असला म्हणजे झालं! - ''

: ६४४ :

त्याविषयीं आणखीं पुष्कळ विचारावें, असें कमळामावशीला वाटत होतें. पण त्यामुळे बाबांना दुःख होईल, म्हणून तिनें प्रयासानें आपलें मन दाबलें! आणि ती रिकामा कप व दाराजवळची लोटी घेऊन स्वयंपाकघराकडे वळली.

पण, कप वगैरे पाणेऱ्यावर ठेवून ती परत येऊन पाहाते, तों बाबांनीं आपला डगला आंगांत चढवला होता! आणि ते आपल्या जुन्या फेट्याला पीळ घालीत होते -

तिनें आश्चर्यानें त्यांना एकदम विचारलें, ''हें काय? कुठें निघालांत, बाबा?''

बाबा फेटा डोक्यांला गुंडाळीत म्हणाले, ''घरीऽ माटुंग्याला!.. कां? - आतां मुंबईकडे जाणारी गाडी असेल ना पांचाला?''

''अशी दगदग कशाला करतां?'' कमळामावशी बाबांच्या त्या त्रस्त मनःस्थितीनें थोडीशी

खिन्न होऊन त्यांना आग्रहाच्या स्वरांत म्हणाली, ‘‘कधीं नाहीं ते आलांत आज! आतां राहाना ते येईपर्यंत, बाबा? - ’’

‘‘कोण? भाऊ येईपर्यंत? नको!’’ बाबा हातानें फेटा नीट बसवीत, पुन्हां बाकांवर बसून म्हणाले, ‘‘आतां जातो मी! कामं आहेत बरींच राहिलेलीं, कमळे! संध्याकाळपर्यंत घरीं पोहोंचलेलं बरं आपलं! - ’’

‘‘कसलीं कामं आलीं आतां? आणि राहिलीं जरा बाजूला तर काय बिघडलं?’’ हा विचार कमळामावशीच्या मनांत क्षणभर येऊन गेला. पण, बाबांच्या मनाची एकंदर खिन्न धडपड जाणून ती गप्पच राहिली!

- आणि सुधीर त्यांच्या जवळ जाऊन त्यांना राहण्याचा आग्रह करीत होता, तरी जेव्हां त्याचा गाल कुसकरून, ‘‘नको हं बाळ, पुन्हां येईन लौकरच - आज जातो मी!...’’ असें बाबांनीं म्हटलें, तेव्हा मात्र तिनें आपल्या मनाची उरली सुरली समजूत केली. मागल्या दाराकडे पहात, ती लागलीच म्हणाली, ‘‘अरे सदूऽ, गाडी जोड पाहू! चार वाजायला आले. बाबांना जायचं आहे गाडीनें परत मुंबईकडे!...’’

: ६४५ :

जोडीगाडी तयार करून, सदू त्यांत बाबांची बॅग ठेवावयास नेईपर्यंत, बाबा किंवा कमळामावशी विशेष काहींच बोललीं नाहींत! - दोघेंहि, अगदीं मुकाट्यानें आपापल्या मनांत विचार करीत होतीं!..सुधीरची मात्र नव्याजुन्या गाडी जोडींची - बाबांना उद्देशून पण स्वतःच्याच समाधानसाठीं - वटवट चालली होती! - शेवटीं, मन घट्ट करून बाबा पटकन् उठले; ते ओटीवर आले व सँडलचे बंद बाधून, त्यांनी कोंपऱ्यांतील आपली जाड काठी हातांत घेतली! -

चालत चालत दारापर्यंत आल्यावर, ते तेथेंच क्षणभर थबकले; त्यांनी मागें वळून मावशीकडे पहात, हंसण्याचा वृथा प्रयत्न केला;..आणि अगदीं जड झालेल्या अडखळत्या आवाजानें, तें कमळामावशीला म्हणाले, ‘‘बरंऽ! कमळे! - येतो मी आतां! - मुलांच्या आणि आपल्या प्रकृतीला नेहमीं जपून असावं, अंऽ - ’’

: ६४६ :

बाबांनीं कमळामावशीच्या घराकडे प्रयासानें पाठ फिरविली. आणि तें आंगण ओलांडून, हळूंहळूं काठी टेकीत रस्त्याकडे चालूं लागले. तसं मंद पावलें टाकीत त्यांना लांब जातांना पाहून, त्यांच्याविषयींच्या प्रेमादरानें कमळामावशीला अगदीं दाटून येत होतें! - आपल्या आयुष्यांतील साऱ्या भावना एकवटून, तिच्या डोळ्यांत अश्रू सांचू लागले होते! बाबांना पुन्हां एकदां



लहानपणासारखी लाडुक हांक मारावी, असेंहि तिला वाटलें, पण कंठांतून आवाज बाहेर पडेना! -

बरोबरच्या छोट्या सुधीरच्या खांद्यावर हात टाकून, त्याच्या उरल्यासुरल्या साऱ्या प्रश्नांना उत्तरें देण्याचा प्रयासानें प्रयत्न करीत, हळूंहळूं चालून बाबा गाडींत जाऊन बसले - वास्तविक, सुधीर काय बोलत आहे तिकडे त्यांचें जरा देखील लक्ष नव्हतें! -

गाडींत पाठीशीं टाकलेल्या तक्क्याला ओडगतां ओडगतां, बाबांचे डोळे भरून आले होते. - ‘कोणी पहात नाहींना?’ अशी मनाची खात्री करण्यासाठीं आजूबाजूंस पहात, त्यांनीं गळ्याभोंवतालच्या आपल्या उपरण्यानें हळूंच आपले डोळे पुसले! -

: ६४७ :

गाडी खडखड करीत चालूं लागली! - तिच्यांतून, बाबासाहेब कमळामावशीपासून दूर दूर चालले होते!..आपला थरथरणारा ओठ अतिशय प्रयासानें दाबून, गाडी चालू होतांच, बाबांनीं आपलें तोंड अगदीं हळूंच बाहेर काढलें! - आणि आपली अश्रुपूर्ण मंददृष्टि, कमळामावशी, सुधीर व मामासाहेबांचें घर यांकडे टाकून, ते पुन्हा मन आंवरून नीट बसले! -

खिन्न चेहऱ्यानें व डबडबलेल्या डोळ्यांनीं रस्त्याकडे पहात, कमळामावशी दारांत पायऱ्यांजवळ उभी होती! -

रस्त्यापर्यंत पुढें गेलेला सुधीर, गाडीकडे व आंतील बाबांकडे पहात, बालिशपणें हसून हात वर करीत, मोठ्यानें ओरडून बाबांना विचारीत होता, ‘‘बाबाऽ बाबाऽ! आतां तुम्ही परत केव्हां हो येणार? - ’’

बाबांनीं आपली मान दुसऱ्या बाजूस वळवली! -

बालिश उत्साहानें बाबांना हांका मारणाऱ्या आपल्या सुधीरकडे व बाबासाहेब बसलेल्या, हळूंहळूं दूर जात असलेल्या गाडीकडे, दारांतच उभे राहून, एकाग्रतेनें पहातां पहातां, कमळामावशीच्या गालांवरून अश्रूंचे ओघळ वाहूं लागले होते! -

तिला मोठ्यानें आलेला दुःखाचा हुंदका आवरेना! -

तरी घरांत वळतां वळतां, तिच्या तोंडांतून अर्धवट दडपलेले तुटक शब्द बाहेर पडले, ‘‘बाबा, बाबाऽ - ’’

: ६४८ :

गाडी भायखळ्यापुढें गेली, - तरी जाईची स्नेहाळ मूर्ति व तिचा अश्रूंनीं डबडबलेला सात्त्विक चेहरा अरुणपुढून हलेना! -

त्याच सौजन्यपूर्ण मुलीच्या आत्यंतिक विटंबनेमुळें चिडून, आपण आज एकाएकीं नोकरी सोडली, या घटनेबद्दल मात्र अरुणला मनोमय आनंद वाटत होता! जाईचे त्याविषयींचे सारे शब्द आठवून त्याला वाटलें, ''तिची सोशिकता कमालीची होती! ती प्रेमळ मुलगी,..आपल्याचसाठीं, खुद्द आपल्याकडून व दुसऱ्यांकडूनहि, पदोपदीं मानखंडना सोशीत आली!..आज तर त्याचा अतिरेक झाला! - ''

आज तीच जाई अतिशय आनंदी, उत्साही दिसली होती; त्यामुळें त्याला त्यांतल्या त्यांत समाधान वाटलें. 'या आपल्या नवीन दृष्टीला सर्वस्वी कारण जाईचा सहवास! - ' असेंहि एकदां त्याच्या मनांत येऊन गेलें. कारण - मधल्या एकाकी, कठोर, बेफिकीर, जीवनक्रमाची चटक नाहींशी होऊन, आपल्या साऱ्या नव्याजुन्या संबंधी माणसांच्या सहवासाची इच्छा,..त्यांच्या सुखदुःखांत खोल शिरण्याची तीव्र हुरहूर,...आज त्याला वाटूं लागली होती!

वसंत - मंजुळेचा सुहासच्या सहवासांतील समाधानी संसार, तो तासभर कां होईना, प्रत्यक्ष पाहून आला होता. अरविंद - सुनीतीच्या सुखाची त्याला कल्पनाचित्रें रंगवितां येत होतीं. कमळामावशीचा त्यागी जीवनपथ, त्याला मिश्र भावभावनांनी विरंगुळा देत होता -

: ६४९ :

बाबांचा आयुःपट त्याच्यासमोर तेवढ्यांतच उलगडूं लागला...आणि आज त्याचें भावनाकल्लोळांनीं गजबजलेलें हृदय, तिकडे जास्त सहानुभूतीनें - अगदीं निराळ्या रीतीनें - पहाण्यास समर्थ झालें होते.

तसा आपल्याशीं विचार करतां करतां, त्याला वाटलें, ''बाबांची वैयक्तिक सुखें तीं आतां म्हातारपणीं काय असणार? - पण तरी सारखी धडपड करीत त्यांचा कांहीं तरी सतत उद्योग हा चाललाच असेल! - कां? कसला? कोणासाठीं? - ''

तोंच नेहमीं समोर दिसत असलेला बाबांचा सुरकुतलेला गंभीर चेहरा, त्यांची मंद पण प्रेमळ म्हातारी वत्सलदृष्टि! - त्याच्यापुढें बाबाच प्रत्यक्ष उभे आहेत, असें त्याला क्षणभर वाटलें. आणि तेवढ्यांत ते हलूं लागले! - 'कोण? अरुण का रे?'.. अशा आशापूर्ण दृष्टीनें, ते त्याच्या शोधार्थ इकडे तिकडे पहात चाचपडूं लागले!

- तें मनोमय दृश्य पाहून अरुण दचकला! - आणि त्या दिवशीं कल्याण स्टेशनवर ते भेटले असतां, त्यानें दाखविलेली कठोर बेफिकीरी आठवून, त्याला असंख्य शल्यें बोंचल्यासारखें वाटलें! - त्याच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें! -

: ६५० :



''बाबांना व इतर साऱ्यांना, स्वार्थी, उपकारी म्हणून, आपण त्यांना सोडून गेलों! आपल्या मनांत वावरणाऱ्या मोठमोठ्या ध्येयांनीं प्रेरित होऊन, आपण त्यांना एका क्षणांत बाजूस सारलें. देशसेवा झाली, तुरुंग झाला! - त्यानंतरची असहाय्य वणवण आणि स्वतःला आर्थिक दृष्टीनें स्वतंत्र करणारी नोकरीची चाकोरी!..त्यावेळचं कुत्सित दृष्टीचं भ्रमण!'' - अरुणला तें सारें आठवून वाटलें, - ''या साऱ्या व्यर्थ धडपडींत आपण मिळवलं तें काय? सारी.. सारी घनघोर निष्क्रियता! - महत्त्वाकांक्षाहीन, ध्येयहीन, भकास आयुष्य,...हीच आपली प्रत्यक्ष जगाशीं स्वतंत्र तोंड देतांनाची इतिकर्तव्यता ठरली! - जगाच्या सामन्यांत आपलीहि तितकीच विकल स्थिति झाली! - आपली दृष्टि जड झाली! - ''

आगगाडीबरोबरच, अरुणच्या विचारांची गाडी, अशी वेगानें पुढें धांवत होती -

''जाईच्या अंजनानें, तिनें अप्रत्यक्ष दिलेल्या उत्साहाच्या शिदोरीनें मात्र, आपली ध्येयें - साऱ्या भराऱ्या पुन्हां उसळून आल्या! - आज नोकरी गेली. जड - जीवन पुन्हा डळमळलं! - पण तरी, आतां मात्र त्या भराऱ्या पुन्हा मर्यादित होऊं शकत नाहींत! - नोकरी गेली यांतहि एक प्रकारचा आनंदच होत आहे! - कां? - जड जीवनासाठीं आपला अप्रत्यक्षपणें होत गेलेला अधःपात - त्याचा आज अगदीं कडेलोट होणार होता! त्याला असा खंड पडला म्हणून? - खरंच तें!.. पैशाचा आपण आपल्याला कितीहि पायबंद घालण्याचा प्रयत्न केला, तरी आपल्या मनाच्या नैसगिर्क आकांक्षा - अपेक्षा, आपल्याला कधींच दडपणं शक्य नाहीं! - त्यामुळें आपलं आयुष्य जन्मभर असंच अस्थिर रहाणार!..पण हें असंच चालायचं!'' -

: ६५१ :

आणि मग अरुणला बाबांच्या आयुष्याची धडपड आठवली - ''आपल्यावर रागावण्याचा त्यांना हक्क वाटतो,..तसाच प्रेम करण्याचाहि वाटतो! - आतां या जाणिवेनंतर तरी आपण त्यांना शक्य तितक्या लौकर भेटून, त्यांच्या वत्सल हृदयाला म्हातारपणाचं समाधान दिलं पाहिजे! - तें आपलं कर्तव्यच आहे - ''

या मनोमय निर्णयानें मात्र अरुणचें मन बाबांकडे वायुवेगानें धांवूं लागलें. त्याच्या मनांत किती तरी दिवसांनी कल्लोळ उठला - ''बाबा आतां कुठें असतील? काय करीत असतील? वसंताकडे गेल्यावर त्यांना आपण निघून गेल्याचें समजतांच काय वाटलं असेल? - वसंताला आपला पत्ता कळविल्याला दोन दिवस झाले. पण बाबा आले कां? - आपल्याकडे धांवून येण्यापेक्षां, ते स्वतः फार तर घरीं डोक्यावर हात घेऊन, आपल्याविषयींच विचार करतील! - अरेरे - बाबांचं सारं आयुष्य, कौटुंबिक, वैवाहिक - सर्वच दृष्टीनें एकप्रकारें दुसऱ्यासाठीं - दुसऱ्यांच्या सुखदुःखासाठीं

धडपडण्यांत व आपलं स्वतःचं दुःख आतंल्याआंत दडपण्यांत गेलं! - ''

या भावनाकल्लोळांनीं त्याला भारल्यासारखें झालें! - गाडी उभी राहिली, म्हणून त्यानें पाटी पाहिली. डोळ्यासमोर धुकें आल्यासारखें त्याला अस्पष्ट दिसलें - 'सींव' -

तो यांत्रिकपणें पटकन् खालीं उतरला! - आणि पूल ओलांडून आग्रारस्त्यावर आला! -

- संध्याकाळच्या अस्ताला जाणाऱ्या सूर्याची उन्हें अजून चोहोंबाजूंस पसरलीं होतीं! -

पण अरुणला वाटलें - आपण काळोखांतूनच रस्ता कांटीत आहों! -

: ६५२ :

अरुण आपल्या खोलीवर आला तों दार उघडेंच होतें! - त्याचें काम करणारा म्हातारा बाल्या खोलीची झाडलोट करीत होता. अरुण आंत शिरला व आपल्या कॉटवर पडला.

''शेट, सा म्हैनं हंयसर हांव, पन् अगदीं दाद बी लागून दिली नायीत!..''म्हातारा बाल्या, कचरा काढतां काढतां, अरुणला हंसून म्हणाला.

त्यामुळें, भोंवतालची शांतता व अरुणची विचारशृंखला मोडली! -

प्रथम अरुणला त्याच्या या शब्दांचा अर्थ समजेना. तो गोंधळून त्याच्याकडे पहात म्हणाला, ''कसली रे?..''

''तुमी लय म्होट मानूस हां, शेट!'' बाल्या कचरा काढतांना हांत थांबवून म्हणाला, ''तुमचे वडील कलेक्टर हायेत न्हवं कां?..आन् येक काका लाखोपति व्हते न्हवं कां?..''

अरुण अगदी चपापला! - 'या बाल्याला या भानगडी कोणी सागितल्या साऱ्या?..' तो चटकन् उठून बसला व त्यानें बाल्याला घाईघाईनें विचारलें, ''तुला रे कोणी सांगितलं हें सारं?..''

''नाय बा! त्ये तुमचे दुसरे काका न्हवं कां?'' बाल्या हातांतली केरसुणी खालीं टाकून टेबलाकडे जात म्हणाला, ''काय शंकरकाका का काय म्हनले बा नांव!..ते दोनपारी आले व्हते!..त्येच आपसूक बोलत व्हते माज्यापाशीं - ''

'' - शंकरकाका?..हो, तेच असतील! - ते वसंताकडे गेले असतील; आणि त्यानें चिठीबिठी देऊन त्यांना पाठवलं असेल इकडे कदाचित्! पण त्यांनीं या बाल्याला कशाला सांगितल्या या साऱ्या गोष्टी? - ''

मग अरुणला शंकरकाकांचा स्वभाव आठवला; आणि त्या गोंधळलेल्या मनःस्थितींतहि, त्यानें आपल्याशींच हंसून एक खिन्न सुस्कारा सोडला व म्हटले, ''काय मूर्ख प्राणी आहे! सारं आयुष्य जवळजवळ आतां जात आलं! - आपलं सारं होतं नव्हतं तें असल्याच मूर्ख कल्पनांमागें लागून गमावलन् - कंगाल झाला! - पण अजूनहि कुलाचा मोठेपणा, वैभव यांविषयींच्या शंकरकाकांच्या कल्पना, आपल्या नातेवाईकांच्या श्रीमंतीची त्यांची घमेंड कांहीं जात नाहीं!''

: ६५३ :

पण मग, ते विचार पटकन् बाजूस सारून, अरुणनें घाबरल्या चेहऱ्यानें बाल्याला विचारलें, ''अरे, त्या शेटनीं आणखी कांहीं सांगितलं आहे कां? काय रे? बोल लवकर?''

''ही चिठी दिली हाय् न्हवं कां?..'' बाल्यानें टेबलावरील एका पुस्तकांतील चिठी काढून अरुणच्या हातीं देत म्हटलें, ''म्हनले, आपून कल्यानहून आलों! कोन वसंतराव शेट कां कोन त्यांचा पास मिलाला हाय! जरा मुंबईकड् चक्कर मारून येतों. परत येतायेळ येन बनलं तर! - ''

त्यानें दिलेली चिठी अरुणनें लगबगीनें उघडली; ती वसंताचीच होती. आणि त्यांत घाईघाईनें लिहिलें होतें -

''अरुण, कमळामावशीकडून आल्यावर बाबा, थोडे आजारी झाले असल्याची बातमी आहे. म्हणून मी तिकडेच जात आहे. बाबांनी मला मुद्दाम तुला कांहींच कळवू नकोस असं सांगितलं होतं. पण मला तें आतां शक्य नाहीं. शंकरकाकाला पास देऊन तुझ्याकडे लागलीच पाठवीत आहे!..तूं कसलाहि विचार न करतां असशील तसा बाबांना भेटायला निघून ये! - वसंत.''

अरुणनें ती चिठी पुन्हा एकदां वाचली व पटकन् उठून तो दाराकडे वळला. तसाच लगबगीनें बाहेर पडत, त्या बाल्याला खिन्न स्वरांत तो म्हणाला, ''अरे आज डबा नको आणूस दादरहून! आणि काम झालं, कीं किल्ली तुझ्याकडेच ठेव! मी जातो आहे आतां माझ्या वडिलांकडे! - पुन्हां केव्हां येईन सांगतां येत नाहीं...''

***

# उपकारी माणसें

# - - अभ्र - पटल - -

# विभाग ४ था.

वसंताच्या त्या बोटभर चिठीनें अरुण अगदीं गोंधळला होता! -

''बाबा असे एकाएकीं आजारी कसे झाले? आतां त्यांची प्रकृति कशी असेल? चार पांच दिवसांपूर्वीच नाहीं कां ते कल्याणला गेले? आणि वसंताच्या चिठीवरून दिसतं, ते काल कमळामावशीकडूनहि जाऊन आले! - कशाला बरं गेले असतील मावशीकडे ते? इतक्या अशक्तपणांत ती दगदग त्यांना झेपलीहि नसेल कदाचित्! - पण नुसत्या शारीरिक त्रासापेक्षां त्यांना मानसिक त्रासच किती तरी होत असेल? आपण रस्त्यांत भेटूनहि, पुढें झालों नाहीं, बोललों नाहीं, तेव्हांपासून कदाचित् त्यांचं मानसिक दुःख जास्त वाढलं असेल! - आणि - म्हणजे या साऱ्या गोष्टींना आपणच जवळ जवळ कारण नव्हे कां? - ''

त्याचे सारखे असेच विचार चालले होते! -

पुढल्याच माटुंगा स्टेशनवर उतरून, तो बाहेर पडला; चालतां चालतां त्याला वाटलें, - ''गेले सहा महिने आपण सींवलाच राहत होतों. आजच्याप्रमाणें तेव्हांहि, आपल्यांत व बाबांमध्ये एका स्टेशनाचेंच अंतर होतें! - पण आपल्या मनःस्थितीमुळें मात्र - आपण त्यांच्यापासून अनेक स्टेशनें लांब... जवळ जवळ जगाच्या दुसऱ्याच टोंकाला...होतों! आणि तें दोन ध्रुवांचं अंतर! तें काटायचं आपल्यांत सामर्थ्य नव्हतं! - पण आज - उलट लोकल गाडी हळू चालत असल्यासारखेंच दोन मिनिटांपूर्वी, आपल्याला वाटत होतं! आणि राहिलेलं लहानसं अंतर झपझप चालून जावयास सुद्धां, आपली या क्षणीं केवढी धडपड चालली आहे!! - ''

आणि मग चालतां चालतां अरुणला वाटलें, - ''आपली बेफिकीरी आतां एकदम गेली तरी कुठें? बाबापासून पूर्वी जितक्या जोरानें आपण दूर धांवून गेलों, तितक्याच जोरानें आपण आज त्यांच्याजवळ धांव घेत आहों! - त्यांचें आपले पुष्कळ झगडे झाले, खटके उडाले! पण ते सारे...आपण यावेळी क्षणाक्षणाला जास्त विसरत चाललों आहों! - ''

या विचित्र परिवर्तनामुळें अरुण अगदी भांबावून गेला होता!...''कां? आपलं त्यांच्याविषयीचं प्रेम व आदर? पण त्यापेक्षां त्यांचंच आपल्याविषयींचं उत्कट प्रेम, वात्सल्य! - ''

या विचारानें, तो आणखी झपझप पावलें टाकूं लागला! भोवतीं विजेचे दिवे लागले होते, ते त्याला गरगर फिरत असल्यासारखें वाटलें. मनांतील हे आवेग सहन न होऊन, तो शेवटी आपल्याशींच मोठ्यानें पुटपुटला, ''बाबा, रागावूं नका माझ्यावर! तुमच्या साऱ्या आयुष्यभर दुःख देणारा तुमचा दुर्दैवी दुबळ्या मनाचा अरुण, आतां फक्त तुमच्याचकडेच धांवून येत आहे!!''

: ६५५ :

तो शेवटच्या चौकाजवळ वळला! आणि ज्या घराच्या बांधकामाच्या वेळीं, केवळ आपल्याच सुखदुःखाकडे, आपल्याच कलात्मक सौंदर्यदृष्टीकडे पाहून आतां आजारी असलेल्या आपल्या बाबांबरोबर तो झगडला होता - त्या त्यांच्या..व त्याच्याहि...घराकडे पाहण्यासाठीं, त्यानें आपली दृष्टि फिरविली! - पुढला कोट दिसूं लागतांच, त्याचा हृदयावेग कोट फोडून बाहेर आला!! -

''बाबा आतां कशा स्थितींत आपणांस भेटतील कोणास ठाऊक?' - ही एकच एक काळजी त्याच्या मनाला सारखी टोंचत होती!...

पुढील दाराचें बारकें फाटक लोटून तो आंत गेला. त्यानें पूर्वीं तेथें असतांना पुढच्या दारीं, मधून मधून उत्साहानें लावलेली तऱ्हतऱ्हेची बाग, आतां बरीच कोमेजलेली होती, ती सुकली होती!

चालतां चालतां, आपल्या वाढलेल्या दाढीवर उगीचच हात फिरवीत, तो आपल्या घराचा जिना चढूं लागला. त्यानें हौसेनें व बाबांबरोबर भांडूनच करविलेलें छानदार दार बंद होतें! -

खालच्या भाडोत्र्यांच्या घरांत मुलांचा गोंधळ चालला होता! तोंच - लांबून स्टेशनवरच्या विजेच्या इंजिनच्या जातांयेतांना वाजलेल्या शिटीचा कर्कश आवाज, त्याच्या कानावर आदळला! - तो आपल्या तसल्या विचारांचा तंद्रीतून जागा झाला! - 'बाबा आतां काय करीत असतील, कोठें बसले असतील?' या विचारानें धडधडत असलेली छाती दडपून, त्यानें दाराजवळील घंटेच्या बटनावर बोट ठेवलें! - आणि आंतील चाहूल खिन्न उत्सुकतेनें तो ऐकूं लागला. -

आंतल्या शांततेंत, हॉलच्या दाराजवळ घंटा थोडा वेळ कर्कशपणें वाजली! त्यावेळीं त्याचें हृदय त्याचें त्यालाच मोठ्यानें धडधडतांना ऐकूं येत होतें! -

तेवढ्यांत बसल्या ठिकाणाहूनच येणारा, अगदीं खोल गेलेला लांबून उच्चारलेला, बाबांचा

आवाज त्याला ऐकूं आला - ‘‘अग सुनीतिऽ! कोण आलं आहे बघ बरं! - ’’

: ६५६ :

बऱ्याच दिवसांनी ऐकूं आलेला तो बाबांचा शब्द, अरुणच्या कानीं पडतांच प्रथम त्याला हायसें वाटलें! भावनांनी त्याचें हृदय अगदीं भरून आल्यामुळें, त्यानें आपले डोळे हळूच पुसले - व तो धडधडत्या छातीनें, पुन्हा आंतली चाहूल ऐकूं लागला! -

‘‘हो, पहाते!’’ हे सुनीतीचे शब्द,..त्यानंतर, दाराकडे जवळ जवळ येत असलेला तिच्या पावलांचा आवाज व त्यानंतर, ‘कोण गऽ?’ असा तिच्या मागूनच अरविंदचा जवळ येत असल्यासारखा आवाज ऐकून, - दार उघडलें जाण्याची अरुण उत्कंठेनें वाट पाहूं लागला! -

इतक्यांत, सुनीतीच्या बांगड्यांचा व त्याबरोबर खट्कन उघडलेल्या आंतल्या कडीचा आवाज झाला! - आणि दरवाजा उघडून, सुनीति व अरविंद त्याच्यापुढें उभीं असलेलीं त्याला दिसलीं. -

‘‘कोण? - अरुणदाऽऽदा??’’ त्याच्याकडे गांगरून पाहातांना सुनीतीच्या तोंडून असे शब्द येत आहेत नाहीत - इतक्यांत, अरविंद पुढें झाला व अरुणच्या खांद्यावर स्नेहानें हात ठेवून म्हणाला, ‘‘काय? आलास अरुण? चांगलं केलंस!’’ -

अरुणनें दोघांकडेहि आलटून पालटून बावरलेल्या नजरेनें पाहिलें. अरविंदाच्या चेहऱ्यावर, त्याची नेहमींची खेळकर वृत्ति दिसत होती; पण त्यांत खिन्नतेची छटाच जास्त मिसळलेली होती. सुनीतीनें आपल्या मोकळ्या स्वभावाप्रमाणें अरुणकडे हंसून पहात, त्याचा हात आपल्या हातीं घेतला व तीं तिघेंहि हळूंहळूं चालूं लागलीं! -

: ६५७ :

अरुण त्यांच्याबरोबर वरच्या हॉलमध्यें शिरला; एका कोपऱ्याचा दिवा तेवढाच लावलेला होता आणि दुसऱ्या कोपऱ्याच्या खोलींत बाबासाहेब मच्छरदाणीच्या आंत कॉटवर पडलेले अस्पष्ट अस्पष्ट दिसत होते.

तोंच, त्यांच्या बाजूनें आवाज आला, ‘‘कोण आलं आहे हो, अरविंद?’’ तिघांनीहि क्षणभर एकमेकांकडे पाहिलें व नंतर अरुणच्या खांद्यावर आपला हात ठेवून, त्याच्याजवळ उभी राहात, सुनीति कंपित स्वरांत म्हणाली, ‘‘आपला अरुणदादा आला आहे, बाबा! - ’’

‘‘कोण? अरुण??’’ पडल्या पडल्याच कुशीं वळून, बाबासाहेब कांपऱ्या स्वरांत म्हणाले. त्यांनी एक मोठा सुस्कारा सोडला व ते थोडा वेळ स्वस्थ पडून राहिले.

त्या दोनच शब्दांमुळें, चार दिवसांपूर्वी झालेल्या त्यांच्या भेटीची, अरुणला एकदम आठवण झाली व तो अगदीं रडकुंडीं फिरून हळूंहळूं पावलें टाकीत बाबांच्या जवळ जाऊं लागला -



बाबाही थोडेसे बसते झाल्यासारखे करून, मच्छरदाणीच्या आंतूनच अगदीं खोल आवाजांत म्हणाले, ‘‘आलास अरुण? ये बाबा, बरं झालं! - ’’

अरुणला पुष्कळ पुष्कळ बोलावेसें वाटत होतें. पण अगदीं गळा दाटून आल्यामुळें त्यांच्या तोंडून कांहींच शब्द फुटेनात! -

: ६५८ :

‘‘ये, ती खुर्ची जवळ ओढ पाहूं! - ’’ बाबांच्या शब्दांत वात्सल्य ओतप्रोत भरलें होतें. ‘‘नाहीं तर, - अरविंद? ही मच्छरदाणी वर करा. तो माझ्या जवळच बसेल इथें!’’

अरविंद पुढें येत होता, इतक्यांत, अरुणनेंच मच्छरदाणी वर केली व तो पलंगाच्या कडेवर बाबांपाशी बसला.

अरविंद मागें वळून बाहेर व्हिक्टोरिया कोणची थांबली आहे हें पाहण्यासाठीं व आपल्या डोळ्यांतील अश्रू लपवण्यासाठी ग्यालरींत गेला; आणि त्याच्यामागून सुनीतीहि लगबगीनें तिकडेच निघून गेली!

बाबांनीं अरुणच्या पाठीवर आपला थरथरता हात ठेवला व ते म्हणाले, ‘‘आतां आंगांतले कपडे काढ पहिले! जेवणाला वेळ असेल, तर पाहिजे तर चहा वगैरे घे!’’

स्वतःच्या दुःखापेक्षा, आल्यापासून आपल्याच सुखसोयींची बाबांच्या जिवाची ती धडपड व आपल्याविषयींचें त्यांचें वत्सल प्रेम पाहून, अरुणला त्याचें हृदय पिळवटल्यासारखें झालें? - त्याला भावनांचे आवेग सहन न होऊन, त्यानें बाबांच्या खांद्यावर आपला एक हात टाकला; व त्यांच्या कुशींत आपलें तोंड लपवून, तो ढसढसा रडत, अडखळत्या शब्दांत त्यांना म्हणाला, ‘‘बाबा, मी तुम्हांला सारखं कितीतरी दुःख दिलं! - ’’

बाबांचेहि डोळे भरून येत होते - पण त्यांनी आपलें मन प्रयासानें आवरलें; आणि अरुणच्या पाठीवर हळूहळू थोपटत, ते त्याला हंसल्यासारखें करून, जड आवाजांत म्हणाले, ‘‘वेडा आहेस, अरुण! चल, ऊठ पाहूं! जा आतां ग्यालरींत - मोकळी हवा घे! - म्हणजे तुला बरं वाटेल! आणि कोण आलंय पहा बरं? - ’’

: ६५९ :

अरुणला बाबांचे ते सौम्य शब्द, आपल्या पाठीवरील त्यांचा थरथरता हात, त्यामुळें थोडेसें हलकें वाटलें. त्याला येणारा हुंदका त्यानें तसाच दाबला व तो उठून उभा राहात, बाबांकडे अश्रुपूर्ण नेत्रांनीं पाहात म्हणाला, ‘‘तुम्हांला झोपवूं का नीट?’’

‘‘अरे नको, झोपेन मी!’’ आपण होऊनच, बिछान्यावर पुन्हा हळूंहळूं आंग टाकीत बाबा

म्हणाले, ''इतका कांहीं अशक्त झालेलों नाहीं मी, अरुण! - कालच तर कमळीकडे जाऊन आलो एकटा!'' -

बाबांनीं आणलेल्या त्या उसन्या अवसानानें, अरुणला दुःखच होत होतें; त्यांच्या सुकलेल्या कांहींशा निस्तेज चेहऱ्याकडे पाहात, तो त्यांच्या जवळ उशाशीं उभा राहिला! -

तेवढ्यांत, सुनीति बाहेरील दार उघडीत म्हणाली, - ''कमळामावशी आली, बाबा!..''

- कमळामावशीचें नांव ऐकतांच, अरुणच्या मनाची पुन्हा एकदां नवी चलबिचल झाली. तो घाईघाईनें पावलें टाकीत दाराजवळ गेलो. पहातो - तों तेथें कमळामावशी व तिच्यामागें वासुदेवरावभाऊ त्याच्याकडेच पाहात उभे! -

अरुण धांवतच, 'काय रे अरुण' असें म्हणत उभ्या असलेल्या कमळामावशीजवळ गेला; आणि तिच्या खांद्यावर आपली मान टाकून, तो रडतच तिजजवळ उभा राहिला.

: ६६० :

बऱ्याच दिवसांनी भेटलेला आपला अरुण, आपल्याजवळच उभा आहे, हें पाहून कमळामावशीलाही आनंद व दुःख यांनी भरून येत होतें! पण तिनें त्याला जवळ घेऊन त्याच्या पाठीवर आपला हात ठेवला; आणि ती त्याच्या कानाजवळ अगदीं हळूंच पुटपुटली - ''वेड्याऽ, गप्प राहा! असं काय करतोस? बाबांच्या मनावर परिणाम होईल नाहीं का त्याचा?? - ''

अरुण तिच्या त्या शब्दांनी चपापला व तिच्याकडे वर मान करून त्यानें पाहिलें; पटकन् आपले डोळे पुसले व तो तिजबरोबर मुग्धपणें चालूं लागला.

''कोण आलं आहे?..कमळीऽ?'' बाबासाहेबांचें पुन्हा पडल्या पडल्या बोलणें सुरू झालें, ''कां ग?..असं घाईघाईनं कां आलांत? मुलांबाळांचं घर तुझं! - अशी अडचण करून येण्याचं कांहीं कारण तरीऽ? मी काय आतां म्हातारं माणूस!.. आमची प्रकृति ही अशीच चालायची आतां! - ''

त्यांच्या त्या शब्दांतील तळमळ कमळामावशीला जास्तच दुःखी करीत होती. नुकतेच तिच्या घरीं येऊन गेलेले बाबा व आज तिच्यासमोर बिछान्यावर पडून असलेले बाबा, यांत तिला किती तरी फरक दिसून येत होता! त्यांचे डोळे बरेच खोल गेले होते! - चेहरा अगदीं सुकला होता व बोलतांना त्यांचा आवाज खोल व कांपरा येत होता! -

आणि त्यामुळें, 'अरविंदभाऊजींची दुपारीं तार आली, हें एका अर्थीं बरंच झालं,' असें कमळामावशीला वाटलें! - आणि तार पोंचतांच, दोनअडीच तासांनी असलेली गाडी पकडण्यासाठीं, भाऊंच्या तनमनाची झालेली धडपड, तिला त्याक्षणीं जरी थोडी उगीचच वाटली होती, तरी आतां



त्यामुळेंच भाऊंच्याविषयीं तिला प्रेमाचें भरतें येत होतें! -

त्या विचारानें, जवळ कावऱ्याबावऱ्या चेहऱ्यानें उभे असलेल्या भाऊंकडे, तिनें एक प्रेमभरला कटाक्ष टाकला; आणि तार आली होती हें लपवण्यासाठीं, ती बाबांच्या जवळ उभी राहून म्हणाली - ''तसं नाहीं बाबा, तुम्हीं निघून आल्यानंतर हे लागलीच आले रात्रीं! - आणि मग मला रागावून म्हणाले, 'बाबांना ठेवून कां नाहीं घेतलंस?' - तेव्हां मीच म्हणाले त्यांना, 'तुम्हाला कसलं काम नसेल तर दोघेहि जाऊन येऊं चार दिवस बाबांकडे! बरेच दिवस गेलोंहि नाहीं आहोंत!' - आणि बाबा, गंधा आहे घरीं! संभाळील चार दिवस! - ''

आपल्या पत्नीच्या समयसूचकतेचें, भाऊंना त्यावेळीं कौतुक वाटलें; आणि त्यांनी मुकाट्यानेंच तिजकडे एकदां वळून पाहिलें! -

: ६६१ :

आपल्याला फसवण्यासाठीं, कमळीं हें कांहीं तरी आपल्या पदरचेंच सांगत आहे, हें बाबांना समजत होतें! - पण तरीहि ते तिला म्हणाले, ''बरं बरं! आलांत तें बरं केलंत! अरुण भेटला कां तुला, कमळे? - ''

''हो!'' - कमळामावशी दाटलेल्या गळ्यानें म्हणाली; पण मग, तो विषय बदलण्यासाठीं तिनें बाबांना विचारलें, ''तुमची प्रकृति ठीक आहे ना आतां? - ''

''मला ग तसं काय झालं आहे? - म्हातारपण..नबळं शरीर - हाच आतां आमचा बाजार! - '' बाबा तिच्याकडे हंसून पाहिल्यासारखें करून म्हणाले, ''आतां अरुण, तूं अशीं भेटलांत, - म्हणजे मनाला जरा बरं वाटतं - ''

बाबांनीं क्षणभर आपली मान दुसऱ्या बाजूस वळवली! -

कमळामावशी, अरुण, भाऊ, अरविंद - सारे गप्प उभे राहूनच तें ऐकत होते! -

इतक्यांत, बाबांनी हळूंच पुन्हा एक सुस्कारा सोडला आणि ते मोठ्यानें म्हणाले ''अरे मुरारी! एऽमुरारी, अरे आपल्याकडे हीं मंडळी आलीं आहेत सारीं! - पाहिलंस कां? - त्यांच्या जेवणाची तयारी करतोयस् ना लवकर? - केव्हांपासूनचीं उपाशीं असतील तीं! - ''

: ६६२ :

अरुणला वाटलें, आपण तरी बाबांच्या असल्या प्रेमाशिवाय कितीतरी दिवस उपाशीं होतों! - तोंच मुरारी घरांतून पुढें आला व बाबांच्या उशाजवळ उभा राहून म्हणाला, ''काऽय बाबा?..जेवण तयार आहे ना! वाढतोंच साऱ्यांना आतां. पण तुम्ही काय खाणार? - ''

''मी? घेईन एखादा कपभर दूध! आतां मी जरा स्वस्थ पडणार आहे. तुम्हीं सारीं प्रथम जेवून

घ्या, बरं कां कमळेऽ! - ''

''बरं!'' असं म्हणून कमळामावशी घरांत वळली. इतक्यांत, बाबाच पुन्हां म्हणाले, ''अरे हो, वसंत आला कां नाहीं अजून? - बाकी तो थोडा उशीरा येणार असं म्हणालाच होता म्हणा, मला!..''

''तो नऊ दहा वाजतां जेवूनच येईन म्हणालाय्, बाबा!'' अरविंद पुढें होऊन म्हणाला.

''बरं बरं!'' बाबा पडल्या पडल्या दुसऱ्या कुशीवर वळून, आपल्याशींच म्हणाले,''मी थोडा नबळा झालो आहे! - सगळी मंडळी अशी घरीं आलीं! आतां त्यांची व्यवस्था व्हायला पाहिजेना?.. पडल्या पडल्या होईल तेवढंच करायचं, झालं!...''

: ६६३ :

अरुणला त्यावेळीं वाटलें, ''मी त्यांचा प्रत्यक्ष मुलगा! - पण आपल्यालाहि ते असे परके परके कां वागवतात? ते आपल्याला कां नाहीं सांगत? पण त्यांनीं सांगितलं नाहीं, म्हणून आपण करावयाचं नाहीं असं थोडंच आहे!..''

इतक्यांत बाबाच म्हणाले, ''अरे अरुण, इकडे ये बाळ जरा! - ''

अरुण लगबगीनें त्यांच्याजवळ गेला, तेव्हां ते त्याच्याकडे प्रेमळ नजरेनें पहात जिव्हाळ्यानें म्हणाले, ''अरेऽ आपल्याकडे पाहुणे मंडळी आली आहेत! त्यांची सगळी व्यवस्था कर पाहूं!.. भाऊबिऊंचं जेवण झाल्यावर मग तूं बसलास तरी चालेल! अंऽ? - ''

आपण कल्पना करीत होतों, तोंच, ऐकूं आलेल्या बाबांच्या त्या प्रेमळ व आपुलकी भरलेल्या वत्सल शब्दांनीं, अरुणचें हृदय अगदी उचंबळून येत होतें. तो दाटलेल्या कंठानें त्यांना म्हणाले, 'हो, तुम्ही स्वस्थ पडा, बाबा! मी करतो सारं!..''

: ६६४ :

मुरारीनें आणलेलें दूध, उठून बसून घेतां घेतां बाबा म्हणाले, ''अरे काठ्या कुठं आहे?..त्याला एक सोडावॉटरची बाटली आणून ठेवायला सांग रात्रींसाठीं!''

बाबा पुन्हां अंग बिछान्यावर टाकून, अंगावर पांघरून ओढीत स्वस्थ पडले! -

''बऽरं!..'' असं बाबांना सांगून, रिकामा कप घेऊन स्वयंपाकघराकडे वळतां वळतां, थबकून मुरारी अरुणला म्हणाला, ''चला दादाऽ, पानं मांडली आहेत? - साऱ्यांना घेऊन या - ''

अरुणनें बऱ्याच दिवसांनीं मुरारीकडे वळून पाहिलें. त्याच्या मंद दृष्टींत, पूर्वीचाच प्रेमळभाव होता;..पण तो खिन्नहि दिसत होता! - अरुण हंसल्यासारखें करून त्याला म्हणाला, ''हो, आलोंच हं आम्हीं!..वाढायला घे!..''



अरविंद, भाऊ यांना घेऊन, अरुण न्हाणीघरांत हातपाय धूत होता. या न्हाणीजवळच्याच बांधकामाच्या वेळीं, अरुणचा व बाबांचा खटका उडाला होता! - तो प्रसंग व आपले त्यावेळचे बाबांना उद्देशून उच्चारलेले कठोर शब्द त्याला आठवले! आणि त्याच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें..पण त्यानें एक चूळ भरली व डोळ्यांना जोरानें पाणी मारून, तोंड साफ करीत भाऊंना म्हणाला - ''चला भाऊ, जाऊं या जेवायला नाहीं? - ''

: ६६५ :

त्यांच्या घराच्या त्या मोठ्या थोरल्या स्वयंपाकघरांत, दोन टोंकाला दोन पंक्ति मांडल्या होत्या! - एका बाजूस,...भाऊ, अरविंद, अरुण, शरद् वगैरे बसले होते. दुसऱ्या बाजूस, कमळामावशी, सुनीति या दोघींच बसल्या होत्या.

मुरारी व काकू वाढीत होतीं! -

अरुणनें काकूंकडे ती वाढत असतांना वळून पहात हास्य केलें! - तिनेंहि त्याला चपाती वाढतां वाढतां हंसून हळूंच म्हटलें, ''काय रेऽ अरुण? - आलास?..किती दिवस वाट पहात होते ते सारखी!..मी तरी काय सांगणार सांग बरंऽ, अशा वेळीं त्यांना! - ''

अरुणला काकूविषयीं विशेष आपुलकी कधींच वाटली नव्हती. पण तिचा त्या दिवशींचा खिन्न चेहरा पाहून व तिचे ते शब्द ऐकून, अरुणलाहि वाईट वाटलें. तिचा स्वभाव कसल्याहि प्रकारचा असला, तरी आज ती आपल्या वृद्ध पतीच्या आजारानें बरीच गांगरली होती, हें त्याला स्पष्ट दिसून आल्यावांचून राहिलें नाहीं! तिजबरोबर कांहींतरी बोलावें असें अरुणला वाटलें! - पण त्याच्या कंठांतून शब्दच फुटेना!..

: ६६६ :

सारीं अगदीं गप्प गप्पच जेवत होतीं. मधून मधून एकमेकांकडे नुसती दृष्टि टाकण्याशिवाय कोणीच कांहीं बोलत नव्हतें.

शेवटीं, ती बराच वेळ राहिलेली शांतता मोडण्यासाठीं, अरविंदच सुनीतीपलीकडे बसलेल्या कमळामावशीकडे व जवळ बसलेल्या भाऊंकडे पाहून म्हणाला, ''तुम्हाला माझी तार अगदीं गाडीच्या वेळेवरच मिळून, बरीच घाई झाली असेल नाहीं, कमळावहिनी? - ''

''हंऽ!'' दोघेहि जेवतांना खालीं पहातां पहातां, त्याच्याकडे वळून बेभान मनःस्थितींत म्हणाली.

आणि पुन्हा थोडा वेळ सगळीकडे शांतता पसरली! -

''आमची चिठी तुला केव्हां पोचली, अरुण?'' अरविंद पुन्हा थोडा वेळ गेल्यावर म्हणाला,

''संध्याकाळीं मिळाल्याबरोबर लागलींच आलो. नाहीं तर बहुतेक उद्यां सकाळीं मी येणारच होतो इथें!...''

अरविंदनें एक सुस्कारा सोडला व अरुणकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पाहिलें! -

: ६६७ :

''तुमचं झालं तर उठाना भाऊ तुम्ही!'' पानावर भिडस्तपणें ताटकळत बसलेल्या भाऊंकडे पाहून, अरुण व अरविंद एकदम म्हणाले. भाऊ उठून गेल्यावर, अरुण अरविंदकडे वळून, हळूच पण जड आवाजानें म्हणाला, ''अरविंद, मी पुष्कळ चुका करीत आलो नाही रे, बाबांच्या बाबतींत? - ''

अरविंदनें त्याच्याकडे प्रेमळ व स्नेहपूर्ण नजर टाकली; आणि सहानुभूतीच्या स्वरानें तो त्याला म्हणाला, ''अरुण, मागाहून आपल्याला बोलायला पुष्कळ वेळ आहे त्याविषयीं! - ''

अरुण त्यावर कांहीं वेळ, कांहींच न बोलतां, पानावर बेभानपणें बसला. मग तो उठून अरविंदला म्हणाला, ''मी उठतो अरविंद, तुझं सावकाश होऊं दे!'

आपल्या दुःखी अंतःकरणाला शांत करण्याचा प्रयत्न करीत, अरुण न्हाणीघरांत गेला. तो आंचवून बाहेर येऊं लागतो, तों दारावरच त्याला बाबांचे मोठमोठ्यानें उच्चारलेले कांहीं तरी शब्द ऐकूं येऊं लागले - तो जागच्या जागीं थबकून ऐकूं लागला! -

: ६६८ :

ते बहुतेक काठ्यालाच म्हणत होते, ''आतां मी दाखवली तेव्हां म्हणतो आहेस ती दिडकी खोटी म्हणून!..कोणाकडून आणलीस बाबा, सोडावॉटरची बाटली?...आतां चार आण्याच्या व्यवहारांत जर तूं असा फसायला लागलास तर कसं होणार काठ्या, तुझं?..तुला नसेल, पण मला माझ्या दिडकीची किंमत आहे! - दुसरे कांहीं नाहीं. तुमच्या असल्या निष्काळजीपणाचाच मला राग येतो! - बरं बरं, जा तूं! - मला स्वस्थ तरी पडूं दे आतां - ''

थोड्या वेळानें, अरुण हळूंहळूं पावलें टाकीत, बाबा झोंपले होते त्या खोलीच्या दारांतून आंत वांकून पाहूं लागला. काठ्या निघून गेला होता. बाबा भिंतीच्या बाजूस तोंड करून, एका कुशीवर वळून चुळबुळ करीत होते! -

पण बाबांचे दोन मिनिटांपूर्वींचेच शब्द, अजून अरुणच्या कानांत घुमत असल्यामुळें त्याला अगदीं उचंबळून येत होतें! -

: ६६९ :

'आतां, एक दिडकी खोटी निघाली असती, तर काय मोठंसं होतं?..पण आजारीपणांत,



पडल्या पडल्याहि बाबांच्या मनाला स्वस्थता नाही!...' या विचारांतच अरुण गॅलरींत येऊन उभा राहिला.

मुरारी, काकू व सुनीति घरांतील आंवरांआवर करीत होतीं. कमळामावशी बाहेर आली. तिनें बाबांच्या खोलींत एकदां वांकून पाहिलें. ते झोपलेले दिसतांच तीहि खालच्या गॅलरीकडे वळली.

एका कोपऱ्यांतील खुर्चीवर भाऊ बसले होते. अरुण व अरविंद कठड्याला रेलून जवळ जवळ उभे होते. कमळामावशी त्या दोघांच्या जवळ जाऊन उभी राहिली.

''दुसरा विशेष कसला आजार नाही रे!''अरविंद अरुणला सांगत होता. ''ते आतां बरेच अशक्त झाले आहेत, एवढंच! माझ्या ओळखीचा हार्ट डिसीझ स्पेशालिस्ट आहे गोडबोले म्हणून; गेल्या महिन्याभरांत, मी दोन वेळां त्याला आणला होता माझ्याबरोबर! - तो माझा मित्र म्हणूनच बाबांनीं त्याच्याकडून तपासवून तरी घेतलं. त्यानेंच मला मागाहून सांगितलं - 'तसं कांहीं विशेष नाहीं!...ब्लडप्रेशर मधून मधून एकदम वाढतं. हार्ट वीक झालं आहे. म्हातारपणीं हें आतां असंच चालायचं! विशेषतः एके ठिकाणीं बसून हे डोक्याचं काम करणारे असेच शेवटीं!...'असं तो म्हणाला - ''

''औषध?..''कमळामावशीनें सूचकपणें प्रश्न केला.

'होऽ! दिलं होतं ना त्यानं!' अरुण व कमळामावशी या दोघांकडे पहात, अरविंद हळूंच म्हणाला, ''पण त्यांचा त्रागाऽ!...त्याला नाहीं ना औषध!..आणि म्हणाले, 'गेली दहा बारा वर्षें, औषधांवरच जगत आलो! आतां वीट आला असल्या जगण्याचा!...पुरे! जास्त जगण्यांत तरी काय मजा आहे? - ''

: ६७० :

तिघंहि थोडा वेळ कांहीच बोललीं नाहींत.

मग अरविंदच पुन्हां म्हणाला, ''काल चांगले, वहिनींकडून रात्रीं याच वेळी आले. पण मग, आज सकाळी उठल्यावर, जेव्हां ते 'अशक्तपणा फार वाटतो' असं माझ्याकडे म्हणून हिंडाफिरायचेहि थांबले,...तेव्हा मात्र मला काळजी वाटूं लागली! - आणि दुपारी वसंत आल्याबरोबर, त्याला त्यांनी लागलीच मुंबईला पाठवला. त्याला म्हणाले 'गेल्या पंधरवड्यांत आपण ठरवल्याप्रमाणें ते शेअर्स सारे विकून ये! - आणि बँकेंत पैसे भर. अरुणला त्यातलं कांहीं समजत नाहीं. मग मागाहून भानगडी रहायला नकोत कांहीं! - मीच आलो असतो; - पण आज मला शक्ति नाही वाटत तेवढी!'' - -

अरुणला रडूं कोसळत होतें. तें तसेंच प्रयासानें दाबून, तो अरविंदकडे पहात होता. तोहि

बोलतां बोलतां थोडा वेळ थांबला; आणि मग पुन्हां म्हणाला, ''म्हणून मला थोडी जास्तच काळजी वाटूं लागली! - आाणि वसंत गेल्यावर तासाभरानें तार केली. म्हटलं कमळावहिनी शुश्रूषेला जवळ असलेली बरी! - ''

कमळामावशीलाहि आतां राहवेना. पण 'बरं केलंत भावोजी!' असें कांहीसें तोंडातल्या तोंडात म्हणून, ती शून्य दृष्टीनें रस्त्याकडे पाहूं लागली.

: ६७३ :

इतक्यांत, खालून हळूंच हांक ऐकूं आली, ''बाबा झोंपले आहेत का रे, अरविंद,...जरा हळूं दार उघड पाहूं मागलं! - ''

तिघांनी खालीं पाहिलें,..तों वसंत उभा होता.

अरविंदानें जाऊन मागलें दार उघडलें; वसंत हळूंच वर आला; त्यानें कपडे काढले; तो ग्यालरींत आला, तेव्हां तें दोघेहि, पुन्हां त्याच्याजवळ येऊन उभे राहिले.

''केलंस सारं काम?...'' अरविंदनें वसंताकडे पाहून कुजबुजत विचारलें.

''हो! कालच्यापेक्षां भाव एक रुपयानें कमी होता!'' वसंत म्हणाला, ''पांचशें रुपये कमी आले. पण बाबांना सांगून उपयोग नाहीं त्यांतलं!..त्यांना ती एक नवीन चिंता उत्पन्न व्हायची नाहीं तर! - ''

अरुण व कमळामावशी, वसंताचे ते दूरदर्शी शब्द ऐकून, मनांतल्या मनांत बाबांच्या आत्यंतिक हिशेबी स्वाभाविषयीं हळहळत होतीं. अरुणसमोर अर्ध्या तासापूर्वीचा काठ्यानें आणलेल्या खोट्या दिडकीचा प्रसंग उभा राहिला होता! -

: ६७२ :

तेवढ्यांत, कमळामावशीचें लक्ष भाऊंकडे गेले. ते खुर्चीवर बसल्या बसल्या डुलक्या घेऊं लागले होते. ती पटकन् त्यांच्याकडे जाऊन, त्यांना हलवून जागे करीत म्हणाली, ''चला ना! हॉलमध्ये काठ्यानें साऱ्यांचे बिछाने घातले आहेत! - ''

'अं:?' करीत भाऊ दचकून उठले. ते आपल्या बायकोचे शब्द ऐकून, दाराजवळच्या तांब्यांतील पाणी पिऊन, बिछान्यावर जाऊन पडले.

थोड्या वेळानें, भाऊ निजलेलें पाहून कमळामावशी परत आली, तेव्हां वसंत बाबांच्या प्रकृतीची व अरुण केव्हां आला, त्याची चौकशी करीत होता.

मावशीनें साऱ्यांना उद्देशून म्हटलें, ''अरे, आतां झोंपा पाहूं सारीं! सकाळी बोला मग! - ''

अरुणला मुळींच चैन पडत नव्हतें! - तो बाबांच्याविषयीं चिंता करीत आपल्याच विचारांत



बाजूस उभा होता!...

इतक्यांत अरुविंद म्हणाला, ''वहिनी, तुम्ही झोंपा बाबांच्याच खोलींत वरती! त्यांना कांहीं लागलं तर?...आम्हीं झोपूं, या हॉलमधें!..''

आणि मग अरुणकडे वळून तो म्हणाला, 'चल अरुण, येतोसना झोंपायला?' एकदम भानावर आल्यासारखें करून, अरुण भांबावून म्हणाला, ''काय? कुठें?..''

''अरे असं काय करतोस, अरुण?'' अरविंदला त्याची त्रस्त मनःस्थिति पाहून वाईट वाटलें व तो सहानुभूतीनें त्याला म्हणाला, ''झोपायला येतोस ना हॉलमधें?'' -

अरुणनें त्या तिघांकडेहि एकदां आपली खिन्न दृष्टि वळवली. शेवटीं, कमळामावशी त्याच्याचकडे अगदीं प्रेमानें अश्रुपूर्ण नेत्रानीं पहात असलेली पाहून तो अगदी असहाय्यपणें तिलाच म्हणाला, ''तूं कुठें झोंपतेस, मावशी? - ''

मावशीला त्याच्याकडे पहातां पहातां भडभडून आलें. पण तरी तिनें रुद्ध स्वरांतच म्हटलें, ''बाबांच्या खोलींत! - ''

''मग मी झोंपतों ना ग तुझ्याजवळ, मावशी!'' अरुण तिजकडे अगदीं विनवणीच्या बालिश स्वरांत म्हणाला! - ''

''बरं चल! - '' कमळामावशी त्याच्या पाठीवर हात ठेवीत त्याच्याकडे कळवळ्यानें पाहून म्हणाली.

अरुणनें एक समाधानाचा सुस्कारा सोडला! आणि तो मावशीबरोबर चालूं लागला! -

: ६७३ :

बाबांच्या खोलींत बेडलाइटचा अंधुक निळसर उजेड पडला होता. पलंगावरील मच्छरदाणी मंद वाहणाऱ्या वाऱ्यानें भुरभुर हलत होती. आणि आंतील गादीवर बाबा शांतपणें पडले होते.

अरुण व कमळामावशी खोलींत आलीं तेव्हां त्यांना वाटलें, बाबा गाढ झोपीं गेले आहेत.

खालीं पसरलेल्या दुलईवर, अरुण हळूंच आडवा झाला. कमळामावशीहि कांहीं न बोलतां त्याच्याजवळ बसली. उताण्या पडलेल्या अरुणकडे, क्षणभर प्रेमानें मुग्ध दृष्टि टाकून तिनेंहि नंतर त्याच्याजवळ अंग पसरलें.

बऱ्याच दिवसांनीं भेटलेल्या आपल्या कमळामावशीजवळ तसें पडल्यामुळें, अरुणला अगदीं हायसें वाटत होतें. पण तरी, त्याचें हेलावलेलें हृदय कांहीं केल्या स्थिर होईना. आपल्या चाहुलीनें बाबा कदाचित् जागे होती, म्हणून त्यानें आपल्या उचंबळणाऱ्या भावनांना पुष्कळ बांध घालून पाहिले - - पण शेवटीं, तो मुळुमुळु अश्रू ढाळूं लागला.

अगदीं लहानपणीं, असेंच तिच्याजवळ, तिच्यासमोर पडून, तिला नाना प्रश्न विचारणारा तिचा अरुण, आज असा अश्रू ढाळतांना पाहून, कमळामावशीनें आतांपर्यंत आपल्या मनावर मिळविलेला सारा ताबा, गेला. तिनें अरुणला आपल्या जवळ ओढलें व भरल्या डोळ्यांनीं त्याच्याकडे पाहत, त्याच्या पाठीवर थोपटून ती त्याला कुजबुजत म्हणाली, ''उगी उगीऽ! अरुण असा जिवाला त्रास करून घेऊं नकोस ना! - पूस पाहूं डोळे - बाबा थोडे आजारी आहेत - पण उद्यां लगेच बरे होतील! - अंऽ! तूं असा काय घोर अपराध केलाहेस बरं? - वेडा! - ''

असें म्हणून तिनें स्वतः आवंढा गिळला; आणि थोडें आनंदी वातावरण निर्माण करण्यासाठीं, एखाद्या लहान मुलाप्रमाणें, अरुणला पाठीवर थोपटीत, ती त्याच्या कानाजवळ कुजबुजली, ''झोप तूं! - मी तुला थोपटते अंऽ!''

अरुणलाहि आपल्या लहानपणाची आठवण झाली. तो रडतां रडतां मावशीकडे बळेंच हसून पहात पुटपुटला, ''थांब तर मावशी, मी तसा त्या कुशीवर होतो. तूं माझ्या पाठीवर असाच हात ठेव! - म्हणजे तरी मला झोंप येईल! - ''

: ६७४ :

बराच वेळ, अरुण तसाच झोंपला होता. त्याच्या पाठीवर हात टाकून, त्याला थोपटतां थोपटतां, मावशी स्वतःच झोपीं गेली. - पण अरुणचें तळमळणारें मन मात्र कांहीं केल्या शांत होईना.

तो डोळे बंद करून, विचार करतच पडला होता. बाबांचे व त्यांचे आयुष्य त्या दोघांत झालेलीं लहान मोठीं मतमतांतरें, झगडे - सारें त्याच्यापुढून चित्रपटाप्रमाणें भरभर सरकत होते! - आपलें बाबांशीं झालेलें ध्येयवादी भांडण व नंतरचा आपला प्रत्यक्ष जगांतील अधःपात, त्याला पुन्हां आठवून, त्याला वाटलें, ''मधल्या लहानग्या कालखंडांत, आपण जास्त तर कांहींच मिळवूं शकलों नाहीं. उलट बाबांना मात्र उगीच दुःखीं केलं! - त्या प्रेमळ म्हाताऱ्याच्या मनःस्तापास मात्र आपण विनाकारण कारणीभूत झालों! - ''

रात्र बरीच झाल्यामुळें, सगळीकडे अगदी शांत झालें होतें. लांबून एक दोनदां ट्रामचा खडखडाट; व दांड्याचा सरकणारा आवाज, धांवत्या व्हिक्टोरियांच्या घोड्यांच्या टापा व एखादें मोटारीचें विजेरी हॉर्न...एवढेंच त्याच्या कर्णपटलावर आदळून गेलें! -

मध्यें एकदां काकूनें हळूंच आंत डोकावून पाहिलें; आणि बाबा झोंपीं गेलेले दिसतांच, ती पुन्हा दार लोटून निघून गेली! - त्याशिवाय, साऱ्या घरांत व चोहूबाजूंस, जिकडे तिकडे अगदीं सामसूम होतें! -



तोंच, खालच्या एका बिऱ्हाडांतील घड्याळांत, गंभीरपणें ठण्ठण् - असें एकंदर बारा ठोके पडले! -

: ६७५ :

अरुण दुसऱ्या कुशीवर वळला. जिच्याजवळ पडल्यामुळें व जिच्या थोपटण्यामुळें, त्याच्या जिवाला मघां थोडें शांत वाटत होतें; ती कमळामावशी शांत झोपी गेलेली दिसत होती. तिच्या निद्रित चेहऱ्याकडे पहातां पहातां, त्याला कितीतरी गोष्टी आठवल्या. ती कधीं कधीं सांगत असलेले त्याच्या लहानपणातील बोबडे बोल, पांच सहा वर्षांपूर्वीं त्यानें तिजकडे केलेल्या मोठमोठ्या ध्येयांच्या भराऱ्या व वल्गना,..सारें त्याच्यापुढें उभें राहिलें. आणि तें आठवतां आठवतां, मधल्या स्वतंत्र आयुष्याच्या आभासांत, सर्व मनोरे जणू ढांसळल्याचें चित्र त्याच्यापुढें दिसूं लागलें!

अतिशय भारावलेल्या हृदयानें त्यानें एकदां बाबांच्या हलत्या मच्छरदाणीकडे हळूच दृष्टि वळविली. त्याला त्याआडची त्यांची अस्पष्ट आकृति दिसत होती. त्यांच्या साऱ्या आयुष्याच्या धडपडीचीं कल्पनाचित्रें, त्याच्या डोळ्यापुढें उभी रहात होतीं. त्यांच्याविषयींच्या भावनांनी भरून आलेल्या त्याच्या हृदयांत अगदी अकल्पित बोल उभे राहिले, ''बाबा, तुम्ही अजूनहि लहान पोराप्रमाणें मजवर पूर्वीइतकेंच उत्कट प्रेम करतां!..माझ्या साऱ्या चुका तुम्ही पोटांत घातल्यात!..माझ्या दृष्टीनें तुमच्या साऱ्या आयुष्याची धडपड कदाचित् अपेक्षापूर्ण झाली असेल!..पण ती अपेक्षा मात्र माझ्या सुखाचीच होती! - ''

डोकं अगदीं सुन्न झाल्यासारखें वाटून तो हळूच उठून बसला; आणि त्यानें दोन्ही हातानें आपल्या कानशिलांजवळ घट्ट दाबून धरलें! -

: ६७६ :

बाबाहि कदाचित् तसेच तळमळत होते कीं काय कोणास ठाऊक? -

थोड्या वेळानें, त्यांच्या पलंगाकडून, मच्छरदाणींतून हळूच आवाज ऐकूं आला, ''कोण रेऽ? अरुण? - तूं इथेंच झोपला आहेस कां? - आणि अजून जागा कां? - झोप नां - ''

बाबांचे ते अचानक आलेले शब्द ऐकून, अरुण दचकून भानावर आला. त्या शब्दांतील कळकळ व वात्सल्य यांची जाणीव होऊन, त्याचा कंठ जड झाला; आणि शेवटीं बसल्या बसल्या बाबांच्या पलंगाजवळ हळूंच सरत, तो जड आवाजानें पण मोकळ्या मनानें म्हणाला, ''मला बाबा झोपच येत नाहीं! - ''

बाबांनीं एक सुस्कारा टाकला; आणि ते आपला हात मच्छरदाणीतून बाहेर काढून, अरुणचा हात धरीत म्हणाले, ''हं - आणि मलाहि!

: ६७७ :

थोडा वेळ दोघेहि तसेच स्तब्ध होते. पण मग बाबाच पुन्हां म्हणाले, ''मला थोडं पाणी दे पाहूं प्यायला, अरुण!''

अरुण उठला; पलंगाखालच्या तांब्यांतील थोडें पाणी त्यानें प्याल्यांत ओतलें व भावनावेगांनीं थरथर कांपणाऱ्या आपल्या हातानें त्यानें तें बाबांपुढें केलें.

बाबा अर्धवट बसते होऊन, त्यांतील चार पांच घोट प्याले आणि पेला परत अरुणकडे देत, त्यांनी त्याला विचारलें, ''सारीं झोपलीं असतील ना घरांतील मंडळी? - ''

प्याला पुन्हा पलंगाखालच्या ताब्यावर हळूंच ठेवतां ठेवतां, अगदी शांत पडलेल्या कमळामावशीकडे पाहून, परत बाबांकडे पहात, अरुण म्हणाला ''हो! - ''

''मग असं कर, अरुण! हा तक्क्या ठेव भिंतीला टेंकून! - '' बाबा अरुणकडे प्रेमानें पहात सावकाश म्हणाले, ''जरा ओडगून तरी बसतो थोडा वेळ मी''

अरुणनें ठेवलेल्या तक्क्याला ओडगून बसतां बसतां, खोलींतील अंधुक उजेडांत बाबांनीं एकदां आपली मंद दृष्टि फिरवली, आणि खालीं झोंपलेल्या कमळामावशीकडे दृष्टि थबकून पहात ते म्हणाले, ''ही कोण? कमळी झोंपली आहे कां इथें? झोंपूं दे, झोपूं दे! - तिला बिचारीला मनःस्ताप काय कमी असतील? - ''

: ६७८ :

अगदीं रडकुंडी फिरून जवळ उभ्या असलेल्या अरुणकडे अगदीं वत्सलतेनें पाहून, बाबा थोडा वेळ गेल्यावर त्याला म्हणाले, ''ये अरुण, फार दिवसांनीं घरीं आला आहेस! - असा माझ्याजवळ बस पाहूं बिछान्यावर! - आपण थोडा वेळ मोकळं मोकळं बोलूं या सारं कांहीं! - ''

बाबांकडे पहातां पहातां, अरुणचे डोळे भरून आले. मनावर ताबा मिळवून तो त्यांच्या अगदीं जवळ जाऊन बसला.

पण दुःख अनावर होऊन, दोघेहि एकमेकांकडे पहात, थोडावेळी तसेंच अश्रू ढाळीत होते.

- कमळामावशी स्वस्थ झोंपल्यासारखी पडली होती; तरी ती जागीच होती त्या बापलेलकांचा आतांपर्यंतचा तो सारा संवाद ऐकून, दुसऱ्या बाजूस असलेल्या तिच्या डोळ्यांतून दुलईवर हळूंहळूं अश्रू ठिपकत होते! -

: ६७९ :

अरुणच्या खांद्यावर हात ठेवून, त्याला थोडें आपल्या बाजूस ओढीत, बाबा त्याच्याकडे मुग्धपणें पहात राहिले. त्याचें तें दुःख, आणि आपल्या साऱ्या आयुष्यांतील धडपडी आठवून,



त्यांना अगदीं उचंबळून येत होतें! - आणि त्यांच्या म्हाताऱ्या ओढलेल्या डोळ्यांतून अश्रूंचें सारखे पूर वहात होते.

तरी, अरुण त्यांना मिठी मारून निःशब्दपणें रडत असलेला पाहून, शेवटीं, बाबांनी आपलें मन अतिशय प्रयासानें आवरले. अरुणच्या कपाळावरून हळूंहळूं एक हात फिरवीत, दुसऱ्या हातानें त्याला थोपटीत, ते वात्सल्यानें त्याला म्हणाले, ''अरुण, मला समजतं, तुला आज माझ्या दुःखामुळेंच जास्त दुःख होत आहे. पण वेड्या, असं नुसतं रडून रे काय होणार? - तूं शहाणा आहेस ना? थांब पाहूं मग! मन आंवर एकदम! - ''

अरुणनें हळूंच त्यांच्याकडे वर मान करून पाहिलें; आणि तो अडखळत म्हणाला, ''बाबा, मी तुमच्या दुःखालाच कां हो नेहमीं कारण झालो?...पण खरंच सांगतो - माझी तशी कधींच इच्छा नव्हती!..

''मला ठाऊक आहे, अरुण - '' बाबा त्याला सांत्वनासाठीं पुढें म्हणाले, ''तुझी तशी इच्छा नव्हती, नाहीं व नसणारहि! - आणि तुझ्यामुळें, मी माझ्या आयुष्यांत थोडा फार दुःखी झालो, हेंहि कांहींसं खरं आहे! - तरी त्यांत तुझीच सर्वस्वी चूक आहे, असं मी कसं म्हणूं? आतां तरी मला तसं नाहीं वाटत! - हं, डोळे पूस तुझे! मला आज तुला पुष्कळ सांगून घ्यायचं आहे! - ''

: ६८० :

अरुणनें प्रयासानें आपल्या मनावर ताबा मिळवला; आणि बाबांच्या अगदीं जवळ सरकून त्यानें डोळे पुसले! -

''तूंच पहा! तुझ्यावर वेळोवेळी रागावलो मी, तें तरी तुला दुःख व्हावं, तूं असुखी व्हावंस, म्हणून का रे अरुण?'' - बाबा अगदीं मन घट्ट करून, शांतपणें हळूंहळूं एकएक शब्द उच्चारीत होते, - ''त्यानंतर मी आपल्याशींच किती तरी वेळ दुःख करीत बसे, प्रत्येक वेळीं! - पण अरुण, मला वाटे, पोरगा लहान! - आपला हात धरून चाललेला आहे. त्याला जगांत अजून स्वतंत्रपणें चालायला शिकायचं आहे! - तुझीं ध्येयें मला समजत होतीं. अगदींच नाहींत असं नाही, बाळा!..पण माझ्या आयुष्यांत आलेले अनुभव, तुला दुसऱ्या मार्गानें नेण्याविषयीं, मला पुन्हां पुन्हां बजावत होते!..आणि तुझा हात माझ्या हातीं होता, म्हणूनच मी तो धरून तुला माझ्याबरोबर नेण्याचा प्रयत्न करीत होतो! - यांत माझी कोणती चूक बरं? - ''

श्रम झाल्यामुळें, बाबा थोडा वेळ थांबले. त्यांनी एक दोनदां श्वास टाकल्यासारखें केलें! - मग ते अगदीं स्वस्थ पडून राहिले. अरुणला अगदीं भारल्यासारखें झालें होतें. त्याला वाटलें, यावेळी

बाबांना जास्त बोलून त्रास होईल! म्हणून, तो त्यांचा हात आपल्या हातीं घेऊन त्यांना कळवळ्यानें म्हणाला, ''बाबाऽ! नका ना जास्त बोलूं! तुम्हाला त्रास होईल! - तुम्हीं अगदी स्वस्थ पडा!''

''थांऽब रेऽ, अरुण!...'' बाबा हंसल्यासारखें करून, त्याच्याकडे वात्सल्यानें पहात म्हणाले, ''थोड्या अशक्तपणामुळें मला किंचित् त्रास होतो - पण तुझ्याबरोबर असें बोलूनच मला जास्त बरं वाटणार आहे! पुन्हां कधीं बोलतां येईल ते येईल! - पण आज संधी आली आहे, तर मला सारं मोकळेपणें बोलूं तरी दे! - ''

: ६८१ :

अरुणनें धरलेल्या आपल्या हातावर, बाबांनी आपला दुसरा हात ठेवला; आणि थोडा वेळ ते स्वस्थ बसले. अरुणहि त्यांच्याकडे उंचबळून आलेल्या हृदयानें पहात गप्प बसला.

''तेव्हां तूं माझा हात धरून जगांत पावलें टाकण्याचा प्रयत्न करीत आहेस, असं समजून, मी तुला माझ्याबरोबर, माझ्या मतांप्रमाणें, - वेळीं रागावून, चिडून नेत होतो!'' - अरुणचा हात दोन्ही हातांनी घट्ट धरून, बाबा पुन्हां बोलू लागले, ''पण तुला तुझीं मोठमोठीं ध्येयें, मोठमोठ्या विश्वव्यापी कल्पना होत्या. त्यांत तुझी चूक मुळींच नाहीं! पण - आणि त्यांना माझा नेहमीं होणारा विरोध पाहून पाहून, शेवटीं तूं माझा हात बाजूला ढकललास! - मला सोडून निघून गेलास!..हो ना?''

बाबांना गळा दाटल्यामुळें, पुढें थोडा वेळ बोलतां येईना! अरुणचे डोळे पाण्यानें तुडुंब भरले होते; पण त्याच्या तोंडांतून एक शब्दसुद्धां बाहेर फुटेना!

: ६८२ :

''मला थोडं वाईट वाटलं प्रथम!'' बाबा पुन्हा हळूंहळूं प्रयासानें बोलूं लागले, ''पण मग तुझ्याबद्दल अभिमानच वाटला शेवटीं. म्हटलं, पोरगा जरा हिंडून येऊं दे! तरी मनाची इतकी समजूत करूनहि मला नेहमीं वाटे, 'अरुण अजूनहि लहान आहे! - तो दुःखी झाला असेल, संकटांत असेल!' पण मी मग मनाला पुन्हा समजावलं, 'स्वतंत्रता शेवटी आपोआप कशी मर्यादित होते, तें तरी त्याला समजूं द्या! - तो केव्हांतरी, आपल्याला भेटल्याशिवाय राहणार नाही!' - ''आणि म्हणनूच, मी आपला मुग्धपणेंच, तुझ्या स्वंतत्र आयुष्याची कल्पना करीत व तुझ्याकडे अजूनहि लहान मुलाप्रमाणेंच काळजीनें पहात, दिवस काढीत होतो! - ''

थोडा वेळ श्वास घेऊन, बाबा पुन्हां पुढें बोलूं लागले ''माझे व्यवहार चालले नव्हतें कां?..सारे काहीं चालले होते! - पण तुझीं नेहमीं आठवण होई!..पुष्कळ वेळां दुःखी मनानें मी तसाच बसून राही! - चार दिवसांपूर्वी तू रस्त्यांत भेटलास! - पण बोलला नाहींस! - अतिशय दुःख झालं



माझ्या जिवाला!! - पण तरी मी म्हटलं, 'ती केवळ अरुणचीच चूक असं म्हणतां येत नाहीं! - मी असं काय अहित केलें आहे त्याचं? - केव्हां तरी त्याला आपल्या बाबांकडे यावंसं वाटेल! - ' आणि पहा! - आज तूं माझ्याकडे आलास!..मला किती बरं वाटलं म्हणतोस? - - ''

बाबांनीं अरुणच्या खांद्यावर एक हात टाकला व त्याला थोडें थोपटत क्षणभर आपल्याजवळ ओढलें.

अरुणला आतां अगदीं राहवेना. त्यानें त्यांना घट्ट मिठी मारली व तो ढसढसा रडूं लागला.

: ६८३ :

''हं!...वेड्या थांब!...'' बाबा त्याला लहान मुलासारखें थोपटीत म्हणाले, ''शांत हो पाहूं!...''

पण असें बोलत असतां, त्यांच्याहि डोळ्यातून ठिबकलेले दोन उष्ण अश्रू अरुणच्या डोक्यावर पडलेंच!...

''आज तूं तुझ्या स्वतंत्र कल्पनांना, मोठ्या ध्येयानां, वांव देण्याचा थोडा वेळ प्रयत्न करून, घरी परत आला आहेस! - '' पुन्हा आपल्या मनावर ताबा मिळवून, किंचित् खांकरून बाबा अरुणला म्हणाले, ''तुझी ध्येयें वाईट, कनिष्ठ असं मी म्हणत नाहीं, अरुण! - पण त्यांची प्रत्येक पावलाला किंमत करणारे तुला किती सांपडले रे जगांत?..मला माहीत नाहीं तुझा अनुभव! तें तुझं तूच पहा!..पण मला आपलं वाटतं ते सांगितलं! -

बाबा थोडा वेळ स्वस्थ पडले; आणि मग अरुणला म्हणाले, ''बाळ, मला आणखी थोडं पाणी दे प्यायला! - ''

''तुझ्या भोंवतालीं सगळीकडे अपेक्षा आहे. तुझीं सारी माणसें उपकारी आहेत. तुझ्याशीं तीं त्याच दृष्टीनें वागतात! - '' बाबांनी पाणी पिऊन अरुणकडे प्याला दिला व ते त्याच्याकडे पुन्हां वात्सल्यानें पहात बोलूं लागले, ''तूं चळवळींत पडण्यापूर्वी मला पत्रांत असंच कांहींसं लिहिलं होतंस!..मीहि एक त्याच अपेक्षापूर्ण उपकारी माणसांपैकीं, असं तुला त्यावेळीं वाटलं असेल! - कदाचित् अजूनहि वाटत असेल! - पण अरुण मला आतां तूंच सांग कोण नाही रे उपकारी जगांत?..कोण स्वार्थी नाहीं? - मी कांहीं कोणी मोठा देशभक्त नाहीं! - समाजसुधारक नाहीं! मी कबूल करतो, मी एक उघड उघड स्वार्थी संसारी माणूस आहे!.. माझी कक्षाहि अगदीं लहान!...माझं कुटुंब, माझीं माणसं, - माझी मुलं बाळं!..एवढंच! - आणि त्यांच्यासाठींच मी धडपड धडपड केली. याशिवाय मला देशसेवा ठाऊक नाहीं...समाजसेवा ठाऊक तरी तसं समाधान वाटतं आहे आज!...मग मला सांग त्या साऱ्यांकडून कांहींच कां रे अपेक्षा नसाव्यात मला,

अरुण? केवळ असल्या मला अगदी न्याय्य वाटणाऱ्या अपेक्षेनें मी जगत आलो! - म्हणूनच मीं घोर अपराधी ठरतो कां? सांग, तूंच याचा न्याय कर!''

: ६८४ :

बाबांना आतां अगदीं राहवेना. आतांपर्यंतचा सारा मनावरील ताबा जाऊन ते एकदम ढळढळा रडूं लागले! अरुणहि रडत रडत, त्यांच्या सांत्वनासाठी तळमळणाऱ्या हृदयानें म्हणाला, ''बाबा, थांबा, थांबा! तुम्हांला त्रास नाहीं कां होणार? तुम्ही अगदीं मुळींच बोलूं नका! - ''

''ऐक! - या वेळीं मी बोललो नाहीं, तर मला कधींच बोलतां येणार नाहीं! - बाबा पुन्हां मन आवरून एक मोठा सुस्कारा सोडून किंचित् खिन्न हंसून बोलूं लागले! - ''माझी कक्षा लहान करून मी सारी धडपड केली! तरी पण मला कितीसं सुख लाभलं? - एकत्र कुटुंबाची धूळधाण झाली! माझ्या समोर समोर त्याच्या ठिकऱ्या उडाल्या! - एकमेकांत द्वेष वाढला! माझ्या निःस्वार्थी धडपडीचं..माझ्या माणसांनांहि चीज वाटलं नाहीं!..आणि ज्याच्यावर मी मनापासून प्रेम केलं, ज्याच्यासाठी आयुष्यभर - कोत्या असतील कदाचित् पण अगदीं प्रांजळ अशा माझ्या समजुतींप्रमाणें मी धडपडलो, कष्ट केलें, तो माझा मुलगा! - मला उपकारी समजून, दुःखांत उडी घ्यायलाहि तो शेवटीं तयार झाला! - हं..! चाललं आहे. पण तरी मी धीर सोडला नव्हता! - मनाची तयारी करून, धडपड चालूंच ठेवली आतांपर्यंत! आणि आतां काय? म्हातारपण आलं - आमचे दिवस काय आतां संपलेच! - ''

बाबांना मनांतील उत्कट आवेगामुळें, थोडा वेळ पुढें कांहीं बोलतांच येईना!

अरुण अतिशय दुःखानें अश्रू ढाळीत होता. पण त्याला काय बोलावें, करावें, तेंच समजेना!-

: ६८५ :

''आतां माझं बोलणंहि संपलंच, अरुण!'' बाबा पुन्हां नवीन अवसान आणून म्हणाले ''पुन्हां कधीं सांगण्याची वेळ येईल न येईल!..तुला आजच सांगून टाकतो - ''

बाबा किंचित् काळ थांबून म्हणाले, ''अरुण, तुझ्यासाठीं आणि माझ्या इतर माणसांसाठी माझी सारी धडपड होती. तेव्हां आतां माझा आहे तो सगळा पैसा तुमचाच आहे. आणि तो तूं तरी चांगल्या मार्गानें वापरशील अशी मला खात्री आहे! - पण, तरी आपलं तुला सांगावसं वाटतं मला, माझा अनुभव हाच...अरुण!..ध्येयें माणसानें ठेवावींत. पण पैसा ही जगांत मोठी शक्ति आहे, बाळ! जगांत रहायचं तर माणसानं तो सारखा मिळवीत राहिलंच पाहिजे!..विश्वकुटुंब मी जाणतो! पण अरुण मी तरी तुला सांगेन - बाळ! ध्येयें हृदयाशीं ठेव! पण तुझी कक्षा प्रथम तूं लहान कर! - साऱ्या स्वार्थी जगांत तूं पण स्वार्थीच हो! मात्र सन्मार्गानेंच धडपड कर. तूं पैसा



मिळवलास, तरच तुझी किंमत जगांत वाढेल. आणि ती 'डिग्निटी' मिळवलीस, कीं मग तुझीं सारी मोठीं ध्येयें, आकांक्षा - त्यांच्या कारणीं मग खर्च केलास तरी कोण तुझा हात धरणारा आहे? - तुझा धर्म, तुझी कर्तव्यदक्षता,..प्रथम तुझी व्यक्ति, तुझीं मुलं - माणसं, तुझे कुटुंबीय नातलग,..अशीं हळूंहळूं वाढवलीस, तरच तुझा किंवा कोणाचाहि या व्यवहारी जगांत तरणोपाय आहे!..याहून निराळीं, असामान्य माणसं, हाताच्या बोटावर मोजण्याइतकींच असतात! - ''

: ६८६ :

बाबांना बराच वेळ बोलल्यामुळें श्वास लागत आहे, हें पाहून अरुण पुन्हां म्हणाला, ''बाबा, असं काय करतां? थांबा ना बोलायचं! - ''

''हो, थांबतोच आतां!'' बाबा हंसल्यासारखें करून, अरुणकडे वत्सल दृष्टीनें पहात म्हणाले, ''पण अरुण, केवळ वैभव हेंहि सुखाचं साधन नाहीं, याचाहि मला आतां पूर्ण अनुभव आला! - माझंच उदाहरण पहा ना! तें कशाला? ही जवळच खालीं झोंपली आहे, ती तुझी कमळामावशी पहा! पाठची बहीण..पोटची मुलगी - अशा कांहींशा भावनेनें तिच्यासाठीं थोडी फार धडपड केली! - आणि अगदीं कालकालपर्यंत, ती पूर्ण सुखी आहे. असंच मला वाटत होतं..पण अरुण - माझा तो सारा आभास ठरला..मला तिची संसारांतील मुग्ध कुचंबणा आतां शेवटीं समजते आहे! - ''

बाबासाहेब बोलतां बोलतां रडूं लागले; अरुणला तें दुःख आवरतां येईना. आणि तोहि रडूं लागला.

- कमळामावशी, आतांपर्यंत सारें पडल्या पडल्या, दुसऱ्या कुशीवर तोंड करून ऐकत होती. तिच्या डोळ्यांतूनहि सारखा अश्रूंचा पूर चालला होता.

पण शेवटचा आपला उल्लेख व आपल्यासाठींची बाबांच्या जिवाची त्या क्षणींची धडपड जाणून तिला स्वस्थ बसवेना! ती एकदम उठून बाबांकडे धांवत गेली व त्यांना म्हणाली, ''बाबाऽ! नका ना हो असं मनाला दुःख करीत राहूं!..''

तिला एकदम उठून आलेली पाहतांच, बाबांनाहि भावनावेग आवरेनात. ''पोरी, तूं जागीच आहेस कां अजून?'' असें कांहीं तरी तिला अडखळत म्हणत, त्यांनीं आपल्या अशक्त हातांनीं, तिला घट्ट मिठी मारली! -

बाबा, कमळामावशी व अरुण तिघंहि, थोडा वेळ असेच मनसोक्त अश्रु ढाळीत होतीं! -

: ६८७ :

नंतर बाबासाहेबांनीं मनावर ताबा मिळवून, कमळामावशीला बाजूला करीत म्हटलें, ''कमळे,

मला थोडं पाणी दे!''

कमळामावशीनें आणून दिलेले पाणी प्यायल्यावर, बाबांनीं तिच्याकडे व अरुणकडे आपले डोळे पुसून क्षीण हास्य करून पाहिलें व मग कांहींशा समाधानाचा एक दीर्घ सुस्कारा सोडून ते म्हणाले, ''हें पहा, मन मोकळं केल्यावर, आतां मला थोडं बरं वाटतं आहे! झोंप येईल तर पाहतो. तुम्हीहि जा पाहूं - जाऊन झोंपा!''

अरुणनें अश्रुभरित नेत्रांनीं बाबांकडे पाहिलें व तो कमळामावशीकडे पाहून जड शब्दांत म्हणाला ''बरं बाबा, जातो झोंपायला!''

बाबांच्या उशाचा तक्क्या नीट करून, बाबांची मच्छरदाणी सारखी लावल्यावर कमळामावशी व अरुण बाजूस सरले. बाबांनीं एकदां हास्यमुद्रेनें त्यांच्याकडे पाहिले व ते दुसऱ्या कुशीवर वळून समाधानानें एक लांब सुस्कारा सोडीत स्वस्थ पडले! -

: ६८८ :

अरुण लगबगीनें कोठें गेला ते पहावयास कमळामावशी ग्यालरीकडे गेलीं; तों अरुण कठड्याजवळ उभा राहिला होता व त्या रात्री शांत वेळच्या, अगदीं निर्जन सामसूम रस्त्याकडे लागलेल्या, त्याच्या शून्य डोळ्यांतून हळूंहळूं अश्रू वहात होते!...

कमळामावशीनें हळूंच त्याच्या पाठीवर हात ठेवला व ती मुग्धपणेंच त्याच्या जवळ जाऊन उभी राहिली. तिचेहि डोळे अश्रूंनीं तुडुंब भरून आले होते!

थोडा वेळ तेथें तशीच शांतता पसरली होती. शेवटी कमळामावशीकडे वळून अरुण हळूंच कुजबुजला, ''मावशी, बाबांना फार त्रास झाला असेल, सारखं बोलून बोलून!..डॉक्टरला आणूं या कां?''

मावशी थोडा वेळ विचार करीत गप्प उभी राहिली व नंतर अडखळता म्हणाली, ''हो, खरंच आणला तर बरं होईल. वसंताला सांगूं या, चल!'' -

अरुणनें मान हलविली व ती दोघेंहि जिन्यानें हळूंच खालीं उतरून, हॉलमध्यें शिरलीं! -

: ६८९ :

सारीं झोपली होतीं!..पण जानकीकाकू, एका कोपऱ्यांत सुनीतीजवळ जमिनीवरच पडली होती. तिची या कुशीवरून त्या कुशीवर सारखी चुळबूळ चालली होती. दोघांना वरून आलेले पाहतांच, ती पटकन् उठून, हळूच कुजबुजली, ''काय ग कमळे?..झोंप लागली आहे ना? - ''

''हो'' कमळामावशी तिच्याकडे जाऊन खिन्नपणें व दुःखानें म्हणाली. अरुणनें सगळीकडे पाहिलें -



अरविंदच्या जवळच, वसंत एका कुशीवर झोंपला होता; आणि त्याच्याजवळ भाऊ पाय पोटाजवळ घेऊन हळूंहळूं घोरत पडले होते. वसंत व अरविंद यांच्यामध्ये गाढ झोंपलेल्या शरदकडे पाहून, अरुणनें अगदीं आपुलकीचा, पण खिन्न, दुःखी दृष्टिक्षेप टाकला! - आपल्या जड हृदयाला शांतविण्यासाठीं एक सुस्कारा टाकून, तो हळूंच वसंताजवळ गेला व त्याला उठविण्यासाठीं खालीं वांकला.

वसंत थोडा फार जागाच होता. अरुण खालीं वांकताना त्याच्या हाताच्या लागलेल्या ओझरत्या धक्क्यानें तो एकदम जागा झाला; आणि उठून बसून कुजबुजत म्हणाला, ''काय रे, अरुण?..''

अरुणनें त्याला बाहेर येण्यास खुणावलें.

ते दोघेही अरविंदजवळ गेले व त्याला हळूंच हलवून वसंत म्हणाला, ''अरविंद, उठ पाहूं - जरा डॉक्टर गोडबोल्यांना आणतोस कां?''

अरविंद एकदम धडपडून उठून, त्या दोघांकडे पाहून म्हणाला, ''कां रे?.. बाबांची प्रकृति बरोबर नाहीं?..

ते तिघेहि पुन्हा गॅलरींत जाऊन थोडा वेळ कुजबुजत होते.

इतक्यांत, वसंताला मोठ्यानें खोकला आला. त्यानें लागलीच तो आतल्याआंत दाबला.

पण तेवढ्यांतच बाबांच्या खोलींतून आवाज आला, ''कोण? - वसंत कां रे?..हं काय माझ्यासाठी डॉक्टर आणण्याच्या गोष्टी चालल्या आहेत कीं काय तुमच्या?''

: ६९० :

तिघेहि चपापले. पण अरविंदाला जाण्याची खूण करून, वसंत बाबांच्या खोलीजवळ जात त्यांना म्हणाला, ''काय बाबा? आलो!...''

त्या अंधुक प्रकाशांत दिसत असलेल्या वसंताकडे, बाबा मच्छरदाणीच्या आंतूनच पहात म्हणाले, ''अरे वेड्यांनो, झोंपा आतां! - माझं म्हाताऱ्या माणसाचं असंच चालायचं आतां! - मला रे कशाला डॉक्टर? अंऽ? आतांपर्यंत काय कमी झाले? - ''

''हो!''...वसंत पुढलें सारें टाळण्यासाठीं, लागलींच पुढें म्हणाला, ''झोपा तुम्ही बाबा आतां!..''

''थांब थांब!..''बाबा हंसल्यासारखें करून म्हणाले, ''केलंस कां सारं सांगितल्याप्रमाणं? छोटालाल भेटला ना शेअरबाजारांत?..आणि रक्कम भरलीस बँकेंत?''

''हो!'' वसंताला दुपारचा प्रकार आठवल्यामुळें तो चपापला होता. पण तो विषय तेथेंच संपविण्यासाठीं, तो एकदम म्हणाला, ''सारं कांहीं केलं व्यवस्थित!''

‘‘हं!’’ असा बाबांचा स्वर ऐकून त्याला हायसें वाटलें; आणि तो परत फिरणार तोंच बाबा स्पष्टपणें पुढें म्हणाले, ‘‘चारपांचशे रुपये तरी कमी आले असतील, नाहीं रे? काल सकाळीं टाइम्समध्यें आपल्या शेअर्सचा भाव एक रुपयानें पडल्याचं वाचलं होतं मी!...बरं बरं! - चला असं चालायचंच! - जा तूं झोंप येते कां पहातो मी! - ’’

वसंत केवढ्यानें दचकला! - त्याची आतांपर्यंतची सारी लपवाछपवी फुकट गेली होती.

ग्यालरींतून तें सारें ऐकतां ऐकतां, डोळ्याचें अश्रू पुसत, अरुण स्वतःशीं पुटपुटला, ‘‘बाबा बाबाऽ! तुमच्या जीवाच्या या धडपडी, शेवटपर्यंत चालणारच कां हो? - ’’

: ६९१ :

बाबांचा मृत्यु! - अरुणला तें खरेंच वाटेना! - त्याक्षणीं तरी त्याचें मन त्या प्रसंगाला मुळींच तयार नव्हतें!

रात्रीच्या जाग्रणामुळें, अरुण थोडी डुलकी घेण्यासाठी पडला होता! - तोच बाबांच्या खोलींत कमळामावशीच्या हुंदक्याचा आवाज त्यानें ऐकला! - तो दचकून उठला व तिकडे धांवूं लागला -

: ६९२ :

रात्रीच्या साऱ्या प्रसंगांनंतर, बाबा थोडे उशीरपर्यंतच झोंपले होते. डॉक्टर येऊन गेल्यावर, ‘नको नको’ म्हणूनहि सारे प्रतिर्विधि त्यांनी उत्साहानें आटोपले. काठ्याकडून अंगाला तेल लावून, गरम पाण्यानें आंघोळ केली - आणि त्यानंतर किती तरी वेळ, बाबांची देवपूजा चालली होती! -

कालच्या कामासाठीं, वसंताला मुंबईस लौकर बँकेंत जावयाचें होतें; म्हणून बाबांनीं मुरारीला साऱ्यांचींच जेवणें लौकर करावयास सांगितलें. जेवण तयार झाल्यावर, बाबा, भाऊ, वसंत, अरविंद, अरुण, शरद् एका पंक्तींत बसले. बाबांनीं आग्रहानें, कमळामावशी, सुनीति यांनाहि समोर पाट ठेवावयास लावले. - आणि मग किती वेळ, इकडच्या तिकडच्या घरगुती गप्पा मारीत, सर्व मंडळी शांतपणें जेवत होतीं.

त्या वेळीं साऱ्यांना वाटत होतें, ‘बऱ्याच दिवसांनी अरुण भेटल्यामुळें, बाबांना आता आजपासून भरभर बरं वाटणार! - त्यांची प्रकृति सुधारणार! - ’

: ६९३ :

साऱ्यांची जेवणें झाल्यावर, वसंत मुंबईस निघून गेला. बाबा आपल्या खोलींत गेले; आणि तासभरानें, अरुण, शरद् व काकू यांना त्यांनीं बोलावून घेतलें. थोडा वेळ, त्यांच्याबरोबर ते कांहीं प्रेमळपणें बोलत होते.



त्यानंतर बाबा वामकुक्षी घेण्यास बिछान्यावर पडले;..आणि त्यांना झोंप लागली असें पाहून, अरुण बाहेर आला होता! -

पण थोडा वेळ, पडल्यापडल्या अरुण डुलकी घेतो न घेतो, तोंच त्याला बाबांच्या खोलींतून कमळामावशीचा तो हुंदका ऐकूं आला;..आणि तो दचकून जागा झाला -

धांवत धांवत आंत जाऊन त्यानें पाहिलें; बाबांच्या बिछान्यावर बसून, कमळामावशी अश्रुपूर्ण व घाबरल्या नजरेनें, आतं येणाऱ्या अरुणकडे पहात, त्याला अडखळत्या शब्दांत म्हणत होती, ‘‘अरुण! बाळ! आपले बाबा आपल्याला सोडून गेले रे ऽऽ’’

: ६९४ :

अगदीं धडधडत्या अंतःकरणानें, अरुणनें बिछान्याजवळ जाऊन पाहिलें! - बाबा अगदीं शांत पडले होते. त्यांचा चेहरा जास्तच तेजस्वी दिसत होता; तोंडावर सौम्य हास्य झळकत होतें; आणि त्या उघड्या भरलेल्या डोळ्यांत वात्सल्य, प्रेम..सारे उच्च भाव तरंगत होते! -

प्रथम अरुणला खरेंच वाटेना!..पण बाबांचे ते निश्चल कलेवर पाहून, अरुणचें हृदय अगदीं विविध भावनांनी एकदम हेलावलें! - ‘‘बाबाऽबाऽबा!’’ - असें हळूंच पुटपुटत तो त्यांच्याजवळ वांकला; आणि त्यांच्या छातीवर आपलें डोकें टेकून, थोडा वेळ डोळे मिटून, तो तसाच स्वस्थ पडून राहिला! -

बाबांचा थंडगार स्पर्श होऊन, आपलीहि सारी गात्रें बधिर झाल्यासारखें अरुणला क्षणभर वाटलें! दुःख असह्य होत होतें! - पण त्याला रडूं मात्र फुटेना! -

: ६९५ :

थोड्या वेळानें, पाठीवर पडलेल्या, कमळामावशीच्या हाताचा रसरसलेला स्पर्श होतांच, अरुणनें दचकून आपलें डोकें वर उचललें; आणि तो तसल्याच भारावलेल्या मनानें व कोरड्या ओढलेल्या डोळ्यांनीं मावशीच्या अश्रुभरित नेत्रांकडे पाहूं लागला! -

कमळामावशी, त्याच्या पाठीवरील आपला हात तसाच ठेवून, आपल्या डोळ्यांतून ठिबकणारे अश्रु तसेच वाहूं देत होती; त्याच्याकडे पाहून, अडखळत अडखळत, अस्पष्ट शब्दांत ती शेवटीं म्हणाली, ‘‘बाबा झोंपले म्हणून तूं निघून गेल्यावर, ते तसेच निश्चल पडून राहिले! - ‘‘कमळेऽ!’ म्हणून कांहीं वेळानें त्यांनी हांक मारली; म्हणून मी पुढें आले. आणि त्यांच्याजवळ येऊन बसले.’’

आवंढा गिळावयास किंचित् थांबून, मग कमळामावशी पुन्हा पुढें म्हणाली, ‘‘थोडा वेळ, तशाच खोल गेलेल्या आवाजांत, बाबा माझ्या संसाराची चौकशी करीत होते - शेवटी, आपल्या

थरथरत्या हातांत, त्यांनी प्रेमानें माझा हात घेतला; आणि ते मला कांहीं सांगावें म्हणून घसा साफ करण्यासाठीं खांकरले!.. पण मग ते काहींच बोलले नाहीत! - क्षणभर माझ्याकडे हायस्यमुद्रेने पहातां पहातां - ''

बोलतां बोलतां कमळामावशी एकदम थांबली; कांहीं केल्यां तिला आलेला हुंदका आवरेना!-

बाबांच्या बिछान्यावर, कमळामावशीशेजारी अरुण अगदी सुन्न मनानें बसला. दोघांकडे बाबा तसे वत्सलतेनें पहात आहेत अशा नजरेनें, त्यानें एकदा त्यांच्याकडे एकाग्रतेने पाहिलें! - आणि हुंदके देत असलेल्या कमळामावशीजवळ सरकून, त्यानें तिच्या खांद्यावर आपली मान टाकीत एक दीर्घ सुस्कारा सोडला! -

: ६९६ :

काकू, शरद्, सुनीति, भाऊ अरविंद सारी मंडळी, तोंपर्यंत लगबगीनें तेथे येऊन पोहोंचली होती! -

खोलींतील दृश्य पहातांच, आलेला प्रसंग जाणून, सारीं ओक्साबोक्शीं रडूं लागलीं! -

सुनीति - शरद्, आपल्या मातेच्या पदरांत दुःखानें तोंड लपवून, रडत होतीं! तीहि पतिवियोगाच्या दुःखानें हुंदके देत होती! -

आर्द्र झालेले आपले डोळे, सदऱ्याच्या बाहीनें हळूंच पुसत, अरविंद दारांतच उभा होता.

भाऊंना तें करूण शोकमय वातावरण पाहून उंचबळून येत होतें! - त्यांच्या डोळ्यांत अश्रु सांचत होते. ओठ थरथरूं लागले होते!..पण मोठ्या प्रयासानें त्यांनीं आपल्या धोतराच्या सोग्यानें नाकडोळे पुसले, तसेंच मुसमुसत काकूंकडे वळले; आणि रडत रडतच त्यांना समजावण्यासाठीं, अडखळत सांगूं लागले, ''असं काय? - ऐका...ऐका! - रडूं नका...आतां शरद् - अरुणांकडे पहा!''

त्यांना समजवतांना, भाऊंच्या स्वतःच्याच जिवाची चालेली ती हतबल धडपड पाहून, मनाचा एकदा निग्रह करून, अरुण बाबांजवळून उठला आणि त्या साऱ्यांना हातानें धरून, तो हळूंहळूं त्या खोलीबाहेर मुग्धपणेंच आला.

'अरुणदादाऽ!' असें म्हणत, त्याचीं भावडें त्याला दुःखानें बिलगली. त्यांची माता अरुणजवळ उभी राहून हुंदके देऊं लागली.

त्या साऱ्या पितृविहीन झालेल्या बाळांचे सांत्वन करावें, असें थोड्या अंतरावर उभ्या असलेल्या भाऊंना, मनांतून फार वाटत होतें! - पण सभोंवार तीव्र दुःख पाहून, तेच उलट स्वतःला झालेलें दुःख अश्रुंवाटें बाहेर सोडीत बेभानपणे, एका बाजूला जाऊन उभे राहिले! -



: ६९७ :

कमळामावशी अजूनहि जागची हलली नव्हती. ती दुःखानें एकटीच सारखें स्फुंदत आहे, असें पाहून, इतका वेळ खिन्न चेहऱ्यानें लांब उभा असलेला अरविंद पुढें झाला. आणि तिच्याजवळ जाऊन, सहानुभूतीनें अगदी हळुवार शब्दांत तिला म्हणाला, ''वहिनीऽ, वहिनीऽ, वेड्या आहांत कां? - हें काय बरं? - तुम्हीच असं करूं लागलांत तर आतां साऱ्यांची समजूत तरी कोणी घालायची? - '' कमळामावशीला हातानें धरून उठून, अरविंदनें तिला अरुण वगैरे मंडळीं जवळ आणून सोडलें! तो स्वतः मात्र, दाराजवळ उभा राहून, बाबांच्या शवाकडे, लांबून एकसारखा एकाग्रतेनें पहात होता! -

: ६९८ :

नंतर त्यानें अरुणला जवळ बोलावलें; तो उठून आल्यावर अरविंद हळूंच त्याला म्हणाला, ''अरुण, आतां आपल्याला मन घट्ट करणं भाग आहे. मी वसंताला दोनतीन ठिकाणीं फोन करतो! - पुढल्या तयारीला लागलींच लागलेंच पाहिजे आपल्याला, दुःख बाजूला सारून! - ''

- आपल्या त्या जिवलग स्नेह्याच्या खांद्यावर, अरुणनें आपला जड हात हतबलपणें टाकला; आणि त्याच्या अंगावर रेलत तो म्हणाला - ''हो.''

- तसेंच पुढें जाऊन, बाबांजवळच अरविंदशेजारीं, अरुण थोडा वेळ उभा होता! - बाबांच्या निश्चल देहाकडे, पुतळ्याप्रमाणें निश्चल नजरेनें पहात, तो जागच्याजागी थबकला! -

- दुःखानें आपले हृदय तुडुंब भरून आल्यासारखें त्याला वाटलें! - पण हुंदकाहि फुटेना - कीं त्याच्या डोळ्यांतून अश्रूहि ठिबकेनात! -

: ६९९ :

''हं - चला निघूं या!'' असें कोणीसें म्हणालें. अरुणनें मनाचा अगदीं धीर केला; माडीवरील साऱ्यांची रडारड, अगदीं कठोर मनानें त्यानें कानाआड केली आणि सांगितल्याप्रमाणें, विस्तवाचें मडकें हातीं घेऊन, तो निमूटपणें चालूं लागला! -

भाऊ, वसंत, अरविंद, पांडोबा, विठोबाअण्णा, शंकरकाका व बाबांची इतर कांहीं मोठमोठी अंमलदार मित्रमंडळी मागाहून येत होती! - पण अरुणला वाटत होतें, आपल्या बाबांबरोबर आपण अगदीं एकटेच वाटचाल करीत आहों! - बाबा आपल्याशीं अगदीं मोकळ्या मनानें गप्पा करीत आहेत आणि त्यामुळेंच, बाबांचें आधल्या रात्रींचे ओतप्रोत प्रेम भरलेले शेवटचे शब्द, त्याच्या मनांत पुन्हां पुन्हां घुमूं लागलें! -

पण त्यानें त्याच वेड्या आशेनें मागें वळून पाहिलें, तो बाबा अगदीं निश्चलपणें पडले होते! -

आणि त्यांना घेऊन मंडळी हळूंहळूं मागून येत होतीं? -

: ७०० :

यादवी विसरून, याप्रसंगी तरी वसंताच्या बोलवण्यानें आपले सारे भाऊबंद जमले, याचें अरुणला किंचित् आश्चर्य वाटत होतें. आपल्या मनांत अव्याहत असलेली स्वार्थी तेढ विसरून, ही मंडळी आज जमली! - त्यामागें दांभिक शिष्टाचार असो, कांहीं असो - पण अरुणला ती घटना थोडी समाधानकारकच वाटली शेवटीं!..

आणि घरांत? - काकूंची नेहमींची कठोरता, आज कोठें पळाली होती! - मुरारीसारखा साधा स्वयंपाकी - ''अरुणदादाऽ, माझं छत्र गेलं! - आतां बाबा मला रागावायालाहि परत येणार नाहींत! - '' असले शब्द काढून, तो म्हातारा अरुणजवळ हंबरडा फोडीत होता. - शेवटच्या जमवाजमवीची काठ्या डोळे पुसतपुसत धडपड करीत होता! - कां? -

हीं सारीं दृश्यें पुढें उभीं राहून, अरुणला वाटलें, ''बाबांची योग्यताच तशी थोर! - हीं सारीं कोणाचीं कोण? - पण त्यांनाहि साऱ्यांना आपल्या बाबांचा प्रेमळ सहवास पुष्कळ घडला! - आणि आपले ते प्रत्यक्ष वडील! - पण आपण मात्र, त्यांना सोडून, दूर...दूर...निघून गेलों!..आणि आपल्याच मृगजलामागें लागून, शेवटीं शेवटीं तर त्यांना आपण बहुतेक जास्त जास्तच दुःखी केलें! पण इतकं असूनहि,..तसं पाहिलं, तर बाबांचं आपल्याविषयींचं दयाशील वत्सल प्रेम, आपल्यासाठींची त्यांच्या आयुष्याची जागरूक धडपड,...शेवटपर्यंत सारं तसंच चालूं होतं! - ''

: ७०१ :

तो घरीं परतल्यावरचें, बाबांनीं स्वतःचें दुःख आवरून केलेलें त्याचें स्वागत, त्यानंतरचे सारे लहानमोठे प्रसंग, रात्रीच्या गंभीर शांततेंतील बाबांच्या मनमोकळ्या बोलण्यांमधील प्रत्येक शब्द,..सारें जणूं प्रत्यक्ष आपल्यापुढें पुन्हा घडतच आहे, असें क्षणभर अरुणला वाटलें! -

बाबांच्या या अचानक वियोगानें, अरुणचें दुःख अगदीं अनावर होत होतें! त्याला वाटलें, यावेळीं आपल्याला मोठा हुंदका येईल, डोळ्यांतून मनसोक्त अश्रू ओघळतील..तर मनाला थोडें तरी समाधान लाभेल; पण तसें कांहींच होईना! -

त्यानें असल्याच भणाणलेल्या डोक्यानें, व आंतल्याआंत धुमसत असलेल्या हृदयानें त्रस्त होऊन चालतां चालतां, मधूनच मागें वळून, बाबांच्या ताटीवरील कलेवराकडे पाहिलें! -

: ७०२ :

नऊ वाजून गेले होते! भोंवतीं काळोख पसरला होता! - तितकाच तो त्याच्या हृदयांतहि कोंदाटला होता! - केवळ मनाचा समाधानासाठीं, मागें वळून त्यानें बाबांकडे पुन्हां दृष्टि फिरविली!



ते जणूं, त्याच्याकडे वत्सल नजरेनें हंसून पहातां पहातां, एकदम झोंपले आहेत, असाच अरुणला क्षणभर भास झाला! -

थोड्याच वेळापूर्वी, त्यानें आपल्या हातानें बाबांना शेवटीची आंघोळ घातली होती! - त्यावेळीं, त्यांना आपल्या अश्रूंचीच आंघोळ घालावी, असें अरुणला वाटलें! - ज्यांनीं साऱ्या आयुष्यभर, अरुणला प्रेमाचें अखंड पांघरूण घालून, आपण स्वतः मात्र जुन्यासुन्या कपड्यांतच स्वतःचें समाधान मानलें होतें; त्याच बाबांना, बाजारांतून आणलेलें नवीन कापड फाडून पांघरतांना, अरुणचा हात थरथर कांपत होता - !

ज्या जिन्याच्या बांधकामाच्या वेळीं, अरुण - बाबांचा छोटासा झगडा झाला होता, ते त्याच्यावर रागावले होते - त्याच जिन्याजवळून, लोक बाबांना उचलूं लागतांना, त्या निश्चल स्थितींतहि, तितक्याच वत्सलतेच्या सौम्य हास्यानें बाबा आपल्याकडे स्थिरदृष्टीनें पहात आहेत, असें अरुणला वाटून, त्याचें हृदय पिळवटून आलें होतें! -

आणि आतां - तें पुन्हां दिसणार नाहीत अशा ठिकाणीं - बाबांना आपण घेऊन जात आहों, याची जाणीव होऊन, अरुणनें आपल्या एका हातांतील विस्तवाचे मडके तसेंच घट्ट धरलें; व दुसरा हात दुःखानें कोंदाटलेल्या आपल्या छातीवर ठेवला! -

: ७०३ :

स्मशानांत आल्यावर, भटजी कांहीं तरी सांगत होता, बडबडत होता! - अरुणचें मात्र तिकडे लक्षच नव्हतें; - तो यांत्रिकपणें सारें करीत होता एवढेंच -

आपल्या लहानपणीं, अगदी गजबजलेलें दिसणारें सारें एकत्र कुटुंब...आणि सुरकुतलेल्या चेहऱ्याची त्याची म्हातारी आजी..त्याला दिसूं लागली!..

आजी..नाना..दादा..त्याच्यापुढें येऊन गेले! - आणि आतां त्याचे बाबाच प्रत्यक्ष चालले होते! -

त्याला वाटलें, जुनी कष्टाळू, प्रेमळ पिढी चालली दृष्टिआड! - एकत्र कुटुंब साफ विसकटलें..अगदीं विरल झालें!..मुग्ध प्रेमाच्या व मुग्ध त्यागाच्या जोरावर बळकट झालेल्या, त्या एका मोठ्या थोरल्या बळकट सुवर्णशृंखलेचा, आणखी एक मोठा महत्त्वाचा दुवा तटकन् तुटून पडला! -

आणि आतां आमची आसनारूढ झालेली ही नवी पिढी! - ती त्याला दूर दूर सरकलेलीच दिसत होती! - पांडोबा, विठोबाअण्णा यांच्यासारखे तिचे घटक! - स्वतःपुरता परीस शोधणारे ते स्वस्वनिष्ठ लोखंडाचे तुकडे! -

पण सारी कौटुंबिक शृंखला सोन्याची करूं पाहणारे व शकणारे, परिसाचे गुण अंगीं असलेले

बाबा! - तेच पहातां पहातां आज चालले! -

त्यामुळेंच, भटजीच्या त्या निर्जीव मंत्रांपेक्षा, बाबांच्या आयुष्याचे मंत्र, त्यांचे सारेंच आयुष्य, अरुणला आठवत होतें! -

: ७०४ :

''हं! - चल अरुण! - दुःख करून काय होणार? - '' पांडोबा, विठोबा - अण्णा वगैरे जाणत्या मंडळींनी, चार खुंटांवर सरणाचा माच रचला होता; आणि अरुणजवळ ते त्याला गंभीर इशाऱ्याचे शब्द उचारीत होते! ते ऐकतांच, तो दचकून भानावर आला! -

त्याचें ते शब्द, सहजच आले असतील कदाचित्! - दुःख करून कांहीं होणार नाहीं, हें अरुणलाहि समजत होतें; - पण आपल्या त्रस्त मनानें, तो थोड्या रागांतच म्हणाला, 'थांऽबा! थांबाऽऽ! - मला पांच मिनिटं तरी विसावा घेऊं द्या!''

पण, तेवढ्यांत अरविंद - वसंत यांनीं, त्याचें सान्त्वन केल्यामुळें, त्याला किंचित् बरे वाटलें;..आणि कांहीं वेळानें अरुण नवा धीर करून म्हणाला, - ''हं, आतां मी तयार आहे! काय करू म्हणतां? - ''

बाबांना ताटीवरून खाली घेतलें होतें -

अरुण त्यांच्याजवळ गेला; आणि क्षणभर आपली शून्य दृष्टि त्यांच्या शवाकडे लावून अगदीं दुःखी अंतःकरणानें जवळच्या मंडळीकडे पहात, तो पुन्हा म्हणाला, ''काय करूं म्हणतां मी?..''

''बाबांच्या अंगावरचे सारे कपडे काढून घ्यायला पाहिजेत, अरुण!'' कोणीसें त्याला सुचविलें.

''काऽऽय? - साऽरे ऽऽ?...''एकदम दचकून, गांगरलेल्या स्वरांत, अरुण भरभर पुढें म्हणाला, ''नको, नको!...राहूंद्यात ना!...माझं ऐका!..असं नका कांहीं करूं!''

''पण तशी नेहमीची चाल - नियम आहे, अरुण!'' पांडोबांनीं आपल्या नेहमींच्या निर्विकार चेहऱ्यानें पहात त्याला सुचविलें.

''चाल? कसली चाल? - आणि ती मोडली तर काय झालं?'' हा विचार अरुणच्या दुःखानें गांजलेल्या मनांत आला. पण थोडा वेळ तसाच सुन्नपणें गप्प उभा राहिला. जवळ उभ्या असलेल्या, वसंत, अरविंद वगैरे साऱ्यांकडे, त्यानें एकदां आपली हतबल खिन्न प्रश्नार्थक दृष्टि वळविली!...

..पण तेहि सारे, 'तें करावं लागतं!' अशा उत्तराच्या दृष्टीनेंच त्याच्याकडे पहात होते!..

तेव्हां शेवटीं, अरुणनें मनाचा धडा केला! - तो खालीं वांकला, आणि बाबांच्या अंगावरील सारीं वस्त्रें आपल्या थरथरत्या हातांनी बाजूस करूं लागला! -

त्याला वाटलें, ''आपलं हृदय आतां मात्र फुटतंय!'' -



: ७०५ :

'' - हं - आतां त्यांना नेऊन सरणावर ठेवायचं! - '' पुन्हां कोणीसा वृद्ध मनुष्य म्हणाला! - तें ऐकून, जड अंतःकरणानें, अरुण पुन्हा यांत्रिकपणें खालीं वांकला - आणि बाबांना उचलण्यासाठीं त्यानें आपला हात पुढे केला! -

- पण, आतां मात्र, अरुणला राहवेना! - बाबांना तसें विवस्त्र उचलून नेतांना, वत्सल हास्यानें तेजस्वी दिसणाऱ्या त्यांच्या त्या चेहऱ्याकडे पहातां पहातां, अरुणचें हृदय उचंबळून आलें! - इतका वेळ आंतल्या आंत धुमसत असलेला त्याचा दुःखाग्नि एकदम भडकला!..त्याला जोराचा हुंदका आला!..आणि त्याच्या डोळ्यांतून ओघळणारे उष्ण अश्रू बाबांच्या निश्चल थंडगार अंगावर टपटप पडूं लागले!..

शेवटीं, अरुणला दुःखावेग सहनच होईना; आणि तो मोठ्यानें ओक्साबोक्शी रडत, पण अडखळत अडखळत हळूंच म्हणाला, ''बाबाऽ - बाऽबाऽऽ! - साऱ्या आयुष्यभर साऱ्यांसाठी धडपड केलीत! - पण आतां जातांना इतका साधासुधा सुद्धा स्वार्थ, नाहीं कां हो तुम्हाला? - नुसते अंगावरचे कपडे देखील नकोत ना तुम्हाला? - ''

: ७०६ :

बाबांच्या, उघड्या अंगाला लांकडे बोंचतील, म्हणून अरुणनें अत्यंत हलक्या हातानेंच, रडत रडत त्यांना सरणावर ठेवलें! -

त्यावेळच्या कल्लोळ करणाऱ्या साऱ्या भावनांच्या कोंडमाऱ्यामुळें, दुःख अगदी असह्य होऊन, त्यानें जवळच बसकण मारली! - आणि तसाच सुन्न अंतःकरणानें तो तेथें बसून कांहीं वेळ, आपल्या हृदयाचे पाट अगदी मोकळे वाहूं देत होता! -

''सारी तयारी झाली, हं, अरुण! - अग्नि घे आतां हातांत! - '' असे शब्द कानावर पडतांच, तो पुन्हा धीर आणून जागेवरून उठला; आणि जड अंतःकरणानें त्यानें प्रथम चितेवर अग्नि ठेवला.

अरुणच्या अगदीं डोळ्यादेखत - कालच त्याच्याबरोबर प्रेमानें गद्गदित स्वरानें बोलत असलेल्या त्याच्या प्रिय बाबांची चिता चोहूबाजूनें भडकली! -

: ७०७ :

इतक्या लौकर लौकर, हे सारेच प्रसंग आपल्याला सामोरे येणार आहेत, अशी अरुणला कल्पनादेखील नव्हती! - क्षणभर त्याला वाटलें, ''हें एक लांबच लांब स्वप्न आपल्याला पडत आहे! - आणि वेड्यासारखें त्यांतच दुःखानें गुंगून, आपण हे सारे प्रसंग उगीच खरे धरून चालत

आहों!..यांतील कांहीच खरं नाहीं - ''

त्यानें अंगाला चिमटा घेतला; सभोंवार पाहिलें - तों..सारं सारं खरं! - अरविंद, वसंत यांच्याजवळच तो बसला होता. कोणीच कांहीं बोलत नव्हतें. समोर भडकलेल्या चितेचा मंद सळसळाट ऐकूं येत होता! - दादरचा गंभीर समुद्र लांबवर खळखळत होता! -

अरुणच्या डोळ्यांतून अश्रू ठिबकत होते! बधिर अंतःकरणानें तो बाबांच्या चितेकडे कितीतरी वेळ तसाच पहात होता! -

: ७०८ :

इतक्यांत, कसलासा मोठा आवाज झाला! आणि अरुण दचकून भानावर आला!

त्याच्यापासून जरा लांब अंतरावर बसलेल्या, स्मशानयात्रेसाठीं आलेल्या घोळक्यांतील, कोणीसा वृद्ध कपि, असले प्रसंग नेहमीं नेहमीं पाहून बोथट झालेल्या भावनांनीं एकदम म्हणाला, ''अरेऽ, कवटी बरीच लौकर फुटली हं! - आतां सांगा मृताच्या मुलाला पाणी फिरवायला! - ''

मध्यें दोन मिनिटें गेलीं! - आणि मग अरुणनें आपल्या थरथरत्या हातांनीं मंतरलेल्या पाण्याचें मडकें उचललें! - त्याला खालीं फोडतांना, आपलें हृदयच कोणी फोडीत आहे, असें अरुणला वाटलें! - मंदमंद पावलें टाकीत, तो बाबांच्या रसरसणाऱ्या चितेजवळ गेला! -

आणि त्याला सांगितल्याप्रमाणें, त्यानें डोळ्यांतील अश्रू आणि खांद्यावरील मडक्यांतील पाणी गाळत गाळत, बाबांभोंवतीं हळू हळू शेवटच्या तीन प्रदक्षिणा घातल्या! शेवटी - बाबांच्या पायाजवळ, दक्षिणेस येऊन, क्षणभर जणूं त्यांच्या जीवन - ज्योतीकडे पहात सुन्न उभें राहून, पण अत्यंत आदरप्रेमानें, त्यानें तें मडकें खांद्यावरून मागें सोडलें -

खाटकन् आवाज झाला! - धरणीमातेनें मडकें आपल्याकडे ओढलें! - मडक्यांतील पाणी सांडून गेलें होतें! मडक्याच्याहि ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या होत्या!..

मातीजवळ माती पडली होती!! -

बाबांच्या पेटत्या चितेकडे टक लावून पहात, अरुण समोर उभा राहिला! -

त्याच्या डोळ्यांतून सारखे अश्रू वहात होते! -

आणि त्या अश्रूंचा उगम, त्याच्या हृदयांतील उत्कट कोमल भावनांत होता!! -

: ७०९ :

इतक्यांत, पांडोबाचा आवाज ऐकूं आला, ''अरुण, चल पाहूं आतां! - ''त्यांच्याकडे एकदां पाहिल्यासारखें करून, अरुण पुन्हां समोरचे दृश्य भरल्या डोळ्यानें, डोळे भरून पाहूं लागला! -

'निघावें' म्हणून तेथून त्यानें पावलें उचललीं! - पण चार पावलें चालतांच, तो पुन्हा थबकला



- व वळून त्यानें पुन्हां तिकडे दृष्टि वळवली! -

- बाबांच्या चितेची झळ अजूनहि अरुणला भासत होती! - तींतून निघणाऱ्या त्या लळलळणाऱ्या ज्वाला,...काळ्या निळ्या धुराचे लोळ - चकूकन् चमकून जाणारीं असंख्य किटाळें - आकाशांत वरवर जात होतीं! -

अरुणच्या मनांत कल्लोळ उठविणारे, ते धुराचे लोळ पहातां पहातां, त्याला वाटलें, ''बाबांच्या चितेंतून उडणारी हीं किटाळें,..म्हणजेच वरच्या तारका! - वरलीं बाष्पबिंदू धारण करणारीं अभ्रपटलें - येथूनच तिथें चाललीं आहेत! - या साऱ्याच काळोखांत,..या ज्वाळांचाच तेवढा प्रकाश पडत आहे! - ''

: ७१० :

तसें पहातां पहातां, आणि वेड्यासारख्या कल्पना करतां करतां, त्याला एक मोठा अनावर हुंदका आला! - टपटप पडणारे अश्रू, आपल्या धोतराच्या सोग्यानें हळूंच पुसत, अरुण आपल्याशींच अडखळत अडखळत म्हणाला, '' - बाबाऽ! - घेऊं ना आतां तुमचा निरोप? - मला या क्षणीं काय वाटतं आहे? - माझे हे शब्द तुम्हाला ऐकूं जातील कां? - तुम्ही केव्हांच परतणार नाहीं कां आतां? मग मी हें सारं सांगू तरी कोणाला? - तुम्ही होतां तोपर्यंत, मला तुमची खरी किंमत कळतच नव्हती! तुम्हाला सोडून मी वणवण फिरलो वेड्यासारखा ! - तुम्हीं काल म्हणाला तसाच, - तुमचा अरुण खरोखरच पोर होता! - अजूनहि तो तसाच आहे, बाबा! - पण आतां त्याच्यावरचं तुमचं प्रेमळ छत्र गेलं! - तुम्ही त्याला पोरका करून चाललां आहां! - बाबाऽ..मी आतांपर्यंत तुम्हालाहि, इतरांप्रमाणेंच, कुत्सितपणें 'उपकारी' म्हणत होतो! - पण माझ्या भोंवतालीं पसरलेलं अभ्र - पटल!..तें आतां विरूं लागलं - नव्हे विरलं! - आतां माझं उचंबळून येणारं हें निर्मल हृदय - आज मला पुन्हा पुन्हां ओरडून सांगतं आहे, कीं - माझे बाबाच खरे श्रेष्ठ प्रतीचे उपकारी माणूस! - ''

# - द्वितीय खंड संपूर्ण -

## - अल्प विश्रान्ति -